९९०१८
म. ग्रं. सं. ठाणें
विषय इतिहास
सं. क्र. ६७१



REFBK-0000382

ज. ग्रं. सं. ठाणं
इतिहास
२२८

सं. ३ नं. ८२

ग्रंथमालेंत छापलेलें प्रकरण.

जगांतील क्रांतिकारक लढाया

भाग १ ला.

३८२

हें पुस्तक

सीलोनचे माजी चीफ् जज्ज सर एडवर्ड क्रीसी ह्यांच्या

" जगांतील पंधरा क्रांतिकारक लढाया. "

ह्या पुस्तकाचे आधारें

जनार्दन सखाराम करंदीकर बी. ए, एल्एल्. बी.

शिक्षक समर्थ विद्यालय तळेगांव (दाभाडें)

ह्यांनीं लिहिलें

तें

REFBK-0000382

रा० रा० विष्णु गोविंद विजापूरकर एम्. ए.

ह्यांनीं

कोल्हापूर--श्रीसमर्थप्रसाद छापखान्यांत छापून प्रसिद्ध केलें.

शके १८२९ इसवी सन

किंमत रु. २।१२

म. इ. ने. C...
ता. ....
इ) नं. .

अर्पणपत्रिका.

हें पुस्तक

कै० रा० रा० त्र्यंबक गंगाधर खांडेकर

माजी हेड्मास्तर

परशुराम भाऊ हायस्कूल जमखंडी

ह्यांस

त्यांची स्वधर्मनिष्ठा, कर्तव्यतत्परता, शिष्यवृंदा-

विषयीं कळकळ, ज्ञानलालसा इत्यादि

गुणांचें स्मारक ह्मणून

अर्पण केलें असें.

आज्ञाधारक व नम्र शिष्य,

जनार्दन सखाराम करंदीकर.



प्रस्तावना.

सांप्रतच्या कालास सुधारणेचें युग असें ह्मणतात. ह्या युगांत बंडाळ्या, रक्तपात, लढाया ह्यांचा सुधारलेल्या राष्ट्रांस तिटकारा यावा हें साहजिकच आहे. ह्याकरितांच राष्ट्राराष्ट्रांतील तंटे विकोपास जाऊं न देतां सामोपचारानें मिटवून रक्तपात टाळावा ह्या स्तुत्य उद्देशानें हेग कान्फरन्ससारख्या संस्था स्थापन झाल्या आहेत; व त्या संस्थेच्या परिश्रमानें थोडाबहुत रक्तपात टळलाही असेल. अशा शांततेच्या काळांत केवळ लढायांच्या वर्णनानें भरलेलें पुस्तक लिहिणें अनवश्यक व निरर्थक वाटणार. पण जगांत कितीही ठिकाणीं शांततापरिषदेचें अभिनिवेशन झालें, तरी जोंपर्यंत कामक्रोधादि षड्रिपूंचा पगडा मानवांचे मनावर कायमच आहे, तोंपर्यंत 'बळी तो कान पिळी' हाच न्याय अखेरीस अंमलांत येणार. देशांत कितीही उत्तम कायदे प्रचलित असून सर्वत्र शांतता राखण्याचें व प्रजेच्या संरक्षणाचें काम राजाकडून अत्युत्कृष्ट रीतीनें बजाविलें जात असलें, तरीसुद्धां प्रजेला स्वसंरक्षणाच्या हक्काची बजावणी करण्याचा प्रसंग येतो, त्याचप्रमाणें एखाद्या राष्ट्रास आपलें अस्तित्व, स्वातंत्र्य अगर मान राखण्याकरितां युद्ध करणें अवश्यक होऊन बसतें. आतां त्या युद्धाला धर्मयुद्धाचें स्वरूप किती व कसें द्यावयाचें हा भाग निराळा. पण कित्येक प्रसंगीं मानवी जीवित्वावद्दलची सर्व कळकळ बाजूस सारून लाखो लोकांचे प्राणांची आहुति देऊन व घेऊन स्वपक्षसमर्थन करणें भाग पडतें हें निर्विवाद आहे. एतावता युद्धप्रसंग जर कोणत्याही राष्ट्रास अजीबात टाळतां येत नाहीं, तर प्रत्येक राष्ट्रांतील व्यक्तीव्यक्तीनें युद्धकलेचें थोडेंबहुत मर्म जाणणें अवश्यक नाहीं काय? ह्या दृष्टीनेंच मोठमोठ्या योद्ध्यांच्या युद्धचमत्काराशीं परिचय असणें हें

एक युद्धशिक्षणाचें प्रधान अंग गणिलें जातें; आणि शिकंदर, नेपोलियन, हानिबाल वगैरेसारख्या युद्धविशारदांच्या लष्करी डावपेचांच्या वर्णनात्मक पुस्तकांचीं पाश्चात्य देशांत पारायणें होत असतात. परंतु प्रस्तुतचा ग्रंथ मूळ ग्रंथकारानें ह्या लष्करी शिक्षणाच्या हेतूनें लिहिलेला नाहीं, तर तो सामान्य वाचकांकरितांच लिहिलेला आहे. कारण युद्धाचा इतिहास जसा शिपाईबच्चांस तसाच राजकारणी पुरुषांस, मुत्सद्यांस, समाजसुधारकांस सर्वांसच अत्यंत बोधप्रद असतो. लढाई ही कित्येक सद्गुणांची पोषक असते. त्यांत मुख्यत्वेंकरून आज्ञाधारकपणा, शौर्य, आणि मर्दानी स्वार्थत्याग ह्यांचा समावेश होतो. लढाईंत जिवाची पर्वा मुळींच न बाळगतां, किंबहुना प्रसंगीं आपल्या प्राणाची हेतुपुरस्सर आहुति देऊन आपल्या राष्ट्राचें हित साधावें लागतें. हाच खरा स्वार्थत्याग होय. ह्यामुळेंच,

‘ द्वाविमौ पुरुषौ लोके सूर्यमंडलभेदिनौ ।
परिव्राड्योगयुक्तश्च रणे चाभिमुखो हतः ॥

या श्लोकांत वर्णिल्याप्रमाणें असल्या मर्दांची योग्यता योग्यांचे बरोबरीची मानिली जाते. अशा निस्सीम स्वार्थत्यागाचीं उदाहरणें सदोदित डोळ्यापुढें वागल्यास त्यांचें अनुकरण करण्याची स्फूर्ति कचित्प्रसंगीं अंतःकरणांत होण्याचा संभव असतो. तथापि प्रस्तुतचें पुस्तक निराळ्याच दृष्टीनें लिहिलेलें आहे. ह्या पुस्तकांत लढायांचा जो समावेश केला आहे तो लढाईच्या मूळ कारणाच्या न्यायान्यायावरून अगर सेनानींच्या युद्धकौशल्यावरून अथवा शिपायांच्या अंगच्या अचाट मर्दुमकीवरून केलेला नाहीं. तर ज्या लढायांमुळें जगाचे इतिहासास एका प्रकारचें विशिष्ट वळण लागलें, तेवढ्यांचाच ह्या पुस्तकांत समावेश केला आहे. लढाईच्या आदिकारणाच्या न्यायान्यायाकडे न पाहतां केवळ तिच्या परि-

णामावरूनच वाचकांचें लक्ष्य वेधून टाकणाऱ्या कांहीं लढाया आहेत. त्यांच्यायोगानें जगाच्या राजकीय, सामाजिक व औद्योगिक स्थितीवर कायमचे विलक्षण परिणाम घडून आले आहेत. अशा लढायांस क्रांतिकारक अशी संज्ञा दिली आहे. कार्यकारणभाव शोधीत मागें गेलें असतां जगाला प्रस्तुतची स्थिति ज्या लढायांमुळें प्राप्त झाली, आणि ज्यांचे परिणाम हल्लींहून भिन्न तऱ्हेचे झाले असते तर मानवी प्रगतीचा ओघ कोणत्या दिशेनें वाहत गेला असता अशाप्रकारचें गूढ पडतें, असल्या चिरपरिणामी लढाया क्रांतिकारक होत.

टूर्सच्या लढाईविषयीं लिहीत असतां हॅलॅम ह्मणतो, 'ज्या लढायांचा परिणाम विपरीत झाला असता तर जगाचे इतिहासाचा ओघ बदलून त्यास निराळीच दिशा लागली असती, अशा मॅरेथान, मेटॉरस, आरबेला, चॅलान्स, लिप्झिक, इत्यादि लढायांचा तोडीचीच ही टूर्सची लढाई आहे'. हॅलॅमच्या ह्या शेऱ्यावरूनच कीसी साहेबांनींही क्रांतिकारक लढायांची कल्पना उचलली. पण जगांतील क्रांतिकारक लढाया कोणत्या याविषयीं हॅलॅमशीं त्यांचें ऐकमत्य नाहीं यांत कांहीं नवल नाहीं. कोणाही दोघां इतिहासकारांस इतिहासोदधि मंथन करून क्रांतिकारक लढायांची यादी करण्यास सांगितलें तर त्यांचीं मतें सर्वांशीं सारखींच पडतील असें नाहीं. तथापि मुख्य तत्त्व सर्वांस सारखेंच मान्य असल्यावर विशिष्ट युद्धप्रसंगाविषयींचा मतभेद फारसा महत्त्वाचा नाहीं हें उघड आहे. आतां कोणतीही एकादी लढाई व तिचा जगाचे इतिहासावर परिणाम यांचा कार्यकारण-संबंध जोडतांना प्रत्यक्ष व उघड उघड दिसून येणारा तेवढाच संबंध पाहिला पाहिजे. नाहीं तर अनवस्था प्रसंग येऊन कोणत्याही क्षुल्लक लढाईसमुद्धां नसतें महत्त्व येईल. ह्याकरितांच तसला परंपरित संबंध

बाजूस ठेऊन केवळ साक्षात् संबंधाचा मात्र विचार प्रस्तुत ग्रंथांत केला आहे; आणि अशा कार्यकारणसंबंधानें वरील व्याख्या ज्यांस लागू पडेल तेवढ्याच लढायांचा ह्या पुस्तकांत समावेश केला आहे. असल्या लढाया ह्मणजे सुधारणादेवीच्या मंदिराच्या पायऱ्याच होत.

जपाननें सुशिमाच्या लढाईत 'न भूतो न भविष्यति' असा विजय संपादन केल्याचें वृत्त प्रसिद्ध होतांच इतिहासशास्त्रवेत्त्यांनीं ती जगांतील **सोळावी** क्रांतिकारक लढाई असें ठरविलें. तज्ज्ञांचें हें मत वाचल्यावर पूर्वीच्या पंधरा लढायांची माहिती करून घेण्याची जिज्ञासा उत्पन्न होणें साहजिकच आहे. ही जिज्ञासा तृप्त होऊन शिवाय 'युद्धस्य कथा रम्या' या न्यायानें वाचकांचें मनोरंजनही होईल आणि त्याबरोबर साहजिक रीतीनेंच जगाच्या प्रारंभापासून आजपर्यंतच्या इतिहासांतील कांहीं ठळक ठळक घडामोडींचें ज्ञान होईल, ह्या हेतूनें क्रीसी साहेबांच्या पुस्तकाचें भाषांतर करण्याचें योजिलें. हें भाषांतर शब्दशः केल्यास ग्रंथ फार वाढेल व सामान्य वाचकांस तो कंटाळवाणा होईल हें जाणून महत्त्वाचा कोणताहि भाग न गाळतां लढायांच्या वर्णनांत थोडीबहुत छाटाछाट करून हें रूपांतर केलें आहे. क्रीसीच्या पुस्तकावरून पंधरा लढायांचीं वर्णनें देऊन, शेवटच्या सुशिमाच्या लढाईचें वृत्त तत्कालीन वृत्तपत्रांवरून घेतलें आहे. मूळ ग्रंथकारानें केलेली निवड कांहीं बाबतींत अव्याप्ति दोषास तर कांहीं ठिकाणीं अतिव्याप्ति दोषास पात्र असल्यानें आक्षेपार्ह आहे; परंतु ग्रंथ समग्र वाचल्यावांचून त्यावरील टीकेचें मर्म कळणें शक्य नसल्यानें टीकात्मक भागाचा समावेश प्रस्तावनेंत न करितां त्यास उपसंहारांत स्थळ दिलें आहे. मूळ ग्रंथांत असलेले अव्याप्ति व अतिव्याप्ति हे दोष रूपांतरांतून काढून टाकण्याचा प्रयत्न कां केला नाहीं, त्याचेंही सकारण विवेचन तेथेंच केलें आहे.

एशिया खंड व एशिआटिक लोक यांचेविषयीं क्रीसीच्या मनांत इतका तिटकारा वसत होता कीं, एशियाटिक लोकांत कांहीं वाखाणण्याजोगे अगर अनुकरणीय गुण असतील अशी शंकाही त्यास आली नाहीं. ह्मणून त्यांच्याविषयींचे अनुदार उद्गार त्यांनीं वेळोवेळीं प्रगट केले आहेत; परंतु बहुतेक स्थळीं ते अप्रासंगिक असल्यानें गाळून टाकले आहेत. इंग्रजांचे अंगीं मुरलेला अहंकार, परकीयांविषयींचा तिटकारा, व ह्या दोहोमुळें अपरिहार्य असा अल्पस्वल्प पक्षपात एवढे दोष वजा केले असतां, इतर बाबतींत क्रीसी साहेबांचें पुस्तक खरोखरच वाचनीय आहे. प्रत्येक लढाईचें महत्त्व, त्यायोगानें इतिहासांत घडलेली क्रांति आणि प्रत्यक्ष युद्धप्रसंगाचें वर्णन हीं सर्व त्यांनीं चटकदार भाषेनें विशेष पाल्हाळ न लावतां केलीं आहेत. प्रत्येक लढाईचें वर्णन देण्यापूर्वी तें वर्णन समजण्याइतपत त्या त्या देशाच्या इतिहासाची जरूर तितकी माहिती वाचकांस आहे असें गृहीत धरून चाललें पाहिजे. नाहीं तर एका सुशिमाच्या लढाईचे कारणाची मीमांसा करावयाची ह्मटल्यास चीन, जपान, रशिया, इत्यादि देशांच्या इतिहासाची पुनरावृत्ति करावी लागेल. आतां जी माहिती वाचकांस आहेच असें गृहीत धरून चालतों, तितकें इतिहासाचें ज्ञान नसलेल्या वाचकांससुद्धां या पुस्तकापासून करमणूक होणार आहे. केवळ कांहीं टीकात्मक अगर चर्चात्मक भाग खेरीजकरून इतर सर्व मजकूर इतिहासानभिज्ञ वाचकांसही समजण्याजोगा आहे; आणि अशा वाचकांचे मनांत विस्तृत माहितीविषयीं जिज्ञासा उत्पन्न होऊन त्यांचें मन इतिहासाचे वाचनाकडे लागावें हाही एक हें भाषांतर करण्यांत हेतु आहे.

तथापि स्वतःची अगर वाचकांची केवळ ऐतिहासिक ज्ञानाची लालसा तृप्त करण्याकरितां अथवा कांहीं तरी करमणूक ह्मणून प्रस्तुतचें भाषांतर

केलेलें नाहीं. हे हेतु असले तरी ते गौण आहेत, करितां प्रधान-हेतूचाहि येथें स्पष्टपणें उल्लेख करणें जरूर आहे. तो हेतु ह्मणजे वाचकांनीं प्रस्तुत पुस्तकापासून घ्यावयाचा बोध हा होय. मॅरेथानच्या लढाईपासून सुशिमाच्या लढाईअखेर सोळा लढाया भिन्नभिन्न राष्ट्रांत भिन्नभिन्न कालीं झालेल्या आहेत. परंतु ह्या सर्वांपासून वाचकांनीं एकच धडा शिकण्याजोगा आहे. या जगांत निव्वळ चांगली किंवा निव्वळ वाईट अशी कोणतीही गोष्ट नाहीं; त्याचप्रमाणें कोणतीही चांगली अगर वाईट गोष्ट चिरकाल टिकणारी नाहीं. त्यामुळें कोणीही निराश होतां कामा नये. अमुक एक गुण आपले अंगीं नाहींत व ते कधींही प्राप्त होणें शक्य नाहीं, अथवा आपल्या अंगीं खिळलेले कोणतेही दुर्गुण कदापि नाहींसे व्हावयाचे नाहींत, अशी आपली निराशा कोणीही करून घेऊं नये. जगाचें रहाटगाडगें चाललेंच आहे, त्यांत आज 'रिक्त' आहेत ते कालांतरानें 'भरित' होतात आणि त्याचप्रमाणें 'भारितांचें' 'रिक्त' होतात. तसेंच सुष्टाचे दुष्ट, दुष्टाचे सुष्ट, शूराचे नेभळे, नेभळ्याचे शूर, देशाभिमान्याचे देशद्रोही, देशद्रोह्याचे देशाभिमानी, असा उलटसुलट प्रकार सदोदित कालचक्राबरोबर चाललाच आहे. जे पर्शियन शिपाई मॅरेथानच्या लढाईच्या पूर्वी अजिंक्य ह्मणून गाजलेले होते त्यांचा मॅरेथॉनच्या समरभूमीवर मूठभर अथीनियन्सनीं पुरा नक्षा उतरला. त्याच अथीनियन लोकांना सॅरेक्यूज बेटांत पळतां भुई थोडी झाली. मेटॉरस लढाईत शत्रूस हुलकावणी दाखवून त्यांजवर अचानक छापा घालून त्यांची लांडगेतोड करणाऱ्या रोमन शिपायांस विन्फील्डच्या लढाईत अर्मिनिअसनें गोत्यांत घालावें हें आश्चर्य नव्हे काय? बाराव्या चार्ल्सच्या शूर सैनिकांपुढें रशियन शिपाई भाजूबाईप्रमाणें पळत असत; परंतु पुल्टोवाच्या लढाईत त्याच भित्र्या रशियनांनीं अशी गर्दुमकी गाजविली कीं सगळें युरोपखंड आश्चर्यानें थक्क

होऊन गेलें. व्हामीच्या लढाईपूर्वी फ्रान्समधील लोकपक्षाच्या बहुतेक शिपायांस तलवार व बंदूक ह्यांचा उपयोगसुद्धां माहित नव्हता; व शत्रूच्या सैन्यांतून एकाददुसरा तोफेचा गोळा येऊन धडकतांच ते यःपलाय करीत असत; पण तसल्या नवशिक्या बाजारबुणग्यांनीं ब्रन्सविकच्या हाताखालील कसलेल्या सैन्याशीं टक्कर दिली आणि त्यांस धूळ चारिली. पुढें नेपोलियनच्या तालमींत तर तें फ्रेंच सैन्य अजिंक्यच बनलें. परंतु वाटर्लूच्या लढाईत त्यांनासुद्धां हार खावी लागली. रूसो जपानी युद्धापूर्वी रशियन पायदळाची आणि कोसॅक घोडेस्वारांची कोण बडेजाव! ज्यांच्या पराक्रमापुढें खुद्द नेपोलियनचाही टिकाव लागला नाहीं, आणि क्रिमियाचे लढाईत ज्यांनीं तुर्कस्थान, फ्रान्स आणि इंग्लंड अशा तीन प्रबळ राष्ट्रांशीं सामना केला, त्या राक्षसी शिपायांस जपानच्या वामनमूर्ति सैनिकांनीं धूळ चारिली हें आश्चर्यावह नव्हे काय? सारांश कालचक्राच्या फेऱ्याबरोबर दिसून येणारा हा उलट सुलट प्रकार पाहून कोणासही निराश होण्याचें कारण नाहीं हें कळून येईल. आह्मी कायमचेच नेभळे, आमच्यांत एकी कधीं व्हावयाचीच नाहीं, इत्यादि निराशाजनक कल्पनांनी जितकें आपल्या राष्ट्राचें नुकसान झालें आहे, तितकें दुसऱ्या कशानेंही झालें नाहीं. ह्याकरितां असल्या निराशाजनक विचारांचें उच्चाटन करून आशेचें बीजारोपण करण्याला हा ग्रंथ कारणीभूत होईल ह्या आशेनें हल्लींच्या प्रसंगीं तो छापून प्रसिद्ध करण्याचें धाडस केलें. आतां तो उद्दिष्ट हेतु कितपत साध्य होईल हें निराळें. परंतु ह्या ग्रंथाचे वाचनामुळें भग्न झालेला उत्साह पुनरपि उत्तेजित झाला, असें एकादें तरी उदाहरण आढळून आल्यास आपल्या श्रमाचें चीज झालें असें मानण्याला भाषांतरकार तयार आहे.

प्रस्तुत पुस्तक दीड वर्षापूर्वीच लिहून तयार झालें होतें; परंतु छापण्याच्या अडचणीमुळें तें तसेंच पडून राहिलें. पुढें सुदैवेंकरून

समर्थ विद्यालयाशीं माझा संबंध जडल्यानें मार्गातील अडचण अनायासेंच दूर झाली, ह्मणून हें पुस्तक वाचकांपुढें ठेवण्याचा योग येत आहे. परंतु भाषांतराकरितां पुस्तकाची निवड आणि भाषांतराचें सर्व काम पूर्वीच पूर्ण होऊन राहिलें असल्यानें त्याचा समर्थ विद्यालयाशीं कोणताही संबंध नसून सर्व दोषाबद्दल एकटा भाषांतरकारच जबाबदार आहे हें नमूद करून ठेवणें अवश्य वाटल्यावरून तसें करीत आहे.

समर्थविद्यालय, तळेगांव (दाभाडें) }
मिति मार्गशीर्ष वद्य १३ शके १८२९ }

जनार्दन.

जगांतील क्रांतिकारक लढाया.

भाग १ ला.

मॅरेथॉनची लढाई (इ० स० पू० ४९०.)

ग्रीस देशांतील ॲटिका प्रांताच्या पूर्वकिनाऱ्याजवळील एका टेकडीचे माथ्यावर इ० स० पूर्वी ४९० वे वर्षी अथेन्सचे लष्करी अम्मलदार कांहीं मसलत करण्याकरितां जमले होते. त्या डोंगराच्या पायथ्याशीं तळ देऊन राहिलेल्या शत्रुसैन्यावर ताबडतोब हल्ला करावा किंवा कसें, हा त्यांच्या वाटाघाटीचा विषय होता; परंतु त्या प्रश्नाचे निकालावर केवळ त्या जमलेल्या उभय दळांचेंच इष्टानिष्ट नव्हे तर सर्व मानवी जातीच्या सुधारणेची मदार अवलंबून होती.

ते मसलतगार अकरा होते. ॲटिकाच्या दहा पोटभागांतर्फे दहा. हे आपापल्या भागांतील सैन्याचे अधिकारी असून त्या सर्वांचे अधिकार समान होते व त्या सर्वांवर अथेन्समधील अर्कान नामक एक अधिकारी प्रमुख होता. त्याची सर्व सैन्यावर हुकमत चालत असे, ह्मणून त्यास 'युद्धपति' ह्मणत असत. लढाईचे मसलतींत आपलें मत देण्याचा त्यास अधिकार असून युद्धाचे वेळीं उजव्या टोळीचे आधिपत्याचा मान त्याजकडे असे. या लढाईचे वेळीं कॅलिमॅकस नांवाचा एक धीरोदात्त अथीनियन 'युद्धपति' होता. तो त्या अम्मलदारांचा वादविवाद लक्ष्यपूर्वक

ऐकत होता. आपल्या मतावर सर्व जगताचें कल्याण अकल्याण अवलंबून असल्यानें भावी पिढ्या आजच्या वादविवादाचें किती सूक्ष्मनिरीक्षण करतील याची त्यांस कल्पनासुद्धां नव्हती, तथापि तो वादग्रस्त प्रश्न त्यांस हरिणकाळजी लावणारा होता.

त्यांच्या विरुद्ध पक्षाचें सैन्य हें तत्कालीन ज्ञातजगतांतील लहान मोठीं सर्व संस्थानें केवळ पन्नास वर्षांच्या अवधींत पादाक्रांत करणाऱ्या बलाढ्य पर्शिया देशाचें होतें. ती सेना त्या देशाच्या राजानें अथीनियन्स व एरिट्रियन्स यांचा सूड उगविण्याकरितां मुद्दाम रवाना केली होती. त्या सैन्यानें आपली अर्धी कामगिरी उरकून टाकली होती. एरिट्रियन लोकांचा पुरा मोड करून सार्डिस शहर जाळण्यास अथीनियन लोकांस मदत करणाऱ्या त्यांच्या धाडसी पुढाऱ्यांस कैद करून आणून त्यांनीं एजिलिया बेटांत त्यांस बंदींत ठेविलें होतें. आतां त्यांचे साथीदार जे अथीनियन्स त्यांसही कैद करून एशिया खंडास न्यावें, व डरायस बादशहापुढें सर्वांस आपली शिक्षा ऐकण्यास उभे करावें, असा त्यांचा बेत होता. शिवाय अथीनियन लोकांनीं हाकून लाविलेला त्यांचा जुलमी राजा हिपायस हा स्वार्थ साधण्याकरितां पर्शियन लोकांस शरण गेला होता, व त्याचे साह्यानें अथेन्स शहर काबीज करून शत्रूच्या कत्तलींतून जे लोक अवशिष्ट राहतील व डरायसकडे कैद करून नेण्यालाही जे नालायख ठरतील अशा रहिवाशांवर फिरून एकदां आपली जुलमी सत्ता गाजविण्याच्या प्रबळ इच्छेनें तो पर्शियन सैन्याबरोबर आला होता.

आपल्या व आपल्या प्रतिपक्षाच्या सैन्याच्या संख्येंत जमीनअस्मानाचें अंतर पाहून कांहीं मसलतगारांचे छातींत धडकी भरली होती. या युद्धानंतर थोडक्याच दिवसांनीं ज्या इतिहासकारांनीं या युद्धाचा

इतिहास लिहिला त्यांनीं दोहों सैन्यांची संख्या नमूद केलेली नाहीं. तथापि अथीनियन सैन्याची संख्या अंदाजानें ताडण्यास इतर साधनें आहेत. प्रत्येक ग्रीक मनुष्यास लष्करी शिक्षण अवश्यक होतें, व निरनिराळ्या संस्थानांच्या सरहद्दीवर किरकोळ झटापटी नेहमीं चाललेल्याच असत. त्यामुळें वयांत आलेल्या ग्रीक मनुष्यानें युद्धप्रसंग पाहिला नाहीं असें क्वचितच घडत असे. परंतु युद्धोपयोगी अथीनियन प्रजेची खानेसुमारी कधीं तीस हजारांवर गेली नाहीं, व चालू युद्धाचे वेळीं तर ती सदर संख्येच्या दोनतृतीयांशाइतकीच असावी. या वीस हजारांतसुद्धां दारिद्र्यामुळें ज्यांचेजवळ हत्यारपात्यार नाहीं, व ज्यांस कवाईतीची माहिती नाहीं त्यांची संख्या वजा टाकिली पाहिजे. शिवाय करोल सैन्यापैकीं कांहीं पलटणी खुद्द अथेन्सचे संरक्षणास व कांहीं ॲटिकाप्रांतातील इतर ठाण्यांचे बंदोबस्तास ठेवून द्याव्या लागल्या. सारांश, पर्शियन सैन्य ग्रीसचे किनाऱ्यावर उतरल्याची बातमी ऐकतांच जें निवडक सैन्य अथेन्सहून शत्रूस टक्कर देण्यास निघालें तें दहा हजारांहून अधिक असणें संभवनीय नाहीं.

ग्रीस देशांतील कोणतीं संस्थानें अथेन्सच्या मदतीस येतील तर शपथ. स्पार्टन लोकांनीं सहाय्य करण्याचें अभिवचन दिलें होतें; पण पर्शियन सैन्य ग्रीसचे किनाऱ्यावर शुक्लपक्षांत उतरल्यामुळें स्पार्टन लोकांच्या धर्मसमजुतीप्रमाणें पौर्णिमा होऊन जाईपर्यंत त्यांस लढाईस निघतां येईना. या असल्या आणीबाणीच्या वेळीं एका अकल्पित दिशेकडून मात्र अथेन्सला मदत मिळाली.

कांहीं वर्षांपूर्वी बोएशिया प्रांतांतील प्लॅटिआ संस्थानावर शेजारच्या थीब्स संस्थानची वक्रदृष्टि झाली होती. त्यावेळीं अथेन्सनें त्यास सहाय्य केलें म्हणूनच प्लॅटिआ संस्थानचें स्वातंत्र्य कायम राहिलें. आतां

पृथ्वीच्या पूर्वदिशेकडील मीड्स देशाचा राजा अथेन्सचा नायनाट करण्यास उद्युक्त होऊन त्याजवर चालून आल्याचें वर्तमान ग्रीस देशभर पसरतांच ते कृतज्ञ प्लॅटियन लोक आपखुषीनें आपल्या संरक्षणकर्त्यांचे सहाय्यास आपलें बलसर्वस्व घेऊन धांवत आले. त्यांचें सैन्य केवळ एक हजार होतें. तें संख्येनें जरी अल्प होतें तरी त्यांतील शिपायांचे हिंतमीनें तें दसपट असल्याप्रमाणें वाटत होतें. स्पार्टन लोकांची कुमक येऊन न पोंचल्यानें आपल्या पक्षास कोणाचें साहाय्य नाहीं असा जो खेदजनक विचार शिपायांचे मनांत उद्भव होता, तो यामुळें पार नाहींसा झाला. अथेन्सला या अल्पबल पण आस्थेवाईक साथीदारांच्या उदात्त धाष्ट्र्याचा विसर कधींच पडला नाहीं. कांहीं विशिष्ट राजकीय हक्क खेरीजकरून आपल्या नागरिकांचे सर्व हक्क अथेन्सनें प्लॅटियाला दिले, व त्यावेळेपासून अथेन्समधील प्रत्येक यज्ञाचे वेळीं अथीनियन्सबरोबर प्लॅटियन्सचेंही अभीष्ट चिंतन केलें जात असे.

प्लॅटियाचे सैन्याची जोड मिळाल्यावर ग्रीक कवाइती सैन्य अकरा हजार झालें. याशिवाय कित्येक आडहत्यारी व विन कवाइती टोळ्या होत्या. कित्येक दरिद्री नागरिक बर्च्छा, ढाल, तलवारी, अगर इतर जें कांहीं हत्यार वेळेनुसार मिळेल तें घेऊन संमरांगणावर जात. प्रत्येक कवाइती शिपायाचे दिमतीस तात्पूर्ती हत्यारें वागविणारा एक एक गुलाम असे. अथीनियन सैन्यांत घोडेस्वार व तिरंदाज यांची मात्र पुरी वाण होती.

अथेन्सच्या ह्या मूठभर शिपायांस चिरडून टाकण्याकरितां, पूर्वेच्या बादशहाचे हुकूम झेलणाऱ्या विविध राष्ट्रांचें जें सैन्य ॲटिकाच्या किनाऱ्यावर उतरलें होतें त्याची गणतीच करतां येण्याजोगी नव्हती. समुद्र पार होण्यास नावांची अडचण, व सैन्यास सामुग्री पुरविण्याची असं-

भाव्यता, यायोगानेंच पर्शियन सैन्याचे संख्येस कांहीं आळा पडला होता. तें सैन्य किमानपक्ष एक लक्ष असावें असें जस्टिनचें अनुमान आहे. यांत कांहीं अतिशयोक्ति असण्याचा संभव नाहीं. या संख्येंतून दर्यावर्दी, खलाशी व बाजारबुणगे वजा टाकल्यासही बाकीची करोल फौज अथेन्सच्या सर्व सैन्यास चिरडून टाकण्यास पुरी आहे असें वाटत होतें. मॅरेथानच्या जयापासून युरोपियन सैन्यास एशियाटिक सैन्य ह्मणजे कःपदार्थ वाटतें. रोमन लोकांस मिथ्रिडेट्स व टायग्रेनस यांच्या हाताखालील लक्षावधि सैन्य अगर मॅरेथॉननंतरच्या लढायांत ग्रीक शिपायांस पर्शियन सैन्य, किंवा अर्वाचीन काळीं इंग्लिश सोजीरांस हिंदुस्थानांतील बिनकवाइती सैन्य जसें खिसगणतींत नसतें तसाही प्रकार त्यावेळीं नव्हता. उलट त्यावेळेपावेतों पार्शियन व मीडियन सैन्य ह्मणजे अजिंक्य अशीच सार्वत्रिक समजूत होती. एशियामायनर, सायप्रस, आणि इजिप्त या देशांत जेथें जेथें ग्रीक व इराणी सैन्यांचा सामना झाला तेथें तेथें ग्रीक लोकांसच हार खावी लागली होती. यामुळें त्यांचे मनावर पर्शियन सैन्याचा दरारा बसून गेला होता. अशा नाणावलेल्या व संख्येनें अधिक अशा सैन्यावर चालून जाऊन निकराची लढाई देण्यास पांच ग्रीक सरदारांचीं मतें विरुद्ध पडलीं यांत कांहीं नवल नाहीं. कारण टेंकडीवरील त्यांचे छावणीची जागा मजबूत असून मूठभर शिपायांस प्रचंड परचक्रापासून बचाव करून घेण्यास सोईची होती. अशी सुरक्षित जागा सोडून पुढें चालून जाणें ह्मणजे मूर्खपणाची कमाल होय. कारण त्यायोगानें सर्व ग्रीक सैन्य डरायसच्या घोडेस्वारांच्या टापांला, तिरंदाजांच्या बाणांला, किंवा शिपायांचे तलवारीला, बळी पडावयाचें. शिवाय सगळ्या ग्रीस देशांत मर्दराष्ट्र ह्मणजे स्पार्टा. त्या स्पार्टन लोकांनीं पौर्णिमेनंतर निघून मदतीस येण्याचें वचन दिलें होतें. तेव्हां या सर्व परिस्थितीचा विचार करितां निदान स्पार्टन फौज

मदतीस येईपर्यंत आपण होऊन चढाई करून जाऊं नये असें पांच अम्मलदारांचें मत पडलें.

वर नमूद केलेलीं कारणें बाह्यतः कितीही निरुत्तर वाटलीं तरी त्यांचा पोचटपणा इतर पांच सरदारांचे लक्षांत आला होता. अथेन्सच्या किंवहुना सर्व जगाच्या सुदैवेंकरून त्या पांच अम्मलदारांत मिल्टाइडीस नामक एक तरुण सरदार होता. त्याची मति युद्धकलेंत अकुंठित होती एवढेंच नव्हे; तर आपले विचार प्रतिपक्षाचे मनावर ठसविण्याची हातोटीही त्यास चांगली साधली होती.

मिल्टाइडीस हा अथेन्समधील एका श्रेष्ठ कुलांतील पुरुष होता. तो ॲकिलीजचा वंशज असल्यानें ट्रॉयच्या योद्ध्याचें रक्त मॅरेथॉनच्या वीराच्या अंगांत खेळत होतें असें मानण्यास प्रत्यवाय नाहीं. पर्शियाचा राजा डरायस यानें जेव्हां युरोप खंडांतील हेलेस्पांट प्रांतांत आपला अम्मल बसविला तेव्हां थ्रेसियन द्वीपकल्पांतील संस्थानिक मिल्टाइडीस हा त्याचा मांडलिक बनला. पुढें डरायसनें सिथियन लोकांवर स्वारी केली. त्यावेळीं इतर मांडलिकांबरोबर मिल्टाइडीसही स्वसैन्यासह डरायसचे फौजेंत होता. डरायसनें डॅन्यूब नदीपावेतों सर्व मुलूख जिंकून ती नदी ओलांडली आणि डॅन्यूब व नीपर यांचे दुआबांत राहणाऱ्या कोसॅक शिपायांचे प्रांतांत तो शिरला. आपले पाठीमागें डॅन्यूब नदीवरील पुलाच्या संरक्षणाकरितां त्यानें कांहीं फौज ठेवून दिली होती. तींत मिल्टाइडीसही होता. डरायस जो एकदां पूल ओलांडून गेला तो कित्येक महिने त्याचा पत्ताच नव्हता. त्यावेळीं मिल्टाइडीसचे मनांत एक भयंकर कल्पना आली. डॅन्यूब नदीवरील पूल पुरा पाडून टाकून आपापल्या पथकांसह आपण स्वदेशास निघून जावें, ह्मणजे परभारें सिथियन लोकांकडून डरायसची इतिश्री होते, व सर्वांवरचें अरिष्ट आपोआप

टळतें असें त्यांनीं सुचविलें; परंतु त्याप्रमाणें वागण्याचें धैर्य इतर सेनानायकांस न झाल्यानें तो विचार तसाच राहिला. पुढें डरायस परत आला तेव्हां त्यास मिल्टाइडीसच्या घातुक सूचनेची गुणगुण कळली; पण त्यावेळीं त्यानें गय केली. तथापि त्या वेळेपासून मिल्टाइडीस व डरायस यांचे मनांत परस्पराविषयीं अढी बसली. हाच मिल्टाइडीस आतां अथेन्सच्या सैन्याचा अधिपति होता.

मिल्टाइडीसचे मनानें लढाईचें पुढील धोरण ठाम ठरवून टाकलें होतें व तें मत आपल्या जोडीदार सरदारांच्या मनावर ठसविण्याची त्यानें पराकाष्ठा केली. ग्रीस सैन्याच्या युक्तीनें व शिस्तीनें हालचाली केल्या तर तें पर्शियन सैन्याहून वरचढ ठरेल हें त्यास स्पष्ट दिसत होतें. आपल्या जागेची बळकटी व तेथून शत्रूच्या छावणीवर चालून जाऊन त्यांचें चंदन उडविण्याची सोय त्यानें पाहून ठेविली होती. शिवाय लढाई न देतां रिकामा काळ घालविल्यास फंदफितुरीला अवकाश मिळून देशाचें कसें सर्वस्वी नुकसान होतें याची त्यास चांगली कल्पना होती.

त्या सभेंत फक्त 'युद्धपति' कॅलिमॅकस यानें अद्याप मत दिलें नव्हतें. दोहों पक्षांस पांच पांचच मतें पडलीं असल्यानें कॅलिमॅकसच्या मतानेंच त्या प्रश्नाचा काय तो निकाल ठरावयाचा होता. यासाठीं मिल्टाइडीसनें त्याचें मन वळविण्यास प्रारंभ केला. तो ह्मणाला "कॅलिमॅकस, अथेन्सला तारणें अगर मारणें, स्वतंत्र अगर गुलाम बनविणें, हें तुमच्या मतावर अवलंबून आहे. अथेन्सचें एक राष्ट्र बनल्यापासून त्याजवर असलें अरिष्ट कोसळलें नव्हतें. या मीड्सलोकांपुढें मान वाकविणें ह्मणजे आमच्या मुंड्या हिपायसच्या हातीं देण्याप्रमाणेंच आहे. या जुलमी राजाच्या अंमलाचें सुख काय आहे तें

तुह्मांस अनुभवानें कळलेंच आहे. उलटपक्षीं अथेन्सचा जय झाला तर सर्व ग्रीक लोकांचें तें पुढारी शहर बनेल. आजचे आज लढाई देणें अगर न देणें हें तुह्मी ठरवावयाचें आहे. पण तें मत देण्यापूर्वी एक गोष्ट मात्र पक्की लक्षांत बागवा ती ही कीं, आजच्या आज लढाईस सुरवात केली नाहीं तर फितुरीचा सुकाळ माजेल, व देशद्रोही लोक बळावून अथेन्स शहर मीड्सलोकांचे ताब्यांत जाईल; परंतु देशद्रोहाची कीड लागण्यापूर्वीच जर आह्मी लढाईस सुरवात केली तर त्यांत आह्मांस जय येऊन सत्पक्षाचीच सरशी होईल."

मिल्टाइडीसच्या भाषणानें कॅलिमॅकसचें मन वळलें. त्यानें युद्धास अनुकूल मत दिलें. तत्काळ लढाई देण्याचें ठरलें. मिल्टाइडीसच्या युद्धनैपुण्याबद्दल इतर सर्व सरदारांची इतकी खात्री होती कीं, त्यांनीं आपले समान हक्क बाजूस ठेवून मिल्टाइडीसच्या हुकमतीप्रमाणें चालण्याचें वचन दिलें. पण मिल्टाइडीसनें आपल्या अधिकाराचा दुरुपयोग केला नाहीं. कारण न जाणो मत्सरपिशाच्च कोणाचे मनांत संचार करील व काय अनर्थ घडवील! यास्तव त्यानें अधिकाराचा अतिक्रम न करितां लढाई देण्याचा बेत ठरविला.

परंतु प्रथम पर्शियन लोकांच्या अथेन्सवरील या स्वारीचें कारण काय तें पाहूं. मॅरेथॉनचे लढाईचे पूर्वी सुमारे दहा वर्षे पर्शियाचा राजा डरायस यास अथेन्स शहरचें नांवही ऐकून ठाऊक नव्हतें. पुढें इराणी लोकांचे ताब्यांतील आयोनियन बेटांतील ग्रीक लोकांनीं पर्शियन लोकांचा अम्मल झुगारून देण्याकरितां बंड उभारलें. त्यांत अथीनियन्सनीं बंडवाल्यांस मदत केली. आयोनियन बंडवाल्यांनीं अथेन्सचे सहाय्यानें सार्डिस शहर जाळून फस्त केलें. सार्डिस शहर जाळल्याची बातमी ऐकतांच डरायसनें चौकशी केल्यावरून त्यास कळून आलें कीं,

ग्रीस देशांत अथेन्स ह्मणून एक लहानसें शहर आहे. तेथील रहिवाशांनीं आयोनियन्सना बंडास प्रवृत्त केलें, व आपल्या एका प्रांताची राजधानी असें सार्डिस शहर त्यांचेकडून जाळविलें. त्यावेळीं डरायसला अथेन्सच्या धाडसाबद्दल आश्चर्य वाटलें, आणि त्यानें अथेन्सचा सूड घेण्याची प्रतिज्ञा केली. त्या प्रतिज्ञेचें विस्मरण होऊं नये ह्मणून दररोज भोजनाचे वेळीं एक गुलाम 'सरकार अथीनियन्सची आठवण असूं द्या' अशी इशारत देत असे.

आयोनियन बंडवाल्यांचा पुरा पाडाव करण्यास डरायसला बरींच वर्षे लागलीं; पण त्यांची पक्की खोड मोडल्यानंतर आपली प्रतिज्ञा पुरी पाडण्याचे तयारीस तो लागला. याच सुमारास अथीनियन्सनीं हाकून लाविलेला जुलमी राजा हिपायस हा आपली गादी परत मिळविण्यासाठीं डरायसची मदत मागण्यास आला. डरायसला या 'राघोबादादा' चे वर्तीनें अथेन्सवर मोहीम करण्यास आयतेंच निमित्त मिळालें. त्यानें आपलें सैन्य व आरमार सज्ज करण्याबद्दल सक्तीचे हुकूम सोडले. त्याप्रमाणें सर्व इराणी बंदरांतून घोडे व सैन्य नेण्या आणण्यास उपयुक्त अशा नावा ईजियन समुद्रांत जमूं लागल्या. इकडे अशी जारीनें तयारी चालू असतां डरायसनें आपले दूत निरनिराळ्या ग्रीक संस्थानांकडे पाठवून त्यांस सामोपचारानें शरण येण्यास सुचविलें. ज्या संस्थानिकास शरण यावयाचें असेल त्यानें डरायसचें सार्वभौमत्व व आपलें मांडलिकत्व दर्शविण्याकरितां आपले संस्थानांतील थोडें पाणी व मृत्तिका दूतांचे हवालीं करावी अशी त्या वेळीं चाल होती. त्याप्रमाणें ठिकठिकाणाहून पाणी व माती गोळा करीत कांहीं वकील अथेन्सला व कांहीं स्पार्टाला गेले. या दोन्ही प्रमुख संस्थानांनीं राजनीतीचे सर्व नियम गुंडाळून ठेवून एका वकीलाला खोल खड्डा खणून त्यांत जिवंत पुरलें व दुसऱ्यास

समुद्रांत नेऊन बुडविलें. याप्रमाणें त्यांस भरपूर माती व पाणी मिळालें. ही वार्ता डरायसला कळतांच त्याचा क्रोध अनावर झाला. आगींत तेल ओतल्याप्रमाणें त्याचा संतापाग्नि भडकला. अथेन्सच्या स्वारीची तयारी जारीनें चालू झाली. डेटिस नामक मीडिश सेनापतीचे हाताखालीं सहाशें गलबतें व कित्येक होड्या जमा झाल्या.

डेटिसच्या पूर्वचरित्राबद्दल फारशी माहिती मिळत नाहीं. तथापि त्याचें शौर्य व कर्तृत्वशक्ति याविषयीं डरायसला पूर्ण भरंवसा असल्याशिवाय त्यानें त्याची असल्या महत्त्वाच्या मोहिमेवर योजना केली नसती. डेटिसला डरायसनें हुकूम केला कीं, 'ग्रीसदेश पादाक्रांत करून अथेन्स व एरिट्रिया येथील प्रमुख रहिवाशांस कैद करून आपलेपुढें आणून उभें करावें.'

सज्ज झालेलें आरमार व सैन्य घेऊन डेटिस निघाला. त्यानें वाटेंत नॅक्सिस, कॅरीस्टर, व एरेट्रिया हीं बंदरें घेतलीं. अथीनियन्सनीं एरिट्रियाचे मदतीस चार हजार सैन्य रवाना केलें होतें. पण एरिट्रियामध्यें फितुराचा सुळसुळाट होता. अथीनियन फौजेस त्याची वेळींच सूचना मिळाल्यामुळें पर्शियन सैन्यापासून स्वतःच्या शहराचें रक्षण करण्यास ती तात्काळ परत आली. एरिट्रियन्सनीं कसाबसा सहा दिवस टिकाव धरला. सातवे दिवशीं त्यांच्यांतील फितुरी लोकांनीं पर्शियन सैन्यास गुप्तपणें आंत घेतलें. याप्रमाणें एरिट्रिया बंदर पर्शियन लोकांचे स्वाधीन झालें. सार्डिस शहर जाळल्याचा सूड उगविण्याकरितां त्यांनीं तेथील मुख्य देवालयांस आग लावून दिली व प्रमुख नागरिकांस गुलाम करून एजिलिया बेटांत ठेवून दिलें. अथेन्सच्या पुढाऱ्यांसही कैद केल्यावर सर्वांस बरोबरीनेंच डरायस बादशहापुढें हजर करावें असा डेटिसचा हेतु होता; परंतु ईश्वरी नेमानेम वेगळाच होता तें त्या बिचाऱ्यांस कोठून कळणार?

येणेंप्रमाणें अर्धी अधिक कामगिरी बजावून जयानें तरे होऊन गेलेली आपली फौज डेटिसनें ॲटिकाच्या किनाऱ्यावर मॅरेथॉन नजीक उरतविली. त्यावेळच्या पद्धतीप्रमाणें त्यानें गलबतें किनाऱ्याचे लगत ओढवून ठेवविलीं. डेटिसला त्याच्या पाठीमागील बेटांतून रसद पोहोचत होती व कारण पडल्यास शिपायांचीही भरती होण्याजोगी होती. मॅरेथॉनचा किनारा डेटिसला सर्व तऱ्हेनें सोइस्कर होता. मुख्यत्वेंकरून तें मैदान सपाट असल्यानें अथीनियन्सनीं आपल्या छावणीवर हल्ला केल्यास त्यांची चांदी उडविण्याला त्यास घोडेस्वारांचा उपयोग करतां येण्याजोगा होता. पार्शियन सैन्याबरोबर हिपायस होता, त्यानेंही हीच जागा पसंत केली होती; पण त्यांत त्याचा दुसरा एक हेतु होता. सुमारें सत्तेचाळीस वर्षांपूर्वी पिसिस्ट्रेटस नामक आपल्या पित्यावरोबर तो याच किनाऱ्यावर उतरला होता व अथीनियन सैन्याचा पुरा मोड करून आपलें जुलमाचें जूं त्यांच्या मानेवर लादलें होतें. त्या वेळेप्रमाणेंच आतांही आपणास जयप्राप्ति व राज्यलाभ घडेल असें त्याचें अनुमान होतें; पण हिपायसला चांगलीच अद्दल घडून कळून यावयाचें होतें कीं, सत्तेचाळीस वर्षांत अथेन्स येथील नागरिकांचे शक्तींत विलक्षण फरक झाला आहे. तथापि एरिट्रियसप्रमाणें येथेंही फितुरी व विश्वासघातकी लोक मुळींच नव्हते असें नाहीं. मिल्टाइडीसनें एकदम लढाई देण्याचा बेत केला नसता तर देशद्रोही लोकांस संधि मिळाली असती व एरिट्रियाप्रमाणें अथेन्सचीही स्थिति झाली असती.

मॅरेथॉनचें समरांगण ॲटिका प्रांताच्या उत्तरपूर्व कोनांत अथेन्सहून बावीस मैलांवर मॅरेथॉन नांवाच्या उपसागराचे किनाऱ्यावर आहे. हें रणमैदान अर्धचंद्राकार असून त्याची लांबी सहा मैल आहे. मध्यभागीं

त्याची रुंदी दोन मैल असून ती दोहो बाजूंस कमी होत गेली आहे. मध्याचे सुमारास एक दरी असून तिचे दक्षिणेस एक खोरें आहे. तेवढी बाजू खेरीजकरून इतर सर्व बाजूंस चुनखडीच्या ठेकड्यांनीं त्या रणभूमीस वेष्टिलें आहे. या मैदानावर मॅरेथॉनच्या लढाईत पडलेल्यांचे स्मरणार्थ एक उंच बुरूज उभारलेला दृष्टीस पडतो; परंतु पर्शियन सैन्य त्या किनाऱ्यावर येऊन उतरलें त्या वेळीं तें मैदान केवळ सपाट होतें. त्याच्या दोहो टोंकांस दलदली आहेत; त्या वसंत व ग्रीष्मऋतूंत सुकलेल्या असत; पण या लढाईचे वेळीं वर्षाऋतु असल्यानें त्या दलदलींतून जाणें येणें दुर्घट होतें. घोडेस्वारांस तर तें अशक्यच होतें.

ग्रीक सैन्यास दुसरी एक सोय अशी होती कीं टेकडीवरून खालील सैन्याचे हालचालीवर चांगली नजर ठेवतां येत असे; व उलट पक्षीं त्यांचे बातबेताचा व हालचालीचा शत्रूस मुळींच सुगावा लागत नसे. ग्रीक लोकांना वाटेल त्यावेळीं शत्रूवर चालून जाणें अगर लढाई टाळणें शक्य होतें. पर्शियन सैन्याला मात्र शत्रूच्या हालचालीची वाट पहात स्वस्थ बसावें, किंवा टेकडी चढून जाऊन त्यांचे छावणीवर हल्ला करावा याशिवाय तिसरा मार्ग नव्हता.

ग्रीक व पर्शियन सैन्यांत जरी जमीनअस्मानाचें अंतर होतें, तथापि मिल्टाइडीसचा व त्याचे पक्षाचे सरदारांचा लढाई देण्याचा विचार मूर्खपणाचा होता, किंवा त्यास पुढें जो जय मिळाला तो केवळ काकतालीय न्यायानें होय, असें कदापि ह्मणतां यावयाचें नाहीं. मिल्टाइडीस हा मांडलिक या नात्यानें डरायसच्या सैन्याबरोबर होता हें पूर्वीच सांगितलें आहे. त्यावेळीं त्यानें पर्शियन सैन्याची स्थिति, रीति, व शक्ति अजमावून पाहिली होती. त्यावरून तें सैन्य 'देखनेमे ढबू और चलनेमे शिवराई' या मासल्याचें आहे अशी त्याची खात्री झाली होती. कायरसच्या

सैन्यांत खुद्द इराण व कुर्दिस्थान येथील डोंगराळ मुलखांतले धट्टे कट्टे धनगर व पहाडी शिपाई होते. त्यांच्या शौर्यामुळें कायरसला अपजय कधीं शिवलासुद्धां नाहीं; पण यावेळच्या डरायसच्या सैन्यांत कंटक शिपायांचा अभावच असून बहुतेक सैन्य ह्मणजे जिंकलेल्या मुलुखांतून जुलुमानें धरून आणलेले खोगीरभरती बारगीरच होते. त्यांना आपल्या धन्याच्या जयापजयाबद्दल फिकीर थोडीच होती; व त्याच्यासाठीं ते आपल्या प्राणाची पर्वा न करितां लढतील हें संभनीय नव्हतें. कारण किती झालें तरी ते भाडोत्री शिपाई. शिवाय टापटीप, शिस्त, हत्यारें व चिलखतें या सर्व बाबतींत पर्शियन लोकांची हलाखी होती हेंही त्यांचे शत्रूस दिसत होतें. पण सर्वांत मुख्य गोष्ट ह्मणजे आपले हाताखालील सैनिकांची व स्वतःची उमेद यांजवर मिल्टाइडीसचा अतोनात भरंवसा होता, तो अनाठायीं नव्हता हें पुढें सिद्ध झालेंच. असो.

जुलमी राजांचे जोखडाखालीं ज्या लोकांत विशेष तेज दिसून येत नाहीं तेच लोक समता व स्वतंत्रता या जादूनें किती तेजः पुंज बनतात, व त्यावरून स्वातंत्र्य व समत्व हे गुण किती उत्तेजक आहेत, याचा मासला अथीनियन्सनीं आपल्या शेजाऱ्यांशीं झालेल्या लढाईंत नुकताच दाखविला होता. तेच अथीनियन लोक आतां आपल्या प्रजासत्ताक राज्याकरितां लढायास उद्युक्त झाले होते. पर्शियन सैन्यांत त्यांचा हांकून लाविलेला जुलमी राजा हिपायस होता. त्यामुळें त्यांस दुप्पट त्वेष आला होता. याप्रमाणें मिल्टाइडीसला आपल्या बळाची सर्वतोपरी श्रेष्ठता दिसून येत होती. आपल्या शहरीं देशबुडवे लोक कांहीं आहेत हेंही तो जाणून होता; पण असले लोक वरिष्ठ जातींत मात्र असून रणभूमीवरील सैन्यांत त्यांचा शिरकाव झाला

नव्हता. आतां या लढाईंत एक जय मिळाला तरी पार्शियाहून दुसरें अधिक बलाढ्य सैन्य येऊन ग्रीस देश कावीज करील असल्याही दीर्घ शंका काढणारे कित्येक होते. त्यांस त्यांचें उत्तर हेंच कीं 'एकदां पर्शियन सैन्यावर ग्रीक लोकांस जय मिळूंदे. ह्मणजे सर्व ग्रीस देश त्यांचे विरुद्ध एक होईल; व खुद्द पर्शियन साम्राज्यांतच जे प्रांत बेदिल आहेत ते स्वातंत्र्याकरितां बंडाळी करण्यास लगेच प्रवृत्त होतील. अशा रीतीनें पर्शियन साम्राज्याचे तुकडे तुकडे होऊन तें नामशेष होईल."

याप्रमाणें या प्रश्नाबद्दल पूर्ण 'भवति न भवति' करून मिल्टाइडीसनें लढाई देण्याचें ठरविलें, व आपल्या सैनिकांस तयार होण्याविषयीं गुप्त रीतीनें हुकूम सोडले. 'युद्धपति' कॅलिमॅकस याजकडे उजव्या बाजूचें आधिपत्य ठराविकच होतें. प्लॅटियन सैन्याची योजना डाव्या बाजूस झाली. मध्यभागीं थेमिस्टाक्लिस व अरिस्टाइडीस यांचें सैन्य उभें करण्यांत आलें. ग्रीक सैन्यांत निव्वळ भालाइतांचा भरणा विशेष होता. कारण आडहत्यारी व बिन कवाइती फौजेचा उपयोग ते केवळ हातघाईच्या लढाईंत मात्र करीत. पराजित शत्रूंचा पाठलाग करण्याचे कामींही तिची योजना होत असे. अथीनियन सैनिकांचा जामानिमा ह्मटला ह्मणजे ढाल, तलवार, शिरस्त्राण उरस्त्राण, व पादवेष्टण हा होय. याप्रमाणें हत्यारबंद होऊन आठ आठ रांगांचें भालाईत पथक जुटीनें, धिम्मेपणानें व नेटानें पुढें चाल करून जात असे. परंतु या प्रसंगीं आपली नेहमीची पद्धत बाजूस ठेविली पाहिजे हें मिल्टाइडीसच्या तीव्र बुद्धीला तात्काळ कळून आलें. कारण आठ आठ रांगानीं शिपाई उभे केल्यास समरांगणाची सर्व जागा व्यापिली जाणार नाहीं; व तसें न होईल तर शत्रूचे घोडेस्वारांस दोहो बाजूनें वळसा घालून पिछाडीवर हल्ला करण्यास

सवड मिळेल व ग्रीक सैन्याचा कोंडमारा होऊन त्याची धुळधाण उडून जाईल. यास्तव आपले सैन्यांतील रांगांची संख्या कमी करून त्या जास्त विस्तृत करणें अवश्य होतें. मिल्टाइडीसनें सरसकट सर्व रांगा कमी न करितां मध्य भागांतील सैन्य कमी करून दोहो बाजूंची बळकटी कायम ठेविली, व सैन्याची लांबी वाढवून शत्रूकडून घेरिलें जाण्याची भीति नाहींशी केली. मध्यभागावर सेनापति स्वतः मिल्टाइडीस व असल्यानें तेथील सैन्य कमी केलें होतें तथापि ती बाजू ढासळण्याची त्यास बिलकुल धास्ती वाटत नव्हती.

टेकडीवरील चढउतारामुळें आपल्या हालचाली गुप्त ठेवून मिल्टाइडीसनें वर निर्दिष्ट केलेल्या रीतीनें आपल्या सैन्याची मांडणी केली. रीतीप्रमाणें देवतांचे नांवानें हवन होऊन व बळी देऊन जयसूचक चिन्हें दृष्टीस पडल्याचें जाहीर करण्यांत आलें, व कुच करण्याबद्दल शिंग फुकलें गेलें. तत्क्षणींच युद्धगीतें ह्मणत भाले सरसावून तें सैन्य शत्रूवर चाल करून निघालें. या भाल्यांच्या करामतीनें एशिया व युरोप खंडांमधील श्रेष्ठत्वाच्या प्रश्नाचा निर्णय व्हावयाचा होता. मिल्टाइडीसनें आपले फौजेस भरदौडीनें शत्रूवर चाल करण्यास फर्मावि‍लें. कारण टेकडी उतरल्यापासून पर्शियन छावणीस पोहोंचेपर्यंत जो कालावधि लागणार तेवढ्यांत पर्शियन घोडेस्वारांस घोड्यावर जीन ठेवण्यास व पायदळांस हत्यारबंद होऊन युद्धाचे शिस्तीनें उभे राहण्यास अवकाशच राहूं नये असा त्याचा हेतु होता. आतां अशा दौडीनें हल्ला केल्यास आपल्या सैनिकांस दम लागून शत्रूची गांठ पडतांच त्यांस निकरानें लढतां येणार नाहीं अशी शंका घेण्याचें कारण नव्हतें. कां तर अथीनियन्सना पळण्याचे शर्यतीची संवय असल्यानें त्यांचा दम लवकर छाटत नसे. टेकडीचे पायथ्यापासून पर्शियन छावणीपर्यंत अंतर

सुमारें एक मैल होतें. तितकें अंतर तोडून जाईपर्यंत शत्रूच्या तिरंदाजांच्या बाणांचा मार सोसावा लागणार तोही शक्य तितका टळावा ह्मणून त्यांस वेगानें चाल करून जाणें अवश्यक होतें. एकदां अंगलट केल्यावर बाणांचा कांहींच उपयोग होत नाहीं, व अशा हातघाईचे लढाईत आपले शिपाई शत्रूचा चांगलाच समाचार घेतील अशी मिल्टाइडीसची खात्री होती. या सर्व साधक बाधक गोष्टींचा विचार करूनच त्यानें दौडीनें जाऊन हल्ला करण्यास फर्माविलें होतें. हुकुमाप्रमाणें तें सैन्य एथ्रिलिजच्या पुढील अर्थाच्या कविता ह्मणत निघालें. 'ग्रीस पुत्रांनो चला. स्वातंत्र्याकरितां व स्वतःचे घराण्याचे अब्रूकरितां लढा. आपल्या पूर्वजांच्या देवताकरितां व मातृभूमीसाठीं कसून लढा. कारण त्या सर्वांचें रक्षण आजच्या लढाईचे जयापजयावर अवलंबून आहे.

हें मूठभर सैन्य बरोबर घोडेस्वार अगर तिरंदाज कांहीं एक न घेतां आपल्यावर चालून येत आहे असें जेव्हां पर्शियन्सनीं पाहिलें, तेव्हां ते वेडेपीर असावेत असें त्यांस प्रथम वाटलें. दिव्यावर पतंग झडप घालतो त्याप्रमाणें त्यांची अवस्था होणार याविषयीं त्यांस बिलकुल अंदेशा वाटला नाहीं. पण तें सैन्य जास्त नेटानें समीप येऊं लागलें तेव्हां त्यांच्या वेडेपणांतसुद्धां एक प्रकारची शिस्त आहे असें त्यांस आढळून आलें आणि त्यांचा प्रतिकार करण्याकरितां होईल तितक्या जलदीनें ते तयारी करूं लागले. त्या सैन्यांत हिर्केनिया प्रांतांतील आणि अफगाणिस्थानांतील पहाडी लोक, खुरासानच्या पठारावरील घोडेस्वार, एथिओपियामधील कृष्णवर्ण तिरंदाज व सिंधु आक्सस, युफ्रेटीस आणि नाइल या नद्यांचे तीरावरील तलवारबहादर होते. परंतु त्यांच्यांत स्वाभिमान अगर स्वदेशाची कळकळ यांचा अगदीं अभाव होता. शिवाय त्या अफाट सेनासागरांत भाषा, जात, धर्म व युद्धपद्धति यांची

एकवाक्यता रतिमात्र नव्हती. तथापि ते जातीनिशीं शूर असून युद्धाचे कामांत कसलेले होते. त्यांचे अम्मलदारही युद्धकलेंत वाकबगार असून जय म्हणजे आजवर त्यांना हातचा मळ झाला होता. त्यामुळें त्यांना अथीनियन सैन्याची दरद वाटली नाहीं. घोडेस्वारांस सज्ज होण्यास वेळ मिळाला नाहीं म्हणून नुसतें पायदळच शत्रूचा प्रतिकार करण्यास पुढें सरसावलें. ग्रीक सैन्य धिम्मेपणानें आपल्या रांगा मोडूं न देतां भाल्यांची शिस्त धरून चढाव करून आलें. त्यांच्या भाल्यांच्या मारापुढें इराणी शिपायांच्या हलक्या ढाला, आखूड भाले व तलवारी निरुपयोगीं ठरल्या. पहिल्याच तडाक्यासरशीं पर्शियन सैन्याची अघाडीची रांगची रांग जमीनदोस्त झाली; तथापि ते सैनिक डगमगले नाहींत अगर परत फिरले नाहींत. हत्यारांचा उणेपणा संख्येनें भरून काढून, स्वपराक्रमानें युरोपियन सैन्याची पातळ फळी फोडण्याचा त्यांनीं निश्चय केला. अथीनियन सैन्याचा मध्यभाग कमकुवत असल्यानें, व त्याच ठिकाणीं खुद्द पर्शियन व सॅसी लोकांचा मारा चालू झाल्यानें, अरिस्टाइडीस व थेमिस्टॉक्लीस यांचे सैन्याची फळी फोडून पर्शियन शिपाई आंत घुसले, आणि त्यांनीं अथीनियन सैन्यास टेंकडीच्या पायथ्याशीं असलेल्या दरीपर्यंत मागें हटवीत नेलें. तेथें जमीन खांचखळग्याची असल्यामुळें अथीनियन फौजेचा शत्रूपासून बचाव झाला व तीस फिरून जमवाजमव करून परत हल्ला करण्यास सवड मिळाली. इकडे मिल्टाइडीसनें मजबूत केलेल्या दोहों बगलांनीं आपल्या समोरील एशियाटिक सैन्याचा फन्ना उडविला; व त्या दोन्ही टोळ्या एकत्र उलटून पर्शियन सैन्याच्या विजयी मध्यभागावर चालून गेल्या. आपल्यास ही कुमक मिळालेली पाहतांच अरिस्टाइडीस व थेमिस्टॉक्लीज यांनींही आपल्या फौजेची उठावणी केली. याप्रमाणें पर्शियन सैन्य चोहोकडून वेढलें गेलें. डेटिसच्या लढवय्यांनीं आपल्या बळाची पराकाष्ठा केली;

पण त्याचा कांहीं उपाय चालेना. त्यांचे अंगांत चिलखत नव्हतें व त्यांचीं हत्यारें आखूड होतीं. त्यांस कवाईत येत नसल्यानें, आपल्या रांगा कायम राखणें, एक जुटीनें पुढें सरसावून हल्ला करणें, अगर शत्रूच्या हल्ल्याचा प्रतिकार करणें, हे लष्करी डावपेच त्यांस साधत नव्हते; ह्मणून त्यांच्यानें अथीनियन सेनेशीं तोंड देववेना. व्यक्तिशः तुलना केली असतां पर्शियन शिपाई अथीनियन्सना शौर्यांत किंवा अंगचापल्याचे कामीं हार जाण्यासारखे नव्हते. पराजय शब्द तर आजवर त्यांस अवगतच नव्हता. यास्तव त्यांचें धैर्य खचलें नव्हतें. आजवर शौर्यानें लढून संपादिलेल्या विजयास व कीर्तीस बट्टा लागेल ह्मणून ते प्राणाचीही पर्वा न करतां लढत होते. त्यांच्या मागील रांगा शत्रूवर बाणांचा वर्षाव करीत होत्या व पुढील रांगा शत्रूंच्या भाल्याची फेंक चुकवून आपल्या आंखूड तलवारीचा उपयोग करण्याची संधि साधण्यास टपत होत्या; पण ग्रीक सैन्यानें त्यांस तशी संधीच मिळूं दिली नाहीं. जयाचीं चिन्हें दिसूं लागतांच त्यांस स्फुरण चढलें व त्यांनीं शत्रूची भयंकर कत्तल केली. अथिनीयन शिपायांचे चिलखतावर पार्शीयन बाणांचा कांहींच परिणाम घडेना; पण ग्रीक सैनिकांचे भाले बिनचिलखती पर्शियन शिपायांस जमीनदोस्त करीत चालले. ग्रीक लोकांचे अंगांत त्यावेळीं विलक्षण आवेश चढला. त्या आवेशांत ते शत्रूस मागें रेटीत व त्यांचा भयंकर संहार करीत चालले. त्यावेळीं त्यांना आपल्या देहाचें बिलकुल भान नव्हतें ह्मणून त्यांस जिवापाड श्रम होऊनही थकवा आला नाहीं. सरतेशेवटीं आजवर अजिंक्य ठरलेले एशिआटिक जगजेते शिपाई शत्रूस पाठ दाखवून पळूं लागले. ग्रीक सैन्यानें त्यांचा समुद्रकिनाऱ्यापर्यंत पाठलाग केला. पर्शियन सैन्य होड्यांत बसून समुद्रपार होण्याचा प्रयत्न करूं लागलें. जयश्रीनें धुंद झालेल्या अथीनियन्सनीं पाण्यांत शिरून त्यांच्या नावांसही अटकाव

केला व त्या जाळून टाकण्याकरितां अग्नीचा प्रयोग केला. त्या ठिकाणीं डेटिसचें सैन्य अति निकरानें लढलें, त्यामुळें ग्रीक लोकांचा बराच नाश झाला. 'युद्धपति' कॅलिमॅकस, जनरल स्टेसिलॉस, व एथ्रिलीज कवीचा बंधु कायनेजीरस हे येथें युद्धांत पतन पावले. पर्शियन आरमारांतील सात गलबतें अथीनियन्सनीं हस्तगत केलीं व कांहीं थोडीं जाळून टाकिलीं. बाकी राहिलेल्या गलबतांत व होड्यांत बसून पर्शियन सैन्यानें मॅरेथॉनच्या किनाऱ्यापासून पळ काढला; तथापि डेटिसचें प्रसंगावधान कायम होतें. त्यानें त्या किनाऱ्यास उजवी घालून ॲटिकाच्या पश्चिम किनाऱ्यावर आपलें सैन्य नेऊन उतरविलें. त्याचे मनांतील उद्देश हा कीं, अथेन्सचें यच्चावत् सैन्य समरांगणावर गेलें असल्यानें अथेन्स शहर असुरक्षित असेल, तर तें अचानक छापा घालून आपण काबीज करून घ्यावें; परंतु मिल्टाइडीस हा त्याच्या बारशास जेवला होता. त्यानें तो डाव ओळखला व त्यावर लगेच तोड काढिली. अरिस्टाइडीसच्या हाताखालील सैन्यास जखमी शिपायांचे शुश्रूषेस व लुटीचे संरक्षणास ठेवून बाकीच्या सैन्यासह तो जलदीनें कुच करून निघाला, तो रातोरात अथेन्सजवळ येऊन पोहोंचला. दुसरे दिवशीं प्रातःकाळीं अथेन्स बंदरांत डेटिसचें आरमार येऊन लागलें; पण ज्यांच्या हातचा मार खाऊन आदले दिवशीं आपण पळालों तेच विजयी शिपाई अथेन्सच्या टेकडीवर फिरून आपल्याशीं सामना देण्यास तयार आहेत असें पर्शियन लोकांचे नजरेस पडतांच त्यांची जयाची आशा पार मावळून गेली व तें पराभूत सैन्य हिरमुसलें होऊन एशिया खंडास परत निघून गेलें.

मॅरेथॉनची लढाई नुकतीच संपली होती. अद्यापि लढाईत पडलेल्यांच्या प्रेतांची व्यवस्था लागली नव्हती; इतक्यांत स्पार्टाशहराहून निघा-

लेलें दोन हजार भालाइतांचें एक पथक रणभूमीवर येऊन दाखल झालें. पौर्णिमा होतांच निघून तीन दिवसांत दीडशें मैल कूच करून आश्चर्यकारक अशा चलाखीनें तें सैन्य लढण्यास आलें होतें; परंतु तत्पूर्वीच लढाई होऊन गेली असल्यानें त्यांनीं केवळ रणमैदान पाहिलें, व पर्शियन सैन्याची झालेली भयंकर कत्तल पाहून अथीनियन्सची त्यांच्या जयाबद्दल व विलक्षण शौर्याबद्दल पाठ थोपटली, आणि ते परत आपल्या शहरास निघून गेले.

या लढाईत पर्शियन सैन्यांतील ६४०० शिपाई पतन पावले. अथीनियन्सचे केवळ १९२ लोक लढाईत कामास आले. ही अथीनियन शिपायांची मृत्युसंख्या फारच कमी अतएव अविश्वसनीय भासेल. परंतु त्यांच्या चिलखतानें व कवाइती शिस्तीनें त्यांचा बचाव झाला व पर्शियन सैनिकांचे क्षुल्लक हत्यारांचें त्यांच्यावर कांहीं चाललें नाहीं. आपली नेहमींची पद्धत सोडून मॅरेथॉन येथें युद्धांत पडलेल्यांचे सन्मानार्थ त्या रणभूमीचे मध्यभागीं अथीनियन्सनीं एक कबर रचिली व त्यांत त्या सर्वांचीं प्रेतें पुरून टाकिलीं, आणि प्रत्येक टोळीकरितां एक असे दहा जयस्तंभ उभारून त्यांवर मृत सैनिकांचीं नांवें खोदविलीं.

या पराजयानें पर्शियन राष्ट्राचीं हाडें बरींच खिळखिळीं झालीं. तथापि त्यांनीं आपली दिग्विजयाची महत्वाकांक्षा सोडिली नाहीं. या लढाईनंतर दहा वर्षांनीं पुनः एक वेळ युरोपखंड जिंकण्याचा त्यांनीं अटोकाट प्रयत्न केला. ग्रीसदेशानेंही फिरून पुढाकार घेऊन त्यांचा भयंकर संहार करून तो यत्न निष्फळ केला. त्यावेळीं झालेल्या आर्टेमिसियम, सॅलॅमिस, प्लॅटिया, व युरिमिडॉन या लढायांत मॅरेथॉनच्या कितीतरी पटीनें अधिक सैन्य रणभूमीवर पतन पावलें. परंतु हे संग्राम कितीही घनघोर झाले तरी मॅरेथॉनहून त्यांचें महत्व कमीच ठरणार. मॅरेथॉनच्या

लढाईत जयाचें पारडें युरोपच्या बाजूस प्रथम कलतें. पुढील लढाया केवळ या क्रांतीच्याच अनुवादक होत. ह्मणून त्या सर्वांत अग्रस्थानचा मान मॅरेथॉनलाच योग्य आहे. पर्शियाच्या अजिंक्यत्वाची जादू नाहींशी करून युरोपियन राष्ट्रांत नवीन जोम आणणारी, पौर्वात्यांच्या पूर्वीच्या अपकृत्यांचा सूड उगवून त्यांस प्रतिबंध करणारी राष्ट्रीय जागृति प्रथमतः युरोपखंडांत मॅरेथॉनचे समरांगणावरच दृग्गोचर झाली. थ्झर्क्सीसचा पराजय व थ्झेनोफन, ॲजेसिलॉस आणि अलेग्झँडर यांच्या एशियाखंडावरील स्वाऱ्या हीं त्याच जागृतीचीं फलें होत. एवंच मॅरेथॉनचे जयानें अथेन्सचें अद्वितीय बुद्धिवैभव, स्वांतत्र्यमूलक संस्था आणि युरोपियन सुधारणा यांचा क्रमाक्रमानें जगास लाभ घडला. या लढाईत अथेन्सचा पराजय झाला असता तर युरोपियन सुधारणेचा अंकुर मुळांतच खुडल्यानें त्याच्या वाढीचा प्रश्नच राहिला नसता. सर्व युरोपियन कला, विद्या, धर्म, नीति, रीतिभाति यांचा उगम ग्रीस देशापासूनच आहे. सबब मॅरेथॉनच्या लढाईच्या विपरीत परिणामानें ग्रीसच्या इतिहासाचा व तद्द्वारा युरोपियन प्रगतीचा ओघ बदलून गेला असता. मॅरेथान येथें अथेन्सचा पराजय झाला असता ह्मणजे स्पार्टाखेरीज दुसरें कोणतेंही ग्रीक संस्थान पर्शियन सैन्याशीं टक्कर देण्यास धजलें नसतें. स्पार्टन लोकांनीं मात्र आपल्या बळाची पराकाष्ठा केली असती व त्यांचे मर्द सैनिक थर्मापली येथल्याप्रमाणें जिवावर उदार होऊन लढले असते व कारण पडल्यास सर्वांनीं आपल्या प्राणाची आहुति दिली असती; पण अथेन्सप्रमाणें त्यांच्या हातून इराणी सैन्याचा पुरा मोड झाला नसता. शिवाय पर्शियन फौज एका लढाईत विजयी होण्याचा अवकाश, कीं बाकीचीं सर्व ग्रीक संस्थानें त्यांचे पक्षास मिळालीं असतीं. याप्रमाणें ग्रीस देशाकडून या बावटळीस प्रतिबंध करवला नसता ह्मणजे सर्व युरोप खंड पर्शियन लोकांचे पूर्ण तावडींत सांपडत होतें. रोमन राष्ट्रांत

त्यावेळीं बडे लोक व सामान्य लोक यांच्यांत यादवी माजल्यानें तें अगदीं दुर्बळ झालें होतें. आतां इटलीच्या दक्षिणेस ग्रीसच्या सिसिली इत्यादि वसाहती होत्या; पण जेथें खुद्द ग्रीसचा टिकाव लागला नाहीं तेथें त्या चिमुकल्या वसाहतींची कथा काय? फिनीशियन खलाशांनीं कार्थेज येथील स्वबांधवांविरुद्ध चालून जाण्याचें नाकारल्यानें इराणी लोकांच्या तडाक्यांतून कार्थेज बचावलें होतें. परंतु फिनीशियन खलाशांचा हा स्वाभिमान किती वेळ टिकला असता याचा संशयच आहे. तो एकदा सुटला असता ह्मणजे कार्थेजचें साम्राज्यही पर्शियन लोकांचे अंकित झालें असतें. पिरिनीज, आल्प्स व बाल्कन पर्वतांच्या दक्षिणेकडील देशांची ही स्थिति. युरोपच्या उत्तरार्धांत तर त्यावेळीं जिकडे तिकडे गडद अज्ञानांधकार भरला होता. फिन्स, केल्टस, स्लॅव्ह व ट्युटॉनिक या जाती त्यावेळीं अगदींच रानटी स्थितींत होत्या. ह्मणून पर्शियाचा मॅरेथॉनच्या लढाईंत जय झाला असता तर डरायसला कोणी प्रातस्पर्धीच उरला नसता, व त्यानें तत्कालीन ज्ञात जगाच्या सर्व भागावर आपला अम्मल गाजाविला असता. या जुलमी अम्मलाखालीं युरोपच्या भावी सुधारणेचे बालांकुर चिरडून जाऊन एशियाखंडाप्रमाणें युरोपांतही मानसिक, बौद्धिक व राजकीय गुलामगिरीचें साम्राज्य पसरलें असतें. असल्या अरिष्टांतून युरोपखंड बचावलें तें अथेन्सच्या मॅरेथॉन येथील विजयामुळेंच होय; आणि याच कारणास्तव जगांतील क्रांतिकारक लढायांत मॅरेथॉनचा समावेश करणें अवश्यमेव आहे.

सॅरेक्यूजचा वेढा (इ. स. पूर्वी ४१३.)

प्राचीन काळीं अगर मध्ययुगांत वेढ्याविषयीं प्रसिद्धि पावलेल्या शहरांत सॅरेक्यूजचा नंबर बराच वर लागेल. अथीनियन, कार्थेजीनियन, रोमन, व्हँडाल, सॅरेसन व नार्मन लोकांनीं अनुक्रमेंकरून सॅरेक्यूजला वेढा घातला होता. त्यांत अथीनियन व कार्थेजीनियन सैन्यांचा सॅरेक्यूजचे राहिवाशांनीं जो पराजय केला त्यायोगानें केवळ त्याचाच फायदा झाला असें नव्हे; तर त्याचा परिणाम पुढील पिढ्यांवर घडून आला व त्यामुळेंच सॅरेक्यूजच्या वेढ्यांत अथेन्सचा झालेला पराजय क्रांतिकारक मणला गेला आहे. प्रसिद्ध इतिहासकार अर्नोल्ड ह्मणतो कीं, "सॅरेक्यूजच्या वेढ्यांत अथेन्सचा पराजय झाला नसता तर अथीनियन्सनीं पाश्चिम युरोप पादाक्रांत केलें असतें. त्यायोगानें रोमच्या भावी उन्नतीस जबरदस्त अडथळा झाला असता; व रोमचें भाग्य पुढें उदयास आल्यानें जगास जो कांहीं लाभ झाला त्यास सर्वांस मुकावें लागलें असतें." ज्ञात जगाचें राज्य आक्रमिण्याची हांव बाळगणाऱ्या पूर्वकालीन राष्ट्रांच्या बलाबलाची सॅरेक्यूजचा वेढा ही एक कसोटीच होती. त्या कसास अथेन्स व कार्थेज हीं साम्राज्यें उतरलीं नाहींत. रोम मात्र सॅरेक्यूज येथें विजयी झालें व पुढें रोमचें साम्राज्य सर्व ज्ञात जगावर पसरलें. सॅरेक्यूजच्या वेढ्यांत अथेन्सला जयश्री प्राप्त झाली असती तर सर्व सिसिली बेट अथेन्सच्या हस्तगत होत होतें. तदनंतर कार्थेज व इटली जिंकली गेलीं असतीं. मग अथीनियन्सनीं आपला मोर्चा स्पेनदेशाकडे

वळविला असता. स्पेन देश जिंकून तेथील भाडोती शिपायांचे साहाय्यानें स्पार्टा वगैरे संस्थानास वठणीस आणलें असतें. नंतर डरायसच्या दुबळ्या वंशजांचे ताब्यांतील पर्शियन साम्राज्यावर हल्ला करून तें डळमळीत राज्य धुळीस मिळविलें असतें. याप्रमाणें दशदिशस अथीनियन साम्राज्याचा फैलाव झाला असता; पण सॅरेक्यूजचे लोकांचे शौर्यानें व धाडसानें अथेन्सचें हें मनोराज्य जागच्या जागींच राहिलें; व त्यामुळें रोमन लोकांस पुढें सरसावण्यास मार्ग खुला झाला.

अथेन्सच्या एका प्रसिद्ध नाटककारानें ह्मटलें आहे कीं, अथेन्सच्या पूर्ण भरभराटीचे वेळीं त्याची सत्ता एक हजार संस्थानांवर चालत होती. कवीच्या शब्दांत अतिशयोक्ति ही असणारच; तथापि पेलापोनीसियन युद्धाचे पूर्वी अथेन्सचे ताब्यांत मांडलिक संस्थानें पुष्कळच होतीं ही गोष्ट निर्विवाद आहे. एकाददुसरा अपवाद खेरीजकरून ईजियन समुद्रांतील सर्व बेटें, एशियामायनरच्या किनाऱ्यावरील सर्व शहरें आणि हेलेस्पांट व थ्रेस हे देश, इतक्या सर्वांवर अथेन्सची सत्ता चालत होतीं. ईजियन समुद्र तर अथीनियन्सचें क्रीडासरोवर झाला होता. ग्रीसचे पश्चिम दिशेस मात्र त्यांचा अम्मल क्वचित् ठिकाणीं होता. सिसिली बेटांत व दक्षिण इटालींत त्यांच्या वसाहती भरभराटींत होत्या; पण त्यांचेवर अथेन्सचा दाब विशेष नव्हता व त्यांचेकडून अथेन्सला खंडणीही पोंचत नसे. अथेन्समधील महत्वाकांक्षी वक्ते व सरदार यांस सिसिली बेटावर पूर्ण वर्चस्व स्थापण्याचा निदिध्यास लागला होता; तथापि अथेन्सचा दूरदर्शी मुत्सद्दी पेरिक्लिस जीवंत असेपर्यंत त्यांचीं कांहीं डाळ शिजली नाहीं पेरिक्लीजनें अथानियन लोकांच्या महत्वाकांक्षेस जरी आवरून धरलें होतें तरी

त्याचे वेळीं अथेन्सची सत्ता जोरावर होती. ह्मणून पेरिक्लीजच्या मरणानंतर त्यानें आंखून दिलेल्या मर्यादांचें उल्लंघन केल्यावांचून अथीनियन्सना राहवेना.

कारिंथियन लोकांचे आग्रहाचे विनवणीवरून स्पार्टानें इ. स. पूर्वी ४३१त अथेन्सविरुद्ध जूट केली; त्यांत पांचषष्ठांश ग्रीक संस्थानें सामील झालीं. स्पार्टन वीरांचे अथेन्सवर हल्ल्यावर हले होऊं लागले, तेव्हां सर्वांस वाटलें कीं, एक दोन वर्षांत अथेन्सची इतिश्री होणार; निदान आपल्या शत्रूंच्या सर्व मागण्या तरी त्यास कबूल कराव्या लागणार. परंतु अथेन्सची तटबंदी मजबूत असून समुद्राशीं त्याचा संबंध अप्रतिहत असल्यानें तें शत्रूंच्या खुष्कीवरील हल्ल्यास मुळींच जुमानत नव्हतें व समुद्रावर त्याची सत्ता अबाधित होती. थेमिस्टॉक्लीसपासून पेरिक्लीसपर्यंत सर्व अथीनियन मुत्सद्यांचा भरंवसा नौकानयनावर होता; ह्मणून अथेन्सचे यच्चावत् नागरिक निपुण नाविक बनले होते. नाहींतर ज्या शहराची युद्धोपयोगी लोकसंख्या तीस हजारांवर कधींच नव्हती, त्या शहरास सहस्रावधि संस्थानांवर साम्राज्य गाजवितां आलें नसतें. या दर्यावर्दीपणामुळें, फिलापोनीसियन युद्ध सुरू झाल्यापासून स्पार्टन सैन्य दरसाल ॲटिका प्रांतांत शिरून तो प्रदेश उध्वस्त करी, तरी त्यापासून अथेन्सचें काडीमात्र नुकसान झालें नाहीं. स्पार्टन सरदार ब्रॅसिडास यानें मात्र अथेन्सच्या थ्रेसमधील सत्तेस हरताळ लावला. परंतु इ. स. पूर्वी ४२१ वे वर्षी तो धारातीर्थी पतन पावला. त्याचे पश्चात् स्पार्टन सैन्यांत तसला मोहरा दुसरा राहिलाच नाहीं. ह्मणून त्यांचे हातपाय गळल्यासारखे झाले व त्यांचा सारासार विचारही मंदावला. अशा स्थितींत दोघांही प्रतिस्पर्ध्यांस युद्धाचा कंटाळा येऊन इ. स. पूर्वी ४२१त पन्नास वर्षें लढाई तहकूब ठेवण्याचा करार झाला.

तो करार उभय पक्षांनीं अक्षरशः पाळला असें नाहीं. तथापि स्पार्टन सैन्याकडून दरसाल पिकांची नासाडी होत असे ती बंद होऊन अथेन्सचा वसूल सुरळीत येऊं लागला. त्याच सुमारास प्लेगनेंही आपलें फार दिवसांचें ठाणें तेथून हलविलें. तेव्हां थोड्याच वर्षांत लढाई व प्लेगमुळें झालेलें नुकसान भरून येऊन, अथीनियन लोकांस फिरून एखादी मोहीम हातीं घेण्याची उमेद आली. त्यावेळीं प्रत्येक महत्वाकांक्षी अथीनियनची दृष्टि पश्चिमेकडे वळली. सिसिली बेटावर अथेन्सचा डोळा फार दिवसांचा होता. त्यांत तेथील ग्रीक वसाहतींत सदा स्थानिक तंटे चालू असत. तेव्हां कोणा एकाचा पक्ष घेऊन सॅरेक्यूजवर स्वारी करण्यास निमित्त सांपडण्याची पंचाईत मुळींच पडली नाहीं. यास्तव सॅरेक्यूजवर चालून जाण्याचें सर्वांच्या विचारें ठरलें.

या मोहिमेकरितां अथेन्सनें जें आरमार व सैन्य सज्ज केलें, तें अथेन्सच्या जग जिंकण्याच्या महत्वाकांक्षेस साजेसेंच होतें. त्या आरमारांत १३० जहाजें होतीं. त्याशिवाय सामानसुमान ने आण करणाऱ्या होड्या होत्या त्या वेगळ्याच. अथेन्स व त्याचे मांडलिक यांनीं आपापलें करोल पायदळ सैन्य जमा केलें. त्यांत तिरंदाज व गोफणवाले यांचाही समावेश होता. हें सैन्य संख्येनें मोठें होतेंच, पण त्याची कर्तृत्वशक्ति अधिक वर्णनीय होती. उत्तम जहाजें, दर्यावर्दीपणांत निपुण असे नावाडी, आणि शस्त्रास्त्रें यांचा पुरवठा करण्यांत सरकार व प्रजाजन यांच्यामध्यें जणूंकाय चढाओढ लागून गेली होती. अशा रीतीनें खासगी आणि सार्वजनिक पैशानें उभारलेलें हें सैन्य व आरमार इ. स. पूर्वी ४१५ चे उन्हाळ्यांत काळाचे बोलावण्यावरून सॅरेक्यूजला निघालें.

सॅरेक्यूज येथेंही यावेळीं लोकसत्ताक राज्यव्यवस्था होती; व भूमध्य समुद्राच्या पूर्व किनाऱ्याबरील शहरावर अथेन्सचा जसा जुलूम

चालला होता तसाच सॅरेक्यूजचा सिसिलींतील इतर शहरांवर चालला होता. संख्येच्या मानानें पाहिलें असतां सॅरेक्यूज व अथेन्स यांची बराबरी होती. शौर्य व साहस या गुणांतही सॅरेक्यूजन्स कांहीं कमी नव्हते. पण त्यांच्यांत शिस्त मुळींच नव्हती व दर्यावर्दीपणास ते केवळ पारखे होते.

अथीनियन लोक आपल्यावर चाल करून येत आहेत, ही गोष्टच सॅरेक्यूजन्सना प्रथम संभवनीय वाटेना. ती बातमी सांगणारांची ते टर उडवूं लागले. असल्या कंड्या पिकवून, परशत्रूचा बागुलबोवा दाखवून आपले हातीं सर्व सत्ता बळकावण्याचा कांहीं लोकांचा हा कट आहे असेंही कित्येकांचे मनानें घेतलें. ते ह्मणत " आह्मी अथेन्सच्या अध्यांतना मध्यांत. असें असतां आमच्यावर निष्कारण स्वारी करण्याइतके कांहीं अथीनियन्स उद्दाम नाहींत. शिवाय त्यांस स्वहितही चांगलें कळतें; करितां असल्या स्वदेशहितविघातक भानगडींत ते पडणार नाहींत. पण जरकरितां त्यांनीं असा निष्कारण हल्ला केला तर त्यांचीं पुरीं शंभर वर्षें भरलीं असें समजा. अथेन्सपासून इतक्या दूर अंतरावर त्यांनीं आमच्याशीं लढण्यास येणें असंभवनीय आहे. त्यांचें आरमार आमच्या किनाऱ्यापर्यंत पोहोचूंदे व सैन्याला लागणाऱ्या रसदीचा त्यांचेकडून वेळेवर पुरवठा होऊंदे ह्मणजे त्यांनीं मिळविली. बरें एक वेळ त्यांनीं आपली फौज आमचे किनाऱ्यावर उतरविली असें गृहीत धरूं. तरी पुढें काय? येथें काय त्यांना किल्ल्याचा आश्रय आहे कां दुसरा कसला आसरा आहे? तंबू देऊन छावणी करतील व पावसानें झोड लावली ह्मणजे त्यांस ' दे माय धरणी ठाव ' असें होऊन जाईल. पण मुळीं आपलें सैन्य या किनाऱ्यावर उतरविण्यापर्यंतसुद्धां त्यांची मजल येणार नाहीं. तथापि जर कोणी शत्रु सॅरेक्यूजकडे वांकड्या नजरेनें

पाहील तर सॅरेक्यूजच्या शिपायांनीं कांहीं बांगड्या भरल्या नाहींत हें त्यांचे निदर्शनास येईल. "

असलें आत्मस्तुतिपर भाषण जनसमूहास पसंत पडणारच. तेवढ्यावरच ते लोक अगदीं गाफील राहिले. पण सॅरेक्यूजचे शत्रु खरोखरीच चालून आले, व त्यांनीं आपलें सैन्य सिसिलीच्या किनाऱ्यावर बिनदिक्कत उतरविलें. त्याचवेळीं त्यानीं लगट केली असती तर सॅरेक्यूज बंदरही तत्काळ त्यांचे आधीन झालें असतें. पण अथीनियन सेनापतींनीं असली अमोलिक वेळ निष्कारण इकडच्या तिकडच्या किरकोळ मोहिमांत गमाविली. अथीनियन सैन्यावर तिघे सेनापति होते; त्यांत अल्किबाइडीस व लॅमेकस हे दोघे युद्धकलेंत निपुण असून कर्तबगारीचे होते. तिसरा निकायस नामक सेनापति चंचळ मनाचा, गैरवाकबगार, व अविवेकी होता. सॅरेक्यूजन्सचे सुदैवानें लॅमेकस हा युद्धाचे आरंभींच एका चकमकींत मरण पावला व दुसरा अल्किबाइडीस यास अथीनियन्सनीं पक्षाभिमानानें व विक्षिप्तपणानें कामावरून दूर करून अथेन्सला परत बोलाविलें. यामुळें पुढील मोहिमेची सर्व जबाबदारी निकायससारख्या कुचकामाच्या सेनानायकावर पडली. दर्यावरील व खुष्कीकडील सर्व सैन्यावर तोच अधिकारी झाला व त्यास सल्लामसलत देण्यास अगर वेळेवर कानउघाडणी करून ताळ्यावर आणण्यास कोणीच राहिला नाहीं. अलक बाबतींत फाजील दक्षता ठेवून व ऐन आणीबाणीच्या प्रसंगीं गर्ब निष्काळजीपणा दाखवून, युद्धारंभीच्या व्यवस्थेनें व टापटिपीनें जय प्राप्त होण्याची जी सुसंधि आली होती, ती त्यानें व्यर्थ दवडिली. सेनापतीची करामत जरी अशाप्रकारची होती तरी अथीनियन सैन्यानें सॅरेक्यूजच्या अनभ्यस्त खोगीरभरती सैन्यास चांगलाच हात दाखविला व सॅरेक्यूज शहर बहुतेक काबीज केलें. त्यांनीं सॅरेक्यूजच्या

सैन्याला किल्ल्यांत कोंडून टाकिलें, व एपिपोलीच्या बाजूनें एका बाजूच्या समुद्रकिनाऱ्यापासून तहत दुसऱ्या बाजूच्या किनाऱ्यापावेतों तटबंदी घालून त्यांचें खुष्कीकडील दळणवळण बंद करण्याचा घाट घातला. हा तट पुरा झाला असता तर सॅरेक्यूजच्या नाड्या पुऱ्या आंखडल्या असत्या व त्यांस बिन अटीनें शरण येण्याखेरीज गत्यंतरच उरलें नसतें. परंतु इतकें आटोक्यांत आलेलें हें सावज अथीनियन्सच्या तडाक्यांतून कसें निसटलें तें आतां पाहूं.

अथीनियन्सनीं विक्षिप्तपणाचे लहरींत अल्किबाइडीसचा अधिकार कमी करून त्यास आपल्यावरील आरोपाबद्दल जाब देण्यास परत अथेन्सला बोलाविलें होतें. पण सॅरेक्यूजहून निघून अथेन्सकडे न जातां तो थेट स्पार्टास गेला. अल्किबाइडीसची बुद्धि कुशाग्र होती; युद्धकलेंत तो निष्णात असून शिवाय मोठा मुत्सद्दी वक्ताही होता; इतके गुण अंगीं असूनही ते सर्व कवडीमोल करून टाकण्यास त्याचें निरर्गल वर्तन कारणीभूत झालें. त्याला नीतिबंधन व उदात्त मनोवृत्ति यांची ओळखही नव्हती. 'विद्या मोठी बुद्धि खोटी' अशा मासल्याच्या कित्येक व्यक्ति इतिहासांत आढळून येतात; त्यांच्यांत अल्किबाइडीस हा मुकुटमणि शोभण्यासारखा होता. आपल्या देशबांधवांनीं आपला अपमान केला व आपल्यावर कांहीं किटाळ उपस्थित केलें, एवढ्यानें चिडून जाऊन, स्वदेशाभिमान वगैरे उच्च मनोवृत्ति पार झुगारून देऊन अथेन्सचा सूड उगाविण्याचे कार्यास त्यानें कंबर बांधिली. स्पार्टा व अथेन्स यांचें बऱ्याच कालापासून हाडवैर होतें. त्यांत फिलापोनीशियन युद्ध सुरू झाल्यापासून स्पार्टाचे द्वेषाग्नींत तेल ओतल्याप्रमाणें झालें होतें. दहा पंधरा वर्षें सतत युद्ध चालू ठेवून ॲटिकाप्रांत दरसाल उध्वस्त केला तरी अथेन्सचा ताठा कमी होत नाहीं व तें शरण येत

नाहीं, असें पाहून नाइलाजास्तव स्पार्टानें पन्नास वर्षें युद्ध तहकूब ठेवण्याचा करारनामा केला होता. अशावेळीं तो करार न मोडतां परभारें अथेन्सचें नाक ठेंचण्याची त्यांस संधि मिळाली असतां ती गमावण्याइतके स्पार्टन लोक दुधखुळे नव्हते. स्पार्टन्सची मनःस्थिति अशा प्रकारची असल्यानें, अल्किबाइडीसला डाव साधण्यास मुळींच प्रयास पडले नाहींत. त्यानें अथेन्सच्या भरभराटीचें, गर्वाचें व महत्त्वाकांक्षेचें तिखटमीठ लावून वर्णन केलें. आणि सॅरेक्यूजचें युद्ध संपतांच त्यांचा मोर्चा स्पार्टाकडे वळेल; मग त्यांस तोंड देण्यास स्पार्टन्सना जड जाईल, करितां त्यांनीं अथेन्स कचाटींत सांपडल्याची हल्लींची संधि साधून त्यांचा नक्षा उतरावा अशी विनंति केली.

स्पार्टन लोकांचा प्रथम त्याचे भाषणावर विश्वासच बसेना. यांत अथेन्सचा कांहीं कावा असावा व अशा कपटप्रयोगानें आपल्यास फसवून कात्रींत धरण्याची त्यांची मसलत असावी अशी त्यांस शंका आली. परंतु अल्किबाइडीसनें त्यांच्या सर्व आक्षेपांचें निरसन करून, सॅरेक्यूजजवळील अथीनियन सैन्यावर व आरमारावर कोठून व कसा हल्ला करावा ह्मणजे तो फलद्रुप होईल यांचेंही सविस्तर विवेचन केलें; तेव्हां स्पार्टन लोकांच्या तोंडास पाणी सुटलें व ते त्या मोहिमेच्या तयारीस लागले.

ही कामगिरी त्यांनीं जिलीपस नामक सरदाराकडे सोंपविली. तो स्पार्टन सरदार असल्यानें शूर व धाडशी होता ह्मणून सांगणें ही द्विरुक्तिच होय. पण त्याचे अंगीं शौर्य व युद्धनैपुण्य असून शिवाय ब्रॅसिडासप्रमाणें मुत्सद्देगिरीही होती. आतां त्याचे अंगीं कित्येक दुर्गुण होते व त्यामुळें इतिहासांतरीं त्याचे नांव फारसें पुढें आलें नाहीं हें वास्तविकच आहे. परंतु यावेळीं ही मोहीम पत्करण्याला व ती तडीस

नेण्याला त्याहून योग्य सरदार स्पार्टामध्यें दुसरा कोणी नव्हता. स्पार्टानें जिलीपसची या कामगिरीवर नेमणूक केली. पण त्याजबरोबर कांहीं सैन्य अगर खजिना त्यांनीं दिला असें मुळींच नाहीं. तथापि स्पार्टन या नांवातच अशी कांहीं जादू होती कीं, स्पार्टन सरदार अथेन्स विरुद्ध सॅरेक्यूजचे मदतीस निघाला, अशी वार्ता पसरतांच अथेन्सचे हाडवैरी कारिंथियन्स व इतर फिलापोनीसियन संस्थानें यांनीं आपापलीं जहाजें स्पार्टाच्या मदतीस पाठविलीं. पहिलीं चार जहाजें तयार होतांच इटलीच्या दक्षिण किनाऱ्याचा रोंख धरून जिलीपस हा पुढें निघाला. तो इटलीच्या दक्षिण किनाऱ्याजवळ येऊन पोहोंचला. त्यावेळीं " सॅरेक्यूजची स्थिति इतकी हलाखीची आहे कीं तो वेढा उठविणें आतां शक्य नाहीं " अशी त्यास बातमी लागली. तरी अथेन्सच्या तावडींतून निदान इटलींतील इतर शहरें वांचवावीं या उद्देशानें तो सिसिलीच्या आसपास आपल्या गलबतांसह राहिला.

निकायसचे वेढ्याचें व तटबंदीचें काम इतकें पूर्ण होत आलें होतें कीं, सॅरेक्यूजन्सना आतां त्यांतून निसटण्याची आशा राहिली नव्हती. शत्रूस शरण जाण्याखेरीज मरण टाळण्याचा दुसरा मार्ग नसल्यानें, कोणत्या अटीवर शरण जावें याचा विचार करण्याकरितां त्यांची सभा भरली होती. सभेंतील वाटघाट पुरी होऊन शत्रूस शरण जाण्याविषयीं अनुकूल प्रतिकूल मतें घेण्याचे कामास सुरवात होणार होती. इतक्यांत नावाड्यांनीं अति जलदीनें वल्हविलेली एक होडी बंदरांत शिरली. अथेन्सच्या आरमाराची बाजू टाळून दुसऱ्या बाजूनें तो आल्यानें ती स्वपक्षीय आहे असें अनुमानानें ठरलें. आतां आपणांस जयश्री खात्रीनें वरणार अशा घमेंडींत अथीनियन आरमार निर्धास्त व निष्काळजी राहिलें होतें. त्यांस बंदरांतून आंत जातो कोण व येतो कोण याची

चौकशी करण्याची किंवा त्यास प्रतिबंध करण्याची अवश्यकताच भासली नाहीं. इकडे त्या आलेल्या होडींतून एक कॉरिंथियन अधिकारी किनाऱ्यावर उतरला व तो त्या सभेंत येऊन दाखल झाला.

आपल्या मदतीस आलेले सरदार व सैनिक पाहून व स्पार्टाची मदत लवकरच येऊन पोहोंचण्याचें वर्तमान ऐकून ह्या वेळपावेतों हताश झालेल्या सॅरेक्यूजन्सचे चेहऱ्यावर फिरून टवटवी आली. असल्या संकटांतसुद्धां आपणांस पाठिराखे आहेत, त्यांतून स्पार्टन सरदार आपले मदतीस येणार इतकें कळल्यानंतर पुनः शरण जाण्याची गोष्ट बोलेल कोण? आजवर जसा नेटानें टिकाव धरला तसाच स्पार्टन सेनापति येईपर्यंत हिम्मतीनें टिकाव धरण्याचा सर्वांचा निश्चय झाला. स्पार्टन सेनापति जिलीपस यांसही कळून आलें कीं, सॅरेक्यूजची स्थिति निर्वाणीची आहे व त्यास आतां साहाय्य करण्यापासून फलप्राप्ति कांहीं नाहीं, वगैरे आपण ऐकलेल्या बातम्या केवळ निराधार होत्या. किल्ल्याभोंवतालची शत्रूची तटबंदी अद्यापि अपूर्ण आहे, व तींतून सैन्य व रसद किल्ल्यांत पोंचविणें शक्य आहे; इतकें कळतांच मेसिनाच्या सामुद्रधुनींतून सिसिलीच्या उत्तर किनाऱ्यावर तो उतरला. स्पार्टाहून त्यानें जें कांहीं नांवाला थोडेसें सैन्य बरोबर आणलें होतें त्यांत ग्रीकशहरांतून सैनिकांची भरती घालतां घालतां तें दोन हजारांवर गेलें. या करोल पायदळाशिवाय कित्येक बाजारबुणगे होते ते वेगळेच. निकायसच्या डोळ्यावर यावेळीं धुंदी चढली होती. त्यामुळें त्यानें जिलीपसला कोणत्याही प्रकारचा अडथळा केला नाहीं. तें नवीन उभारलेलें सैन्य खुशाल त्याच्या डोळ्यादेखत सॅरेक्यूजच्या मदतीस गेलें व सॅरेक्यूजन्सनीं सामोरे येऊन त्यांचें स्वागत केलें. अथीनियन सैन्याचें लक्ष आतां ती तटबंदी जलदीनें पुरी करण्याकडे लागलें. एपिपोलीच्या मागच्या

अंगास तळ देऊन जिलीपसनें त्यांना मागें हटावयास लाविलें व क्रमाक्रमानें त्यांसच किनाऱ्याच्या एका खोलगट कोपऱ्यांत कोंडून टाकिलें.

सगळ्या ग्रीस देशाचे डोळे आतां सॅरेक्यूजकडे वळले. अथेन्सच्या शत्रूंना तर आनंदाच्या उकळ्या फुटूं लागल्या. अथेन्सचा गर्व परिहार करण्यास किंबहुना त्याची सत्ता संपुष्टांत आणण्यास ही संधि उत्कृष्ट आहे असें पाहून कारिंथ, थीब्स वगैरे शहरांतून सॅरेक्यूजला द्रव्याचा व सैन्याचा पुरवठा होऊं लागला. निकायसनें तर अगदीं हातपाय गाळले. हें वेढ्याचें काम असेंच चालू ठेवण्यांत काडीमात्र फायदा नाहीं, उलट सर्वस्वी सैन्याचा नाश होण्याचा संभव आहे; करितां आपणास सैन्यासह परत येण्याची परवानगी द्यावी अशी त्यानें विनवणी सुरूं केली. पण अथेन्सचा आजवरचा बाणा ह्मणजे पुढें टाकलेला पाय मागें घ्यावयाचा नाहीं, मग त्या कामीं कितीही संकटें भोगावीं लागलीं तरी बेहत्तर. अल्किबाइडीसच्या सूचनेवरून स्पार्टन्सनीं ॲटिका प्रांतांत कायमचें लष्करी ठाणें ठेवून दिल्यानें त्या बाजूनें अथेन्सचा कोंडमारा होत होता; तथापि समुद्रकिनारा मोकळा असल्यानें सॅरेक्यूजची खोड मोडण्याकरितां सत्तर जहाजांचें नवीन आरमार व ताज्या दमाचें सैन्य पाठवून देण्याचें ठरलें. अथेन्सचा दृढनिश्चय प्रशंसनीय होता. मान मोडली तरी बेहत्तर; पण शत्रूपुढें ती लववणार नाहीं असा अथेन्सचा बाणा अद्याप कायम होता.

या नवीन आरमारावर ज्या अधिकाऱ्याची नेमणूक झाली होती तो युद्धांत पुरा वाकबगार होता. सॅरेक्यूजच्या वेढ्याचें काम प्रथमपासून याजकडेसच असतें तर एव्हांना सॅरेक्यूज हें अथेन्सच्या ताब्यांतील एक पहिल्या प्रतीचें बंदर व लष्करी ठाणें झालें असतें. या सरदाराचें नांव डेमॉस्थिनीस होय. डेमॉस्थिनीस नांव कानीं पडतांच मॅसिडॉनच्या फिलिप राजाविरुद्ध

आपल्या वाक्प्रतापानें सर्व ग्रीस देश एकवटून टाकणारा प्रसिद्ध वक्ता डोळ्यापुढें उभा राहतो. कारण त्याच्या कीर्तिसमुद्रांत इतर डेमॉस्थिनीसची कीर्ति लोपून गेली आहे. तथापि या नवीन सैन्याचा नायक डेमॉस्थिनीस हा फारच कर्तबगारीचा पुरुष असून कर्तव्यदक्षही होता. फिलापोनीसियन युद्धांत यानें नांव गाजविलें होतें. मेसिनियन किनाऱ्यावरील पायलास शहर काबीज करून स्पार्टाच्या सैन्यास व आरमारास दाद न देतां तें त्यानें मोठ्या शौर्यानें राखिलें होतें. पुढें त्यानें स्पार्टाचें स्फॅक्टेरिया नामक ठाणें घेतल्यानें जेरीस येऊन स्पार्टानें लढाईची तहकुबी मागितली होती. डेमॉस्थिनीसचें खासगी वर्तनही निर्दोष होतें. आपलें कर्तव्य आपण बजावावयाचें; मग त्याबद्दल कोणी निंदो कोणी वंदो, त्याची पर्वा मुळींच करावयाची नाहीं असें त्याचें ब्रीद होतें.

अथेन्सनें इ० स० पूर्वी ४१३ त सॅरेक्यूजवर जें दुसरें आरमार रवाना केलें त्यावरील सेनानी अशाप्रकारचा धीरोदत्त पुरुष होता; परंतु दुर्दैवानें त्याचे कपाळीं अपयशच लिहून ठेविलें होतें. तो सॅरेक्यूजला येऊन पोहोंचला ती वेळ आणीबाणीची होती. जिलीप्सनें निकायसच्या आरमारावर हल्ला करून त्याचा एकदा मोड केला होता. दर्यायुद्धांत अथेन्सला पराजय कसा तो ठाऊकच नव्हता; पण आतां तें सर्व पारडें फिरलें. या पराजयानें शत्रू नामोहरम झाला आहे, तोंच दर्यांत व खुष्कीवर चोहोकडे एकदम हल्ला करावा, व अथेन्सचें सैन्य आणि आरमार यांचा धुव्वा उडवून द्यावा, असें जिलीपसच्या मनांत होतें. इतक्यांत हें नवीन आरमार व सैन्य येऊन दाखल झालें. सत्तर गलबतें, पांच हजार कवाइती पायदळ, पांच हजारांहून अधिक तिरंदाज आणि गोफणवाले, असा हा सरंजाम पाहून सॅरेक्यूजन्सचें धैर्य गलित झालें. त्यांची अशी समजूत झाली होती कीं, अथेन्सची फिलापोनीसियन

युद्धानें लेधातिरपिट उडाली आहे; त्यांचा मुलूख शत्रूनीं आक्रमिला असल्यानें त्यांस स्वसंरक्षणाची पंचाईत पडली आहे. पण इकडे पहावें तों निकायसच्या पूर्वीच्या सैन्याइतकें सैन्य पुनः मदतीस तयार. तेव्हां अथेन्सच्या सामर्थ्याचा त्यांस अंत लागेना.

डेमॉस्थिनीसनें समरभूमीवर येतांच ताडलें कीं, एपिपोलीं ही सॅरेक्यूजची किल्ली आहे. यास्तव नवीन सैन्याच्या आगमनानें शत्रू भांबावून गेले आहेत तोंच एपिपोलीवर हल्ला करून तें ठाणें हस्तगत करून घेतलें पाहिजे. शिवाय एपिपोलीच्या भोंवतालची तटबंदी पुरी झाली ह्मणजे तें काम जड जाईल, याकरितां तें दिनावधीवर टाकतां कामा नये. एकदां तें ठाणें हातीं आलें ह्मणजे सॅरेक्यूजभोंवतालची भिंत पुरी करून त्यांस वेढतां येईल. मग जिलीपसनें सॅरेक्यूजच्या मदतीस आणलेल्या सैन्याचा त्यास उपयोग होणार नाहीं, इतकेंच नव्हे तर उलट त्यापासून अपाय मात्र होईल. कारण वेढ्यांत सांपडलेल्या सैन्याची संख्या जितकी अधिक तितकी अन्नसामुग्रीची तूट लवकर भासूं लागणार व त्या मानानें त्यांस लवकर शरण यावें लागणार.

याप्रमाणें पुढील सर्व धोरण ठरवून डेमॉस्थिनीसनें एके दिवशीं आपल्या शिपायांकडून एपिपोलीच्या मोर्चेबंदीवर हल्ला करविला. अशा उघड रीतीनें चालून जाऊन सुरक्षित ठिकाणच्या शत्रूस हुसकून लावतां येणें शक्य नाहीं हें तो जाणून होता; परंतु आपला खरा हेतु छपविण्याकरितां ही त्याची नुसती हुलकावणी होती. या हल्ल्यांत अथीनियन्सना अर्थात् माघार ध्यावी लागली व ते आपल्या तळावर परत आले. इकडे सॅरेक्यूजची फौज जयानें फुशारून जाऊन बेफिकीर व निष्काळजी राहिली. त्याच रात्रीं काळोख पडतांच डेमास्थिनीसनें आपले पलटणीस तयार राहण्याचा इषारा दिला. प्रत्येक शिपायाबरोबर पांच दिवसांचीं अन्नसामुग्री व

सैन्याबरोबर एंजिनियर व मजूर लोक घेऊन तो तसल्या अंधारांतच निघाला. या रात्रीच्या छाप्यांत मोर्चेबंदीचा जो भाग स्वाधीन होईल तो स्वसंरक्षणास उपयोगी असा करण्यांत यावा, व तेथून परत फिरण्याचें कारण पडूं नये याकरितां ही तरतूद होती. अशा तजविजीनें सर्व तयारी करून एपिपोलीच्या दक्षिण दिशेनें निघून नैऋत्य कोनास तें सैन्य आलें. तेथून एक चक्कर घेऊन बिनीची टोळी कड्याचे बाजूनें वळणावळणानें वर चढून गेली. त्यांचे मागोमाग सर्व सैन्य वर पोंहचून त्यानें सॅरेक्यूजच्या शिबंदी फौजेवर एकदम छापा घातला. अथीनियन्सनीं अकस्मात् चालून येऊन काबीज केलेली जागा उंचवट्याची व मजबूत असून तेथून त्यांस सॅरेक्यूजन सैन्यावर हल्ला करणें सुलभ होतें. त्यांनीं सॅरेक्यूजन्सचे अघाडीचे टोळीस पिटाळून लाविलें व तेथील मोर्चेबंदी पाडण्यास त्यांचे मजूरांनीं प्रारंभ केला. जिलीपसनें आपले फौजेस थोपटून धरण्याची पराकाष्ठा केली. परंतु अथीनियन सैन्याचे अंगांत या क्षणिक विजयानें स्फुरण चढलें असल्यामुळें स्पार्टन्सचा पायच त्यांचेपुढें ठरेना. याप्रमाणें सॅरेक्यूज व स्पार्टाच्या सैन्याची पिछेहाट झाली असतां, पायदळाची एक तुकडी मात्र टिकाव धरून राहिली. तिनें एक पाऊलही मागें घेतलें नाहीं. ही पलटण बोएशियन लोकांची असून तिची योजना एपिपोलीच्या तटबंदीच्या पुढील उतरणीच्या जागीं झाली होती. आपल्या चारी बाजूंस स्वपक्षाची फौज पळत सुटली आहे हें पाहूनसुद्धां त्यांचें धैर्य खचलें नाहीं. त्यांनीं शांत व धिम्मेपणानें आपली शिस्त संभाळून पुढें चालून येणाऱ्या अथीनियन्सच्या हल्ल्यास तोंड दिलें. ही वेळ मोठी आणीबाणीची होती अथेन्सची या ठिकाणींही सरशी झाली असती ह्मणजे त्यास मागें परतविण्याची दुसऱ्या कोणाची छाति नव्हती; व सॅरेक्यूज, सिसिली, इटाली, इत्यादि प्रांत एकामागून एक अथेन्सच्या घशांत उतरले असते. परंतु अथेन्सच्या विजयी कारकीर्दीची

इतिश्री येथेंच व्हावयाची होती. त्या बोएशियन पलटणीचे मारापुढें अथीनियन सैन्य कचरलें व माघार घेऊं लागलें. हें दृष्टीस पडतांच हा वेळपावेतों मित्रेपणानें पळ काढीत असलेल्या सॅरेक्यूजचे शिपायांचे अंगांत वीरश्रीचा संचार झाला. आपला पळपुटेपणा सोडून ते परतले, व त्यांनीं नेटानें आणि एकदिलानें आतां कच खाऊं लागलेल्या अथीनियन फौजेवर चोहोंकडून मारा चालू केला. अथीनियन सेनापतीनें आपल्या लोकांस चेतविण्याची शर्थ केली. पण ती अंधाऱ्या रात्रीची वेळ, उंचसखल जमीन, एकाच सैन्यांतील कांहीं टोळ्या पुढें चालून जात आहेत, कांहीं परतत आहेत व कांहीं चक्राकार वळसे घेत आहेत अशा स्थितींत शत्रु, मित्र कळण्याची मारामार; तेव्हां अथीनियन सैन्याचा धीर सुटत चालला. या धांदलींत कित्येक वेळां अथीनियन टोळ्यांनीं आपल्याच दुसऱ्या तुकड्यांवर हल्ले केले. अशी धुमश्चक्री चालल्यानें सैन्याची शिस्त अगदीं बिघडून गेली. जेथें जेथें शत्रुसैन्य समोर असल्याचें दिसत होतें, तेथें तेथें अथीनियन सैन्य निकरानें लढत होतें; परंतु सर्व सैन्यानें एकजुटीनें हल्ला चढविणें, वळसा घेऊन शत्रूचे पिछाडीवर किंवा बगलेवर तुटून पडणें, परत फिरल्याचें मिष करून उलट खाणें व पाठलाग करणारांचाच समाचार घेणें, इत्यादि लष्करी डांवपेचास अवकाशच नव्हता. त्यामुळें अथीनियन सैन्याची कुचंबणी झाली; व एकदां जी घडी बिनसली ती फिरून सुधरून घेतां येईना. अथेन्सचें सैन्य चोहोकडे पांगलें गेल्यामुळें त्याजवर वेगवेगळ्या ठिकाणीं हल्ला करण्यास व जय मिळविण्यास शत्रूस सवड मिळाली. अशा रीतीनें अथीनियन सैन्याचा पराजय होऊन त्याची भयंकर कत्तल झाली. उरलेलें सैन्य कसेंबसें त्या कड्यावरून उतरून खालीं आलें. केवळ दोनप्रहरांपूर्वी याच कड्यावरून मोठ्या उमेदीनें व जयाच्या खात्रीनें तें वर चढून गेलें होतें.

या पराजयानें वेढ्याचें पर्यवसान कळून चुकलें. अथेन्सची सॅरेक्यूज घेण्याची आशा तर पार मावळून गेलीच ; पण उलट आपल्या स्वतःचा बचाव करण्याची त्यास मुष्कील येऊन पडली. सॅरेक्यूजचे लोक पक्के खुनशी. ते आतां मागील सर्व अपराधांचें उट्टें काढतील अशी त्यास धास्ती पडली. ही भीति निराधार नव्हती हें लवकरच त्यांचे प्रत्ययास आलें. सॅरेक्यूजन्सप्रमाणें आपल्या शत्रूवर पुरा सूड उगविण्यास दुसऱ्या कोणास साधलें नसेल. समुद्रावर नित्य चकमकी झडूं लागल्या. अथेन्सचीं बहुतेक गलबतें बुडालीं अगर शत्रूचे स्वाधीन झालीं. जे खलाशी किंवा शिपाई आपला जीव वांचविण्याकरितां समुद्रकिनारा सोडून बेटाचे अंतर्भागांत शिरले ते कैदी झाले. अथीनियन सेनापति निकायस व डेमास्थिनीस यांचा निष्कारण वध करण्यांत आला. जे कोणी अथीनियन सैनिक शत्रूच्या हातीं लागले त्यांतील अर्धे सुमार तुरुंगांतच मरण पावले व बाकीच्यांना गुलाम म्हणून विकण्यांत आलें. याप्रमाणें दैवदुर्विलसितानें ज्या लोकांस गुलाम बनविण्याकरितां ते मोठ्या गर्वानें व तोऱ्यानें चालून आले होते, त्यांचेच पदरीं त्यांस दास होऊन राहण्याची पाळी आली.

अथेन्सच्या सिसिली बेटावरील मोहिमेचा असा भयंकर शेवट झाला. अथेन्सचें साम्राज्य डळमळीत होऊन पुढें थोड्याच कालांत तें लयास गेलें. पश्चिम युरोपांतील स्वतंत्र व वर्धिष्णु संस्थानांस त्याचा जो बाऊ वाटत होता तो नाहींसा होऊन तीं अथेन्सचे तडाक्यांतून बचावलीं व त्यांची पुरी वाढ होण्यास अवकाश मिळाला. अथेन्सचा उत्कर्षरवि गगनमध्यापासून च्युत झाला. आतां त्याचा अस्त होण्यास कांहीं कालावधि लागला व तेवढ्या वेळांत आपल्या किरणानें त्यानें सटरफटर ढगास दाद दिली नाहीं हें खरें. तथापि अथेन्सनें केवळ आपल्या

उद्दामपणानें व उतावळेपणानें आपल्या पायावर धोंडा पाडून घेतला हें निःसंशय आहे. अथेन्सच्या पाठीमागें दिग्विजयाची हांव बाळगण्यास लायक असे कोणी त्याच्या शत्रूंत नव्हते. पश्चिम युरोपचें साम्राज्य अथेन्सला साध्य झालें नाहीं. तें दुसऱ्या कोणत्याही ग्रीक संस्थानास साध्य होणें शक्य नव्हतें. त्या साम्राज्याची हांव बाळगणारे दोघे प्रतिस्पर्धी रोम व कार्थेज हे रंगभूमीवर येण्यास अद्याप दोन शतकांचा अवधि होता. पुढें दोनशे वर्षांनीं हे दोघे मल्ल त्या साम्राज्याकरितां झगडूं लागले तेव्हांचे त्यांचे डावपेंच, धाडस व युद्धकौशल्य यांजपुढें अथेन्सनें आपल्या उदयकाळीं, भर अमदानींत, किंवा ऱ्हासकाळीं दाखविलेला पराक्रम पासंगासही पुरणार नाहीं.

जगांतील क्रांतिकारक लढाया.

भाग ३ रा

'अरबेलाची लढाई' (इ. स. पूर्वी ३३१.)

ज्या विख्यात पुरुषांच्या महत्कृत्यांना कित्येक शतकें जग नाक मुरडीत होतें व दूषण देत होतें, पण पुढें कालांतरानें जे वंदनीय ठरले, अशा नररत्नांची यादी केल्यास ती बरीच लांबलचक होईल. हल्लींचा काळ जिज्ञासेचा व टीकेचा आहे. ती टीका केवळ विघातक असते असा तिजविषयीं आक्षेप आहे; तथापि या जिज्ञासेनें व टीकेनें किती तरी महात्म्यांचीं चरित्रें अज्ञानांधकारांतून उजेडांत आणलीं आहेत, निंदाप्रचुर होतीं तीं स्तुतिपूर्ण करून सोडलीं आहेत, व जीं पूर्वी निवळ काल्पनिक ह्मणून धुडकावून दिलीं जात होतीं तीं खरीं ठरविलीं आहेत. प्राचीन काळच्या कित्येक वीरांच्या बाणेदार कृत्यांचें चटकदार वर्णन शब्दशः खरें आहे असें सिद्ध झालें आहे; आणि कित्येक क्षुद्र मनाचे लेखक अचाट कर्तबगारीच्या पुरुषाच्या अद्भुत कृत्यास दोषास्पद मानीत असत, त्याचा पोकळपणाही आतां उघाडीस येऊं लागला आहे.

हे उपरिनिर्दिष्ट विचार सुचण्यास अरबेलाच्या लढाईतील विजयी योद्धा जो शिकंदर त्याचें नांव कारणीभूत झालें. शिकंदरनें तत्कालीन ज्ञात जगाचा बहुतेक भाग फारच अल्प काळांत जिंकला, त्याबद्दल आश्चर्य वाटून थक्क न होणारा पुरुष विरळा. परंतु त्याच्या सुधारणाविषयक व

व्यापारविषयक कल्पना, आणि सर्व जगाचें परस्पर दळणवळण वाढवून सर्व राष्ट्रांचा एक जोव बनविण्याचा त्याचा हेतु, यांत दिसून आलेल्या त्याच्या अतर्क्य बुद्धीची आजवर कोणी विचारपूर्वक शिफारस केली नव्हती. अलीकडे कोठें पांच पन्नास वर्षांत त्याची किंमत जगास कळूं लागली आहे. कित्येक भूतकालीन इतिहासकारांस तर शिकंदरला दूषण देण्यांत आपण जगाचें मोठें कल्याण करतों असें वाटत असे. तथापि आतां तो मनु पालटला आहे, व शिकंदरच्या कृतीचें खरें रहस्य लोकांस समजूं लागलें आहे.

शिकंदरच्या विजयाची जी खरी योग्यता आहे ती त्यानें राज्य किती वर्षें केलें, अगर त्याचें राज्य किती वर्षें टिकलें, किंबहुना त्याच्या सरदारांनीं त्याच्या साम्राज्याचे तुकडे वांटून घेतले ते किती कालपावेतों त्यांच्या ताब्यांत राहिले, यांवरून कांहीं ठरावयाची नाहीं. शिकंदरनें जो जो प्रांत जिंकला त्यांत त्यानें शहरें वसविलीं व ग्रीक वसाहती स्थापन केल्या आणि त्या प्रदेशांत सर्व बाबतींत ग्रीक लोकांचें वर्चस्व स्थापित केलें. त्याच्या सरदारांपैकीं सेल्यूकस व टॉलेमी यांनीं व त्यांचे वंशजांनीं त्याचाच कित्ता गिरविला; आणि तलवारीचे जोरावर कोणताही देश बळकावितांच तेथें राज्यव्यवस्थेबरोबरच, ग्रीक सुधारणा, व्यापार, विद्या, व कलाकौशल्य यांचा प्रसार करण्याचा परिपाठ ठेवला. या ग्रीक सुधारणांचा प्रसार इतका झपाट्यानें झाला कीं, शिकंदरनें युरोप खंडाची सरहद्द ओलांडून एशियाखंडांत पाय ठेवल्यास पुरीं तीस वर्षें झालीं नाहींत तोंच, ईजियन समुद्रापासून ते तहत गंगेच्या तीरापर्यंत ग्रीक भाषा, वाङ्मय, व कला यांचें वर्चस्व स्थापित झालें. कुढच्या मनाच्या इजिप्तनेंसुद्धां ग्रीसचें बुद्धिवर्चस्व मान्य केलें, आणि पेरिक्लीस व प्लेटो यांच्या ग्रंथांचें पिरामिदच्या सानिध अध्ययन चालू झालें. ईजियन समुद्र

व एक्झार्टिस, गंगा, नाईल इत्यादि नद्या, यांच्या दरम्यानच्या प्रदेशांत पूर्वी चालू असलेल्या कॉप्टिक, सीरियन, अर्मेनियन, पर्शियन, या भाषा अज्जी बंदच झाल्या असें नाहीं. तथापि सुशिक्षित वर्गात, दरबारी लोकांत, व्यापारी मंडळींत, लष्करामध्यें, आणि ग्रंथलेखनाचे कामीं सामान्यत्वेंकरून ग्रीक भाषेचाच उपयोग होऊं लागला. महमंदी धर्माचे लोकांनीं ते देश व्यापून टाकिले जाईपर्यंत ग्रीक भाषेचा हा वरपगडा कायम होता. शिवाय सर्वांत अत्यंत महत्त्वाची गोष्ट झटली झणजे एशिया मायनर, सीरिया, व इजिप्त या देशांत ग्रीक लोकांचें प्राबल्य झाल्यामुळें ख्रिस्ती धर्माचे प्रसारास आरंभींच चांगला अवकाश मिळाला.

युफ्रेतीस नदीच्या पलीकडे उत्तर एशियांत शिकंदरचा अम्मल अल्प कालच टिकला. पण बॅक्ट्रिया प्रांतांत ग्रीक लोकांचें वर्चस्व बरेच दिवस राहिल्यानें, तेथील आणि त्यांचे शेजारील राहिवाशांचे मनावर व बुद्धीवर ग्रीक लोकांच्या तरतरीत व उत्साहवर्धक वृत्तीचा कायम परिणाम घडून आला. त्यामुळेंच तदनंतरच्या हिंदुस्थानांतील किंवा इराणांतील प्रत्येक कलेंत व शास्त्रांत ग्रीक कलांचा व शास्त्रांचा थोडाबहुत अंश दृष्टोत्पत्तीस येतो. अरबी लोकांतील तर बहुतेक ज्ञानसंचय ग्रीक लोकांपासून उसना घेततेला अगर त्यांच्या अनुकरणानें सुधारून वाढविलेला आहे. पुढें मध्ययुगांत सॅरेसन लोकांनीं त्याच ज्ञानाचा प्रसार पश्चिम युरोपांत केला. सारांश ग्रीक लोकांची विद्या मॅसिडोनियाच्या राजाच्या हातून इराणांत पेरली गेली व महंमदाचे अनुयायांचे हातीं ती वृद्धिंगत होऊन त्यांचेकडून युरोपखंडास परत मिळाली. याप्रमाणें युरोपखंडाच्या अर्वाचीन सुधारणेंत ग्रीस देशाचा अप्रत्यक्षपणें संबंध आहे व त्याचें श्रेय शिकंदर बादशहासच आहे.

अशाप्रकारें दूरवर विचार करून पाहतां, मॅसिडोनियन दिग्विजयाबद्दल कौतुक वाटतें. नाहीं तर केवळ एका राजानें दुसऱ्या राजाचा

पाडाव केला, अगणित लूट मिळविली आणि आपली क्षुद्र महत्त्वाकांक्षा तृप्त करून घेतली तर त्याबद्दल जगास कांहीं आदर वाटणार नाहीं. फार तर तत्कालीन लोकांचे डोळे त्याच्या अतुल पराक्रमानें दिपून जातील. अरबेलाच्या लढाईत डरायसला जय प्राप्त झाला असता तरी कायरसनें स्थापिलेलें पर्शियन साम्राज्य फार दिवस टिकलें असतें असें नाहीं. हल्लींच्या काळीं तुर्कस्थानची जी स्थिति आहे तशीच हुबेहूब स्थिति त्यावेळीं पर्शियन साम्राज्याची झाली होती. त्या साम्राज्यांत ऱ्हास-काळचीं सर्व चिन्हें स्पष्ट दिसूं लागलीं होतीं. तुर्कस्थानचे सुलतानाचा हुकूम त्याचे सरदार हल्लीं जितक्या तत्परतेनें पाळतात, तितपतच पर्शियन सुभेदार आपल्या राजाचे हुकूम पाळीत. सर्व प्रांतांना आकलून एकवटून धरण्याची शक्ति केंद्रस्थानीं नव्हती; व एवढें अवाढव्य साम्राज्य एकजीव होण्यासही कांहीं तात्विक कारण नव्हतें. पर्शियाचा ऱ्हासकाळ जवळ आलाच होता. आतां शिकंदरनें तें जिंकलें नसतें तर दुसऱ्या कोणत्या तरी प्राच्य राष्ट्राच्या तें भक्ष्यस्थानीं पडलें असतें. पण एक प्राच्य राष्ट्र लयास गेलें व त्याचे जागीं दुसरें उदयास आलें तर त्यांत मानवजातीचें कोणतें हित साध्य होणार होतें? पण शिकंदरच्या अरबेला येथील विजयानें पर्शियन साम्राज्याचा अस्त होऊन त्या जागीं ग्रीशियन साम्राज्याची स्थापना झाली. त्यामुळें पौर्वात्य कल्पना व विचार यांच्या एकतानतेचा भंग होऊन पाश्चात्यांची उच्च सुधारणा व कर्तव्य-तत्परता आणि आस्था यांचा त्यांच्यांत फैलाव झाला. (हल्लीं इंग्लिश साम्राज्याचा हिंदुस्थानांत तोच परिणाम घडत आहे.) असो.

ज्या गांवाचे नांवावरून ही लढाई प्रसिद्ध आहे, तें अरबेला गांव प्रत्यक्ष समरभूमीपासून वीस मैल दूर आहे. सदरील रणांगणाजवळ गॉगमेला नांवाचें एक खेडें आहे. परंतु पूर्वीपासून अरबेलागांव जास्त

प्रसिद्ध असल्यानें या लढाईस तेंच नांव प्रचलित आहे. तैग्रीस नदी व कुर्दिस्थानचा डोंगराळ प्रदेश यांचे दरम्यान जें अफाट मैदान आहे त्यांत हें गांव वसलें आहे. या वालुकामय प्रदेशांत कांहीं टेंकड्या कोठें कोठें दृष्टिगोचर होतात. तथापि एकंदरींत हा प्रदेश सपाट असल्यानें युद्धाचे वेळीं घोडदळाचे हालचालीस अनुकूल आहे. अशा विस्तीर्ण मैदानांत सैन्याचें आधिक्य चांगलेंच फायदेशीर होतें. पर्शियाचा राजा दुसरा डरायस यानें गादीवर येण्यापूर्वीच आपलें शौर्य व सेनानायकत्व प्रदर्शित केलें होतें. तो चतुर योद्धा असल्यानें आपल्या प्रतिपक्षाशीं शेवटची निर्वाणीची लढाई देण्यास त्यानें ही जागा पसंत केली होती. शिकंदरनें यापूर्वीच त्याच्या सैन्याचा दोन वेळ पराजय केला होता. परंतु तो पराजय फिरून भरून येण्याजोगा होता. ग्रॅनिकसची लढाई त्याचे सरदारांनीं उतावीळपणानें एकमेकांचे संमतीवांचून व सहाय्याशिवाय लढून गमाविली. ईससच्या लढाईत डरायस स्वतः हजर होता; तथापि त्याचा मोड झाला. पण त्यास रणभूमीची प्रतिकूलता हें कारण होतें. त्या समरांगणाचे एका बाजूस पर्वत तर दुसऱ्या बाजूस नदी आणि तिसरीकडे समुद्र अशी अडचण असल्यानें त्याचे सैन्याचा कोंडमारा झाला. सैन्याचे हालचालीस व शिपायांचे पराक्रमास अवकाशच मिळाला नाहीं व सैन्याचें आधिक्य हितकारक न होतां उलट अपायकारकच झालें. परंतु या कुर्दिस्थानचे मैदानांत एशियांतील अति बलाढ्य व असंख्य सैन्याला जमण्यास, हल्ला करण्यास, परत फिरण्यास, व हुलकावणी दाखवून शत्रूस गराडा घालण्यास, किंवा इतर कोणताही डावपेंच चालविण्यास पूर्ण अवकाश होता. अशा समरभूमींत आपल्या सेनासमुद्रावर चालून येण्याचें धाडस शिकंदर करील तर त्याच्या मूठभर सैनिकांची पुरीं शंभर वर्षें भरलींच ह्मणून समजावें असें डरायसला वाटत होतें.

या लढाईत आपला अगर आपल्या प्रतिपक्षाचा काय तो सोक्षमोक्ष होणार हें डरायस जाणून होता. दोन पराजयांतून कशी तरी निभावणी काढली. आतां जर कां तिसरा पराभवाचा तडाका बसला तर त्यांतून बचावणें कठीण. या लढाईत शिकंदरला जय मिळाल्यास मेसापोटेमिया, उत्तर एशिया, व पर्शियन साम्राज्याचा मध्यभाग शत्रूचे स्वाधीन होईल; यास्तव या लढाईच्या परिणामाविषयीं डरायस फार फिकीरींत होता. शिवाय पौर्वात्यांची एक गोम त्यास ठाऊक होती कीं, एकदा एकाद्याला जयश्रीनें वरिलें कीं तो भाग्यशाली आहे; त्याचा पराजय होणें दुर्घट अशी समजूत होऊन त्यांचें धैर्य गलित व्हावयाचें. यास्तव या लढाईत आपला मुकुट चिरस्थाई होईल कीं शत्रूंचे स्वाधीन होईल याची त्यास घोर चिंता लागली होती. एवढ्याचकरितां इसिसची लढाई झाल्यापासून शिकंदर हा इजिप्त व सीरिया हे देश पादाक्रांत करण्यांत गुंतला असतां, डरायसनें आपल्या विस्तृत राज्यांतून शक्य तितकें निवडक सैन्य जमविलें; व सर्व सैन्यांनें एकजुटीनें, शिस्तीनें, पद्धतशीर लढावें ह्मणून त्या आपल्या विविध सैनिकांस कवाइतीचें शिक्षण देण्यास त्यांनें प्रारंभ केला.

हल्लींप्रमाणेंच त्याकाळींही अफगाणिस्थान, बुखारा, खीव व तिबेट देशांतील पहाडी लोक एशिया खंडांतील इतर रहिवाशांपेक्षां क्षात्रतेज व कंटकपणा यांत वरचढ होते. यास्तव डरायसनें त्या सर्व मुलुखांतून निवडक व वाखाणण्याजोगें पायदळ जमा केलें. त्याचे मदतीस खुर्द व तुर्कोमन स्वारांचा रिसालाही तयार केला. हे घोडेस्वार दणगट, चलाख, धाडशी असून युद्धाचे कामांत निर्ढावलेले होते. ज्या शीख बहादरांनीं चिलियनवाला येथें इंग्रजाशीं बरोबरीचा सामना केला त्यांचे पूर्वजही डरायसच्या बाजूनें मॉसिडोनियन सैन्याशीं लढण्याकरितां हुकू-

माप्रमाणें सैन्यांत येऊन दाखल झाले होते. बॅक्ट्रियाच्या सुभेदाराकडून जें सैन्य आलें होतें त्यांत त्यांचा समावेश झाला होता, व सर्व पार्शियन फौजेंत त्यांचे तोडीचें स्वार दुसरे कोणी नव्हते. या निवडक सेनेखेरीज डरायसच्या ताब्यांतील इतर प्रांतांतूत किरकोळ पलटणी आल्या होत्या त्या वेगळ्याच. डरायसचें एकंदर सैन्य, घोडदळ चाळीस हजार, सशस्त्ररथ दोनशें, हत्ती पंधरा इतकें असून 'पादातिचालति नव्हे गणना तयाची' अशी स्थिति होती.

मेसापोटेमियाच्या आसपासचा सपाट प्रदेश समरभूमि ठरविण्यांत डरायसनें आपलें युद्धकौशल्य व्यक्त केलें. इजिप्त देश जिंकून शिकंदर परतल्यावर इराणदेशावर स्वारी करण्यास त्याला सीरियाचे उत्तरेकडून जाणें भाग होतें. कारण पॅलेस्टाईन प्रांतांतून सीरियाचा वैराण मुलूख तुडवीत थेट पूर्वेला गेल्यास सैन्यास अन्नसामुग्रीचा व पाण्याचा पुरवठा होण्याची पंचाईत पडली असती. याकरितां युफ्रेटीस नदी ओलांडून शिकंदरला मेसापोटेमिया प्रांतांत आलेंच पाहिजे होतें. त्या मार्गानें आल्यानें पर्शियन साम्राज्यांतील बॅबिलोन, सूसा, पर्सेपोलीस हीं बलिष्ठ व संपत्तिमान् शहरें त्याच्या दक्षिणेस राहणार; पण जर शिकंदर तसाच पुढें चालून जाऊन त्यांचेवर हल्ला करील तर त्यांत डरायसचें आयतेंच कार्य साधेल. शत्रूच्या पाठीस आपले घोडेस्वार लावून त्यांचा पाठीमागचा मार्ग बंद केला व नंतर संधि साधून त्यांजवर हळू हळू छापे घालून त्यास भंडावून सोडलें ह्मणजे शत्रू जेरीस येण्यास मुळींच अवकाश नको. पण बॅबिलोनचा नाद सोडून शिकंदर आपल्या शत्रूचा पाठलाग करूं लागेल तर, तिकडूनही डरायसला भीति नव्हती. कारण तैग्रीस नदीच्या दोहो तीरांवरील प्रदेश त्यास अनुकूल होता. त्याच्या पिछाडीस उत्तर मीडियांतील डोंगराळ मुलूख होता. डरायस

स्वतः तेथें कांहीं वर्षें सुभेदार असल्यानें त्या मुलखाची त्यास चांगली माहिती होती व त्या प्रांतांतील राहिवासी आपल्या जिवास जीव देतील व आपला पराजय झाला तरीसुद्धां आपणांस शत्रूचे स्वाधीन होण्याचा प्रसंग येणार नाहीं अशी त्याची खात्री होती. याप्रमाणें सर्व बाजूंनीं विचार करून डरायस हा मेसापोटेमिया प्रांतांत आरबेलाजवळ तळ देऊन राहिला होता.

इकडे शिकंदर इजिप्त देश जिंकून परत सीरिया प्रांतीं आला. शत्रूचे डावपेंच सर्व जाणून त्यानें युफ्रेटीस नदी ओलांडली व तो थरायस-वरच रोंख धरून चालला. त्याचें सैन्य चाळीस हजार पायदळ व सात हजार घोडेस्वार इतकें होतें. शिकंदरच्या बरोबरचे व त्याच्या सर्व लढायांत प्रमुख असलेले सरदार अरिस्टॉब्यूलस व टॉलेमी यांच्या रोजनिशीवरून ॲरियन नामक इतिहासकारानें वरील माहिती दिली आहे; सबब ती विश्वसनीय मानण्यास कांहींच हरकत नाहीं. शिवाय युरोपखंडांतून निघाल्या वेळचे शिकंदरचे सैन्यांत, आजवर युद्धांत कामास आलेले व निकामी झालेले वजा टाकून, आणि नवीन कुमक आलेली जमा धरून पाहतां ॲरियननें दिलेल्या आंकड्याशीं मेळ बसतो. ज्या इंग्लिशांनीं हिंदुस्थानांतील प्रचंड सेनासमूहाशीं मूठभर सैन्यानिशीं प्लासी, आसई, मियानी वगैरे ठिकाणीं लढाया दिल्या व जय संपादन केला, त्यांस तरी निदान शिकंदरच्या व डरायसच्या सैन्यांतील जमीन-अस्मानाचें अंतर पाहून आश्चर्य वाटणार नाहीं, किंवा त्याच्या खरेपणा-विषयीं मन साशंक राहणार नाहीं. शिकंदराचें सैन्य अल्प होतें खरें; पण तें सर्व कसलेलें असून त्यांचीं शस्त्रास्त्रें, जामानिमा, व शिस्त हीं पहिल्या प्रतीचीं होतीं. शिवाय त्यांची आपल्या सेनापतीवर दृढ भक्ति असून त्याचें युद्धकौशल्य व त्याचें यशस्वी दैव यांजवर त्यांचा पूर्ण विश्वास होता.

मॅसिडोसियन्सचें प्रसिद्ध भालाइत पथक हें शिकंदरच्या पायदळांतील प्रधान अंग होतें. त्याच्या कर्तबगारीवरच त्याची कायती यशापयशाची मदार होती. शिकंदरचा पिता फिलिप्स यानें आपल्या राज्यरोहणाचे वेळीं ही भालाईत पथकाची टूम काढिली. ग्रीक लोकांचे भाल्याहून अधिक पल्लेदार भाले उपयोगांत आणून व पथकांतील रांगांची संख्या वाढवून त्यानें हें पथक ह्मणजे एक भयंकर शस्त्र बनविलें होतें. त्या पथकांत सोळा रांगा असून प्रत्येक शिपायाचे हातांतील भाला चोवीस फूट लांबीचा असे. लढाईचे वेळीं त्यानें तो तोलून पवित्र्यांत धरला ह्मणजे त्याचे छातीपासून तो अठरा फूट पुढें रहात असे. प्रत्येक रांगेंत दोन दोन फुटांचें अंतर असल्यानें अगदीं अघाडीच्या रांगेंतील शिपायाचे पुढें किमानपक्ष पांच भाल्याचीं तरी फळें त्याचे रक्षणास असत. या पथकांतील प्रत्येक शिपायाचे अंगांत चिलखतही असे. तेणेंकरून तें पथक ह्मणजे केवळ शस्त्रांच्या दुर्भेद्य कोटाप्रमाणें दिसे, व जोंपर्यंत त्यांच्या रांगा कायम असत, तोंपर्यंत त्यांच्या हल्ल्यापुढें कोणाचाही टिकाव होत नसे. अशा प्रकारच्या सैन्यरचनेंत कांहीं दोषही असावयाचेच, व पुढें रोमन लोकांचे कवाइती सैन्यापुढें या भालाइतांचें कांहींच चाललें नाहीं हेंही सर्वविश्रुतच आहे. तथापि शिकंदरचें भालाइत पथक 'सायनो,' 'सेफेल,' व 'पीडना' यांचे फौजेप्रमाणें अवजड झालें नव्हतें. कारण त्यांतील सैनिक सर्व कसलेले लढवय्ये असून त्यांस सर्व लष्करी डावपेंच अवगत होते व त्याप्रमाणें ते बिनचूक वागत असत. शिकंदराजवळ तीन हजारांची एक अशा सहा तुकड्या मिळून अठरा हजार भालाइत पायदळाचा भरणा होता. जेव्हां सर्व भालाइतांचें एकच पथक करणें लढाईंत सोईचें नसे, त्यावेळीं त्यांच्या निरनिराळ्या तुकड्या करून शत्रूनें मधून घुसूं नये अगर बगलेवर हल्ला करूं नये ह्मणून मधलें अंतर निराळ्या प्रकारच्या सैनिकांनीं भरून

काढिलें जात असे. परंतु हल्ला चढवावयाची संधि आल्यास अगर घोडेस्वारांचा हल्ला परतवावयाचा असल्यास हें मधील खेागीरभरती सैन्य बाजूस होऊन भालाइतांचें एक पथक बनत असे. असो.

या भालाईत पलटणीशिवाय शिकंदरजवळ ढालवाल्या पायदळांचा भरणा विशेष होता. ग्रीक करोल सैन्याप्रमाणें यांचा जामानिमा भरपूर नसे. तथापि लगट करून लढण्यांत, व छापा घालण्यांत यांचा उपयोग ग्रीक सैन्यापेक्षां अधिक होत असे. यांची शिरगणती सहा हजार होती. याखेरीज त्याच्या सैन्यांत ग्रीक कवाइती पायदळ, तिरंदाज, गोफणवाले, बर्चीवाले यांचा भरणा होता, हे शेवटचे सैनिक रुंद पातीच्या तलवारी व ढाली घेऊनही कारण पडल्यास लढत. यांचा भरणा मुख्यत्त्वें करून इलीरिया व थ्रेसिया या प्रांतांतून झाला होता. मॅसिडोनिया व थ्रेसॅलिया येथून प्रत्येकीं दीड हजार स्वार त्याच्या फौजेंत होते. ते अरुंद तलवारीनें लढत; परंतु त्यांच्या तलवारी जड व भाले लांब असत आणि घोडा व स्वार मिळूनच चिलखतानें व हत्यारांनीं फुल्लन गेलेला असे. याशिवाय इतर किरकोळ घोडेस्वार असत त्यांचा जामानिमा तितपतच असे. इजिप्त व सीरिया येथील लढायांत शिकंदरास जयप्राप्ति झाल्यावेळीं लुटींत जे सुंदर घोडे सांपडले त्यांचा उपयोग करून ही घोडेस्वारांची नवी पलटण उभारण्यांत आली होती.

आगष्ट महिना संपतां संपतां शिकंदर हा थॅपसेकस येथें युफ्रेटीस नदी ओलांडून अलीकडे आला. मेझिअसच्या हाताखालील कांहीं पार्शियन स्वार टेहळणीस होते; त्यांनीं त्याचेपुढें पळ काढला. मेसापोटेमियाच्या वैराण प्रदेशांतून कूच करण्यास शिकंदर कांहीं वेडा नव्हता. तैग्रीस नदी ओलांडून तिच्या तीरानें पुढें चाल करून जावें या उद्देशानें त्यानें पूर्वदिशेस मोर्चा वळविला. तैग्रीसच्या पैलतीरीं गेल्यावर

डरायस जर आढळला नाहीं किंवा त्यास लढाई देण्याला भाग पाडतां आलें नाहीं, तर त्या नदीच्या डाव्या कांठानें डोंगराळ मुलुखांतून आपला रस्ता सुधरावा ह्मणजे सैन्यास उन्हाचा तितका ताप होणार नाहीं, व धान्यसामुग्री आणि पाणी यांचा तुटवडा पडणार नाहीं असें शिकंदरचें धोरण होतें.

मेसापोटेमियांतून आपल्या राजधानीवर चालून येण्यास शिकंदर उद्युक्त नाहीं असें पाहून तैग्रीसच्या डाव्या तीरावरील माऱ्याची जागा आपण धरून रहावें असा डरायसनें बेत केला. शिकंदरला जर या ठिकाणीं हार खावी लागली तर तैग्रीस व युफ्रेटीस या दोन नद्या ओलांडून परत जाणें दुर्घट होईल व त्याच्या सैन्याचा फडशा पाडतां येईल असें त्याचें अनुमान होतें. त्याप्रमाणें युद्धाची जागा मुकर करून आपले सशस्त्र रथाचे सोयीकरितां त्यानें ती रणभूमि साफ करविली. आपल्या पिछाडीस २० मैलांवर असलेल्या अरबेला गांवी त्यानें युद्धसामुग्रीचा भरपूर पुरवठा करून ठेविला. मध्य युगांतील इतिहासकार 'डरायस हा ग्झग्झेसप्रमाणेंच डौली व भित्रा होता' असें विधान करितात. परंतु या त्याच्या शेवटच्या लढाईंत त्यानें जें युद्धकौशल्य दाखविलें त्यावरून तो आपला पूर्वज डरायस हिस्टॅस्पिस याचें नांव धारण करण्यास लायक होता असें दिसून येतें.

तैग्रीस नदीच्या डावे तीरावर डरायस हा आपल्या प्रचंड सैन्यासह तळ देऊन राहिला आहे असें शिकंदरला कळतांच तो तांतडीनें निघाला, व त्यानें ती नदी कांहीं एक अडथळा न येतां ओलांडली. प्रथमतः त्यास आपल्या शत्रूचा ठावठिकाणा बरोबर लागेना, ह्मणून आपल्या सैन्यास चार दिवस विश्रांति देऊन नंतर तो पुढें निघाला. याप्रमाणें चार दिवस कूच केल्यावर बिनीवाल्यांनीं शत्रूचे घोडेस्वार दिसल्याची वर्दी दिली.

तत्क्षणींच शिकंदरनें आपली फौज लढाईच्या शिस्तीनें बनवून नंतर कूच करण्यास हुकूम दिला, आणि आपण स्वतः कांहीं घोडेस्वार बरोबर घेऊन शत्रूच्या टेहळणी करणाऱ्या स्वारांवर तुटून पडला. त्यांतील कांहीं स्वार कैद करून आणिले व बाकीच्यांस पिटाळून लाविलें. त्या कैद केलेल्या स्वारांचे तोंडून शिकंदरनें डरायसच्या छावणीची जागा व त्याचे सैन्याची संख्या याविषयीं नक्की बातमी काढून घेतली. तदनंतर त्यानें पुनः एकवार आपल्या सैन्यास चार दिवस विश्रांति दिली- कारण लढाईच्या वेळीं तें ताजेतवानें व उमेदींत असलें पाहिजे. शिवाय त्या चार दिवसांत त्यानें आपल्या छावणीची मोर्चेबंदी केली व त्यांत त्यानें आपली अधिक असलेली सामुग्री ठेवून दिली; आणि आजारी अगर जायबंदी शिपाईही तेथेंच व्यवस्थेनें ठेवून सड्या स्वारीनिशीं तो रातोरात तडक निघाला. दोहों सैन्यांच्या मध्यभागीं उंचसखल प्रदेश होता त्यामुळें प्रत्येकास प्रतिपक्षाचें सैन्य दिसत नव्हतें. परंतु सूर्योदयाचे सुमारास डरायसचे छावणीसमोरील टेकडीवर शिकंदरचें सैन्य आलें त्यावेळीं प्रभातकालचे प्रकाशानें शत्रुसैन्य त्याचे दृष्टीस पडलें. त्याच वेळीं शिकंदरच्या काकदृष्टीस आपल्या समोरील समरभूमींत कांहीं फेरबदल नुकताच केलेला असल्याचें दिसून आलें. पर्शियन सैन्यांतील सशस्त्ररथाचे गतीस अडथळा होऊं नये ह्मणून जमीन साफसूफ केलेल्या त्या खुणा होत्या. पण शिकंदरास वाटलें कीं, आपल्या घोडेस्वारांस अडथळा करण्याकरितां हे प्रच्छन्न खड्डे आहेत. अशी शंका येतांच त्यानें आपलें मंत्रिमंडळ बोलाविलें. कित्येक अधिकाऱ्यांचें मत पडलें कीं काय होईल तें होवो; ताबडतोब शत्रूवर चाल करून जावें. परंतु पार्मेनिओचें दूरदर्शी मतच शिकंदरला मान्य झालें. समरांगणाची पूर्ण टेहळणी केल्याखेरीज पुढें चालून जावयाचें नाहीं असें त्यानें ठरविलें.

शिकंदरनें त्या दिवशीं आपल्या सैन्याचा तळ त्या टेकडीवरच दिला, व कांहीं जुजबी सज्ज असें पायदळ व कांहीं घोडेस्वार बरोबर घेऊन तो प्रतिपक्षाचे बलाची हालचाल पाहण्यास आणि समरभूमीचें निरीक्षण करण्यास निघाला. डरायसही कांहीं कमी धूर्त नव्हता. ग्रीक सैन्य उंचवट्यावर असल्यानें त्याजवर हल्ला करणें कठीण होतें सबब त्यानें आपली जागा सोडली नाहीं. याप्रमाणें तो सगळा दिवस तीं उभय दळें समोरासमोर कांहीं हालचाल न करितां राहिलीं. टेहळणी करून परत तबूंत आल्यावर शिकंदरनें आपल्या सर्व सैन्यांतील प्रमुख सरदारांस पाचारण केलें व तो म्हणालाः— "सरदारहो, तुमच्या शौर्याविषयीं व उमेदीविषयीं माझी खात्री आहे सबब त्याबद्दल मी तुम्हांस सांगितलें पाहिजे असें नाहीं. पण तुमच्या हाताखालीं जे सैनिक आहेत त्यांस तुम्ही उदईक कसून नेटानें व जिवाची पर्वा न करितां लढण्यास सांगा. आजवर मारलेल्या लढाया एखाद्या प्रांताकरितां अगर देशाकरितां होत्या. पण उदईक होणारी लढाई विशेष महत्त्वाची आहे. त्या लढाईतील जयापजयावर अखिल एशिया खंडाचें स्वामित्व अवलंबून आहे ही गोष्ट तुम्ही आपल्या दुय्यम अधिकाऱ्यांकडून सर्व शिपायांचे मनावर पूर्ण ठसवा. तुम्ही जात्याच शूर असल्यानें तुम्हांस उसनें धैर्य आणण्याची अगर बतावणी करण्याची गरज नाहीं. पण एक गोष्ट सर्वांना पूर्णपणें लक्षांत बागविण्यास सांगा कीं, लढाईत धिम्मेपणा हा गुण धैर्याहून वरिष्ठ आहे. शिवाय जोपर्यंत तोंडांतून एक शब्द न काढतां चालेल, तोंपर्यंत मुकाट्यानें तलवार चालवूंद्या ; पण एकदां कां युद्धाची धुमश्चक्री चालू झाली म्हणजे तुमच्या जयघोषानेंच शत्रूंचीं हृदयें उकलून गेलीं पाहिजेत. अधिकाऱ्यांनीं हुकूम ऐकण्यांत व सैनिकांस ताबडतोब कळवून ते अमलांत आणण्यास तत्पर असावें. शेवटीं एकच मुख्य गोष्ट सांगतों ती ही कीं, प्रत्येकानें जणूंकाय लढाईचा सर्व जयापजय

आपल्या पराक्रमावरच अवलंबून आहे अशी कल्पना करून मर्दुमकीची शर्त करावी." याप्रमाणें उत्तेजनपर व उपदेशपर भाषण करून त्यानें त्यांस विश्रांति घेण्यास परवानगी दिली.

रात्र बरीच होऊन अंधार गडद पडला होता. अशावेळीं शिकंदरचा विश्वासु व कसलेला सेनापति पार्मेनिओ त्याजकडे आला व त्यानें शिकंदरला शत्रूवर रात्रीचा छापा घालण्यास सुचविलें; पण शिकंदरनें असें बाणेदार उत्तर दिलें कीं वा! तो ह्मणाला 'शिकंदर हा कांहीं चोर किंवा दरवडेखोर नव्हे. एशियाखंडाचें स्वामित्व अशा रीतीनें चोरून मिळविणें निंद्य आहे. शिकंदरचे जय सर्व जगाचे डोळ्यांदेखत व युद्धनीतीस अनुसरूनच संपादिलेले असले पाहिजेत." हें उत्तर केवळ बाणेदारच नव्हे तर मुसद्दीपणाचेंही होतें. कारण रात्रीच्या छाप्यांत गोंधळ व अनिश्चितपणा असणार. तथापि आपणास जयप्राप्ति हाईल असें गृहीत धरलें तरी शत्रूला तीं एक पराजयाबद्दल कुरकुर करण्यास जागा राहणार. डरायसचा एक वेळ कसा तरी पराजय करावयाचा एवढाच शिकंदचा हेतु नसून तो पुनः डोकें वर करणार नाहीं असा त्याचा पुरा मोड करण्याचा त्याचा संकल्प होता. याकरितां रात्रीच्या चोरट्या छाप्यानें तें काम साधण्यासारखें नव्हतें.

इकडे पर्शियन फौजेस रात्रीच्या हल्लचाची भीति वाटत असल्यानें, डरायसनें सायंकाळपासूनच आपली सेना युद्धाचे शिस्तीनें उभी केली होती. सारी रात्र त्यांनीं तशाच स्थितींत काढल्यानें, सूर्योदयीं ग्रीसियन सैन्य ताजेतवानें होऊन युद्धास निघालें तर पर्शियन सैन्य जाग्रणानें व श्रमानें थकून, गळून, नाउमेद होऊन गेलेलें असें बाहेर पडलें.

युद्धाचे व्यवस्थेसंबंधी डरायसनें टांचण करून ठेविलें होतें तें या लढाईनंतर ग्रीक लोकांचे हातीं लागलें; त्यावरून पर्शियन सैन्याचे

हालचालीबद्दल अगदीं विश्वसनीय अशी माहिती मिळते. पर्शियन सैन्यांत डावे बाजूस अगदी शेवटीं बॅक्ट्रियन, डॉन व अरकेशियन घोडेस्वार होते. त्यांच्या अलीकडे खुद्द इराणी स्वार व पायदळ, नंतर सूसियन्स व कॅडूसियन्स. हे सर्व मिळून सैन्याची डावी बाजू झाली. डरायस जातीनिशीं मध्यभागीं उभा होता. त्याचे संनिध इंडियन, कोरियन व मीडियन तिरंदाज, सोन्याच्या मुठी बसविलेले भालेवाले पर्शियन्स आणि पर्शियन सरदारांचे शरीररक्षक होते. शिवाय त्या ठिकाणीं युक्झियन, बाबालोनियन, व तांबड्या समुद्राजवळील प्रदेशांतील सैन्य होतें. डरायसच्या पदरीं कांहीं ग्रीक सैन्य असून मॅसिडोनियन भालाइतांचा हल्ला सोसण्यास हें एकटेंच समर्थ अशी समजूत असल्यानें त्याना डरायसनें आपल्या रथाच्या दोहों बांजूस उभें केलें होतें. उजव्या अंगाचे सैन्यांत किलोसीरियन, मेसापोटेमियन, मीड्स, पार्थियन्स, सॅसियन्स, टायरियन्स हिकेनियन्स, अल्यूनियन्स इत्यादि भिन्न भिन्न प्रकारचें दळ होतें. डाव्या बाजूचे तोंडावर सीथियन व बॅक्ट्रियन घोडेस्वार एक हजार, आणि शंभर सशस्त्र रथ सज्ज होते. मध्यभागाचे संरक्षणास पन्नास रथ व पंधरा हत्ती असून उजव्या बाजूचे पुढें आर्मेनियन व कॅपेडोसियन रिसाला हजर होता. अशा रीतीनें युद्धार्थ सज्ज होऊन त्यांनीं ती रात्र काढिली. जांग्रणानें त्यांचे डोळे ताठून गेले होते. सूर्योदय होतांच मॅसिडोनियन सैन्यास लढाईची इशारत देणारें शिंग झालें. लगेंच ग्रीक सन्य टेंकडीवरून उतरून खालीं मैदानांत युद्धाचे शिस्तीनें उभें राहूं लागलें.

शिकंदरला या लढाईत आपलें सर्व बळ व चातुर्य खर्चावें लागलें. या युद्धांत त्यानें दाखविलेल्या रणपटुत्वास दुसऱ्या कोठेंही तोड मिळणें शक्य नाहीं. त्याच्या सैन्याच्या दोहों बाजूंस स्वाभाविक रक्षणसाधन

कांहीं नसल्यानें शत्रू आपले बगलेवर हल्ला करील किंवहुना आपण प्रतिपक्षाचे मध्यावर चालून गेल्यास तो आपल्या सैन्याला गराडा देऊन चोहों बाजूनें मारा करील अशी शिकंदरला धास्ती वाटत होती. ह्मणून त्यानें कांहीं सैन्य अशा आणीबाणीच्या प्रसंगाकरितां मागील बाजूस राखून ठेविलें. त्या सैन्यानें वेळ पडेल त्याप्रमाणें कोणत्याही बाजूस मदत करावी. त्याचप्रमाणें वाटेल त्यावेळीं आपल्या सेनेचा पोकळ व्यूह रचितां येईल अशी तजवीज करून तो पुढें निघाला. ग्रीक सैन्याचे उजव्या बाजूचें अधिपत्य नेहमींच्या पद्धतीप्रमाणें स्वतः शिकंदरकडे असून डाव्या बाजूस पार्मेनियो होता. मॅसिडोनियन्सचें प्रसिद्ध अजिंक्य भालाईत पथक मध्यभागीं होतें.

आपले सर्व सरदारांस अवश्यक ते सर्व हुकूम देऊन व कोणत्या प्रसंगीं कसें वागावयाचें याविषयीं पूर्ण तरतूद करून ठेवून त्यानें आपले सैन्यास कूच करण्यास हुकूम दिला. उजव्या तुकडीचे अग्रभागीं आपण स्वतः तो सर्व लढायांत असत असे, त्याप्रमाणें याही प्रसंगीं आपल्या ठराविक जागीं होता. त्याचे सभोंवतीं लष्करी अधिकाऱ्यांचा गराडा असल्यानें व त्याच्या अंगांत चकचकीत चिखलत होतें त्यावरून तो सर्वांस चटकन ओळखूं येत असे. तो अपणास ॲकिलीजचा वंशज ह्मणवीत असे; आणि त्याच्या पराक्रमाची बरोबरी करण्याच्या इर्षेनें आपला जीव लढाईत तो बेलाशक धोक्यांत घालीत असे. आरंभीच्या लढायांत स्वसैन्यास उत्तेजन देण्याकरितां त्यास कदाचित् तसें करणें भाग पडलें असेल, पण पुढें तीच त्यास संवय पडून गेली. तथापि शिपाईगिरीचे आवेशांत तो सेनापतीचें कर्तव्य विसरत नसे.

डरायसला आपल्या सशस्त्र रथांचा फार भरंवसा होतो. हे रथ प्रथम पुढें ढकलावयाचे व त्या योगानें ग्रीक भालाइतांचें पथक विस्कळीत झालें

ह्मणजे त्यांतून घुसून पर्शियन घोडेस्वारांनीं त्यांची कत्तल करावयाची व शिकंदरच्या मुख्य भयंभर तुकडीचा फन्ना उडवावयाचा असा त्याचा उद्देश होता. एवढ्याचकरितां समरांगणांतील जमीन त्यानें साफसूफ करून ठेविली होती.

मॅसिडोनियन सैन्य डरायसच्या फौजेसमीप आलें तेव्हां शिकंदरला दिसून आलें कीं, आपलें सर्व सैन्य शत्रूच्या मध्यभागाएवढेंही नाहीं. यास्तव अशीच सरळ पुढें चाल केल्यास शत्रूची डावी व उजवी बाजू आपल्या दोंहो बगलांवर उलट्टून आपला कोंडमारा करण्यास चुकणार नाहीं. शिकंदरची नेहमींची युद्धपद्धति ह्मटली ह्मणजे आपल्या करोल सैन्यानिशीं शत्रूच्या एकाद्या कमजोर भागावर हल्ला करावयाचा व तेवढयाचा फडशा पाडून शत्रूचे सैन्याची फुटाफूट करावयाची आणि तो वेळपर्यंत आपल्या बाकीच्या सैन्यावर हल्ला करण्यास शत्रूला सवडच द्यावयाची नाहीं. हेंच धोरण साधण्यासाठीं यावेळीं सरळ रेषेनें चालून न जातां तो जरासा उजवीकडे वळला. या तिरप्या गतीनें शत्रूच्या कमजोर अशा डाव्या बाजूवर त्यांस हल्ला करितां आला. आतां त्यामुळें त्याचे स्वतःचे सैन्याची डावी बाजू उघडी पडली हें उघडच आहे. पण पार्मेनिओचे युद्धकौशल्यावर भिस्त ठेऊन त्यास त्यावेळीं तिकडे दुर्लक्ष्य करावें लागलें. तिरप्या गतीनें कुच केल्यानें त्याचे भालाइतांची तुकडी पर्शियन रथ उभे होते त्याच्या पलीकडे गेली. डरायसला भीति पडली कीं, आपल्या रथांचा मारा शत्रूच्या मुख्य भयानक भागावर होत नाहीं. यासाठीं त्यानें आपल्या डावीकडील बॅक्ट्रियन व सीथियन घोडेस्वारांस शिकंदरच्या उजव्या बगलेवर मारा करून त्याची वक्रगति बंद करण्यास फर्माविलें. या हल्ल्यापासून बचाव करण्याकरितां शिकंदरनें आपल्या शिलकी सैन्यापैकीं कांहीं भागास पुढें वाढून जाण्यास आज्ञा केली,

याप्रमाणें त्या बाजूस रणधुमाळी माजली. एशियाटिक घोडेस्वारांची संख्या युरोपियन स्वारांहून अधिक होती. परंतु एकजुटीनें, परस्परांस साहाय्य करून, एकएका टोळीनें आळीपाळीनें हल्ला करणें, वगैरे युद्ध-पद्धतीचें त्यांस शिक्षण नसल्यानें त्यांस शेवटीं माघार ध्यावी लागली. नंतर डरायसनें आपल्या रथसमूहास शिकंदरच्या भालाइतावर आणि घोडेस्वारांवर हल्ला करण्यास पाठविलें व ते रथ घडघड करीत पुढें निघाले. ब्रिटनच्या रहिवाशांनीं ज्यूलियस सीझरच्या सैन्याची असल्याच रथांनीं कशी त्रेधा करून सोडली हें ज्यास अवगत आहे, तो डरायसला या रथाचा उपयोग केल्याबद्दल नांवें ठेवणार नाहीं. पण अरबेलाचे लढाईंत शिकंदरच्या दूरदर्शीपणामुळें त्या रथांचा कांहीं उपयोग झाला नाहीं. या रथांस प्रतिबंध करण्याकरितां त्यानें कांहीं चपळ पायउतारा सैन्य मुद्दाम योजून ठेवलें होतें. त्या शिपायांनीं कांहीं घोड्यांस बुजवून, कांहींस ठार करून व कित्येकांचे दोर कापून काढून ते रथ निरुपयोगी केले. बाकी थोडे रथ भालाईत पथकापर्यंत येऊन थडकले. तेव्हां त्या शिपायांनीं आपल्या रांगा दुभागून त्या रथास मधून वाट दिली व ते रथ मुकाट्यानें पुढें जातांच आपल्या रांगा पूर्वीप्रमाणें एकवटून सोडल्या. सैन्याच्या पिछाडीस ते रथ पोचतांच तेथें त्यांचे घोडे सोडून टाकण्यांत आले. याप्रमाणें डरायसच्या या योजनेपासून शिकंदरच्या सैन्याचें काडीमात्र नुकसान झालें नाहीं.

इकडे डरायसच्या घोडेस्वारांनीं फिरून एकवार शिकंदरचे उजव्या तुकडीच्या बगलेवर हल्ला करण्याचा बेत केला. याकरितां वळसा घालून ते येत असतां ग्रीक शिलकी सैन्यांतील ॲरिटसच्या हाताखालील घोडेस्वारांनीं उलट त्यांच्याच बगलेवर मारा केला. याप्रमाणें आपणास वेढण्याचे शत्रूचे सर्व बेत निष्फळ करून त्यानें आपलें स्वतःचें घोडेस्वारांचें

पथक अद्याप ताज्या दमाचें राखिलें होतें. संधि साधून त्यांच्याकडून एक जोराचा हल्ला करवून लढाईचा निकाल लावावा असा त्याचा मनोदय होता. तशी संधि त्यास लवकरच प्राप्त झाली. त्याचे उजव्या हातास उभय दळांत जें रणकंदन माजलें होतें त्यांत स्वपक्षास मदत करण्याकरितां डरायसच्या सैन्याच्या मध्यभागाजवळील डाव्या बाजूचे घोडेस्वार पुढें वाढून गेले. त्यामुळें त्याच्या सैन्याची डावी बाजू उघडी पडली. ही जी फट पडली त्यांत शिकंदर आपल्या गार्द्यांसह शिरला व त्यानें पर्शियन मध्याच्या डाव्या बाजूची कत्तल करण्यास सुरवात केली. त्या डळमळूं लागलेल्या एशियाटिक सैन्यावर ढालाईत पायदळानें चढाव केला व भालाईत पथकांतील पांच तुकड्यांनीं आपल्या अनिवार्य माऱ्यानें डरायसच्या भाडोत्री ग्रीक सैन्याचा धुव्वा उडवून अगदीं मध्यापर्यंत आपला हल्ला नेऊन भिडविला. लढाईच्या प्रारंभीं डरायस धीरानें व चातुर्यानें लढत होता, आणि या आणीबाणीच्या वेळींही त्यानें स्वकृतीनें व शब्दानें आपले सैन्यास धीर दिला. परंतु ग्रीक घोडेस्वार व भालाईत पलटण जसजसें जवळ येऊं लागलें तसतसा त्याचा धीर सुटत चालला. आपल्या सारथ्यास बर्चीची जखम लागून तो घायाळ होऊन पडलेला पाहतांच त्याचे हातपाय लटपटूं लागले. त्यानें निमूटपणें रथांतून उडी टाकली, व एका चपळ घोड्यावर स्वार होऊन, समरांगणांत इतर बाजूस लढाईचा रागरंग कसा काय आहे याची विचारपूस न करतां, पलायनास प्रारंभ केला. वास्तविक पाहतां त्याच्या उजव्या बाजूची अद्याप सरशी होती. - तेथें जाऊन त्यानें या लढवय्यांस उत्तेजन दिलें असतें तर कदाचित् त्यास जयश्री प्राप्त झाली असती.

शिकंदरनें आपल्या उजव्या बाजूच्या व मध्यभागच्या सैन्याच्या ज्या हालचाली केल्या त्यामुळें त्याची डावी बाजू अगदीं लंगडी पडली.

त्या बाजूवरच शत्रूचाही जोर अधिक होता. पार्मेनियोनें प्रथम होतां होईल तों लढाई टाळली. पण पर्शियन डाव्या बाजूचा सेनापति मेझिअस यानें त्यास शेवटीं गांठलें; व आपल्या अधिक सैन्यानें त्यास बहुतेक सर्व बाजूंनीं घेरून टाकिलें. अशा अडचणींत ग्रीक सैन्यास पाडून मेझिअसनें त्याजवर हल्लचावर हल्ले चढविले. ग्रीक सैन्यांतील सहावी भालाइत टोळी इतर पलटणीबरोबर पर्शियन सैन्याचे मध्यभागावर तुटून न पडतां पार्मेनिओस मदत करण्यासाठीं शिल्लक राखून ठेविली होती ह्मणून बरें, नाहींतर शत्रूंनीं पार्मेनियोस पुरेंच वेढून टाकिलें असतें. ही भालाईत पलटण डावीकडे वळल्यामुळें ग्रीक सैन्यांत फट पडली. त्यांतून घुसून पर्शियन व इंडियन घोडेस्वारांनीं चाल केली व ते शिकंदरच्या शिलकी सैन्याची पातळ फळी फोडून पार निघून गेले. वास्तविक पाहतां त्यांनीं यानंतर परत फिरून पार्मेनिओ अगर शिकंदर यांचे पिछाडीवर तुटून पडावयाचें, ह्मणजे त्यांची पूर्ण कंबक्कीच होत होती. पण तें सर्व सोडून देऊन ते थेट ग्रीक छावणीवर चालून गेले व तेथील अेसियन संरक्षकांस पिटाळून लावून त्यांनीं छावणीची लूट चालविली. इतक्यांत शिकंदरच्या शिलकी सैन्यास ती बातमी कळून ते परत फिरले आणि त्यांनीं बऱ्याच इंडियन व पर्शियन घोडेस्वारांस यमसदनीं रवाना करून बाकीच्यांस पिटाळून लाविलें. याच सुमारास शिकंदरला कळलें कीं, पार्मेनियोवर मेझिअसनें गहजब केला आहे व त्यास तावडतोब कुमक न मिळाल्यास त्याची धडगत नाहीं. हें वर्तमान ऐकतांच आपल्याबरोबर निवडक संरक्षक घोडेस्वार घेऊन तो पार्मेनियोचे मदतीकरितां माघारा वळला. इतक्या अवधींत ग्रीक छावणी लुटण्यास गेलेले पर्शियन व इंडियन स्वार परत येत होते त्यांची व शिकंदरचे रिसाल्याची गांठ पडली. पर्शियन स्वारांस शिकंदरच्या सैन्यांत घुसून पुढें निघून गेल्याखेरीज गत्यंतर नव्हतें. ह्मणून त्यांनीं एकजुटीनें त्याचे

खासपागेवर हल्ला केला. हा हल्ला इतका निकराचा होता कीं, शिकंदरच्या संरक्षकापैकीं झपाट्यासरशीं साठ स्वार त्यांनीं लोळविले, व त्यांच्यावरील तीन सरदारही घायाळ झाले. पण मॅसिडोनियन सैन्याचें धैर्य व शिस्त विलक्षण; त्यांत शिकंदर स्वतःच त्यांच्यांत हजर असल्यानें त्यास अधिकच स्फुरण चढलें. त्यांनीं पर्शियन व इंडियन घोडेस्वारांची भयंकर कत्तल केली, व त्यांतील फारच थोडे स्वार निसटून जिवानिशीं परत गेले असतील. याप्रमाणें या हटवादी तुकडीची वाट लावून शिकंदर पार्मेनियोचे सहाय्यास आला. पण आतां पार्मेनिओसही मदतीची अपेक्षा राहिली नव्हती. डरायस पळून गेल्याची व त्याच्या मुख्य सैन्याचा पराभव झाल्याची वार्ता ऐकून मेझिअसचे हात लटके पडले, त्याच्या सैनिकांची नाउमेद झाली. इकडे शिकंदरच्या उजव्या बाजूचे फौजेस जय मिळाल्याचें कळतांच पार्मेनिओ व त्याचे शिपाई यांस दुप्पट वीरश्री चढली. त्या आवेशांत त्यांनीं आपल्या शत्रूचा चांगलाच समाचार घेतला. थ्रेसलींतील घोडेस्वारांनीं आपल्या मर्दुमकीची शिकस्त केली. एवंच शिकंदर पार्मेनियोचे मदतीस येईपर्यंत पर्शियन सैन्याचा त्याही बाजूला पुरा मोड होऊन तें दशदिशा पळूं लागलें होतें.

खुद्द डरायस आपले हातीं सांपडावा अशी शिकंदरची प्रबळ इच्छा होती. कारण त्यायोगानें त्याचें मोठेंच कार्य साधलें असतें. याकरितां त्यानें त्याचा पाठलाग जोरानें चालविला. समरभूमि व अरबेला गांव यांचे दरम्यान लायकस नदी आहे; ती पार होऊन जातांना पर्शियन सैन्याचा जो नाश झाला तो रणांगणांतल्याहून अधिक होता. कारण त्या नदीवर एकच लहान पूल होता; त्यावर त्या पळपुट्यांची अति खेंचाखेंच होऊन कित्येक नदींत पडून अगर ढकलले जाऊन मरण पावले. तत्पूर्वीच डरायस अरबेलाला पोंचला होता; पण तेथें मुक्काम

न करतां त्यानें तसाच सूंबाल्या हांकला. विजयी शिकंदर दुसरे दिवशीं अरबेलागांवीं येऊन पोहोचला. तेथें डरायसचा सर्व खजीना व युद्धसामुग्री त्याचे हातीं लागली. डरायस मात्र पूर्वीच निसटून गेला होता, तो पळतां पळतां ब्रेसस नामक सुभेदाराच्या हद्दींत शिरला. तेथें ब्रेससनें विश्वासघातानें त्यास ठार केलें.

अरबेलाचे विजयानंतर थोडेच दिवसांनीं शिकंदर बॅबिलोन शहरास जाऊन पोहोंचला. तेथें तो सर्व पर्शियन साम्राज्याचा मालक झाला. त्यावेळीं अस्तित्वांत असलेल्या राजधान्यांत बॅबिलोनच अति जुनी राजधानी होती. यानंतर शिकंदरनें आपल्या अल्पावधि पण दैदीप्यमान कारकीर्दींत आणखी पुष्कळ जय मिळविले. मध्यएशियास त्याच्या भाल्याचें वीर्य दिसून आलें. इंग्लंडला अजिंक्य असा अफगाणिस्थान देश त्यानें जिंकिला. हिडॅस्पीस नदीवर व चिलियनवाला येथें त्याचें युद्धकौशल्य दिसून आलें. हे सर्व त्याचे पराक्रम जगास दिपवून टाकण्यासारखे आहेत. पण अरबेलाचे लढाईतच त्याचा प्रतापरवि पूर्ण दैदीप्यमान असा होऊन गगनमार्ग आक्रमूं लागला. या युद्धांत त्याचा अंतिम जीवितहेतु साध्य झाला. जें पर्शियन साम्राज्य युरोपांतील किंबहुना सर्व ज्ञात जगांतील लहानसहान संस्थानांस भेडसावीत असे व गट्ट करून टाकण्याची भीति घालीत असे, तें अरबेलाच्या लढाईत नामशेष झालें व एशियाखंडाच्या तावडींतून सुटून उलट युरोप खंडानेंच त्यावर आपला पगडा बसविला.

जगातील क्रांतिकारक लढाया.

भाग ४ था

'मेटॉरसची लढाई' (इ. स. पूर्वी २०७.)

इताली देशांत रिमिनि व अंकोना या शहरांचे दरम्यान एक नदी आहे. त्या नदीस मेटॉरस हेंच नांव अद्यापही चालू आहे. हें नांव कर्णपथावर येतांच इ. स. पू. २०७ व्या वर्षी या नदीतीरावर रोमन राष्ट्रानें जें अद्भुत धाडस व अचल धैर्य दाखविलें, आणि रोमन कॉन्सल नीरो व लिव्हियस यानीं, रोमचें साम्राज्य रसातळास घालून ज्ञात जगावर प्यूनिक साम्राज्य स्थापण्याकरितां अटोकाट प्रयत्न करणारा भीमकर्मा हॅनिबाल यास साहाय्य करण्याकरितां आलेला त्याचा बंधु हॅस्ड्रुबाल याच्या पिरिनीज, ऱ्होन, आल्पस व पो यांमधील मुलुखांतून उभारविलेल्या विविध जातींच्या सैन्याची जी भयंकर कत्तल करून या नदीचें पाणी रक्तानें लाल केलें, त्याची आठवण झाल्याविना रहात नाहीं.

रोमच्या सर्व युद्धांत हें युद्ध अत्यंत चिरस्मरणीय आहे. प्राचीन काळच्या युद्धांत या तोडीचें युद्धच झालें नाहीं. अधुनिक काळच्या एका युद्धांत मात्र या युद्धाशीं व त्यांतील योद्धयाशीं साम्य आढळून येतें. हॅनिबाल व रोम आणि नेपोलियन व इंग्लंड यांच्या सामन्यांत बरेंच सादृश्य आहे. प्रसिद्ध इतिहासकार ॲर्नोल्ड ह्मणतो 'महाबलाढ्य राष्ट्र व अद्वितीय पराक्रमी एक व्यक्ति यांची झटापट जगाचे इतिहासांत

दोनदां दृष्टोत्पत्तीस आली व त्या दोन्ही वेळीं राष्ट्राचा जय होऊन व्यक्तीस हार खावी लागली. रोमचा नायनाट करण्याचा प्रयत्न हॅनिबालनें सतरा वर्षें सतत चालविला होता. नेपोलियनें याच उद्देशानें इंग्लंडविरुद्ध सोळा वर्षें धडपड करून पाहिली; पण पहिल्याचा शेवट झामाच्या लढाईत व दुसऱ्याचा वाटर्लूच्या घनघोर संग्रामानें झाला.' याखेरीज आणखी एक बाबतींत या दोहोंत साम्य आहे. तिकडे इतिहासज्ञांचें लक्ष जावें तितकें गेलें नाहीं. रोमच्या ज्या योद्ध्यानें कार्थेजीनियन वीराचा समाचार घेतला आणि इंग्लंडच्या ज्या बहाद्दरानें नेपोलियनची खोडकी जिरविली त्या दोघा विजयी वीरांचे आयुष्यक्रमांतही विलक्षण सारखेपणा आहे. प्रथमतः उभयतांनींही आपला युद्धचमत्कार मुख्य रणभूमीपासून दूर अंतरावर दर्शविला. दोघांनींही आपल्या युद्धकौशल्याची परीक्षा स्पेन देशांतच दिली. मुख्य मोहऱ्याची गांठ पडेपर्यंत सिपियो व वेलिंग्टन या दोघांनींही अनुक्रमें हॅनिबाल व नेपोलियन यांच्या हाताखालील सरदारांचा स्पेनदेशांतच मोड करून, पूर्वीच्या पराजयानें आपल्या शिपायांचें धैर्य खचलें होतें तें फिरून त्यांचे अंगीं आणलें, व आपापल्या देशबांधवांचे मनांतही भरंवसा उत्पन्न केला, आणि शेवटीं आपल्या शत्रूचा व त्याच्या करोल फौजेचा पूर्ण पराजय करून बहुत वर्षें चाललेल्या व भयंकर अशा युद्धाचा समाधानकारक रीतीनें निकाल लाविला. याप्रमाणें सिपिओ व वेलिंग्टन यांचे लष्करी कारकीर्दींत व पराक्रमांतच साम्य आहे असें नाहीं. युद्धाचा शेवट झाल्यानंतर सिपिओप्रमाणें वेलिंग्टनही आपल्या देशांत सरदारपक्षाचा पुढारी झाला, व त्यालाही आपल्या प्रतिपक्षाच्या जहाल पुढाऱ्यांकडून कडक टीका सोसून घ्यावी लागली. इ. स. १८४८त वाटर्लूच्या लढाईच्या तारखेसच चवताळलेल्या दंगेखोरांनीं लंडनच्या रस्त्यांत ड्यूक ऑफ् वेलिंग्टनवर हल्ला केला, त्यांत मात्र इंग्लंडची नाचक्की झाली;

पण रोमन लोकांनीं सिपियोविषयीं इतका कृतघ्नपणा दाखविला नाहीं. लोकपक्षाच्या पुढाऱ्यांनीं सिपिओविरुद्ध कागाळ्या केल्या होत्या. त्यांचा जाब देण्याकरितां सीनेटसभेनें त्यांस पाचारिलें होतें. तेव्हां तो दिवस झामाच्या लढाईचा शुभ दिवस आहे एवढें बजावून त्यानें आपली आरोपांतून मुक्तता करून घेतली. तथापि रोमच्या कृतघ्नतेचा तिटकारा येऊन व तेथील मत्सरी लोकांचे त्रासास कंटाळून सिपिओनें आपण होऊनच रोम शहर वर्ज केलें. वेलिंग्टनला तसा प्रसंग आला नाहीं हें इंग्लंडचें सुदैवच मानलें पाहिजे.

असो, सिपिओनें झामाच्या लढाईंत कार्थेजची सत्ता धुळीस मिळविली हें खरें. तत्रापि ती सत्ता तत्पूर्वीच दुसऱ्या एका लढाईनेंच डळमळीत झाली होती व मृत्युपंथास लागली होती. मेटॉरसच्या लढाईंत पराजय होऊन हॅस्ड्रुबालचा वध झाला तेव्हांच कार्थेजचें सर्व मनोराज्य ढासळलें. हॅमिल्कारच्या दोघां पराक्रमी पुत्रांनीं निवडक सैन्यानिशीं दोहो दिशेकडून येऊन रोम शहरास वेढा द्यावयाचा व रोमन साम्राज्याची इतिश्री करावयाची, हा बेत मेटॉरसच्या लढाईनें फसला. यास्तवच रोम व कार्थेजच्या बलाबलाची परीक्षा होऊन निर्णय ठरविणारी लढाई, मेटॉरस येथें इ. स. पूर्वी २०७ वे वर्षीं झाली तीच होय.

फ्रेंच इतिहासकार मिचेलेट आपल्या रोमच्या इतिहासांत ह्मणतोः---'प्यूनिक युद्धांचें इतिहासांत जें महत्त्व आहे तें अवास्तव नाहीं. कारण हें युद्ध कांहीं दोन शहरांचें अगर दोन राष्ट्रांचें नव्हे, तर मानवजातींतील दोन शाखांच्या वर्चस्वाविषयींचें होय. जगाचें साम्राज्य इंडोजर्मन शाखेकडे असावें कीं सेमिटिक शाखेकडे असावें हें या प्यूनिक युद्धांत ठरवावयाचें होतें. इंडोजर्मनशाखेंत इंडियन, पर्शियन, ग्रीक,

रोमन, जर्मन इत्यादि लोकांचा समावेश होतो. सेमिटिक शाखेंत फोनीशियन, कार्थेजीनियन, अरब व ज्यू या जाती मोडतात. पहिल्या शाखेंतील लोकांत शौर्य, कलाकौशल्य, विद्वत्ता, न्यायनिपुणता हे गुण प्राधान्यत्वेंकरून दृग्गोचर होतात. दुसऱ्या शाखेंत व्यापार, उदीम, उद्योग, दर्यावर्दीपणा हे गुण विशिष्ट आहेत. या दोहों शाखांची अति-प्राचीन कालापासून झटापट व चढाओढ चालू आहे. प्राचीनकाळीं पर्शियन्स व खाल्डियन्स यांची चुरस लागून राहिली होती. पुढें ग्रीक लोक व फोनीशियन्स यांच्यांत भूमध्यसमुद्राच्या प्रत्येक प्रमुख बंदरांत सत्तेविषयीं झटापट हरहमेष चाले. यांत बहुतेक ठिकाणीं ग्रीक लोकांनीं आपल्या प्रतिस्पर्ध्यास उखडून काढून तेथें आपलें ठाणें दिलें. शिकंदरनें अले ग्झँड्रिया बंदराची स्थापना करून भूमध्यसमुद्रांतील व्यापाराचा ओघ बदलून टाकला व फोनीशियन व्यापाऱ्यांचें सर्वस्वी नुकसान केलें. तदनंतर सेमिटिकशाखेची कार्थेज येथील सत्ता मात्र अव्याहत चालली होती; पण या प्यूनिक युद्धांत रोमनें कार्थेजची धुळधाण उडवून दिली. कार्थेजची सर्व सुधारणा आणि त्याचें ऐतिहासिक महत्त्व पार ढासळून लयास गेलें व कार्थेजच्या अचाट वैभवाची आठवण देण्यास शेष काय राहिलें ह्मणाल तर—हॅनोचा पेरिप्लस नामक ग्रंथ, प्लॅटसे पुस्तकांत कार्थेजसंबंधीं एकाद दुसऱ्या ठिकाणीं उल्लेख आणि कांहीं जुनीं नाणीं!!

प्यूनिक युद्धांत कार्थेजचा नायनाट झाल्यानंतर पुनरपि सेमिटिक व इंडोजर्मन यांचा सामना कित्येक शतकांनंतर पश्चिम युरोपांत झाला. त्यावेळीं सेमिटिक शाखेचें पुढारीपण अरब लोकांकडे होतें. सुदैवेंकरून या महमदानुयायांस युरोपच्या पूर्व भागांत कान्स्टंटिनोपल येथें व पश्चिमेस ट्यूर्स येथें चांगलीच थप्पड मिळाली. जरूसलेम येथें झालेलीं धर्मयुद्धें हा या शाखांमधील शेवटचा सामना होय.

रोमच्या प्राचीन कवींच्या लोटक उल्लेखावरून कार्थेजच्या दानती-विषयीं व राज्यपद्धतीविषयीं सविस्तर माहिती मिळणें शक्य नाहीं. तथापि युद्धाचे कामांत कार्थेजचा कमजोरपणा स्पष्ट दिसून येतो. शिवाय भूमध्यसमुद्राच्या किनाऱ्यावर व आजूबाजूस ज्या विविध व एकलकोंड्या जाती होत्या त्या सर्व एकवटून, त्यांचे मनांत साम्राज्याचें वारें भरवून त्या सर्वांचें चित्त आपणाकडे आकर्षून घेऊन, कित्येक शतकें टिकून राहील असें साम्राज्य स्थापण्यास व अशा सुधारणेचें केंद्र बनण्यास कार्थेज किती नालायक होतें हें स्पष्ट दिसून येतें. फिनीशियन लोकांनीं आफ्रिकेच्या उत्तर किनाऱ्यावर ज्या शेंकडों वसाहती केल्या त्यांत कार्थेज हें कांहीं अति पुरातन अगर महत्त्वाचें शहर नव्हे. परंतु पुढें भूमध्यसमुद्रांतील व्यापाराचें तें केंद्र बनून त्याचें वैभव वाढत गेलें व तें प्यूनिक साम्राज्याचें आद्यस्थान बनलें. दर्यावर्दीपणा, व्यापार, संपत्ति, सुपीक जमीन, अभेद्य राजधानीचें शहर, भिन्नभिन्न ज्ञातीस सुखावह अशी राज्यपद्धति आणि अत्यंत बुद्धिशाली असा सरदारवर्ग या सर्व गोष्टींचें आनुकूल्य असून रोमशीं झालेल्या संग्रामांत कार्थेजनें सपशेल हार खावी याचें राहून राहून आश्चर्य वाटतें. परंतु कार्थेजच्या या पराजयाचें एक मुख्य कारण म्हणजे तेथील पुढाऱ्यांचे ठायीं असलेला चिकाटीचा अभाव हें होय. पहिल्या प्यूनिक युद्धांत रोमचा नाश अधिक झाला असतां, केवळ कांहीं दिवस कळ सोसण्या इतका सोशिकपणा अंगीं नसल्यानें, कार्थेजीनियन्सनीं कसा तरी एकदां तह उरकून घेतला. दुसरें महत्त्वाचें कारण त्यांची आपसांतील दुही होय. या दुहीमुळेंच दुसऱ्या प्यूनिक युद्धांत हॅनिबॉलला सैन्याचा व सामुग्रीचा योग्य पुरवठा त्यांचेकडून झाला नाहीं. याशिवाय कार्थेजचे नाशास दुसरींहीं कित्येक कारणें आहेत. आपल्या अमलाखालील लोकांस ते समबुद्धीनें न वागवितां पक्षपात करीत. हे सर्व दोष एकत्र करून-

सुद्धां ज्याच्या पासंगास पुरणार नाहींत असा आणखी एक दोष कार्थेजीनियन राज्यपद्धतींत होता. ते आपल्या युद्धांत भाडोत्री सैन्याचा उपयोग करीत; हेंच पुढें त्यांस भोंवलें. इकडे जगावर साम्राज्य करण्याची हांव, पण सैन्यांत पहावें तों खोगीरभरती सैन्यच फार. खुद्द कार्थेजचे पुत्र सेनानायक ह्मणून युद्धांत झळकले खरे. परंतु त्यांचे हाताखालीं भरणा भाडोत्री शिपायांचाच. कार्थेजीनियन्सचा ओढा क्षात्रधर्मापेक्षां वैश्यवृतीकडे जास्त होता. या कारणास्तव भाडोत्री शिपाई मिळत तोंपर्यंत लढण्यास ते तयार असत; पण स्वतःचे खांद्यावर भाला घेऊन रणांगणांत जाण्याचा प्रसंग आला कीं त्यांनीं मागें पाय घेतलाच. व्यापारांत द्रव्य संपादन करण्याची चटक लागल्यानें युद्धशिक्षणांत घालविलेला काळ नुकसानकारक होय असेंच त्यांस वाटत असे.

भाडोत्री सैन्य कित्येक वेळां शत्रूशीं लढण्याचें सोडून उलट यजमानावरच शस्त्र उचलण्यास तयार होतें. परंतु हॅनिबॉलच्या सैन्यांत अशा भाडोत्री शिपायांचा भरणा अधिक असूनही त्याचे सैन्यांत कधीं बंड उद्भवलें नाहीं. रोमचें सैन्य ह्मणजे रोमन नागरिकांतून निवडक लोक काढून युद्धशिक्षण देऊन तयार केलेलें व देशाभिमानानें प्रेरित झालेलें असें असे. हॅनिबॉलशीं प्रसंग येण्यापूर्वी त्यांना पराजय ह्मणजे काय हें माहित नव्हतें. अशा सैन्याविरुद्ध लढण्यास हानिबॉलनें जें दळ सिद्ध केलें होतें तें फारच कमी दर्जाचें होतें. त्या सैनिकांना ना एक देश, ना एकधर्म, ना समान भाषा. कवाइती शिक्षण तर त्यांस कधीं स्वप्नींही ठाऊक नव्हतें. असल्या उत्साहभङ्गक, अव्यवस्थित बाजारबुणग्यांचें एक सैन्य उभारून त्यास शिस्त लावून देणें आणि त्यांचे मनांत आपल्याविषयीं पूज्यबुद्धि उत्पन्न करून आपल्याकरितां त्यांस जीवाची पर्वा न धरतां लढावयास लावणें हें कृत्य कांहीं सुसाध्य

नव्हे. परंतु असलें दुःसाध्य कर्म ही हानिबॉलनें सहजीं पार पाडलें म्हणूनच जग त्याच्या बुद्धिवैभवास मान तुकवितें. या भाडोत्री शिपायांची आपल्या सेनापतीवर इतकी दृढभक्ति बसली, आणि त्याच्या लष्करी तालमेंत तें इतकें तरबेज झालें कीं, त्याच्या चलतीच्या व आपत्काळांतही त्यांची भक्ति ढळली नाहीं, व जय येवो अगर पराजय होवो, भयानें पळून जाऊन त्यांनीं आपल्या अब्रूस कधीं बट्टा लावला नाहीं. हॅनिबॉलविरुद्ध बंडाची कधीं त्यांस कल्पनाही आली नाहीं. याप्रमाणें एकनिष्ठेनें पंधरा वर्षें त्याच्या हुकमतींत मोहिमेवर राहून सरतेशेवटच्या झामाच्या लढाईतही सतीचें वाण घेऊन ते त्याजबरोबर उभे राहिले. त्या लढाईत बराच कालपर्यंत त्यांनीं टिकाव धरिला; पण अखेरीस सिपिओच्या न्यूमीडियन स्वारांनीं त्यांजवर दोहो बाजूनें हल्ला करून त्यांस कोंडींत धरिलें, त्यावेळीं आपले प्राण धारातीर्थीं अर्पण करून त्यांनीं आपल्या स्वामिभक्तीचा कळस केला.

याप्रमाणें हॅनिबॉलचें युद्धनैपुण्य पाहून सर्व विस्मयचकित झाले खरे; परंतु रोमन राष्ट्रानें या युद्धांत जो उत्साह व दृढनिश्चय दाखविला तो केवळ अवर्णनीय होय. कार्थेजच्या सर्व पराक्रमाची; मदार कायती हॅनिबॉलच्या जिवावर. हॅनिबॉलला वगळून कार्थेजच्या मोठेपणाची किंमत बांधल्यास ती जवळ जवळ शून्यच येणार. पण रोमन राष्ट्राचा प्रकार याच्या अगदीं उलट. फेबिस्लयस, मार्सेलस, नीरो, सिपिओ इत्यादि महापराक्रमी वीरांचा व्यक्तिशः पराक्रम रोमन राष्ट्राचे तेजांत पार लोपून जातो. ही गोष्ट मुद्दाम सांगण्याचें कारण हेंच कीं, साधारणतः जगाचे डोळे व्यक्तीच्या कर्तबगारीनें दिपून जातात व त्याला एखाद्या साम्राज्याची, देशाची अगर समाजाची करामत यःकश्चित् वाटते. हॅनिबॉलच्या तोडीचा योद्धा अखिल रोमन राष्ट्रांत एकही निपजला नाहीं

हें निःसंदेह आहे. परंतु तेवढ्यावरून रोमचा जय होऊन हॅनिबॉलच्या पदरीं शेवटीं अपयश आलें यांत न्याय बिलकुल झाला नाहीं असें प्रतिपादणें चुकीचें होईल. कारण ईश्वरी न्याय चुकणें शक्य नाहीं. रोम व कार्थेजच्या झटापटीचे निर्णयांत ईश्वरी दूरदर्शित्व दिसून आलें तसें इतरत्र क्वचितच दिसून आलें असेल. हॅनिबॉलचा पराजय होऊन रोमन राष्ट्र विजयी व्हावें हें मानवी प्रगतीस अवश्यक होतें. थोर पुरुष राष्ट्राचे घटकावयव बनले तरच त्यांस मनुष्यमात्राचें कांहीं तरी चिरकालिक हित साधतां येतें. परंतु हॅनिबॉल किंवा नेपोलियनप्रमाणें एकच व्यक्ति कितीही गुणसंपन्न असेल तथापि त्याच्या एकट्याच्या परिश्रमानें राष्ट्राच्या दानतींत व संस्कृतींत कायमचा फरक पडणें संभवनीय नाहीं. जो कांहीं थोडा सुपरिणाम दिसून येईल तो त्याच्या आयुष्याबरोबरच क्षय होणार. ज्या राष्ट्राचा मोठेपणा एकाच व्यक्तीच्या गुणावर व कर्तृत्वावर अवलंबून असतो त्या राष्ट्राची भरभराट त्या व्यक्तीबरोबरच लोप पावते. जोंपर्यंत तो एकटा महात्मा जीवंत असतो तोंपर्यंत तें राष्ट्रही सजीव भासतें. परंतु तो नामशेष होतांच जादूगारानें मंत्र काढून घेतल्यानंतर लांकडाचें बाहूलें जसें निश्चेष्ट होतें तशी त्या राष्ट्राची अवस्था होते. झामाचे लढाईचे परिणामाबद्दल ज्यास वाईट वाटत असेल त्यानें त्या लढाईनंतर तीस वर्षांनीं काय प्रकार दृष्टीस पडला असता याची कल्पना करावी. सृष्टिक्रमानुसार हॅनिबॉल मरून गेला असेल व कार्थेज शहर जगाचे एका कोपऱ्यांत आपल्याच वैभवांत गर्क होऊन गेलेलें दिसेल. परंतु ग्रीस देशाची विद्या व संस्कृति आपलीशी करून तिचा प्रसार करणें, आपल्या कायदेकानूंनीं जगांतील नानाविध अडाणी जातीस एक करून त्यांचें पराक्रमी एक राष्ट्र बनविणें, आणि तें साम्राज्य ऱ्हास पावूं लागतांच युरोपखंडांत सर्वत्र स्वतंत्र लहान लहान

राज्यें स्थापणें, या गोष्टी घडवून आणण्याचें सामर्थ्य कार्थेजच्या अंगीं दिसून आलें असतें काय? अर्थात् नाहीं असेंच कबूल केलें पाहिजे. असो.

इ. स. पूर्वी २०७ चे वसंत ऋतूंत कार्थेजचा सेनापति प्रसिद्ध हॅनिबॉल ह्याचा बंधु हॅस्ड्रूबॉल हा स्पेनमधीन रोमन सैन्यास झुकांडी देऊन, युक्तीनें गॉल्स व लिग्यूरियन्स यांची आपल्या सैन्यांत भर घालून आल्प्स पर्वत ओलांडून उत्तरलोंबार्डी प्रांतांत येऊन दाखल झाला. कार्थेजचा सरदार हॅमिल्कार हा रोमचा कट्टा दुष्मन होता. त्यानें आपले मरणसमयीं आपले तिघे पुत्र मॅगो, हॅनिबॉल, व हॅस्ड्रूबॉल यास यावज्जन्म रोमशीं वैर बांधून त्याचा नायनाट करण्याविषयीं शपथ वाहण्यास सांगितलें होतें. त्यावेळीं हॅनिबॉल हा तर केवळ नऊ वर्षांचा बच्चा होता. याप्रमाणें हे सिंहाचे तीन छावे रोमच्या नरडीचा घोट घेण्यास त्यावेळेपासून प्रयत्न करीत होते. आपली प्रतिज्ञा खरी करण्याकरितां हॅनिबॉल हा ससैन्य इतालींत येऊन तळ देऊन राहिला त्यास आतां अकरा वर्षें होत आलीं होतीं. इतक्या कालांत त्यास पराजय हा शब्द ठाऊक नव्हता. त्याचें सैन्य अजिंक्य आहे अशी समजूत होऊं लागली होती. ट्रेबिया, थ्रेसिमनी व कानीच्या भयंकर संग्रामांत त्यानें रोमचीं हाडें चांगलीं नरम केलीं होतीं. परंतु अद्यापि रोमचें धैर्य गलित होऊन तें टेकीस आलें नव्हतें. रणांगणांतील संहारानें रोमची प्रजासंख्या कमी झाली. हॅनिबॉलच्या घोडेस्वारांच्या लुटीनें शेतें ओस पडलीं; चंदीचारा मिळेनासा झाला; बागबगीचांचा विध्वंस होऊन गेला व इतालींत दुष्काळाचें उग्रस्वरूप प्रगट होऊं लागलें. पण रोमचीं संकटपरंपरा एवढ्यानेंच पुरी झाली नाहीं. त्याचे मित्र शत्रुपक्षास मिळाले; मॅसिडोनिया व गॉल इकडून परचक्राची वावटळ येण्याचीं चिन्हें दिसूं लागलीं; पण रोमचा निश्चय रतिमात्र ढळला नाहीं. श्रीमंत व दरिद्री दोघांचीही देशभक्तीचे

कामांत चढाओढ लागली होती. धनवानांनीं आपली मालमत्ता व सर्वांनीं आपलें जीवित देशकार्यास वाहिलें. अद्याप जरी हॅनिबॉलचा रोमच्या हातून पराजय झाला नव्हता तथापि रोमला आपला निश्चय व्यर्थ झाला असा पश्चात्ताप करण्याचें कारण पडलें नाहीं. कारण या अकरा वर्षांच्या सतत युद्धानें रोम जरी क्षीण झालें, तथापि हॅनिबालचीही शक्ति कमी कमी होत व उमेद खचत चालली व दुसरीकडून आपणास मदत आल्याखेरीज रोमन राज्य उलथून पाडतां येत नाहीं अशी त्याची खात्री झाली. तथापि आपला बंधु हॅस्ड्रूबाल हा स्पेनमधून लवकरच आपल्या सहाय्यास येईल व दोहो बाजूनें शह देऊन रोमवर मात करूं अशी त्यास अद्याप आशा होती.

हॅस्ड्रूबाल हा कांहीं वर्षें कार्थेजच्या स्पेनमधील सैन्याचा अधिपति होता. तो जरी युद्धकलाविशारद होता तथापि त्यास जयश्री फारशी वश नव्हती. शिवाय हॅनिबाल अगर हॅमिल्कार यांस जसा स्पेनमध्यें कुलअधिकार होता तसा हॅस्ड्रूबालला नव्हता. कार्थेजमधील अधिकाऱ्यांचें त्याच्या घराण्याशीं नीट नव्हतें ह्मणून ते वरचेवर स्पेनमध्यें दुसऱ्या सरदारांची खानगी करीत, आणि त्यांच्या चुकांचें प्रायश्चित्त हॅस्ड्रूबालला भोगावें लागे. असो.

अशा प्रतिकूल स्थितींतअसूनही इ. स. पूर्वी २०८ त हॅड्रूबालनें रोमन सरदार सिपियो यास चकविलें. सिपिओस वाटलें होतें कीं हॅस्ड्रूबाल हा भूमध्यसमुद्राचे काठच्या नजीकच्या मार्गानें पिरिनीज पर्वत ओलांडून इतालींत प्रवेश करील. त्या अंदाजानें त्यानें पिरिनीज पर्वताच्या पूर्वभागाची चांगली मजबुती व नाकेबंदी केली होती. पण हॅस्ड्रूबाल कसला बिलंदर. त्यानें पिरिनीजच्या पश्चिम टोंकाकडून गॉल देशांत प्रवेश केला

व तेथूनही सरळ भूमध्यसमुद्राकडे न येतां ईशान्य दिशेचा रोख धरून गॉलच्या मध्यभागापर्यंत मजल मारिली. त्या वेळीं त्याचे जवळ बरेंचसें स्पॉनिशपायदळ, आफ्रिकेंतील कांहीं फौज, थोडेसे हत्ती व भरपूर खजीना अशी सामुग्री होती. गॉलमधील ऑव्हर्न प्रांतीं त्यानें हिंवाळा संपेपर्यंत तळ दिला व तेथील रहिवाशांची मर्जी त्यानें इतकी सुप्रसन्न केली कीं, त्यांनीं त्यास हिंवाळा संपेपर्यंत तेथें राहूं दिलें एवढेंच नव्हे तर तो पुढें स्वारीला निघतांच त्याच्या निशाणाखालीं लढण्याही कित्येक तयार झाले.

याप्रमाणें गॉल देशांत नैऋत्यदिशेनें शिरून व दक्षिणेकडील समुद्रकांठचे प्रांत टाळून रोमन्सना त्यानें आपल्या हालचालीबद्दल यत्किंचित्ही सुगावा लागूं दिला नाहीं. तथापि सिपिओची नजर चुकवून हॅस्ड्रूबाल गॉलमध्यें घुसला व तेथें नवीन सैन्य जमवून हिंवाळा सरतांच तो इतालीवर येणार हें त्यांनीं अंदाजानें ताडलें. हॅस्ड्रूबाल इतालींत आला ह्मणजे मात्र जिकडे तिकडे रणधुमाळी माजून राहील व हॅमिल्कारचा एक पुत्र उत्तरेकडून तर दुसरा दक्षिणेकडून रोमवर चालून येईल; तर अशा आणीबाणीच्या प्रसंगीं सेनापति कोणास निवडावें याची ते मोठ्या काळजीनें वाटाघाट करूं लागले.

रोमन लोकसत्ताक राज्यांत दरसाल दोघा 'सुभेदारांची' निवडणूक होत असे व एक वर्षपावेतों सर्व सत्ता त्यांचे हातीं रहात असे. त्यांतील एक 'सुभेदार' वृद्ध मंत्रिसभेनें सरदार घराण्यापैकीं निवडावयाचा, व दुसरा सामान्य जनांनीं आपल्या तर्फे आपल्यापैकीं एक नेमून द्यावयाचा अशी वहिवाट असे. या संकटाचे वेळीं वृद्धमंत्रिमंडळानें आपल्या तर्फे 'केयस क्लॉडियस नीरो' याची निवडणूक केली. संकट-

कालीं अवश्य असें धैर्य व उमेद हे गुण त्याच्या अंगीं असल्याचें ओळखून 'मंत्रिसभेनें' आपली गुणग्राहकता व धूर्तता दर्शविली. लोकपक्षानेंही आपल्यातर्फे मार्कसलिव्हियस याची त्याच्या अंगच्या गुणावरून निवड केली. बाह्यस्वरूप अगर डामडौलास फसून भलत्या मनुष्याचे हातीं अधिकार देण्याची राष्ट्रहितविघातक चुकी त्यानीं केली नाहीं. लिव्हियस हा पूर्वी एक वेळ सुभेदार होता, तेव्हां इलीरियन्सचा मोड करून त्यानें आपल्या शौर्याची चुणूक दाखविली होती. परंतु लुटीच्या पैशाचे वाटणींत कांहीं अफरातफर केल्याचा त्याजवर आरोप आला. तो अपराध त्यावर शाबीद झाला नाहीं तथापि त्यावेळेपासून त्याचें मन विटून गेल्यानें तो कोणत्याही सार्वजनिक कामांत पडत नसे. आतां त्याची फिरून सुभेदारीचे जागीं निवडणूक होतांच त्यानें ती नाकारली; पण असल्या बिकट प्रसंगीं दुसरा योग्य इसम मिळत नसल्यानें सर्वांनीं त्याची मनधरणी करून त्याचेकडून कबूली घेतली. याप्रमाणें नीरो आणि लिव्हियस हे होघे कॉन्सल कायम झाले. यांचीं परस्पराविषयीं पूर्वी मनें शुद्ध नव्हतीं. तथापि प्रस्तुतचा जीवावरचा प्रसंग असल्यानें त्यांनीं एकदिलानें काम करण्याचें अभिवचन दिलें.

हिंवाळा संपून बर्फ वितळूं लागतांच हॅस्ड्रुबालनें ऑव्हर्न येथून तळ हालविला व तो आल्प्स पर्वताकडे आला. हॅनिबालचें सैन्य प्रथम या मार्गानें इतालींत शिरलें तत्पूर्वी त्या पर्वतावरील रहिवाशांनीं त्या वाटेनें कोणतेंही सैन्य गेलेलें पाहिलेंच नव्हतें. ह्मणून वन्यपशूप्रमाणें घाबरून जाऊन त्यांनीं त्याचे फौजेस अडथळा केला. पण आतां ते अधिक माणसाळले असल्यानें हॅस्ड्रुबालला त्यांचेकडून कोत्याणही प्रकारचा त्रास पोंचला नाहीं. उलट त्यांनीं त्यास मदत केली. कित्येकांनीं लुटीच्या आशेनें, कांहीं जणानीं वेतनाच्या लालसेनें, तर कांहींकांनीं केवळ साह-

साभिलाषानें त्याचे फौजेंत नोकरी पत्करिली. यामुळें तो जसजसा इतालीच्या समीप येऊं लागला तसतशी त्याच्या सैन्यांत भर पडूं लागली. शिवाय हॅनिबालनें पूर्वी आल्प्स पर्वत ओलांडण्याबद्दल ज्या कांहीं तरतुदी करून ठेविल्या होत्या त्या अद्याप तशाच कायम असल्यानें हॅस्ड्रुबालचें काम तितकें सुलभ झालें. ह्मणून सर्वांच्या अंदाजापेक्षां लवकर तो इतालींत येऊन दाखल झाला. पो नदी उतरून तिच्या दक्षिणतीरानें कूच करून प्लॅसेंशिया शहरास त्यानें वेढा घातला. तें शहर घेऊन आपल्या युद्धभूमीचा तो पाया करावा असा त्याचा हेतु होता. पण अकरा वर्षांपूर्वी हॅनिबालच्या हल्ल्याचा तेथील नागरिकांनीं जितक्या नेटानें प्रतिकार केला होता तितक्याच शौर्यानें यावेळीं त्यांनीं हॅस्ड्रुबाल यास तोंड देण्याची तयारी केली. सबब त्याला या वेढ्यांत बरेच दिवस निष्कारण गुंतून रहावें लागलें.

इकडे रोमनें आपल्या नागरिकांचें सत्तर हजार सैन्य जमा केलें. इतालीच्या इतर संस्थानांतून अजमासें ६०।७० हजार शिपाई त्यांचे मदतीस आले. सुमारें तीस हजार पायदळ व घोडेस्वार खेरीज बाह्य संस्थानांतून त्यांचे सहाय्यार्थ आलें तें वेगळेंच. प्यूनिक युद्धास आरंभ होण्यापूर्वी रोमची लढाऊ लोकसंख्या २७० हजार होती, ती या द्वादश वार्षिक युद्धांत कमी होत होत १३० हजारांवर येऊन ठेपली. यावरून रोमची स्थिति प्रस्तुत किती भयंकर होती याचें अनुमान सहज होतें. 'ॲसिमनी' अगर 'कानी' प्रमाणें पराजय होऊन हल्लीं उभारलेल्या सैन्याचा संहार होईल तर फिरून लढाईवर पाठविण्यास युद्धोपयोगी नागरिक मुलींच शिलक नाहींत; असा दुर्धर प्रसंग रोमवर येऊन ठेपला होता. हॅनिबालनें दक्षिण इतली आक्रमिली होती. त्याच्या बंधूनें उत्तरेच्या प्रांतास शह दिला; त्यायोगानें रोमला द्रव्यबळ आणि

मनुष्यबळ या दोहोंची उणीव भासूं लागली. रोमन सैन्यास लवकर पूर्ण जय मिळाला नाहीं तर रोमन नागरिकांची उपासमार होण्याचीही भीति होती. अशा निराशमय स्थितींत रोमन सेनापति लिव्हियस हा तीन पलटणी समागमें घेऊन हॅस्ड्रुबालशीं सामना करण्यास उत्तरेस निघाला. चिठ्या टाकून ठरल्याप्रमाणें नीरो हा बाकीच्या लष्करासह हॅनिबालवर रोख धरून दक्षिणेस चालला. रोमन नागरिकांचें मन यावेळीं संशय-समुद्रांत गटंगळ्या खात होतें. दोघेही सेनानायक विजयी होऊन सुखरूप परत येण्याइतकें आपलें भाग्य असेल अशी त्यांची कल्पनाही होईना. फारतर एकास जय मिळेल; पण केवळ एका सेनापतीचे विजयानें जिवावरचें अरिष्ट टळेल असें त्यास वाटेना. अशा संशयग्रस्त मनःस्थितीमुळें त्यानीं आपल्या सरदारांस अमुकच प्रकारानें लढाई करा अगर वागा असा हुकूम केला नाहीं; तर आपलें सर्व चातुर्य, बळ व दूरदर्शित्व खर्च करून विजय संपादन करा अशी त्यांनीं आशा प्रगट केली; परंतु ती आशा सफल होईल असें त्याचें मन त्यास खात्री देत नव्हतें.

हॅनिबाल हा यावेळीं दक्षिण इतालींत होता. आपला बंधु इतक्या तातडीनें आल्प्स ओलांडून येईल असें त्यास वाटलें नव्हतें. आपल्या भावाचें लढाईचें धोरण कळल्याशिवाय त्यास स्वतःचा पुढील बेत ठाम करितां येत नव्हता. तथापि हॅस्ड्रुबाल हा इतालींत आल्याची वार्ता त्याचे कानीं पडतांच तो आपली हिंवाळ्याची छावणी सोडून उत्तर दिशेस निघाला. रोमन-सुभेदार नीरो हा या वेळपावेतों वेन्यूसिया येथें येऊन दाखल झाला होता. त्याचे हाताखालीं चाळीस हजार पायदळ, दोन अडीच हजार स्वार इतकी फौज जमली होती. हॅनिबालच्या छावणीचे दक्षिणेस टॅरेंटम येथें दुसऱ्या एका रोमन सरदाराचें सैन्य असल्यानें हॅनिबालच्या हालचालीस पायबंद बसला. एवढें मोठें सैन्य आपल्या

पाठीमागें तसेंच सोडून जावें तर आपला युद्धभूमीचे पायाशीं संबंध तुटण्याची भीति. बरें दक्षिणेस चालून जाऊन या सैन्याचा फडशा पाडावा तर नीरोची फौज अगदीं जवळ येऊन भिडली. नीरोच्या पलटणीवर प्रथम हल्ला करावा तर तें सैन्य डोंगराचा आसरा सोडून पुढें येत नाहीं. या दोन्ही सैन्यास हुलकावणी दाखवून थेट उत्तरेस जावें व रोमला वेढा घालावा तर आपल्या एकट्याच्या हाताखालील सैन्यास तें शहर जिंकून घेणें शक्य नाहीं. बरें हे सर्व बेत सोडून आपल्या बंधूस जाऊन मिळावें तर त्याचा मुक्काम कोठें आहे व तो पुढें कोणत्या मार्गानें कूच करणार याची खात्रीलायक बातमी नाहीं. अशा रीतीनें हॅनिबाल हा बुचकळ्यांत पडला, आणि हॅस्ड्रुबालकडून नक्की बातमी येईपर्यंत कोणताच बेत ठरवावयाचा नाहीं असें योजून त्याच्या निरोपाची मार्गप्रतीक्षा करीत राहिला.

प्लॅसेंशिया शहर हातीं येत नाहींसें पाहून हॅस्ड्रुबालनें तो वेढा उठविला व पोर्शियसचे हाताखालील सैन्यास धुडकावून ॲड्रिॲटिक समुद्राचे कांठीं ॲरिमिनम नामक बंदरापर्यंत तो येऊन पोहोचला. त्याशीं टक्कर देण्याकरितां रोमहून निघालेला सुभेदार लिव्हियस यानें आपल्या सैन्याच्या सर्व टोळ्या एकत्र केल्या तथापि शत्रूशीं सामना करण्याइतकी आपली शक्ति नाहीं असें पाहून ॲरिमिनम येथून मागें हटत हटत मेटॉरस-नदीच्या आग्नेयीस 'सेना' गांवापर्यंत तो परत आला. यापुढें हॅनिबालच्या सल्ल्यानेंच मोहिमेचे बातबेत ठरवावे असें मनांत योजून हॅस्ड्रुबालनें त्याजकडे जासूद रवाना केले. त्यांच्याबरोबर दिलेल्या पत्रांत त्यानें असें सुचविलें होतें कीं, हॅनिबालनें उत्तरेस येऊन त्यास ॲब्रिया प्रांतांत भेटावें व नंतर उभयतांनीं एकत्र होऊन रोमवर चाल करावी. हे जासूद सुरक्षितपणें बराच प्रवास करून हॅनिबालच्या छावणी-

समीप आले, पण दुर्दैवेंकरून तेथें नीरोच्या घोडेस्वारांच्या तावडींत सांपडून हॅनिबालच्या नांवचीं पत्रें त्याला न मिळतां आयतींच रोमन सरदाराच्या हातीं लागलीं. हॅस्ड्रुबालचा सर्व न्यूह नीरोस कळून चुकला. त्याची बुद्धि कुशाग्र व प्रसंगावधान जबर त्यामुळें त्या संकटसमयीं घाबरून न जातां त्यानें विचारपूर्वक आपला बेत ठरविला. हॅमिल्कारच्या दोघा पुत्रांमध्यें अंतर केवळ दोनशें मैलांचें होतें. ते शूरवीर जर एकत्र होतील तर रोमचीं पुरीं शंभर वर्षें भरलीं असें मानण्यास प्रत्यवाय नाहीं. यास्तव रोमचा बचाव करावयाचा असेल तर हॅस्ड्रुबाल आणि हॅनिबाल यांची जीवंतपणीं भेट होऊं देतां कामा नये. हे साध्य होण्यास कांहीं अचाट धाडस केलें पाहिजे असें ठरवून त्यानें ताबडतोब सहा हजार करोल पायदळ व एक हजार स्वार एवढ्या सैन्यास तयारींत राहण्यास फर्माविलें. रात्र पडतांच त्या निवडक सैन्यासह हॅनिबालच्या एका ठाण्यावर छापा घालण्याचें मिष करून तो निघाला. परंतु थोड्याच वेळांत त्यानें दक्षिणेकडचा रोख सोडून एकदम उत्तरेकडे मोर्चा वळविला. आदले दिवशीं दोनप्रहरीं त्यानें हॅस्ड्रूबालचीं पत्रें व त्यावर आपण ठरविलेला बेत मंत्रिसभेस कळविण्याकरितां जासूद धाडिले होते. रोमच्या कायद्यानें सेनापतीला आपली ठराविक मर्यादा सोडून दुसरीकडे जाण्याची व लढाई देण्याची बंदी असे. यास्तव नीरोनें आपल्या उद्देशाप्रमाणें वागण्यास परवानगी मागितली होती व ती मिळेलच अशा खात्रीवर आपण उत्तरेकडे जाण्यास निघाल्याचें ही त्यानें कळविलें होतें. रोमच्या मंत्रिसभेस याप्रमाणें निरोप कळवून आपल्या सैनिकांस वाटेंत अडचण पडूं नये अगर विलंब होऊंनये याकरितां टप्याटप्यावर शिधासामुग्रीची व वाहनांची तरतूद ठेवण्यास त्यानें स्थानिक अधिकाऱ्यांस ताकीद पाठविली. याप्रमाणं टांकोटांक कूच करून कांहीं मार्ग आक्र-

मिल्यावर त्यानें आपल्या फौजेस आपला खरा उद्देश कळविला. तो ह्मणाला 'हा माझा बेत दिसण्यांत धाडसाचा दिसतो. परंतु सध्यांचे प्रसंगीं हाच योग्य उपाय आहे. उत्तरेकडील लिव्हियसचें सैन्य हॅस्ड्रुबालशीं लढण्यास समर्थ आहे. त्यांतच तुमची भर पडली ह्मणजे जयापजयाविषयीं शंका बाळगण्याचें कारण राहणार नाहीं. दुसरा सेनापति नवीन सैन्य घेऊन आपल्या प्रतिपक्षाचे मदतीस आला आहे असें ऐन लढाईचे वेळीं शत्रूस कळतांच त्यांचे हातपाय गळतील व त्यांची लढाईत त्रेधा उडून जाईल. याप्रमाणें जयाचें सर्व श्रेय तुह्मांसच मिळेल. वाटेंत तुमच्या देशबांधवांनीं तुह्मांस जी मदत केली व तुमच्याबद्दल कळकळ दाखविली तो तुह्मांस शुभशकूनच झाला असें ह्मटलें पाहिजे.' याप्रमाणें नीरोच्या उत्तेजनपर भाषणानें त्याच्या सैन्यांतही उत्साह पूर्ण भरून गेला. वाटेंत नागरिकांनीं व ग्रामस्थांनीं त्यांस मोठ्या कळकळीनें सहाय्य केलें.

रोमशहरीं नीरोच्या या धाडसी कृत्याची बातमी पसरतांच जिकडे तिकडे चळवळ उडून गेली. नीरोच्या कृतीला काय नांव ठेवावें हें कोणासच समजेना. कोणत्याही कृतीची फलावरून योग्यायोग्यता ठरविणें हें न्याय्य नव्हे खरें. तथापि नीरोच्या या कृत्याचें समर्थन करणें न करणें हें केवळ परिणामावर अवलंबून आहे असें सर्वांस वाटलें. भीमकर्म्मा हॅनिबालचे तावडींत निर्नायक असें अर्धवट सैन्य सोडून नीरो इकडे आला. आतां हें वृत्त जर हॅनिबालला समजेल तर त्या असुरक्षित सैन्याचा तो बळी घेतल्याशिवाय राहणार नाहीं. अशा रीतीनें त्या सैन्याचा निकाल लावून हॅनिबाल हा नीरोचा पाठलाग करून त्यास गांठील. मग रोमच्या बचावाची आशाच नको. असे भीतिप्रद विचारही त्यांच्या मनांत उद्भवूं लागले.

रोमचे रहिवाशांची जरी याप्रमाणें पांचांवर धारण बसली होती तथापि त्यांच्या सेनापतींची उमेद कायम होती. नीरोनें लिव्हियस यास आपला बेत व आगमनाची वार्ता आगाऊच कळविली होती. लिव्हियसचे सूचनेवरून नीरोनें अशा बेतानें मुक्काम ठराविले कीं, शेवटीं लिव्हियसच्या छावणींत तें सैन्य रात्रीच्या वेळीं येऊन दाखल झालें. हॅस्ड्रुबालची छावणी तेथून उत्तरेस अर्ध मैलावर होती, पण त्यास या नवीन फौजेच्या आगमनाचा सुगावा मुळींच लागला नाहीं. लिव्हियसच्या छावणींतच ज्याच्या त्याच्या दर्जाप्रमाणें सर्वांची व्यवस्था झाली. ही नवीन आलेली कुमक कांहीं थोडी थोडकी नव्हती. नीरो निघाला त्या वेळीं त्याचें सैन्य सात हजार होतें; त्यांत वाटेंत सतत भर पडतच होती. नीरोनें छावणींत दाखल होतांच सर्व लष्करी अधिकाऱ्यांस पाचारण केलें. लढाई देण्याची वेळ मुक्रर करण्याविषयीं त्यांच्यांत वाटाघाट होऊन कित्येकांचा अभिप्राय पडला कीं, नीरोचे शिपाई थकून भागून आले आहेत त्यांस एक दिवसाची विश्रांति घेण्यास सवड द्यावी व नंतर लढाईचा बेत करावा; परंतु अशाप्रकारें व्यर्थ काल गमावण्यास नीरो कांहीं मूर्ख नव्हता. तो ह्मणाला 'जो अधिकारी युद्ध लांबणीवर टाकण्याची सल्ला देईल त्यास मी आपला शत्रू लेखीन. कारण इकडे असा काल व्यर्थ दवडल्यास तिकडे माझ्या सैन्याचा जीव धोक्यांत पडत आहे हें लक्षांत बागवा. मी इकडे निघून आल्याचा यत्किंचित् संशय जरी हॅनिबाल यास आला तरी तो त्याची कत्तल उडविण्यास विलंब लावणार नाहीं, याकरितां आह्मीं ताबडतोब लढाईस सुरवात केली पाहिजे. मी आल्याचें कळण्यापूर्वी हॅस्ड्रुबालवर तुटून पडून त्याचा फडशा पाडून हॅनिबाल अज्ञान निर्दैत आहे तोंच मला परत दक्षिणेस माझ्या छावणींत दाखल झालें पाहिजे.' नीरोचें हें भाषण सर्वांस पटून लगेंच युद्ध सुरू

करण्याविषयीं इशारतीचें तांबडें निशाण फडफडूं लागलें व रोमन सैन्य लढाईच्या तयारीनें आणि शिस्तीनें मैदानांत उभें राहूं लागलें.

रोमन छावणीवर आपणच चालून जाण्याची जरी हॅस्ड्रुबालची छाती नव्हती तथापि तो मैदानांत शत्रूशीं दोन हात करण्यास उत्सुक होता; परंतु रोमन सैन्य आपण होऊन लढाईचे उद्देशानें पुढें येत असल्याचें पाहून त्यास आश्चर्य वाटलें व कांहीं शंकाही आली. रोमन फौजेची संख्या आपल्या पूर्वीच्या अंदाजाहून अधिक आहे व त्यांतील कांहीं शिपायांची चिलखतें धुळीनें भरलेलीं आणि घोडे प्रवासानें थकून गेलेले आहेत असें पाहून त्याची शंका बळावली. स्पेन देशांत असतांना त्याला रोमन लष्करी रिवाजाची माहिती झाली होती त्यावरून रण-शिंगाच्या द्विरुक्तीवरून त्यानें ताडलें कीं, आपले विरुद्ध लढण्यास दोघेही रोमन सुभेदार हजर आहेत. त्यावेळीं तो आपले मनांत चर-कला. कारण हॅनिबालच्या सुरक्षिततेबद्दल त्यास आतां संशय वाटूं लागला. दक्षिणेच्या सैन्याची काय वाट झाली असावी? कदाचित् हॅनिबालही आपल्यास मिळण्यास इकडे निघून आला नसेल ना? असे शेकडो विचार त्याच्या मनांत उद्भवले. शेवटीं हॅनिबालविषयीं नक्की बातमी लागेपर्यंत आपण लढाई टाळून इन्सुब्रियन गॉलमध्यें जाऊन रहावें असें त्यानें योजिलें व आपलें सैन्य परत छावणींत नेलें. त्याच्या छावणीवर चालून जाण्याची कुवत रोमन सैन्यांत नव्हती व शत्रूच्या डोळ्यादेखत परत फिरण्याचें धैर्य हॅस्ड्रुबॉलला नव्हतें. यास्तव तीं उभय दळें त्या दिवशीं कांहीं एक हालचाल न करतां स्तब्ध राहिलीं. एक प्रहर रात्र लोटल्यानंतर हॅस्ड्रुबॉलनें निमुटपणें अंधारांत आपले सैन्यास परत फिरण्याचा हुकूम दिला. आपला हा बेत शत्रूस कळण्याचे पूर्वीच आपण मेटॉरस नदी ओलांडून पलीकडे जावें असें त्याच्या मनांत होतें;

पण त्याच्या वाटाड्यांनीं त्याचा विश्वासघात केला. नदीच्या पायउतारची वाट सोडून देऊन त्यांनीं त्यास भलत्याच ठिकाणीं नेलें आणि रात्रीच्या काळोखांत आपण हळूच पोबारा केला. हॅस्ड्रुबॉलचें सैन्य नदीचा उतार शोधण्यासाठीं उंच व सुळक्यासारख्या नदीतीरानें उगीच धडपड करूं लागलें; पण त्यास मार्ग सांपडला नाहीं. अशा स्थितींत असतां सूर्योदय झाला. तेव्हां हॅस्ड्रुबॉलनें आपल्या सैन्याची झालेली अव्यवस्था पाहिली. मदतीस आलेलें गॉलचें सैन्य तर तशा प्रसंगांतही दारू पिऊन धुंद होऊन पडलें होतें. रोमन स्वार पाठलाग करीत अगदीं समीप येऊन ठेपले; पायदळ पलटणीही फारशा दूर नव्हत्या, त्या तावडतोब लढाई देण्याचे बेतानेंच येत होत्या. आतां लढाई टाळणें शक्य नसल्यानें त्यानें तयारीचें शिंग फुंकिलें. त्याला आशा वाटत होती कीं लढाईस सुरवात होतांच रणमदानें आपलें सैन्य पूर्वीप्रमाणें शौर्यानें व शिस्तीनें वागेल.

कार्थेजीनियन सैन्यांत स्वारांचा भरणा फार कमी होता. खुद्द कार्थेजहून आलेलें सैन्यही थोडकेंच होतें. स्पेनमधील कसलेलें कांहीं सैन्य व आफ्रिकन पलटणी स्वतःचे देखरेखीखालीं उजव्या बाजूस ठेवून, मध्यभागीं लिग्यूरियन्स आणि डावीकडे बर्चीवाले गॉलिश लोक याप्रमाणें त्यानें सैन्याची मांडणी केली. आपण रोमन सैन्याचे डावे बाजूवर हल्ला करून त्याचा फडशा पाडीपर्यंत रोमन सैन्याची उजवी बाजू या गॉलिश गचाळ सैन्यावर हल्ला करूं शकणार नाहीं अशा बेतानें त्यानें ही योजना केली होती. कारण गॉलिश फौजेच्या समोर व डाव्या बगलेस जमीन उंचसखल असल्यानें रोमन सैन्याला त्यांचेवर चालून जाण्यांत बराच अडथळा होण्याजोगा होता. आपली ही कमकुमत बाजू सुरक्षित राहील तर आपणास खात्रीनें जय मिळेल

असें हॅस्ड्रुबॉलला वाटत होतें. युद्धकौशल्यानें जय मिळण्यास जी जी अवश्य तरतूद करावयाची ती ती सर्व त्यानें करून ठेविली होती. आपल्या सैन्याचा मध्य व उजवी बाजू यांचेसमोर त्यानें आपले हत्ती उभे केले. प्रत्येक माहुताजवळ एक खिळा व लांकडी हातोडा देऊन त्यांस अशी सक्त ताकीद देऊन ठेविली होती कीं जर कां हत्ती शत्रूवरील रोख सोडून उलट खाऊन आपल्याच सेनेचा विध्वंस करूं लागला तर त्याचे मेंदूंत खिळ ठोकून त्यास ठार करावयाचें.

रोमन सैन्याची उजवी बाजू नीरोचे हाताखालीं असून मध्यभाग पोर्शियस नामक सेनापतीचे ताब्यांत होता. डावीकडे लिव्हियस हा सेनानायक होता. ही लढाई निकराची होणार आणि पराजित पक्षास शत्रूकडून दयामाया दाखविली जाण्याचा संभव नाहीं, अशी उभय पक्षांची खात्री होती. रोमन सैन्यास फुशारकी मारण्यास एक जागा होती. कार्थेजीनियन्सनीं आदल्या रात्रीं त्यांचे पुढून पळ काढला होता. तेव्हां अशा पळपुट्या शिपायांचा चेंदामेंदा उडवून देणें आपणास कठिण जाणार नाहीं असें त्यांस वाटत होतें. अशा घमेंडींतच रोमन सैन्यानें स्पॅनिश व आफ्रिकन तुकडीवर हल्ला केला. पण तेथें शत्रूंनीं त्याचा इतक्या निकरानें प्रतिकार केला कीं, रोमन बाजू डळमळूं लागली. स्पॅनिश व आफ्रिकन शिपाई शरीरानें घट्टेकट्टे होते, त्यांस रोमनसैन्याची युद्धपद्धति चांगली ठाऊक होती. लिग्यूरियन सैनिकही चांगले कंटक होते व युद्धांत माघार घेणें त्यांस माहित नव्हतें. शिवाय हॅस्ड्रुबॉलनें त्यांची योजना मध्यभागीं केली असल्यानें त्यांनीं मनांत आणिलें असतें तरी पळ काढण्यास त्यांस वावच नव्हती. अशा रीतीनें हॅस्ड्रुबालची उजवी बाजू व मध्य अढळ असल्यानें लिव्हियस आणि पोर्शियस यांच्या हल्ल्यांचा त्यांजवर कांहीं परिणाम झाला नाहीं. दोहोंकडील वीर मोठ्या

आवेशानें लढूं लागले. रक्ताचे पूर वाहूं लागून मेटॉरस नदी लाल दिसूं लागली. पण जयाची आशा कोणासच दिसेना. कार्थेजच्या हत्तींनीं रोमन सैन्याची बरीच त्रेधा उडवून दिली. त्यांचीं अघाडीची रांगची रांग जमीनदोस्त झाली. पुढील शिपायांची स्थिति पाहून मागील खोगीरभरती सैन्यानें पळ काढण्यास सुरवात केली. हा वेळपावेतों नीरो हा आपल्यासमोरील शत्रूच्या डाव्या बगलेवर हल्ला चढविण्याचा प्रयत्न करीत होता. परंतु तेथें उभय सैन्यांचे दरम्यान एक उंच टेकडी असल्यानें नीरोचा उपाय चालेना. आपली डावी बाजू सुरक्षित आहे असें पाहून हॅस्ड्रुबालला अधिकच हुरूप आली. रोमनसैन्याचे डावे बगलेवर व मध्यभागीं तो जास्त नेटानें निकराचे हल्ले करूं लागला. तेव्हां लिव्हियस यास आपलें सैन्य थोपवून धरणें मुष्किलीचें झालें.

नीरोनें ताडिलें कीं, गॉलिश सैन्य आपली जागा सोडून पुढें चालून येत नाहीं व तें आहे तेथेंच आपणास जाऊन हल्ला करणें जड जाईल. याकरितां दक्षिणेकडून उत्तरेस जसें आपण सैन्य घेऊन आलों, तशीच कांहीं शक्कल लढविल्याखेरीज आज निभाव लागत नाहीं. ही क्लृप्ति मनांत येतांच त्यानें आपले सैन्यांतील निवडक शिपाई बरोबर घेतले; आणि मागें वळून, बाकीच्या रोमन सैन्यास उजवी घालून, स्पॅनिश व कार्थेजीनियन्स यांचे पिछाडीवर तो जोरानें तुटून पडला. या कचक्याच्या आकस्मिक हल्ल्यानें कार्थेजची ती बाजू एकदम ढांसळली. कार्थेजीनियन्स व लिग्यूरियन्स हे मागें उलटून या नवीन फौजेशीं लढूं लागले; पण दोहोंकडून कचाटींत सांपडल्यामुळें त्यांचा कोंडमारा झाला. त्यांची भयंकर कत्तल होऊं लागली; तथापि शेवटपर्यंत ते धीर न सोडतां लढत राहिले व अखेरीस बहुतेकांनीं धारातीर्थीं देह ठेविले. याप्रमाणें इकडे जय मिळवून नंतर एवढा वेळपावेतों तटस्थ राहिलेल्या गॉल लोकांवर

रोमन पलटणींनीं हल्ला केला व त्यांना त्यांनीं बकऱ्यांप्रमाणें चराचर कापून काढिलें. हॅस्ड्रुबालनें अखेरपर्यंत आपलें युद्धचातुर्य व्यक्त केलें. आपले सैन्यास थोपवून धरून त्यास चेतविण्याचे व त्यास वांचविण्याचे त्यानें जे आटोकाट प्रयत्न केले त्याबद्दल त्याच्या शत्रूंनींही त्याची तारीफ केली. पण अखेरीस त्याचे सर्व उपाय खुंटले. तथापि रोमन लोकांचे हातीं जीवंत सांपडून त्यांचे जयघोषाच्या वेळीं आपल्या दीन मुद्रेनें त्यांचा हर्ष वृद्धिंगत करणें किंवा ज्या शूर बच्चांनीं आपल्यासाठीं रणांगणावर शयन केलें, त्यांचे मागें जीवंत राहणें त्यास नामुष्कीचें वाटून त्यानें आपल्या घोड्यास टांच दिली व तो रोमन पलटणीवर तुटून पडला. हॅमिल्कारचा पुत्र, हॅनिबॉलचा बंधु व रोमचा प्रतिस्पर्धी अशा ब्रीदाला साजेसा पराक्रम गाजवून तो सरतेशेवटीं युद्धांत पतन पावला.

नीरोच्या धाडसी कृत्यास पूर्णपणें यश आलें. नंतर लगेच परत वळून पूर्वीप्रमाणेंच जलद कूच करून हॅनिबॉलला अद्याप वार्ताही नाहीं तोंच तो आपल्या छावणींत परत येऊन दाखल झाला. आपल्याबरोबर आपल्या विजयाचें भयंकर चिन्ह त्यानें आणिलें होतें. रोमन लोकांच्या निर्दय स्वभावास अनुसरून त्यानें हॅस्ड्रुबॉलचें आणिलेलें शिर हॅनिबॉलच्या छावणींत टाकविलें. त्या दोघा बंधूंची भेट अकरा वर्षांत झाली नव्हती. इतालींत आल्यापासून हॅनिबॉल हा रात्रंदिवस आपल्या भावाची मार्ग-प्रतीक्षा करीत होता. तो इतालींत येऊन दाखल झाला म्हणजे आपल्या करामतीबद्दल पाठ थोपटील; नंतर उभयतांचीं अजिंक्य सैन्यें एकत्र करून रोमला वेढा देऊं व बापाचे मरणकाळीं दिलेलें वचन शेवटास नेऊं असें तो मनोराज्य करीत होता. अशावेळीं आपल्या भावाचें मुंडकें अकस्मात् छावणींत पडलेलें पाहून त्याच्या डोळ्यापुढें अंधारी

आली. तो धाडकन् जमिनीवर बेशुद्ध होऊन पडला. कांहीं वेळान सावध झाल्यावर 'कार्थेजचें नशीब फुटलें, त्याचीं शंभर वर्षें भरलीं' एवढेच उद्गार त्याचे मुखावाटे बाहेर पडले.

या आणीबाणीच्या लढाईच्या परिणामाकडे रोमन लोकांचें लक्ष्य सारखें लागून राहिलें होतें. उभय दळें समोरासमोर आलीं असें कळल्यापासून अधिक बातमी आली असल्यास ऐकण्याच्या उत्सुकतेनें ते नित्य फोरम कचेरींत हेलपाटे घालूं लागले. कार्थेजच्या सैन्याची त्यास इतकी धास्ती वाटत होती कीं, हॅस्ड्रुबाल हा फिरून 'कानी' ची पुनरावृत्ति करील असेंच त्यास वाटत होतें. बायकामुलें रात्रंदिवस देवास प्रार्थना व नवस करीत आणि त्या रानदांडग्या शत्रूंपासून रोमचें संरक्षण करण्याविषयीं त्यास आळवीत. अशा वेळीं रोमचा जय झाल्याची प्रथम उडत बातमी आली. पण हॅस्ड्रुबालचें तें कपट असावें असाच त्याजबद्दल सर्वजण संशय घेऊं लागले. अखेर एकदां नक्की बातमी मंत्रिसभेकडे आलेल्या रिपोर्टावरून कळली. कित्येक दीर्घशंकी होते त्यांनीं ते कागदपत्रच बनावट असतील असा संशय घेतला. अखेर त्या लढाईंत प्रत्यक्ष हजर असलेले सरदारच गांवानजीक परत आल्याचें कळलें; तेव्हां मग जिकडेतिकडे आनंदीआनंद दिसूं लागला. सर्व शहरवासी लहानथोर त्यांना सामोरे गेले. त्या गर्दींतून जेमतेम वाट करून ते अधिकारी मंत्रिसभेंत आले. 'आमच्या सैन्यानें हॅस्ड्रुबालच्या सैन्याचा पुरा निःपात केला. हॅस्ड्रुबाल स्वतः ठार झाला. आमचे दोघे सुभेदार सुरक्षित आहेत' अशी बातमी त्यांनीं मंत्रिसभेंत निवेदन केली. नंतर नागरिक लोक देवळांत प्रार्थना करावयास गेले. आफ्रिकन लोकांच्या तडाक्यांतून रोम शहर व आपलीं मुलेंबाळें बचावल्याबद्दल भक्तिभावानें त्यांनीं ईश्वराचें स्तवन केलें.

या जयानें रोमन लोकांचे छातीवरील एक दडपण काढल्याप्रमाणें झालें. प्यूनिकयुद्ध सुरूं होण्यापूर्वी जसा लेवादेवीचा व्यवहार निर्धास्त चालला होता तसाच तो फिरून चालू झाला. अद्यापि हॅनिबाल हा इतालींत होता हें खरें. पण आतां त्याची नांगी पडल्याप्रमाणें झाली. प्यूनिक युद्धाची आणीबाणीची वेळ निघून गेली. जयाचें पारडें कार्थेजला अनुकूल होतें तें फिरलें. पुढें चार पांच वर्षांनीं हॅनिबालचा प्रताप-रवि झामाच्या लढाईत पूर्णपणें अस्तंगत झाला व कार्थेजची सत्ता नामशेष झाली. पण कार्थेजच्या भरभराटीस ओहटी लागली ती मेटॉरसच्या अपजयानें होय. यास्तवच झामाच्या लढाईपेक्षां ही लढाई अधिक महत्त्वाची व क्रांतिदर्शक आहे. या लढाईनें कार्थेजचा शिलशिला नाहींसा झाल्यानें रोमन साम्राज्यास विस्तार पावण्याला संधि सांपडली. कारण हॅनिबॉलनंतर तितक्या लायकीचा दुसरा कोणी प्रतिस्पर्धी बऱ्याच काळांत रोमला भेटला नाहीं.

नीरोचा हा डावपेंच अद्वितीय होय असें बायरनचें मत आहे. परिणामावरून पहातां यांत अतिशयोक्ति बिलकुल नाहीं. युद्धशास्त्राचे दृष्टीनें पाहिलें तर त्याचे तोडीचें दुसरें उदाहरण म्हणजे मार्लबरोनें फ्लँडर्समधून निघून डॅन्यूब नदीपर्यंत मजल मारून ब्लेन्हिम येथें फ्रेंच सैन्याशीं लढाई दिली तें होय.

जगातील क्रांतिकारक लढाया.

भाग ५ वा

विन्फील्डची लढाई. इ. स. ९.

यूरोपच्या अर्वाचीन सुधारणेंत जर्मनीचा अंश किती आहे, व जे जर्मन लोक कित्येक शतकें रोमचे अजित प्रतिस्पर्धी होते आणि पुढें रोमचे जेते झाले, त्या शूर वीरांचे मानवजातीवर किती उपकार आहेत, याचा बरोबर अंदाज करून तो सुंदर भाषेनें एका फ्रेंच गृहस्थानें प्रगट केला आहे. या फ्रेंच लेखकाची मुत्सद्दीपणाविषयीं फारशी ख्याति नाहीं; तथापि ग्रंथकार या नात्यानें तो बराच नांवाजलेला आहे, आणि त्याचें हें मत सर्व इतिहासकारांस मान्य झालें आहे.

इ. स १८२८ त पारीसमधील अर्वाचीनइतिहासव्याख्यापक एम्. गिझो यानें 'युरोपियन सुधारणेचा इतिहास' या विषयावर व्याख्यानें देण्यास सुरवात केली. त्या वेळेपासून सांप्रत अस्तित्वांत असलेल्या प्रत्येक संस्थेचें मूळ शोधून काढण्याची जिज्ञासा वाढूं लागली. गिझोनें आपल्या ग्रंथांत प्रचलित कालांतील प्रमुख राजकीय व सामाजिक पद्धतीचें उत्कृष्ट पृथक्करण केलें. त्यावरून ज्या प्रसंगामुळें, त्या पद्धतीचें सामान्य स्वरूप निश्चित झालें, व तीस सांप्रतचें रूप येण्यास प्रारंभ झाला, त्या गोष्टीकडे मन साहजिकच वेधलें गेलें. इ. स. ९ वे वर्षी जर्मनीनें स्वातंत्र्यार्थ रोमविरुद्ध शस्त्र उचलिलें तो हा प्रसंग होय.

जर्मनवीर अर्मीनियसनें स्वातंत्र्यार्थ धडपड केली नसती अगर तींत त्याला यश प्राप्त झालें नसतें, तर ईडर व एल्ब नद्यांमधील प्रदेशांतील जर्मन रहिवाशी नामशेष झाले असते, किंवा दास्यांत खितपत राहिले असते. मग त्यांनीं इंग्लंडांत येऊन राज्य स्थापणें, त्या राज्याची भरभराट होऊन पृथ्वीच्या एकतृतीयांश भागावर त्यांचें साम्राज्य पसरणें व इंग्लिश भाषा, विद्या, कलाकौशल्य यांचा जगभर प्रसार होणें, या सर्व गोष्टी मृगजलाप्रमाणें झाल्या असत्या.

रोमचा जुलूम असह्य होऊन त्यांतून आपल्या देशाची मुक्तता करण्याचा जेव्हां अर्मीनियसनें संकल्प केला त्यावेळीं त्या प्रयत्नांत यश येईल असें मोठ्या निधड्या छातीच्या पुरुषासही वाटत नव्हतें. जिकडे तिकडे निराशेचें साम्राज्य पसरलें होतें. जर्मनीचा अर्धाअधिक प्रदेश रोमन लष्करी ठाण्यांनीं आक्रमिला होता. परंतु सर्वांत अत्यंत उत्साहभंजक व उद्वेगकारक गोष्ट ह्मणजे, ज्या लोकांस दास्यांतून सोडविण्यास तो झटून आकाशपाताळ एक करीत होता, त्याच जर्मन लोकांस त्या पारतंत्र्याबद्दल तिटकारा न येतां, उलट त्यांत त्यांस सुखच वाटत होतें. जे कांहीं थोडे शूर देशभक्त होते, त्यांजवळ हत्यारें वैगेरे कांहीं साधन नव्हतें. मग लष्करी शिक्षणाचा त्यांच्यांत अभाव होता हें वेगळें सांगणें नकोच. रोमन लोकांचें सैन्य चांगलें कसलेलें; त्यांचा जामानिमा सवोत्कृष्ट; त्या सैन्यावरील अधिकारी युद्धकलेंत वाकबगार व शौर्याविषयीं नाणावलेले असे होते. लढाईची साधनसामुग्री त्यांचेजवळ भरपूर. शिवाय रोमची चिकाटी ह्मणजे मगरमिठीच. मुसरीच्या दांडेतून एकादा पदार्थ काढून घेणें शक्य असेल, पण रोमनें जिंकलेला प्रदेश स्वतंत्र करणें ह्मणजे दुरापास्त अशी त्यावेळीं सर्वांची कल्पना असे. जर्मनी व रोमच्या बलाबलांत याप्रमाणें जमीनअस्मानाचें

अंतर होतें. रोमपुढें जर्मनीचा टिकाव लागेल अशी कल्पनाच मनांत येत नसे. बरें दुसऱ्या एखाद्या देशाकडून जर्मनीला स्वातंत्र्यप्रीत्यर्थ चालविलेल्या खटपटींत कुमक मिळेल म्हणावें तर तिकडूनही पूर्ण निराशाच. कारण युरोप खंडांतील बहुतेक सर्व ज्ञात भाग रोमचे अमलाखालींच होता. स्वतंत्र, असा एकही देश उरला नव्हता. तेव्हां मदतीची अथवा निदान सहानभूतीची अपेक्षा तरी कोणापासून करावयाची?

अर्मिनियस हा कांहीं अडाणी अशिक्षित मनुष्य नव्हता. निष्कारण रक्तपाताची त्यास कांहीं हौस नव्हती. रोमची अप्रतिहत शक्ति तो जाणून होता. रोमन सैन्यांत त्यानें कित्येक दिवस नोकरी केली होती व सैन्यांत तो एक छोटासा सरदार बनला होता. ज्या लोकांचें स्वातंत्र्य हरण करावयाचें असेल त्यांच्यांतील कुलीन व तरुण पुरुषांना पदव्या व मानमरातब देणें ही एक रोमची युक्ति होती.+ त्याप्रमाणें या कपटजालांत गुंतविण्याकरितां चेरूसी घराण्यांतील दोघे वीर अर्मिनियस व त्याचा बंधु यांस लालूच दाखविली गेली होती. या प्राप्त झालेल्या पदवीस व मानास दिपून जाऊन आर्मिनीयसचा भाऊ स्वत्व विसरला. आपलें पूर्वीचें जर्मन नांवसुद्धां टाकून देऊन त्यानें फ्लेव्हिअस हें लॅटिन नांव धारण केलें आणि रोमच्या सर्व लढायांत तो मातृभूमीविरुद्ध लढला. आर्मिनियस मात्र असल्या शुष्क पदव्यांना, पोकळ मनाला, सुधारणेला अगर सुखोपभोगाला कशालाच भाळला नाहीं. रोमची हांजीहांजी करून जी पदवी त्याला मिळाली असती त्याहून स्वदेशोद्धारक ही पदवी त्याला शतपटींनें अधिक अमूल्य वाटत होती व तीच त्यानें शेवटीं संपादिली. रोमच्या प्रख्यात

× हिंदुस्थानांतील लोकांना पदव्या देण्यांत इंग्लिशांचा कोणता हेतु असतो हे कोणी साहेबाचे देशबांधव सांगतील काय?

इतिहासकारांनेंसुद्धां 'जर्मनीस स्वातंत्र्य संपादून देणारा वीर' अशा बहुमानानें त्यांस आपल्या इतिहासांत संबोधिलें आहे.

रोमच्या दिग्विजयास प्रतिबंध करून आपला देश स्वतंत्र करावयाचा हा विचार अर्मिनियसचे मनांत घोळूं लागला. तेव्हां असल्या प्रयत्नांत पूर्वी शेकडो लोकांचे बळी पडलेले आठवून त्याचें मन कचरूं लागलें. ज्या प्रयत्नांत हॉनिबॉल व मिथ्रिडेटससारख्यांस अपयश आलें तेथें आपला पाड काय? व्हिरिअॅथसची स्थिति काय झाली? न्यूमॅन्शिया शहराची राखरांगोळी होऊन त्याचा मागमूसही नाहींसा झाला नाहीं काय? पण इतके मागील व परदेशचे दाखले कशाला? जर्मनीच्या अगदीं डोळ्यांसमोरच गॉल देशांत रोमविरुद्ध बंड करणारांची काय दुरवस्था होते याची प्रचीति आली नाहीं काय? सीझरविरुद्ध गॉल लोकांनीं आठ वेळां प्रयत्न केला. शेवटच्या बंडांत तर व्हर्सिजेटॉरिक्सनें सगळा देशचा देश रोमविरुद्ध चेतविला होता आणि कित्येक रोमन पलटणी गारद करून खुद्द ज्यूलिअस सीझरलाही अलेसियाचे लढाईत पेंचांत आणिलें होतें. पण अशा व्हर्सिजेटॉरिक्सची स्थिति काय झाली? अखेरीस त्यास कैदी करून सीझरच्या विजयोत्सवांत त्याचे रथापाठीमागें पशूप्रमाणें बांधून मिरविलें व शेवटीं निर्दयपणें त्याचा वध केला. अशीं एक कां दोन शेकडों उदाहरणें डोळ्यापुढें उभीं राहतात; त्यामुळें रोमविरुद्ध बंड करून यश संपादन करणें अशक्य असें वाटून अर्मिनियसचें मन निराश होत असे.

आतां ही गोष्ट निर्विवाद होती कीं, ज्या रोमन सत्तेपुढें पश्चिम युरोपांतील सर्व संस्थानें लटपटलीं ती रोमची शक्ति अद्याप तशीच कायम राहिली नव्हती. रोमच्या राज्यपद्धतींत क्रांति होऊन लोकसत्ताक राज्यपद्धतीचे जागीं एकसत्ताक साम्राज्याची स्थापना झाली होती. परंतु

त्यांच्या सैन्यांतील शिस्त बिघडली नव्हती किंवा त्यांच्यांतील शिपाईबाणा यत्किंचित्ही कमी झाला नव्हता. लोकसत्ताक राज्यपद्धतीचे वेळीं जसे जय रोमला प्राप्त झाले होते तसेच जय अद्यापहीं रोमन सैन्यास मिळत होते. कित्येक इतिहासकारांचें असें मत आहे कीं, आगस्टस सीझरला राज्यमर्यादा वाढविण्याची हांव नव्हती; पण हें मत निव्वळ चुकीचें आहे. भीतीनें असो अगर मात्सर्यानें असो, आपल्या वंशजांना मात्र त्यानें तसला उपदेश केला होता. परंतु अर्मिनियसनें त्याची चांगली रग जिरवीपर्यंत त्याची स्वतःची नीति त्या उपदेशाच्या उलटच होती. त्याच्या कारकीर्दीत रोमन राज्याची सरहद्द आल्प्सपासून पुढें डॅन्यूब नदीपर्यंत जाऊन भिडली. आस्ट्रिया, हंगेरी, पूर्व स्वित्झर्लंड, बव्हेरिया, व्हॅलेंटाईन व टायरोल हे सर्व प्रांत त्याच्या कारकीर्दीतच जिंकले गेले. याप्रमाणें इकडे जर्मनीला दक्षिणेकडून शह मिळत असतां पश्चिम दिशेस रोमन सैन्यानें फारच धुमाकूळ उडवून दिला. गॉल प्रांतांतून निघून रोमन सैन्यानें ऱ्हाईन नदीच्या तीरावरील किले घेतले, व ती सरहद्द पुढें वाढत वाढत एल्ब नदीस जाऊन भिडली. शिवाय रोमन आरमार गॉलमधील बंदरांतून, जर्मन समुद्रांतील सामुद्रधुन्यांतून व खाड्यांतून येऊन नदीमुखानें वर चढून खुष्कीवरील आपल्या सैन्यास मदत करीत असे. त्यामुळें तर अडाणी जर्मन राष्ट्रावर त्यांचा फारच वचक बसला होता. जिंकलेल्या मुलुखांत रोमचीं लष्करी ठाणीं अशा बेतानें बसविलेलीं होतीं कीं, मुलुखांत कोठेंही बंड उद्भवल्यास त्या ठिकाणीं फौज पाठविण्याला विलंब लागूं नये.

रोमची शक्ति सरहद्दीवर व प्रांतांतून याप्रमाणें अतुल भासत होती. तथापि त्या साम्राज्यास अंतर्यामीं कीड लागली होती. परशत्रूशीं चालू असलेल्या युद्धांत व रोममधील यादवींत इतालींतील

बराच प्रदेश उजाड होऊन स्वतंत्र मध्यम वर्ग नामशेष झाला होता. श्रीमान् बडे लोकांचा वर्ग चैनींत व विलासांत गर्क आणि कनिष्ठवर्ग दारिद्र्य व गुलामगिरी यांनीं गांजलेला. वरिष्ठ वर्गाबद्दल खालील वर्गांतील प्रजेस आदर वाटण्याचें बंद झालें होतें. सैन्यांत आफ्रिका, सार्डिनिया, एशियामायनर, इलीरिया इत्यादि देशांतून जिंकून आणलेल्या गुलामांची भरती फार झाल्यानें अविवेक व विकारवशता जिकडे तिकडे बोकाळली होती. वारंवार घडणाऱ्या राज्यक्रांतीस कंटाळून व स्वतःचे अंगांत राज्य चालविण्याची धमक नाहीं अशी नादान स्थिति ओळखून मंत्रिसभेनें आपले सर्व अधिकार ऑगस्टस सीझरच्या चरणकमळीं अर्पण केले. त्यावेळेपासून मंत्रिसभेचें काम ह्मटलें ह्मणजे बादशहाची हांजी जीहां करणें हेंच होय. बादशहाची व त्याच्या खुषमस्कऱ्यांची चटकदार भाषेनें नसत्या गुणांबद्दल अवास्तव स्तुति करणें यांतच बुद्धीचा व कालाचा अपव्यय होऊं लागला.

ही शोचनीय स्थिति पाहून आर्मिनियसला रोमन लोकांविषयीं तिटकारा उत्पन्न झाला व त्याच मानानें स्वदेशबांधवाविषयींचा त्याचा आदर वाढूं लागला. शौर्य, विश्वासूकपणा, वचनस्थिरता, मर्दानी स्वार्थत्याग, स्वतंत्र संस्थांची आवड आणि भ्रष्टपणा व हलकटपणा यांचा किळस इत्यादि उत्कृष्ट गुण बीजरूपानें जर्मन लोकांचे अंगीं होते. त्या व विशेषेकरून स्त्रियांविषयीं आदर बुद्धि व पवित्रपणा या गुणांनीं अलंकृत अशा जर्मन लोकांनीं, हलकट, अपवित्र, भ्रष्ट व खुशामती इटालियन लोकांचे बंदेदास बनून रहावें काय ? असा प्रश्न आर्मिनियसच्या मनाला स्वस्थ बसूं देईना. तथापि यादवी मिटवून सर्व जर्मन लोकांची एकी करणें, त्या सर्वांस एकसमयावच्छेदेंकरून रोमविरुद्ध बंड करण्यास प्रवृत्त करणें, तो बेत परिपक्व होईपर्यंत त्याची परिस्फुटता होऊं न देणें,

आणि ना युद्धसामुग्री, ना लष्करी शिक्षण, अशा अर्ध कच्चा सैन्यास, एकाही किल्ल्याचा किंवा तटबंदीचा आसरा नसतां, उघड मैदानांत कसलेल्या रोमन पलटणीपुढें नेऊन उभे करणें, व त्याचे हातून रोमन फौजेचा पराजय करविणें, ह्मणजे आकाशास गवसणी घालणें अगर वाऱ्याची मोठ बांधणें असें त्यास वाटत होतें. अशा वेळीं आर्मिनियस हा जर कमी धैर्याचा पुरुष असतां, अथवा स्वदेशप्रीतीच्या जोडीस दुसऱ्या प्रीतीचा दुजोरा मिळाला नसता, तर त्यानें हें काम अंगावाहेर टाकलें असतें.

रोमन लोकांची सत्ता प्रस्थापित होतांच त्यांच्यापुढें गोंडा घोळण्यास जे जर्मन सरदार प्रथम तयार झाले त्यांत सेजेस्टस नामक एक सरदार होता. त्यास रूपगुणसंपन्न अशी थेस्नेल्डा नांवाची एक कन्या होती. आर्मिनियस व थेस्नेल्डा यांचा परस्परावर प्रीति जडून त्यानें तिच्या बापाकडे तिजबद्दल मागणी घातली. परंतु आर्मिनियस हा रोमन लोकांचा द्वेष करितो असें सेजेस्टसला वाटत असल्यानें त्या लुब्ऱ्या थेरड्यानें ती मागणी झिटकारली, व थेस्नेडेला त्याच्याशीं कोणत्याही प्रकारचा पत्रव्यवहार ठेवण्याची मनाई केली. परंतु बापाच्या लांगूनचालनवृत्तीपेक्षां आपल्या प्रियतमाचा धीरोदात्त व बाणेदार स्वभाव तिला अधिक पसंत पडून तिनें आर्मिनियसबरोबर पितृगृहांतून पलायन केलें. कन्येच्या या वर्तनानें सेजेस्टसचे दांत पाडल्याप्रमाणें झालें. रागाच्या आवेशांत त्यानें रोमन गव्हर्नरपुढें आर्मिनियसवर फिर्याद केली, व आपला हेतु साधण्याकरितां, आर्मिनियस हा रोमविरुद्ध बंड करण्याची तयारी करीत आहे अशी खोटीच चहाडी करून रोमन सुभेदारांचें मन कलुषित केलें. याप्रमाणें आपल्या जीवितावर व अब्रूवर धाड आली आणि आपली प्रियतमा पकडून नेण्याचा आपल्या दुस्मनांचा बेत चालला आहे असें

कळतांच आपला उद्दिष्ट हेतु यापुढें लांबणीवर टाकला तर आपला घात होईल असें आर्मिनियसला वाटलें. तत्क्षणींच त्यानें रोमविरुद्ध आपल्या सर्व देशबांधवांस चेतविण्यास कंबर बांधिली. ज्यांनीं आजवर केवळ आलस्यामुळें रोमची दास्यशृंखला सहन केली होती ते सर्व जर्मन लोक आर्मिनियसला अनुकूल झाले.

हा कालपावेतों टायबेरीयस सीझर हा त्या प्रांतावर सुभेदार होता; त्यानेंच तो बहुतेक भाग जिंकून रोमन राज्याला जोडला असल्यामुळें, त्या प्रदेशाची व तेथील रहिवाशांचे स्वभावाची आणि चालीरीतींची त्यास खडान्‌खडा माहिती होती. शिवाय तो अति संशयखोर असल्यानें कोणतीही महत्त्वाची गोष्ट त्याजपासून लपविणें दुरापास्त होतें. पण जर्मन लोकांचे सुदैवानें यावेळीं त्याची बदली होऊन त्याचे जागीं व्हॅरस नामक सुभेदार आला. पॅनोनिया प्रांतांत भयंकर बंड उद्भवल्यामुळें टायबेरियसची तिकडे बंड मोडण्याचे कामगिरीवर रवानगी झाली. या फेरबदलामुळें आर्मिनिसयचा दुहेरी फायदा झाला. एक तर नवीन सुभेदाराला त्या प्रांताची पुरी माहिती नसल्यानें आपले बेत गुप्त ठेवण्यास त्यास जड गेलें नाहीं. दुसरें, जो नवीन गव्हर्नर आला तो अत्यंत जुलमी असल्यानें तत्पूर्वी जे कोणी तटस्थवृत्तीचे होते तेही आतां बंडांत सामील होण्यास उत्सुक झाले. याप्रमाणें आर्मिनियसचा कट बराच रंगांत येत चालला

नवीन नेमणूक झालेला गव्हर्नर व्हॅरस हा पूर्वी सीरिया प्रांताचा सुभेदार होता. त्या वेळच्या उच्च वर्गातील रोमन लोकांच्या अंगीं साधारणपणें जे कांहीं गुणदोष होते ते सर्व व्हॅरसच्या अंगीं होते. वाङ्मयाविषयीं आवड, विद्यानंदाचे ठायीं तल्लीनता, कायदेपांडित्य, व बावदूकता हे गुण वरिष्ठ वर्गांत बऱ्याच प्रमाणानें आढळून येत. पण या

गुणांनीं रोमन लोकांचे अंगचा मुळचा क्रूरपणा, परदुःखाविषयीं व मनोविकाराविषयीं बेपर्वाई, इत्यादि दुर्गुण लेशमात्र कमी झाले नव्हते, किंवा उद्दाम लोभ, महत्त्वाकांक्षा व नैसर्गिक नीतिभ्रष्टता या दोषांस यत्किंचित् आळा बसला नव्हता. अशा प्रकारें मनोविकार प्रबळ, त्यांत सीरियासारख्या प्रांतांत सुभेदारीचा अधिकार! मग काय 'आधींच मर्कट' अशांतली व्हॅरसची स्थिति झाली होती. सीरिया देशांत पुरुषांचे ठायीं मर्दपणा आणि स्त्रियांचे ठायीं पातिव्रत्य या गुणांचा लोप होऊन कित्यक शतकें झालीं होतीं. अशा हलकट व नीतिभ्रष्ट लोकांवर अम्मल गाजविण्याची संवय झाल्यामुळें व्हॅरसला वाटलें कीं आपले हेच चाळे जर्मनींतील मानी पुरुष व शुद्ध मनांच्या स्त्रिया यांचेवर चालविल्यास आपला हात कोण धरणार? सेनापतीनेंच असल्या दुर्वर्तनाचें उदाहरण घालून दिल्यावर त्याचे हाताखालील अधिकारी त्याचेंच अनुकरण करतात; आणि तें पाहून पागल व पशुतुल्य शिपाई तर आपल्या नीच कृत्यांनीं त्याचा कळस करितात. जर्मनीमध्येंही या वेळीं असाच प्रकार सुरू झाला. ज्या प्रकारच्या जुलुमास त्रासून अत्यंत भ्याड लोकसुद्धां बंडास प्रवृत्त होतात, तसले जुलूम म्हणजे कुलीन वधूंच्या पातिव्रत्याचा भंग व्हॅरसचे कारकीर्दीत जर्मन प्रांतांत नित्यशः घडूं लागला.

आपल्या देशाच्या या दुरवस्थेबद्दल ज्यांचें अंतःकरण जळत आहे, व स्वतःवरच असला मानभंग सहन करण्याची पाळी आल्यानें ज्यांचा क्रोधाग्नि भडकून गेला आहे, असले समानशील तरुण पुढारी आर्मिनियसला बरेच आढळले. त्यामुळें बंडाचा वणवा सर्वत्र एकसमयावच्छेदेंकरून पेटवून देणें सुलभ झालें; तथापि रोमविरुद्ध उघड बंडाचा झेंडा उभारणें आणि व्हॅरसच्या पलटणीशीं ठाण मांडून लढाई

देणं ह्मणजे पतंगानें दिव्यावर झडप घालण्यासारखेंच होतें. व्हॅरसच्या हाताखालीं तीन पलटणी होत्या. त्यांतील ठाण्यावर ठेवलेले शिपाई वगळले तथापि करोल चवदा हजार पायदळांत कांहीं कमतरता येण्याजोगी नव्हती. शिवाय रोमन नागरिक, व रोमचें नागरिकत्व अद्याप प्राप्त न झालेले दोस्त यांचे मिळून दोन हजारांवर घोडेस्वार होते. या सर्व सैन्याचा जर्मन लोकांस जो धाक वाटत होता तो त्याच्या संख्येमुळें नव्हे तर अंगच्या पराक्रमामुळें होय. सेनापति ह्या नात्यानें व्हॅरस हा कुचकामाचा होता. तथापि रोमन सैन्य शूर व धाडसी असून त्यावरील इतर अधिकारी आपल्या कामांत वाकबगार होते. रोमन शिपायास कवाइतीचें शिक्षण पूर्ण असल्यानें लढाईत आपली बाजू घसरूं लागल्यास कोणता व्यूह रचावा किंवा कशी हालचाल करावी ही विद्या त्यांना करतलामलकवत् असे. यास्तव आर्मिनियसनें ठरविलें कीं, आपलें काम युक्तिप्रयुक्तीनेंच साधून घ्यावयाचें; व तशी संधि मिळेपर्यंत आपल्या कटाची गुणगुण तर काय पण नुसती शंकाही व्हॅरसच्या कानीं जाऊं द्यावयाची नाहीं.

व्हॅरसच्या सैन्याचें मुख्य ठाणें हल्लींच्या वेस्ट फॅलिआ प्रांताच्या मध्यभागी होतें. त्या ठिकाणीं व्हॅरस हा निर्धास्तपणें नांदत होता. जणूंकाय जर्मन लोक ह्मणजे गोगलगायच आहेत असें त्यास वाटत होतें. त्यामुळें तो बेसुर्वती व बेफिकीर झाला होता. आर्मिनियस व इतर जर्मन सरदारांनीं या ठिकाणीं त्याच्या न्यायमंदिरांत येण्याचा क्रम ठेविला होता. व्हॅरसला वाटे कीं आपलें न्यायचातुर्य व रोमन वकिलांचें वक्तृत्व आणि न्यायपांडित्य पाहून त्याची तारीफ करण्यासच हे येतात.

याप्रमाणें व्हॅरसच्या डोळ्यावर पूर्ण धुंदी चढली असतां पर्जन्यकाळ सुरूं झाला, वृष्टि होऊन जिकडे तिकडे जलमय होऊन गेलें, त्या प्रांतां-

तून दळणवळण ठेवण्याची मुष्कील पडूं लागली. ज्या संधीची आर्मिनियस मार्गप्रतीक्षा करीत होता ती संधि आली असें पाहून वेसर व एम्स यांच्या दुआबांतील रहिवाशांस रोमविरुद्ध उघडपणें बंड करण्याविषयीं त्यानें गुप्तपणें निरोप पाठविला. याप्रमाणें तिकडे 'सूत उवाच' करवून व्हॅरसला त्या बंडाची बातमी समजविली; आणि तें बंड मोडण्याला स्वतः सुभेदारांनींच कंबर बांधावी, हलक्या सलक्या सरदारांचे हातून तें काम भागण्यासारखें नाहीं, असें त्यास भासविलें; मात्र कपटनाटकांतील हा केवळ पूर्वरंग आहे याची त्यास बिलकुल शंका येऊं दिली नाहीं. आर्मिनियसला तो अद्यापि आपला हितचिंतक व सहाय्यकर्ताच मानीत असे. याकरितां त्याच्या शब्दावर विश्वास ठेवून तो तें बंड मोडण्यास निघण्याचे तयारीला लागला. आर्मिनियसकडून आपल्या सैन्यास वाटेंत अडी अडचणीच्या प्रसंगीं लागेल ती मदत मिळेल अशा भरंवशावरच विशेष तयारी न करितां त्यानें तळ हालविला. लिपे-नदीच्या प्रवाहाशीं समांतर रेषेनें तो पूर्वेकडे चालला. प्रथम कांहीं दिवस त्याचा मार्ग सपाट मैदानांतून होता. परंतु लिपे नदीच्या उत्तरतीरीं एम्स नदीच्या उगमाजवळ जें वळण आहे तेथून त्या प्रदेशाचें स्वरूप बदलत चाललें. पुढें सर्व प्रदेश दऱ्याखोऱ्यांनीं परिप्लुत असल्यानें आर्मिनियसनें रणयज्ञास तीच जागा मुकरर केली होती.

वेसर व एम्स या दोन नद्यांच्या चिमट्यांतील प्रदेश डोंगराळ असून गर्द झाडींनें आच्छादित आहे. तेथूनच त्या दोहों नद्यांस पाण्याचा पुरवठा होतो. या प्रदेशाच्या पूर्वेस हल्लींचें डेटमॉल्ट शहर असून लिपे संस्थानची ती राजधानी आहे. या प्रदेशांत कांहीं ठिकाणीं सपाट मैदान असून मधून मधून आडव्या तिडव्या खोल ओघळी आहेत. सभोंवतालीं डोंगरांचे उंच सुळके असून मधल्या सपाट प्रदेशांत जाण्याला

डोंगरांतील कांहीं खोऱ्याशिवाय दुसरी वाट नाहीं. सर्व दऱ्यांतून शीघ्र-प्रवाही नद्या वाहत जातात. उन्हाळ्यांत त्यांना पायउतार असतो. पण वर्षाकालांत व हिंवाळ्यांत त्यांस आकस्मिक पूर येऊन त्यायोगें सर्व दळणवळण बंद पडतें. डोंगराच्या उतरणीवर मुख्यत्वेंकरून ओक झाडांचीं दाट अरण्यें आहेत, किरकोळ झाडेंझुडपेंही क्वचित् ठिकाणीं आढळतात. यास्तव मोठालीं झाडें पडून मार्ग बंद झाला नसेल, किंवा पाण्याच्या प्रवाहानें पडलेली मोठी ओघळ वाटेंत आड येत नसेल, तर त्या वाटेनें पायदळास व घोडेस्वारांसही जाण्याला हरकत पडत नाहीं. या ठिकाणच्या कित्येक भूभागांस जयभूमि, अस्थिमार्ग, अस्थिसरित्, संहारकुंड इत्यादि नांवें अद्याप प्रचलित आहेत. त्यावरून व्हॅरसच्या सैन्याचें 'सोनपत पानपत' याच ठिकाणीं झालें असावें असा इतिहास-कारांचा अंदाज आहे.

रोमन लोकांचे नेहमींचे कडक लष्करी नियम उल्लंघून व शिस्त झुगारून देऊन व्हॅरसनें आपल्याबरोबर सामानसुमानाच्या गाड्यांचें लटांबर आणि बाजारबुणगें घेतलें. जणूं काय आपल्याच देशांत तळ हालवून एका मुक्कामाहून दुसऱ्या मुक्कामाला जाण्यास निघावें अशा बेफिकी-रीनें तो निघाला. जेव्हां सपाट प्रदेश सोडून डोंगरास वळसा घालून अरण्यांतील दलदलीमधून व दऱ्याखोऱ्यांतून मार्ग आक्रमावा लागला, तेव्हां शत्रूचा कांहीं त्रास नसतानांसुद्धां त्या वाटेनें जाणें किती धोक्याचें आहे, हें व्हॅरसच्या प्रत्ययास येऊं लागलें. कित्येक ठिकाणीं पावसानें जमीन इतकी भुसभुशीत झाली होती कीं, पाय ठेवतांच माणूस आंत गडप होत असे. घोडेस्वारांची तर तेथें गति अगदींच कुंठित झाली. आजूबाजूचीं झाडें तोडून तीं पसरून त्यावरून जेमतेम पायदळास पुढें जाण्याला मार्ग सांपडला.

अशा प्रकारच्या अडचणींत तें सैन्य असतां पिछाडीवर रानटी टोळ्यांनीं हल्ला केला अशी बातमी येऊन थडकली. व्हॅरसनें तिकडे कानाडोळा करून तसाच नेट धरून पुढें कूच करण्याविषयीं फर्माविलें. पण इतक्यांत चोहों बाजूंनीं अरण्यांतून रोमन फौजेवर घनदाट शरवर्षाव होऊं लागला. व्हॅरसला आपण शत्रूच्या पूर्ण कचाटींत सांपडलों असें कळून चुकलें. त्या बाणांच्या माऱ्यानें त्याचे शेलके शेलके वीर पटापट मरूं लागले, शत्रूचा तर सुगावा लागेना व त्याजवर चालून जाऊन त्याचा समाचार घेण्यास संधि मिळेना. त्याच्या लष्करांत कांहीं आडहत्यारी जर्मन टोळ्या होत्या, त्या फितूर होऊन शत्रूस सामील झाल्या. जमीन समविषम असल्यानें कवायती पलटणींना फरा धरून उभे राहण्यास सवड नव्हती. त्यांतले त्यांत एक साधारण लहानसें सपाट मैदान पाहून तें रोमन सैन्य तेथपर्यंत कसेंबसें जाऊन पोहोचलें आणि त्याच ठिकाणीं छावणी करून रात्र काढण्याचा त्यांनीं विचार केला. शत्रूचा भरणा अधिकाधिक होऊन त्यांचा हल्ला जोरानें होत असतांच त्यांनीं परिश्रमानें व चातुर्यानें आपला बचाव करण्यास योग्य अशी मोर्चेबंदी करून तळ दिला. रोमन शिपायांस शिस्त आणि टापटीप इतकी अंगवळणीं पडली होती कीं, अशा संकटसमयींसुद्धां ते गडबडून गेले नाहींत.

सूर्योदय होतांच फिरून त्यांनीं कूच करण्यास प्रारंभ केला. व्हॅरसच्या काळजानें ठाव सोडल्यानें त्याचे हातून सेनापतीचें काम होईना. यास्तव त्याच्या हाताखालील अधिकाऱ्यांनींच सर्व जबाबदारी आपले अंगावर घेतली. जर्मन लोक समोरासमोर चाल करून आल्यास त्यांचा पुरा समाचार घेण्याची त्यांनीं तरतूद केली; पण आर्मिनियस कांहीं कच्चा गुरूचा चेला नव्हता. जर्मन बंडवाल्यांचीं हत्यारें म्हणजे दुपाती तलवार आणि तिरकमठा. अंगांतील चिलखत केवळ नांवाचेंच

होतें. रोमन शिपायांचे मारापुढें त्यांचा मुळींच टिकाव लागण्यासारखा नव्हता. रोमन सैन्याचा जामानिमा ह्मणजे, शिरस्त्राण चिलखत, पादत्राण, कट्यार, ढाल, तलवार आणि बर्ची. शत्रू जवळ येतांच जोरानें बर्ची फेंकून त्यांच्या तोंडावर मारा करावयाचा व लगेच कट्यार उपसून त्यांस लंबे करावयाचें; अशा रीतीनें त्यांची फळी फोडून कत्तल करीत आंत घुसून सर्व सैन्याची दाणादाण उडवून द्यावयाची ही त्यांची ठराविक युद्धपद्धति होती. अशा प्रतिस्पर्ध्याशीं समोरासमोर गांठ पडल्यास आपणांस जय मिळणें दुरापास्त होय अशी आर्मिनियसची खात्री होती; ह्मणूनच त्यानें त्याजवर उघडपणें हल्ला केला नाहीं. शत्रूचा मागमूस कोठें दिसेना असें पाहून व्हॅरसनें पुढें कूच करण्याचें ठरविलें; पण त्या मार्गात नैसर्गिक अडचणीच इतक्या होत्या कीं प्रत्येक पाऊल काळजीनें विचारपूर्वक टाकावें लागे. अशा संकटाचे वेळीं मुसळधारा पाऊस सुरू झाला. सर्व प्रदेश जलमय दिसूं लागला. विजांच्या कडकडाटाच्या मिषानें जर्मन राष्ट्रदेवता आपला क्रोध प्रगट करीत आहेत असें भासलें. पुढें थोड्या वेळानें रोमन सैन्यांतील बिनीची तुकडी प्रसिद्ध हर्सीनियन अरण्याच्या एका टोकास येऊन पोहोचली. तेथून पुढील मार्ग आधींच बिकट होता; त्यांत आर्मिनियसनें मोठमोठे वृक्ष मार्गात उलथून पाडून कृत्रिम अडचणींची भर घातली होती. रोमन सैन्य या वेळीं अगदीं थकून जाऊन पूर्ण निराश झालें होतें. सामानसुमानाचे खटारे पुढें चालविणें अशक्य झाल्यानें ते तेथेंच सोडून द्यावे लागले. तेव्हां फौजेंतील शिपाई आपापल्या रांगा सोडून मूल्यवान् चीजवस्तूंच्या आशेनें त्या खटाऱ्याजवळच घुटमळूं लागले. अधिकाऱ्यांच्या हुकुमाकडे जाणूनबुजून कानाडोळा होऊं लागला. अशी सर्वत्र बजबजपुरी माजली असतां आर्मिनियसनें त्यांस चौगीर्द वेढून सरासर हल्ला चढविण्याला हुकूम दिला. त्यावेळीं चोहों बाजूंच्या भयंकर

अंधारमय अरण्यांतून जर्मन योद्धचांच्या भयानक आरोळ्या ऐकूं येऊं लागल्या. रोमन सैनिक सामानसुमानाची व्यवस्था लावण्यांत गुंतले असतां त्यांच्यावर बाणांचा भडिमार होऊं लागला. तेव्हां कांहीं शिपाई टेकडीवर चढून जाण्यास धडपड करूं लागले. कित्येक दलदलींत रुतून बसले. याप्रमाणें त्यांच्या रांगा विस्कळित होतांच मध्यें घुसून एका पलटणीची वार्ता दुसरीस कळूं नये अशा रीतीनें त्यांची फाटाफूट करण्याची जर्मन लोकांनीं योजना केली. आर्मिनियस हा आपल्या निवडक टोळीसह सैन्याच्या अग्रभागीं असून आपल्या शब्दांनीं व कृतीनें स्वानुयायांस उत्तेजन देत होता. त्याचा व त्याच्या अनुयायांचा कटाक्ष रोमन घोडेस्वारांच्या घोड्यांवर विशेष होता. कारण घोडा जखमी होतांच, वरील स्वारास चेंडूप्रमाणें दूर फेकून देऊन चिखलांतून धडपडत बाहेर निघून जाण्याचा तो प्रयत्न करी. त्यायोगानें रोमन पलटणींत फारच घोटाळा उडून जात असे. अशा रीतीनें आपल्या सैन्याची खराबी होत असलेली पाहून व्हॅरसनें परत फिरण्याचें मनांत आणिलें. लिपे नदीवरील अगदीं नजीकच्या रोमन छावणीस आपण परत जाऊन पोहोचूं अशी अद्यापि त्याला आशा वाटत होती. परंतु परत फिरणें हें पुढें चालून जाण्याहून अधिक दुर्घट आहे असें त्याच्या तत्काळ प्रत्ययास आलें. कारण रोमन सैन्य मागें हटूं लागलें अशी बातमी कळतांच शत्रूस अधिकच स्फुरण चढलें व ते अधिक निकरानें हल्ले करूं लागले. घोडदळावरील सरदार न्युमोनियस व्हॅला यानें नीचपणानें पायदळाची आशा सोडून आपला जीव बचावण्याच्या क्षुद्र हेतूनें पलायनास प्रारंभ केला; परंतु त्या दाट जंगलांत व दलदलींत त्यांचा काय निभाव लागणार? थोड्याच वेळांत त्यांची जूट फुटतांच वेगवेगळ्या जर्मन टोळ्यांनीं त्यांची ठिकठिकाणीं कत्तल केली. त्यांतून एकही घोडेस्वार जिवानिशीं परत गेला नाहीं. पाय-

दळानें मात्र होतां होईल तों आपली जूट कायम राखिली. आतां त्यांस जय प्राप्त होण्याची किंवा जीव जगण्याची आशा थोडीच होती; पण लष्करी शिस्त त्यांच्या हाडींमासीं खिळली असल्यानें व नैसर्गिक धैर्यानें त्यांनीं हा वेळपावेतों बाजू संभाळिली होती. शेवटीं खुद्द व्हॅरसच्या तुकडीवर हल्ला होऊन व्हॅरस घायाळ झाला त्या वेळीं त्यास त्रिभुवन आठवलें. ज्यांचा आपण आजवर निःशंकपणें मनमानेल तसा छळ केला त्यांच्या तावडींत आतां सांपडल्यास ते आपले हाल हाल करतील अशी भीति वाटून त्यानें आत्महत्या करून घेतली. तदनंतर दोघा दुय्यम सेनापतींपैकीं एक रणांगणीं पतन पावला. याप्रमाणें कहर गुदरलेला पाहून राहिलेल्या सैन्यासह शरण आल्याचें त्या दुसऱ्या अधिकाऱ्यानें कळविलें. रोमन लोकांनीं आपल्या विजयाचे वेळीं शत्रूस दया क्वचित्च दाखविली होती. तेव्हां शत्रूशीं वागण्यांत त्यांनीं जें क्रौर्य दर्शविलें होतें त्याचा अनुभव त्यांस यावेळीं स्वतःच घेण्याची पाळी आली हें युक्तच झालें. जर्मन लोकांनीं त्यांतील बहुतेकांची अत्यंत क्रूरपणानें कत्तल केली. बाकीच्यांस थोड्या दिवसांनीं आपल्या देवतापुढें बळी दिलें.

रोमन सैन्यास सर्व तऱ्हेच्या अडचणी व अनुकूलता असल्यानें त्याचा शेवटीं निःपात झाला. तथापि एकंदरींत ते शिपाई धिम्मेपणानें व कसून लढले. कित्येक वेळां आपल्यापेक्षां कितीतरी पटीनें अधिक फौजेचा हल्ला त्यांनीं मोडून काढला. परंतु क्रमाक्रमानें त्यांची संख्या कमी होत व त्यांची जूट फुटत चालली त्यामुळें त्यांचा अगदीं निरुपाय होऊन ते अखेरीस शरण आले. एवंच चार दिवसांपूर्वीं जें प्रचंड रोमन सैन्य एवढ्या ऐटीनें व उमेदीनें जर्मन बंडवाल्यांच्या नाशास प्रवृत्त झालें होतें त्याची याप्रमाणें वाताहत झाली. व्हॅईन नदीच्या पैलतीरास सुरक्षित परत गेले असे शिपाई विरळाच.

या लढाईंत जर्मन सैन्यास जो विजय मिळाला त्याहून पूर्णतर जय मिळणें जवळ जवळ अशक्यच झटल्यास चालेल. त्याचप्रमाणें जुलमी परकी अंमलांतून जर्मनीची जशी एका तडाक्यासरशी सुटका झाली तशी तडकफडक स्वतंत्रता दुसऱ्या कोणत्याही राष्ट्रानें क्वचितच संपादन केली असेल. या जयाची वार्ता समजण्याचा अवकाश, रोमचीं जीं कांहीं लहानसहान लष्करी ठाणीं जर्मनींत होतीं तीं सर्व जर्मन लोकांनीं उठवून लाविलीं. त्यायोगानें विन्फील्डच्या जयानंतर रोमन लोकांचा नक्षाच उतरला व जर्मन देश स्वल्पावधींत स्वतंत्र झाला.

पॅडरबार्न गांवाहून पिर्मीटला जाण्याचा जो रस्ता आहे त्या रस्त्यानें गेलें असतां भीतिप्रद अक्राळविक्राळ खडकांनीं युक्त असा एक्स्टरस्टीन नामक प्रदेश लागतो. त्या डोंगराजवळ एक सरोवर असून त्याचे भोंवतीं गर्द राई आहे. तेथें प्राचीन काळीं जर्मन लोकांच्या मुख्य देवतेचें स्थान असून लढाईत कैद केलेल्या रोमन शिपायांस येथेंच बळी दिले अशी दंतकथा आहे.

विन्फील्डच्या लढाईची भयंकर वार्ता रोम शहरीं कळण्यापूर्वीच तेथें भयंकर उत्पात होऊं लागल्यानें सर्व लोक भयचकित होऊन गेले होते. आल्प्सचें एक शिखर एकाएकीं कोसळून पडून त्यांतून तीन ज्वाळा प्रगट झाल्या. रोमपत्तनसंस्थापक रोम्युलस ज्या युद्धदेवतेपासून जन्मला अशी समजूत होती त्या देवतेच्या देवळावर बीज पडली. रात्रीचे वेळीं सर्व नभोमंडळ पेटल्याप्रमाणें लाल दिसूं लागलें. कित्येक धूमकेतू दृग्गोचर होऊं लागले. भाल्याच्या आकाराच्या उल्कांचा उत्तर दिशेकडून रोमन छावणींत पात होण्यास प्रारंभ झाला. रोमच्या सरहद्दीवर विजयदेवतेचा पुतळा जर्मनीकडे तोंड करून उभा केलेला होता तो आपोआप फिरून इतालीकडे तोंड करून उभा राहिला. या सर्व अनिष्ट चिन्हांवरून रोमवर कांहीं संकट गुदरणार असें कित्येकांनीं भाकित केलें. बादशहा आग-

स्टस सीझर हाही धर्मभोळाच असल्यानें त्याला या दुश्चिन्हांचा फारच धाक वाटला. इतक्यांत जर्मनीकडून या भयंकर युद्धाची बातमी आली. त्यावेळीं जिकडे तिकडे हाहाःकार पसरला. आतां जर्मन व गॉल्स एकत्र होऊन इतालीवर चालून येतील त्यांचा प्रतिकार कसा करावा याची त्यांस मोठी विवंचना पडली. यावरून त्या कालीं रोमन नागरिक किती दुर्बळ झाले होते याची चांगली कल्पना करितां येते. या पराभवाच्या धक्क्यानें ऑगस्टस तर कित्येक दिवस भ्रमिष्ट झाला होता. वेडाचे लहरींत तो भिंतीवर डोकें आपटी व 'व्हॅरस, व्हॅरस माझ्या पलटणी मला परत दे' असें बडबडे; तथापि हा दुःखाचा भर निघून जातांच त्यानें रोमच्या बचावाची तरतूद करण्यास प्रारंभ केला. परंतु जर्मन लोकांची खोड मोडून व्हॅरसबद्दल सूड उगविण्यास रवाना करून देण्याकरितां सैन्याची भरती होईना. खुषीनें कोणी नागरिक जर्मनीवर स्वारी करण्यास जमत नाहींत असें पाहून त्यानें सक्तीचे उपाय योजिले. चिठ्या टाकून ज्यांचीं नांवें निघतील ते लढाईवर जाण्यास नाकबूल असल्यास त्यांचे नागरिकत्वाचे हक्क काढून घेऊन त्यांची जिनगी जप्त करण्याचा त्यानें धाक घातला. तेवढ्यानेंही काम भागेना, तेव्हां 'घर शिपाई कीं दे फांशीं' असा तडाखा त्यानें सुरूं केला तेव्हां सैनिक लोक ताळ्यावर आले. त्यांतच जुनेपुराणे बैठे पगारी शिपाई आणि दास्यमुक्त झालेले गुलाम यांची भर घालून कसेंबसें एकदाचें सैन्य उभारलें. त्यावर आपला दत्तक पुत्र 'टायबेरियस' याची योजना करून त्याची जर्मनीकडे रवानगी करून दिली. टायबेरियसनें धूर्ततेनें व दक्षतेनें सैन्याची खराबी होऊं न देतां जर्मन मुलुखांतून एक चक्कर घेतलें, आणि रोमन सैन्यास अडविण्यास कोणी धजला नाहीं, एवढ्यावरच व्हॅरसच्या पराजयाबद्दल सूड उगविला व रोमचा दबदबा पूर्वीप्रमाणें प्रस्थापित झाला अशी त्यानें आपल्या मनाची समजूत करून घेतली.

जर्मन राष्ट्रास जो हा जय मिळाला त्यानें त्याचें स्वातंत्र्य परत मिळालें. तेवढ्यावरच संतुष्ट राहून ते अधिक आशेला गुंतले नाहींत; पण एका विन्फील्डच्या जयानें ट्यूटॉनिक शाखेचें स्वातंत्र्य बिनदिक्कत शाबीत झालें. टायबेरियसच्या सैन्यानें आपलें अस्तित्व व स्वामित्व दर्शविण्याकरितां जर्मन प्रदेशांत एकवार रोमचें गरुडचिन्हांकित निशाण फडकाविलें. पण जर्मनींत कायमचें लष्करी ठाणें देऊन तेथें आपला अम्मल गाजविण्याचा प्रयत्न आगस्टसनें किंवा त्याच्या वंशजांपैकीं कोणीही केला नाहीं. आर्मिनियसनें रोमला जी अद्दल घडविली तिचें विस्मरण त्यास कधींच झालें नाहीं. आपली भीति झाकण्याकरितां यापुढें रोमन बादशहांनीं नेमस्तपणाचें ढोंग केलें. यावेळीं व्हाईन नदी हीच रोमन व जर्मन राष्ट्राची हद्द ठरली. ही व्यवस्था चार शतकें अबाधित चालली. पुढें पांचव्या शतकांत जर्मन लोकांनीं आपली तटस्थ वृत्ति सोडून देऊन रोमन साम्राज्यावर घाव घालून त्याचीं शकलें करण्यास सुरवात केली. या एकेक शकलाचें एकेक स्वतंत्र राज्य बनलें. हल्लीं युरोपखंडांत जीं वेगवेगळीं राष्ट्रें आहेत त्यांतील बहुतेकांची स्थापना या वेळींच झाली. याप्रमाणें युरोपच्या अर्वाचीन इतिहासास जें वळण लागलें त्याचें स्वरूप ट्यूटॉनिक जातीच्या विजयानें सामान्यत्वेंकरून ठरून गेलें. परंतु या विजयास प्रारंभ विन्फील्डच्या लढाईनें झाला. याच कारणास्तव त्या लढाईस क्रांतिकारक लढाई ह्मणण्यास प्रत्यवाय नाहीं.

जगांतील क्रांतिकारक लढाया.

भाग ६ वा.

'चॅलान्सची लढाई.' इ. स. ४५१.

फ्रान्स देशाच्या ईशान्य कोनांत चॅलान्स नांवाचें एक गांव आहे. त्या गांवाच्या आजूबाजूस एक अफाट मैदान आहे. ह्या मैदानांतून मॉर्न नदी वळणावळणानें वहात जाते. त्या नदीच्या तीरावर पॉप्लर झाडें आहेत. कोठें कोठें एकादें खेडेंही त्या नदीच्या कांठीं दृष्टीस पडतें. याखेरीज दुसऱ्या कशानेंही त्या अफाट मैदानाची एकतानता भंग पावली नाहीं. परंतु चॅलान्सपासून पांच मैलांवर चेप व कूपर्ली नांवाचीं दोन खेडीं आहेत, त्यांचे आजूबाजूस जमीन उंचसखल झाली आहे. कित्येक ठिकाणीं ती खोदून खंदक केले आहेत तर दुसऱ्या कांहीं ठिकाणीं भर टाकून मोर्चेबंदीसारखे ढीग रचले आहेत. या सर्व लक्षणांवरून हल्लीं दिसत असलेला समविषमपणा नैसर्गिक नसून मनुष्यकृत असावा असें साहजिकच वाटतें. लष्करी दृष्टीला तर कित्येक शतकांपूर्वी तेथें एकाद्या प्रचंड सैन्याची विस्तीर्ण छावणी असावी असा तर्क होता.

प्रचलित दंतकथा तर अशी आहे कीं, प्रख्यात हूणयोद्धा जो ॲटिला त्याचे फौजेनें येथें तळ दिला होता. ही दंतकथा अविश्वसनीय मानण्यास कांहीं कारण दिसत नाहीं. इ. स. ४५१ वे वर्षी याच समरभूमीवर ॲटिलानें रोमन सेनापति एटियस आणि गॉथ

लोकांचा राजा थिओडोसियस यांशीं लढाई दिली. त्या लढाईंत त्यास यश आलें नाहीं, तेव्हां याच छावणीच्या मोर्चेबंदीचे आश्रयानें शत्रूच्या छाप्याची मार्गप्रतीक्षा करीत त्यानें रात्र काढिली. रणांगणांत विजयी झालेल्या रोमन व गॉथिक वीरांस त्याच्या छावणीवर चालून जाण्याचें धैर्य झालें नाहीं. शत्रू आपल्या तळावर अचानक चालून आल्यास त्यांचे हातीं आपली संपत्ति व आपण जीवंतपणीं लागूं नये, अशा इराद्यानें आपल्या सर्व संपत्तीची व बहुमूल्य वस्तूंची रास करून शत्रू जवळ येतांच ती पेटवून देण्याची तयारी करून त्यावर ॲटिला बसला होता असें सांगतात.

आपल्या गॉथिक साथिदारांचे मदतीनें रोमनें हूण लोकांवर हा जो जय मिळविला तो पश्चिम रामने साम्राज्याचा शेवटचाच विजय होय. परंतु या विजयाइतका मानवजातीस कल्याणकारक असा जय रोमला दुसरा क्वचितच प्राप्त झाला असेल. चॅलान्स येथें मिळालेल्या यशानें रोमन-साम्राज्य विस्तार पावलें नाहीं अगर अधिक मजबूत झालें नाहीं, किंबहुना त्याचा अंतकाळ यत्किंचित्ही दुरावला नाहीं. एतावता रोमला व्यक्तिशः या जयापासून लभ्यांश थोडाच प्राप्त झाला. परंतु त्यायोगानें युरोपच्या सुधारणेच्या प्रश्नाचा निकाल लागला. रोमची आतां अवतारसमाप्तीचीच वेळ आली होती. भूमध्य समुद्राच्या भोंवतीं जीं पृथक् पृथक् लहानसहान संस्थानें होतीं तीं एकवटून रोमनें तेथें एक भाषा, एक राज्यपद्धति व समान कायदे चालू केले. ग्रसिची जी संस्कृति रोमनें आपलीशी केली होती तिचा फैलाव सर्व रोमन राज्यांत झाला. रोमच्या ताब्यांतील एका मुलखांत ख्रिस्ती धर्माचा उद्भव होऊन त्याचा प्रसारही सर्व साम्राज्यभर झाला होता. एवंच रोमनें आपलें अवतारकृत्य संपवून टाकिलें होतें. मानवजातीचें याहून अधिक हित साधण्याची शक्ति आतां रोमन लोकांत उरली नव्हती. त्यामुळें रोमन साम्राज्याचा ऱ्हास झाल्यास त्यांत

जगाचें कांहीं नुकसान होण्याजोगें नव्हतें; परंतु रोमच्या सत्तेचा लोप झाल्यास ती जागा दुसऱ्या कोणी पटकावावी हा प्रश्न अत्यंत महत्त्वाचा होता. जर्मनींतील स्वतंत्र ख्रिस्ती लोकांनीं रोमचे लचके तोडून तेथें आपापलीं स्वतंत्र राज्यें स्थापावीं, अगर मध्य एशियांतील रानटी व मूर्तिपूजक लोकांनीं युरोपखंडांत नुकत्याच वाढीस लागलेल्या स्वतंत्र संस्था, राज्यपद्धति, धर्म आणि ग्रीक सुधारणा यांचा नायनाट करून तेथें आपली झोटिंगपाच्छाई गाजवावी हा प्रश्न होता. त्या प्रश्नाचा निर्णय चॅलान्सच्या लढाईत ठरला. जर्मनींतील व्हिजिगॉथसनीं रोमन सैन्यास कुमक करून आपल्या धर्माचा व सुधारलेल्या संस्थांचा बचाव केला आणि युरोपखंडास हूण लोकांचे तावडींतून सोडविलें.

या लढाईनंतर रोमन साम्राज्याचा शेवट थोडक्याच कालानें झाला. जर्मन लोकांना आपला पगडा सर्व युरोपभर बसविण्यास त्यायोगानें अवकाश मिळाला. याप्रमाणें जर्मन अगर ट्यूटॉनिक शाखेचें यूरोपखंडांत यापुढें प्राबल्य वाढत गेलें. जर्मन शाखेंत गॉथ्स व स्कँडिनेव्हियन्स यांचाही समावेश होतो. युरोपखंडाचा पश्चिमार्ध ह्मणजे उत्तरेस बोथ्नियाच्या उपसागरापासून ते दक्षिणेस सिसिली बेटापर्यंत व पूर्वेस ओडर नदी आणि ॲड्रिआटिक समुद्रापासून ते पश्चिमेस लिस्बनशहरापर्यंतच्या भागांत जे रहिवासी आहेत ते जर्मन रक्ताचे होत. या सर्व प्रदेशांतील लोक जर्मन भाषा बोलत नाहींत हें खरें; तथापि फ्रान्स, इताली व स्पेन देशांतील भाषांत जर्मन भाषेचा बराच अंश आहे, व तेथील संस्था जर्मनबीजापासून उद्भवल्या आहेत हें नाकारतां येणार नाहीं. खुद्द जर्मनी, हॉलंड, अर्धाअधिक स्वित्झर्लंड, डेन्मार्क, नॉर्वे, स्वीडन, इंग्लंड, स्कॉटलंड, आयर्लंड हा सर्व मुलूख जर्मनमय आहे. पोर्तुगीज व स्पॅनिश लोकांनीं दक्षिण अमेरिका व इंग्लिशांनीं उत्तर अमे-

रिका व आस्ट्रेलिया हे देश व्यापले आहेत. आफ्रिका व एशियाखंडांतही ट्यूटॉनिक जातीचा प्रसार होत आहे. सारांश अर्धाअधिक युरोप, संपूर्ण अमेरिका व आस्ट्रेलिया एवढ्या प्रदेशांत जी वस्ती आहे ती सर्व मूळ जर्मनींतील होय. इ. स. च्या पांचव्या शतकाच्या मध्याचे सुमारास जर्मन लोकांनीं रोमन साम्राज्यांतील बरेच सुपीक पण रोमपासून दूर अंतरावरचे असे प्रांत बळकाविले होते. व्हिजिगॉथ्सनीं लॉयर नदीच दक्षिणेस फ्रान्स व उत्तरस्पेनमध्यें आपलें ठाणें दिलें. फ्रँक्स, अलेमन्नि, बर्गंडियन्स, ॲलन्स इत्यादि उपजातींनीं फ्रान्समध्यें वसाहत केली. स्वेव्हि लोकांनीं दक्षिणस्पेन आक्रमिलें. व्हॅंडाल्सचा एक सेनानायक उत्तरआफ्रिकेंत राज्य स्थापीत होता. आस्ट्रोगॉथ्सनीं इतालीच्या उत्तरेकडील सर्व भाग आपले अमलाखालीं दडपला होता. याप्रमाणें विन्फील्डच्या लढाईनंतर थोड्याच अवधींत जर्मन लोकांनीं आपलें वर्चस्व बरेंच प्रस्थापिलें. आतां चॅलान्सच्या लढाईत त्यांचा पराजय झाला असता तर हीं सर्व राज्यें हूण लोकांच्या दास्यांत सांपडलीं असतीं, व त्यांचें सर्व महत्त्व लुप्तप्राय झालें असतें, आणि त्यांचा विस्तार तेथेंच खुंटला असता; पण चॅलान्स येथील जयानें हा प्रसंग टळला व वर निर्दिष्ट केल्याप्रमाणें आफ्रिका, एशिया, युरोप व अमेरिका या चारी खंडांत आपला दिग्विजय गाजविण्यास ट्यूटॉनिक जातीस संधि सांपडली.

आतां आपण हूण लोकांच्या पूर्वेतिहासाकडे वळूं. मध्य एशियांतील उंचसपाट भूप्रदेश हा त्यांचें मूळ वसतिस्थान होय. तेथून त्यांनीं चोहोंकडे हातपाय पसरण्यास सुरवात केली. प्रथम त्यांची नजर चीन देशाकडे गेली; परंतु मध्यएशियांतील सीनपी नामक दुसऱ्या एका भुरट्या जातीनें त्यांचा पराजय करून त्यास चीनमधून हांकून लाविलें तेव्हां त्यांची धाड पश्चिमेकडे वळली. प्रत्येक नवीन टोळीनें आपल्या

पुढच्या टोळीस ढकलावें व आपण ती जागा पटकवावी. असा खो-खोचा डाव काळ्या समुद्रापासून उत्तर इतालीपर्यंत चालू झाला. इ. स. ३७७ वे वर्षी त्यांनीं प्रथम युरोपखंडांत प्रवेश केला व डॅन्यूब नदीच्या तीरावर वसाहत करून राहिलेल्या ॲलडन्स, ऑस्ट्रोगॉथस वगैरे जातींचा प्रथम पाडाव केला. रोमन सैन्यानें त्यांच्या गतीचा अवरोध करण्याचे प्रयत्न केले; पण त्यांचा हूण लोकांपुढें टिकाव लागेना. त्यानंतर थोड्याच कालांत डॅन्यूब नदीच्या दक्षिण तीरावरील पॅनोनिया वगैरे प्रांतास हूण घोडेस्वारांच्या बलाचा उपसर्ग पोहोंचूं लागला. हूण लोकांची भयानक आकृति, असंख्यात जमाव, विद्युत्प्राय वेग, व समरभूमीवरील अचाट शौर्य यापुढें स्वैण रोमन व ग्रीक लोकांनीं आपल्या माना लवविल्या यांत कांहींच आश्चर्य नाहीं. कारण धाडसी व कंटक जर्मन आणि स्कँडिनेव्हियन योद्धेही त्यांस पाहून गर्भगळित होत. हे हूण लोक मानवकोटींतील नसून, वेताळ, राक्षस अगर समंध असावेत अशीही कित्येकांची त्यावेळीं समजूत होती.

अशा प्रकारच्या हूण लोकांच्या वावटळीपुढें शहरानशहर आणि प्रत्येक जात नमूं लागली. पुढें कांहीं काळपर्यंत आपापसांतील यादवीमुळें युरोपचा नैऋत्यभाग जिंकण्याचा राहिला. परंतु ॲटझेल अगर ॲटिला हा त्यांचा बादशहा झाला तेव्हांपासून त्याच्या एकछत्री अमलाखालीं सर्व हूण लोक एकवटून, ॲटिलाच्या बुद्धिसामर्थ्यानें व प्रभावानें युरोपच्या सर्व नव्याजुन्या राज्यांचा ते चुराडा करीत चालले.

ॲटिलाची पराक्रमाविषयीं जी ख्याति आहे तींत पक्षपातिपणाचा अंश बिलकुल नाहीं. कारण त्याच्या स्तुतिपर जे कांहीं लेख आहेत ते सर्व त्याच्या शत्रूंच्या हातचेच आहेत. त्यावरून ॲटिलाची सत्ता किती विस्तृत प्रदेशावर व कशी अप्रतिहत होती याची चांगली कल्पना

होते. बायझँशियन, लॅटिन, गॉथिक जर्मन, व स्कँडिनेव्हिअन इतक्या भिन्न भिन्न भाषांत त्यांच्या राज्यविस्ताराचा इतिहास आहे, आणि त्याजवर कवनें रचिलीं गेलीं आहेत. त्यांतील वर्णन अतिशयोक्तिपर असणारच. पण त्याचे शत्रू जे जर्मन व स्कँडिनेव्हियन्स ह्यांनीं तीं काव्यें लिहिलीं व राखून ठेविलीं ह्या गोष्टीवरूनच त्या लोकांस ॲटिलाचा धाक किती वाटत होता याची खात्रीलायक अटकळ बांधता येते. नार्वे व आइसलंड प्रांतांतही ॲटिलाविषयीं दंतकथा प्रचलित आहेत. जर्मन भाषेंतील एका अति प्राचीन काव्यांत ॲटिलाचा उल्लेख असून त्यांत त्यानें एकंदर बारा साम्राज्यें पादाक्रांत केलीं व आपल्या पट्टराणीला स्त्रीधन ह्मणून तीस राज्यें देऊन टाकिलीं अशा मासल्याचें वर्णन आहे.

काव्यांतील अलंकारिक वर्णनें बाजूस ठेवून आपण विश्वसनीय इतिहासाचें पर्यालोचन करू लागलों तर त्यावरूनही ॲटिला हा कांहीं 'जेंगिझखाना' प्रमाणें केवळ क्रूर राक्षस नव्हता असें दिसून येतें. त्याचें युद्धकौशल्य, प्रसंगावधान, मित्रावर वचक आणि शत्रूवर धाक हीं सर्व त्याच्या सतत जयाचीं कारणें होत; न ह्मून केवळ पशुतुल्य रानदांडगेपणानें कांहीं त्याचें साम्राज्य इतकें विस्तार पावलें नसतें. त्याचें खासगी वर्तन अगदीं चोख शुद्ध होतें. न्यायाचे कामांत तो अति कडक होता. अंगबळ, कंटकपणा, मर्दानी खेळांत प्रवीणता या गुणांनीं तो आपल्या सर्व शूर सैनिकांत अग्रगण्य होता. कोणतेंही कार्य हातीं घेण्यापूर्वी तो दूरवर विचार करी; पण एकदां एक ठाम निश्चय ठरला ह्मणजे मग तो बजाविण्यांत क्षणाचा विलंब करावयाचा नाहीं, किंवा संकटास जुमानावयाचें नाहीं, असा तो दृढनिश्चयी होता. त्यामुळेंच त्याच्या अफाट राज्यांत सर्वत्र शांतता व निर्भयता नांदत होती. त्याच्या सत्ते-

विरुद्ध धडपड करणाराची त्याजपुढें बिलकुल मात्रा चालत नसे. जिंकलेल्या व जिंकावयाच्या सर्व देशांतील रहिवाशांचे मनोविकार, आवडनिवड, समजूती, धर्म व चालीरीति या सर्वांचें सूक्ष्मावलोकन करून त्याचा आपल्या कार्यात उपयोग करून घेण्यांत त्याचा हातखंडा असे. देवतांची त्याजवर पूर्ण कृपा आहे अशा समजुतीनें त्याचे सैनिक त्याजकरतां प्राण देण्यास तयार असत. त्याच्या शत्रूस वाटे कीं ईश्वराचा आपल्यावर कोप होऊन आपला नाश करण्यास त्यानें हा काळच उत्पन्न केला आहे. या समजुतीनें ॲटिलाचें नांव ऐकतांच त्यांचे अंगांत कापरें भरे.

ॲटिलाच्या कारकीर्दीच्या आरंभीं एका मोहिमेवर गेल्यावेळीं एका गवळ्यानें त्याला एक तलवार नजर केली. आपलें चुकलेलें वासरूं रानांत शोधीत असतां त्यास ती आकाशांतून खालीं गळल्याप्रमाणें जमिनींत टोंक रुतून बसलेली सांपडली होती. सीथियन लोक युद्धदेवता ह्मणून एका तलवारीची पूजाअर्चा करीत असत. ती देवता अलीकडे गुप्त झाल्याचा बोभाट होता. गवळ्यानें हातीं दिलेली तलवार पहातांच ॲटिलानें चोहोंकडे पुकारा केला कीं सीथियन लोकांची गुप्त झालेली तलवार ईश्वरानें कृपाळू होऊन आपणास दिली. त्यावेळेपासून त्याचे अनुयायी त्यास अजिंक्य मानूं लागले. ॲटिला हा आपण एंगॅडी येथें जन्मल्याचें सांगत असे. कारण बायबलांतील 'भविष्यकथनाध्यायांत' असें एक भविष्य आहे कीं, 'एंगडी येथील रानांत एका स्त्रीला सूर्यापासून पुत्र होईल. तो सप्तशृंग व दशशृंग अशा राक्षसांशीं लढून विजय संपादन करील; आणि आपल्या तलवारीच्या बलावर सर्व जगावर राज्य करील.' सप्तशृंगी राक्षस याचा अर्थ सप्त टेकड्यांवर वसलेलें रोम शहर होय. तेव्हां रोमन साम्राज्य पालथें घालून हूण लोकांचा अम्मल स्थापण्याकरितां आपला अवतार असें भोळ्या

लोकांस भासविण्याकरितां त्यानें एंगॅडी येथें जन्मल्याची उगाच आवाई उठविली होती.

ॲटिला हा आपणांस हूण, मीड्स, गॉथ्स व डेन्स यांचा बादशहा म्हणवीत असे. हूण व गॉथ्स यांजवर त्याचा अम्मल प्रत्यक्ष होताच. मीड्स लोकांच्या इराणांतील सत्तेवर त्याचा डोळा होता. इराणच्या उत्तर सरहद्दीवर त्याच्या सैन्याची नेहमीं कटकट चालू असे व तेथील संस्थानिकांकडून तो खंडणीही घेत असे. याप्रमाणें पूर्वेकडे त्याची हद्द इराण देशापर्यंत व पश्चिमेस डेन्मार्कपर्यंत होती. कॉकेसस पर्वताच्या पश्चिमेस व डॅन्यूबनदी आणि काळा समुद्र यांच्या उत्तरेस त्याच्या साम्राज्याची हद्द कोठवर होती याची नक्की माहिती मिळत नाहीं. परंतु हूण, गॉथ्स, ट्यूटॉन्स, स्लॅव्ह व फिन्स इतक्या भिन्न जातींचा त्याच्या राज्यांत समावेश होता. डॅन्यूबनदीच्या दक्षिणेस साव नदीपासून थ्रेस प्रांतांतील नोव्ही नदीपावेतों सर्व प्रदेश त्याचे ताब्यांत होता.

इ. स. ४४५चे सुमारास हूण साम्राज्याचा विस्तार वर नमूद केल्याप्रमाणें असून त्यावर ॲटिला व त्याचा बंधु हे दोघे राज्य करीत होते. परंतु त्याच सालीं ॲटिलानें आपल्या भावाचा खून करून सर्व सत्ता आपणच बळकाविली. हा खून करण्यांत केवळ बंधुद्वेष किंवा सत्तेची अनावर इच्छा हेंच कारण नसून दुसरा कांहीं गूढ हेतु होता. रोमन लोकांत त्या वेळीं अशी एक दंतकथा प्रचलित होती कीं, रोम्युलसनें रोम शहराची स्थापना केली त्यावेळीं तेथें बारा गृध्रपक्षी प्रगट झाले. त्यावरून रोमन साम्राज्य बारा शतकें टिकणार अशी ठाम समजूत होऊन गेली होती. तसेंच रोम्युलसनें त्या शहराचा पाया घातला त्यावेळीं त्याचे हातून त्याचा बंधु रेमस याचा वध झाला होता. तो आकस्मिक रीतीनें

चुकून झाला असें मानणारे कित्येक होते. परंतु पुष्कळांची अशी समजूत होती कीं, रोम्युलसनें आपल्या भावाचा बळी देऊन देवता संतुष्ट केल्या आणि रोमचें राज्य बाराशें वर्षें टिकावें असा त्यांच्याकडून वर मिळविला. अशा प्रकारें रोमशहर वसाविल्यास यावेळीं बाराशें वर्षें भरत आलीं होतीं. त्यामुळें रोमची आतां इतिश्री होणार व ज्यानें रोम्युलसप्रमाणें आपल्या भावाचा बळी दिला असेल तोच रोमचा विध्वंस करणार अशी सर्वत्र समजूत झाली होती; त्या समजुतीस अनुसरून ॲटिलानें आपल्या बंधूचा वध केला असावा असा कित्येकांचा तर्क होता.

कॉन्स्टंटिनोपलचा बादशहा धाकटा थिओडोसियस यानें आपला खून करविण्याचा प्रयत्न केला असा संशय आल्यावरून इ. स. ४४९त ॲटिलानें कॉन्स्टंटिनोपलला वेढा दिला. त्याच वेळीं काळ्या समुद्राच्या उत्तरेकडील मुलुखांत बंड उद्भवलें असल्यानें ॲटिलाचें लक्ष्य तिकडे गुंतल्यामुळें रोमकडे लक्ष्य देण्याला त्याला सवड झाली नाहीं. परंतु इ. स. ४९०त त्या बंडाचा बीमोड करून थिओडोसियसची चांगली खोड जिरवून आणि कॉन्स्टंटिनोपलच्या राज्यापैकीं कांहीं चांगला सुपीक प्रदेश उध्वस्त करून त्यानें आपला मोर्चा पश्चिम युरोपकडे वळविला. व्हिजिगॉथ्स लोकांचा राजा थिओडोरिक याला रोमकडून फोडून आपल्याकडे वळविण्याचा त्यानें सामदामादि प्रकारें प्रयत्न केला. परंतु तो निष्फळ झाल्यानें चतुर्थोपायाचें अवलंबन करावें व थिओडोरिकचा प्रथम समाचार घेऊन नंतर पश्चिम युरोपियन रोमन साम्राज्यास हात घालावा असा त्यानें निश्चय केला.

रोमन साम्राज्यांतील पश्चिमार्धाचा बादशहा ३ रा व्हॅलेंटाईन याची बहीण आनोरिया हिनें ॲटिलाकडे प्रणयपत्रिका पाठविली; आणि आपलें पाणिग्रहण करून आपल्या हिश्शाचा रोमन राज्याचा भाग

स्वीकारावा अशी त्यास विनंति केली. ही हकीकत रोमन नागरिकांस कळली, तेव्हां संतापानें त्यांनीं तीस बंदींत टाकलें. ही वार्ता ॲटिलाला कळतांच त्यास आयतेंच लढाईचें सयुक्तिक व भलाईचें कारण सांपडलें. स्वयंवरास तयार झालेली आपली वधू आनोरिया इजला तिच्या दुष्ट बंधूच्या कचाटींतून सोडविण्याच्या निमित्तानें त्यानें लढाईची तयारी चालविली. हूणिश बादशहावर आनोरियाचें मन बसण्यास दुष्ट महत्त्वाकांक्षा व बंधुद्वेष हींच कारणीभूत झालीं असलीं पाहिजेत. कारण ॲटिलाचें स्वरूप म्हणजे कुरूपतेची कमालच होती, व ती गोष्ट रोममध्यें सर्वश्रुत असल्यानें आनोरियाच्या कानीं आलीच असली पाहिजे.

र्‍हाइन नदीच्या मुखाजवळील प्रदेशांत फ्रँक लोकांच्या कांहीं वसाहती होत्या. त्यांतील दोघा सरदारांचा आपापसांत कांहीं कलह होऊन एकानें रोमची मदत मागितली. तेव्हां अर्थातच दुसऱ्यानें ॲटिलाकडे धांव घेतली व त्यास आपल्या मदतीला येण्या विषयीं विनविलें. ॲटिला तरी, असल्या सुसंधीची वाटच पहात होता. तो कां ती व्यर्थ दवडणार ? त्यानें लगेच आपला मोर्चा गॉलकडे वळविला. र्‍हाइन नदी उतरण्यास त्यास अडथळा होण्याची आतां भीति राहिली नाहीं; आणि गॉलमध्यें गेल्यावरही मदत करणारा दोस्त त्याला मिळाला. तेव्हां हंगेरींतून निघून गॉलवर मोहिम करण्यास त्यानें उत्तरेकडचा मार्ग धरिला. याप्रमाणें गॉलदेशाकडे ढाला फिरतांच त्याच्या निशाणाखालीं जिंकलेल्या सर्व मुलुखांतून सैनिक जमा होऊं लागले. जुन्या बखरकारांनीं त्याचे सैन्याची शिरगणती सात लाखपावतों दिली आहे आणि त्यांत फारशी अतिशयोक्ति असेल असें वाटत नाहीं.

असा प्रचंड सेनासमुद्र घेऊन ॲटिला निघाला. त्यानें कॉब्लेंट्झ नामक गांवाजवळ र्‍हाइन नदी ओलांडली आणि तेथें त्यास प्रतिबंध

करावयास आलेल्या बर्गंडीच्या राजाचा त्यानें पराजय केला. नंतर आपल्या सैन्याचे दोन भाग करून एक तुकडी वायव्य दिशेनें टांग्रस, आरास इत्यादि शहरांकडे रवाना केली, आणि दुसरी आपल्या खास नजरेखालीं घेऊन मॉसेल नदीच्या तीरानें जाऊन बोसॅशन शहराचा त्यानें धुव्वा उडविला. मग बर्गंडी प्रांतांतील प्रमुख शहरें घेण्याचें खटपटीस तो लागला. याप्रमाणें पूर्वगॉल निर्वैर करून लॉयर नदीच्या पलीकडील पश्चिमगॉलवर त्यानें रोख धरिला. आर्लीन्स शहरासमीप लॉयर नदी उतरण्याचा त्याचा मानस होता. नकाशाकडे सहजीं नजर फेकल्यास कळून येईल कीं, ॲटिलाचे सर्व बेत शहाणपणाचे व पद्धतशीर होते. उत्तरेस जो फ्रँक सरदार त्याचा दोस्त बनला होता त्याच्या साहाय्यास सैन्याचा एक भाग त्यानें पाठविला. दुसरा भाग दक्षिणेस बर्गंडीयन लोकांस शह देण्याकरितां, त्यांची जूट झाल्यास फोडण्याकरितां आणि आल्प्स पर्वताचे घाट ताब्यांत ठेवण्याकरितां योजिला होता. इ. स. १८१४त युरोपियन राष्ट्रांनीं जुगून फ्रान्सवर जी चाल केली त्या वेळची त्यांची पद्धतिही अशीच होती. मात्र त्यांच्या मध्य सैन्याचा रोख पारीस राजधानीवर होता, आणि ॲटिलाचा कटाक्ष आर्लीन्स शहरावर होता.

इ. स. ४५१ त ॲटिलानें ऑर्लीन्स शहरास वेढा घातला. गॉलमध्यें प्रवेश करून पूर्वेकडील प्रांत तो हस्तगत करूं लागल्यापासून रोमन सेनापति एटियस यानें सैन्याची जमवाजमव चालविली. व्हिजिगॉथ लोकांचें त्यानें आपल्याकडे मन वळवून घेतलें व त्यांच्या साहाय्यानें ॲटिलाशीं टक्कर देण्याची त्यानें जारीनें खटपट सुरू केली. देशाभिमानानें, हौसेनें, लुटीच्या आशेनें किंवा बळजबरीनें जमतील तितके रोमन शिपाई त्यानें जमविले. रोमन पलटणी युद्धास तयार होतांच

त्यांच्या अनुकरणानें कांहीं रानटी लोकांच्या टोळ्याही त्यांच्या मदतीस आल्या. इकडे व्हिजिगॉथलोकांचा राजा थिओडोरिक यानेंही फौज उभारण्यास पराकाष्ठेचा प्रयत्न केला. आर्लीन्स शहरानें त्यावेळीं चांगला नेट धरला. रोमन सैन्यानें लॉयर नदीचे उतार हस्तगत करून तेथें नाकेबंदी केली. युक्तिप्रयुक्तीनें थिओडोरिक याचें सैन्य एटियसच्या सैन्यास लॉयर नदीच्या दक्षिण तीरावर येऊन मिळालें. याप्रमाणें प्रतिपक्षाचीं सैन्यें एकत्र झाल्याचें पाहतांच ॲटिलानें आर्लीन्सच्या वेढ्याचा नाद सोडला व तो मॉर्न्स नदीकडे परतला. कारण त्याच्या सर्व फौजेपैकीं केवळ तिसरा हिस्सा फौज त्याचे हाताखालीं होती. तेवढ्या सैन्याचे जोरावर सर्व रोमन सैन्याशीं लढाई देण्याचें धाडस त्यानें केलें नाहीं. आपल्या दोहों बाजूंच्या सैन्याच्या तुकड्या त्यानें बोलावल्या व त्या येऊन दाखल होतांच मॉर्न्स नदीनजीक चॅलान्स गांवाजवळच्या विस्तीर्ण मैदानांत त्यानें तळ दिला. ही जागा त्यास सर्व तऱ्हेनें सोईची होती. त्याच्या सैन्यांत घोडेस्वारांचा भरणा विशेष होता. त्यांच्या हालचालीस तें सपाट मैदान फार अनुकूल होतें.

चॅलान्सच्या अफाट व सपाट समरभूमीवर रोमन्स व व्हिजिगॉथ्स यांची त्यांच्या प्रतिपक्षांशीं गांठ पडली. रोमन सैन्याची उजवी बाजू एटियसच्या हाताखालीं होती. डावीकडे थिओडोरिक हा स्वसैन्याच्या अग्रभागीं होता. ॲलेन्सचा राजा संगिपन याच्या विश्वासुपणाबद्दल शंका होती म्हणून त्याची योजना मध्यभागीं लढाईचे तोंडावर केली होती. हूणिश फौजेचा मध्यभाग खुद्द ॲटिलाचे देखरेखीखालीं होता. त्या ठिकाणीं त्यानें आपलीं खास पलटणें उभीं केलीं होतीं. ऑस्ट्रोगॉथ्स, जेमिडि वगैरे अंकित राष्ट्रांचीं सैन्यें डाव्या उजव्या बाजूस होतीं.

लढाईचे प्रारंभीं कांहीं हालचाली झाल्या त्यांत एटिअसनें एक उंचवट्याची जागा पटकाविली. तेथून हूण सैन्याचे डावेबाजूवर चांगला

मारा करितां येण्याजोगा होता. एटियसचा हा पेंच ॲटिलाचे लक्षांत येऊन आपल्या मध्यभागचें कांहीं सैन्य डाव्या बाजूच्या सैन्याच्या कुमकेस पाठवून एटियसवरच पहिला कचक्याचा हल्ला त्यानें करविला. रोमन सैन्य टेकाडावर असल्यानें त्यानें हूणिश लोकांच्या पहिल्या हल्ल्याचा प्रतिकार केला. याप्रमाणें इकडे एटियसची सरशी होऊं लागली तों तिकडे थिओडेरिकनें आपल्या प्रतिपक्षाच्या उजव्या बाजूवर हल्ला चढविला. जातीनिशीं थिओडेरिक हा आपल्या सैन्यास उत्तेजन देत होता. त्याच्या विरुद्ध बाजूचें सैन्य आस्ट्रोगॉथ्सचें होतें. याप्रमाणें व्हिजिगॉथ्स व आस्ट्रोगॉथ्स यांची खडाजंगी चालू असतां थिओडेरिकला बर्चीची जखम लागून तो घायाळ होऊन पडला. त्याला उचलून बाजूस नेण्याचीही त्या भाऊगर्दीत सवड झाली नाहीं, त्यामुळें घोड्यांच्या टापांखालीं सांपडून तो प्राणास मुकला. आपला राजा व सेनाग्रणी पडला म्हणून व्हिजिगॉथ्स कांहीं निराश झाले नाहींत. उलट त्यांस अधिक चेव येऊन त्या आवेशांत त्यांनीं शत्रूस चांगलाच हात दाखविला. आस्ट्रोगॉथ्सचा पराजय होऊन ते मागें हटूं लागले, तेव्हां व्हिजिगॉथ्सना पुढें चालून जाण्याला आयतीच संधि सांपडली. त्यावेळीं ज्या ठिकाणीं ॲटिला ॲलन्सशीं तुंबळ युद्ध करीत होता, त्याच्या मध्यभागाच्या बगलेवर त्यांनीं शिस्त धरिली. याप्रमाणें पुढून व उजव्या बाजूनें मारा होऊं लागतांच त्या कचाटींतून आपलें सैन्य पार करण्याकरितां त्यानें माघार घेतली. आपल्या फौजेची पिछेहाट करीत करीत तो आपल्या छावणीपर्यंत मागें सरला. तेथें त्याच्या सैन्यास छावणींतील मोर्चेबंदीचा व खटाऱ्यांचा आश्रय मिळतांच त्यानें शत्रूचा हल्ला परतविला आणि खुनशी गॉथिक स्वारांचा हूण लोकांनीं पुरा पराजय केला. इकडे प्रारंभींच एटियसला जय मिळाला होता;

पण तसेंच पुढें चालून जाऊन दुसऱ्या बाजूच्या सैनिकांना मदत करण्याची त्यांच्यांत ताकद उरली नव्हती. एकंदरींत सायंकाळचे सुमारास ॲटिलाच्या सैन्यापैकीं उजव्या बाजूचा फडशा पडला होता, मध्यसैन्यास मागें हटून तळावर जावें लागलें होतें; पण डावी बाजू शाबूद होती. समरांगणावर मुडद्यांचा नुसता खच पडून गेला होता. अशा स्थितींत काळोख पडल्यानें लढाईचें काम थंडावलें; तथापि फिरून रात्रीं अगर दुसऱ्या दिवशीं सकाळीं आपल्या छावणीवर हल्ला होईल असा ॲटिलास धाक पडला. त्याकरितां त्यानें सामानसुमानाच्या सर्व गाड्या व खटारे यांचा आपल्या छावणीभोंवतीं तट केला. इतक्यांतूनही शत्रु जर आपल्या अंगावर चालून आला व आपला पराजय होण्याचीं स्पष्ट चिन्हें दिसूं लागलीं तर आपण शत्रूचे हातीं जीवंत सापडूं नये किंवा आपली संपत्ति शत्रूचे हातीं पडूं नये ह्मणून छावणीचे मध्यभागीं त्यानें लाकडी खोगिरांची रास केली. त्यावर आजवर लूट करून मिळविलेली अगणित संपत्ति व आपल्या स्त्रिया त्यानें बसविल्या. निर्वाणीचा प्रसंग आलाच तर स्वतःसह त्या सर्वांची होळी करण्याची त्यानें तरतूद करून ठेविली.

प्रभात काल होऊन सूर्य प्रकाशूं लागला त्यावेळीं रोमन लोकांस आदल्या दिवसाच्या भयंकर संहाराचें पूर्ण स्वरूप कळून आलें. समरांगणांत जिकडे तिकडे प्रेतांचे ढीग पडले होते. आपल्या सैन्याची झालेली ही खराबी व शत्रूची लढण्याची व जोहाराची कडेकोट तयारी पाहून रोमन लोकांचें धैर्य खचलें. शत्रूच्या छावणीवर हल्ला करण्याचा विचार सोडून देऊन त्यांनीं आपलें सैन्य परतविलें. ॲटिलाच्या फौजेस गराडा देऊन त्याची रसद बंद केल्यास अन्नसामुग्रीचा तुटार पडून शत्रू शरण येण्याचा संभव होता; पण एवढ्या प्रचंड सैन्यास कोंडण्याला पुरेसें

सैन्य त्यांचेजवळ नसल्यानें तो विचारही त्यांस सुसाध्य वाटला नाहीं. तेव्हां रोमन सेनापतीनें पोक्त विचार करून इतर कोणत्याही मानगडींत न पडतां ॲटिलास मुकाट्यानें परत जाऊं दिलें. आपले शत्रूंचा लढाई करण्याचा मानस नाहीं असें पाहून ॲटिलानेंही आपला तळ हालविला, व जणूंकाय आपल्यासच जय मिळाला अशा डौलानें तो परत फिरला.

ॲटिलाला अशा रीतीनें परत जाऊं देण्यांत एटियसचा कांहीं कावा असावा असें वाटतें. आदल्या दिवशींच्या लढाईत व्हिजिगॉथ लोकांची सरशी झाली होती. आतां त्यांचा राजा युद्धांत पतन पावला होता हें खरें; तथापि त्याचा पुत्र थॉरिस्मंड यास त्यांनीं रणभूमीवरच राजा कबूल केलें होतें. व्हिजिगॉथ लोकांच्या साहाय्यानें आपल्या शत्रूचा बीं मोडकेला, तर हेच व्हिजिगॉथ्स आपणास डोईजड होतील, व हाच थॉरिस्मंड अलॅरिकप्रमाणें रोमवर चालून येईल अशी एटियसला भीति पडली असावी, आणि याच हेतूनें ॲटिलाचा कांटा त्यानें तसाच राहूं दिला असावा. ॲटिला निघून गेल्यावर एटियसनें आपला मित्र व सहाय्यकर्ता आणि पुढें मागें कदाचित बनणारा शत्रू थॉरिस्मंड यास चॅलान्सच्या रणभूमीवरूनच निरोप दिला.

ॲटिलानें यापुढें पश्चिम रोमनसाम्राज्यावर स्वाऱ्या करण्यास कमी केलें नाहीं. परंतु चॅलान्सच्या पराजयानें जी त्याची घडी बिघडली ती फिरून नीट बसली नाहीं. त्याच्या अजिंक्यत्वाची जादू नाहींशी झाली, त्यामुळें त्याच्या निशाणाखालीं पूर्वीप्रमाणें सैन्य जमा होईना; आणि युरोपियन राष्ट्रांस त्याचा धाक वाटेनासा झाला. पुढें दोन वर्षांनीं ॲटिला मरण पावला. त्याच्या मृत्युनंतर त्याच्या बुद्धिवैभवानें व अगाध कर्तृत्वशक्तीनें एकवटलेल्या अफाट हूणिश साम्राज्यांत ठिकठिकाणीं बंडें उद्भवलीं आणि जित लोकांचा स्वातंत्र्यार्थ प्रयत्न सुरू

झाला. चॅलान्सच्या लढाईपासून हूण लोकांचे शक्तीस उतरती कळा लागली. ॲटिलाचे मरणानें त्यांच्यांतील जोम नाहींसा झाला; व पुढें थोड्याच काळांत त्यांच्याविषयीं पूर्वी वाटत असलेला धाक नाहींसा होऊन युरोपियन राष्ट्रांनीं त्यांची सत्ता झुगारून दिली. ॲटिलाची राजधानी हंगेरींत बुडापेस्थ येथें होती. तेवढा प्रदेश कांहीं कालपावेतों त्यांच्या ताब्यांत राहिला. परंतु इतर सर्व युरोपियन राष्ट्रांनीं त्यांची सत्ता झुगारून दिली व आपआपलीं स्वतंत्र राज्यें स्थापिलीं. याप्रमाणें चॅलान्स येथें हूण लोकांचा पराजय झाल्यानें युरोप खंडाचे नकाशाला हल्लींचें स्वरूप येण्यास प्रारंभ झाला, आणि ग्रीक व रोमन संस्कृति यांचा बचाव होऊन इतर देशांत त्यांचा फैलाव होण्याला संधि मिळाली.

जगांतील क्रांतिकारक लढाया.

भाग ७ वा.

'टूर्सची लढाई.' इ. स. ७३२.

फ्रान्स देशांत पॉइटूर्स व टूर्स या गांवांच्या दरम्यान एक विस्तृत सपाट मैदान आहे. त्या मैदानाचा बहुतेक भाग सुपीक असून कुरणांनीं आच्छादिलेला आहे. त्या कुरणांतून चेर, क्रूज, व्हिने, क्लेन, इंडर इत्यादि नद्या वहात जाऊन लॉयर नदीस मिळतात. कोठें कोठें या प्रदेशांत लहान लहान टेकड्याही आहेत, त्यामुळें त्या प्रदेशाची रमणीयता वाढली आहे. कोठें अरण्याचा अरुंद पट्टा, कोठें हिरवें चार कुरण तर कोठें द्राक्षांचे मळे असा भिन्नभिन्न देखावा असल्यानें सृष्टिसौंदर्यास वैचित्र्य येऊन प्रेक्षकांचें मन आल्हादित होतें. हा भूप्रदेश घोडेस्वारांच्या हालचालीस सोइस्कर असल्यानें येथें कितीतरी लढाया लढल्या गेल्या आहेत. परंतु इ. स. ७३२त या ठिकाणीं चार्ल्स मार्टेलनें सॅरेसन लोकांवर जो जय मिळविला आणि ज्यायोगें अरब लोकांच्या पश्चिम युरोपांतील प्रगतीस प्रतिबंध झाला त्या तोडीचा महत्त्वाचा जय कोणताच नसेल. महंमदी धर्मीयांच्या या पराभवानें ख्रिस्ती धर्म, ग्रीक व रोमन सुधारणांचा अवशिष्ट भाग आणि अर्वाचीन सुधारणेचे बीजांकुर या सर्वांचा बचाव झाला, आणि पूर्वापार चालू असलेल्या परंपरेप्रमाणें इंडो-युरोपियन शाखेचें सेमिटिक शाखेवर श्रेष्ठत्व कायम राहिलें.

अर्धचंद्र व क्रूस यांचा हा जो सामना झाला त्याच्या खऱ्या महत्त्वाची कल्पना फ्रेंच इतिहासकार सिस्मांडी व मिचेलेट यांस झाली नाहीं. तथापि फ्रेंच ग्रंथकारांनीं जरी आपल्या वीरांची हेळसांड केली तरी इंग्लिश आणि जर्मन इतिहासकारांनीं ती उणीव दूर केली आहे. गिबननें आपले इतिहासांत या लढाईचें सविस्तर वर्णन दिलें आहे. तसेंच या लढाईत अबदुल रहिमान यास जय मिळाला असता तर युरोपच्या इतिहासांत काय काय फरक घडून आले असते याचीही त्यानें चांगलीच चर्चा केली आहे. पोपांचा इतिहासकार रँके ह्मणतो "आठवे शतकाचा प्रारंभ हा जगाचे इतिहासांत अत्यंत महत्त्वाचा काळ आहे. इकडे महंमदी धर्म इताली व गॉल हे देश व्यापूं पहात होता. उत्तरेस मूर्तिपूजक लोक सॅक्सनी व फिन्सलंड येथें बळावून ऱ्हाईन नदी ओलांडून इताली देशावर स्वारी करण्याचे बेतांत होते. याप्रमाणें ख्रिस्तीधर्म कचाट्यांत सांपडला असतां चार्लस मार्टेल नामक एक तरुण जर्मन राजपुत्र पुढें सरसावला व त्यानें ख्रिस्ती धर्माची बाजू संभाळली. परधर्मीयांशीं टक्कर देऊन त्यांचा उच्छेद केला आणि ख्रिस्ती धर्माचा चोहोंकडे फिरून दबदबा पाडला." अर्नोल्डच्या मतें टूर्सच्या लढाईचें महत्त्व विन्फील्डच्या लढाईहून अधिक आहे. सारांश, या लढाईविषयीं जितका जितका अधिक विचार करावा तितकें तितकें त्या लढाईचें महत्त्व अधिक वाटतें.

या लढाईविषयीं यद्यपि भरपूर माहिती मिळत नाहीं, तथापि रोमन साम्राज्य रसातळास घालूं इच्छिणाऱ्या दोघा प्रतिस्पर्ध्यांचा हा सामना फार बहारीचा झाला असें उपलब्ध असलेल्या माहितीवरून मानण्यास हरकत नाहीं. आठव्या शतकाचे सुमारास रोमन साम्राज्य हें एक सर्व वीर्यवान् जातींच्या लोकांस आमिष झालें होतें. आमिषाभोवतीं

गिधाडें जमतात त्याप्रमाणें त्या साम्राज्यावर चोहोकडून शत्रूंची टोळधाड येऊं लागली. त्यांत उत्तरेकडून जर्मन्स व दक्षिणेकडून सॅरेसन्स हे विशेष प्रबळ प्रतिस्पर्धी होते. रोमन राज्याच्या लोभानें ते एकमेकांचे सहज शत्रू बनले. या प्रतिस्पर्ध्यांची गांठ टूर्स येथें पडली, आणि एकाच हत्तीणीकरितां झगडणारे मदोन्मत्त गज किंवा एकाच झऱ्यावर पाणी पिण्यास आलेले क्रूर व्याघ्र यांच्यामध्यें जसा घनघोर संग्राम व्हावा तसें तुंबळ रणकंदन या ठिकाणीं झालें. त्यांत सॅरेसन लोकांचा मोड झाला. विजयी जर्मन्सनीं रोमन साम्राज्य आक्रमिलें, व कालेंकरून पाश्चिम युरोपांतून महंमदानुयायांना हुसकावून लाविलें.

जर्मन लोकांच्या विजयी कारकीर्दीस प्रारंभ होऊन टूर्स लढाईच्या वेळीं तीनशें वर्षें झालीं होतीं. ऱ्हाईन नदी ओलांडून त्यांनीं जें एकदां पुढें पाऊल टाकिलें तें मागें ह्मणून घेतलें नाहीं. तथापि अरब लोकांशीं दोन हात करण्याचा प्रसंग आला त्या वेळपावेतों त्यांनीं कोठेंही आपलें भक्कम राज्य स्थापून एक भाषा, समान कायदेकानू व आचारविचार यांच्यायोगानें प्रजेंत एकीकरण केलें नव्हतें. गॉल देश फ्रँक लोकांचे ताब्यांत जाऊन अद्याप फ्रान्स हें नामाभिधान पावला नव्हता. पश्चिमयुरोपांतून रोमची सत्ता पांचवे शतकाचे अवलीस नामशेष होऊन त्या ठिकाणीं रानटी राज्यांची स्थापना झाली; परंतु तीं सर्वच डळमळीत. शाश्वतता कोणांतच नव्हती. एकाही संस्थानानें पुढाकार घेऊन इतर सर्वांचें आकलन करून एक भाषा व राज्यपद्धति यांचा सर्वत्र प्रसार करण्याचें काम केलें नाहीं. कारण हे जर्मन लोक त्यावेळपावेतों बहुतेक अडाणी व रानदांडगे होते. रोमन लोकांचे सहवासानें व अनुकरणानें ते नुकतें कोठें थोडे सुधारूं लागले होते. जर्मन लोकांनीं प्रचंड सैन्य जमा करून एकसमयावच्छेदेंकरून सर्व प्रांतांवर आपला

अम्मल बसविला नाहीं. लहानसहान टोळ्या करून येऊन वेगवेगळे प्रांत हस्तगत करून घेतले. कांहीं पुढारी जय संपादन करून लूट घेऊन परत गेले; पण बहुतेकांनीं जिंकलेल्या प्रांतांतच वसाहती केल्या. याप्रमाणें गॉलच्या सुपीक प्रदेशांत वसाहत केल्यापासून पूर्वीचा त्यांचा चंचल व रानदांडगा स्वभाव बदलून ते थोडथोडे निवळूं लागले. नाहीं तर ऱ्हाईन नदीच्या पूर्वतीरावर असेपर्यंत कोणाही शूर, धाडसी नायकाचे निशाणाखालीं जमावें व लुटालूट करीत सुटावें, हा त्यांचा व्यवसाय बनला होता. याच सुमारास त्यांनीं ख्रिस्तिधर्माचा स्वीकार केला व पूर्वीच्या धर्माबरोबरच रानटीपणा टाकून देऊन ते सुधारत चालले; तथापि गॉलमध्यें अद्याप शांतता नांदत नव्हती. ऱ्हाईन, मेन व वेसर या नद्यांच्या चिमट्यांतील प्रांतांतून आलेल्या फ्रँक नामक ट्यूटॉनिक पोटजातीचें प्राबल्य फ्रान्समध्यें स्थापित झालें होतें. तथापि राज्यपद्धति निश्चित झाली नसल्यानें राज्याच्या वारसदारीबद्दल व हिश्शाबद्दल देशांत तंटेबखेडे चालूच असत. शिवाय रोमन साम्राज्याचा एक तरी तुकडा आपणास मिळावा या हेतूनें धडपडत ऱ्हाईन नदी ओलांडून येणाऱ्या व अद्याप ख्रिस्तिधर्म न स्वीकारलेल्या ट्यूटॉनिक टोळ्यांशीं त्यांचे झगडे नेहमीं चालू असत.

जर्मन लोकांनीं उत्तरेकडून रोमन साम्राज्यास जो शह दिला त्याहून फारच अल्प काळांत सॅरेसन्सनीं दक्षिणेकडून त्यास गराडा घातला. त्यांनीं तडाक्यासरशीं प्रांतचेप्रांत काबीज केले व अवघ्या तीन वर्षांत सगळा स्पेनदेश व्यापून टाकला. त्या ठिकाणीं महंमदी समाजरचना एकदम व सरास चालू केली. टूर्सच्या लढाईचे वेळीं महंमद पैगंबर मृत्यु पावून केवळ एक शतक झालें होतें. एवढ्या अल्पावधींत मुसलमानांनीं रोमन साम्राज्याचा अर्धा हिस्सा आपल्या अमलाखालीं आणला.

त्याशिवाय पर्शिया देश पादाक्रांत केला तो वेगळाच. इ. स. ७३२ त सॅरेसन लोकांचे ताब्यांत पर्शिया, सीरिया, इजिप्त, बार्बरी, मोरोक्को, स्पेन इतके देश होते. इतक्या स्वाऱ्यांत त्यांनीं कोठेंच माघार घेतली नव्हती त्यामुळें ते अजिंक्य आहेत अशी समजूत होऊं लागली होती. महंमदी धर्मानुयायांत त्यावेळीं एकी असून सर्वांवर एका खलिपाची सत्ता अप्रतिहत चालत होती. आक्सस नदीपासून ते तहत पिरिनिज पर्वताच्या पश्चिम टोंकापावेतों यच्चयावत् मुलुखांत महंमदाच्या आज्ञा प्रमाण मानिल्या जात होत्या.

परंतु अरब लोकांची महत्त्वाकांक्षा त्यांच्या दिग्विजयाबरोबर वाढतच गेली. पिरिनीज पर्वत ओलांडून उत्तर यूरोप काबीज करण्याची त्यांस हांव सुटली. या कामाकरितां कसलेलें सैन्य व निष्णात सेनापति यांची योजना झाली. स्पेन देशांत सहज जय मिळत गेल्यानें मुसलमान शिपायांचे बाहु नवीन प्रांत जिंकून तेथील देवळें पाडून लूट गोळा करण्याविषयीं स्फुरण पावूं लागले. जय म्हणजे त्यांस हातचा मळ वाटत होता व गर्वानें त्यांस अस्मान ठेंगणें झालें होतें. अशा वेळीं इ. स. ७२९त अबदुल रहिमान बिन अबदुल्ला अल्घाफेकि याची खलिपनें स्पेनच्या सुभेदारीवर नेमणूक केली. तेव्हां तर मुसलमानी सैन्यास आनंदाच्या उकळ्या फुटूं लागल्या. कारण अबदुल रहिमान यानें आफ्रिका व स्पेन हे जिंकण्यांत आपलें शौर्य व युद्धनैपुण्य व्यक्त केलें होतें. अतुल भुजबल, युद्धाची तडफ, मनाचा दिलदारपणा इत्यादि गुणांनीं तो सैनिकांच्या नाकांतील केवळ बाल बनला होता. गॉलमध्यें त्यानें कांहीं किरकोळ मोहिमी केल्या होत्या. त्यामुळें फ्रँक लोकांचा स्वभाव, त्यांचे डावपेंच वगैरे सर्व त्याला परिपूर्ण अवगत झाले होते. शिवाय पिरिनीजच्या उत्तरेस कांहीं मुसलमानी टोळ्यांची गॉल लोकांनीं

कत्तल केली होती त्याजबद्दल सूड उगवणें हें आपलें कर्तव्य आहे असें त्यास अंतःकरणपूर्वक वाटत होतें व तें कर्तव्य केव्हां बजावीन अशी त्याला उत्कंठा लागून राहिली होती.

अबदुल रहिमान हा उत्तम सेनानायक असून पूर्ण न्यायी व सचोटीचा माणूस होता. स्पेनच्या सुभेदारीवर येऊन दाखल होतांच पूर्वीच्या कारकीर्दीतील सर्व अंदाधुंदी व गैरव्यवस्था मोडून टाकण्यांत पहिलीं दोन वर्षें त्यानें घालविलीं. गॉलच्या मोहिमेच्या तरतुदीसही त्यानें प्रारंभ केला. स्पेनमधील सैन्याचे मदतीस बर्बर घोडेस्वारांचीं पलटणें त्यानें आणविलीं. या घोडेस्वारांचे अधिकारी युद्धकुशल व अनुभवशीर अरब होते. याप्रमाणें सैन्याची जय्यत तयारी करून इ. स. ७३२च्या उन्हाळ्यांत ८० हजार सैन्यानिशीं पिरिनीज पर्वत ओलांडून त्यानें गॉल देशांत प्रवेश केला. ख्रिस्ती इतिहासकारांनीं मुसलमानी सैन्याची संख्या बरीच फुगवून ती कित्येक लाखांवर होती असें दर्शविलें आहे. अरब ग्रंथकारांनीं दिलेली उपरिनिर्दिष्ट संख्या कदाचित् कमी असण्याचा संभव आहे. तथापि ती सत्यास फारशी सोडून नाहीं असें वाटतें. असो.

ॲक्विटेनचा काउंट युडेस यानें या सैन्याचे टोळधाडीस प्रतिबंध करण्याचा प्रयत्न केला. परंतु त्या इस्लामी अजिंक्य सैन्यापुढें त्याच्या मूठभर शिपायांचा काय टिकाव लागणार? त्यांस शत्रूपुढें पलायन करणेंच भाग पडलें. याप्रमाणें शत्रूसैन्य धुडकावून देऊन मार्गांतील शहरें, कोट, किल्ले काबीज करीत ते सॅरेसन लोक पुढें चाललें. त्यांनीं अर्धाअधिक गॉल देश पादाक्रांत अगर उध्वस्त केला.

आठव्या शतकाचे प्रारंभापूर्वीच गॉलमधील मरोव्हिंजियन राजे दुर्बळ होऊन पदरच्या सरदारांचे हातांतील बाहुलीं बनले होते. अबदुल

रहिमानच्या स्वारीच्या वेळीं त्या मरोव्हिंजियन राजाच्या दरबारीं चार्ल्स मार्टेल नामक एक ड्यूक असून तो ऑस्ट्रेसिअन फ्रँक लोकांचा पुढारी होता. हे ऑस्ट्रेसियन लोक अस्सल जर्मन बीजाचे असून अति शूर होते. इ. स. ७३२च्या सुमारास हा चार्ल्स मार्टेल आपल्या नामधारी राजाच्या वतीनें इतर मांडलिक संस्थानिकांवर, कांहीं आर्जवानें तर कांहीं धाकदपटशानें, शक्य तितका अम्मल चालवीत होता. आपली सत्ता कायम राखण्यास्तव स्वतःचे प्रतिस्पर्ध्यांशीं व ऱ्हाइन नदीच्या पश्चिम तीरावर स्वारी करण्यास डोळ्यांत तेल घालून टपून बसलेल्या फ्रिजियन, बव्हेरियन, सॅक्सन, आणि थ्युरिंजियन लोकांशीं त्यास सतत झगडावें लागत असल्यानें चार्ल्स मार्टेलच्या नैसर्गिक कुशाग्र बुद्धीस अनुभवाची जोड मिळून तो अद्वितीय योद्धा बनला होता. त्यानें फ्रँक लोकांची मोठी सेना जमवून ती युद्धाचे कामीं तरबेज केली होती. तथापि सॅरेसन लोकांशीं टक्कर देण्यास त्याची तयारी पुरेशी नव्हती. अशा कचचा तयारीनिशीं ठाण मांडून लढाई देणें व त्या लढाईच्या जयापजयावर सर्व फ्रान्स देशाचें जीवित्व अवलंबून ठेवणें हें फार धाडसाचें काम होय. टूर्सच्या लढाईत अखेरीस चार्ल्सला विजयप्राप्ति झाली त्यामुळें त्याच्या कर्तृत्वास दिपून जाऊन त्याच्या चुकांकडे आपण दुर्लक्ष्य करितों असें हॅलेमचें मत आहे. परंतु या आक्षेपकानें हेंही लक्षांत बागविलें पाहिजे होतें कीं, चार्लस मार्टेलजवळ खडी फौज अशी थोडी होती. त्याच्या सैन्यांत बहुतेक सर्व भरणा स्वयंसेवकांचा किंवा शिलेदारांचा होता. चार्ल्सनें यावेळीं लढाई देण्याचें दिरंगाईवर टाकलें असतें, तर लढाईचा मोसम संपतांच तें सैन्य घरोघर निघून जाऊन सर्व फांकाफांक होऊन गेली असती. शिवाय सॅरेसन घोडेस्वारांच्या हलक्या टोळ्यांनीं गॉल देशांत पसरून असा धुमाकूळ मांडिला होता कीं, सर्वांस ' दे माय धरणी ठाव ' असें होऊन

गेलें होतें. अशा प्रसंगीं फ्रँक लोकांचा लढाईचा आवेश कमी करून त्यास आंवरून धरणें अशक्य होतें. या सर्व कारणांचा विचार करून पाहतां चार्ल्स मार्टेलनें यावेळीं अविचार केला असें म्हणवत नाहीं. अरब अखबारनवीसांची माहिती विश्वसनीय मानिल्यास त्यावरून मुसलमानी सैन्याची शिस्त यावेळीं अगदीं बिघडून गेली होती असें दिसून येतें. या सर्व गोष्टींवरून चार्लसनें ही लढाई काळवेळ परिस्थिति पाहूनच केली व त्याचे सैन्याच्या मर्दुमकीनें त्याचा अंदाज खोटा पडूं दिला नाहीं असें मानण्यास प्रत्यवाय नाहीं.

ख्रिस्ति मठवाशांनीं या लढाईचा वृत्तांत लिहून ठेवला आहे. त्यावरून सॅरेसन लोकांच्या या स्वारीनें त्यांच्या छातींत कशी धडकी भरली होती याचें प्रत्यंतर पाहतां येतें. बखरकार लिहितात—"अबदुल रहिमान नामक एक सॅरेसन सेनापति आपल्या प्रचंड सैन्यासह पिरिनिज पर्वत ओलांडून गॉलमध्यें घुसला. त्याचे शिपायांनीं येतांना आपला सर्व परिवार व चीजवस्तही बरोबर आणली होती. त्यांच्या या तयारीवरून ते त्या देशांत कायमचें ठाणें देण्याचे उद्देशानें आले होते हें उघड आहे. आपल्या अनुयायांनीं सर्व दक्षिणप्रदेश व्यापला असें पाहून अबदुल रहिमानानें पुढें चाल करण्यास प्रारंभ केला. डोंगर, घाट, दऱ्या, खोरीं यांमधून कसल्याही अडथळ्याला न जुमानतां त्याचें सैन्य पाण्याचे लोटाप्रमाणें पुढें वाढत चाललें. काउंट यूडो यानें गॅरोन नदीच्या कांठीं त्यास थोपवून धरण्याचा प्रयत्न केला; पण यूडोचा पुरा मोड होऊन त्यांचें सैन्य दशदिशा झालें. या पळाचे वेळीं त्यांची जी भयंकर कत्तल झाली ती 'ईश्वरो वै वेत्ति." याप्रमाणें जय मिळवून मुसलमानी सैन्य गॅरो नदी उतरून पुढें गेलें. तो मुलूख उध्वस्त करून व मनमुराद लूट संपादन करून त्यांनीं तेथें आपला विजयी अर्धचंद्राचा बाहुटा रोंविला. शत्रूकडील कैदी किती पाडाव

झाले याची तर गणतीच नव्हती. अशा रीतीनें लागोपाठ जय मिळत गेल्यानें आपल्या अमीराच्या युद्धकौशल्याविषयीं व स्वतःच्या भुजबलाविषयीं त्यांस गर्व झाला. टोळधाडीप्रमाणें किंवा वावटळीप्रमाणें ते पुढें पसरत व देश उजाड करीत चालले. यूडोचा काउंट पलायन करून एका किल्ल्यांत लपून बसला होता. तो किल्ला हस्तगत करून यूडोस अरब लोकांनीं यमसदनीं धाडिलें. मुसलमान लोकांच्या भयानक व शत्रुप्राणहारक तलवारीपुढें गॉलमधील कोणत्याच्च जातीचा टिकाव लागेना. मात्र या जयामुळें मिळालेल्या लुटीच्यायोगानें त्यांची द्रव्यतृष्णा वाढत चालली.

सॅरेसन लोकांची याप्रमाणें सरशी होत चाललेली पाहून फ्रँक लोकांच्या काळजानें ठाव सोडिला. पैगंबराच्या अनुयायांनीं नार्बोन, टुलाऊस, बोर्डो इत्यादि मोठमोठीं शहरें काबीज केल्याचें व यूडोस ठार केल्याचें वर्तमान त्यांनीं आपल्या राजास निवेदन केलें. त्यावेळीं चार्ल्स मार्टेलनें त्या सर्वांस धीर दिला व आपल्या सर्व फौजेस एकत्र जमण्याविषयीं निकडीचे हुकूम सोडले. त्यावेळीं स्वदेशसंरक्षणार्थ लढण्याला व कारण पडल्यास तन्निमित्त स्वप्राणाची आहुति देण्याला हजारों तरुण स्वयंसेवक अहमहिकेनें पुढें आले. याप्रमाणें असंख्यात दळ सिद्ध करून चार्ल्स हा टूर्स शहरासमीप येऊन ठेपला. सॅरेसन्सनीं त्या शहराला वेढा घातला होता. तो उठविण्यास शत्रूचें सैन्य येऊन दाखल झालें असतां त्याच्या डोळ्यादेखत त्यांनीं टूर्स शहरावर हल्ला चढविला व तें हस्तगत करून घेतलें. त्यावेळीं शहरवासी जनांची त्यांनीं जी कत्तल केली ती केवळ अमानुष होय. अरब सैन्य आधींच लुटीनें गबर झालें होतें, त्यांत टूर्सच्या लुटीची भर पडली. त्यामुळें तें सैन्य अवजड होऊन त्याची शिस्त बिघडून गेली, मुसलमानी सैन्यांत हा

वेळपावेतों असा कडक नियम अशे कीं, तलवार, घोडा, चिलखत याखेरीज अधिक चीजवस्त फौजेंत कोणीही बाळगूं नये; पण तो नियम यावेळीं अगदींच सुटला. त्या नियमाची कडक अम्मलबजावणी करण्याचें अबदुल रहिमानच्या जिवावर आलें. स्वतःचें युद्धनैपुण्य व आपल्या शिपायांची मर्दुमकी याचीं त्यास घमेंड असल्यानें असल्या बेशिस्त वर्तनास आळा घालण्याची त्यानें टाळाटाळी केली; पण त्याचें त्यास लवकरच प्रायश्चित्त मिळाल्याखेरीज राहिलें नाहीं. अशा बेलगामी आचरणाबद्दल मुसलमानी सैन्यास चांगलीच ठोकर बसली व त्यावेळेपासून महमद पैगंबराचे अनुयायांचे अजिंक्य सैन्याचा पराजय होऊन त्याचें आंत पाऊल येऊं लागलें.

टूर्स शहरांतील लूट व कत्तल आटोपल्यावर तें सैन्य चार्लस मार्टेलच्या फौजेच्या समाचारास निघालें. ओनार नदीच्या तीरावर त्या उभय दळांची गांठ पडली. मुसलमानी शिपाई आपल्या तोऱ्यांतच होते. टूर्स येथील रक्तपातानें त्यांचे अंगावर खून चढला होता. त्या धुंदींतच त्यांनीं लढाईस प्रारंभ केला. अरब स्वारांनीं बेजरब हल्ला करून फ्रँक लोकांच्या कित्येक पलटणी गारद केल्या. फ्रँक सैन्यही जिवाची पर्वा न धरितां मर्दपणानें लढलें व जरी त्यांची भयंकर कत्तल झाली तथापि त्यांनीं पाऊल मागें घेतलें नाहीं. याप्रमाणें हा घनघोर संग्राम सूर्यास्तापर्यंत चालू होता; पण उभय पक्षांपैकीं कोणीच माघार घेईना. शेवटीं अंधार पडून शत्रुमित्र ओळखण्याची मारामार पडूं लागली, तेव्हां निरुपायास्तव उभय दळें विश्रांतीकरितां आपापल्या छावणींत गेलीं. तथापि कोणीच हार खाल्ली नसल्यानें झुंजूमुंजू दिसूं लागलें नाहीं तोंच फिरून रणगर्जना सुरू झाली. त्यावेळीं अरबी घोडेस्वारांची मांड उठली व त्यांनीं ख्रिस्ती सैन्याची फळी फोडून त्याच्या मध्यभागावर हल्ला केला.

याप्रमाणें हें विजयी घोडदळ नेटानें शत्रूस मागें रेंटीत नेत असतां डाव्या उजव्या बगलेच्या फ्रँक टोळ्यांनीं मुसलमानी छावणीवर हल्ला केला व ते ती लुटत आहेत अशी भुमका उठली. सॅरेसन लोकांस आतां लुटीची चट लागली असल्यानें आपल्या कृतीचा परिणाम काय होईल याचा दूरवर विचार न करितां कांहीं स्वारांच्या टोळ्या छावणीचे संरक्षणार्थ परत फिरल्या; पण त्यांच्या या कृत्याचा फारच भयंकर परिणाम झाला. घोडेस्वारांचा पराजय होऊन ते मागें हटले अशी समजूत होऊन पायदळाचें धैर्य खचलें. आतां आपण पुढें जावें कीं, परत फिरावें हें त्यास सुचेना. असा जिकडे तिकडे घोटाळा उडून गेलेला पाहून आपल्या फौजेस धीर देऊन फिरून शत्रूवर हल्ला करण्याकरितां अबदुल रहिमान पुढें झाला. त्यानें पळपुट्या सैनिकास थोपवून धरिलें व आपल्या सर्व शिपायांस उत्तेजन देऊन त्यांच्याकडून शत्रूवर पुनरपि हल्ला करविला. पण दुर्दैवेंकरून या भाऊगर्दींत त्यांचे भोंवतीं शत्रूचा गराडा पडला; त्यांतून निसटण्याचा तो यत्न करीत असतां फ्रँक सैनिकांनीं भाल्यांनीं भोंकसून त्यांस ठार मारिलें. झालें! आपला सेनापति पडला असें कळतांच सगळ्या सैन्याची गाळण उडाली. त्यांच्या तोंडचें पाणी पळालें. त्यांचीं शस्त्रें लटकीं पडलीं. त्यांनीं माघार घेऊन पलायनास प्रारंभ केला. तेव्हां शत्रूनीं त्यांची लांडगेतोड चालविली. मुसलमानी सैन्यास पळतां भुई थोडी झाली. यूरोपियन ग्रंथकारांच्या मतानें अबदुल रहिमानाचें युद्धांत पतन हेंच मुसलमानांच्या पराजयाचें मुख्य कारण होय.

या लढाईत मुसलमानी व ख्रिस्ती धर्मानुयायांची झटापट होऊन त्यांत अर्धचंद्राचे निशाणास कायमची हार खावी लागली हें निर्विवाद आहे. या पराजयाच्या महत्त्वाविषयीं मुख्य पुरावा म्हणजे महंमदी

धर्मानुयायांनीं यापुढें फिरून कधींही पिरिनीज पर्वत ओलांडला नाहीं हा होय. ख्रिस्ती राष्ट्राचें जिवावरचें संकट टूर्स येथील जयानें टळलें. युरोपांतील अर्वाचीन राज्यें, राजनीति सुधारणा, विद्या, कला व कौशल्य यांचे वाढीस यावेळेपासून जें चलन मिळालें तें आजतागाईत अप्रतिहत चाललें आहे. ही सर्व क्रांति घडून येण्यास अवकाश मिळाला तो टूर्स येथील जयामुळेंच होय. अतएव युरोपियन राष्ट्रांस त्या लढाईचें एवढें महत्त्व वाटतें तें योग्यच आहे.

जगांतील क्रांतिकारक लढाया.

भाग ८ वा.

'हेस्टिंग्जची लढाई' इ. स. १०६६.

अठराव्या शतकांतील कांहीं प्रसिद्ध इंग्रज इतिहासकारांनीं 'हेस्टिंग्जची लढाई म्हणजे अँग्लोसॅक्सन राजघराण्याचा ऐवजीं नार्मन राजघराण्याची इंग्लंडचे गादीवर स्थापना, आणि नार्मन कायदेपंडितांच्या लबाडीनें इंग्लंडच्या कायद्यांत ढवळाढवळ होय; याशिवाय त्या लढाईस जास्त महत्त्व नाहीं' असें मत प्रतिपादिलें आहे. परंतु आगस्टिन थायरीनें 'नार्मन विजय' नांवाचें पुस्तक प्रसिद्ध केल्यापासून वरील मताची किंमत कोणी फारशी मानीत नाहीं. हेस्टिंग्जच्या लढाईपासून ते रनीमेड येथें 'मग्नाचार्टा' वर जॉन राजाकडून सही घेईपर्यंत इंग्लिश प्रजेला जुल्म सोसावा लागला हें खरें. तथापि त्यापासून त्यांचें अतोनात हित झालें हें कोणास नाकबूल करतां यावयाचें नाहीं. मॅग्नाचार्टावर सही घेतल्या वेळेपासून इंग्लंडच्या इतिहासाला निराळें वळण लागलें. या महत्कार्याचे वेळीं इंग्लिश व नॉर्मन्स हा भेदाभेद लोपून गेला होता. तत्पूर्वी नार्मन लोक आपल्याच ऐटींत, ताठ्यांत व ऐषआरामांत गर्क असत; आणि इकडे अँग्लो—सॅक्सन्स हे आपल्या मनांत जळफळत, चडफडत, दुर्मुखलेले असे असत. परंतु मॅग्नाचार्टावर सही करण्याला राजास भाग पाडून स्वतंत्रता देवीच्या देवालयाचे पायाचा दगड बसविण्यांत नार्मन्स व

सॅक्सन्स या उभयतांनींही एकजुटीनें शिकस्त केली. ह्मणूनच प्रसिद्ध फ्रेंच इतिहासकार 'गिझो' ह्मणतो कीं, 'इंग्लंड देश नार्मन लोकांकडून जिंकला जाऊन परतंत्र बनला त्यामुळेंच त्यास स्वातंत्र्यसुख प्राप्त झालें.' हें ह्मणणें विरोधात्मक भासतें; परंतु तें अक्षरशः खरें आहे. सॅक्सन लोकांच्या तत्कालीन प्रचलित संस्थामध्यें स्वातंत्र्याचें बीज होतें. परंतु त्या बीजास नॉर्मन विजयाचें अनुकूल खत मिळालें नसतें तर त्याचा हल्लींप्रमाणें रमणीय वृक्ष बनला नसता. हेस्टिंग्जच्या लढाईनें नार्मन व सॅक्सन लोकांचा संबंध जुळून त्यापासून इंग्लंडला स्वातंत्र्यरूपी फल प्राप्त झालें.

ब्रिटन देशावर ज्या ज्या परकी लोकांनीं आपली सत्ता स्थापिली, त्यांत नॉर्मन लोक सर्व तऱ्हेनें अवल नंबरचे होत. गॉथिक शाखेच्या पोट विभागांत नॉर्मन लोक शौर्य, लष्करीबाणा, व आज्ञाधारकत्व या गुणांनीं श्रेष्ठ असून ज्या ज्या लोकांशीं त्याचा संबंध जडे त्यांच्या मधील निवडक गुण उचलण्यांत त्यांचा हातखंडा असे. त्यांच्या राजनीतींत व्यक्तिस्वातंत्र्य व सार्वजनिक शांतता यांचा उत्तम मेळ असून राजसत्तेच्या नियंत्रणाचें बीज वसत होतें. शिवाय धर्माभिमान, शिलेदारीबाणा, कुलीन स्त्रियांविषयीं आदर, रसिकता, शिल्पकामाविषयीं आवड, या सर्व बाबतींत ते तत्कालीन लोकांस गुरुस्थानीं होते. तथापि उद्दामपणा, निर्दयपणा, जित लोकांचे हक्क व मनोविकार यांजकडे दुर्लक्ष्य या अवगुणांनीं त्याच्या नांवास कमीपणा आला होता. परंतु सॅक्सन लोकांशीं त्यांचा सहवास घडतांच त्यांचे हे दुर्गुण कमी होऊं लागले. उलट पक्षीं सॅक्सन लोकांत जें आलस्य होतें तें झडून जाऊन ते तरतरीत झाले आणि आपल्या शक्तीची त्यांस कल्पना येऊं लागली. हेस्टिंग्जच्या लढाई पूर्वी सॅक्सन लोकांचें रक्त थंड होतें तें नॉर्मन लोकांच्या सहवासानें

तरतरीत झालें ह्मणून इंग्लंडचा आज जो सर्व जगभर दबदबा आहे तो नॉर्मन लोकांच्या विजयाचा परिणाम होय. फ्रेंच इतिहासकार रॉपिन ह्मणतो 'हल्लीं इंग्लंड देश कीर्तिमंदिराच्या कळसावर आपण पाहतों; त्या मंदिराचा पाया हेस्टिंग्जच्या लढाईनें घातला गेला.'

इ. स. १०६६त एडवर्ड दी कन्फेसर हा इंग्लंडचा राजा होता. त्याला मूलबाळ कांहीं नव्हतें. त्याचे पाश्चात् न्यायानें वारसदार ह्मटला तर एडगर ॲथेलिंग नांवाचा एक किचकट मेलतोंड्या मुलगा होता. असल्या राजाचे अल्पवयस्क कारकीर्दींत देशावर अरिष्टें कशीं ओढवतात आणि प्रजेचे हाल कशा प्रकारें होतात याची सर्वांस चांगली कल्पना असल्यानें एडगर हा जरी सीधा वारस होता तरी सर्व देशाचे डोळे हॅरोल्ड नामक सरदाराकडे लागले. हॅरोल्ड हा एक अत्यंत बलिष्ठ सरदार असून त्याचे घराण्यास राजघराण्याच्या खालोखाल मान मिळत असे. हॅरोल्डच्या अंगच्या गुणांस लुब्ध होऊन सर्वांनीं त्यास आपला भावी राजा असें ठरवून टाकिलें होतें.

याखेरीज नार्वेचा राजा हॅरोल्ड हर्ड्रडा आणि नार्मंडीचा डयूक वुइल्यम् हेही इंग्लंडच्या गादीवर आपला हक्क सांगत होते. नार्वेच्या राजाचा इंग्लंडच्या गादीवर संबंध कसा पोंचतो याचें त्यावेळींही सर्वांस गूढच होतें. त्यामुळें त्याच्या ह्मणण्याकडे प्रथमतः कोणी विशेष लक्ष्य दिलें नाहीं. डयूक वुइल्यम् हा मात्र एडवर्ड धी कन्फेसरचा दूरचा एक नातेवाईक होता आणि आपल्या मरणानंतर वुइल्यमला इंग्लंडची गादी मिळावी अशी तजवीज करण्याचें एडवर्डनें त्यास वचन दिलें होतें, असे तो सांगत असे. एडवर्डची डयूक वुइल्यमवर हॅरोल्डहून अधिक प्रीति होती हें निर्विवाद आहे.

एडवर्ड दी कन्फेसरच्या मरणापूर्वी कांहीं दिवस हॅरोल्ड हा नार्मंडीस गेला होता. तेथें तो कोणत्या कामगिरीकरितां अगर काय

उद्देशानें गेला याबद्दल विश्वसनीय हकीकत कळत नाहीं. तथापि नार्मंडींत असतांना तो सर्वस्वी वुइल्यमच्या तावडींत सांपडला यांत बिलकुल शंका नाहीं. वुइल्यमनें या संधीचा मोठ्या खुबीनें अनुचित फायदा घेतला. बाह्यतः तो हॅरोल्डशीं मोठ्या प्रेमानें व आदरानें वागत असे. एके दिवशीं त्या उभयतांचें संभाषण चाललें असतां मध्येंच वुइल्यम् दिलसफाईचें मिष करून ह्मणाला ' एडवर्ड व मी आजवर बंधुप्रमाणें वागत आलों. त्यानें पूर्वी मला वचन दिलें आहे कीं, माझे पश्चात् आपलें राज्य मी तुला देईन '. हॅरोल्डनें या गोष्टीला रुकार दर्शविला. तेव्हां वुइल्यमनें त्यास आपली मुलगी ॲडेला देण्याचें ठरवून हॅरोल्डनें आपली बहीण वुइल्यमच्या पदरच्या एखाद्या बड्या सरदाराला द्यावी, आणि वुइल्यमला इंग्लंदची गादी मिळण्याचे कामीं साहाय्य करावें असें त्याजकडून वचन घेतलें. एवढ्यानेंच वुइल्यमची तृप्ति झाली नाहीं. हॅरोल्डला पक्क्या वचनानें बांधून टाकावें, ह्मणजे वचनभंग करण्याला त्याचें मन कचरेल आणि त्याचा पक्ष स्वीकारण्यीची कोणास छाती होणार नाहीं अशी कल्पना करून, एके दिवशीं भरदरबारांत त्यानें हॅरोल्डला आपणाशीं इमानेंइतबारें वागण्याची शपथ घ्यावयास लाविलें. या शपथविधिकरितां वुइल्यमनें तेथील देवालयांतील व मठांतील मृत साधूंच्या अस्थि व इतर पवित्र वस्तू एका पेटींत भरल्या, आणि त्या पेटीवर किनखाबी सरपोस घालून त्यावर आपलें प्रार्थनापुस्तक ठेविलें. हॅरोल्डला ही शपथ घेणें जिवावर आलें; परंतु त्यावांचून आपली सुटका होत नाहीं असें पाहून त्यानें विधिपूर्वक शपथ घेऊन वुइल्यमला इंग्लंडचें राज्यपद मिळवून देण्याचे कामीं साहाय्य करण्याचें वचन दिलें.

नंतर हॅरोल्डला इंग्लंडला परत जाण्याची परवानगी मिळाली. तेथें पोंचल्यावर नार्दंब्रिया प्रांतांत अँग्लो-डेन्सनीं धामधूम चालविली होती,

ती त्यानें मोठ्या चातुर्यानें मोडिली. यामुळें तो फार लोकप्रिय झाला. इकडे एडवर्ड दी कन्फेसर हा ता. ५ जानेवारी १०६६ रोजीं हक्क झाला; तेव्हां लंडनमधील धर्माधिकारी, सरदार व प्रजाजन यांची सभा भरून त्यांनीं हॅरोल्डला राज्यपद देऊं केलें. एडवर्डनेंही मरतेवेळीं हॅरोल्डलाच राज्याभिषेक करावा अशी इच्छा प्रदर्शित केली होती असें म्हणतात. तथापि हॅरोल्डच्या निवडणुकीला त्याची लोकप्रियताच कारणीभूत झाली. तेव्हां वुइल्यमला दिलेलें आपलें वचन पाळावें, कीं राष्ट्राची अनुज्ञा मानावी याचा त्यास विचार पडून, त्यानें शेवटीं आपणाकडून कपटानें व बळजबरीनें घेवविलेली शपथ रद्द आहे असें ठरविलें; आणि ता. ७ जानेवारीं रोजीं तो प्रजेच्या संमतीनें सिंहासनारूढ झाला.

एडवर्डच्या मृत्यूची वार्ता कळतांच वुइल्यमनें हॅरोल्डला त्याच्या विधिपूर्वक घेतलेल्या शपथेची आठवण दिली. तेव्हां हॅरोल्डनें त्याला उलट कळविलें कीं, 'मी शपथ राजीखुषीनें घेतलेली नाहीं. शिवाय त्यावेळीं जें राज्य माझें नव्हतें त्यावरील हक्क सोडून देण्याला मला अधिकार नव्हता; आतां मी जें राज्यपद स्वीकारलें आहे तें लोकांच्या आग्रहावरून होय. इंग्लंडच्या प्रजेनें ही आपली ठेव माझे स्वाधीन केली आहे. ती त्यांच्या संमतिखेरीज मला दुसऱ्या कोणास देतां येत नाहीं. त्याचप्रमाणें माझे प्रजेचे अनुमतिखेरीज मला परदेशच्या कुमारिकेशीं विवाह लावतां येत नाहीं. राहतां राहिली माझ्या बहिणीचे लग्नाची शपथ; पण तिला मरून कित्येक दिवस झाले. आतां माझें वचन राखण्याकरितां तिचें प्रेत आपलाकडे पाठवून द्यावें अशी आपली इच्छा असल्यास त्याप्रमाणें कळवावें म्हणजे जरूर ती तजवीज करण्यांत येईल.' हें उत्तर ऐकून वुइल्यमनें हॅरोल्डच्या वचनभंगाची गोष्ट जगजाहीर केली; आणि तलवारीच्या जोरावर एक वर्षाचे आंत आपलें हक्काचें

राज्य संपादन आणि वचनभ्रष्टास शिक्षा करण्याची त्यानें प्रतिज्ञा केली. तथापि तो पुरा कावेबाज असल्यानें तलवारीस हात घालण्याचेपूर्वी त्या वादाचा निर्णय करण्याची त्यानें पोपला विनंति केली. या बाबतींत पोपचा अधिकार मानण्याचें हॅरोल्डनें नाकारिलें. तेव्हां पोप व त्याचें पाद्रीमंडळ यांनीं एकतर्फी निकाल दिला कीं 'वुइल्यमचा इंग्लंडचे गादीवर हक्क आहे; तो त्यानें लढून संभाळावा'. या निर्णयाचें चिन्ह म्हणून पोपनें त्याजकडे एक अभिमंत्रित निशाण पाठविलें. वुइल्यमची इंग्लंडवर होणारी स्वारी हें धर्मयुद्ध आहे असा पाद्रीभटांनीं सर्व युरोपखंडभर पुकारा केला. त्याचा फायदा वुइल्यमला कितपत झाला यांचें अनुमान हल्लींच्या धर्मभ्रष्ट व भावहीन काळीं करितां येणें शक्य नाहीं. अशा प्रकारें एक बाजू मजबूद करून त्यानें आपली लष्करी तयारीही झपाट्यानें चालविली. त्याच्या शब्दास मान देणारे जे साहाय्यकर्ते अगर मांडलिक होते त्यांस त्यानें आपल्या मदतीस येण्याला विनविलें. ख्रिस्ति राष्ट्रांतील यच्चावत् धाडशी लढवय्ये वुइल्यमसारख्या विख्यात व वाकब सेनानीच्या हुकमतींत, पोपनें दिलेल्या झेंड्याखालीं लढावयास उत्सुकतेनें जमा झाले. एवढें अफाट सैन्य पश्चिमयुरोपांत यापूर्वी कधींच जमलें नव्हतें. इ. स. १०६६ च्या उन्हाळ्यांत नॉर्मंडी, पिकार्डी, व ब्रिटनी या परगण्यांतील सर्व बंदरांतून घनचक्कर तयारी चालू झाली. ब्रिटिश खाडीच्या उत्तर किनाऱ्यावर हॅरोल्डनेंही या स्वारीचा प्रतिकार करण्याकरितां जारीनें तजवीज केली. पण इतक्यांत नार्वेचा राजा हॅरोल्ड हर्ड्रेडा यानें इंग्लंडच्या उत्तरेकडील प्रांतांवर स्वारी केल्याचें वर्तमान आलें. त्यामुळें हॅरोल्डला आपला विचारपूर्वक ठरविलेला बेत बदलावा लागला.

टॉस्टिग नांवाचा हॅरोल्डचा एक भाऊ होता. राज्यतृष्णेनें देशद्रोही व राजद्रोही बनून त्यानें नार्वेच्या राजाला इंग्लंडवर स्वारी करण्यास चिथविलें.

त्याप्रमाणें हॅर्ड्रेडानें दोनशें लढाऊ जहाजें व तीनशें इतर गलबतें सज्ज केलीं, आणि नॉर्वेतील निवडक निवडक शिपाई या मोहिमेकरितां एकत्र जमवून त्यानें प्रथम ऑर्कनी बेटाकडे मोर्चा वळविला. तें बेट काबीज करून तेथील शूर लोकांची आपल्या सैन्यांत भरती करून त्यानें इंग्लंडचा रोख धरिला आणि यार्क परगण्यांतील बंदरांत आपलें सैन्य उतरविलें. या फौजेस प्रतिबंध करण्यासाठीं नार्दंब्रियाचे गव्हर्नर एडविन व मॉर्कर हे तिजवर तुटून पडले. परंतु त्यांचा पराजय होऊन यार्क शहर व टाईन नदीपासून हंबरपर्यंतचा सर्व मुलूख हॅर्ड्रेडाच्या अंकित झाला. एडविन व मार्करच्या पराभवाची वार्ता कळतांच आपला दक्षिणकिनाऱ्यावरील तळ हालवून तातडीनें उत्तरेस कूच करणें हॅरोल्डला भाग पडलें. तो वायुवेगानें चवथे दिवशीं यार्क परगण्यांत दाखल झाला. तेव्हां स्टॅम्फोर्ड ब्रिज येथें शत्रूशीं गांठ पडून घनघोर रणसंग्राम झाला. बराच वेळपावेतों जयापजय कोणास प्राप्त होणार हें ठरेना. नॉर्वेजियन पलटणीच्या रांगा मोडणें अशक्य दिसल्यानें हॅरोल्डनें कावेबाजपणानें पलायनाचें मिष केलें. या हुलकावणीनें त्याचें कार्य साधलें. नॉर्वेजियन सैन्य विजयानंदाचे भरांत इंग्लिश फौजेचा पाठलाग करूं लागलें, त्यावेळीं त्याची शिस्त पूर्वीप्रमाणें राहिली नाहीं. तें पाहतांच इंग्लिश सैन्यानें उलटून त्याजवर मारा चालू केला. त्यावेळीं नॉर्वेजियन शिपायांची भयंकर कत्तल झाली. या पराजयानंतर नॉर्वे देशानें पाव शतकपावेतों डोकें वर केलें नाहीं, इतका खरपूस मार त्यास या लढाईत मिळाला. नॉर्वेचा राजा हॅर्ड्रेडा व त्याचे करोल सरदार रणांगणीं पतन पावले. ही लढाई ता. २५ सप्टंबर १०६६ रोजीं झाली.

हॅरोल्डला हा मोठाच विजय मिळून इंग्लंड देशावरचें एक अरिष्ट टळलें खरें. परंतु या कामीं त्याला आपले कित्येक निवडक अम्मल-

दार व शूर सैनिक खर्ची घालावे लागले. पण याहून मोठी हानि म्हणजे ड्यूक वुइल्यमला ससेक्सच्या किनाऱ्यावर बिनधोक रीतीनें आपलें सैन्य उतरवितां आलें, ही होय. वुइल्यमचीं सर्व तारवें आगष्ट-अखेरीसच सीन व ऑर्म नदीचे मुखाजवळ जमलीं होतीं. त्याचे सैन्यांत पन्नास हजार शिलेदार व दहा हजार बारगीर होते. बरेच दिवसपर्यंत वारा प्रतिकूल असल्यानें वुइल्यमला गलबतें हाकारतां येईनात. तथापि तेवढ्या अवकाशांत त्यानें आपल्या सैन्याची व्यवस्था व टापटीप बसविली, आणि सर्व शिपायांस लष्करी शिस्त लावून दिली.

सप्टंबर ता. २१ ला तूळ संक्रमण होतांच ईशान्येचा वारा बदलून वायव्येचा वाहूं लागला. नॉर्मन नाविक त्याचीच मार्गप्रतीक्षा करीत असल्यानें, त्यांनीं लगेच नांगर उचलून गलबतें हाकारलीं. परंतु वारा तुफान वाहूं लागून, त्यामुळें तीं तारवें पश्चिमेस सेंटव्हलेरी किनाऱ्यास जाऊन लागलीं. हा प्रतिकूल वारा वुइल्यमच्या पथ्यावरच पडला. कारण इंग्लिश किनाऱ्यावर हॅरोल्ड ससैन्य हजर असतांना जमिनीवर आपली फौज उतरविणें त्यास धोक्याचें झालें असतें. पण याचवेळीं ससेक्सचा किनारा सोडून हॅरोल्ड उत्तरेकडे गेला; आणि ब्रिटिश खाडींत टेहळणीसाठीं जें आरमार होतें तें या तुफानानें नादुरुस्त होऊन आस-ऱ्याकरितां निरनिराळ्या बंदरास निघून गेलें. याप्रमाणें वुइल्यमच्या मार्गीतील विघ्नें आपोआपच दूर झालीं. ता. २८ सप्टंबर रोजीं वारा बदलला. तेव्हां दक्षिणचे वाऱ्याचे साहाय्यानें ता. २९ रोजीं वुइल्य-मनें आपलें सैन्य ससेक्स परगण्यांतील पेव्हेन्सी आखातांतून पेव्हेन्सी व हेस्टिंग्ज किल्ल्यांचे दरम्यान उतरविलें.

इंग्लंडचे पुरातन शत्रू जे नॉर्वेजियन्स त्यांचे तडाक्यांतून इंग्लंड वाचलें या आनंदांत असतांनाच हॅरोल्डला वुइल्यम हा ससेक्सच्या

किनाऱ्यावर आपल्या बलाढ्य फौजेनिशीं उतरल्याचें वर्तमान कळलें. ही बातमी येऊन धडकतांच हॅरोल्डनें आपला मोर्चा दक्षिणेकडे वळविला. नॉर्वेजियन लोकाशीं स्टॅम्फर्डब्रिज्ज येथें झालेल्या लढाईत त्याचे जे शिपाई पडले होते त्यांच्या जागीं दुसरी भरती करण्यास त्याला अवकाश मिळाला नाहीं. वाटेंत लंडन शहरीं तो केवळ सह दिवस राहिला. तेवढ्या अवधींत दक्षिण व मध्य परगण्यांतून सैन्य उभविण्यास व ससेक्सचे किनाऱ्यावर फिरून आरमार जमविण्यास त्यानें हुकूम दिला. लंडन येथें त्याच्या छावणींत नित्य सैनिकांची भर पडूं लागली. त्यानें आणखी कांहीं दिवस दम धरला असता तर आपल्या प्रतिपक्ष्याहून अधिक सैन्य त्याचे निशाणाखालीं जमलें असतें. पण स्टॅम्फर्डब्रिज्जच्या जयानें त्याला स्वतःच्या बलाविषयीं फाजील विश्वास वाटूं लागला होता, आणि वुइल्यमनें आपला देश उजाड करण्यास प्रारंभ केल्याचें ऐकून त्याच्या अंगाचा तिळपापड झाला. या कारणास्तव तो वुइल्यमवर चालून जाण्याविषयीं उत्सुक झाला होता. ह्मणून लंडन येथें जेवढ्या सैन्याची जमवाजमव झाली, तेवढेंच घेऊन तो जलदीनें सरे व ससेक्स प्रातांतून समुद्रकिनाऱ्याला आला. मनांतील हेतु कीं, ज्याप्रमाणें नॉर्वेजियन सैन्य गैरसावध असतां त्याजवर चालून जाऊन त्याचा फडशा पाडला, त्याचप्रमाणें आपण आल्याची बातमी वुइल्यमला लागण्याचेपूर्वीच त्याच्या फौजेवर छापा घालून तिची दाणादाण करावी. पण त्याचा प्रतिपक्षी वुइल्यम फार युद्धकुशल व अत्यंत सावध असल्यानें, त्याचा हा बेत सिद्धीस गेला नाहीं.

नॉर्मन लोकांस अचानक गांठून त्यांचा फडशा पाडण्याचा पहिला बेत सपशेल फसल्यानें हॅरोल्डनें शत्रुसैन्यापासून सात मैलांवर आपली छावणी ठोकिली. शत्रूंची संख्या समजून घेण्याकरितां फ्रेंच भाषा जाण-

णारे हेर रवाना झाले. त्यांनीं परत येऊन सांगितलें कीं, 'वुइल्यमच्या सैन्यांत शिपायापेक्षां धर्मोपदेशकच अधिक आहेत.' परंतु हॅरोल्डला नार्मन लोकांच्या चालीरीति ठाऊक असल्यानें तो हांसून ह्मणाला, ज्यांना तुह्मी धर्मोपदेशक समजतां ते उद्यां लढाईचे वेळीं तुमच्या छातीवर बसतील तेव्हां त्यांचें खरें स्वरूप तुह्मांस कळेल.' संख्येच्या मानानें पाहतां हॅरोल्डचें सैन्य कमकुवत असल्यानें त्याच्या सल्लागारांनीं असें सुचविलें कीं, 'आपण मागें हटत हटत लंडनपर्यंत जावें आणि तेथपर्यंतचा सर्व मुलूख जाळून पोळून फस्त करावा. ह्मणजे शत्रू चंदीचाऱ्याच्या दुष्काळामुळें टेंकीस येईल.' पण हॅरोल्ड हा धाडसी तसाच कनवाळू असल्यानें त्याला ही सल्ला मानवली नाहीं. आपल्याच हातानें आपला मुलूख उध्वस्त करून प्रजेस हालअपेष्टा भोगावयाला लावणें त्यास गैर वाटलें. यामुळें त्यानें हातची जयश्री गमावली.

हॅरोल्डबरोबर त्याचे बंधु 'गर्थ' व लिओफाइन हे होते. त्यांतील 'गर्थ'नें हॅरोल्डला युद्धांत स्वतः हजर न राहण्याविषयीं विनविलें. तो ह्मणाला 'दादा, कपटानें अगर जबरीनें कोणत्या कां कारणामुळें असेना, तूं पूर्वकालीन साधूंच्या पवित्र अस्थीवर हात ठेवून वुइल्यमला मदत करण्याची शपथ वाहिली आहेस. ती मोडून वुइल्यमविरुद्ध शस्त्र धरण्याचें पातक तूं करूं नकोस. आह्मांपैकीं दुसऱ्या कोणी तसली शपथ वाहिली नाहीं किंवा वचन दिलें नाहीं. यास्तव आमच्या देशाकरितां व आमच्या राजाकरितां शिर हातावर घेऊन आह्मीं लढतों. तूं बाजूस राहून आमचें बाहुबल पहा. उगीच पुढें होऊन आपली पत, कीर्ति व आपलें जीवित धोक्यांत घालूं नकोस.' परंतु असली बायकी सल्ला हॅरोल्डला कोठची पटणार? तो उद्गारला 'मजकरितां इतके शूर वीर जिवावर उदार होऊन लढत असतां मी बायकोप्रमाणें पडद्याआड राहूं

काय ? सगळें जग माझ्या शौर्याची किंमत बांधील. आपल्या हितार्थ दुसऱ्याचा बळी देऊन आपण नामानिराळें राहणें हा आप्पलपोटेपणा माझे अंगीं नाहीं'. याप्रमाणें भावाला निरुत्तर करून तो लढाईच्या तयारीस लागला. तो चांगला युद्धविशारद असल्यानें शत्रूच्या अंगावर एकदम बेफामपणें चालून जाण्याचा मूर्खपणा त्यानें केला नाहीं. प्रथम त्यानें आपल्या छावणीची बळकटी केली, आणि सभोंवतीं कुंपण घालून कोणा शत्रूचा तेथें शिरकाव होणार नाहीं अशी त्यानें तजवीज केली.

हेस्टिंग्जनजीकच्या एका टेकडीवर 'बॅटल ॲबे' नांवाचा एक मठ होता. तो हल्लीं बहुतेक पडून गेला आहे. तथापि त्याच्या अवशिष्ट खाणाखुणावरून हॅरोल्डच्या छावणीची जागा ठरवितां येते. लढाईचे वेळीं ज्या स्थळीं इंग्लिशांचें निशाण फडकत होतें, व जेथें भयंकर कत्तल होऊन मुडद्यांचा ढीग पडला होता, त्याच ठिकाणीं वुइल्यमनें पूर्वी नवस केल्याप्रमाणें हा मठ बांधविला. तेथें पाद्री लोक या लढाईत मरण पावलेल्यांच्या आत्म्यास शांति मिळण्याविषयीं प्रार्थना करीत, ह्मणून त्या मठाला 'बॅटल ॲबे' असें नांव पडलें. ही टेकडीवरील छावणीची जागा पाहिली असतां हॅरोल्डच्या युद्धकौशल्याची तारीफ केल्यावांचून राहवत नाहीं. वुइल्यमची सारी भिस्त काय ती घोडेस्वारांवर होती आणि हॅरोल्डकडे तर स्वारांची उणीव होती. याकरितां घोड्यांच्या हालचालीस प्रतिकूल अशी ही जागा त्यानें लढाईसाठीं मुक्रर केली. या टेकडीला सेन्लॅक टेकडी ह्मणतात. हॅरोल्डच्या तेथील छावणीवर समोरून हल्ला करणें घातक होतें. बगलेवर हल्ला करण्यास शत्रूला डोंगराच्या पायथ्याला वळसा घालून पुढें गेलें पाहिजे होतें. पण तसें केल्यास खडकावरून स्वतःचे सैन्याच्या बाजूवर मारा होण्याची भीति होती. हॅरोल्डच्या सैन्याच्या पिछाडीस झाडीचा मुलूख होता. आपणास हार

खाऊन मागें हटावें लागलें तर या झाडींत शिरतां येईल व शत्रूच्या घोडेस्वारांचा तींत शिरकाव होणें शक्य नाहीं हें त्यानें पाहून ठेविलें होतें. याप्रमाणें स्वतःच्या बाजूची मजबुती असून, शिवाय नॉर्मन लोकांस मात्र पराजय झाल्यास आसऱ्याची जागा जवळपास कोठेंही नाहीं, हें त्याच्या लक्षांत आलें होतें. या सर्व गोष्टींचा पोक्त विचार करून त्यानें आपला तळ दिला होता.

शत्रूची छावणी सेन्लॅक टेकडीवर पडल्याचें ऐकून वुइल्यमला आनंद झाला. कारण होतां होईल तितक्या लवकर निकराची लढाई देणें त्याला इष्ट होतें. ह्मणून त्यानें आपली हेस्टिंग्ज येथील छावणी उठवून शत्रूच्या छावणीनजीक तळ देण्यास फर्माविलें. याप्रमाणें उभय दळें समोरासमोर आल्यावर वुइल्यमनें मोठ्या आढचतेनें मॅग्रॉट नामक मठाधिकारी हॅरोल्डकडे शिष्टाईस पाठविला. त्यानें हॅरोल्डला कळविलें कीं, 'तूं आपला राज्यावरचा हक्क सोडून दे, अगर त्या हक्काबद्दल निर्णय करण्यास पोपला पंच नेमून त्याच्या निकालास अनुसरून वर्तन करण्याचें कबूल कर; अथवा हा तंटा तुझा व वुइल्यमचा व्यक्तिविषयक आहे, यांत प्रजेचा निष्कारण संहार होऊं नये, ह्मणून तूं वुइल्यमशीं द्वंद्वयुद्धास सिद्ध हो.' हॅरोल्डनें आपणास यांतील कोणताच मार्ग पसंत नाहीं असें स्पष्ट उत्तर दिलें. तेव्हां वुइल्यमनें पुनरपि मॅग्रॉटच्या तोंडून कळविलें कीं, 'जर तूं आपल्या वचनास जागून माझ्याशीं सलोखा करशील तर तुला हंबर नदीच्या पलीकडील सर्व मुलूख देतों, व तुझा बंधु 'गर्थ' याला गॉडविनची सगळी जहागीर बक्षीस देतों. पण या अटी तुला मान्य न झाल्यास तूं वचनभ्रष्ट आहेस ह्मणून तुला आणि तुझ्या पक्षाच्या सर्व सैनिकांना पोपच्या आज्ञेवरून मी बहिष्कार घालतों'. मॅग्रॉटनें हा निरोप सर्वांसमक्ष गंभीर स्वरानें कळविला. तेव्हां 'बहिष्कार' हा शब्द

कानीं पडतांच कित्येक धर्मभोळे सरदार आपापसांत कुजबुजूं लागले. शेवटीं त्यांनीं ठरविलें कीं, ' नार्मन लोक हे आपल्या देशाचे दुस्मन् आहेत. आमचा देश काबीज करून, आमची संपत्ति, कीर्ति व अब्रू हरण करण्याचा त्यांचा उद्देश आहे. ह्मणून स्वदेश, स्वतःची जिनगी आणि स्वकुल यांचे रक्षणार्थ आह्मांस लढलेंच पाहिजे. केवळ हॅरोल्ड राजाकरितां आह्मी लढतों असें नाहीं. यास्तव हा बहिष्कार आह्मांस लागूं नाहीं. ' याप्रमाणें आपल्या मनाचें कसेंबसें समाधान करून त्यांनीं शत्रूशीं तह करावयाचा नाहीं असें कळविलें, आणि मारूं किंवा मरूं अशा दृढनिश्चयानें ते युद्धास प्रवृत्त झाले.

या शिष्टाईत व वाटाघाटींत आक्टोबरची १३ वी तारीख निघून गेली. त्या रात्रीं ड्यूक वुइल्यमनें आपल्या सर्व सरदारांस बोलावून दुसरे दिवशीं लढाई देण्याचा आपला मानस कळविला, आणि त्यांस तयारींत असण्याविषयीं बजाविलें. इंग्लिश सैन्यानें ती रात्र आनंदांत व चैनबाजींत घालविली. पण नॉर्मन्सनीं प्रथम आपल्या घोड्यांना चंदी चारा मसाला, बगैरे दिला, आपलीं हत्यारें शिकल करून पुसून तयार ठेविलीं, आणि मरणाच्यापूर्वी धर्मोपदेशकाजवळ स्वापराधनिवेदन करितात, तो प्रायश्चित्तविधि करून ते लढण्यास सिद्ध झाले. इ. स. १०६६ च्या आक्टोबरची १४ वी तारीख उजाडली व या क्रान्तिकारक लढाईस प्रारंभ झाला.

सूर्योदय होतांच आपली प्रातःप्रार्थना आटपून नार्मन सैन्य छावणींतून बाहेर पडलें, आणि आपापल्या सरदारांच्या निशाणाखालीं सज्ज होऊन उभें राहिलें. सर्व सरदारमंडळ वुइल्यमच्या भोंवतीं जमलें तेव्हां वुइल्यम् त्यांस उद्देशून ह्मणाला ' सरदार हो, तुमच्या शौर्यावर माझा पूर्ण भरंवसा आहे ह्मणून जय ह्मणजे केवळ हातचा मळ असें

मला वाटतें. तर हा माझा विश्वास कायम राहील असें वर्तन करा. तुमच्या पराक्रमानें जें कांहीं जिंकाल तें सर्व मी तुह्मांसच देऊन टाकतों. लढण्यांत कसूर करूं नका. पहिलाच हल्ला इतक्या नेटानें करा कीं शत्रूची गाळण उडून जावी. मग तुमचें पुढील काम सुलभ होईल. पण जय मिळूं लागतांच लुटीच्या आशेला गुंतूं नका. सर्व लूट तुमचीच असून तीवर तुमचा सर्वांचा सारखा हक्क आहे. शेवटीं एक मुख्य गोष्ट सांगतों ती लक्ष्यांत बागवा. इंग्लिश शिपाई दुष्ट, क्रूर, लबाड व नीच आहेत. तुह्मी जर त्यांचे हातीं लागाल तर ते तुह्मांस क्रूरपणानें ठार करतील. गयावया करून जीवदान मागाल तर तुह्मांस जीवदान देणार नाहींत. पळून जाऊं ह्मणाल तर तुमचा पाठलाग करून लांडगेतोड करतील. पण आधीं तुह्मीं पळून जाणार तरी कोठें? तुमचा नार्मंडी प्रांत समुद्रापलीकडे आहे व शत्रूच्या आरमारानें सगळा समुद्र व्यापिला आहे. समुद्रकिनाऱ्याला पोहोंचेपर्यंतच आधीं तुमचा फडशा पडेल. या सर्व परिस्थितीचा विचार करून मर्दाप्रमाणें लढा. शत्रूस दयामाया बिकुल दाखवूं नका, कारण ते मुळीं दयेस पात्रच नाहींत. चला तर आणि धीरानें व नेटानें लढा ह्मणजे जय हटकून ठेवलेलाच आहे'. वुइल्यमचें भाषण ऐकून त्या सरदारांचे अंगांत वीरश्रीचा संचार झाला. त्यांचे बाहु स्फुरण पावूं लागले, व ते एकसमयावच्छेदेंकरून ह्मणाले 'लढाईतून पळून जाण्याचें नामुष्कीचें काम आमच्या हातून प्राण गेल्यास होणार नाहीं. तुह्मी सांगाल तर तुमच्याकरितां प्रत्यक्ष यमाचे दाढेस हात घालण्यास आह्मी तयार आहों.' असें आवेशयुक्त भाषण ऐकून वुइल्यमला हर्ष झाला व तो ह्मणाला 'तुमच्या स्वामिनिष्ठेबद्दल मी तुमचा आभारी आहे.' आणखीही तो पुढें भाषण करणार होता. इतक्यांत वुइल्यमफिट्झ ऑस्बर्न हा सरदार नखशिखांत चिलखत घालून घोड्यावर स्वार होऊन तेथें उभा होत

त्यानें आपला घोडा पुढें खेचला व तो वुइल्यमला बोलला ' आह्मी निष्कारण वेळ गमावीत आहों. आतां शब्दाचें कारणच उरलें नाहीं, प्रत्यक्ष कृति करून दाखविण्याची वेळ आली आहे. यास्तव युद्धाचे कामास प्रारंभ करावा हें युक्त आहे '. हें ऐकतांच सर्वांनीं आपला मोर्चा शत्रूकडे वळविला. वुइल्यमनें काय काय सूचना व हुकूम द्यावयाचे होते ते त्यास दिले. नंतर पोपनें पाठविलेलें निशाण मागवून तें ट्रॉस्टीन नामक एका शूर तरुण सरदाराच्या हवालीं केलें. टॉस्टीननें मोठ्या उल्हासानें व उमेदीनें तें घेऊन वुइल्यमला मुजरा केला, आणि धिटाईनें तो पुढें चालूं लागला. या कामगिरीबद्दल त्याला जें इनाम मिळालें तें अद्यापि त्याच्या वंशास चालू आहे.

नंतर वुइल्यमनें रॉजियर सरदारास आपल्याजवळ बोलाविलें व त्यास तो ह्मणाला ' माझा सर्व भरंवसा तुझ्या पराक्रमावर आहे. माझें पायदळ बरोबर घेऊन तूं शत्रूच्या उजव्या बाजूवर हल्ला कर. पॉइटेव्हिन, ब्रेटन, व मेन परगण्यांतील फौजेनिशीं ॲलन फरगर्ट हा डाव्या अंगानें शत्रूवर तुटून पडेल. मी माझ्या इतर प्रमुख सरदार व दोस्तांसह मध्यभागीं राहीन. तेथें तुंबळ रण माजून राहील असा माझा तर्क आहे. ' इतकें बोलून पायदळ व घोडेस्वारांस चालून जाण्याला त्यानें इशारत दिली. पायदळांत तिरंदाजाचा भरणा मोठा होता. त्यांचेजवळ धनुष्य, भाते व तलवार हीं हत्यारें असून त्यांचा उपयोग करण्याचे कामीं ते निष्णात होते. त्यानीं डोकीस कातडी टोप्या व पायांत चढाऊ जोडे घातले होते. कित्येकांनीं जनावरांचीं कातडीं आपल्या अंगाभोंवतीं गुंडाळलीं होतीं. शिलेदारांचा जामानिमा पायदळाहून अधिक सुराक्षिततेचा होता. त्यांचे अंगांत चिलखत असून डोकीस झगझगीत शिरस्त्राण होतें. त्यांनीं गळ्यांत ढाला बांधून हातांत भाले घेतले होते आणि त्यांच्या

कमरेस तलवारी लटकत होत्या. नॉर्मन व फ्रेंच शिपायांची आपापसांतच चुकून चकमक होऊं नये ह्मणून सर्व सैन्यांत संकेत शब्द ठरले होते. याप्रमाणें सर्व तरतूद करून पुढें तिरंदाज आणि त्यांचे मागून त्यांस पाठवळ देण्याकरितां घोडेस्वार निघाले.

नॉर्मन सैन्य आपल्या छावणीवर चढाव करून येणार हें हॅरोल्ड यांस माहित असल्यानें त्यानें आपल्या छावणीचा पक्का बंदोबस्त केला होता. ऍश वगैरे झाडांच्या खांद्या तोडून त्यांचें कुंपण करून त्यावर ढाला लाविल्या होत्या, आणि त्या सर्व वेलींनीं इतक्या गुंतवून सोडल्या होत्या कीं, शत्रूला शिरकाव करून घेण्यास कोठेंही वाट नव्हती. अशा बंदोबस्तानें तो राहिला होता आणी त्या दिवशीं जर इंग्लिशसैन्यानें आपली जागा सोडली नसती तर त्याचा खचित पराजय झाला नसता. असो. नार्मन लोकांचा पहिला हल्ला जेथें होण्याचा संभव होता त्या ठिकाणीं हॅरोल्डनें केंट परगण्यांतील शिपायांची योजना केली होती. कारण ज्या ज्या वेळीं राजा स्वतः युद्धाला निघे त्या त्या वेळीं युद्धास सुरवात करण्याचा मान. केंटिश लोकांचा, आणि राजाचे शरीरसंरक्षक होण्याचा मान लंडनच्या लोकांचा ठरलेला असे.

उभय दळांची दृष्टादृष्ट होतांच रणभेरी व रणगर्जना यांनीं आकाश दुमदुमून गेलें. रणशिंगें, तुताऱ्या, बिगुलें, पडघम यांचा आवाज सर्वत्र कोंदाटून गेला. नॉर्मन शिपायांनीं पहिला हल्ला केला त्यावेळीं इंग्लिश बहाद्दरानीं तिळभरही माघार न घेतां त्याचा प्रतिकार केला. इंग्लिश छावणीच्या अघाडीस एक लहानसा खंदक होता; तो ओलांडून नॉर्मन फौज पुढें आली होती. परंतु इंग्लिशांनीं तो हल्ला परतविला तेव्हां माघार घेतांना त्या खंदकाचें विस्मरण झाल्यानें कित्येक फ्रेंच स्वार घोड्यासकट त्या खंदकांत पडले. या ठिकाणीं उभय पक्षांनीं

आपल्या पराक्रमाची शिकस्त केली. परंतु नॉर्मन सैन्याची पिच्छेहाट होऊन त्याची भयंकर कत्तल झाली. त्यायोगानें आपल्या फौजेंत अव्यवस्था होऊन ती नामोहरम होत असल्याचें पाहतांच वुइल्यमचा भाऊ 'ओडो' हा पुढें सरसावला व त्यानें सर्वांस धीर दिला. तेव्हां ते सैनिक तेथेंच ठांसून उभे राहिले. याचप्रमाणें ज्या ज्या ठिकाणीं आपले लोक कच खात आहेत व आपली बाजू घसरत आहे असें त्यास दिसून येईल तेथें तेथें समक्ष हजर राहून तो शिपायांना उत्तेजन देत असे.

प्रहर दिवसापासून लढाई भरांत आली. आतां दोन प्रहर उलटून तिसऱ्या प्रहराचा अम्मल सुरू होता. जयाचें पारडें क्षणोक्षणीं खालवर होत होतें. विजयश्री कोणास वरील हें लवकर निश्चित होण्याचें चिन्ह दिसेना. प्रत्येक शिपाई एक पाऊलभरही माघार घ्यावयाची नाहीं अशा कृतसंकल्पानें लढत होता. सैनिकांची शिरगणती, शरीरबळ, व शस्त्रास्त्रें या सर्व बाबतींत उभय दळांची बहुतेक बरोबरी असल्यानें जयप्राप्त करून घेणें मोठ्या मुष्किलीचें काम होतें. अशा रीतीनें समान योद्धयांची गांठ पडली ह्मणजे सेनानीच्या युद्धकुशलतेवरच जयापजय अवलंबून असतो. या बाबतींत नॉर्मन पक्ष किंचित् बलवत्तर होता. हॅरोल्ड जरी कट्टा शूर व युद्धकुशल सेनापति होता तथापि वुइल्यमच्या समयस्फूर्तिपुढें त्याचें तेज फिकें पडलें.

नॉर्मन तिरंदाजांनीं शत्रूवर सारखा बाणांचा वर्षाव चालविला होता. पण कितीही जोरानें व अचूक नेम मारला तरी सॅक्सन लोकांच्या ढालीवर त्यांचा कांहीं परिणाम होईना. याप्रमाणें आपले सर्व श्रम निष्फळ होत असल्याचें पाहून वुइल्यमनें एक शक्कल काढिली, आणि आपल्या तिरंदाजांस समोर तीर न सोडतां ते उंच आकाशांत सोडण्याला त्यानें

हुकूम केला. तेव्हां ते बाण वर जाऊन लंबरेषेनें सॅक्सन सैनिकांच्या डोकीवरील शिरस्त्राणांतून आंत घुसूं लागले. त्यायोगानें डोक्यास मर्मस्थानीं जखमा होऊन सॅक्सन वीर पटापट मरूं लागले. डोळे उचलून वर पाहण्याची तर कोणाचीच छाति होईना. छातीवरील ढाल सोडून डोकीवर धरावी तर तिकडूनही आपलें मर्मस्थान असुरक्षित पाहून त्याचा फायदा घेण्याला शत्रु टपलेलाच. अशा रीतीनें सर्वत्र धांदल उडून गेली असतां तो शरवर्षाव जास्तच जोरानें होऊं लागला. आपल्या सैन्याची ही दुर्दशा पाहून त्याजवर काय तोड काढावी या विवंचनेंत हॅरोल्ड असतां त्याच्या उजव्या डोळ्यावरील भिवईंत एक तीर घुसला व त्यानें त्याचा डोळा फोडून बाहेर काढला. हॅरोल्डनें संतापाचे भरांत तो बाण बाहेर काढून त्याचे तुकडे केले; पण त्या बाणानें आपली कामगिरी चोख बजावून सोडिली. त्या जखमेमुळें होणाऱ्या वेदना दुःसह होऊन हॅरोल्ड आपल्या ढालीवर डोकें टेंकून स्तब्ध उभा राहिला. त्यावेळेपासून इंग्लिशांची बाजू घसरत चालली. तथापि अजून त्यांनीं धीर सोडला नव्हता किंवा माघार घेतली नव्हती. यानंतर नार्मन्सनीं दुसरी एक युक्ति करून पलायनाचें मिष केलें. ज्या युक्तीचा उपयोग करून हॅरोल्डनें हॅड्रेडाचा नुकताच पराभव केला होता त्याच युक्तीनें तो स्वतः फसेल हें संभवनीय नव्हतें. परंतु या वेळीं त्याचें चित्त स्वस्थ नव्हतें; आणि त्याच्या सैनिकांत तितका पोंच न राहिल्यामुळें 'हुरळली मेंढी आणि लागली लांडग्याच्या पाठीस' अशी गत त्यांनीं केली. टेकडीवरील मजबूत जागा सोडून पुढें येण्याचाच कायतो अवकाश, लगेच नार्मन स्वारांनीं उलट खाऊन आपला पाठलाग करणारांचा खरपूस समाचार घेतला. त्यावेळीं विजयी सैनिकांच्या रणगर्जनेनें आकाश पाताळ दणाणून गेलें. सॅक्सन सेनेचा जो संहार झाला तो 'न भूतो न भविष्यति.' नार्मन सैन्य पुढें रेटीत रेटीत चाललें आणि

इंग्लिश लोक मोठ्या बेलाप्रमाणें मागें हटूं लागले. वुइल्यमचे घोडेस्वार इंग्लिशांच्या निशाणापावेतों येऊन थडकले. तेथें हॅरोल्ड हा आपल्या फौजेस थोपवून धरण्याचा विश्व प्रयत्न करीत होता; पण त्याचे सर्व प्रयत्न निष्फल होऊन नॉर्मन लोकांची सरशी झाली आणि त्यांनीं त्यास चोहोकडून गराडा दिला. आधींच तो पूर्वीच्या जखमेनें विव्हळत होता. त्यांत आपल्या सर्व सैन्याचा डोळ्यादेखत आतां संहार होणार, हें मनांत येऊन त्यास उद्विग्नता आली. जखमेंतून रक्तस्राव अति झाल्यानें त्याच्या डोळ्यापुढें अंधारी आली. अशा समयीं एका नॉर्मन शिपायानें गर्दीतून पुढें घुसून त्याच्या डोकीवर वार केला. त्याचे पाठोपाठ दुसऱ्या एका सरदारानें त्याचे मांडीचें हाड मोडून टाकलें. त्यासरसा हॅरोल्ड रणभूमीवर पतन पावला. 'गर्थ' नें हें पाहून लढाईचा परिणाम ताडला, आणि उरलेल्या शिपायांचा बचाव हरप्रयत्नेंकरून करावा व पुढें कधीं काळीं साधल्यास फिरून लढाई द्यावी असें त्यानें मनांत योजिलें. पण आतां त्याला जिवानिशीं सुटून जाणेंच शक्य नव्हतें. चोहोंकडे शत्रूंचा वेढा पडला होता. त्यांतून युक्तीनें किंवा शक्तीच्या जोरावर बाहेर पडणें दुर्घट होतें. वुइल्यमची दृष्टि त्याजकडे वळलीच. त्यानें आपला घोडा त्याजवर घालून 'गर्थला' असा एक तडाक्याचा वार केला कीं, त्यासरसा तो जमीनदोस्त झाला. फिरून कांहीं त्यानें डोकें वर केलें नाहीं.

वुइल्यमनें इंग्लिश निशाण खालीं पाडून हस्तगत करून घेतलें. या लढाईनंतर त्यानें तें पोपकडे बहुमोल नजराणा म्हणून पाठविलें. इकडे इंग्लिश सैन्यांत हॅरोल्ड व गर्थ मरण पावून निशाण शत्रूचे स्वाधीन झाल्याचें कळतांच पळापळ सुरू झाली. कांहीं सैनिक किंकर्तव्यतामूढ होऊन तसेच लढत राहिले. परंतु सायंकाळ होतांच

त्यांनीं लढण्यांत कांहीं अर्थ नाहीं असें पाहून मागला रस्ता सुधारला. रणभूमीवर एकही सॅक्सन वीर जीवंत राहिला नाहीं. याप्रमाणें इंग्लिशांचा पुरा मोड होऊन वुइल्यमला विजयश्रीनें वरिलें. या लढाईंत वुइल्यमनें जातीनिशीं चांगलाच पराक्रम गाजविला. कित्येक हल्ल्यांत तो स्वतः पुढारी होता. शत्रुपक्षाचे मोठमोठे नांवाजलेले सरदार त्यानें यमसदनास पाठविले. त्याचे खालचे दोन घोडे ठार झाले व त्याला कित्येक जखमा झाल्या; तथापि तिसरा घोडा मागवून त्याजवर स्वार होऊन तो शेवटपर्यंत लढतच होता.

या प्रमाणें जय प्राप्त होतांच वुइल्यमनें तेथेंच ईश्वराची प्रार्थना केली. आपल्या सरदारांच्या पराक्रमाबद्दल त्यानें त्यांची पाठ थोपटली व जे सरदार लढाईंत कामास आले त्यांच्याबद्दल त्यानें विचारपूस केली. नंतर त्या रात्रीं त्यानें रणभूमीवरच मुक्काम केला. पुढें ता. २५ दिसेंबर इ. स. १०६६ रोजीं वुइल्यमला लंडन येथें राज्याभिषेक झाला; आणि त्या दिवसापासून इंग्लंड देश नॉर्मन लोकांच्या ताब्यांत जाऊन इंग्लंडच्या इतिहासाला निराळें वळण लागलें.

जगातील क्रांतिकारक लढाया.

भाग ९ वा.

'आर्लीन्सचा वेढा' इ. स. १४२९.

पूर्वी सॅलेमीसची लढाई होऊन त्यांत ग्रीक लोकांना जय मिळाल्या नंतर त्या लढाईत ज्यांनीं मर्दुमकी गाजविली त्यांना मताधिक्याप्रमाणें नंबरवारीनें बक्षिसें देण्याकरितां अथेन्स येथें सभा भरली. त्यावेळीं मत दारांनीं मतें दिलेले कागद पाहतां प्रत्येकानें आपलें नांव शिरोभागीं लिहून नंतर दुसऱ्या नंबरास थेमिस्टॉक्लीसचें नांव नमूद केलें होतें. त्यावरून थेमिस्टाक्लीसनें सर्वांत अधिक पराक्रम केला असें निर्विवाद ठरलें. त्याचप्रमाणें युरोपखंडांत हल्लीं जी सुधारणा दिसून येत आहे ती घडवून आणण्यांत कोणत्या राष्ट्राचा किती वांटा आहे असा प्रश्न निघाल्यास इंग्लंड, जर्मनी, ग्रीस, रोम, स्पेन, इत्यादि राष्ट्रें आपला हक्क पहिल्या नंबरावर सांगतात. मात्र सर्वानुमतें दुसऱ्या नंबराचा मान फ्रान्सचा आहे. यावरून फ्रान्स देशाचें महत्त्व युरोपियन प्रगतीच्या इतिहासांत केवढें आहे हें उघड होतें. युरोपांतील हल्लींचें कलाकौशल्य, वाङ्मय, चालीरीति, आचारविचार या सर्वांत फ्रान्सचें वळण बऱ्याच अंशानें आहे. त्याकरितांच या देशाच्या पूर्वेतिहासाकडे इतिहासशास्त्रज्ञांचें लक्ष वेधतें, आणि इ. स. १४२९त आर्लीन्सचे वेढ्याचे वेळीं त्या देशावर जें गंडांतर आलें होतें, व ज्यांतून त्या देशाची सुटका एका गरीब शेतकऱ्याच्या

पोरीच्या हातून झाली त्या आर्लीन्सच्या वेढ्याची गणना क्रांतिकारक लढायांत करणें त्याच कारणास्तव अवश्यक आहे.

इ. स. १४२८त इंग्लिशांनीं ऑर्लीन्सला वेढा घातला व हळू हळू त्यांनीं त्या शहराच्या नाड्या आंखडित आणिल्या. त्यावेळीं फ्रान्सचें स्वातंत्र्य बहुतेक नष्टप्राय झालें होतें व फ्रान्सचें स्वातंत्र्य कायम राहणें अशक्य आहे असेंच सर्वांस वाटत होतें. इतक्या आसन्नमरण स्थितीस येऊन दुसरा कोणताही देश त्यांतून फ्रान्सप्रमाणें सत्वर बचावला नसेल. शतसांवत्सरिक युद्ध सुरू झाल्यापासून फ्रान्सच्या कपाळीं नुसता पराजयच लिहिला होता. प्रत्येक लढाईत भयंकर संहार होत गेल्यानें त्या देशांतील शिलेदारांची संख्या घटत चालली व उरलेल्या सैनिकांचें धैर्य गलित झालें. इंग्लंडच्या राजाच्या नांवें फ्रान्स देशाच्या राजधानींतच द्वाही फिरली होती. इंग्लंडचें सैन्य कसलेलें व शूर आणि सेनापति आपल्या कामांत निष्णात. फ्रान्सचे सर्व सुपीक प्रांत अशा नाणावलेल्या सैन्याच्या स्वाधीन झालेले. येणेंप्रमाणें फ्रान्सवर संकटांचा कहर गुदरला होता. या सर्व संकटासही त्या देशानें जुमानले नसतें. परंतु आपापसांत दुही, वैमनस्य, कलह, विश्वासघात या दुर्गुणांनीं त्या देशाचें मातेरें करून सोडलें होतें. हजारो उघड परशत्रू पुरवले; पण हे अंतःशत्रु नकोत असें फ्रान्सला होऊन गेलें. फ्रान्सचा राजा विषयांध असून त्याच्या शब्दास फुटक्या कवडीचीही किंमत नव्हती. त्यांतच त्यानें एका प्रबल सरदाराचा खून करविल्यामुळें त्या कृत्याचा सूड उगविण्याकरितां त्या सरदाराचा पुत्र शत्रूस जाऊन मिळाला होता. इंग्लंडच्या राजाच्या नांवानें पारींसमध्यें द्वाही फिरल्यानें कित्येक सरदार, धर्माध्यक्ष, दंडनायक व इतर अम्मलदार यांनीं इंग्लंडशीं निमकहरामी न करण्याची शपथ वाहिली होती. देशांत लढाया व शत्रूंचा सुळसुळाट चालू अस-

ल्यानें सर्व मुलूक प्रदेश ओसाड झाला होता. देश अराजक होऊन सर्वत्र बजबजपुरी माजून गेली होती.

इ. स. १४२८च्या पावसाळ्यापर्यंत इंग्लिशांनीं लॉयर नदीच्या उत्तरेकडील सर्व मुलूख बळकावला. दक्षिण भागांत अद्यापि फ्रान्सच्या राजपुत्राच्या पक्षाचे कांहीं प्रांत होते ते जिंकण्याच्या उद्योगास इंग्लिश सैन्य लागलें. फ्रान्समधील स्वदेशाभिमानी मंडळीचें ऑर्लीन्स शहर हें केंद्रस्थान होतें. तें एकदां इंग्लिशांच्या हस्तगत झालें ह्मणजे सगळा फ्रान्स देश त्यांच्या स्वाधीन झाल्याप्रमाणें होता. याकरितांच इंग्लिश सेनापति सॅलिसबरीचा अर्ल यानें आपला मोर्चा त्या शहराकडे वळविला. आजूबाजूचीं किरकोळ ठाणीं मारून ता. १२ आक्टोबर १४२८ इ. रोजीं तो आर्लीन्सपुढें येऊन दाखल झाला.

आर्लीन्स शहर हें लॉयर नदीच्या उत्तर तीरावर वसलेलें आहे. परंतु त्याशहराचे कांहीं भाग नदीच्या दक्षिण तीरावर असून दोहोस जोडण्याकरितां नदीवर एक दगडी पूल आहे. या पुलाचे संरक्षणार्थ त्याचे दक्षिण टोकावर दोहो बाजूंस दोन बुरूज आहेत. त्यापुढें एक खंदक असून त्यावर एक सुटा पूल आहे आणि त्या पुलाच्या पलीकडील अंगास एक गढी आहे. ही गढी जोंपर्यंत आर्लीयन्सच्या ताब्यांत राहील तोपर्यंत दक्षिण प्रांताशीं त्यांचें दळणवळण चालू राहणार, व तिकडे त्यांच्या पक्षाची वस्ति अधिक असल्यानें त्यास वेढ्याचे वेळीं कुमकही चांगलीच मिळणार. यास्तव ही गढी काबीज करून घेईपर्यंत आर्लीन्स येथील शिबंदी वेढ्यास दाद देणार नाहीं हें इंग्लिश सेनापतीस उघड दिसत होतें, ह्मणून ता. २३ आक्टोबरला त्यानें त्या गढीवर हल्ला करविला; आणि शत्रूच्या मारास दाद न देतां इंग्लिशांनीं तें ठाणें काबीज करून घेतलें. परंतु आर्लीन्समधील शिबंदी लोकांनीं दरम्यानचा

दगडी पूल पाडून टाकल्यानें खुद्द आर्लीन्सवर चढाव करून येण्यास शत्रूला प्रतिबंध झाला. तथापि इंग्लिश सेनापतीनें त्या गढीवरून किल्ल्यावर तोफांचा मारा करण्यास सुरवात केली. वेढ्याचे कामीं तोफांचा उपयोग नुकताच होऊं लागला असल्यानें त्यापासून तादृश फायदा झाला नाहीं. किल्ला सर करण्याचा त्या काळचा धोपट मार्ग म्हणजे किल्ल्यांत जाणारी रसद बंद करून आंतील लोकांस उपासमारामुळें शरण येण्यास भाग पाडणें हाच होय. आर्लीन्सचा किल्ला मजबूत असून आंत सामुग्रीचा पुरवठा भरपूर होता. शिवाय किल्ल्याचे बाजूस नदी असल्यानें बाह्य प्रदेशाशीं दळणवळण बंद करणें इंग्लिश सैन्यास अवघड होतें. तथापि लॉर्ड सॅलिस्बरी यानें तें काम नेटानें चालविलें. परंतु पुढें लवकरच तो दुर्दैवानें तोफेचा गोळा लागून ठार झाला. त्या नंतर लॉर्ड सॅफॉक हा सेनापति झाला. त्यानेंही वेढ्याचें काम जारीनें व चतुराईनें चालविलें.

आर्लीयन्सही आतां अगदीं मेटाकुटीस आले होते त्यांनीं शरण येऊन 'इंग्रजाकडे फितुर झालेल्या बर्गंडीच्या डयूकचे हवालीं तें शहर करतों' असें बोलणें चालविलें. परंतु इंग्लिश राजाप्रतिनिधि डयूक ऑफ् बेडफर्ड यास ही अट मान्य झाली नाहीं. कारण ऑर्लीन्स शहर बिन अटीनें स्वाधीन होण्यास कालावधि नको असा त्याचा अंदाज होता. फ्रान्सचा राजपुत्र आपल्या दरबारासह चिनॉन येथें जाऊन राहिला होता. स्वराज्य व स्वदेश यांच्या संरक्षणार्थ लढण्याचीं त्यास पुरा कंटाळा येऊन तो आतां देशत्याग करण्याचा विचारांत होता; परंतु त्याची राणी आणि नाटकशाळा यांच्या अंगीं त्याच्याहून पौरुष अधिक असल्यानें त्यांनीं त्यास असल्या विचारापासून परावृत्त केलें. पण उपयोग काय? देशांतर न करितां देशांतच तळ देऊन राहिलें तरी

इंग्लिशांशीं लढण्यास सैन्य कोठून जमवावें, व त्या सैन्याचा पुढाकार कोणी घ्यावा ह्या प्रश्नाचा कांहीं निकाल लागेना. त्यावेळीं आर्लीन्सचा वेढा उठविणें, व फ्रान्सदेशास स्वतंत्रता मिळवून देणें, हीं कामें एका गरीब कुणब्याच्या पोरीच्या हातून घडून येतील असें भाकित करण्यचें धाडस मोठ्या भविष्यवाद्यांसही झालें नसतें. परंतु ईश्वरीसूत्र कांहीं अतर्क्य आहे.

लोरेन नदीतीरीं डाम्रेमी नांवाच्या खेड्यांत आर्कचा जेकेस ह्मणून एक गरीब कुणबी रहात होता. त्याच्या वडील मुलीचें नांव जीनेट असें होतें. इंग्लिश भाषेंत त्याचेंच जोन असें रूपांतर झालें आहे. जोन ही यावेळीं अठरा वर्षांची होती. तिचा स्वभाव जात्याच श्रद्धालु होता. त्यांत यक्षिणीच्या कल्पित गोष्टी, साधुसंतांच्या अद्भुत चमत्कारांच्या दंतकथा ऐकण्याची तिला अति हौस असे. तिचा नित्य व्यवसाय बापाचीं मेंढरें राखण्याचा असल्यानें तिचा काल एकांतांत जात होता. त्यामुळें तिचे मनांत कोणतीहि चमत्कारिक गोष्ट फार लवकर बिंबत असे. ईश्वरावर भक्ति, सच्छील वर्तन, आणि आनाथ, अपंग, व रुग्ण यांची शुश्रूषा याविषयीं तिचा मोठा लौकिक होता. ती जसजशी मोठी होऊं लागली तसतशी तिच्या अंतःकरणांत देशाभिमानाची ज्योत पेट घेऊं लागली. इंग्लिशांचे तडाक्यांतून फ्रान्स देशाची सुटका कशी होईल याविषयींच्या चिंतनांत तिनें सदोदित मग्न असावें, व रात्रीं स्वप्नांतही तिच्या डोळ्यापुढून तो विषय दूर होऊं नये. तिनें साधुसंतांचीं चरित्रें ऐकिलीं होतीं; त्यांत भक्तसंकटनिवारणार्थ ईश्वर अतर्क्य योजना करितो ही गोष्ट तिच्या मनांत पक्की ठसली होती. तो विचार सदोदित तिच्या डोक्यांत घोळत असल्यानें आपणास ईश्वरी प्रेरणा झाली असें तिच्या मनानें घेतलें. 'आर्लीन्सचा वेढा उठवून

चार्ल्सला ऱ्हीम्स येथें राज्याभिषेक करण्याबद्दल देवदूत आपणास सांगत आहत असें तिच्या मनानें घेतलें'. सरतेशेवटीं तिनें आपल्या आई-बापांस कळविलें कीं 'आर्लीन्सचा वेढा उठविण्याकरितां व्हाकोलूर येथील सेनाधिकारी ब्राड्रिको याजकडे मी जाणार; कारण मी राजास साहाय्य करून फ्रान्सचें संरक्षण करावें असा ईश्वरी संकेत आहे'. हें ऐकून तिच्या मातापितरांस अत्यंत संताप आला. शिपायांच्या छावणींत जाऊन तेथील दुष्ट संगतीनें नीतिभ्रष्ट होण्यापेक्षां तूं मरण पावशील तर बरें, असेही त्यांनीं दुःखोद्वेगानें उद्गार काढिले. परंतु तिचा निश्चय ढळला नाहीं. तेव्हां तिच्या चुलत्यानें तिला व्हाकोलूर येथें पोचविण्याचें कबूल केलें. त्याप्रमाणें ती सेनापति ब्रॉड्रिकोपुढें जाऊन उभी राहिली आणि तिनें त्याला आपला हेतु कळविला. प्रथमतः त्यास ती वेडी असावी असें वाटून तो तिची थट्टा करूं लागला. परंतु तिचा निश्चय व तिची अंतःकरणपूर्वकता पाहून त्याचें मत बदललें. तिला खरोखरीच ईश्वरी प्रेरणा झाली आहे असें जरी त्यास वाटलें नाहीं, तथापि तिच्या प्रेरणेच्या कल्पनेनेंच राजपुत्रास चांगला उपयोग होईल असें त्यास वाटलें.

तिची ईश्वरनिष्ठा पाहून व्हाकोलूरचे रहिवाशी तिच्या पक्षास वळले व तिच्यावर त्यांचा दृढ विश्वास बसून तिला प्रेरणा झालेली खरी असें तेही मानूं लागले. ती ह्मणे 'मला हा असला उपद्व्याप कोठें हवा होता. माझ्या बापाचीं मेंढरें राखीत मी स्वस्थ राहिलें असतें. परंतु मला अंतःस्फूर्ति होत आहे कीं, माझ्या साहाय्यावांचून फ्रान्सची धडगत नाहीं. ह्मणून ईश्वरी प्रेरणेनेंच मी माझ्या देशाचे संरक्षणार्थ पुढें आलें आहे.' या प्रकारचें तिचें भाषण ऐकून व तिचें पवित्र आचरण पाहून तिच्याविषयींची बातमी हां हां ह्मणतां पसरली. ब्राड्रिकोनें योग्य बंदो-

बस्तानें व इतमामानिशीं तिला चिनॉन येथें चार्ल्सकडे पाठविलें. तेथें येऊन पोहोचल्यावर कांहीं वेळानें तिला राजास भेटण्याची परवानगी मिळाली. तिची परीक्षा पाहण्याकरितां चार्ल्सनें आपल्या सरदारलोकांपेक्षां हलक्या प्रतीचा पोशाख केला होता; व तो त्यांच्यांतच मिसळून उभा राहिला होता. परंतु जोननें त्याला अचूक निवडून काढिलें व त्यापुढें गुडघे टेंकून ती म्हणाली 'राजन्, माझ्या हस्तें तुला ऱ्हीम्स येथें राज्याभिषेक व्हावा व ईश्वराचा प्रतिनिधि या नात्यानें तूं फ्रान्स देशावर राज्य करावें असा ईश्वरी संकेत देवदूतांकडून कळून मी तुझ्या साहाय्यास आलें आहे.'

इकडे सर्व देशभर जोननें राजास दैविक प्रेरणेनें चमत्कारानें ओळखिलें अशी बातमी पसरली. विपत्काल जाऊन आतां ईश्वर आपणांस चांगले दिवस दाखवील अशी त्यामुळें सर्वांस आशा वाटूं लागली. यापूर्वी फ्रान्सच्या यच्चयावत् प्रजेची नीति बिघडल्यामुळें अखिल देशावर राष्ट्रीय संकटें येत होतीं. परंतु विपत्काल आल्यानें फ्रान्सचें शील सुधारत चाललें व विजयानंदाच्या भरांत इंग्लिश सैन्य मदोन्मत्त व दुर्वृत्त बनत चाललें. या व्युत्क्रम स्थितीस अनुसरून जयाचें पारडेंही आतां बदलेल असा सर्व प्रजेंत आशातंतु उद्भवला. त्यायोगानें सर्व फ्रान्स देशांत धार्मिकतेची लाट उसळली. शेकडों धर्माधिकारी व मठवासी शहरांतून आणि खेड्यापाड्यांतून धर्मोपदेश करूं लागले. त्यांच्या उपदेशाप्रमाणें राष्ट्रीय संकटांतून मुक्त करण्याकरितां प्रत्येक मनुष्य ईश्वराचा धांवा करूं लागला.

या आकस्मिक धार्मिक जागृतीमुळें जोनचा दुहेरी फायदा झाला. फ्रेंच लोक तिची ईश्वरानेंच आपल्या सर्वांच्या मुक्ततेकरितां रवानगी केली आहे असें मानून [illegible]यावर अत्यंत श्रद्धा ठेवून वागूं लागले.

इंग्लिश व बर्गंडियन लोक तिची सैतानाच्या दूतांत गणना करूं लागले. परंतु उभय पक्षांस तिची अमानुष शक्ति मान्य असल्यानें फ्रेंचांचें धैर्य द्विगुणित झालें व इंग्लिश शिपाई त्याच मानानें गर्भगळित झाले. प्रथमतः राजपुत्र चार्ल्स यास शंका वाटत होती कीं, आपण हिच्या नादीं लागलों व पुढेंमागें ती डाकीण अगर चेटकीण आहे असें ठरलें तर आपल्या दुःस्थितीचा कळस होऊन आपला पुरा नायनाट होईल. याकरितां त्यानें व त्याच्या मंत्रिमंडळानें, जोनच्या साधुत्वाविषयीं जितकी कसोटी लावून पहावयाची तितकी पाहिली; आणि जेव्हां तिच्या धार्मिकतेबद्दल किंवा सच्छीलाबद्दल काडीमात्र संदेह राहिला नाहीं, त्यावेळीं ते तिच्या सल्ल्याप्रमाणें वागण्यास तयार झाले.

चार्ल्स आणि त्याचे सल्लागार यांनीं जरी तिच्या ह्मणण्यास रुकार दिला तथापि ते केवळ श्रद्धांध बनले नाहींत. सेनापति ड्यूनाईस हा तर तिचे हुकूम लष्करी दृष्टीनें कुचकामाचे असल्यास क्वचित्च पाळी. परंतु खालच्या दर्जाच्या सैनिकावर आणि सामान्यजनतेवर तिची जी एकदां छाप बसली ती कायम झाली. इकडे जोनच्या खरेखोटेपणाबद्दल चार्ल्सचा विचार चालला असतां तिकडे आर्लीन्सच्या नाड्या अगदीं सुटत चालल्या. बाह्य प्रदेशाशीं त्याचें दळणवळण बहुतेक बंद झालें. आर्लीन्सच्या रहिवाशांनींही जोनची कीर्ति ऐकली होती. ह्मणून त्यांनीं आपल्या राजास जोनबरोबर अन्नसामुग्री पाठवून देण्यास विनविलें. त्याप्रमाणें सेनापति ड्यूनॉइस यानें ज्या सैन्याबरोबर रसद पाठविण्याची तयारी केली होती त्या सैन्याबरोबरच जोनची आर्लीन्सकडे रवानगी करण्याचें ठरलें.

यावेळीं फ्रेंच सैन्याचा तळ ब्लाइस येथें पडला होता. पराजयामुळें तें जरी खट्टू झालें होतें, तथापि कटु अनुभवानें त्यास शहाणपणा

आला होता. या सैन्याचे छावणींत जोन येऊन दाखल झाली. तिनें अंगांत नवीन झगझगीत चिलखत घातलें होतें. काळ्या खंद्या घोड्यावर ती स्वार झाली होती. तिनें हातांत भाला घेतला होता; त्याची फेंक करण्याची तिची हातोटी अवर्णनीय होती. तिनें तिरस्त्राण घातलें नसल्यानें तिचा सुबक व मोहक चेहरा सर्वांस स्पष्ट दिसत होता. सेंटकॅथेराइनच्या देवळांतून तिच्या आज्ञेनें काढून आणलेली पंचकूसांकित तलवार व एक परशु हीं हत्यारें तिजपाशीं होतीं. आकाशवाणीनें सांगितल्या प्ररकारचें एक निशाण, त्याजवर कशिदा कौरे काढून तिनें तयार केलें होतें; तें घेऊन एक हुजऱ्या नेहमीं तिच्याजवळ रहात असे. अशा जामानिम्यानिशीं ती सैन्यांत येऊन दाखल झाली. तिचें प्रमाणबद्ध अंगसौष्टव, शस्त्रधारणलाघव आणि अश्वारोहणकौशल्य पाहून त्या सैनिकांस तिच्याविषयीं आदरबुद्धि निपजली. तिचें लष्करी शिक्षण फारच अल्प झालें होतें; पण तेवढ्या अल्पज्ञानाचा चांगला उपयोग कसा करावा हें तिला अवगत होतें. लष्करच्या हालचाली करणें वगैरे बाबींत स्वतः ढवळाढवळ न करितां, ड्यूनाईस व इतर सरदारांकडे तिनें त्या गोष्टी सोंपवून दिल्या होत्या. युद्धाचा तिचा एक धोपट मार्ग म्हणजे शत्रूवर तुटून पडण्यास फौजेस हुकूम द्यावयाचा व आपण सर्वांचे पुढें होऊन स्वकृतीनें सैन्यास उत्तेजन द्यावयाचें. पण एवढ्यानेंच सैन्याच्या हातून अतर्क्य करामत घडून येई. शिपायांच्या नैतिक वर्तनावर तिची करडी नजर असे. जे शिपाई अनीतिपूर्ण असून ज्यांची सुधारणा होण्याची आशा नव्हती, त्यांस तिनें सैन्यांतून हांकून लाविलें. सेनाधिकारी व सैनिक या सर्वांस सर्व धार्मिक विधि बिनचूक पाळण्यास तिनें भाग पाडिलें. सैन्याचा मुक्काम पडतांच तळावर वेदि तयार होऊन प्रायश्चित्तविधि होई. शिव्यागाळी, शपथ घालणें वगैरेची सक्त मनाई होती. या सर्व तिच्या आज्ञा जुनेपुराणे आणि आडदांड शिपाईही निमटपणें पाळीत.

याप्रमाणें तिच्या उपदेशानें त्यांनीं आपली हाडींमासीं खिळलेली पशुवृत्ति सोडून दिली; आणि स्वदेशसंरक्षणाचे पवित्र कामांत शुद्धांतःकरणानें वागल्यास त्या ईशप्रेरित कुमारिकेच्या नायकत्वाखालीं आपणांस खचित यश मिळेल असें त्यांस वाटूं लागलें.

ड्यूनॉईस, हिरे, इत्यादि फ्रेंच सरदारांसह आर्लीन्स शहरास रसद पोंचविण्यास जोन ता. २५ एप्रिल १४२९ रोजीं ब्लॉइस येथून निघाली. तिसरे दिवशीं त्या सैन्याचा तळ आर्लीन्सच्या जवळ पडला. आर्लीन्समधील अन्नसामुग्री अगदीं सरत आली असल्यानें तें शहर आतां लवकरच बिनशर्तीनें शरण येणार या घमेंडींत इंग्लिश सैन्य या वेळीं बेसावध होतें. चौकीपाहऱ्याचा बंदोबस्त कच्चा होता. त्यांतच त्या रात्रीं विजांचा कडकडाट, मेघांचा गडगडाट व मुसळधारा पाऊस सुरू झाला. ही संधि साधून फ्रेंच सैन्य रसद घेऊन आपल्या तोफखान्यासह किल्ल्यांत शिरलें. दुसरे दिवशीं प्रांतःकाळीं अंगांत चिलखत घालून एका बगळ्या रंगाच्या घोड्यावर आरूढ होऊन ती 'कुमारिका' तेथील मुख्य प्रार्थनामंदिरांत गेली. ज्यांना ज्यांना ती आदल्या मध्यरात्रीं भर पावसाचे वेळीं किल्ल्यांत आल्याचें कळलें नव्हतें, त्यांना त्यांना ती त्या शहराचें रक्षण करण्याकरितां स्वर्गातून अवतरलेल्या देवतेप्रमाणें भासली. प्रार्थनामंदिरांत गेल्यावर देवानें शहरवासीयांस कुमक पाठविल्याबद्दल आभारप्रदर्शक कवनें गाण्यांत आलीं.

'जोन' आर्लीन्सच्या किल्ल्यांत शिरल्याचें वर्तमान जेव्हां इंग्लिश सैन्यांत पसरलें तेव्हां तें भीतीनें गांगरून गेलें. ती एक चेटकीण असून जादूच्या साहाय्यानें अमानुष कृत्यें करून ती आपला फडशा पाडणार अशी त्यांस धास्ति पडली. लॉरेन प्रांतांतील एक कुमारिका फ्रान्स देशाचें परशत्रूपासून संरक्षण करणार असें एक पुरातन भविष्य

असल्याचें फ्रेंच व इंग्लिश लोकांस माहीत होतें. तें खरें ठरण्याचा समय प्राप्त झालेला पाहून फ्रेंच लोकांस स्फुरण चढलें आणि इंग्लिश सैन्यानें हातपाय गाळण्यास प्रारंभ केला. जोन किल्ल्यांत आल्याच्या चौथ्या दिवशीं आणखी कांहीं फ्रेंच सैन्य दारूगोळा, अन्नसामुग्री घेऊन किल्ल्यासमीप आलें त्यावेळीं जोन त्यास सामोरी गेली आणि युद्ध-सामुग्री व रसद लादलेल्या गाड्या बेधडक तिच्याबरोबर किल्ल्यांत आल्या. हें सर्व कृत्य इंग्लिश शिपाई आपल्या छावणींतून अगर मोर्चांतून पहात होते. परंतु आजवरच्या त्यांच्या परिपाठाप्रमाणें ती कांहीं लुटण्याचें त्यांस अवसान राहिलें नाहीं.

येथवर जोनची कामगिरी हातीं शस्त्र धारण न करतांच झाली. घनघोर रणसंग्रामांत भयंकर रक्तपाताचे प्रसंगीं तिचें धैर्य कितपत टिकतें हें पाहण्याचीही संधि लवकरच आली. नवीन युद्धसामुग्री किल्ल्यांत आल्याचे दुसऱ्या दिवशीं ड्यूनाईसनें योग्य संधि साधून इंग्लिशांच्या सेंटलोप नांवाच्या तटबंदीवर हल्ला केला. हा फ्रेंचांचा हल्ला अति निकराचा होता; तथापि इंग्लिशांनींही धैर्यानें त्यास तोंड दिलें. ही धुमश्चक्री चालू असतां जोन जागी झाली. ईश्वरी प्रेरणेनेंच आपणास लढाईस जाण्याकरितां जागृत केलें अशा भावनेनें तिनें आपला घोडा व शस्त्रास्त्रें तावडतोब मागविलीं; व ज्या दरवाजानें आपलें सैन्य लढाईस बाहेर पडलें होतें त्याच वाटेनें ती निघाली. इकडे फ्रेंच सैन्य पराभूत होऊन घावऱ्या घाबऱ्या परत पळत सुटलें होतें. जे पळपुटे धूम ठोकीत किल्ल्याकडे निघाले होते त्यांच्या दृष्टीस जोनचें निशाण पडतांच ते शरमिंदे झाले. पळून जाण्याचा आपला बेत रहित करून ते जोनच्या निशाणाखालीं जमले व फिरून त्यांनीं इंग्लिश तटबंदीवर हल्ला केला. तिचें निशाण आणि तिच्या अनुयायांचा आवेशाचा मारा पाहून इंग्लिशांच्या तोंडचें पाणी

पळालें. त्यांचे हातपाय लटपटूं लागले आणि त्यांचीं शस्त्रें त्यांच्या हातांतून गळून पडूं लागलीं. हें पाहून फ्रेंचांस दुप्पट आवेश चढला. त्यांनीं शत्रूच्या शिबंदीची एकसहा कत्तल उडविली. शेवटीं जोननेंच दयाळूपणानें ती कत्तल बंद करविली म्हणून कांहीं शिपायांचे प्राण वांचले. युद्ध आटोपतांच तिचा रणमद उतरला व तो भयंकर प्रेतांचा समूह पाहून तिचें कोमल अंतःकरण विव्हळ झालें.

दुसरे दिवशीं येशूचा स्वर्गारोहण दिवस असल्यानें तो तिनें ईश्वर-भजनांत घालविला. पुढें फ्रेंच सेनापतींनीं शहरच्या दक्षिण दिशेकडील इंग्लिशांच्या बुरुजावर चढाव करून जाण्याचें योजिलें. ठरल्याप्रमाणें फ्रेंच सैन्य होड्यांचे साहाय्यानें लॉयर नदीपार गेलें. कांहीं वेळ हात-घाईची लढाई होऊन फ्रेंचांनीं इंग्लिशांस हुसकून लावून त्यांचे दोन बुरूज काबीज केले. आतां इंग्लिशांच्या ताब्यांत टूरेल नामक पडकोटा-खेरीज दुसरें कोणतेंही ठाणें राहिलें नाहीं. पण तें फार मजबूत असून तेथून शहरांत येणाऱ्या पुलावर मारा करितां येण्याजोगा होता. त्यासाठीं किल्ल्याचा वेढा उठविण्यास तें ठाणें काबीज करणें अवश्यक होतें. गेल्या पांच सात दिवसांत जोननें जी कामगिरी केली होती आणि फ्रेंचांस जे जय मिळाले होते त्यायोगानें त्यांची हुरूप विलक्षण वाढली होती व तितक्याच मानानें शत्रू नामोहरम झाले होते. हे उमेदीचे दिवस व्यर्थ दवडल्यास तें वारें निघून जाईल व इंग्लिश सैन्यही हळू हळू पूर्ववत् धीट होईल, या सर्व साधकबाधक गोष्टींचा विचार करून ड्यूनॉईसनें दुसऱ्याच दिवशीं टूरेलवर हल्ला करण्याचें ठरविलें. हें काम अत्यंत कठिण व धोक्याचें होतें.

मे महिन्याच्या सातव्या तारखेस प्रातःकाळीं फ्रेंच फौजेंतील निवडक असे हजारों लोक जोनच्या हुकुमानें लढाईस तयार झाले. त्यांनीं

प्रथम प्रातःस्मरण करून नंतर स्वपापोच्चारण केलें. मग आदल्या दिवसाप्रमाणें नावांच्या साह्यानें नदी उतरून त्यांनीं दूरेलवर हल्ला सुरू केला. त्यावेळीं त्यांचें मन प्रफुल्लित असून रणोत्साहानें त्यांचें देहभान नाहींसें झालें होतें. इंलिश सेनानायक ग्लॅड्सडेल हा कांहीं सामान्य योद्धा नव्हता. त्यानें आपल्या सैनिकांस चेतविण्याची शर्थ केली. तेव्हां त्यांनीं नेटानें झुंजास प्रारंभ केला. जोननें आपलें निशाण खंदकाचे कांठावर रोविलें आणि खंदकांत उडी टाकून पोहत पोहत ती तटाच्या भिंतीस जाऊन भिडली. तटास शिड्या लावल्यावर ती वर चढूं लागली, त्यावेळीं बुरुजावरील तिरंदाजांनीं तिच्यावर बाणांचा नुसता वर्षाव केला. त्यांतील एक बाण तिचें चिलखत फोडून खांद्यांत घुसला त्यासरशीं ती शिडीवरून खालीं पडली. तें पाहतांच इंग्लिशांनीं जयघोष केला. कित्येक शिपायांनीं खंदकांत उड्या टाकून तिला कैद करण्याचा प्रयत्न केला; परंतु तिच्या अनुयायांनीं तिला चटकन् उचलून परत नेलें आणि सैन्याच्या पिछाडीस गवतावर निजविलें. त्या जखमेंतील रक्तप्रवाहानें ती कांहीं वेळ मूर्छित पडली. पण तितक्यांत देवदूत आपणास धीर देत आहेत असें पाहून आपल्या कामगिरीचें तिला फिरून भान आलें. तिची मनोवृत्ति तत्काळ पालटली. ती उठून बसली व जोरानें हिसका मारून तो तीर तिनें उपसून काढला. नंतर जखम बांधून झाल्यावर तिनें धर्मोपदेशकास बोलाविलें व त्याजबरोबर ईशस्तोत्रें ह्मटलीं.

इकडे जोनच्या परतण्यानें इंग्लिश शिपायांस उत्तेजन येऊन ते फारच निकरानें लढूं लागले. त्यांचेपुढें फ्रेंचांचा कांहीं इलाज चालेना. फ्रेंच शिपायांचा झालेला भयंकर संहार पाहून ड्यूनॉईसचाही धीर खचला. निराशेनें ग्रस्त होऊन तो आतां परत फिरण्याविषयीं हुकूम सोडण्याच्या बेतांत होता. इतक्यांत जोनकडून त्यास निरोप आला कीं, 'तुह्मी

निराश होऊं नका, आज हा कोट तुह्मी खात्रीनें सर करणार. मी युद्धास फिरून येण्यास तयार झालें आहे. माझें निशाण तटाचे भिंतीस भिडतांच तुह्मी चोहों बाजूनें किल्ल्यावर चढाव करून वर चढण्यास प्रारंभ करा ह्मणजे किल्ला तुमचाच आहे'. याप्रमाणें सर्वांस उत्तेजन देऊन व संकेत ठरवून ती पुनरपि सैन्याच्या अग्रभागीं दाखल झाली. बाणाच्या जखमेनें जोननें इहलोक सोडला अशी इंग्लिश सैनिकांची समजूत झाली होती. तेव्हां अर्थात् शत्रूच्या सैन्याच्या अग्रभागीं तिला पाहून आश्चर्यानें ते सर्द झाले. फ्रेंच सैन्यास ताजा दम येऊन तें मुसंडी मारून पुढें घुसूं लागलें. इतक्यांत जोनच्या निशाणवाहकानें त्या निशाणाचें टोंक तटाच्या भिंतीस लाविलें. त्यासरशीं शेकडो शूर फ्रेंच वीर शिड्यांच्या साहाय्यानें तटावर चढले. इंग्लिशांनीं त्यांस प्रतिबंध करण्याविषयीं हरप्रयत्न केले; परंतु त्याचा उपयोग झाला नाहीं. आर्लीन्सच्या किल्ल्यांत जें अवशिष्ट फ्रेंच सैन्य होतें त्यानें त्या पडलेल्या पुलावर फळ्या बसवून त्याची तात्पूर्तिक दुरुस्ती केली; आणि त्या पुलावरून जाऊन टूरेलवर उत्तर दिशेनें हल्ला केला. याप्रमाणें दोहोंबांजूनीं हल्ला होतांच इंग्लिशांची गाळण उडाली. ग्लॅडसडेल यानें पाहिलें कीं, सर्व किल्ला कांहीं आतां आपणांस बचावितां येत नाहीं; याकरितां मधला ओढपूल वर घेऊन टूरेलच्या मध्यभागीं आपल्या सर्व सैन्याची जमवाजमव करावी व तेथें शत्रूंशीं टक्कर द्यावी. असा निश्चय करून आपल्या शिपायांसह मागें हटून त्या सरक पुलावरून तो कोटाच्या अंतर्भागीं जाऊं लागला. त्यावेळपावेतों जोन तटाच्या भिंतीवर चढून आली होती. तिनें ग्लॅडसडेल यास हत्यार ठेवून शरण येण्यास सांगितलें. त्यास तो कांहीं उर्मटपणाचें उत्तर देण्याच्या बेतांत होता; इतक्यांत आर्लीन्स किल्ल्यावरील तोफेंतून एक गोळा आला. त्यानें ग्लॅडसडेल, त्याचे अनुयायी आणि तो ओढपूल या

सर्वांची क्षणार्धांत होळी करून टाकली. ग्लॅडसडेलचा असा अंत झालेला पाहतांच शिल्लक राहिलेल्या किल्ल्यांतील इंग्लिश सैन्यानें लढाईचें नांव सोडून दिलें व हत्यारें ठेवून तें शत्रूस शरण आलें.

फ्रेंचांचा विजय झाला. त्यांनीं तो पडलेला दगडीपूल दुरुस्त केला आणि जो मार्ग आजवर फ्रेंचांना बंद होता त्याच मार्गानें, जोननें विजयघोष करीत आर्लीन्समध्यें थाटानें प्रवेश केला. शहरांत प्रत्येक प्रार्थनामंदिरांतून आनंदसूचक घंटा वाजूं लागल्या व जिकडेतिकडे विजयप्रदर्शक होळ्या धडाक्यानें पेटूं लागल्या. आर्लीन्सच्या उत्तरेस जें इंग्लिश सैन्य होतें त्यास हा प्रकार दृष्टीस पडतांच तें मोठ्या फिकीरींत पडलें. त्यांच्या तोंडावरील तजेला जाऊन तीं फटफटीत दिसूं लागलीं. फ्रान्स देश पादाक्रांत करून इंग्लिश राज्यास जोडण्याच्या त्यांच्या सर्व आशा पार मावळून गेल्या. इंग्लिश सेनापति टॉल्बट याचें असें मत पडलें कीं, इंग्लिश सैन्यानें परत फिरावें. त्याप्रमाणें परतण्याची तजवीज चालू झाली. आपलें सर्व जड अवजड सामान त्यांनीं जाळून टाकिलें. आर्लीन्स शहराची होळी करण्याकरितां जी सामुग्री त्यांनीं सांठविली होती ती पेटवून देऊन इंग्लिश सैन्य परत फिरलें.

राजपुत्राची भेट घेतल्यापासून तीन महिन्यांचे आंतच जोननें ऑर्लीन्सचा वेढा उठवून आपली अर्धी कामगिरी तडीस नेली. पुढें तेथून राजपुत्रासह ऱ्हीम्स शहरीं जाऊन तेथें तिनें त्यास राज्याभिषेक केला. हा राज्याभिषेकसमारंभ करण्यापूर्वी तिनें जार्गो, ट्रॉय इत्यादि मजबूत किल्ले इंग्लिशांचे हातून सोडविले. पॅटेच्या रणांगणांत तर शत्रूशीं समोरासमोर लढून तिनें इंग्लिश सैन्याचा पुरा मोड केला. तिच्या देशबांधवांच्या हर्षास व स्तुतीस पारावार नाहींसा झाला. आर्लीन्सचा वेढा उठवून मार्गें हटल्यापासून इंग्लिशांना जयश्रीनें सोडल्याप्रमाणेंच झालें.

जरी इंग्लिशांनीं काबीज केलेलीं सर्व ठाणीं परत घेऊन त्यांना फ्रान्स देशांतून पुरें हुसकून देण्याला यापुढें पंचवीस तीस वर्षें लागलीं, तथापि आर्लीन्स येथील जोनच्या कामगिरीनेंच ही सर्व क्रान्ति घडवून आणली हें निर्विवाद आहे. इंग्लिश राजप्रतिनिधि ड्यूक ऑफ बेडफर्ड यानें यावेळीं इंग्लंडच्या राजास पत्र लिहिलें त्यांत ही गोष्ट त्यानें स्पष्ट कबूल केली आहे. तो लिहितो. " याप्रमाणें हा काळपावेतों फ्रान्स देशांत आमचा चलचलाट होता. परंतु शेवटीं कोणत्या दुष्ट मुहूर्तावर आह्मी आर्लीन्सला वेढा घातला ईश्वर जाणें. तो वेढा घातल्यापासून आमच्या दुर्दैवास प्रारंभ झाला. प्रथमतः तोफेचा गोळा लागून सॅलिस्बरीसारखा सेनापति मरण पावला. पुढें जोन नामक एक चेटकीण प्रत्यक्ष सैतानाची बहीण फ्रेंचांचे सैन्यांत येऊन दाखल झाली. तिनें आपल्या जादूटोण्यानें आमच्या सैन्याला भारून टाकल्यानें आमच्या शिपायांच्या हातून लढाईचें काम पूर्ववत् होईना. शेकडो सैनिक निष्कारण पटापट प्राणास मुकले. जे जीवंत राहिले त्यांच्या अंगांत लढण्याचें अवसान बिलकुल राहिलें नाहीं. उलटपक्षीं शत्रूंचा भरणा वाढूं लागला. त्यांचें धैर्य दुणावलें, अखेरीस आर्लीन्सचा वेढा उठवून परतणें आह्मांस भाग पडलें. त्यावेळेपासून आमची सारखी पिछेहाट होत चालली आहे ".

याप्रमाणें आपल्या देशावर जें अरिष्ट कोसळलें होतें त्याचा प्रतिकार करण्याचें धैर्य आपल्या देशबांधवांचें अंगीं जोननें आपल्या पराक्रमानें उत्पन्न केलें. फ्रेंचांना इंग्लिश सैन्याचा जो पूर्वी बाऊ वाटत असे तो नाहींसा झाला. अशा रीतीनें आपल्या देशास स्वतंत्रतेच्या मार्गाला लावल्यावर ऱ्हीम्स येथें तिनें चार्ल्सला राज्याभिषेक केला. त्यावेळींच आपली कामगिरी झाली असें तिला वाटलें व तें खरेंही होतें. राजाला विधिपूर्वक अभिषेक झाल्यानें त्याच्याविषयीं गैरसमज होता तो दूर

झाला. ईश्वराचें त्यास साहाय्य आहे अशी प्रजेची खात्री होऊन त्याचा हुकूम उठावण्यास प्रजाजन उत्सुक झाले. याप्रमाणें लोकमत आपणास अनुकूल, विजयी सरदार व कसलेलें सैन्य लढण्यास तयार, शत्रूचें सैन्य नामोहरम आणि त्याची आपापसांत फाटाफूट, इतक्या गोष्टी जुळून आल्यावर मग जय ह्मणजे काय हातचा मळ. परंतु चार्ल्स राजा इतका अदूरदर्शी व कर्तृत्वशून्य होता कीं, इतकी परिस्थिति अनुकूल असतां त्याचे हातून इंग्लिश सैन्याला देशपार करवलें नाहीं. पुढें इंग्लंडांतच 'गुलाबांचीं युद्धें' सुरू झालीं ह्मणून सर्व इंग्लिश सैन्य स्वदेशाला निघून गेलें. तेव्हां हें 'शतसांवत्सरिक' युद्ध संपून परकीयांच्या तडाक्यांतून फ्रान्स देश एकदांचा मुक्त झाला. परंतु या पुढील दीर्घसूत्रीपणाचा दोष जोनकडे बिलकुल नाहीं.

चार्लसला राज्याभिषेक होतांच तिनें त्याजपुढें गुडघे टेंकले आणि आपल्या घरीं जाण्यास तिनें परवानगी मागितली. पण सैन्यांतील शिपायांवर तिचें वजन केवढें आहे हें चार्ल्स व त्याचे सेनानायक यांस अवगत असल्यानें त्यांना तिच्या मदतीची अपेक्षा होती; ह्मणून राजानें तिला सैन्याबरोबरच राहण्यास विनविलें. त्याच्या आग्रहावरून तिनें सैन्यांत राहण्याचें कबूल केलें. त्यानंतरही ती पूर्वीप्रमाणेंच शौर्यानें लढत असे; पण आतांचें तिचें सर्व धैर्य मानवी होतें. त्यांत ईश्वरीप्रेरणेचा अंश बिलकुल राहिला नव्हता. तिची धर्मनिष्ठा कमी झाली नव्हती व तिला अद्यापही आकाशवाणी ऐकूं येत असे. परंतु आतां आपलें अवतारकृत्य संपलें अशी तिची ठाम समजूत होऊन गेली. कोणत्याही संकटांत उडी घातली तरी त्यांतून खात्रीनें पार पडूं, किंवा प्रत्येक लढाईत हटकून जय मिळवूं असा भरंवसा तिला राहिला नाहीं; तरीदेखील ती संकटास जुमानीत नसे. यावरून तिच्या धैर्याबद्दलचें आमचें आश्चर्य बुद्धिगतच होतें.

तिचा पूर्वीचा उत्साह व उमेद जरी राहिली नव्हती तरी चार्लसच्या सैन्याबरोबर राहून तिनें लॉन, काम्पीन, बोव्हे इत्यादि मजबूत ठाणीं घेतलीं. पुढें सप्टंबर महिन्यांत फ्रेंच सैन्यानें उतावळेपणानें पारीसवर हल्ला केला. त्यांत त्यांचा पराजय होऊन जोन जखमी झाली. हिंवाळ्यांत ती फिरून सैन्यांत दाखल झाली. इ. स. १४३० च्या वसंतऋतूंत काम्पीन शहरास वेढा पडला असतां ती किल्ल्यांत घुसली. हा किल्ला आदल्या वर्षीं तिनें इंग्लिशांकडून जिंकून घेतला होता. आतां बर्गंडीच्या ड्यूकनें त्यास वेढा घातला होता. ता. २४ मे १४३० रोजीं किल्ल्यांतून सैन्यासह वेढा घालणाऱ्या सैन्यावर छापा घालण्याकरितां ती बाहेर पडली. दुर्दैवानें त्यावेळीं ती जखमी होऊन शत्रूचे हातीं लागली. त्यांनीं तिला प्रथम आरास येथें नंतर क्राटॉय गांवीं बंदींत ठेविलें. पुढें नवंबर महिन्यांत इंग्लिश सेनापतीकडून मोठी रक्कम घेऊन ड्यूक ऑफ् बर्गंडीनें तिला त्याचे हवालीं केलें. त्यानें तिच्यावर चेटूक केल्याचा आरोप ठेवून रुएन येथें तिची चौकशी चालविली. याप्रमाणें न्यायाचा फार्स करून तिच्यावर आरोप शाबीत झाला असें ठरविलें, व ता. ३० मे १४३१ रोजीं रुएनच्या भर बाजारांत वधस्तंभास बांधून तिला जाळून ठार केलें.

फ्रान्स देशास स्वातंत्र्य देणाऱ्या या निरपराधी शूर कुमारिकेचा अशा तऱ्हेनें भयंकर शेवट झाला; परंतु त्यायोगानें इंग्लिशांची घसरत चाललेली बाजू कांहीं सावरली नाहीं. तिनें आरंभिलेलें फ्रान्स देश स्वतंत्र करण्याचें कार्य पुढें तडीस गेलें तें गेलेंच. असो. या शूर स्त्रीचे वर्तनासंबंधीं आणखी एक सूचना करणें आवश्यक आहे. तिला देवदूत, साधुसंत दिसत व आकाशवाणी ऐकूं येत असे; याची जे कोणी थट्टा करीत असतील किंवा ज्यांना हें सर्व थोतांड आहे असें वाटत असेल त्यांनीं

प्रसिद्ध साधु सॉक्रेटीस याच्या चरित्राचें परिशीलन करावें. सॉक्रेटीस याचाही असाच विश्वास असे कीं, प्रत्येक महत्त्वाचे कार्यारंभीं एक देवदूत येऊन आपले कानांत त्या कृत्याच्या योग्यायोग्यतेविषयीं उपदेश करितो. आतां ज्यांस सॉक्रेटीस हा मूर्ख अगर ढोंगी होता असें ह्मणावयाचें असेल त्याला वाटेल तें बडबडण्यास पूर्ण मुभा आहे. परंतु ज्यास सॉक्रेटीसचें हें ह्मणणें खरें असें वाटत असेल त्यानें ऑर्कच्या जोन-विषयींही तितकाच मनाचा उदारपणा दाखवावा.

जगांतील क्रांतिकारक लढाया.

भाग १० वा.

'स्पेनचें अजिंक्य आरमार' इ. स. १५८८.

विसाव्या शतकांतील इंग्लंड व स्पेन यांची तुलना केली असतां, इंग्लंडच्या अतुल सार्वभौम शक्तीपुढें स्पेन देश केवळ कःपदार्थ वाटतो. त्या कारणानें सोळाव्या शतकाच्या अखेरीस इंग्लंडला स्पेनपासून केवढी भीति होती, आणि स्पेनच्या धार्मिक जुलुमास इंग्लंडला मान वांकवावी लागण्याचा किती संभव होता, याची कल्पना करितां येत नाहीं. त्यामुळें स्पेनच्या राजानें इ. स. १५८८ सालीं जें 'अजिंक्य आरमार' इंग्लंड देश जिंकण्यास पाठविलें त्या अरिष्टाचें खरें महत्त्व आमच्या मनावर बिंबत नाहीं.

इंग्लंडचा राज्यविस्तार त्यावेळीं ग्रेटब्रिटन व आयर्लंड खेरीजकरून इतर कोठेंही नव्हताच ह्मटलें तरी चालेल. सर वाल्टर रॅले व गिल्बर्ट यांनीं उत्तर अमेरिकेंत नुकतें कोठें वसाहतीचें बीं रुजत घातलें होतें. स्काटलंड देश त्यावेळीं भिन्न राजांचे अंमलाखालीं असून इंग्लिश लोकांशीं स्कॉच प्रजेचें विळ्याभोपळ्याइतकें उजू होतें. आयर्लंड देशापासून इंग्लंडला मदत होण्याचें दूरच राहिलें. उलट तो देश कॅथॉलिक धर्मीयांचा असल्यामुळें बंडाचें केवळ माहेरघर बनला होता. इंग्लंडच्या राज्यपदावर इलिझाबेथ राणी आरूढ झाली तेव्हां, खजि-

न्यांत शिलक आवळ्याएवढें पूज्य, प्रजेंत धर्मसंबंधीं भिन्नमतामुळें फाटाफूट, आणि दरदेशांतील लढायांत इंग्लंडची नाचक्की होऊन कॅलेसारखें मजबूत ठाणें हातचें गेलेलें, अशी निराशाकारक स्थिति होती. पुढें त्या राणीच्या तीस वर्षांचे कारकीर्दींत, प्रजेंतील बेदिली कमी होऊन, तो राजनिष्ठ बनत चालली. व्यापार भरभराटीस येऊं लागला व प्रजेंत स्वराष्ट्राभिमान उत्पन्न झाला हें खरें. पण तेवढ्यानें इंग्लंडची शक्ति स्पेनच्या तोडीची झाली असें नाहीं. युरोपखंडांत इंग्लंडच्या पक्षास काय तो एक हालंड देश होता. पण त्या देशास स्पेनविरुद्ध बंड करून स्वतःचें स्वतंत्र अस्तित्व कायम ठेवणेंच दुरापास्त झालें होतें.

उलट पक्षीं स्पेनची सत्ता त्या काळीं अपरंपार होती. स्पेनचा राजा दुसरा फिलिप असून त्याचें साम्राज्य विस्तारानें, संपत्तीनें आणि विशेषेंकरून दर्यावरील व खुष्कीवरील सैन्यबलानें एवढें प्रबळ होतें कीं, त्यापुढें इतर राष्ट्रें अगदीं क्षुद्र दिसत. युरोपांतील सर्व राज्यें पादाक्रांत करून सगळ्या खंडांचा बादशहा होण्याचें त्यानें मनांत आणल्यास तेंही त्याला अशक्य नव्हतें. रोमन साम्राज्याचा ऱ्हास झाल्यावेळेपासून युरोपांत स्पेनएवढें साम्राज्य दुसरें कोणतें झालें नव्हतें. फ्रान्स देश यादवीमुळें निर्बळ झाला होता. इटाली व पोलंड देशचे राजे फिलिपच्या ताटाखालचीं मांजरें बनले होते. तुर्क लोकांवर मोठा विजय मिळवून स्पॅनियर्डसनीं त्यांची सत्ता मर्यादित केली होती. याप्रमाणें सर्व युरोपखंडांत स्पेनकडे वांकड्या नजरेनें पाहील असा कोणी बळी उरला नव्हता. मूर लोकांचें उच्चाटन करितांना स्पॅनिश लोकांचे अंगीं जी वीरश्री भरली होती आणि त्या झटापटींत जो कंटकपणा त्यांचे अंगीं आला होता, त्याचें स्वतंत्र राज्यपद्धतींत पोषणच होत गेलें. पांचव्या चार्लसनें पूर्वीच्या स्वतंत्र संस्था मोडून अनियंत्रित राज्यपद्धति सुरू

केली होती खरी. परंतु राजकीय जुलुमाखालील एका पिढींत पूर्वीच्या सर्व सद्गुणांचा लोप होत नाहीं. इतिहासशास्त्राचा असा एक सिद्धांत आहे कीं, स्वतंत्र राज्यपद्धतीखालीं वाढलेले लोक एकदम अनिर्बंध सत्तेच्या राजाच्या अमलांत आले तर शेजारच्या देशांस त्याच्यापासून फार धोका असतो ; कारण पूर्वीच्या स्वातंत्र्यांत पोषित झालेला जोम कायम असून, एकसत्तात्मक राज्याधिकारानें त्यांस कार्याकार्यस्थिरता येते; आणि कोणतेंही धाडसाचें कृत्य सर्व शक्ति एकवटून व खर्चून कसल्याही संकटास न जुमानतां पार पाडण्याची शक्ति त्यास प्रकट करतां येते. आतां हा जोम व दृढ निश्चय फार वेळ टिकत नाहीं हें खरें. परंतु त्यांचा ऱ्हास होईपर्यंत तो देश शत्रूचा कर्दनकाळ बनतो. ५ वा चार्लस व २ रा फिलिप यांच्या कारकीर्दीतील स्पेनचा इतिहास वरील सिद्धांताचें ढळढळीत उदाहरण आहे. त्यावेळीं ख्रिस्ति राष्ट्रांत खडी फौज अल्प असत असे; पण फिलिपचे राज्यांत कवाइती व युद्धसाधनांनीं सज्ज अशी मोठी फौज होती. शौर्याविषयीं सर्व युरोपखंडांत ती नांवाजलेली होती. स्पेनचें आरमारही इतर सर्व राष्ट्रांहून मोठें असून त्यांवरील खलाशी आणि अधिकारी दर्यावर्दीपणांत निष्णात होते. स्पॅनिश साम्राज्याचा विस्तारही अफाट होता. युरोपांतील नेपल्स, सिसली, मिलन, फ्रेंच, काम्टे व नेदर्लंड्स हीं सर्व त्या राज्यांत मोडत होतीं, आफ्रिका खंडांतील ट्यूनिस, ऑरेन्, केपवर्ड आणि कॅनरी बेटें स्पेनचे ताब्यांत होतीं. फिलिपाइन व संडा बेटें आणि मोलोक्कोचा कांहीं भाग फिलिपचे अंमलाखालीं होता. अटलांटिक महासागरापलीकडे तर अमेरिका खंड हा एक सोन्याचा तुकडाच स्पेनला लाधला होता. मूल्यवान् धातूंच्या खाणींनीं परिपूरित असे मेक्सिको, न्यूस्पेन, चिली हे देश व हिस्पॅनिओला, क्यूबा आणि इतर सटरफटर बारीकसारीक बेटें, या सर्व ठिकाणीं स्पेनचें निशाण फडकत होतें.

या सर्व वैभवास जणूं काजळाचें बोट लावण्यास नेदर्लंडांत बंड उद्भवलें असून त्याचा अद्याप बीमोड झाला नव्हता. बेल्जियमनें फिरून डोकें वर करूं नये अशी तजवीज करण्यांत आली होती. परंतु हॉलंडनें मात्र दाद दिली नाहीं. तथापि या बंडानेंदेखील एकप्रकारें फिलिपचा फायदाच झाला. त्याचे सैन्यास युद्धशिक्षणाची तालीम मिळून तें कंटक झालें आणि कसल्याही बिकट प्रसंगीं त्याची राजनिष्ठा ढळणार नाहीं अशी खात्री झाली. त्या फौजेवरील अधिकारी 'प्रिन्स ऑफ् पार्मा' हा त्या काळचा एक अद्वितीय उपजत योद्धा होता. चातुर्य, धूर्तता, आणि मुत्सद्दीपणांतही त्याची ख्याति होती. शिपायांचा नाकाचा तो केवळ बाल होता. आपला वचक कायम राखून सैन्यांतील शिस्त बिघडूं न देतां, सैनिकांचें चित्ताकर्षण करण्याची कला त्यास चांगली साधली होती. सैन्याच्या हालचाली व डावपेंच ठरविण्यांत तो फार विचारपूर्वक व काळजीनें वागे. पण एकदां कां बेत पक्का ठरला ह्मणजे तो सिद्धीस नेण्यांत त्याची तडफ दिसून येई. अशा सरदारास आपली करामत इंग्लंडच्या किनाऱ्यावर दाखविण्याची संधि मिळाली नाहीं हें त्या देशाचें मोठें सुदैवच मानिलें पाहिजे.

नेदर्लंडांतील बंडानें स्पेनच्या राज्यविस्तारांत जी न्यूनता आली असेल ती पोर्तुगाल देश जिंकून फिलिपनें भरून काढिली. इ. स. १५८०त पोर्तुगाल देश स्पेनचा अंकित झाल्यानें एशिया, आफ्रिका व अमेरिका खंडांतील त्या देशच्या सर्व वसाहती आयत्याच फिलिपच्या ताब्यांत अल्या. याच सुमारास स्पॅनिश आरमारानें लेपन्टो येथें तुर्की जहाजांचा जो नायनाट केला त्यायोगानें त्या आरमाराची वाखाणणी सर्वतोमुखीं झाली. एवंच फिलिप गादीवर आल्यापासून छत्तीस वर्षांत स्पेनचें पांचव्या चार्ल्सच्या वेळचें वैभव काडीमात्र न उणावतां उलट द्गुणावत चाललें होतें.

यूरोपांतील एका देशानें मात्र त्यास अद्याप दाद दिली नव्हती. इंग्लंडनें नेदर्लंडांतील बंडवांल्यास राजरोसपणें, द्रव्यद्वारा व सैन्यद्वारा मदत केली होती. त्यांना अशाप्रकारचो कुमक मिळाली नसती, तर त्यांची फिलिपनें केव्हांच धुळधाण उडवून दिली असती. यास्तव त्या वेळेपासून इंग्लंड देश स्पेनच्या डोळ्यांत सलूं लागला. इंग्लिश आरमारानें स्पेनच्या वसाहती लुटल्या व सोनें भरून येणारीं जहाजें पकडलीं अशा बातम्या नित्य कानीं येऊं लागल्या. इंग्लिश नाविक जास्त जास्तच धाडस करूं लागले. त्यांनीं खुद्द स्पेनच्या किनाऱ्यावर उतरून त्यांचा दारूखाना जाळला. याखेरीज कित्येक प्रसंगीं इंग्लिशांनीं फिलिपचा उपमर्द केला. या सर्व कारणामुळें चिडून जाऊन त्यानें इंग्लंडची चांगली हड्डी नरम करण्याची प्रतिज्ञा केली, आणि इंग्लंडवर स्वारी करण्याचा बेत ठरविला. इंग्लंडच्या ह्या स्वारीस वरील कारणाशिवाय दुसरेंही एक महत्त्वाचें कारण होतें. फिलिप हा कॅथोलिक धर्माचा कट्टा अभिमानी होता. प्रोटेस्टंट मतांचें उच्चाटन करून पोपच्या अधिकाराची पुनरपि युरोपखंडांत निरपवादेंकरून स्थापना करावी अशी त्यास महत्त्वाकांक्षा होती. सर्व कॅथालिक प्रजेचे डोळेही त्याजकडेसच लागले होते. सोळाव्या शतकाच्या उत्तरार्धापासून प्रोटेस्टंट धर्माविरुद्ध प्रतिक्रिया सुरू झाली. त्या योगानें इटली व स्पेन देशांत सुधारक मतांचा बीमोड झाला. बेल्जियम देश पूर्वी दोन्ही डगरीवर हात ठेवून होता. परंतु फिलिपनें तो जिंकून घेतल्यापासून कॅथालिक धर्म पाळण्यांत त्यानें सर्वांवर ताण केली. अर्धाअधिक जर्मन देश परत जुन्या मतास बिलगला. स्विट्झर्लंड व सॅव्हाय यथेंही सुधारणाविद्वेष्ट्यांचे प्रयत्नास बरेंच यश येऊं लागलें फ्रान्समध्यें पोपचें प्राबल्य वाढूं लागलें व पोपनें शेकडो वर्षांचा आळस पार झुगारून देऊन आपली कर्तृत्वशक्ति प्रकट केली.

सर्व युरोपखंडांत प्रोटेस्टंट धर्मानुयायांचा कोणी वाली राहिला नाहीं त्यामुळें त्यांस 'देमाय धरणी ठाव' असें होऊन त्यांचें लक्ष्य इंग्लंडकडे वेधलें. तेवढा एकच देश काय तो त्यांचा पाठिराखा होता. ह्या वेळीं इंग्लंड हें प्रोटेस्टंट धर्माचें केंद्रस्थान होतें. तो देश जिंकला तर बंडखोर धर्माचे काळजांत कट्यार खुपसल्याप्रमाणें होणार; यासाठीं तत्कालीन पोप पांचवा सिक्सटस यानें इंग्लंडचे मोहिमेविषयीं फिलिपची फार उठावणी केली. त्याच वेळीं इलिझाबेथराणीनें स्काटलंडची कॅथालिक धर्माभिमानी राणी मेरी इजला फांसावर चढविल्याचें कळतांच स्पेन व इटली देश संतप्त झाले आणि इंग्लंडवर स्वारी करून इलिझाबेथ राणीस शासन करावयाचें, आपल्या अपमानाबद्दल सूड उगवावयाचा, आणि प्रोटेस्टंट धर्माचा उच्छेद करून त्या ठिकाणीं सद्धर्माचें बीजारोपण करावयाचें, या उद्देशानें फिलिपनें आरमाराची व सैन्याची सिद्धता करण्यास सुरवात केली.

प्रिन्स ऑफ् पार्माची सेनानीचे पदावर योजना झाली. त्यानें तत्काळ फ्लँडर्सचे किनाऱ्यावर आपलें कसलेलें सैन्य जमा करण्याची तजवीज चालविली. नेदर्लंडांत त्याचे निशाणाखालीं जी फौज होती तिचे मदतीस जर्मनी, आस्ट्रिया, इताली, नेपल्स, कॅस्टिल, अरगांव इ. प्रांतांतून सैनिकांची व घोडेस्वारांची रवानगी झाली. पार्मानें अपल्या सैन्याकरितां रुंद तळाच्या नावा बांधण्यासाठीं बेज येथील अरण्य तोडण्यास हुकूम दिला. तेथें होड्या तयार होऊन नद्यांतून व कालव्यांतून त्या बोटी मीनपोर्ट आणि डंकर्क बंदरांत यावयाच्या, व तेथून स्पॅनिश अजिंक्य आरमाराचे संरक्षणाखालीं सर्व सैन्याची थेम्सनदीच्या मुखापर्यंत पाठवणी व्हावयाची असा बेत ठरला होता. या सैन्यावरोबर तोफखान्याच्या गाड्या, फांसण्या, वेढा घालण्यास, पूल बांधण्यास, छावणी तयार करून तटबंदी करण्यास

अगर मोर्चे बांधण्यास, जी जी साधनसामुग्री पाहिजे ती सर्व तयार करविण्यांत आली.

इलिझाबेथ राणी सद्धर्मभ्रष्ट व खुनी असल्यानें, तिचें पारिपत्य करणें हें आद्य कर्तव्य आहे, या समजुतीनें पोपकडून पार्माकडे एक बहिष्कारपत्र पाठविण्यांत आलें. इंग्लंडच्या किनाऱ्यावर उतरतांच तें प्रसिद्ध करावयाचें, असा संकेत ठरला होता. त्या बहिष्कारपत्रांत माजी पोपानें इलिझाबेथला दिलेल्या शापाचें पुनरुच्चारण असून, तिला इंग्लंडचे गादीवरून पदच्युत केल्याचा जाहिरनामा होता. स्पेनच्या राजानें इंग्लंडवर स्वारी करून एक बंदर काबीज करतांच लढाईच्या खर्चानिमित्त पोपानें मोठी रकम द्यावी असा करार ठरला होता. फिलिपनें तर या कामीं आपलें तनमनधन खर्च करण्यास कंबर बांधिली. फ्रान्समधील कॅथालिक धर्मानुयायांनीं त्यास उत्सुकतेनें हातभार लाविला. भूमध्यसमुद्रांत आणि जिब्राल्टर ते तहत डेन्मार्कमधील जटलंड द्वीपकल्पापर्यंतच्या प्रत्येक स्पॅनिश बंदरांत आरमाराचे सिद्धतेस दणकावून प्रारंभ झाला. याचवेळीं जर्मनींत प्रोटेस्टंट धर्मास उतरती कळा लागली होती. फ्रान्समध्यें त्या धर्मानुयायांची कत्तल होऊं लागली. पोलंडच्या सिंहासनावर कॅथालिक धर्माचा कट्टा अभिमानी सिजिस्मंड हा आरूढ झाला आणि पुढेमागें स्वीडनच्या गादीचाही वारसा त्याजकडे येण्याचा संभव दिसूं लागला. याप्रमाणें कॅथालिक धर्मास अनुकूल अशीच परिस्थिति चोहोंकडे दिसूं लागली; परंतु जगाचा असा एक नियम आहे कीं, कोणतीही सत्ता प्रबळ होऊं लागल्यास तीस अडथळा करणारा कोणी तरी निर्माण होतोच. त्याचें उत्तान कारण मात्र कांहीं कळून येत नाहीं. फिलिपला या गोष्टीचें चांगलेंच प्रत्यंतर आलें. एका चिमुकल्या बेटांतील मूठभर लोकांनीं आपल्या पडाववजा जहाजांचे साधनानें त्याच्या सत्तेस विरोध

करण्याचें धाडस केलें. ज्या चांचे लोकांनीं स्पेनच्या किनाऱ्यावर धुमाकूळ मांडला होता ते आतां स्वदेशसंरक्षणार्थ आपल्या किनाऱ्याभोंवतीं जमा झाले. या देशकार्यास्तव आपलीं नानाविध धार्मिक मतें घटकाभर बाजूस ठेवून, प्रोटेस्टंट, कॅथालिक आणि राणीकडून छळले गेलेले प्यूरिटन लोकसुद्धां एकदिलानें झटूं लागले. इलिझाबेथ राणीनेंही या प्रसंगीं आपलें पौरुष, धैर्य, चतुरस्रता, जनचित्ताकर्षकता आणि नेतृत्व व्यक्त केलें व सर्वांचे ठायीं राजानिष्ठा ओतप्रोत भरवून टाकिली. इंग्लिश आरमाराचा मुख्य अधिकारी लॉर्ड हॉवर्ड हा कॅथालिक पंथाचा असून त्याच पंथाचे शेकडोंशे स्वयंसेवक स्वदेशसंरक्षणार्थ पुढें सरसावले.

फिलिपनें इतकी आरमाराची जंगी तयारी चालविली होती; तथापि त्याची धाड कोणावर येणार आहे याची बातमी प्रथमतः गुप्त राखली होती. स्वतः फिलिप, पोप सिक्टस, आणि फिलिपच्या मर्जीतला प्रधान मेंडोझा एवढ्यांसच खरा उद्देश ठाऊक होता. परंतु इलिझाबेथ व तिचे मंत्री यांना हें अरिष्ट इंग्लंडच्या किनाऱ्यावर धडकणार असा पुरा संशय आल्यानें, इ. स. १५८७ च्या प्रारंभींच नक्की बातमी काढण्याकरितां सर फ्रॅन्सिस ड्रेक याची रवानगी झाली. तो केडिझचा उपसागर व लिस्बनचें बंदर येथपर्यंत पर्यटन करून आला. त्यानें या सफरींत स्पॅनिश बंदरांतील पुष्कळ लष्करी सामुग्री, आणि जहाजें जाळलीं. त्यायोगानें आरमाराचे तयारीस अडथळा होऊन तें काम कालावधीवर पडलें. ड्रेकनें याप्रमाणें इकडे फिलिपची दाढी जाळली असतां इलिझाबेथनें नेदर्लंडांतील बंडवाल्यांस मदत करण्याकरितां कांहीं फौज पाठविली, आणि पार्माचें बंड मोडण्याचें काम दुर्घट होऊन इंग्लंडच्या स्वारीस त्याला सवडच मिळूं नये अशी तरतूद केली.

याप्रमाणें दोहों पक्षांची लढाईची तयारी जारीनें पण गुप्त चालली असतां वरकांतीं सलोख्याचीं बोलणीं सुरू होतीं. इ. स. १५८८ च्या प्रारंभापासून आर्स्टेंड शहरीं तहाची शुष्क वाटाघाट सहा महिने चालली; पण तह जुळण्याचा रंग कांहींच दिसेना. कारण उभयतांच्याही मनांत तह करण्याचें नव्हतें. फ्रान्स देशाचें पाठबळ आपणास मिळावें एतदर्थ मात्र दोघांची सारखी खटपट चालली होती. या कामीं इलिझाबेथला यश येण्याचा प्रथमतः संभव दिसत होता. परंतु शेवटीं तेथें फिलिपचाच लाग साधला. आर्स्टेंड येथील इंग्लंड व स्पेनमधील तहाची वाटाघाट केवळ वरोपचारी आहे, हें लक्ष्यांत न आल्यानें फ्रान्सचा राजा चवथा हेन्री हा भिऊन गेला. इंग्लंड व स्पेनची एकजूट झाल्यास त्यांजपुढें आपली धडगत नाहीं असें पाहून त्यानें इंग्लंडला त्या कटांतून फोडण्याकरितां इलिझाबेथला मदत करण्याचें आमिष पुढें केलें. इकडे तुर्कस्थानचे सुलतानाला स्पेनविरुद्ध लढाई सुरू करण्यास त्यानें आंतून फूस दिली. परंतु फिलिपनें गाईझच्या ड्यूकचे साहाय्यानें फ्रान्समध्यें हेन्री विरुद्ध बंड उभारिलें आणि त्यास पदच्युत करून अटकेंत ठेविलें. फ्रान्सदेशांत याप्रमाणें आपला डाव साधतांच फिलिपनें आरमाराची तयारी करून त्याची इंग्लंडवर रवानगी करण्याविषयीं सक्तीचे हुकूम सोडले.

इंग्लंडमध्यें या राष्ट्रीय संकटास तोंड देण्याकरितां रावापासून रंकापर्यंत सर्वांनीं कंबर बांधिली. इलिझाबेथनें आपले राज्यांत पुढील आशयाचा जाहिरनामा प्रसिद्ध केला. 'स्पेनचा राजा फिलिप हा इंग्लंडवर मोठें आरमार आणि सैन्य धाडीत आहे. यावेळीं इंग्लंडच्या सर्व रहिवाशांनीं एकदिलानें झटून शत्रूचा पाडाव केला पाहिजे. जितकी फौज, जितके घोडे आणि मुख्यत्वेंकरून चंदीचारा शक्य तितका प्रत्येक व्यक्तीनें पुरविला पाहिजे. जर करितां तुमच्या कसूरी-

मुळें शत्रूंचा देशांत शिरकाव झाला, तर तुमचीं घरेंदारें, जमीनजुमला, बायकापोरें, आणि तुमचा प्राणाहून प्रिय असा खरा धर्म या सर्वांचा शत्रूच्या हातून नायनाट होईल. तुमच्या शेजारींच हॉलंड देश आहे; तेथें स्पेननें कसलीं अघोर व अनन्वित कृत्यें चालविलीं आहेत हें तुम्हीं प्रत्यहीं पहातच आहां. असलें जुलमी परकीय राज्याचें जोखड आपल्या मानेवर घेऊन, आपल्या मायलेकी, बहिणी, सुना त्यांचे स्वाधीन कराव्याच्या नसतील, तर लढाईस तयार व्हा. तुमची राजनिष्ठेची आणि देशप्रीतीची मला खात्री आहे; पण त्याची प्रचीति जगास दाखवा म्हणजे ईश्वरी कृपेनें तुमचे वैरी पराजित होऊन फजित पावतील; आणि तुमच्या देशाची व धर्माची कीर्ति जगांत दुमदुमत राहील'. हे जाहिरनामे मंत्रिमंडळानें सरदार लोक, धर्माध्यक्ष व इतर पाद्री यांजकडे पाठविले. त्यामुळें देशांत प्रत्येक व्यक्तीस स्फुरण चढून प्रत्येकानें स्वतःच्या शक्तीबाहेर आणि इतरांच्या अंदाजाहून अधिक साहाय्य ह्या राष्ट्रकार्याला केलें. देशाच्या प्रत्येक कान्याकोपऱ्यांतसुद्धां पायदळ व स्वार स्वयंसेवक तयार होऊन ते लष्करी कवाइतीचें शिक्षण आपखुषीनें घेऊं लागले. घोडे, चिलखतें, शस्त्रास्त्रें, दारुगोळा इत्यादि युद्धसामुग्रीची ठिकठिकाणीं सिद्धता होऊं लागली. या कामास पैशाची वाण मुळींच भासली नाहीं. शत्रूची सरशी झाल्यास आपलें सर्वस्व जाणार, तेव्हां त्याचा प्रतिकार करण्याकरितां कितीहि स्वार्थत्याग केला तरी तो कमीच, या बुद्धीनें प्रेरित होऊन जो तो स्वयंसेवक होऊन लढण्यास तयार झाला. असा स्वाभिमान, स्वदेशाभिमान, व स्वार्थत्याग अश्रूतपूर्व होय. अशा स्वार्थत्यागी व अभिमानी प्रजेची बादशाहीण होण्यास आपण योग्य आहों असें इलिझाबेथनें आपल्या कृतीनें दर्शविलें. टिल्बरी येथें फौजेचा तळ पडला होता. नवशिक्या सैनिकांस कवाइतीची व युद्धकलेची तालीम तेथें देण्यांत येत होती. त्या ठिकाणीं

स्वतः हजर राहून ती सर्व शिपायांचा समाचार घेऊन त्यांस उत्तेजन देत असे. वेळीं अवेळीं स्वशरीरसंरक्षक बरोबर न घेतां सशस्त्र सैन्यांत जाणें धोक्याचें आहे असें तिच्या कांहीं मंत्र्यांनीं तिला सुचविलें, तेव्हां सर्व सैनिकांस उद्देशून ती ह्मणाली. 'अशा बेसावधपणानें मी बाहेर फिरूं नये असें माझे सल्लागार मला कळवितात, त्यांस मी हेंच उत्तर देतें कीं जे जुलमी राजे असतील त्यांनीं आपल्या प्रजेला भ्यावें. मला भिण्याचें कारण काय? माझा सर्व भरंवसा एक ईश्वरावर कीं तुमच्या राजनिष्ठेवर. माझ्या आजवरच्या वागणुकीचें तत्त्व हेंच आहे कीं, तुमचा संतोष व प्रीति हेंच माझें बल आणि हाच मला आधार. आतां यावेळीं मी येथें आल्यें आहे ती काय करमणुकीकरितां? तर तसें नव्हे. देशाकरितां तुह्मी हातावर शीर घेऊन लढण्यास सिद्ध झाला. अशा वेळीं मला स्वस्थ कसें बसवेल? तुमच्याबरोबर लढाईचें सुखदुःख सोसण्यास आणि कारण पडेल तर ईश्वराला स्मरून माझ्या देशाकरितां, धर्माकरितां, माझी अब्रू व कुलाची कीर्ति राखण्याकरितां आणि माझ्या लाडक्या प्रजेच्या हिताकरितां, हा देह धारातीर्थीं ठेवण्यास मी काडीमात्र कचरणार नाहीं. मी जात्या अबला आहे ही गोष्ट खरी. पण मी यःकश्चित् स्त्री नव्हे. मी आठव्या हेन्रीची मुलगी असून इंग्लंडसारख्या देशाची राणी आहे. तेव्हां मी पार्माला किंवा इंग्लंडच्या कोणाही शत्रूला जर इंग्लिश किनाऱ्यावर पाय ठेवूं देईन तर धिक्कार असो माझ्या जिण्याला आणि अधिकाराला. मी तुमच्याबरोबर रणांगणावर येणार, कारण तेथें तुह्मी जे सद्गुण प्रगट कराल त्याबद्दल माझे डोळ्यांची खात्री करून घेऊन तुह्मांस योग्य बक्षीस दिलें पाहिजे. ह्मणून तुह्मी इमानें इतबारें वागून रणभूमीवर तलवार गाजवा; आणि तुमच्या धर्माचे, देशाचे आणि राज्याचे जे शत्रू त्यांजवर अद्भुत असा विजय संपादन करा."

शत्रूचा प्रतिकार करण्याविषयींची तरतूद इलिझाबेथच्या मंत्रिमंडळानें फार दक्षतेनें केल्याचें दिसून येतें. या संकटप्रसंगीं सल्ला देण्याकरितां, सर वॉल्टर रॅले, लार्ड ग्रे, सर फ्रॅन्सिस नोल्स, इत्यादि प्रमुख सरदार जमले होते. यानीं प्रथमतः शत्रूच्या स्वारीची भीति असलेलीं सर्व किनाऱ्या-वरील बंदरें नमूद करून, त्या त्या ठिकाणीं पार्माचें सैन्य उतरल्यास त्याच्याशीं लढाई देणें ती कोणत्या पद्धतीनें द्यावी याचा खल केला. त्या एका महत्त्वाच्या प्रश्नासंबंधीं मतभेद होऊन कडाक्याचा वाद झाला. आरमाराची जय्यत तयारी करून सगळी भिस्त त्याजवर ठेवावी आणि शत्रूला मुळीं किनाऱ्याच्या आसपास फिरकूं देऊं नये असें ह्मणणा-रांचा एक पक्ष; आणि शत्रू किनाऱ्यावर उतरून आला तरी बेहत्तर; खुष्कीवरील सैन्याचा चांगला जमाव करून त्याचा फडशा पाडावा असें ह्मणणारांचा दुसरा पक्ष. पहिल्या पक्षाचा पुरस्कर्ता सर वाल्टर रॅले हा होता. त्यानें मोठ्या युक्तीनें प्रतिपक्षाचें मत खोडून काढून आपली बाजू सप्रमाण स्थापित केली. तो ह्मणाला 'आरमाराचें बळ वाढवून त्याच्या साहाय्यानें शत्रूला किनाऱ्याजवळ येऊं न देतां दुरून फेटाळून लावणें हाच मार्ग उत्तम होय. त्याला दर्यावर दाही दिशा मोकळ्या सोडल्यास तो कोठें हूल दाखवून कोणीकडे उतरेल याचा पत्ता लागणार नाहीं. एकदां कां शत्रूचे पाय सुरक्षितपणें किनाऱ्याला लागले ह्मणजे त्याची अर्धी अधिक कामगिरी फत्ते झालीच ह्मणून समजावें. कारण त्यायोगानें स्वतःचें सैन्य नाउमेद होतें, शत्रूस दुष्पट अवसान येतें आणि विशेषेंकरून फंद फितूरी करण्यास त्याला चांगलेंच फावतें. पालेंमुळें खोल गेलेल्या वृक्षाप्रमाणें अशा शत्रूस उखडून काढणें पुढें फार जड जातें. याकरितां आपली सर्व शक्ति व संपत्ति आरमाराच्या सिद्धतेस खर्चून शत्रूला दूरच्या दूर फेटाळून द्यावें यांतच देशाची सुर-क्षितता आहे." रॅलेचें हें मत मान्य होऊन आरमाराची तयारी नेटानें

चालू झाली. ह्या विसाव्या शतकांत आगगाड्या व तारायंत्रें यांच्या योगानें वाटेल तेथील सैन्य वाटेल त्या ठिकाणीं वायुगतीनें नेतां आणतां येतें; तथापि इंग्लंडची सर्व मदार आरमारावरच आहे. त्यावरून इलिझाबेथच्या वेळीं त्याचें महत्त्व किती वाटत होतें व तें किती यथार्थ होतें याची कल्पना सहज करितां येईल.

ह्या आणीबाणीच्या प्रसंगीं इंग्लंडचीं सरकारी गलबतें केवळ ३६ होतीं. परंतु व्यापाऱ्यांचीं जीं जीं जहाजें लढाईला उपयोगी पडतील असें वाटलें तीं तीं सरकारानें आपल्या ताब्यांत घेऊन एकंदर १९१ जहाजांचा भरती केली. लंडन, ब्रिस्टल, हल्ल इत्यादि बंदरांतील व्यापाऱ्यांनीं नाविकांचा पुरवठा तत्परतेनें केला; आणि १७४७२ दर्यावर्दी आरमारांत दाखल झाले. डच लोकांना मदत करण्याविषयीं विनंति केल्याप्रमाणें त्यांनीं ६० गलबतें इंग्लंडच्या मदतीस व कारण पडल्यास स्वदेशाचे संरक्षणास सिद्ध झालीं. स्पॅनिश गलबतांची संख्या इंग्लिश व डच गलबतांपेक्षां कमी होती. पण स्पेनच्या प्रचंड मनावरापुढें इंग्लिश जहाजें केवळ मचव्याप्रमाणें भासत होतीं. शिवाय इंग्लिश गलबतांवर तोफांचीही कमतरता होती; आणि कांहीं इंग्लिश व सर्व डच जहाजें डंकर्क बंदरांत पार्माचे सैन्यास कोंडण्यांत गुंतलीं गेल्यामुळें, इंग्लिश खाडींत शिरणाऱ्या स्पॅनिश अजिंक्य आरमाराला तोंड देण्यास बाकीचीं जहाजें अगदीं अपुरीं वाटत होतीं.

देशद्रोही सर वुइल्यम स्टॅन्ले यानें फिलिपला अशी सल्ला दिली कीं, आरंभीं इंग्लंडवर रोख न धरतां आयर्लंडवर स्वारी करावी, आणि तेथें चांगलें बस्तान बसल्यावर संधि साधून इंग्लंडवर झडप घालावी. आरमारावरील अधिकारी सँटाक्रूझ याचें मत पडलें कीं, प्रथम हालंडचे किनाऱ्यावरील एखादें बंदर काबीज करावें; ह्मणजे दर्या तुफान झाल्यास

तेथें निवाऱ्यास राहतां येईल, आणि वाटेल त्यावेळीं अचानक इंग्लंडचे किनाऱ्यावर चढाव करून जातां येईल. फिलिपला या दोन्ही सूचना नापसंत झाल्या आणि त्यानें थेट लंडनवरच चालून जावयाचें असें ठरविलें. त्याप्रमाणें ता. २० मे रोजीं तें अजिंक्यध्रुव आरमार मोठ्या डामडौलानें तेगस नदींतून बाहेर पडलें. त्यावेळीं त्याची पाठवणी करण्याला जमलेल्या हजारो प्रेक्षकांस आतां इंग्लंडचीं पुरीं शंभर वर्षें भरलीं असें वाटलें.

तेगस नदीच्या मुखांतून बाहेर पडून तें आरमार उत्तराभिमुख झालें. पण अद्याप स्पेनचा किनारा पुरा सुटला नव्हता तोंच भयंकर वादळ होऊन तें आरमार नादुरुस्त होऊन बिस्के व गॅलिसिआ बंदरांत परत आलें. याचवेळीं या आरमारावरील अधिपति सँटाक्रूझ हा मरण पावला. त्याच्या मृत्यूनें फिलिपची मोठी हानि झाली. कारण तो ॲडमिरल आपल्या कामांत पुरा निष्णात असून त्याच्या तोडीचा दुसरा कोणी अधिकारी स्पेनमध्यें नव्हता. त्याच्या जागीं मेडिनासिडोनिया याची नेमणूक झाली. हा ड्यूक असल्या स्वारीच्या कामास अगदीं नालायक होता.

वादळाच्यायोगानें हा जो स्पेनच्या आरमारास अडथळा झाला, त्याचें वर्णन तिखटमीठ लावून इंग्लंडमध्यें प्रसिद्ध झालें. त्यावरून कित्येकांनीं ठरविलें कीं, ही धाड कांहीं इंग्लंडवर आतां येत नाहीं. इंग्लिश मंत्रिमंडळासही तेच तर्क खरा भासून, इंग्लिश जहाजांस आपापल्या स्थानाला परत पाठविण्याविषयीं लॉर्ड हॉवर्ड यांस हुकूम देण्यांत आला. परंतु त्या ॲडमिरलनें बरोबर ताडलें कीं, हें आरमार इंग्लंडवर चालून आल्याखेरीज रहात नाहीं. या खात्रीवर त्यानें राणीचा हुकूम न जुमानतां आपलें आरमार सज्ज राखिलें आणि प्रसंग पडल्यास सर्व आरमा-

राचा खर्च स्वतः सोसण्यास तो तयार झाला. शत्रूची हालचाल व खरी स्थिति समजून घेण्याकरितां आणि साधल्यास शत्रूला हात दाखविण्याच्या उद्देशानें स्पेनपर्यंत एक फेरी करून येण्याचें त्यानें ठरविलें. त्याप्रमाणें हॉवर्ड व ड्रेक हे कोरुन्ना बंदरापावेतों जाऊन पोहोंचले. पण त्या सुमारास उत्तरेचा वारा बंद होऊन दक्षिणेचा सुरू झाला. तेव्हां या वाऱ्याचे साहाय्यानें शत्रू आपल्या हातावर तुरी देऊन जाईल अशी शंका येऊन हॉवर्ड परत इंग्लिश खाडींत आला, आणि तेथूनच त्यानें शत्रूची टेहळणी चालविली. इकडे स्पॅनिश आरमार आपली मोडतोड दुरुस्त करून ता. १२ जुलै रोजीं फिरून इंग्लंडकडे निघालें आणि अकस्मात् ता. १९ला इंग्लिश खाडींत शिरलें. स्पॅनिश आरमार आल्याची वार्ता तत्काळ सांकेतिक खुणांनीं सर्व देशभर कळविण्यांत आली. तेव्हां यच्चयावत् बंदरांत खुष्कीवरील व दर्यावरील सैन्य कडेकोट तयारीनें शत्रूची मार्ग-प्रतीक्षा करूं लागलें. लॉर्ड हॉवर्डनें आपलें आरमार प्लिमाऊथ बंदरांतून मोठ्या काळजीनें बाहेर काढून, शत्रूचा पाठलाग करण्यास सुलभ होईल अशा रीतीनें पश्चिमेच्या वाऱ्यास पाठ देऊन उभें केलें.

ता. २० जुलै रोजीं उभय आरमारांची दृष्टादृष्ट झाली. त्यावेळीं स्पॅनिश गलबतांची रचना अर्धवर्तुलाकृति असून दोहों टोंकांमधील अंतर सात मैलांचें होतें. वारा नैऋत्य दिशेचा असून त्या वाऱ्यानें सावकाशपणें तीं गलबतें खाडींतून चाललीं होतीं. इंग्लिश अधिकाऱ्यांनीं त्यांना खाडींत पुढें जाऊं दिलें आणि त्यांचा परत जाण्याचा मार्ग बंद करून पाठलागास आरंभ केला. यावेळीं धरपळ सुरूं झाली, तींत कित्येक स्पॅनिश मनावरें पकडलीं गेलीं आणि बरींच जहाजें नादुरुस्त झालीं. पण इंग्लिशजहाजें लहान असून चपल असल्यानें त्यांनीं आपल्या धूड प्रतिस्पर्ध्यांशीं लगट न करितां मागून, पुढून, बाजूनें, मंडलाकार

फेरे घेऊन त्यांस जेरीस आणलें, व स्वतःचे काफिल्यास ह्मणण्यासारखी नुकसानी होऊं दिली नाहीं.

फिलिपनें मेडिनासिडोनियाला बजाविलें होतें कीं, इंग्लिश खाडींत शिरल्यानंतर होतां होईल तों फ्रेंच किनाऱ्याचे बाजूनें पुढें जावें, आणि लढाई देण्याला इंग्लिश आरमार चालून आलें, तरी हातघाईचा प्रसंग टाळून कॅले बंदराचे आसऱ्याला नांगर टाकून रहावें; ह्मणजे तेथें पार्माच्या हाताखालील काफिला येऊन मिळेल आणि पुढील बेत ठरविण्यास सुलभ होईल. या हुकुमाप्रमाणें स्पॅनिश ॲडमिरलनें आपल्या जहाजांचें ह्मणण्यासारखें नुकसान होऊं न देतां, तें आरमार ता. २७ जुलै रोजीं कॅले बंदरांत आणिलें आणि तेथें नांगर टाकून तो स्वस्थ राहिला. फिलिप व ड्यूक ऑफ् पार्मा यांची अशी ठाम समजूत होती कीं, स्पॅनिश आरमाराशीं गांठ पडतांच इंग्लिश व डच जहाजें हैबत खाऊन पळून जातील, आणि सर्व दर्या मोकळा टाकून फार तर आपलीं बंदरें, गोद्या व राजधानी यांच्या बचावाकरितां तेथें जाऊन राहतील. अशा वेळीं आरमाराच्या मदतीनें पार्मानें आपलें सैन्य व युद्धसामुग्री किनाऱ्यावर उतरवावी आणि खुष्कीवर लढाई द्यावी; पहिला तडाक्याचा हल्ला लंडन शहरावर करावयाचा; कारण शहरचे रहिवाशी नाजूक असून त्यांस युद्धाची माहिती व सरावही तितपतच असणार; आणि लंडनवर खुष्कीनें हल्ला केल्यास त्यांस नदींतून लहान लहान जहाजांचेंही साह्यय मिळणार असा संकेत ठरला. पण इंग्लिश खलाशांची हुरूप व चलाखी अद्यापि त्यांस कळून आली नव्हती; त्याची प्रचीति त्यांस आतां येऊं लागली. स्पॅनिश आरमारानें इंग्लिश गलबतांची हकालपट्टी करण्याच्या ऐवजीं इंग्लिश व डच जहाजांनींच त्या अजिंक्य आरमारास कॅले व डंकर्क येथें कोंडून टाकलें. पार्मा व

मेडिनासिडोनिया हे उभयतां डच व इंग्लिश आरमारांच्या कोंडमाऱ्यांत सांपडले; तथापि धैर्य धरून युक्तीनें दोन्ही काफिले एकत्र करावे असा त्यांचा बेत चाललाच होता. याप्रमाणें शत्रूस कचाटींत धरूनच इंग्लिश खलाशी स्वस्थ बसले नाहींत; तर शत्रूला चांगलाच हात दाखविण्याचा त्यांनीं निश्चय केला. पण स्पॅनिश आरमार बंदरांत सुरक्षित ठिकाणीं नांगरून राहिलें असतां त्याजवर चालून जाण्याची इंग्लिशांची ताकद नव्हती. यासाठीं शत्रूला बंदरांतून बाहेर काढण्याकरितां ता. २९ रोजीं रात्रौ त्यांनीं आठ आगीचीं गलबतें स्पॅनिश आरमारांत नेऊन सोडिलीं. त्यायोगानें शत्रूंची एकच धांदल उडून जाऊन कित्येक मनावरांनीं नांगर उचलून पलायनास प्रारंभ केला. त्यावेळीं त्यांच्यांत आपापसांतच टक्कर होऊन एक मोठें जहाज रसातळास गेलें. तें पाहून इतर जहाजावरील खलाशी अगदींच गांगरून गेले आणि त्यांनीं इतस्ततः भटकण्यास सुरवात केली. ती रात्र काळोखी असल्यानें त्यांच्या भीतीस पारावार नाहींसा झाला. याप्रमाणें रात्रभर त्या आरमाराची दुर्दशा झाल्यावर सूर्योदय झाला. त्यावेळीं राहिलींसाहिलीं गलबतें अधिकाऱ्यांच्या हुकुमानें ग्रेव्हलाइन्स येथें युद्धाचे तयारीनें उभीं राहिलीं. हीच वेळ मोठ्या आणीबाणीची होती. पार्माच्या सैनिकांचे पाय इंग्लिश किनाऱ्यास लागावयाचे किंवा नाहीं हें या लढाईच्या परिणामावर अवलंबून होतें. याकरितां इंग्लिशांनीं त्यावेळीं आपल्या पराक्रमाची व धाडसाची हद्द केली. ड्रेक व फेन्नर यांनीं प्रथम हल्ल्यास प्रारंभ केला. त्यांचे मागून फेंटन, बर्टन इत्यादींनीं तोच कित्ता वळविला. शेवटीं लार्ड एफिंगहॅम व शेफील्ड हेही युद्धांत सामील झाले. स्पॅनिश आरमाराचा बेत आपली जूट कायम राखून होतां होईल तों फ्रेंच किनाऱ्याजवळून दूर जावयाचें नाहीं असा होता. पण तेवढेंही त्याचे हातून झालें नाहीं. इंग्लिश गलबतांनीं त्याचेभोवतीं घिरट्या घालन त्यास

जेरीस आणलें, आणि शेवटीं त्यास बंदरांतून हुसकून लाविलें. डंकर्कचे किनाऱ्यावर आपल्या सैन्याचा तळ देऊन मोठ्या उत्कंठेनें पार्मा या आरमाराची मार्गप्रतीक्षा करीत होता. पण त्याच्या डोळ्यादेखत इंग्लिशांनीं सर्व स्पॅनिश गलबतें तेथून उत्तरेस धुडकावून लाविलीं. त्यावेळीं आपलीं पिलें उचलून नेणारावर पिंजऱ्यांतील सिंहीण ज्याप्रमाणें चडफडते, त्याप्रमाणें पार्मा चडफडून रागानें मनगटें चावूं लागला. पण त्याचा उपयोग काय? मेडिनासिडोनियाच्या काफिल्याची व त्याची फिरून दृष्टादृष्टसुद्धां झाली नाहीं. इंग्लिश व स्पॅनिश आरमारांची जी कांहीं समोरासमोर निकराची लढाई झाली ती हीच शेवटची होय. यापुढें जी झटपट झाली, तीस लढाई हें नांव शोभत नाहीं. कारण ती नुसती ससेहोलपट होती.

ह्या दिवशींच्या युद्धांत स्पॅनिश आरमाराचें अतोनात नुकसान झालें. त्याच्या कित्येक मोठ्या लढाऊ जहाजांस तोफांच्या गोळ्यांनीं भोंकें पडून तीं चाळणीसारखीं झालीं. शत्रूनेंही उलट भडिमार केला. पण इंग्लिश जहाजें लहान असून पाण्याच्या पृष्ठभागावर त्यांचा फारच थोडा भाग उरत असे. त्यामुळें तोफांचे गोळ्यांचा नेम त्याजवर साधत नसे. ह्मणून त्याचें एकही गलबत फुटलें अगर बुडालें नाहीं व एकही मोठा अधिकारी जायबंदी झाला नाहीं. स्पॅनिश आरमार इंग्लिश खाडींत आल्यावेळेपासून तों तें परत जाईपर्यंत इंग्लिशांचे सुमारें केवळ शंभर खलाशी कामास आले. स्पॅनिश मनावरांपैकीं तीन बुडालीं व तीन नादुरुस्त होऊन फ्लेमिश किनाऱ्याला लागलीं. बाकीचीं गलबतें थोडींबहुत नादुरुस्त झालीं, तथापि अगदींच निरुपयोगी झालीं नाहींत. परंतु गलबतांवरील खलाशांची व विशेषेंकरून मेडिनासिडोनियाची पांचावर धारण बसली. आपल्या आरमाराची अशी त्रेधा उडालेली पाहून त्यानें उत्तरे-

कडून स्काटलंडला वळसा घालून परत स्पेनला जाण्याचा बेत ठरविला. मेडिनासिडोनियासारख्या नामर्द ॲडमिरलच्या जागीं सॅटाक्रूझसारखा बाणेदार अधिकारी असता तर त्यानें अद्यापिही शत्रूशीं दोन हात केले असते आणि आपल्या देशाचें नांव राखिलें असतें. परंतु त्या सर्व आरमारांत कप्तान ओर्केंडाखेरीज दुसरा कोणीच छातीचा माणूस नव्हता. त्यामुळें ओर्केंडाचें मत झुगारून देऊन सर्वांनीं उत्तर दिशेस पलायनास प्रारंभ केला. त्यावेळीं दक्षिण दिशेचा वारा असल्यानें इंग्लिश जहाजांस शत्रूचा पाठलाग करणें सोईचें होतें. त्याप्रमाणें त्यांनीं पार्माचे काफिल्यावर नजर ठेवण्यास थोडीं गलबतें ठेवून बाकीच्या जहाजानिशीं शत्रूचा पाठलाग केला; परंतु त्यांच्या गलबतावरील दारूगोळा खलास झाल्यानें त्यांस परतावें लागलें. अधिकाऱ्याजवळ पुरेसा दारूगोळा नसल्यानें हातचा शत्रु निसटून जावा हें लष्करी अधिकाऱ्यास लांच्छन आहे.

स्पॅनिश आरमाराचा पाठलाग बंद पडला; पण त्याला अधिक भयंकर शत्रूशीं अद्याप झगडावयाचें होतें. आर्क्ले बेटाजवळ तें आरमार येतांच तुफानाचा जोर भयंकर झाला आणि त्या वादळाच्या तडाक्यानें पन्नास साठ गलबतें तेथील खडकावर आपटून फुटून गेलीं. त्या तुफानांत कित्येक जहाजांचा बेपत्ता जाहला. हें आरमार कोरुन्नाहून निघालें त्यावेळीं त्यांत १३० जहाजें, हजारो तोफा, ८००० खलाशी, आणि २०००० शिपाई होते. त्यांतून चार हजार शिपाई व खलाशी कॅलेच्या लढाईंत ठार झाले; आठ हजार आर्क्लेबेटानजीक गलबतें फुटून मरण पावले; पांच सहा हजार स्काटलंड व आयर्लंडच्या किनाऱ्यावर जहाजें फुटून लागले, त्यांना तेथल्या रहिवाशांनीं कंठस्नान घातलें. उरलेलीं सुमारें पन्नास गलबतें स्पेनच्या कोरुन्ना बंदरास परत आलीं. त्यांवर अजमासें दहा हजार खलाशी होते; परंतु त्यांतील बहुतेक

वादळानें व सांथीच्या तापानें मरणोन्मुख झाले होते. या प्रकारें ह्या अजिंक्य आरमाराची वाताहत झाली. परंतु परत स्वदेशीं गेल्यावर स्पॅनिश अधिकाऱ्यांनीं निलाजरेपणानें आपल्या पराक्रमाचें व इंग्लिशांच्या झालेल्या नुकसानीचें खोटेंनाटेंच वर्णन प्रसिद्ध केलें. तेव्हां तो गैरसमज दूर करण्याकरितां ड्रेकनें जाहीर केलें कीं, 'स्पेनच्या अजिंक्य आरमारानें इंग्लिशांचे एकसुद्धां मनावर, जहाज, गलबत, नांव, मचवा, होडी किंवा पडावसुद्धां बुडवून टाकिला नाहीं. इंग्लिश किनाऱ्याच्या आजूबाजूसही तें येऊं शकलें नाहीं. मग किनाऱ्यावर सैन्य उतरवून जय मिळविणें दूरच राहिलें'.

या पराजयानें स्पेनच्या सत्तेस उतरती कळा लागली; हालंड देश स्वतंत्र झाला; प्रोटेस्टंट धर्माचा बचाव झाला; आणि समुद्रावर इंग्लंडची सत्ता बाढून त्या साम्राज्याच्या विस्तारास प्रारंभ झाला.

जगांतील क्रांतिकारक लढाया.

भाग ११ वा.

ब्लेन्हीमची लढाई इ. स. १७०४.

एकोणिसाव्या शतकाचे प्रारंभीं नेपोलियनच्या अनावर राज्यतृष्णेपासून व अभूतपूर्व राज्यविस्तारापासून युरोप खंडाला जें भय होतें, तेंच भय अठराव्या शतकारंभीं चवदाव्या लुईपासून होतें. लुईनें आपला राज्यविस्तार नेपोलियनप्रमाणें यक्षिणीच्या कांडीनें एक दोन वर्षांत केला नाहीं हें खरें. परंतु त्याचा अम्मल सावकाशपणें बसल्यामुळेंच अधिक पायाशुद्ध व मजबूत होता, आणि त्यामुळें युरोपला त्यापासून अधिकच भीति होती. नेपोलियननें जे प्रदेश जिंकून फ्रान्स देशाला जोडले, त्यांतील एक इंचभरसुद्धां जमीन हल्लीं फ्रान्सच्या ताब्यांत नाहीं. पण चवदाव्या लुईनें हस्तगत केलेले फ्रेंच काम्टे, * अल्सेस, व फ्लँडर्सचा कांहीं भाग हे अद्याप इ. स. (१८९१) फ्रान्सच्या ताब्यांत आहेत व स्पेनच्या घराण्याशीं लुईनें जो संबंध जोडला तोही अद्याप स्मृतिशेष झालेला नाहीं.

इ. स. १६६१ त कार्डिनल मॅझेरिनच्या मृत्यूनंतर लुईनें सर्व राज्यकारभार स्वतः चे हातीं घेतला. त्यावेळेपासून चाळीस वर्षें त्यानें आपलें

* यांतील अल्सेस प्रांत जर्मनीनें इ. स. १८७१ त फ्रँकोजर्मन युद्धांत फ्रान्सकडून बळकावला.

राज्य वाढविण्याचें काम अव्याहत चालविलें. ह्या अवधींत त्याचा पराजय कोठेंच झाला नाहीं. तो इ.स. १७७१ च्या सुमारास मरण पावला असता तर त्याची कारकीर्द फ्रान्सचे इतिहासांत अद्वितीय वैभवाची व पराक्रमाची गणली गेली असती; आणि पुढें मार्लबरोनें त्याच्या सैन्याची धुळधाण उडविल्यामुळें त्यास हाय हाय करावें लागलें तो प्रसंग टळला असता; किंवा ब्लेन्हीमच्या लढाईत लुईच्या हातून मार्लबरोचा मोड झाला असता तर त्याचें राज्याचा विस्तार शिकंदर बादशहाचे राज्याहून अधिक विस्तृत व रोमन राज्यापेक्षां जास्त टिकाऊ झाला असता.

चवदाव्या लुईनें राज्यसूत्रें हातीं घेतलीं त्यावेळीं फ्रान्स देशांत राजाची सत्ता अनियंत्रित होती. माजी मुख्य प्रधान रिचल्यू यानें सरदारघराण्यांची नांगी मोडली होती. पारिसची पार्लमेंट लोकांच्या तिरस्कारास पात्र झाली असून स्टेट्स जनरल नामक लोकसभा तर कोणास ऐकूनही ठाऊक नव्हती. राजा ह्मणजे सर्वाधिकारी अशी प्रजेची समजूत असल्यानें लुईनें त्याचा चांगलाच फायदा करून घेतला, आणि फ्रान्स देशाचें महत्त्व त्यानें अतोनात वाढविलें. लुईचा एक अमोलिक गुण ह्मणजे गुणांची पारख हा होय. गुणी मनुष्यास असेल तेथून निवडून काढून तो आपल्या पदरीं बाळगीत असे. ह्मणून त्याचे हाताखालीं टूरेन, कान्डे, व्हिलार्स, बर्विक यांसारखे सेनापति, व्हॉगनसारखे शिल्पशास्त्रज्ञ, आणि लुव्हॉइसारखे सैन्यव्यवस्थापक चमकत होते. एकंदरींत चवदाव्या लुईचे कारकीर्दींत सर्व युरोप खंडांत मुत्सद्दीपणा, शौर्य व वैभव याविषयीं फ्रान्स देश विख्यात झाला होता. सबब लुईच्या महत्त्वाकांक्षेस आळा घालण्यास दुसरा कोणताही देश समर्थ नव्हता.

वेस्टफॅलियाच्या तहापासून जर्मनीचें मनोराज्य जागचे जागींच राहिलें. आस्ट्रिया देशाचे राज्यपद्धतींत फरक होऊन त्याचें बळ वाढलें. त्या-

योगानें जर्मन गरुड पक्ष्याचीं पंखेंच उपटल्याप्रमाणें झालें. स्पेनची स्थिति त्यावेळीं हलाखीची होती. दुसऱ्या फिलिपचे वेळेपासून त्या देशास जी उतरती कळा लागली ती त्याचे पश्चात् चालूच होती. राहतां राहिले हॉलंड व इंग्लंड हे दोन देश. परंतु ऑलिव्हर क्राम्वेलच्या मरणानंतर दुसरा चार्लस राजा राज्यपदारूढ झाल्यापासून ते इंग्लिश राज्यक्रांतिपर्यंत इ. स. १६६०-१६८८पावेतों इंग्लंडचे शब्दास परराष्ट्रांत फुटक्या कवडीची किंमत नव्हती; एवढेंच नव्हे तर इंग्लंडचे राजे दुसरा चार्लस व जेम्स हे लुईचे मिंधे असल्यानें त्यांच्या हातून लुई-विरुद्ध कांहीं कारस्थान होणें शक्य नव्हतें!

एक हालंड देश मात्र लुईला हार गेला नव्हता. फ्रान्सनें हालंड देशाचा चुराडा करण्यासाठीं आकाशपाताळ एक केलें. पण डच लोकांचें शौर्य व त्यांचा पुढारी वुइल्यम् ऑफ आरेंज याचें अढळ धैर्य यापुढें त्यास हात टेकावे लागले. अशा संधींत इंग्लंडमध्यें राज्यक्रान्ति घडून वुइल्यम् हा इंग्लंडचा राजा झाला. तेव्हां इंग्लंड देश फ्रान्सच्या मिंधेपणांतून मुक्त होऊन हालंडच्या साहाय्यास तयार झाला. फ्रान्सचे शत्रु एकाचे दोन झाले, तथापि प्रत्येक युद्धांत व तहांत फ्रान्सची सरशी अद्याप कायमच होती. अशा वेळीं लुईच्या हाती स्पेनचें साम्राज्य गेल्यास त्याच्या बळास सीमाच राहणार नाहीं व सर्व युरोप खंडास तें जाचेल हें सर्वांस कळून चुकलें.

इकडे स्पेनचा राजा दुसरा चार्लस हा मरणोन्मुख झाला. त्यास संतति नसल्यानें वारसासंबंधीं प्रश्न उपस्थित झाला. इ. स. १६५९त चवदाव्या लुईचा स्पेनच्या राजकन्येशीं विवाह झाला होता. त्या वेळेपासून स्पेनच्या साम्राज्यावर त्याचा डोळा होता. लग्नाचेवेळीं अर्थात् स्पेनचे गादीवरचा वारसा सोडल्याबद्दल रीतीप्रमाणें ठराव झाला. पण

असले करार आपखुषीनें कोण पाळणार? हा ठराव बेकायदेशीर आहे असें प्रतिपादण्यास लुईचे तर्फे वकील तयारच होते. स्पेनच्या राजाचे दुसरे वारस लिओपोल्ड ऑफ् आस्ट्रिया व जोसेफ इलेक्टर ऑफ् पॅलेटिनेट हे होते. या तिघांत जोसेफ हा हीनबल असल्यानें त्यास स्पेनचे साम्राज्यांतील बहुतेक भाग देऊन लुईच्या मुलास सिसिली व नेपल्स आणि लिओपोलच्या पुत्रास मिलनचें संस्थान द्यावें, ह्मणजे युरोपखंडांतील शांततेचा भंग होणार नाहीं असें वाटून, इंग्लंड व फ्रान्सच्या राजांच्या दरम्यान हें पहिलें वांटणीपत्र झालें. पण दुर्दैवानें जोसेफ हा लवकरच वारल्यानें फ्रान्स व आस्ट्रियाचे राजपुत्र हे दोघेच वारसदार राहिले. तेव्हां कोणीकडून तरी फ्रान्सची सत्ता वाढूं देऊं नये या हेतूनें आस्ट्रियाच्या राजपुत्रानें स्पेनचें राज्य व वसाहती घ्याव्या आणि फ्रेंच युवराजास सिसिली, नेपल्स, मिलन हीं संस्थानें मिळावीं असा करार ठरला. स्पेनच्या राजास या कराराची गुणगुण कळतांच, अशा तऱ्हेच्या वांटणीनें स्पेन देश हीनबल होईल हें जाणून त्यानें एक मृत्युपत्र केलें. त्यांत त्यानें आपलें सर्व साम्राज्य चवदाव्या लुईचा धाकटा नातू जो फिलिप त्यास देऊन टाकिलें, आणि इ. स. १७००त तो मरण पावला.

चार्ल्स राजाच्या मृत्युपत्रानें स्पेनचें सर्व राज्य आपल्या नातवास मिळाल्याचें लुईला कळतांच त्यानें आपलें पूर्वीचें करारपत्र गुंडाळून ठेविलें; आणि लगेच आपल्या नातवास स्पेनच्या सिंहासनावर आरूढ होण्यास त्यानें रवाना केलें. त्यास निरोप देतांना तो ह्मणाला 'यापुढें स्पेन व फ्रान्स यांच्या दरम्यानचा पिरिनीज पर्वत अस्मून नसल्याचप्रमाणें होय'. यावेळीं स्पेनच्या साम्राज्यांत स्पेन, नेदर्लंडचा कांहीं भाग, सार्डिनिआ, सिसिली, नेपल्स, मिलन, फिलिपाइन बेटें, कॅलिफोर्निया, फ्लारिडा आणि मध्य व दक्षिण अमेरिकेचा बराच मोठा भाग इतक्यांचा समावेश

होत होता. फिलिपचें स्पेनमध्यें चांगलें आगतस्वागत झालें ; व इ. स. १७०१त त्यास राज्याभिषेकही झाला. याप्रमाणें बुर्बोनच्या वंशजांचे ताब्यांत फ्रान्स व स्पेन हे दोन बलाढ्य देश आले.

लुईचें हें कारस्थान पाहून इंग्लंडचा राजा तिसरा वुइल्यम् व आस्ट्रियन बादशहा लिओपोल्ड यांचा क्रोधाग्नि भडकून गेला. फ्रान्स व स्पेन हीं दोनी राज्यें एकवटून युरोपखंड आपल्या घशांत टाकण्याचा लुईचा विचार त्यांनीं ताडला. फिलिपची रवानगी करून देतांनाच त्याचा फ्रान्सचे गादीवरील हक्क कायम ठेवल्याबद्दलचीं आज्ञापत्रें लुईनें प्रसिद्ध केलीं होतीं. शिवाय आपल्या नातवाच्या नांवावर नेदर्लंडांतील सर्व मुलूख लुईनें आपल्या फौजेकरवींच हस्तगत करून घेतला होता. फ्रान्स व स्पेन हे देश उघडपणें आज अगर कालेंकरून एकत्र होवोत. तूर्त लुईच्या हातीं त्या दोन्ही राज्यांतील सत्ता प्राप्त झाली हें निर्विवाद होतें. या एकीकरणानें इंग्लंड, हालंड, जर्मनी, आस्ट्रिया, डेन्मार्क व पोर्तुगाल या देशांच्या सत्तेस विरोध येण्याचा संभव होता. यास्तव वुइल्यमच्या अश्रांत श्रमानें या सर्वांची फ्रान्स व स्पेनविरुद्ध एकजूट झाली आणि त्यांनीं चवदाव्या लुईच्या वाढत्या सामर्थ्यास अटकाव करण्याचा निश्चय केला.

ही जूट झाली न झाली तोंच त्या जुटीचा मेरुमणि वुइल्यम हा ता. ८ मार्च १७०२ रोजीं मरण पावला. त्यामुळें हा सर्व व्यूह ढासळून जातो कीं काय अशी भीति पडली. पण त्याचेमागून ॲन राणी इंग्लंडच्या गादीवर आली. तिनें तिसरेच दिवशीं पार्लमेंट सभेंत 'वुइल्यमचे सर्व बेत सिद्धीस नेण्यास मी तयार आहे ' असें जाहीर केलें, आणि इंग्लिश सैन्याचें आधिपत्य ड्यूक ऑफ मार्लबरो यास देण्यांत आलें.

मार्लबरोच्या अंगीं व्यक्तिदृष्ट्या कित्येक गर्ह्य दुर्गुण होते. परंतु सध्याचे प्रसंगीं त्याच्या खासगी वर्तणुकीशीं आह्मांस कांहीं कर्तव्य नाहीं. केवळ सेनानी या नात्यानें त्याच्या गुणावगुणाची मीमांसा करितां तो अद्वितीय योद्धा होता असें कळून येईल. मोहिमेचा बेत ठरविण्याचें अटोकाट चातुर्य, व तो बेत पार पाडण्याचे कामीं दिसून येणारें त्याचें दीर्घदर्शित्वयुक्त साहस व तडफ हीं अवर्णनीय होती. सेनापतीस अवश्यक असा अमुक एक गुण मार्लबरोचे अंगीं पूर्णत्वेंकरून नव्हता, असें क्वचितच दाखवितां येईल. अति बिकट प्रसंगीं व लढाईचे भाऊगर्दीतही डोकें शांत असणें हा जो सेनानायकाचा अवश्यक व अमोलिक गुण तो मार्लबरोच्या अंगीं उत्कटत्वेंकरून होता. मार्लबरोचा अविश्वासुकपणा पूर्णपणें अवगत असूनही, एवढ्या गुणांवरूनच वुइल्यमनें मरतेवेळीं ॲनला त्याचें नांव सुचविलें होतें. ॲनला या सूचनेचें कारणच नव्हतें. मार्लबरोच्या पत्नीशीं तिचें अत्यंत रहस्य होतें. यामुळें सेनापतीची जागा त्यास सहजच मिळाली; आणि त्याचे अंगचे जे गुण आजवर कोनाकोपऱ्यांत दडून होते, ते पूर्णपणें जगाचे निदर्शनास आणून देण्यास त्याला सुसंधि प्राप्त झाली.

मार्लबरोला केवळ इंग्लिश सैनेचेंच अधिपत्य मिळालें असें नाहीं, तर डच व आस्ट्रियन प्रधानांनीं सर्व संयुक्त सैन्याचा अधिकार त्याजकडे दिला. या धोक्याच्या व डोळ्यांत सलणाऱ्या अधिकाराचे जागीं केवळ लष्करी नैपुण्यानेंच काम भागण्यासारखें नव्हतें. धिम्मेपणा, गोड स्वभाव, मनुष्याची पारख, योग्य मनुष्यावरच विश्वास ठेवण्याची व इतरांस मान व विश्वास यांच्या वरकरणी उपचारानें खुष ठेवण्याची नैसर्गिक हातोटी, हे खुषमस्कऱ्याचे गुण मार्लबरोच्या अंगीं नसते, किंवा त्यांचा योग्य प्रसंगीं त्यानें उपयोग केला नसता तर त्याला आपले

ह्याखालील सैन्य डॅन्यूब नदीपर्यंत नेतांच आलें नसतें, व ती राष्ट्रांची जूट एक वर्षसुद्धां टिकली नसती. ही जूट त्यानें फुटूं न देतां कायम राखिली; एवढेंच नव्हे तर आपल्या मनोदया प्रमाणें तीस वळण व गति देऊन, जें युद्ध कंटाळवाणें व प्राणहारक झालें असतें, त्याचा प्रत्येक अंक व प्रवेश उत्साहवर्धक केला. ज्या ज्या रणांगणावर तो जातीनिशीं हजर होता, व ज्या लढाया त्याच्या अनुरोधानें झाल्या, त्या सर्वांत त्यास विजयश्रीनें वरिलें. त्यानें लढाई दिली कीं ती जिंकलीच, आणि किल्ल्यास वेढा दिला कीं तो घेतलाच, अशी त्याची सर्वत्र प्रख्याति झाली.

संयुक्त राष्ट्रांनीं ता. ४ मे १७०२ रोजीं फ्रान्सच्याविरुद्ध लढाईचा जाहिरनामा काढिला. प्रथमारंभीं फ्लँडर्स, ह्याइन नदीचा उगम प्रदेश, व इताली हे प्रांत रणक्षेत्र बनले. पहिलीं दोन वर्षें सेनाधिपति मार्लबरो हा फ्लँडर्समध्येंच होता. तेथें कांहीं किरकोळ किल्ले त्यानें घेतले. इटालींत कांहीं महत्त्वाची हालचाल किंवा लढाई झाली नाहीं. परंतु मध्यभागीं सेल्टपासून पो नदीपर्यंतच्या पट्ट्यांत लुईच्या सरदारांनीं इ. स. १७०३ सालांत जे जय मिळविले, त्यायोगानें त्यांच्या जुटींतील एका प्रमुख राष्ट्राचा नाश होण्याचीं लक्षणें दिसूं लागलीं. बव्हेरियाचा संस्थानिक लुईच्या बाजूस होता. त्यानें अल्मचा बळकट किल्ला घेतला व ह्याइनच्या उगमाकडील मुलुखांतून फ्रेंच सैन्याशीं दळणवळण चालू केलें. त्यामुळें फ्रेंच सैन्यास प्रशियाचे छातीवर चालून जाण्यास सवड झाली. इ. स १७०३ च्या पावसाळ्यांतच फ्रेंच व बव्हेरियन सैन्यांनीं आस्ट्रियाच्या फौजेस आपल्या मुलुखांतून हांकून दिलें, व हिंवाळ्यांत आसबर्ग व पॅसा हीं प्रमुख ठाणीं हस्तगत केलीं. ह्याइन व मोसेल नद्यांच्या विभाग्यांतील प्रदेशांत जें फ्रेंच सैन्य होतें त्यानें आपल्या शत्रू-

वर विजय मिळवून ट्रेव्हज व लँडा हीं शहरें घेतलीं. त्याच वेळीं फ्रेंच लोकांच्या खटपटीनें हंगेरींत आस्ट्रिया विरुद्ध बंडें उद्भवून बादशहा व त्याचे सल्लागार यांचें चित्त व्यग्र झालें, आणि ह्या युद्धाच्या परिणामाविषयीं त्यास धास्ती वाटूं लागली.

इ. स. १७०४ सालची मोहीम याहून मोठ्या प्रमाणावर करण्याचा बेत ठरला. फ्लँडर्समध्यें फ्रेंच सैन्यानें स्वसंरक्षण करूनच रहावें; त्या प्रांतांतील फ्रेंच किल्ले इतके मजबूत व असंख्य होते कीं, इंग्लिश सैन्यास कितीही जय मिळाले तरी एका वर्षाच्या अवधींत त्यांचा फ्रेंच सरहद्दीवर कांहींच परिणाम घडणार नाहीं. याकरितां मार्शल व्हिलेरॉयनें फ्लँडर्समध्यें केवळ दिखाऊ तत्पूरतें सैन्य ठेवून बाकीची सर्व फौज व्हाइन व मोसेलकडे पाठवून द्यावी; आणि मार्शल टॅलार्डनें तेथील पलटणी घेऊन प्रशियांतील ब्लॅक फारेस्टमधून कूच करून मार्सिन याच्या मदतीस जावें. इकडे इटालींतील सैन्यानें टायरोलमधून आस्ट्रियांत घुसावें आणि नंतर या सर्व फौजांची छावणी डॅन्यूब व हन्न या नद्यांचे दरम्यान पडावी. शिवाय हंगेरींतील बंडवाल्यांस मदतीसाठीं कांहीं टोळ्या पाठवून देऊन तिकडून आस्ट्रियास पायबंद बसेल अशी तजवीज करावी. याप्रमाणें सर्व व्यूह जमल्यावर व्हिएन्ना राजधानीस वेढा घालून आस्ट्रियन बादशहाकडून आपणांस वांटतील त्या अटी कबूल करून घ्याव्या; असा व्यूह लुईनें मोठ्या शिताफीनें रचिला होता, आणि मार्लबरोसारखा प्रतिस्पर्धी त्यास त्यावेळीं भेटला नसता तर तो सिद्धीसही गेला असता.

व्हाइन नदीतीर व बव्हेरिया येथील युद्धाचा रागरंग मार्लबरो काळजीपूर्वक पहात होता. आपण इकडे एका कोपऱ्यांत फ्लँडर्समधील किल्ले घेण्याच्या क्षुल्लक कामांत गुंतून रहावें आणि तिकडे आस्ट्रियन पाद-

शाहीवर फ्रेंचांचें अरिष्ट कोसळावें हें त्यास रुचेना. यास्तव फ्लँडर्स-मधील लढाई तहकूब ठेवून आपण शक्य तितक्या फौजेसह रणरंग-भूमीच्या मध्यभागावर प्रकट व्हावें असें त्यानें योजिलें. इतक्या दूरवर सैन्यासह कूच करणेंच कठिण. पण शिवाय या बेताला इतर राष्ट्रांची संमति मिळणें कठिणतर होतें. मार्लबरो आपल्या सैन्यासह दुसरीकडे गेल्यास आपली सरहद्द उघडी पडणार ह्मणून डच लोकांची पहिली तक्रार उभी राहणार. ज्या कित्येक राजे, संस्थानिक, मंत्री व सरदा-राशीं मार्लबरोला वागवावयाचें होतें, त्यांत कांहीं मित्रे, तर कित्येक आळशी, कांहीं अजागळ, कांहीं स्वार्थसाधु, कांहीं मूर्ख तर कित्येक विश्वासघातकी होते. त्या सर्वांत जर्मन सेनापति प्रिन्स यूजिन व डच मंत्री हिन्सियस हे दोघेच काय ते कर्तृत्ववान् व विश्वासू होते. त्यास मार्लबरोची युक्ति पूर्ण पटली. इतर कोणास त्यानें आपला खरा हेतु कळविला नाहीं. आपण मोसेल नदीकडे जात असल्याचें कळवून डच सैन्यास त्यानें नेदर्लंडांतच लढाई चालू ठेवण्यास फर्माविलें; आणि प्रशियाच्या राजाकडून मार्गांत ठिकठिकाणीं आपल्या फौजेस मदत मिळण्याची तजवीज करण्याचें मोठ्या मिनतवारीनें कबूल करून घेतलें.

ह्याप्रमाणें सर्व तरतूद करून ता. १९ मे १७०४ रोजीं मार्लबरोनें कूच करण्यास प्रारंभ केला. त्याचें सैन्य ५१ पायदळ पलटणी, ९२ स्वारांच्या तुकड्या इतकें असून त्यांत १६ हजार ब्रिटिश शिपाई होते. वाटेंत त्यास ११ डच पलटणी, व ऱ्हाइन नदीचे कांठची प्रशियन फौज मिळावयाची होती. काब्लेंट्झ शहरानजीक ऱ्हाइन नदी ओलांडून तिच्या उजव्या तीरानें मेंट्झ शहरावरून तो पुढें चालला. जरी तो तांतडीनें निघाला होता तथापि मार्गांत रसद पोचण्याची आगाऊ तर-तूद चोख झाली असल्यानें त्याच्या सैनिकांस निष्कारण त्रास मुळींच

झाला नाहीं. अद्याप शत्रूशीं लढाईचें तोंड कोठेंच लागलें नव्हतें. तरी मार्लबरोची युक्ति फलद्रूप होऊन आस्ट्रियावरची शत्रूची मगरमिठी ढिलावत चालली. मार्शल व्हिलेरॉय यास मार्लबरोच्या बेताचा अंतच लागेना. त्यामुळें भांबावून जाऊन मोसेल व फ्लँडर्स यांच्या दरम्यान तो घुटमळत राहिला. मार्शल टॅलार्ड हा ४९ हजार सैन्यासह स्ट्रूंस्बर्ग येथें होता. बव्हेरियावर स्वारी करण्याची त्याची तयारी चालली होती. पण मार्लबरोचा डोळा अलसेस प्रांतावर असेल अशा समजुतीनें तो फ्रान्सच्या बचावाकरितां तेथेंच तळ देऊन राहिला. त्यास तसेंच बुचकळ्यांत ठेवण्याकरितां मार्लबरोनें फिलिप्सबर्ग येथें ऱ्हाइन नदीवर एक पूल बांधण्याची कामगिरी चालू ठेविली, आणि आपण पुढें निघून चालता झाला. मार्शल मार्सिन व प्रिन्स ऑफ् बव्हेरिया यांनीं मात्र इंग्लिश सेनापतीचा कावा ओळखून आस्ट्रिया अगर हंगेरींत सैन्य पाठविण्याचें तहकूब केलें. याप्रमाणें शत्रुसैन्यें ठिकठिकाणीं संशयांत पडल्यानें, जून महिन्यांत ऱ्हाइन नदी सोडून तो डॅन्यूबकडे वळला, तेव्हां त्यास अडविण्याची कोणाची छाति झाली नाहीं. तेथून नेकर नदी ओलांडून तो आग्नेयी दिशेनें चालला. मंडेलशेन येथें प्रिन्स यूजीनची प्रथम भेट झाली. यापुढें हें युद्ध संपेपर्यंत हे दोघे वीर परस्पर-साहाय्यकारी होते. तेथून डोंगराळ प्रदेशांतून जाऊन ता. २ जुलै रोजीं स्कलेनबर्ग येथील बव्हेरियन छावणीवर त्यांनीं हल्ला केला. येथें जय मिळवून थोडक्याच कालांत म्यूनिच व आग्सबर्ग खेरीज करून सगळा बव्हेरिया प्रांत त्यांनीं पादाक्रांत केला.

मार्शल टॅलार्डला मार्लबरोचा हेतु आतां कळून आल्यानें तो ऱ्हाईन नदी उतरून जर्मनींत शिरला. स्टॉलहॉफेन येथील जर्मन अधिकाऱ्याच्या सुस्तीमुळें कांहीं एक अडथळा न येतां टॅलार्डला ब्लॉक फारेस्ट-

मधून प्रयाण करितां आलें. बिवेरॅक येथें त्यानें आपली सेना मार्सिन व इलेक्टर ऑफ बव्हेरिया यांच्या सैन्याशीं आणून मिळविली. ता. ११ आगष्टला मार्लबरोही डॅन्यूब ओलांडून परत आला. यावेळीं फ्रेंच सैन्य ब्लेन्हीम व लटझिंजन यांचे दरम्यान असून त्याचे समोर नेबेल नदीच्या पलीकडे मार्लबरो व यूजीन यांची छावणी होती. फ्रेंचांचें सैन्य ६० हजार असून त्याजवळ ६१ तोफा होत्या. मार्लबरोचे हाताखालीं ५६ हजार सैनिक व ५२ तोफा इतकी सामुग्री होती.

मार्लबरोच्या योग्य हालचालीनें इतालींतील फ्रेंच सैन्यास आस्ट्रियांत घुसतां आलें नाहीं व आरंभीं संयुक्त राष्ट्रांचा नाश होण्याचा संभव दिसत होता तो दूर झाला; तथापि आणीबाणीचा प्रसंग अद्याप पुढेंच होता. व्हिलेरॉयला इकडील वर्तमान कळून तो खडबडून जागा होण्यापूर्वी फ्रेंच सैन्यावर हल्ला करून त्याचा मोड करणें अवश्यक होतें. कारण एकतर तो फ्रँकोनिया प्रांतांत शिरून तेथून येणारी रसद बंद पाडील, शिवाय त्याचें सैन्य मार्सिनच्या फौजेस येऊन मिळाल्यास फ्रेंचांची निर्विवाद सरशी होऊन संयुक्त सैन्यावर अरिष्ट कोसळेल. बरें, आतांच लढाई द्यावी तर तिकडूनही जय मिळेलच अशी खात्री नव्हती. शत्रूचें सैन्य संख्येनें अधिक असून तें एकदिलाचें व कसलेलें होतें. शिवाय मार्लबरोला शत्रूच्या मजबूत छावणीवर चाल करून जावयाचें असल्यानें लढाईच्या प्रारंभींच त्याच्या सैन्याची भारी खराबी होण्याचा संभव होता.

या लढाईत मार्लबरोचा पराजय झाला असता तर सर्व राष्ट्रांची जूट विस्कळित होऊन लुईचे सर्व मनोरथ सिद्धीस गेले असते, आणि चवदाव्या लुईसारख्या कर्तबगारीच्या पण धर्मवेड्या बादशहाचे अमलांत युरोपियन प्रजेचीं शरीरें राजकीय जुलमाखालीं, व त्यांचीं मनें धार्मिक

पारतंत्र्याखालीं चिरडून गेलीं असतीं आणि ल्यूथर रिडले व लॅटिमर यांनीं प्रदीप्त केलेली ज्ञानज्योत विझून जाऊन सर्व युरोपखंड एकछत्री जुलमी अमलाखालीं गुलाम होऊन अज्ञानांधकारांत पुनरपि घोरत पडलें असतें; आणि जगाच्या इतिहासाचा ओघ बदलून गेला असता.

लढाई द्यावी अगर न द्यावी याविषयीं सरदारमंडळांत भवति न भवति झाली. तेव्हां मार्लबरोच्या दूरदृष्टीपुढें वरील सर्व विचार उभे राहिले. त्यामुळें आपणावरील जबाबदारी पूर्णपणें जाणून तो ह्मणाला 'लढाई देणें धोक्याचें आहे हें मला कबूल आहे. परंतु स्वस्थ माशा मारीत बसणें हें अधिक घातुक आहे. सैन्यांतील शिस्त व शिपायांचें शौर्य यांजवर माझा दृढविश्वास आहे. याकरितां तत्काळ लढाई देणें मला इष्ट वाटतें.' हें मत सर्वांस मान्य होऊन लढाईची तयारी करण्याविषयीं हुकूम सुटले. ते ऐकून सैनिकांत जो उल्हास व आवेश दिसून आला त्यावरून मार्लबरोची कल्पना यथार्थ होती असें दिसून आलें.

ब्लेन्हीमच्या खेड्याजवळून नेबेल नदी उत्तर दक्षिण वहात येऊन डॅन्यूबला मिळते. त्या नदीच्या पश्चिम तीरावरील टेकडीवर फ्रेंच सैन्याची छावणी होती. त्याच्या उजव्या बाजूस ब्लेन्हीम व डाव्या अंगास लटझिंजेन खेडीं होतीं. या खेड्यांस गांवकुसूं असून शिवाय भोवतीं खंदक खणून बळकटी केली होती. सैन्यांत उजव्या अंगास टॅलार्ड असून डावीकडे मार्शलमार्सिन हा होता. मध्यभागीं दलदल असल्यानें तेथें नेटाचा हल्ला होणार नाहीं अशा समजुतीनें फारसें सैन्य ठेवण्यांत आलें नव्हतें. मार्लबरोनें आपल्या दळाचे दोन विभाग केले. त्यांतील मोठा भाग घेऊन आपण टॅलार्डवर चालून जावें व यूजीननें दुसरा भाग घेऊन मार्सिनच्या बाजूवर रोख धरावा अशी योजना ठरली.

त्याप्रमाणें ता. १३ आगष्ट रोजीं प्रातःकाळीं संयुक्त सैन्य बाहेर पडलें व शत्रूवर चालून गेलें. त्यावेळीं दाट धुकें असल्यानें शत्रु आपल्या तोफांच्या माऱ्यांत येईपर्यंत टॅलार्डला त्याची वार्तासुद्धां नव्हती. नंतर कशीबशी घाईघाईनें व्यवस्था करून आठ वाजण्याचे सुमारास इंग्लिश फौजेच्या डाव्या बाजूवर तोफांची मारगिरी चालू झाली. इंग्लिश तोफखान्यांतून त्यास जबाब मिळूं लागला. यूजीनच्या मार्गांत अडथळे फार असल्यानें त्याला आपला तोफखाना पुढें नेतां येईना. तथापि हरप्रयत्नानें बारा वाजण्याचे सुमारास तो लट्झिजनसमोर दाखल झाला. यूजीन हा शत्रुसैन्यासमीप पोहोंल्याचें कळतांच मार्लबरोनें ब्लेन्हीमवर हल्ला चढविला. हा हल्ला मोठ्या निकराचा होता तथापि फ्रेंच शिपायांनीं तो शौर्यानें परतविला आणि त्यांत ब्रिटिश सैन्याची हानि फार झाली. त्या ठाण्याची अशी बळकटी पाहून मार्लबरोनें तो नाद सोडून दिला आणि ब्लेन्हीम व आबरग्लो यांचे दरम्यान शत्रूची फळी फोडण्याचा यत्न चालविला. नेबेल नदीवरील जुना दगडी पूल आणि तुळवटें टाकून नुकताच तयार केलेला तत्पुरता लांकडी पूल यांच्यावरून त्याचें सैन्य नदीपार झालें. यावेळीं फ्रेंच तोफांचा भयंकर भडिमार चालू होता. व नदीपलीकडे शत्रूस अडविण्यास फ्रेंच रिसाला तयार होता. त्या घोडदळावर मार्लबरोनें आपल्या पायदळा कडून गोळ्यांचा वर्षाव करविला व त्यास हटविलें. ब्लेन्हीमचा पहिला हल्ला फसला होता. त्यानंतर या ठिकाणीं इंग्लिश सैन्यानें कच खाली असती ह्मणजे इतिश्रीच झाली; पण इंग्लिश घोडेस्वार ती रक्तानें लाल झालेली नदी ओलांडून धैर्यानें पुढें सरसावले. उजव्या बाजूस यूजीनला अद्याप यश आलें नव्हतें. त्यानें तीन वेळ शत्रूवर हल्ला केला पण तितक्या वेळां त्यास माघार घ्यावी लागली. त्यानें जातीनिशीं मोठी शर्थ केली; व त्याचे प्रशियन शिपाई फारच दमदार ह्मणून त्याचा त्या

दिवशीं बचाव झाला. परंतु ब्लेन्हीमच्या लढाईचा निकाल डाव्या अंगास मार्लबरोच्या सैन्याच्या करामतीनें ठरावयाचा होता. प्रातःकाळचे आठ वाजल्यापासून तों पांच वाजेपर्यंत रणधुमाळी चालू होती. तथापि विजयाचें पारडें अद्याप कोणत्याच बाजूस कललें नव्हतें. हॅनिबाल प्रमाणें मार्लबरोची घोडेस्वारांवर फार भिस्त होती. यास्तव आपल्या घोड-दळाकडून निकराचा हल्ला करवून लढाईचा शेवट लावावा असें त्यानें ठरविलें. त्याप्रमाणें त्यानें आठ हजार स्वारांची एक तुकडी दोन रांगांनीं उभी केली, व त्यांचेकडून ब्लेन्हीम आणि आबरग्लो यांचे दरम्यानच्या फौजेवर हल्ला करविला. या स्वारांच्या पाठपुराव्यास आणि ब्लेन्हीम मधील फ्रेंच पायदळाच्या प्रतिकारार्थ त्यानें आपलें पायदळ मागचे बाजूस जय्यत ठेविलें. पांच वाजल्यांवर मार्लबरोच्या ह्या शेवटच्या हल्ल्यास प्रारंभ झाला. त्यास तोंड देण्यास दहा हजार फ्रेंच घोडेस्वार उभे ठाकले होते. ब्रिटिश रिसाला टेंकडी चढून वर येऊं लागतांच त्याजवर तोफा, बंदुका, कडाबिनी, यांच्या गोळ्यांचा इतका असह्य मारा झाला कीं, ते घोडेस्वार कच खाऊं लागले, तथापि त्यांनीं आपली जागा सोडली नाहीं. इकडे ब्रिटिश पायदळ व गोलंदाज यांनीं फ्रेंच फौजेवर आगीचा केवळ वर्षाव केला. तेव्हां फ्रेंच तोफखान्याचा मारा ढिलावत चालला. इतकी सवड सांपडतांच इंग्लिश घोडेस्वारांची मांडची मांड उठली व शत्रूच्या छातीशीं जाऊन ते भिडले. ही शत्रूची दौड बघून फ्रेंच वीरांची छाति दडपली. त्यांचे काळजानें ठाव सोडिला. ते गलितधैर्य होऊन एकदम थिजल्याप्रमाणें झाले. एक क्षणमात्र त्यांनीं विचार केला. शेवटीं आपल्या कडाबिनी हवेंत उडवून त्यांनीं पलायनास प्रारंभ केला आणि आपल्या पायद-ळास शत्रूंच्या घोड्यांच्या टापाखालीं तुडविले जाण्यास तसेंच सोडून दिलें; झालें. लढाईचा निकाल लागला. मार्लबरोस विजय-

श्रीनें वरिलें. टॅलार्ड व मार्सिन यांची फाटाफूट झाल्यानें मागें हटण्याखेरीज त्यांस गत्यंतर राहिलें नाहीं. टॅलार्डनें उरल्यासुरल्या स्वारांची रांग ब्लेन्हीमनजीक उभी केली, आणि त्या खेड्यांतील शिबंदीस तावडतोब आपल्या मदतीला येण्याविषयीं हुकूम पाठविला. परंतु त्या हुकुमाची बजावणी होण्यापूर्वीच विजयी संयुक्त सैन्य डाव्या बाजूस वळलें, व त्यानें टॅलार्डच्या दुर्बळ फौजेवर हल्ला केला. तेव्हां कांहीं फ्रेंच सैनिक डॅन्यूबनदींत बुडून मेले, व बाकीचे सांडरहीम नामक खेड्याचे आसऱ्यास गेले. पण त्या सैन्यास दुसऱ्या दिवशीं आपल्या अधिकाऱ्यासह शस्त्र ठेऊन शरण यावें लागलें. इकडे यूजीननेंही मार्सिनवर नेटानें हल्ला केला. आपली उजवी बाजू पराभूत होऊन टॅलार्डचें सैन्य दशदिशा झाल्याचें पाहतांच मार्सिनचेंही धैर्य खचून त्यानें पाय मागें काढण्यास आरंभ केला. मागें हटत हटत त्यानें आपलें बरेंच. सैन्य डिलिंजन येथें परत नेलें. परंतु ब्लेन्हीम खेड्यांतील शिपायांची वाट काय याचा कोणीच विचार केला नाहीं. त्यामुळें त्या सैनिकांस शरण जाण्याखेरीज अन्य मार्ग राहिला नाहीं. मार्लबरोनें आपला तोफखाना त्या खेड्याभोंवतीं पसरून मारा सुरूं करितांच ते बिन शर्तीनें त्याच्या स्वाधीन झाले. चोवीस पायदळ पलटणी व बारा स्वारांच्या तुकड्या यांतील शिपायांनीं शस्त्र खालीं ठेविलें, व ते मार्लबरोचे कैदी झाले. संयुक्त सैन्यापैकीं पांच हजार ठार व आठ हजार जखमी झाले. यांत यूजीनच्या सैन्याची हानीच अधिक झाली होती. फ्रेंच सैन्याचा पुरा निःपात झाला. साठ हजार सैन्यापैकीं पुरें वीस हजारही सैन्य लढाईला उपयोगी असें राहिलें नाहीं. बारा हजार वीर धारातीर्थीं पतन पावले. चौदा हजार शिपाई, बाराशे ऑफिसर्स, एक सेनानी, आणि सर्व तोफखाना, दारुगोळा, तंबु राहुट्या इत्यादि छावणींतील एकूणएक चीजवस्त मार्लबरोच्या आधीन झाली.

तें वर्ष पुरें होण्यापूर्वीच अल्म, ट्रेव्हेज इत्यादि शहरें विजयी राष्ट्रास शरण आलीं. बव्हेरियानें आस्ट्रियाचें स्वामित्व मान्य केलें. हंगेरियन्सनीं बंड मोडून शस्त्र खालीं ठेविलें. फ्रान्सच्या पेंचांतून जर्मनी मुक्त झाला, आणि संयुक्त राष्ट्रांचें युरोपांत वर्चस्व प्रस्थापित झालें. यानंतर हें युद्ध कांहीं वर्षें चाललें. पण येथून पुढें फ्रान्सची सर्व धडपड स्वसंरक्षणार्थच होती. सर्व युरोपखंडाचा पादशहा होण्याचे चवदाव्या लुईचे मनोरथ ब्लेन्हीमच्या लढाईनें पार कायमचे ढांसळून गेले.

जगांतील क्रांतिकारक लढाया.

भाग १२ वा.

'पुल्टोव्हाची लढाई' इ. स. १७०९.

सेंट हेलिना बेटांत असतांना नेपोलियननें एकदां बोलून दाखविलें कीं, थोड्याच कालांत सर्व युरोपखंडांत प्रजासत्ताक राज्यपद्धति चालूं होईल अगर रशियन झाराचा अम्मल सर्वत्र सुरू होईल. इ. स. १८४८ त यांतील पहिलें भविष्य खरें होण्याचा योग आला होता. परंतु १८४९त ती स्थिति पार बदलून गेली. लोकसत्तात्मक राज्यपद्धतीची पिच्छेहाट झाली. युरोपांतील बहुतेक सर्व राजधान्यांतून अनियंत्रित राजसत्ता व लष्करी कायदा फिरून बोकाळूं लागला. स्वसंरक्षणार्थ बंड करण्याचा ईश्वरदत्त हक्क प्रजेस आहे असें याच राजधान्यांतून पूर्वी कंठरवानें सांगण्यांत येत होतें, आणि त्याप्रमाणें कित्येक ठिकाणीं वर्तनही होत होतें; परंतु ते विचार अलीकडे अगदीं बदलून गेले आहेत. स्वातंत्र्यार्थ धडपड करणाऱ्या व वेळीं बंडास प्रवृत्त झालेल्या प्रजाजनांस साहाय्य करणें तर राहिलेंच, पण उलट जुलमी राजांचें जोखड जूं कायम राखण्याकरितां एकमेकांस मदत करण्याची प्रवृत्ति राजेलोकांत उद्भवली आहे. ही जी राजपक्षाची सरशी झाली त्याला अनेक कारणें आहेत. पण त्यांत रशियन सैन्य व झारचा दरारा हीं अतिमहत्त्वाचीं व स्थायिक कारणें आहेत. रशिया देश हा हल्लीं युरोपांत लोकसत्ताक

राज्यपद्धतीचा शत्रु आणि अनियंत्रित राजसत्तेचा पाठिंबा आहे. राजसत्ता—मग ती कोणत्याही उपायांनीं संपादिलेली असो---अबाधित चालविणें, व लहानसहान संस्थानांनीं स्वतंत्रतेविषयीं कितीही धडपड केली व त्याचा पक्ष कितीहि न्यायाचा असला तरी त्यास गुलामगिरींतून निसटूं न देतां चिरडून टाकणें हेंच त्यांचें व्रत बनून गेलें आहे.

इ. स. १८९० पर्यंतच्या पाउण शतकांत रशियाचें राज्य पूर्वीच्या दुप्पट झालें. स्वीडनचे हातून त्यानें जो प्रदेश जिंकला तो त्या राज्याचे अवशिष्ट भागाहून मोठा आहे. पोलंड देशाचा जो भाग रशियास मिळाला त्याचें क्षेत्रफळ आस्ट्रिया देशाएवढें आहे. युरोपांतील तुर्कस्थानचा जो तुकडा त्यानें तोडला तो प्रशिया देशाएवढा विस्तृत आहे. एशियांतील तुर्कस्थानचा जो मुलूख रशियानें बळकावला आहे तेवढ्यांत जर्मनी, हालंड व बेल्जियम असे तीन देश होतील. सारांश या पाउण शतकांत रशियाची हद्द पश्चिमेस ८५० मैल, उत्तरेस सुमारें ३०० मैल, आणि पूर्वेस १००० मैल, वाढली. ही इ. स. १८५० पर्यंतची स्थिति झाली. त्यानंतर गेल्या अर्धशतकांत त्या देशाचा जो विस्तार झाला आहे त्याच्या पासंगासही पूर्वीचा सर्व प्रदेश पुरणार नाहीं. उत्तर एशियांत तर त्याची सरहद्द वाढतां वाढतां पॅसिफिक महासागरांतील साघालिन बेटापर्यंत येऊन थडकली आहे. दक्षिणेस इराणास शह देण्याचा प्रयत्न चालू आहे. अफगाणिस्थानचे सरहद्दीवर मर्व्ह व पेन्जडे येथें रशियन सैन्याच्या प्रमुख छावण्या आहेत. तिबेट आणि चीनची पश्चिम सरहद्द हींही त्याच्या सर्वभक्षक जबड्यापासून फारशीं दूर नाहींत.

याप्रमाणें एका अनियंत्रित राजसत्तेखालीं एवढा अफाट मुलूख, व ४० लक्ष जय्यत फौज असल्यानें रशियाचा दरारा युरोपांतील सर्व देशां-

वर आहे. परंतु दोनशे वर्षांपूर्वी याच रशिया देशास काडीइतकेंसुद्धां महत्त्व नव्हतें. पुल्टोव्हाच्या लढाईपूर्वी रशिया देशाचें अस्तित्व फक्त रशियनांसच ठाऊक. सोळाव्या किंवा सतराव्या शतकांतील युरोपांतील प्रसिद्ध मुत्सद्यांस रशियाची माहिती झटली झणजे आह्मास हल्लीं टिंबक्टू-विषयीं माहिती आहे तितपतच होय. परंतु आजकाल युरोप अगर एशिया खंडांतील कोणत्याही देशाचें मंत्रिमंडल कांहीं राजकारणी गोष्टीचा खल करूं लागलें आणि त्यास रशियन बागुलबोवाची आठवण झाली नाहीं असें क्वचितच घडेल. हें जें हल्लीं रशियास महत्त्व प्राप्त झालें आहे तें पुल्टोव्हाच्या लढाईच्या पूर्वी स्वीडन देशास होतें. तेंच आतां स्वीडनला कोणीही विचारीनासें झालें आहे. याप्रमाणें गाड्यावर नाव आणि नावेवर गाडा हा क्रम जगांत चालूच आहे. असो.

पुल्टोव्हाच्या लढाईंत स्वीडनचा प्रतापरवि अस्तंगत झाला. ही क्रांतिकारक लढाई निषेधात्मक व विधेयात्मक परिणामाविषयीं सारखीच महत्त्वाची आहे. ही लढाई केवळ दोन देशांमधील वरचढीबद्दलची नव्हे, तर मानवजातीच्या दोन विशिष्ट शाखांची होय. डच, इंग्लिश वगैरे लोकांप्रमाणेंच स्वीडिश लोक हे इंडो-जर्मन शाखेपैकीं होत. रशियन लोक स्लॅव्हानिक शाखेचे आहेत. युरोप खंडांत विस्त्युला नदीच्या पूर्वेस स्लॅव्हानिक जातीचा भरणा विशेष आहे. पश्चिमेस बोहेमिया, क्रोशिया, सर्विया डाल्मेशिया इत्यादि प्रांतांत त्यांची वस्ति बरीच आहे. पण इतर देशांत जर्मन शाखेच्या लोकांचाच बहुतेक भरणा आहे. पुल्टोव्हा येथें जर्मन शाखीय स्वीडिश लोकांचा पराजय करण्यापूर्वी स्लॅव्हानिक लोकांनीं कोठेंच जय मिळविला नव्हता; पण हल्लीं स्लॅव्हानिक लोकांनीं जो कहर चालविला आहे तो पाहून आधुनिक मुत्सद्दी व इतिहासशास्त्रवेत्ते यांच्या छातींत धडकीच भरते. इतिहासशास्त्रवेत्त्यांचें असें मत होत चाललें आहे

कीं, जर्मन शाखेची चढती कळा संपून आतां तिचा ऱ्हासकाळ आला आहे. जर्मन शाखेच्या लोकांनीं आपली कामगिरी आजवर बजाविली असून आतां त्यांची पडद्यांत जाण्याची वेळ आली आहे. या जगतीतलरूपी रंगभूमीवरील यापुढील कामगिरी स्लॅव्हानिक जातीकडून व्हावयाची आहे.

स्वीडिश लोकांनीं नवव्या शतकाचे सुमारास रशिया देश जिंकून त्यास हल्लींचें नांव दिलें. या स्वीडिश जेत्यांची संख्या फारच अल्प असल्याकारणानें कालांतरानें त्यांचें वेगळें अस्तित्व राहिलें नाहीं. पुढें रशियावर तार्तर लोकांची धाड आली. इव्हान वासिलोविच् यानें तार्तर लोकांच्या कचाट्यांतून स्वदेशाची मुक्तता केल्यावर कांहीं रशियन सरदारांनीं बायझँनशियम सामुद्रधुनीपर्यंत आपला अम्मल बसविला. नंतर पोलंड देश प्रबळ होऊन रशियास त्या लोकांच्या अंकित होऊन रहावें लागलें. सतराव्या शतकाच्या अखेरीस स्वीडनचा प्रसिद्ध राजा बारावा चार्ल्स यानें रशियावर अम्मल बसविण्यास सुरवात केली. एतावता पुल्टोव्हाच्या लढाईच्या पूर्वीचा राशयाचा इतिहास ह्मणजे गुलामगिरीची, गांजणुकीची, उपमर्दाची परंपराच होय. इ. स. १७०९ पूर्वी ज्यानें यावें त्यानें रशियास जिंकावें, लुटावें, लुबाडावें, गांजावें अशी स्थिति होती. ती एकदम बदलून ज्या ज्या देशांशीं रशियाचा संबंध येईल तो तो देश पादाक्रांत करावा, तेथील रहिवाशांस बुचाडावें आणि त्यांस आपल्या अंमलाखालीं दडपून ठेवावें असा फेरबदल रशियाचे वृत्तींत झाला. ही जी यक्षिणीच्या कांडीप्रमाणें एका क्षणांत क्रांति झाली, तीस इतिहासांतरीं कोठेंच साम्य आढळत नाहीं. पण असली अश्रुतपूर्व क्रांति केवळ एका राजानें आपल्या हयातींतच घडवून आणली ही त्याहूनहि अपूर्व गोष्ट होय. ही क्रांति घडवून

आणणारा रशियाचा राजा पीटर दि ग्रेट हा स्वतः कांहीं फारसा शिकलेला नव्हता. तथापि त्यानें आपल्या रानटी प्रजेंत शास्त्रीय ज्ञानाचा प्रसार केला. त्यानें रशियाच्या आरमाराचा व व्यापाराचा पाया घातला. आपल्या प्रजेस युद्धशिक्षण दिलें, आणि पुल्टोव्हा येथें त्यानें आपल्या सैनिकांकरवीं, अजिंक्य मानल्या गेलेल्या स्वीडिश सैन्याचा पुरा मोड करविला. सारांश जे रशियन शिपाई पूर्वी अगदीं गचाळ, टाकाऊ, बेशिस्त आणि अधीर होते तेच पुढें त्यानें दृढनिश्चयी, शूर व आज्ञातत्पर ह्मणून नाणावलेले असे बनविले.

पीटर दि ग्रेट याच्या चरित्राचें मॅसिडोनियाच्या फिलिप राजाच्या चरित्राशीं बरेंच साम्य आहे. पण फिलिपला ग्रीस देशांतील उत्कृष्ट गुरूकडून युद्धकला व राजनीति यांचें शिक्षण मिळालें होतें. पीटरचें बालपण केवळ रानटी लोकांच्या सहवासांत अज्ञानांत गेलें. पण त्याचा वचपा त्यानें मोठेपणीं काढला. दरबारचे नाचरंग, तमाशे यांचा तिरस्कार करून परदेशांत जाऊन त्यानें मोठ्या मेहनतीनें आपल्या पदवीकडे वगैरे न पाहतां हलक्या मजूराप्रमाणें काम करून ज्ञानार्जन केलें. तारवें बांधण्यास शिकून व्यापार वगैरे सुधारणा आपल्या देशांत चालू करण्याची पात्रता संपादन करण्याकरितां हालंड व इंग्लंड या देशांत गोदीमध्यें सामान्य मजूराप्रमाणें त्यानें काम केलें. हें नीतिधैर्य फिलिपच्या अंगीं नव्हतें. तथापि आपल्या राज्यांतील पूर्वापार तंटेबखेडे मोडून त्याचा एकजीव करणें, ज्या आपल्या प्रजेस शेजारीं तुच्छ लेखीत तीच प्रजा कवाइतीचें शिक्षण देऊन शूर व कर्दनकाळ बनविणें, राज्यांत आरमाराची नवीन संस्था सुरू करणें, कोट, किल्ले, बंदरें यांची चातुर्यानें आणि दूरदर्शीपणानें व्यवस्था लावणें, आणि केवढेंही संकट कोसळलें तरी निराशेचे आधीन न होणें, या सर्व गुणांत व धैर्यशौर्यादि गुणांत पीटर व फिलिप यांचें अगदीं तंतोतंत साम्य आहे.

पुल्टोव्हा येथें रशियाचा जय न होतां उलट पराजयच झाला असता तर पीटरचे सर्व बेत जागच्या जागींच राहून रशियांत फिरून पूर्वीप्रमाणेंच अंदाधुंदी सुरू झाली असती. याचकरितां ही लढाई ह्मणजे रशियाच्या आणीबाणीची वेळ होती. एका शतकानंतर आलेलें नेपोलियनच्या स्वारीचें अरिष्टही त्यापुढें कस्पटासमान भासतें. आतां बारावा चार्लस आणि त्याचे शिपाई यांची तुलना नेपोलियन आणि त्याचे सैनिक यांशीं करणें बरोबर नाहीं हें खरें. पण रशिया देशांतही नेपोलियनशीं टक्कर देण्यास जसें चार लक्ष पायदळ आणि पन्नास हजार कोसॅक स्वार हजर होते, तशी जय्यत फौज पीटर दि ग्रेटजवळ पुल्टोव्हाच्या लढाईचे वेळीं नव्हती. नेपोलियनच्या स्वारीच्या वेळीं रशियाचें राज्य अर्धा युरोप आणि बराच एशियाचा भाग इतका प्रदेश व्यापून राहिलें होतें; व त्या प्रांतांतील प्रजा वाटेल त्यावेळीं आपले चैनीचे व्यवसाय टाकून हत्यार धारण करण्यास तयार होती. रशियन शिपायांचे अढळ धैर्याची त्यावेळीं युरोपांत ख्याति झाली होती. त्यांची झारवर एकनिष्ठ भक्ति होती व ते ऊन, तहान, भूक यांस बाळपणापासूनच जुमानीतनासे झाले होते. सारांश नेपोलियनच्या वेळच्या रशियन शिपायांत इंग्लिशांची चिकाटी आणि फ्रेंचांची तडफ एकवटली होती. शिवाय नेपोलियनच्या अरेरावी वर्तनानें व उद्दाम परराज्यलोलुपतेनें त्याच्याविषयीं रशियन लोकांत इतका द्वेष बाणून गेला होता कीं, आपला देश, धर्म आणि राज्यपद्धति याच्या संरक्षणार्थ बारिस्थिनीसपासून ते चीनच्या प्रचंड भिंतीपर्यंतच्या सर्व मुलुखांतील प्रजाजन नेपोलियनच्या प्रतिकारार्थ लढण्यास एका पायावर तयार होते. परंतु इ. स. १७०९ मधील स्थिति याच्या अगदीं उलट होती. शत्रूस तोंड देण्यास त्यावेळीं एवढा मोठा सेनासमूह नव्हता. कारण रशियाची त्या काळीं लोकसंख्याच मुळीं एक कोट सहा लक्ष १०६००००

होती. पण सर्वांत मुख्य गोम ही कीं, प्रजेच्या अंगांत देशाभिमानाचें व वीरश्रीचें वारें अद्याप संचरलें नव्हतें आणि प्रजेची झारवर दृढभक्तिही नव्हती.

पीटरनें स्ट्रेलाइटस नामक पूर्वीची खडी फौज मोडून टाकून इतर देशांतल्याप्रमाणें राष्ट्रीय सैन्याची नव्या पद्धतीनें रचना केली. त्या सैन्यावर परदेशांतून आणलेले अधिकारी नेमिले. प्रथमतः या सैन्यास स्वीडिश शिपायांपुढें टिकाव धरवेना. आपल्यापेक्षां संख्येनें अल्प अशा फौजेनिशींही नेटानें न लढतां हे रशियन सैनिक पळून जात. प्रजाजनांतही पीटरनें त्यांच्या समजुतीविरुद्ध चालविलेल्या सुधारणांमुळें असंतोष उत्पन्न झाला होता. नूतन राज्यपद्धतीचीं विजयरूपी गोड फळें अद्यापि चाखावयास न मिळाल्यानें झारविषयीं पूज्यबुद्धि उद्भवली नव्हती. यास्तव स्वीडनचा राजा बारावा चार्लस यानें रशियाची राजधानी मास्को ही एकदां काबीज केली असती ह्मणजे सर्व रशिया देश त्याच्या हातीं सहज आला असता; आणि त्या देशास पुनरपि परकी अंमलाचें जूं सहन करावें लागलें असतें.

नेपोलियन बोनापार्टाचें मत आहे कीं, बारावा चार्लस हा केवळ शूर, बाणेदार शिपाई. त्याचे अंगीं सेनानायकाचें कौशल्य मुळींच नव्हतें. हें मत जरी बहुतांशीं ग्राह्य आहे तथापि तत्कालीन योद्धयांत चार्लसच्या नांवाचा दरारा फार होता. त्याचें धाडस व दृढनिश्चय, त्यानें संपादिदिलेले विजय, आणि त्याच्या शिपायांची मर्दुमकी, या सर्व गोष्टींचा युरोपियन राष्ट्रांवर असा विलक्षण परिणाम झाला होता कीं, चार्लसचें नांव ऐकतांच युरोपखंड चळचळां कांपत असे. चवदाव्या लुईलाही त्याची मनधरणी करून त्यास आपले पक्षास वळविणें अवश्य वाटलें. त्यानें फ्रेंचास मदत करून जयाचें पारडें फिरवूं नये ह्मणून मार्लबरो-

सारख्या विजयी सेनापतीसही इंग्लिश लोकांतर्फे शिष्टाई करण्यास त्याजकडे जावें लागलें. परंतु इंग्लंड किंवा फ्रान्स देशाकडे त्याचें लक्ष नसून तो रशिया देश पादाक्रांत करण्यास गुंतला होता; आणि सर्वांस त्या वेळीं असेंच वाटत होतें कीं, पीटरच्या सैन्याची धुळधाण उडवून तो सगळा रशिया देश गट्ट करितो. चार्ल्सला तर स्वतःचे पराक्रमाची इतकी घमेंड होती कीं, आपणास जय हा खात्रीनें मिळणारच अशी त्याची मनोदेवता त्यास सांगत होती. तो मनांत ह्मणे 'रशियाचा समाचार घेण्यास एक वर्ष पुरें आहे. पुढें आपला मोर्चा सिलेशिया, इटाली वगैरेकडे वळवूं. याप्रमाणें पूर्व युरोप जिंकल्यावर इजिप्त आणि एशियामायनरवर चालून जाऊं' याप्रमाणें केवळ मनोराज्यच करून तो स्वस्थ बसला होता असें नाहीं, तर त्यानें त्या त्या खंडांतील मुख्य शहरांचे, किल्लयांचे नकाशे घेण्याकरितां आपले गुप्त कामगारही रवाना केला होते. पण रशियांतच आपला पराजय होऊन आपलें सर्व मनोराज्य जागच्या जागीं राहणार आहे याची त्यास कल्पनाही आली नव्हती.

रशिया देशावर स्वारी करण्याकरितां चार्लस हा इ. स. १७०७च्या सप्टंबर महिन्यांत लिपझिक नजीकच्या आल्डस्टॅड छावणीहून ४५ पंचेचाळीस हजार सैन्यासह निघाला. पोलंडच्या मार्गानें तो पुढें रशिया देशांत घुसला. त्याच वेळीं त्यास मदतीकरितां २० हजार सैन्य घेऊन लुवेन हाप्ट नामक सेनापति रिगा बंदरीं उतरला. त्याखेरीज फिन्लंडमध्यें १५ पंधरा हजार फौजेची छावणी होती. अशा रीतीनें एकंदर ८० ऐशी हजार सैन्य एकत्र झालें. या सैन्यांतून १० दहा हजार सैनिक पोलंडच्या राजाचे हालचालीवर नजर ठेवण्यास राखून ठेवून बाकीच्या सैन्यासह चार्ल्स पुढें निघाला. इ.स. १७०८च्या जानेवारींत ग्राडनो येथें येऊन हिंवाळ्या करितां त्यानें छावणी

ठोकली. पुढें जून महिन्यांत मिन्स्क अरण्य ओलांडून तो बोरिसावा शहरास दाखल झाला. तेथील रशियन फौजेस पिटाळून लावून त्यानें वेरेसिना नदी ओलांडिली. नंतर नदीपलीकडील दलदलीच्या रानांत असलेल्या २० वीस हजार रशियन सैन्याचा मोड करून तो बोरिस्थेनिस नदीपार झाला. ता० २२ सप्तंबर रोजीं स्मालेन्स्को येथें सोळा हजार रशियन शिपायांस त्यानें लोळविलें. याप्रमाणें जय मिळवीत तो लिथ्युएनिया प्रांतांत आला. चार्लसचा हा पराक्रम पाहून झार अगदीं घाबरून गेला व त्यानें तहाचें बोलणें लाविलें; पण चार्लसनें अर्थात् तें मान्य केलें नाहीं. तो आतां मास्को शहरापासून केवळ दहा दिवसांच्या रस्त्यावर होता; आणि राजरस्ता सोडला नसता तर तो तेथें लवकरच जाऊन पोंचला असता; परंतु उक्रेन प्रांतांत मॅझेप्पा नामक सरदाराचे हाताखालीं केवळ सहा हजार सैन्य होतें, त्यास मिळण्याकरितां तो तिकडे वळला. ही त्यानें मोठीच चुकी केली.

झारनें या वेळीं एक लाख लढाऊ फौज जमविली होती. प्रथमारंभींच्या कांहीं चकमकींत स्वीडिश सैन्याचीच सरशी झाली. तथापि रशियन शिपायांस आस्ते आस्ते धीर येत चालला व त्यांची शिस्तही बसत चालली. शत्रूंशीं लढतां लढतांच पीटर व त्याचें सैन्य युद्धकलेचा ओनामा शिकत होतें. इ. सन १७०८च्या आक्टोबर महिन्यांत लुवेन हाप्ट हा चार्लसला मिळण्याच्या बेतांत होता. इतक्यांत पीटरनें पन्नास हजार सैन्यानिशीं त्याजवर छापा घातला व त्याच्या सैन्याची कत्तल उडविली. खुद्द लुबेन हाप्ट हा चार हजार सैन्यासह कसावसा शत्रूची फळी फोडून चार्लसला जाऊन मिळाला; परंतु त्याचे आठ हजार शिपाई रणांगणीं पतन पावले व त्यास आपला तोफखाना

दारुगोळा वगैरे सामुग्री टाकून द्यावी लागली. ज्या रसदेची चार्लस व त्याचे शिपाई चातकांप्रमाणें वाट पहात होते, ती सर्व शत्रूच्या हातीं लागली. या अनर्थामुळें चार्लस्ला सगळा हिंवाळा त्याच प्रांतांत काढावा लागला.

वसंतऋतु सुरू होतांच तो पुनः मास्कोकडे वळला, व मार्गांतील पुल्टोवा शहरास त्यानें वेढा दिला. हें शहर मजबूद तटबंदीचें असल्यानें पीटरनें त्या ठिकाणीं युद्धोपयोगी सामान सांठवून ठेविलें होतें. शिवाय त्या किल्ल्यावरून मास्कोकडे जाणारा रस्ता रोखून धरतां येत होता. याकरितां तें शहर काबीज न करतां पुढें चालून जाणें धोक्याचें होतें. हें शहर चार्लसच्या हस्तगत झालें असतें तर त्याचे सैन्यास अन्नसामुग्रीची व दारुगोळ्याची रेलचेल झाली असती; आणि मास्के शहरावर चाल करण्यास हा युद्धभूमीचा पाया झाला असता. याकरितां स्वीडिश सैन्यानें मोठ्या निकरानें वेढ्याचें काम चालविलें. आंतील शिबंदीनेंहा तितक्याच नेटानें टिकाव धरिला.

उभय पक्षांनीं आतां निकराच्या लढाईची तयारी केली. ही लढाई अपरिहार्य आहे व तिचे परिणामावर उभय राष्ट्रांचें भावी भाग्य अवलंबून आहे हें पीटर आणि चार्लस या उभयतांसही कळून चुकलें होतें. झारनें कांहीं लटपट करून आपलें सैन्य व्होर्स्क्ला नदीपार केलें. त्यायोगें उभय दळें नदीच्या एकाच तीरावर समोरासमोर आलीं. ही व्होर्स्क्ला नदी पुल्टोवापासून पुढें पंधरा कोसांवर बोरिस्थनिस नदीला मिळते. झारनें आपलें सैन्य या दोनी नद्यांच्यामधील प्रदेशांत अशा रीतीनें उभें केलें कीं, स्वीडिश फौज मागें हटली तर तिला त्या नद्यांच्या संगमाजवळील चिमट्यांत कोंडतां यावें. याप्रमाणें सैन्याची व्यवस्था ठरवून त्यानें पुढच्या अंगास मोर्चेबंदी केली व त्यावर अजस्र

तोफा चढविल्या. त्याचे घोडेस्वार व पायदळ ताजेंतवानें असून उत्साहपूर्ण होतें, त्यांच्या गोटांत अन्नसामुग्री, चंदीचारा, दारुगोळा, यांची विपुलता होती. उलटपक्षीं चार्लसचें सैन्य केवळ २४ चोवीस हजार होतें. त्यांतही खुद्द स्वीडिश शिपाई अर्धे असतील नसतील. लढाई, अन्नाचा दुष्काळ, श्रम, आणि रशियांतील प्राणघातक थंडी, यायोगानें त्याचे सैन्याची फार खराबी झाली होती. तथापि झार आपणावर चालून येत आहे, हें कळतांच चार्ल्सला वाटलें कीं आपला आजवरचा लौकिक राखण्याकरितां आपणच प्रथम शत्रूवर चाल करून गेले पाहिजे. असा बेत योजून वेब्याचे कामाकरितां जे खंदक खणले होते तेथून त्यानें आपलें सैन्य पुढें काढिलें; आणि रशियन मोर्चेबंदीवर हल्ला करण्यास प्रारंभ केला.

कांहीं दिवसांपूर्वीच्या एका चकमकींत त्याचा पाय जायबंदी झाला होता; ह्मणून डोलींत बसून जेथें लढाई घनचक्कर चालली होती तेथें तो दाखल झाला. स्वीडिश सैन्य संख्येनें फारच अल्प होतें व रशियन छावणी भयंकर मजबूत होती. तथापि या भयंकर युद्धांत स्वीडिश शिपायांनीं आपला पूर्वीचा लौकिक जाऊं दिला नाहीं. त्यांनीं रशियन छावणीवर चढाव करून जाऊन दोन मोर्चे जिंकून घेतले. स्वीडिश सैन्यास जयाची खात्री वाटून जयघोषासही सुरवात झाली. परंतु पीटर दी ग्रेट किंवा त्याचे शिपाई हे घाबरले नाहींत. या क्षणिक जयाबद्दल शत्रूचे सैन्याची प्राणहानि बरीच झाली आहे आणि त्यांच्यांत पहिला दम राहिला नाहीं हें ते जाणून होते. यास्तव त्यांनीं न डगमगतां लढाई तशीच नेटानें चालविली. रशियन तोफा व बंदुका यांचा प्राणघातक मारा अश्रांत चालूच होता, त्यास खळ ह्मणून पडला नाहीं. याच वेळीं पीटरनें शिलकी सैन्यांतील ताज्या दमाच्या पलटणींस पुढें चालून

जाण्यास हुकूम दिला. या नव्या टोळ्यांचा हल्ला फारच कचक्याचा होता. स्वीडिश शिपायांत आतां तो सहन करण्याचा त्राण उरला नव्हता, त्यांनीं हळू हळू पाय मागें घेण्यास प्रारंभ केला. शेवटीं त्या रक्तानें लाल झालेल्या धमधम्यापासून ते मागें परतले. तें पाहतांच झारनें आपल्या पुढील मोर्चांतील पायदळ व स्वार खुल्या पटांगणांत शिताफीनें नेऊन उभे केले, आणि सर्व बाजूंनीं शत्रूवर सररास हल्ला करण्यास फर्माविलें. या लढाईतील जयापजयावर सर्व जगाचें स्वामित्व अवलंबून असल्यानें उभय राजांनीं आपल्या जिवाची तंमा बिलकुल धरली नाहीं. आपापल्या राजाच्या नजरेखालीं उभय पक्षांचे सैनिकही निकरानें व शौर्यानें लढले. ही घनघोर लढाई दोन तास चालल्यावर शत्रूपक्षाचे बलाधिक्यापुढें उपाय चालेनासा होऊन आजवरचे अजिंक्य स्वीडिश शिपाई मागें हटले. एकदां त्यांची पिच्छेहाट सुरू होतांच रशियन्सनीं त्यांची दाणादाण उडवून दिली. चार्लसचें सैन्य अगदीं वाताहत होऊन गेलें. कारण त्यास कोणत्याच बाजूस आश्रा नव्हता. मागल्या अंगास पळून जावें तर दोन नद्यांचा संगम असून तेथें पायउतार मुळींच नाहीं. उजव्या बाजूस वळावें तर तिकडे पुल्टोवाच्या किल्ल्यावरील तोफांनीं मार्ग रोखलेला. समोर व डावीकडे कर्दन काळाप्रमाणें रशियन शिपाई छातीवर उभे. अशा कचाट्यांत सांपडतांच निरुपाय होऊन कांहीं सैन्य शत्रूस शरण आलें; बाकीचें नदीपार होण्याचें खटपटींत बुडून मरण पावलें. खुद्द चार्ल्स राजा व त्याजबरोबरचे कांहीं शिपाई एवढे नदी पोहून पार झाले. ते तुर्कस्थानच्या सुलतानाच्या हद्दींत निघून गेले. रणभूमीवर दहा हजार शिपाई मृत अगर आसन्नमरण असे आढळून आले.

याप्रमाणें जय प्राप्त होतांच झारचें हृदय आनंदातिरेकानें उचंबळून येऊन तो म्हणाला 'स्वीडनचा प्रतापरवि मावळला व पेटर्सबर्गचा

पाया आज मजबूत झाला. पुल्टोवाच्या रणभूमीवर असतांनाच झारच्या मनांत बाल्टिक समुद्राकडे आपलें राज्य वाढविण्याविषयींचे विचार घोळूं लागले. नंतर नायस्टॅड येथें जो तह झाला त्यांत स्वीडनचे अत्यंत सुपीक प्रांत रशियास मिळाले. याप्रमाणें पुल्टोवाच्या लढाईत मिळालेलें रशियाचें वर्चस्व स्वीडननें तहानें कबूल केल्यामुळें त्यास स्थायिकपणा आला. हा जय अद्याप ताजा आहे तोंच तुर्कस्थान व इराण देशावर स्वाऱ्या करण्याचे विचार सुरू झाले. तुर्कस्थानावरच्या आरंभींच्या मोहिमेंत झारला जरी यशप्राप्ति झाली नाहीं, तथापि पीटरच्या प्रत्येक वंशजानें तुर्क लोकांशीं लढाई चालवून सुलतानाचा कांहीं ना कांहीं प्रांत जिंकून घेण्याचें व्रत अखंड चालविलें आहे. दुर्दैवेंकरून ज्या ज्या राज्याची सरहद्द रशियाच्या हद्दीशीं भिडली आहे, त्या त्या राज्यास रशियापासून कधीं ना कधीं धोका येणारच.

रशियाच्या राज्यविस्ताराचें रोमन राज्यविस्ताराशीं सर्व बाबतींत तंतोतंत साम्य आहे असें सर्व इतिहासकारांचें मत आहे. प्रत्येक नवीन मुलूख जिंकण्यापूर्वी त्या प्रांतावर आपलें संरक्षण स्थापित करण्यास रोमची मंत्रिसभा कधींहि विसरली नाहीं. या नियमास अनुसरूनच रोमनें इटालियन व ग्रीक शहरांचें मॅसिडोनियापासून रक्षण करण्याचा मक्ता घेतला. सीरियन राजापासून विथीनिया व इतर एशियाटिक संस्थानें यांचे संरक्षणाची जबाबदारी पत्करिली. कार्थेजपासून न्युमीडियाचें रक्षण केलें. अशा प्रकारचें कौटिल्य अखेरपर्यंत चालूच होतें; परंतु ज्या प्रजेचें स्वातंत्र्य शेजारच्या बलवान् राष्ट्राच्या केवळ मर्जीवर व आत्मसंयमनावर अवलंबून असतें तिच्या जिण्यास धिक्कार असो. जे जे प्रांत शत्रूपासून रक्षण करण्याकरितां रोमनें स्वाधीन करून घेतले, ते ते त्याच्या साम्राज्यसमुद्रांत गडप झाले. सुसरीनें गिळलेलें माणीक फिरून बाहेर काढणें शक्यच नाहीं. त्याच राजनीतीस अनु-

सरून रशिया देशही पोलंड, क्रिमिया, कूर्लंड, जॉर्जिया, मिग्रेलिया, सिर्केशियन आणि कॉकेशियन प्रांतांचें रक्षण करण्यास पुढें सरसावला. त्या प्रदेशाचें त्यानें कांहीं दिवस रक्षण केलें, पुढें भक्षण केलें. त्याचप्रमाणें आस्ट्रिया व तुर्कस्थानावरही त्याचा शह आहेच. आतां रशियाचे पक्षाचे लोक ह्मणतील कीं, कान्स्टंटिनोपल शहरांतून आणि हंगेरी प्रांतांतून रशियानें स्वार्थास लाथ मारून आपलें सैन्य परत नेलें. या बाबतींतही रोमशीं त्याचें साम्य जुळतें. रोमनें आपली महत्त्वाकांक्षा प्रगट केली असतां त्याच्याशीं दोन हात करण्यास जुन्या जगांत जोंपर्यंत शेकडों स्वतंत्र संस्थानें होतीं, तोंपर्यंत रोमची नीति, नेमस्तपणा व स्वार्थत्याग यास सोडून नव्हती. फिलिप, अँटिओकस वगैरे राजाशीं रोमची पहिलीच सलामी झाली तेव्हां रोमनें जय मिळाल्यावरही आपलें सैन्य परत बोलाविलें; आणि 'परोपकाराय सतां विभूतयः' असा आव घातला. पण अनुकूल परिस्थिति येतांच कांहीं तरी सबब काढून आपल्या सैन्याची तेथें परत स्थापना केली, व तो प्रांत आपल्या साम्राज्यांत दाखल करून टाकिला. एवंच जुनें रोमन राष्ट्र काय अथवा अर्वाचीन * रशिया काय? दोघांच्या नेमस्तपणाचें कारण भीति हेंच होय. आपल्या स्वातंत्र्यावर गदा आणणाऱ्या असल्या शत्रूविषयीं शेजारचीं सर्व संस्थानें एकजुटीनें डोळ्यांत तेल घालून जपत राहतील तरच त्यांचा नेमस्तपणा कायम राहणार. नाहींतर त्याच्या सर्वभक्षक उदरांत अमुक एक देश अगर प्रांत जाणार नाहीं असें ह्मणतां यावयाचे नाहीं.

* इंग्लिश मुत्सद्दीही आपला राजनीतीचा धडा रोमपासूनच शिकले आहेत. रोमच्या अगर रशियाच्या राज्यविस्ताराची इंग्लिश राज्यविस्तारपद्धति ही सुधारून वाढविलेली आवृत्तीच आहे. पण ग्रंथकार क्रीसी साहेब त्याबद्दल अवाक्षर काढतील तर शपथ! यावरून खलः सर्षपमात्राणि परच्छिद्राणि पश्यति।
आत्मनो बिल्वमात्राणि पश्यन्नपि न पश्यति ॥ १ ॥ हेंच खरें.

जगांतील क्रांतिकारक लढाया.

भाग १३ वा.

सॅराटोगाची लढाई. इ. स. १७७७.



पृथ्वीवरील सर्व राष्ट्रांत इंग्लंड, फ्रान्स, रशिया, जर्मनी व अमेरिका हीं अव्वल प्रतीचीं राष्ट्रें होत. यांतील पहिलीं दोन बरींच जुनीं आहेत. रशियाच्या मोठेपणास प्रारंभ होऊन अद्यापि पुरीं दोनशेंही वर्षें झालीं नाहींत. जर्मनींचें साम्राज्य अगदींच अलीकडील आहे. तथापि फ्रेडरिक दि ग्रेटचे कारकीर्दीपासून प्रशियाच्या मोठेपणास प्रारंभ झाला असें धरिलें तर त्या राष्ट्रास अजून पुढें येऊन दीडशें वर्षें झालीं नाहींत. शेवटचें राष्ट्र जें अमेरिका त्याच्या स्वतंत्र अस्तित्वास प्रारंभ होऊनच आतां कोठें सरासरी एकशेतीस वर्षें झालीं. यावरून पाहतां अमेरिकन राष्ट्र सर्वांत वयाच्या मानानें कनिष्ठ आहे. परंतु या १३० वर्षांत अमेरिकन राष्ट्रानें जी प्रगति केली आहे ती पाहून मन आश्चर्यानें गुंग होऊन जातें. अमेरिका खंडाची भौगोलिक परिस्थिति व त्याचा विस्तार हेंच त्याच्या मोठेपणास मूलाधार आहेत. त्या खंडाची जमीन सुपिक असून बरीच अद्याप अकृष्ट आहे. त्यांत महान् गहन व गगनचुंबित अरण्यें आहेत. पृथ्वीचे पोटांत कोळशाच्या व धातूच्या खाणी आहेत. दोहों बाजूस महासागर असून समुद्रकिनाराही देशाचे मानानें बराच लांबीचा आहे. त्या खंडांतील लोकसंख्याही झपाट्यानें वाढत आहे. इतक्या सर्व गोष्टी अनुकूल आहेत; परंतु सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे

अमेरिकन लोकांचा स्वभाव होय. त्यांचें अचल धैर्य, दृढ निश्चय, स्थानिक स्वराज्याविषयीं पात्रता, विविध चापल्य, व अश्रांत साहस-प्रियता हे गुण पाहतांच बलाढ्य राष्ट्र बनण्याला अवश्य ते सर्व गुण त्यांच्या ठायीं आहेत अशी तत्काल खात्री पटते.

परंतु केवळ सव्वाशे वर्षांपूर्वी हीं अमेरिकेंतील संयुक्त संस्थानें इंग्लंडच्या ताब्यांतील एक वसाहत होतीं. त्या वसाहतीच्या आरंभाचा इतिहास पाहतां हल्लींचा अमेरिका खंडाचा मोठेपणा केवळ अश्रुतपूर्व वाटतो. अमेरिकेंतील संयुक्त संस्थानांचा विस्तार किती झपाट्यानें होत आहे याची प्रचीति पहावयाची असल्यास तद्वर्णनात्मक एकादा ग्रंथ घेऊन त्याचा वस्तुस्थितीशीं मेळ पाहण्याचा प्रयत्न करावा. ग्रंथ लिहून छापून बाहेर पडतो न पडतो तोंच त्यांतील आंकड्याचा प्रत्यक्ष स्थितीशीं मेळ बसला असें क्वचित्च होतें. इ. स. १८१५ त डी टॉके व्हिले यानें एक पुस्तक प्रसिद्ध केलें, त्यांत रॉकी पर्वताची ओळ ही संयुक्त संस्थानांची पश्चिम सरहद्द होईल असें भविष्य केलें होतें. आज पहावें तों रॉकी पर्वत ओलांडून ती सरहद्द पासिफिक महासागरास भिडली आहे.

इ. स. १८०० सालीं कांग्रेसच्या सर्व प्रतिनिधींना येण्यास सोईचें ह्मणून संयुक्त संस्थानांच्या मध्यभागीं वाशिंग्टन शहराची स्थापना केली. पण आज तेंच शहर एका टोकास झालें आहे. मिसिसिपी नदी पूर्वी सरहद्दीवर होती ती आतां मध्यावर आली आहे. इ. स. १७७६त संयुक्त संस्थानांची लोकसंख्या होती ती हल्लीं फार वाढली आहे. ही जी अमेरिकेंतील ब्रिटिश लोकांची सारखी वाढ चालली आहे, तिला प्रतिबंध होणेंही शक्य नाहीं. हल्लीं जीं संस्थानें एकजुटीनें संयुक्त ह्मणून आहेत त्यांच्यांत कदाचित् फाटाफूट होईल. प्रजासत्ताक राज्य बदलून करडा बादशाही अम्मल गाजूं लागेल. परंतु त्यायोगानें ही प्रगति अजीबाद

बंद होणें शक्य नाहीं. अमेरिकेची नैसर्गिक संपत्ति इतकी विपुल आहे कीं, तेथें सर्व प्रकारचे उद्योगधंदे चालतील, आणि तेथील रहिवाशांस कोणत्याही बाबतींत दुसऱ्याचे तोंडाकडे पहावें लागणार नाहीं. राजकीय वातावरणांत भविष्यकालीं कोणताही फेरबदल झाला तथापि संपत्तीची लालसा आणि धाडसी मनोवृत्ति हे जे अमेरिकन लोकांचे विशिष्ट गुण आहेत त्यांचा लोप कधींहि होणार नाहीं; किंवा ज्या ज्ञानदीपाच्या प्रकाशानें ते आपला भरभराटीचा मार्ग आक्रमीत आहेत तो ज्ञानदीपही मालविला जाणें शक्य नाहीं.

अमेरिकन संस्थानांची वाढ होत होत पश्चिमेस पॅसिफिक महासागरावर त्यांचा ताबा चालू झाला ही गोष्ट नव्या व जुन्या गोलार्धास सारखीच महत्त्वाची आहे. सॅनफ्रॅन्सिस्कोच्या समोर पॅसिफिक महासागराच्या पैलतीरीं * जपान व चीन हीं दोन जुनीं खोडें आहेत. त्यांच्या दरम्यान समुद्रांत शेंकडोशें बेटें आहेत. अमेरिकन लोकांना पुढें वाढून जाण्यास त्या आयत्या पायऱ्याच निर्माण केल्या आहेत म्हटलें तरी शोभेल. या लहानसहान बेटांवर अम्मल बसवीत बसवीत पुढें चीन व जपानला शह देणें सुलभ होईल. प्रथमतः चीन व जपान या रद्दड राष्ट्रांत अमेरिकेचा व्यापार वृद्धिंगत होईल. त्यास अडथळा करण्याचा प्रयत्न त्या राष्ट्रांनीं केल्यास उद्याचें मरण आजच ओढून घेतल्याप्रमाणें होईल. आपलें काम, साम, दाम, भेद, दंड या उपाय चतुष्टयापैकीं एकाचे सहाय्यानें अमेरिकन लोक साधून घेतील. चीन व जपानसारखीं जरठ राष्ट्रें एकीकडे आणि अमेरिकेसारखें ताजें रक्त सळसळत असणारें राष्ट्र एकीकडे. तेव्हां या युद्धाचा परिणाम काय होईल हें

* कीसी साहेबांनीं हें मत इ. स. १८५१ सालीं प्रदर्शित केलें आहे. तेच आज इ. स. १९०७त हयात असते तर त्यांस जपानची अलीकडील प्रगति पाहून काय वाटलें असतें याची कल्पना वाचकांनींच करावी.

सांगावयास भविष्यवादीच पाहिला पाहिजे असें नाहीं. या एशियाटिक राष्ट्रांचा स्वभाव गर्विष्ठ, उद्दाम व मानी आणि अमेरिकन धाडसी, ज्यांत त्यांत तोंड घालण्यास संवकलेले व न्यायान्याय-विचाररहित अशा दोन राष्ट्रांत कांहीं खुसपट निघावयास फारसा विलंब नको. एखादें क्षुल्लक कारण उपस्थित झालें कीं लढाई जुंपलीच; आणि त्या लढाईचा परिणाम काय होईल हें आजच बोलून दाखविलें पाहिजे असें नाहीं. मात्र अशी लढाई सुरू झाल्यास इंग्लंडनें कांहीं वर्षांपूर्वीच्या चीनच्या युद्धांत जसा निष्कारण साधुपणा अंगिकारून हात आंखडला तसा खुळचटपणा अमेरिकेकडून होणार नाहीं. सध्यांच, जपानच्या किनाऱ्यावर जीं अमेरिकन गलबतें फुटून लागतील, त्या गलबतांवरील उतारू, खलाशी व मालमत्ता यांच्या संरक्षणासंबंधीं नियम जपानकडून कबूल करवून घेण्याचा हेतु बाह्यतः दर्शवून, पण अंतर्यामीं दुसराच हेतु धरून अमेरिकन आरमाराचा एक काफिला जपानचे किनाऱ्याकडे गेला आहे. या सर्व गोष्टींचा विचार करितां बहुतेक हल्लींच्या पिढीसच चीन व जपान हे देश अमेरिकेनें * जिंकलेले पहावयास मिळतील. असो.

अमेरिका खंडांतील संयुक्त संस्थानचा प्रस्तुतचा उत्कर्ष पाहून कोणाही इंग्लिश मनुष्याचे मनांत हर्ष व उद्विग्नता हे भिन्न मनोविकार उद्भवतात. ज्या अँग्लो-सॅक्सन जातीची प्रजा व भाषा जगाचे एका टोंकापासून दुसऱ्या टोंकापर्यंत पसरत आहे, त्याच अँग्लो-सॅक्सन

---

* पाश्चात्य राष्ट्रांचे दाखवावयाचे दांत निराळे व खावयाचे दांत निराळे कसे असतात हें यावरून स्पष्ट होतें. पौर्वात्य राजनीतीला कुटिल म्हणून नांवें ठेवणारे कर्झन साहेब अमेरिकन लोकांच्या या कृतीचें समर्थन करूं शकतील काय?

* सुशिमाच्या लढाईचे वेळीं क्रीसी साहेब हयात असते तर आपलें भविष्य सपशेल खोटें ठरलेलें पाहून निराशेनें त्यांचें हृदय विदीर्ण होऊन गेलें असतें.

शाखेपासून बहुतेक अमेरिकन लोकांची उत्पत्ति आहे. इंग्लंड व संयुक्त संस्थानें यांत राज्यपद्धतींत कितीही फरक असो, किंवा पूर्वी एकदां आह्मीं परस्परांशीं शत्रुभावानें लढलों याची स्मृति जागृत असो, इतर जगाशीं संबंध येईल तेव्हां अमेरिकन व इंग्लिश लोक एकाच जातगोताचे आहों हें विसरणें शक्य नाहीं. तथापि पूर्वी एक वेळ हीं संयुक्त संस्थानें इंग्लंडच्या ताब्यांत होतीं, व कांहीं इंग्लिश अधिकाऱ्यांनीं मूर्खपणा केला नसता तर आजमितीलाही तीं तशीं राहिलीं असतीं. हा विचार मनांत येऊन मन उद्विग्न होतें. असो. आतां ह्या संयुक्त संस्थानांच्या पूर्वेतिहासाकडे वळून तीं स्वतंत्र कां व कशीं झालीं तें पाहूं.

सोळाव्या शतकाच्या उत्तरार्धापासून ब्रिटिश लोक उत्तर अमेरिकेंत जाऊन वसाहती करूं लागले. या वसाहत करणाऱ्या मूळ संस्थापकांत कांहीं लोक धर्मच्छळास तर कांहीं राजकीय जुलुमास त्रासून स्वातंत्र्याकरितां देशत्याग करून येथें राहिले होते. ही वसाहत वाढतां वाढतां इ. सन १७५०चे सुमारास उत्तर अमेरिकेंत कानडा प्रांत व दक्षिणेस दुसरीं तेरा संस्थानें इतका विस्तार झाला. यांतील कानडा प्रांतांत फ्रेंचांची वस्ती अधिक असून तो प्रदेश फ्रान्सचे ताब्यांत होता. बाकीच्या तेरा संस्थानांत ब्रिटिश प्रजेचा भरणा असून तीं इंग्लंडच्या अमलाखालीं होतीं. पुढें इ. स. १७५६त इंग्लंड व फ्रान्स या दोन देशांत 'सप्तवार्षिक' युद्ध सुरू झालें. या युद्धांत इंग्लिशांची सरशी होऊन कानडा प्रांत फ्रेंचांकडून इंग्लिशांनीं जिंकून घेतला. त्यामुळें संयुक्त संस्थानांच्या उत्तरेस फ्रेंचांचें जें सैन्य होतें तें नाहींसें होऊन तिकडून त्या संस्थानास शत्रूची भीति उरली नाहीं. तेव्हां 'गरज सरो आणि वैद्य मरो' या न्यायानें इंग्लंडच्या मदतीची अपेक्षा इतःपर न राहिल्यानें त्या संस्थानांचें इंग्लंडशीं वर्तन बेपर्वाईचें

होऊं लागलें. ह्या सप्तवार्षिक युद्धांत इंग्लंडला पाण्यासारखा पैसा खर्च करावा लागला होता. त्यामुळें इंग्लिश प्रजेवर करांचें ओझें असह्य झालें. तेव्हां या लढाईपासून अमेरिकन वसाहतींचें हित झालें असल्यानें त्यांनींही खर्चाचा कांहीं भाग उचलावा असा बूट निघून इ. स. १७६५त अमेरिकन लोकांनीं आपल्या व्यवहारांत स्टांप कागद वापरावे असें ठरलें. इंग्लिश पार्लमेंटचा हा ठराव अमेरिकेंत कळतांच अमेरिकन लोकांचें पित खवळलें. त्यांनीं तो कायदा रद्द करण्याविषयीं खटपट चालविली; पण या कामांत ते केवळ सरकारचे तोंडाकडे पहात बसले नाहींत. सर्व व्यापाऱ्यांनीं आपापसांत एक जूट करून स्टांप कागदास बहिष्कार घातला. ही बहिष्काराची मात्रा इतकी उत्कृष्ट लागू पडली कीं, इंग्लिश सरकारास स्टांप आक्टापासून एक कवडीचीही प्राप्ति झाली नाहीं. ज्या कायद्यापासून आपल्या प्रजेचीं मनें विथरलीं व तिजोरीस भर मुळींच पडली नाहीं तो कायदा रद्द करणेंच शहाणपणाचें असें पाहून इंग्लिश सरकारनें मोठ्या उदारपणानें तो कायदा इ. स. १७६६त रद्द करून टाकिला! आपल्या जोडगोळीचा असा सुपरिणाम झालेला पाहून अमेरिकन लोकांस उमेद आली. त्या वेळेपासून आपल्या हक्कांस ते जास्त जपूं लागले. पण ब्रिटिश प्रधानमंडळ व खुद्द राजा तिसरा जार्ज यांच्या मनावर त्याचा इष्ट परिणाम घडला नाहीं. इ. स १७६८त चहा व इतर पांच किरकोळ जिनसांवर टाऊनशेंडच्या सूचनेवरून जकात बसविण्यांत आली; पण अमेरिकन लोक आतां कसले बधतात? त्यांनीं तत्काळ त्या अन्यायाच्या प्रतिकारार्थ कंबर बांधिली व आपणांस पार्लमेंटमध्यें बसण्याचा हक्क मिळाल्याशिवाय आपणावर कोणताही कर लादण्याचा हक्क इंग्लंडला नाहीं असें त्यांनीं जाहीर केलें. जकात बसलेला कोणताही माल आपल्या बंदरांत उतरूंच द्यावयाचा नाहीं असा त्यांनीं संकल्प केला. या निश्चयानें इंग्लंडच्या व्यापाऱ्यांचें

अतोनात नुकसान होऊन त्यांचा व्यापार बसण्याची पाळी आली. तेव्हां इ. स. १७७२ त व्यापाराच्या तत्त्वाचें निमित्त करून चहा-खेरीज इतर पदार्थांवरील जकात माफ करण्यांत आली; पण अमेरिकन लोक कांहीं दुधखुळे नव्हते. इतर जिनसांवरील जकात काढून टाकण्यांत आली एवढ्यानेंच ते संतुष्ट झाले नाहींत, किंवा कृतज्ञतेच्या ओझ्याखालीं दडपून गेले नाहींत. इंग्लिश प्रधानमंडळास आपल्यावर आपले संमतिखेरीज कोणताही कर बसविण्याचा हक्क नाहीं या तत्त्वाकरितां ते भांडत होते. मग तो कर एका प्रकारच्या मालावर असो किंवा अनेकांवर असो; त्या कराची आकारणी एक पौंड असो अगर हजारों पौंड असो. पण इकडे तिसऱ्या जार्जानें आपला राजेपणाचा हक्क दाखविण्याकरितांच चहावरील जकात कायम ठेविली होती. तेव्हां दोन्ही पक्ष तत्त्वाकरितांच भांडत असल्यानें तडजोडीचा मार्गच उरला नाहीं. इकडे अमेरिकन लोकांनीं आपलें बहिष्काराचें व्रत अक्षरशः पाळण्यांत कसूर केली नाहीं. इतक्या थरास गोष्टी येऊन पोंचल्या असतां कांहीं इंग्लिश व्यापाऱ्यांनीं बोस्टन बंदरांत एक चहाचें गलबत आणून चहा उतरविण्याचा प्रयत्न केला. तेव्हां चिडून जाऊन कांहीं अमेरिकन लोक गलबतावर चढले व त्यांनीं चहाच्या सर्व पेट्या समुद्रांत ढकलून दिल्या. या आडदांडपणाबद्दल कित्येक नेमस्त लोकांस वाईट वाटलें व याचा परिणाम भयंकर होईल असेंही त्यांनीं भाकित केलें; पण अशी वेळ केव्हां तरी यावयाचीच; ती निष्कारण पुढें ढकलण्यांत कांहीं फायदा नाहीं; एकदांच काय तो सोक्ष मोक्ष होऊन जावो; असें इतरांचें मत पडलें. त्याप्रमाणें सर्वत्र जमवाजमव होऊं लागली व बसाहतवाल्यांचें सैन्य तयार झालें. पहिली चकमक लेक्झिंग्टन येथें झाली. त्यांत अमेरिकन्सची सरशी झाली. नंतर बंकरहिलच्या लढाईत जरी त्यांना मागें हटावें लागलें तरी

त्यांच्यांत कांहीं पाणी आहे हें इंग्लिश सैन्यास कबूल करावें लागलें. पुढें ता. ४ जुलई १७७६ रोजीं संयुक्त संस्थानांनीं आपल्या स्वातंत्र्याचा झेंडा उभारला. इंग्लिश प्रधानमंडलानें बंडखोरांस चिरडून टाकण्याची तयारी जारीनें सुरू केली. न्यूयार्क शहर काबीज करून इंग्लंडनें तो आपल्या युद्धभूमीचा पाया केला. इ. स. १७७७ ची मोहीम मोठ्या प्रमाणावर करण्याचें ठरलें. संयुक्त संस्थानें व कानडा यांच्या दरम्यान कांहीं सरोवरें आहेत. त्या सरोवरांतून निघून हडसन नामक नदी न्यूयार्क शहराजवळ अटलांटिक महासागरास मिळते. या नदीच्या पूर्व बाजूस जो त्रिकोणाकृति पट्टा आहे त्यांत न्यूइंग्लंड नामक संस्थानें आहेत. त्यांत मॅसेच्युटेटस, कानेक्टिकट, न्होड आयलंड, न्यूहँपशायर आणि व्हर्माट यांचा समावेश होतो. हीं संस्थानें ह्मणजे बंडाचें केवळ माहेरघर होत. येथील रहिवाशी इंग्लिशांचे कट्टे शत्रू होते. इंग्लिशांच्या विरुद्ध शस्त्र उचलण्यास 'श्रीगणेशाय नमः' झाला तो या न्यूइंग्लंड संस्थानांतूनच होय. याकरितां कानडा प्रांतांतील इंग्लिश सैन्य हडसन नदींतून खालीं उतरवून, न्यूइंग्लंड संस्थानांचा बाकीच्या संस्थानांशीं असलेला संबंध तोडून टाकणें हें महत्त्वाचें व अवश्यक होतें. याप्रमाणें त्या संस्थानांस कोंडींत धरल्यावर त्यांस चिरडून टाकणें अगदीं सुलभ होईल; आणि बंडवाल्यांचें हें आगरच इंग्लिशांच्या हस्तगत झाल्यावर बाकीच्या ठिकाणचा बंडावा मोडण्यास मुळींच प्रयास नकोत. असें या मोहिमेचें एकंदर धोरण होतें. तें हाणून पाडण्याकरितां अमेरिकन लोकांनींही प्रयत्न चालविले. त्यांजवळ सैन्याचा भरपूर पुरवठा नव्हता. शिवाय समोरासमोरच्या लढाईत इंग्लिश सैन्याची संख्या, त्याचें शिक्षण, कवाईत, शिस्त, हत्यारें हीं सर्व सरस असल्यानें वसाहतवाल्यांचा तें हां हां ह्मणतां धुव्वा उडवून देईल असें वाटत होतें. अमेरिकेला या वेळीं युरोपांतील कोणत्याही राष्ट्राची मदत

नव्हती. पारिसच्या तहानें इंग्लंडविषयीं जरी मत्सरबुद्धि उत्पन्न झाली होती तरी अमेरिकेच्या तर्फेनें लढण्यास एकही राष्ट्र तयार नव्हतें. इंग्लंडचे परभारें दांत पडले तर बरें; पण त्या करितां स्वतः झीज सोसण्यास नाकबूल अशी फ्रान्स, स्पेन इत्यादि देशांची स्थिति असल्यानें अमेरिकन लोकांना स्वतःचे बाहुबलावरच अवलंबून राहावें लागलें.

कानडांतून दक्षिणेस जें सैन्य यावयास निघालें त्याजवर जनरल बर्गाईन हा सेनापति होता. तो अति शूर सरदार असून युद्धकलेंत फार निष्णात होता. त्याच्या हाताखालीं अम्मलदारही कर्तृत्ववान् होते. त्यांत फिलिप्स व फ्रेजर हे अग्रगण्य होते. या सैन्याची शिरगणति ७२०० होती व त्याजबरोबर तोफखानाही होता. पश्चिम सरोवराजवळील कांहीं रेड इंडियन्सही बर्गाइननें आपले सैन्यांत घेतले होते. या रानटी लोकांचें साहाय्य घेतल्याबद्दल इंग्लंडांत व अमेरिकेंत चर्चा सुरू झाली. या क्रूर व अडाणी साहाय्यकर्त्यापासून बर्गाइनचें नुकसानच झालें. त्यांच्या क्रूरपणाचा बोभाटा पूर्वीच झाला असल्यानें असल्या राक्षसांपासून आपलीं बायकामुलें, घरेंदारें, जीवजिनगी यांचें संरक्षण करण्याकरितां सर्व वसाहतवाले एकजुटीनें वागूं लागले; आणि आपल्या साहाय्यास असले क्रूर लोक घेतल्याबद्दल इंग्लिश लोकांविषयीचा त्यांचा तिटकारा दुणावला.

बर्गाइननें आपलें लष्कर चॅम्पेन सरोवराजवळ जमा केलें, व तेथून ता० २१ जून इ. स. १७७७ रोजीं तो निघाला. जलमार्गानें प्रथम तो क्राऊन पॉईट येथें येऊन पोंहोंचला. तें ठाणें सहज हस्तगत करून तेथून दक्षिणेस बारा मैलांवर असलेल्या टिकान्डेरोगा किल्ल्यास त्यानें वेढा घातला. बर्गाइनच्या मार्गाची ही किल्लीच असल्यानें अमेरिकन्सनीं त्या किल्ल्याचा बचाव करण्याची पराकाष्ठा केली; परंतु अमेरिकन सरदार सेंट क्लेअर याचे हाताखालीं केवळ

तीन हजार सैन्य होतें. त्या सैन्यास अन्नसामुग्री व दारुगोळा याचाही पुरवठा मुबलक नव्हता. सबब निरुपायास्तव सेंटक्लेअरनें तो किल्ला सोडून दिला व तो सैन्यासह मागें हटला. त्यानें जर हा मार्ग पत्करला नसता तर त्याचे सर्व सैन्याची कत्तल झाली असती किंवा तें कैद झालें असतें. तसें झालें असतां न्यूइंग्लंड संस्थानांत दुसरी फौज नसल्यानें तीं उघडी पडलीं असतां व लढाईचा शेवटच होऊन गेला असता. हें सर्व लक्षण जाणूनच 'सर्वनाशे समुत्पन्ने अर्धं त्यजति पंडिता:' या न्यायप्रमाणें सेंट क्लेअरनें टिकोन्डेरोगा किल्ला सोडून देऊन बाकीच्या संस्थानांचा बचाव केला. बर्गाइनला याप्रमाणें जय मिळत गेल्याचें ऐकून इंग्लंडला हर्षवायु झाला. जे कोणी अमेरिकन लोकांच्या बाजूचे होते त्यांस त्या लोकांबद्दल तिटकारा येऊं लागला. अमेरिकन लोक नामर्द आहेत; स्वत्व संरक्षणार्थसुद्धां ज्यांना मर्दुमकी गाजवितां येत नाहीं ते भागूबाईच समजले पाहिजेत; असल्या नामर्दांना मदत करण्यास कोण तयार होईल; असे विचार फ्रान्स व स्पेन येथील लोक उघडपणें बोलून दाखवूं लागले. अमेरिकन लोकांना आपली याप्रमाणें नाचक्की झालेली पाहून वाईट वाटलें; पण शरण जाण्याचा विचार त्यांचे मनास शिवलासुद्धां नाहीं. ठिकठिकाणच्या स्थानिक अधिकाऱ्यांनीं शत्रूशीं टक्कर देण्याकरितां सैन्य उभारण्याचे प्रयत्न आटोकाट केले. जनरल गेट्सला साराटोगा येथील सैन्यावर अधिपति नेमून पाठविलें. आणि वाशिंग्टननें आपल्या सैन्यांतून अमेरिकन शिपायांचा आवडता सरदार अर्नोल्ड यास कांहीं तोफा व पलटणें देऊन गेट्स याच्या साहाय्यास रवाना केलें. बर्गाइननें आपल्या लष्करांत रेड इंडियन्स सामील केले होते. त्याचा दुष्परिणाम त्यास आतां भोगावा लागला. हे इंडियन्स नरमांसभक्षक आहेत. व लढाईत हातीं सांपडलेल्या शिपायांस ते भाजून खाऊन टाकतात अशा कंड्या सर्वत्र

पसरल्या. त्यायोगानें स्वदेशाचें संरक्षण करण्याकरितां प्रत्येक रहिवासी सैन्यांत येऊन दाखल होऊं लागला. जे लोक इंग्लंडच्या पक्षाचे होते किंवा वडवाघुळाप्रमाणें दोहों डगरीवर हात ठेवून बसले होते त्यांसही आतां या शत्रूचा प्रतिकार करण्यास शस्त्र घेतलेंच पाहिजे असें वाटूं लागलें. सर्वांनीं आपापला नित्य व्यवसाय सोडिला व प्रत्येकजण त्यावेळीं शिपाई बनला. याप्रमाणें रानावनांतून, डोंगराळ मुलुखांतून, लहान मोठ्या गांवांतून हत्यारबंद लोकांच्या टोळ्या जमा होऊं लागल्या. हे शिपाई कांहीं अगदीच नवशिके नव्हते. बंदुकीचा उपयोग करण्याची तर त्यांस बालपणापासूनच संवय होती. त्यांना थोडीबहुत कवाईतही येत होती. पण सर्वांत त्यांचें धैर्य व दृढनिश्चय हे गुण अत्यंत प्रशंसनीय होते.

इकडे याप्रमाणें गेट्सचे सैन्यांत भरती होऊं लागली तेव्हां बर्गाइल हाही पुढील अवघड मार्ग जलदीनें आक्रमिण्याची तयारी करूं लागला. त्यावेळीं दुसरीकडे एक दोन किरकोळ चकमकींत अमेरिकन लोकांस यश आलें. त्यांचा प्रत्यक्ष फायदा ह्मणण्यासारखा झाला नाहीं; परंतु त्यामुळें अमेरिकन फौजेस स्वतःचे बलाचा भरंवसा वाटूं लागला व शत्रू कांहीं आकाश फोडून आले नाहींत अशी त्यांची खात्री झाली.

आपले सैन्यास दोन ठिकाणीं हार खावी लागली, आणि त्यायोगानें शत्रूची उमेद व फौज हीं वाढलीं हें पाहूनही बर्गाइननें आपला पुढें चालून जाण्याचा निश्चय ढळूं दिला नाहीं. त्याचा आतां कानडाशीं संबंध तुटला असल्यानें तिकडून त्यास शिधासामुग्री मिळण्याची सोय नाहींशी झाली. तथापि तो कशीबशी तीन दिवसांची सामुग्री पैदा करून लांकडी फळ्यांचा पूल करून हडसन नदी पार झाला, व त्या नदीच्या पश्चिम तीरानें कांहीं मजल मारून ता. १४ सप्टेंबर रोजीं तो साराटोगा

येथें येऊन दाखल झाला. तेथून अल्बनी शहर केवळ सोळा मैल होतें व त्या ठिकाणीचें दक्षिणेहून येणाऱ्या इंग्लिश सैन्याची गांठ पडण्याचा संकेत ठरला होता. अमेरिकन सैन्यही बर्गाइनच्या सैन्यापुढें हटत हटत अल्बनी आणि साराटोगा यांचे दरम्यान स्टिल्वॉटर येथपर्यंत येऊन पोंहोचलें. पण यापुढें आतां मागें पाऊल घ्यावयाचें नाहीं असा त्याचा कृतसंकल्प दिसला.

इंग्लिशांचे मुख्य सैन्याची छावणी न्यूयॉर्क येथें होती. त्या सैन्यांतील बराच मोठा भाग बरोबर घेऊन लॉर्ड हॉवे हा वॉशिंग्टनशीं लढण्याकरितां डेलावेअरकडे गेला. बाकीचे सैन्यासह जनरल क्लिंटन हा बर्गाइनला जाऊन मिळण्याकरितां उत्तरेकडे निघाला. क्लिंटन हाही शूर व चतुर होता; परंतु त्याजवळ सैन्याचा भरपूर पुरवठा नसल्यानें तो इंग्लंडहून येणाऱ्या मदतीची वाट पहात राहिला. तें सैन्य सप्तंबर महिन्यापर्यंत येऊन पोंहोचलें नाहीं. तथापि तें येऊन दाखल होतांच त्यानें क्षणाचाही विलंब केला नाहीं. तीन हजार पायदळाचें एक पथक तयार करून होड्यांचे साधनानें हडसन नदींतून वर जाऊन ज. बर्गाईनला मिळण्याचा त्यानें बेत केला.

साराटोगा व स्टिल्वॉटर यांचे दरम्यानचा प्रदेश सर्व खडकाळ असून त्यांतच पाण्याच्या प्रवाहानें ओघळी पडलेल्या आहेत. अशा बिकट वाटेंतूनही कांहीं ठिकाणीं पूल बांधून तर कांहीं जागीं सेतु घालून इंग्लिश सैन्य पुढें मार्ग काढीत चाललें. ता० १९ सप्तंबर रोजीं साराटोगा सोडून चार मैलांवर उभय पक्षांची एक जंगी चकमक झडली. त्यांत इंग्लिशांनीं कांहीं आपली जागा सोडली नाहीं. पण अशा करोल इंग्लिश सैन्याशीं गांठ पडली असतांही अमेरिकन नवशिक्या शिपायांनीं टिकाव धरला हीच गोष्ट त्यांस उत्साहजनक होती.

शत्रूचें बल अधिक पाहून बर्गाइननें तेथेंच तळ दिला व आपल्या छावणी-भोंवतीं मोर्चेबंदी करून ती मजबूत केली. तें पाहून अमेरिकन्सनींही आपल्या छावणीचा बंदोबस्त केला आणि ते तेथेंच ठासून राहिले. याप्रमाणें ही उभय दळें एकमेकापासून सरासरी एका गोळीच्या टप्यांत तळ देऊन राहिलीं. त्यावेळीं बर्गाइन हा न्यूयॉर्कहून निघालेल्या ज. क्लिंटनची मार्गप्रतीक्षा करीत राहिला. शेवटीं क्लिंटनकडून एक जासूद मोठ्या माराकुटीनें बर्गाइनचे सैन्यांत पोंचला. त्यानें कळविलें कीं, 'अल्बनीच्या वाटेंत असलेल्या अमेरिकन किल्ल्यावर क्लिंटन हा हल्ला करीत आहे; व तो लवकरच हडसन नदीच्या कांठानें येणार आहे.' हा निरोप ऐकून ता० ५ आक्टोबर रोजीं बर्गाइननें उलट निरोप पाठविला कीं 'कानडा प्रांताशीं माझें दळण वळण बंद झालें आहे. माझ्या छावणींतील अन्नसामुग्री जेमतेम ता० २० पर्यंत पुरेल. त्याचे आंत मजला कुमक येऊन पोंहोचली पाहिजे.'

पण बर्गाइनचा अंदाज चुकीचा ठरला. आक्टोबरच्या पहिल्या तारखेपासूनच त्याचे लष्करांत चंदीचाऱ्याचा तुटवडा भासूं लागला. अन्नसामुग्री संपत आली. तेव्हां पुढें चालून जाण्यावांचून गत्यंतर राहिलें नाहीं. त्या वेळीं रेड इंडियन्स व कानेडियन्स हे त्याची छावणी सोडून जाऊं लागले. इकडे गेट्सच्या सैन्यांत नित्य प्रांतिक सैन्याची भर पडत चालली. या रीतीनें आपल्या प्रतिपक्षाचें बल दिवसेंदिवस वाढत चाललें आणि आपल्या सैनिकांची उमेद खचत चाललेली पाहून बर्गाईननें शत्रूच्या छावणीवर हल्ला करण्याचें ठरविलें. त्यांत यश आल्यास आपण आल्बनीला पोंहोचूं; निदान हल्ल्याच्या कोंडमाऱ्यातून तरी आपली सुटका होईल अशी त्यास आशा वाटत होती.

इंग्लिशांचें सैन्य आतां सहा हजारसुद्धां राहिलें नव्हतें. त्यांच्या छावणीची उजवी बाजू एका लहानशा टेकडीवर होती आणि डावी

बाजू हडसन नदीस भिडली होती. छावणीचें तोंड नदीच्या प्रवाहाशीं काटकोनांत होतें. डाव्या बाजूस नदीचा आश्रा होता. उजव्या अंगचे बाजूनें बळसा घालून बगलेवर शत्रूनें हल्ला करूं नये ह्मणून उजव्या टेकडीवर मोर्चेबंदी करून त्यावर तोफा चढविल्या होत्या. छावणीचे पुढचें सर्व तोंड धमधम्यांनीं सुरक्षित केलें होतें. अमेरिकन सैन्याची संख्या इंग्लिश सैनेहून अधिक होती. त्यांच्या उजव्या बाजूस नदीचा आधार असून ती बाजू फार बळकट असल्यानें बर्गाइननें त्या बाजूस हल्ला करण्याचे मनांतही आणलें नाहीं. डाव्या बाजूवर निकराचा हल्ला करून अमेरिकन सैन्यास नदीच्या बाजूस रेटीत न्यावें व आपल्या समोरचा आल्बनीचा रस्ता खुला करून द्यावा असें त्याचें धोरण होतें. या हल्ल्याकरितां १५०० निवडक शिपाई, दोन बारा पौंडी, सहा सहा पौंडी व दोन डोंगरी तोफा इतक्या सामुग्रीची योजना झाली. आपल्या हाताखालीं रिडेसेल व फ्रेजर या सरदारांस घेऊन खुद्द बर्गाइनच या हल्ल्याचे कामास निघाला. त्या दिवशीं आक्टोबरची ७ वी तारीख होती. बर्गाइनचे हाताखालचें सैन्य ह्मणजे केवळ शौर्याचा कंद होतें. त्यांत नाणावलेले इंग्लिश व जर्मन शिपाई असून इंग्लिश सैन्यांतील अतिविख्यात ग्रेनेडियर्सची पलटण त्यांत होती. याप्रमाणें सैन्य निवडून घेऊन, शत्रूचें लक्ष दुसरीकडे वेधण्याकरितां कांहीं सटरफटर सैन्य तिकडे पाठवून, तो पुढें चाल करून निघाला आणि शत्रूपासून पाऊण मैल अंतराबर येऊन पोहोंचला. तेथें त्यानें आपले शिपाई फिरून लढाईचे शिस्तीनें उभे केले व तो आतां अमेरिकन छावणीवर चालून जाणार तोंच अमेरिकन सेनापती आपण होऊन त्याच्या फौजेवर तुटून पडला. आतां लढाईचें तोंड सगळीकडे लागलें. ग्रेनेडियर्सच्या पलटणीला आपल्याहून अनेक पटीनें अधिक सैन्याशीं लढावें लागलें, तथापि तिनें धीर सोडला नाहीं. अमेरिकन सैन्यानें शत्रूच्या उजव्य

बगलेवर हल्ला करून मागची वाट बंद करण्याचा प्रयत्न केला. पण ज० फ्रेजरनें आपणी पलटण ग्रेनेडियर्सच्या पाठीशीं उभी केली. यांत त्यानें दोन कामें साधिलीं. ग्रेनेडियर्सना पाठिंबा मिळून त्यांचा बचाव झाला व अमेरिकन लोकांचा बगलेवरील हल्ला फसला. ग्रेनेडियर्सना ही कुमक मिळाली नसती तर त्यांची एकसहा कत्तल झाली असती. आतां लढाई ऐन रंगांत आली. उभय पक्षांनीं लढण्याची शर्थ केली. इंग्लिशांच्या तोफा शत्रूंनीं हस्तगत करून घेतल्या होत्या, पण त्यांनीं त्या लगेच परत हिसकावून घेतल्या. शेवटीं ग्रेनेडियर पलटणीचा शत्रूच्या सेनासागरापुढें टिकाव लागेना, तेव्हां ती मागें हटूं लागली. त्या वेळीं अमेरिकन्सनीं त्यांची एक तोफ घेऊन ती त्यांचेचवर डागण्यास प्रारंभ केला. यावेळीं जें घनघोर युद्ध झालें त्यांत अमेरिकन्सना डाव्या बाजूस पूर्ण यश मिळालें.

अद्यापि इंग्लिश सैन्याच्या मध्यभागानें चांगला टिकाव धरिला होता. पण या ठिकाणीं अमेरिकन सरदार अर्नोल्ड याच्या आकस्मिक आगमनानें व शौर्यानें दहा पलटणींहून अधिक कामगिरी बजाविली. ता. १९ सप्टंबर रोजीं झालेल्या एका चकमकीसंबंधीं कांहीं बाबतींत ज. गेट्स व अर्नोल्ड यांची बाचाबाची होऊन अर्नोल्डला बडतर्फ करण्यांत आलें होतें; व तो छावणींतच नजरकैद्याप्रमाणें होता. ता. ७ आक्टोबर रोजीं लढाई अगदीं रंगांत आली त्यावेळीं अर्नोल्डसारख्या रणगाजीस तंबूंत माशा मारीत स्वस्थ बसवेना. त्यानें पाहिलें कीं, आपल्या सैन्याच्या मध्यभागीं लढाईचें काम थोपलें आहे. तेथें आपल्या सैन्याचें पाऊल पुढें पडत नाहीं. हें दृष्टीस पडतांच त्याचे बाहु स्फुरण पावूं लागले. त्याच्या अंगांत आवेश चढला. त्यानें आपला सुरंग बोर घोडा मागविला व त्यावर स्वार होऊन दौडत तो सैन्याच्या अग्रभागीं

दाखल झाला. आपला आवडता सरदार आयतेवेळीं आलेला पाहून सैनिकांसही स्फुरण चढलें. सेनापति गेट्सनें अर्नोल्डची ही कृति पाहिली व त्यास परत बोलावण्यास आपल्या वकीलास पाठविलें. परंतु अर्नोल्डच्या अंगांत यावेळीं वीरश्रीचा पूर्ण संचार झाला होता. तो असले रडके हुकूमबिकूम मानण्याच्या स्थितींत नव्हता. वकीलाचा निरोप त्यानें पुरा ऐकूनही घेतला नाहीं. त्यानें अचानक शत्रुसैन्यावर आपल्या फौजेनिशीं चाल केली. त्याच्या मुसंडीपुढें शत्रूचा टिकाव लागेना. त्याच्या हुकुमानें व उदाहरणानें त्याच्या शिपायांनींही मर्दुमकीची कमाल केली व शत्रूस तोबा तोबा म्हणावयास लाविलें. याप्रमाणें आपली मध्यबाजू ढांसळत चालल्याचें पाहून इंग्लिश सरदार फ्रेजर पुढें सरसावला. त्यानें आपल्या सैनिकांस थोपवून धरिलें व तो शत्रूच्या तोंडावर तुटून पडला. आपल्या अधिकाऱ्याच्या या कृतीनें शिपायांसही उत्तेजन येऊन तेही आपल्या बळाची पराकाष्ठा करूं लागले. याप्रमाणें हा अर्नोल्ड व फ्रेजर यांचा भयंकर सामना सुमारें अर्ध प्रहर झाला. कोणीच कोणास हटेना. उभय सरदारांना तर आपल्या देहाचें मुळीं भानच नव्हतें. त्यावेळीं अमेरिकन सैन्यांतील कर्नल मॉर्गननें ताडलें कीं, या लढाईचें यशापयश अर्नोल्ड व फ्रेजर यांच्या जीवितावर अवलंबून आहे. हा विचार मनांत येतांच त्यानें आपल्या कांहीं नांवाजलेल्या निशाणबहाद्दरांस जवळ बोलाविलें व त्यांस म्हणाला 'इंग्लिश सैन्यांतील तो करड्या घोड्यावरचा सरदार ज. फ्रेजर आहे. त्याच्या शौर्याचें मला कौतुक वाटतें; पण आम्हांस जय प्राप्त होण्यास तो ठार झाला पाहिजे. यास्तव पलीकडील झुडपांतून नेम धरा आणि त्याच्या घोड्याचें जीन रिकामें करा. जा या कामगिरीस विलंब लाविल्यास सर्वस्वी नाश होईल.' हा हुकूम ऐकून त्या निशाणबहाद्दरांनीं त्याजवर गोळ्यांची झोड लाविली. आपले अंमलदारावर एकाएकीं इतक्या गोळ्या आलेल्या पाहून त्याच्या नकि-

बानें ह्मटलें ' सरदार साहेब शत्रूचें लक्ष तुमच्या एकट्यावरच फार दिसतें, तर आपण थोडें आड होणें बरें. ' हें ऐकून त्याचा धिक्कार करून फ्रेजर ह्मणाला ' आपलें कर्तव्य सोडून पळून जाण्यास मी कांहीं भागुबाई नाहीं. ' इतके शब्द त्याच्या तोंडून येतात न येतात तोंच एक काळगोळी त्याचे वर्मी लागली व तो धाडकन घोड्यावरून खालीं पडला. त्याच्या हुजऱ्यांनीं त्यास तत्काळ उचलून छावणींत परत नेलें. फ्रेजरसारखा मोहरा रणांगणीं पतन पावतांच इंग्लिश फौजेचें धैर्य खचूं लागलें व ती मागें हटूं लागली. अमेरिकन्सनीं जास्त नेटानें हल्ला केला व इंग्लिशांचा पूर्ण पराजय झाला. ते परत आपल्या छावणीकडे वळले त्यावेळीं अमेरिकन सैन्यानें त्यांची लगट करून त्यांचा पुरा फडशा पाडण्याचा घाट घातला. पण इंग्रिशांच्या चोविसाव्या पलटणीनें त्यांचे हल्ल्यास रोध करून तो कमजोर केला. त्यामुळें इंग्लिश शिपायांना आपली छावणी गांठतां आली. तथापि त्यांच्या सहा तोफा शत्रूचे हातीं लागल्या व बहुतेक गोलंदाज मागें न हटल्यानें तेथल्या तेथें ठार झाले.

बर्गाइनच्या एवढ्या पराजयानेंच इंग्लिश सैन्यावरील अरिष्ट टळलें नाहीं. तें सैन्य आपल्या छावणींत जाऊन पोचतें न पोचतें तोंच अमेरिकन्सनीं त्यांच्या छावणीवरच हल्ला केला. तोफांच्या, जेजालांच्या, बंदुकांच्या माराला न डगमगतां, मोर्चेबंदींतून, धमधम्यावरून खंदकांतून मार्ग काढून ते छावणीवर तुटून पडले. अर्नोल्डच्या अंगीं तर त्या दिवशीं युद्धपिशाच्च संचरलें होतें. त्यामुळें प्राणाची पर्वा न करितां त्यानें इंग्लिशांच्या तटबंदीवर चाल केली आणि कांहीं निधड्या छातीच्या अनुयायांसह तो इंग्लिश छावणींतच घुसला. परंतु या विजयाच्या भरांतच त्याच्या पायास मोठी जखम झाली आणि

त्याच्या इच्छेविरुद्ध त्यास परत छावणींत नेलें. तथापि त्याच्या फौजेनें तो हल्ला तसाच चालू ठेविला होता. पण आतां इंग्लिश सैन्यासही अधिक धीर येऊन त्यानें शत्रूंचे हल्ले परतविण्यास कसूर केली नाहीं. सरतेशेवटीं रात्र पडून काळोख गडद झाला त्यावेळीं अमेरिकन सैन्य इंग्लिश छावणींतून परत फिरलें. छावणीच्या दुसऱ्या बाजूस त्यास याहून अधिक जय मिळाला होता. छावणीच्या उजव्या अंगच्या टेकडीवर हल्ला करून त्यांनीं इंग्लिशांचे तंबू, राहुट्या, बाडबिछाइत, दारुगोळा सर्व लुटून फस्त केलें. अमेरिकन सैन्यास दारुगोळ्याची कमतरता होती ती यांप्रमाणें दूर झाली. शिवाय ही उजवी बाजू त्यांचे स्वाधीन झाल्यानें वाटेल त्यावेळीं शत्रूच्या बगलेवर चालून जाण्यास त्यास सवड झाली. याकरितां इंग्लिश सैन्यास आपली उजवी बाजू मागें घ्यावी लागली.

दुसरे दिवशीं सकाळीं बर्गाइननें मोठ्या शिताफीनें आपलें सैन्य नदीच्या उत्तर तीरावरील टेंकड्यावर लढाईच्या शिस्तीनें उभें केलें; परंतु आतां केवळ शत्रूंचा कोंडमारा करून खालीनें जय मिळण्यासारखा असल्यानें अमेरिकन सेनापति लढाईच्या भानगडींत पडला नाहीं. शत्रू लढाई देण्यास येत नाहीं असें पाहून बर्गाइननें आपलें सैन्य साराटोगाच्या छावणींत नेलें. अमेरिकन्सनीं आतां निकराची लढाई करण्याचें सोडून किरकोळ छापे घालून त्यांस सतावून सोडण्याचा क्रम धरिला. हडसन नदी ओलांडून पैल तीरावर त्यांनीं जाऊं न ह्मणून नदीपार त्यांची वाट अडविण्यास सैन्याची रवानगी केल यांप्रमाणें बर्गाइनचा चोहोंकडून कोंडमारा झाला. तो पुरा कचाट्यांत सांपडला. कानडा प्रांतांशीं त्याचें दळणवळण पूर्वीच बंद झालें होतें. दक्षिणेकडून मदतीस येणाऱ्या क्लिंटनचा अद्याप पत्ता नव्हता. छावणींत

तर अन्नाचा पुरा दुष्काळ पडला. पुढें, मागें, आजूबाजू सर्व दिशांस शत्रूचे सैन्याचा गराडा पडल्यानें कोणीकडेही हलण्यास वाव नाहीं, अशी त्याच्या सैन्याची स्थिति झाली. या दीनवाण्या स्थितींतही त्याच्या सैनिकांनीं प्रशंसनीय धैर्य दाखविलें; पण तें सर्व निष्फळ ठरलें. त्यास आतां बिन शर्तीनें शरण जाण्याखेरीज मार्गच राहिला नाहीं. शेवटीं ता. १३ आक्टोबर रोजीं बाहेरून कुमक येण्याची निराशा झाल्यावर, छावणींतील बहुतेक सर्व सामुग्री खलास झाल्यावर, आपल्या सर्व अम्मलदारांच्या एकमतानें बर्गाइननें शरण आल्याचें सांगून पाठविलें. गेट्सचें प्रथम मत पडलें कीं, ब्रिटिश शिपायांनीं आपलीं हत्यारें मोडून फोडून, तोडून बाद करावीं व लढाईचे कैदी होऊन शत्रूचे अटकेंत रहावें. पण असल्या अपमानकारक अटीपेक्षां मरण पतकरलें असें त्यांस वाटून ते जिवावर उदार होऊन फिरून लढण्यास प्रवृत्त झाले. त्या वेळीं उभय पक्षांत बरीच वाटाघाट होऊन शेवटीं असें ठरलें कीं, ब्रिटिश सैन्यानें निशाणें, रणवाद्यें व तोफखाना यांसह नदीतीरापावेतों जावें. तोफा तेथेंच सोडून द्याव्या. नंतर आपल्याच अधिकाऱ्यांच्या हुकूमानें आपलीं हत्यारें खालीं ठेवावीं आणि निमूटपणें हडसन नदीपार होऊन जावें. तेथें फिरून या युद्धांत शस्त्र धरणार नाहीं अशी शपथ वाहिल्यावर त्याची विलायतेस रवानगी करून द्यावी.

याप्रमाणें ता. १५ आक्टोबर रोजीं अटी मुकर झाल्या. त्याच दिवशीं सायंकाळीं क्लिंटनकडून जासूद आला. त्यानें कळविलें कीं, 'मार्गीतील सर्व अडथळे दूर करून आणि सर्व अडचणींतून पार पडून क्लिंटनचें सैन्य येथून पन्नास मैलांवर येऊन दाखल झालें आहे.' ही बातमी ऐकून बर्गाईनच्या मनास काय वाटलें असेल बरें? पण आतां

त्याचा काय उपयोग? प्राण निघून गेल्यावर दिव्यौषधि प्राप्त झाल्याप्रमाणेंच तें निष्फळ होतं. शरण आल्याच्या अटी एकवार तोंडांतून निघून गेल्या. आतां ते शब्द परत घेतां येत नाहींत, हें पाहून ता. १७ आक्टोबर रोजीं सर्व ब्रिटिश सैन्यानें हत्यार खालीं ठेविलें. या रीतीनें ५७९० शिपाई कैदी झाले. याखेरीज ब्रिटिश सैन्यांतील आजारी, जखमी अगर जायबंदी झालेले, युद्धांत मरण पावलेले, आणि पाडाव होऊन अगर फितुरीमुळें शत्रूचे स्वाधीन झालेले, यांची संख्या ४६८९ होती. एकूण इंग्लिशांच्या दहा हजार शिपायांचा फडशा पडला.

या विजयाची आनंददायक बातमी कांग्रेसला कळविण्याकरितां गेट्सनें कर्नल विल्किन्सन यास पाठविलें. 'साराटोगा येथील यच्चावत् ब्रिटिश सैन्य शरण आलें. आमचे सैन्याची या जयानें वीरश्री द्विगुणित झाली आहे, तिचा दुसरीकडे योग्य उपयोग होण्यासारखा असल्यास त्याप्रमाणें फर्माविण्यांत यावें. आपल्या देशाचें स्वातंत्र्य राखण्याकरितां वाटेल तें संकट सोसण्यास आमचे शिपाई तयार आहेत.' हा बर्गाइनचा निरोप ऐकून कांग्रेसच्या प्रतिनिधीस व सर्व अमेरिकन लोकांना जो आनंद झाला तो त्रिभुवनांत मावेना. विजयी सरदार व सैनिक यांजवर पदव्यांचा व बहुमानाचा वर्षाव झाला. सर्व लोक आपल्या मनांत पुढील मनोराज्याची कल्पना करूं लागले. आपलें स्वातंत्र्य राखण्यास आपण समर्थ आहों असा त्यांस पूर्ण भरंवसा आला. असला जय मिळाल्याचें कळतांच जे फ्रान्स व स्पेन देश आजवर तटस्थ वृत्तीनें या युद्धाचा चमत्कार पहात होते ते आतां आपणास साहाय्य करण्यास धावून येतील अशी त्यांचे मनास खात्री वाटली. स्वसंरक्षणास आपण खंबीर आहों असें जगाचे निदर्शनास आणून दिल्याखेरीज आपला वाली कोणी होत नाहीं हें त्यांच्या प्रत्ययास

आलें. अमेरिकन लोकांना मदत करण्यांत आतां तिळमात्र धोका नाहीं असें दिसून येतांच भाकित केल्याप्रमाणें फ्रान्स व स्पेन देश त्यांच्या मदतीस आले. पूर्वी ज्या वेळीं टिकोंडेरोगा किल्ला सर करून बर्गाइननें अमेरिकन लोकांचा मोड केल्याची बातमी पारिस येथें कळली त्या वेळीं फ्रेंच लोकांचे तोंडून अमेरिकन लोकांविषयीं तिरस्कारदर्शक शब्द ऐकूं येऊं लागले. फ्रेंच सरकारनें त्यांस मदत करणें तर दूरच राहिलें; उलट अमेरिकन जहाजास संकटाचे प्रसंगाखेरीज फ्रेंच बंदरांत येऊंच द्यावयाचें नाहीं असा हुकूम फर्माविण्यांत आला. फ्रेंच दरबारीं जे अमेरिकन वकील कुमक मिळविण्याच्या उद्देशानें आले होते त्यांस फ्रेंचांचें हें वर्तन पाहून त्यांचा तिटकारा आला आणि त्यांचें मन खट्टू झालें. याप्रमाणें त्यांची सर्व उमेद खचून गेल्याकारणानें इंग्लंडशींच फिरून कांहीं तरी संधान बांधून सलोखा करावा या विचारास ते लागले; पण इंग्लिशांस त्यावेळीं स्वर्ग दोन बोटें उरला होता. त्यांनीं मदांधतेनें अमेरिकन वकीलास झिडकारून टाकलें. इतक्यांत साराटोगाची बातमी येऊन पोंहोंचली तोंच एका क्षणांत सर्व मनु बदलला; इंग्लिश प्रधानमंडळ तह करण्याची उत्सुकता दर्शवूं लागलें. परंतु यावेळीं अमेरिकन लोकांची कमान वर चढली. फ्रेंच सरकारानें अमेरिकन वकीलास पूर्ण साहाय्य करण्याचें अभिवचन दिलें. इंग्लंडकडून आजपर्यंतच्या युद्धांत फ्रान्सची जी हानि व मानखंडना झाली होती त्या सर्वांबद्दल सूड उगविण्याची संधि फ्रान्सला आयतीच मिळाली. दिसेंबर महिन्यांत फ्रान्स व अमेरिका यांच्या दरम्यान तह ठरला. या तहांत फ्रान्सनें अमेरिकेंतील संयुक्त संस्थानांचें स्वातंत्र्य जाहीररीतीनें मान्य केलें. पुढें थोडक्याच दिवसांनीं स्पेननें फ्रान्सचाच कित्ता गिरविला. त्याच्या पाठेपाठ हॉलंड देशही तयारच होता. त्यानेंही संयुक्त संस्थानांचें स्वातंत्र्य कबूल करून त्यांस मदत देण्याचें वचन दिलें.

याप्रमाणें युरोपांतील तीन राष्ट्रांचा पाठिंबा मिळाल्यानें अमेरिकन लोक निर्धास्त झाले व त्यांनीं इंग्लंडशीं बरोबरीच्या नात्यानें टक्कर देऊन त्यास चित केलें. युरोपांतच इंग्लंडला इतके प्रबळ शत्रु उद्भवल्यानें त्याचा हात लटका पडला; तथापि अमेरिकेंत सैन्याचा पुरवठा करण्यास त्यानें कसूर केली नाहीं. पण अमेरिकन लोकांचें बळ दिवसेंदिवस वृद्धिंगतच होत गेलें. शेवटीं इ. स १७८२त कॉर्नवालिसच्या हाताखालील सैन्य यॉर्कटाऊन येथें अमेरिकन सेनापति जॉर्ज वाशिंग्टन यास शरण आलें. याप्रमाणें साराटोगाची पुनरावृत्ति होतांच इंग्लंडला मुठींत नाक धरून अमेरिकन संस्थानांचें स्वातंत्र्य कबूल करणें भाग पडलें. इ. स. १७८३त पारिसच्या तहानें इंग्लंडनें नाइलाजानें ती गोष्ट जाहीर रीतीनें कबूल केली. हा जो शेवटीं अमेरिकन लोकांचा विजय झाला त्यास साराटोगाची लढाईच मूलाधार होय. त्या लढाईत अमेरिकन्सना जय मिळाला नसता तर त्यांना फ्रान्स व स्पेनची मदत मिळत नव्हती व इंग्लंडवर दुसरे जयही मिळण्याची वानवाच होती. यास्तव या स्वातंत्र्ययुद्धांत जयाचें पारडें साराटोगा येथेंच अमेरिकेच्या बाजूस कललें म्हणण्यास बिलकुल प्रत्यवाय नाहीं.

जगांतील क्रांतिकारक लढाया.

भाग १४ वा.

'व्हामी'ची लढाई इ० स० १७९२.

फ्रान्स देशाच्या ईशान्य भागांत मेनेहोल्ड गांवापासून कांहीं मैलांवर व्हामी नांवाचें एक गांव आहे. त्या गांवानजीकच्या एका टेकडीवर एक लहानसें थडगें आहे. हें थडगें फ्रान्सच्या प्रजासत्ताक कारकीर्दीतील एक प्रसिद्ध सरदार केलरमन याचें होय. हा केलरमन इ० स० १७९२ च्या पूर्वीपासून फ्रेंच सैन्यावरील अधिकारी होता. तो इ० स० १८२० त मरण पावला. मरतेसमयीं त्यानें अशी इच्छा प्रदर्शित केली कीं 'मला व्हामीच्या रणांगणांत मूठमाति द्यावी.' ह्या केलरमनला इ० स० १८०२ सालीं लॉईची पदवी देण्याचें ठरलें त्यावेळीं त्यानें 'ड्यूक ऑफ व्हामी' हीच पदवी पसंत केली. याप्रमाणें ह्या केलरमनला यावज्जीव व्हामीच्या लढाईचें स्मरण होतें व त्या लढाईचें महत्त्व त्याचे मनावर पूर्ण बिंबलें होतें. व्हामी येथील रक्तपात व कत्तल ज्याच्या पासंगासही पुरणार नाहींत अशा शेकडो लढायांत तो हजर होता. तथापि व्हामीच्या लढाईच्या महत्त्वाविषयीं जें एकदां त्याचें मत बनून गेलें तें ठाम होय. फ्रान्सच्या जुन्या राज्यपद्धतींतील विस्कळित झालेलें उरलेंसुरलें कांहीं थोडें सैन्य व कार्मनोल नांवाच्या नवशिक्क्या पलटणी यांनीं प्रशिया आणि आस्ट्रिया देशांतील

रणधुरंधर सरदार व फ्रान्समधून पळून आलेले सरदारपुत्र यांच्या हाताखालील निवडक सैन्याशीं टक्कर देऊन त्यास धूळ खावयास लाविलें. त्यावेळेपासून फ्रान्सच्या लोकसत्ताक राज्यपद्धतीचें लष्करी उग्र स्वरूप पूर्णपणें व्यक्त झालें. नवशिके व्यापारी व कारागीर, हेंगाडी खेडवळ लोक, हलकट मजूर आणि यःकश्चित् नांगरे, असल्या तुच्छ मानिल्या जाणाऱ्या मध्यम व कनिष्ठ प्रतीच्या लोकांतून निवडलेल्या शिपायांनीं आपणांस बंदुकीचे चाप ओढतां येतात, संगिना भोंसकता येतात, व प्रत्यक्ष यमाच्या जबड्याप्रमाणें विक्राळ अशा तोफांच्या तोंडावर चालून जातां येतें, हें जगाचे निदर्शनास आणून दिलें. एकंदरींत आपल्या अंगीं नैसर्गिकच शिपाईगिरी आहे ही गोष्ट त्यांची त्यांसच अवगत नव्हती ती आतां त्यांस स्पष्टपणें कळून आली. त्यायोगें त्यांना स्वतःच्या व परस्परांच्या कर्तृत्वाविषयीं भरंवसा आला. यानंतर थोडक्याच काळांत विजयी फ्रेंच सैन्य व्हिएन्ना व मास्कोपर्यंत गेलें त्याचें सर्व श्रेय व्हामीच्या लढाईसच देणें युक्त आहे.

इ. स. १७८९ पासून फ्रान्स देशांत राज्यपद्धतींत स्थिरता म्हणून येईना. लोकांस रुचगारी, लवकर न बिघडणारी व पिढ्यानपिढ्या टिकणारी अशी राज्यपद्धति अद्याप फ्रान्समध्यें मूळ धरीत नाहीं. इ. स. १८०४ पर्यंतच्या पंधरा वर्षांत सतरा प्रकारची राज्यपद्धति अमलांत आली; पण जनतेचें समाधान कशानेंच होईना. पुढें नेपोलियनची बादशाही कारकीर्द सुरू झाली. लिप्झिक येथें त्याचा पराजय झाल्यामुळें त्यास एल्बा बेटांत अज्ञातवासांत रहावें लागलें, आणि बुर्बोन घराण्याची पुनश्च स्थापना झाली. पण नेपोलियननें आपला अज्ञातवास झुगारून देऊन, अठराव्या लुईस सिंहासनावरून पळावयास लाविलें; परंतु वाटर्लूच्या पराभवानें नेपोलियनच्या बादशाही

सत्तेचा शेवट झाला, आणि परकी राष्ट्रांच्या सैन्याच्या जोरावर तोच अप्रिय राजा फ्रेंच लोकांचे बोकांडीं बसला. फ्रेंचांनीं हा जुलूम कसाबसा सुमारें पंधरा वर्षें सोसला आणि इ. स. १८३० त राज्यक्रांति केली. तेवढ्यानेंही त्यांस कायमचें स्वास्थ्य मिळालें नाहीं. इ. स. १८४८ त ही पहिल्या राज्यक्रांतीची पुनरावृति होऊन लुइचें जोखड त्यांच्या मानेवर बसलें. शेवटीं इ. स. १८७० त जर्मनीनें त्यांच्या डोळ्यांत चांगलें अंजन घातल्यावर हल्लीं चालू असलेली लोकसत्ताक राज्यपद्धति सुरू झाली. ही जी फ्रेंच लोकांच्या वृत्तींत अस्थिरता दिसून येते ती केवळ वरकरणी आहे. कारण त्यांचा अंतिम हेतु मूळारंभापासून लोकसत्ताक पद्धति सुरूं करणें हाच आहे. या त्यांच्या प्रयत्नास पररा‌ष्ट्रांनीं अगर कांहीं देशद्रोही लोकांनीं अडथळा केला व त्यांत फ्रेंच लोकांस हार खावी लागली ह्मणून तोच तो प्रयत्न त्यास इतक्या वेळां करावा लागला. परंतु हल्लींच्या लोकसत्ताक राज्यपद्धतीची प्राणप्रतिष्ठा त्यांनीं ता. २० सप्टेंबर सन १७९२ रोजीं ह्मणजे व्हामीच्या लढाईच्या दिवशीं केली.

इकडे रणांगणांत तोफांचा दणदणाट चालला होता त्याचवेळीं पॅरिस शहरांत 'नॅशनल कन्व्हेन्शन' मध्यें लोकसत्ताक राज्यपद्धतीविषयीं चर्चा चालून बहुमतानें ती पद्धति सुरू केल्याचें जाहीर करण्यांत आलें. परंतु व्हामीच्या रणभूमीवरील लोकपक्षाच्या वक्तृत्वांचीं तोंडें जर बंद झालीं असतीं तर कान्व्होकेशनचा हा जाहीरनामा दफ्तरांतच राहिला असता, आणि फ्रान्सवर पूर्वीचीच राज्यपद्धति लादून सरदार लोकांनीं मध्यम व कनिष्ठ वर्गाच्या लोकांस बुटाखालीं तुडविलें असतें आणि आपल्या तीन वर्षांच्या वनवासाचा पुरा सूड उगवला असता.

व्हामीच्या लढाईच्या संधीस फ्रान्समधील प्रजापक्षाचे ग्रह उच्चीचे नव्हते. त्याचे सैन्याची स्थिति अत्यंत शोचनीय होती. चवदाव्या लुईच्या वेळचें अजिक्य सैन्य तदनंतरच्या कारकीर्दीत संख्येनें व तयारीनें व उमेदीनें कुचकामाचें ठरत चाललें होतें. पुढें राज्यक्रांतीच्या पहिल्या अमदानींत कांहीं पथकांनीं जीं अनन्वित कृत्यें केलीं, त्यायोगानें सर्व फौजेंतील शिस्त बिघडून गेली आणि सैनिकांवर कदर नाहींशी झाली. स्वातंत्र्य, समता, बंधुता, यांचें वेड पिकलें; त्यावेळीं शिपायांचे लाड फारच वाढले. आपल्या अधिकाऱ्याविरुद्ध खरी खोटी कसलीही थोडी तक्रार केली कीं पुरे; तो अम्मलदार दोषी ठरलाच. शिपायांस अशी फूस मिळाल्यावर ते सरदारांच्या कह्यांत राहणार कसे व सैन्यांत शिस्त टिकणार तरी कशी? ज्या कांहीं शूर व जीवास जीव देणाऱ्या पलटणी होत्या, त्यांतील कांहीं राजपक्षाच्या ह्मणून बंडवाल्यांनीं कापून काढल्या, आणि बाकीच्या फ्रान्स देश सोडून प्रशियांत फ्रान्सविरुद्ध सैन्य जमत होतें त्यांत सामील झाल्या.

जुन्या कसलेल्या फ्रेंच सैन्याची याप्रमाणें वाताहत झाली होती. त्याचे जागीं 'कार्मनोल' नांवाचें जें स्वयंसेवकांचें सैन्य बनविलें होतें त्यांत तर शुद्ध खोगीरभरतीच होती. शत्रु देशावर चाल करून येत आहे असा जॅकोबिन पक्षानें पुकारा करितांच हे स्वयंसेवक ठिकठिकाणाहून आवेशानें एकत्र झाले, आणि सरहद्दीवर चालून गेले. त्यांचे अंगीं असलेलीं उत्साह, आवेश व कळकळ हीं प्रशंसनीय होतीं. पण त्यांत कवाईत, टापटीप, शिस्त, आज्ञाधारकपणा, इत्यादि गुणांची ओळखसुद्धां नव्हती. ते आपल्या अधिकाऱ्याविरुद्ध बंड करण्यास एका पायावर तयार, परंतु शत्रु दृष्टीस पडतांच पळ काढणारे होते.

हे जे केवळ खेगीरभरती, आडदांड, सैनिक दिसत होते त्यांना कवाइतीचें व युद्धकलेचें शिक्षण मिळून त्या कामांत निर्ढावतांच तेच बाजारबुणगें शत्रूला अजिंक्य झालें. हुकूम देण्याचा अवकाश कीं, वाऱ्याप्रमाणें वाटेल त्या दिशेस ते धांव घेत. ऊन, थंडी, तहान, भूक यांचें त्यांस भानही नाहींसें झालें. कारण पडल्यास अनवाणी आणि उघड्या अंगानें ते शत्रूवर चालून जात; जणुं काय त्यांचीं शरीरें लोहमयच होतीं. भुकेच्या वेळीं एक भाकरीचा तुकडा आणि शत्रूचा धुव्वा उडवून देण्यास दारुगोळा याखेरीज त्यांस कशाची गरज लागत नसे. सारांश हें फ्रेंच सैन्य ह्मणजे केवळ आग आहे अशी युरोप खंडाची खात्री झाली. ॲटिलाच्या वेळेपासून इतकें चपल, चतुर, धाडशी, आणि आवेशयुक्त सैन्य कोणी पाहिलें नसेल.

हें कार्मेनोल स्वयंसेवकांचें सैन्य वर वर्णिल्या प्रकारचें पुढें बनलें खरें. परंतु तें नवें स्वरूप त्यास येईपर्यंत त्या आडमुठ्या व नवशिक्या सैन्यावर अवलंबून रहावें लागल्यानें फ्रान्सच्या जिवावरच बेतलें होतें.

युद्धाचा प्रारंभ तर फ्रान्सला फारच हानिकारक व लज्जास्पद असा झाला. आस्ट्रियाची लढाईची तयारी झाली नाहीं तोंच फ्रेंच सैन्यानें नेदर्लंडावर स्वारी केली. त्या सैन्याची कागदोपत्रीं शिरगणति बरीच असल्यानें युरोपची युद्धभूमि नेदर्लंड ही फ्रेंचांच्या अंकित होणार असें सर्वांनीं भाकित केलें. पण हें फ्रेंच नवशिकें सैन्य आस्ट्रियन तोफेचा एक गोळा सुटतांच पळत सुटे. त्यांचें एक चार हजारांचें पथक टुर्ने किल्ल्याजवळ आलें. तेथें आस्ट्रियाची शिबंदी बेताचीच होती. अद्याप किल्ल्यावरून एकही गोळा सुटला नव्हता, किंवा कोणी बंदुकीचा बारही काढला नव्हता तोंच फ्रेंच सैन्याचे अंगांत कांपरें भरलें, व तें गर्भगळित होऊन धूम पळत सुटलें. रणभूमीवर असा पराक्रम गाजवून

तें छावणींत परत आलें; आणि आपल्या सेनापतींचा व इतर अधिकाऱ्यांचा खून करून त्यानें आपलें शौर्य व आज्ञाधारकत्व प्रगट केलं. दुसऱ्या एका दहा हजार सैनिकांच्या पथकाची टेहळणी करण्याकरितां कांहीं आस्ट्रियन घोडेस्वार आले. फ्रेंचांच्या अघाडीच्या चौकींतून पांच सहा बार निघाले. त्यास आस्ट्रियन टेहळण्याकडून जबाब येतो न येतो तोंच फ्रेंच पलटणींनीं 'दगा, दगा' अशी ओरड करून पळ काढला. असलेच हास्यास्पद प्रकार रोचॅम्बो, ला फायटी वगैरे सेनापतींच्या फौजेंतही घडून आले.

इकडे आस्ट्रिया आणि प्रशिया देशांनीं, फ्रान्सवर स्वारी करण्याकरितां ऱ्हाइन नदीतीरीं कसलेलें कवाइती सैन्य जमा केलें. त्यांतील शिपायांची संख्या फार मोठी असून त्यांची तयारीही कडेकोट होती. त्यांतील शिपाई शूर व सरदार युद्धकलाविशारद होते. त्या सैनिकांनीं आजवर तलवार गाजवून कीर्ति मिळविली होती. त्यांचा बेत थेट पारिसवर चालून जाऊन तें राजधानीचें शहर काबीज करण्याचा होता. मार्गीतील फ्रेंच सैन्याची त्यास मुळींच दरद वाटत नव्हती. कारण त्या सैन्यांतील अव्यवस्था व त्याचा नामर्दपणा जगजाहीर झाला होता. वार्टेंत सेडन, लँग्बी, आणि व्हर्डन हे तीनच बळकट किल्ले होते. एवढे सर केले किंवा शह देऊन धाकांत ठेविले ह्मणजे पारीसपर्यंत दुसरा कसलाही अडथळा येण्यासारखा नव्हता. केवळ वऱ्हाडी लष्कर जातात तितक्या सुलभ रीतीनें आपण पारिसला पोंहोचूं अशा मनोराज्यांत जर्मन शिपाई दंग होते.

इ. स. १७९२ च्या जुलैअखेर या संयुक्त सैन्याची तयारी पुरी होऊन लक्झेंबर्ग येथून तळ हालला. लांग्बी किल्ल्याजवळ तें सैन्य

फ्रेंच हद्दींत शिरलें. फ्रेडरिक दी ग्रेटच्या तालमींत तयार झालेलें, सप्त-वार्षिक युद्धांत गाजलेलें, आणि सगळ्या युरोप खंडांत उत्तम म्हणून नाणावलेलें ६० हजार प्रशियन सैन्य मध्यभागीं होतें. तुर्की लढायांत नांव मिळविलेलें निवडक पंचवीस हजार आस्ट्रियन सैन्य डाव्या उजव्या बाजूस बगला संभाळण्याकरितां होतें. शिवाय फ्रान्समधील राज्यक्रांतीचे धामधुमींत पळून आलेले १५ हजार कुलीन व शूर तरुण फ्रेंच सरदार जर्मन फौजेबरोबर शिपायाच्या वेषानें होते. या सरदा-रांना पारिसचा रस्ता हा जयश्री व कीर्ति वरण्याचा मार्ग, आपल्या राजाची सुटका करून राजनिष्ठा दाखविण्याचा उपाय, कुटुं-बांतील मंडळींना भेटण्याची युक्ति आणि वडिलार्जित इस्टेट मिळ-विण्याचें साधन होता. या सर्व संयुक्त सैन्यावर ड्यूक ऑफ ब्रन्सविक हा सेनापति होता. तो जर्मनींतील एक लहानसा संस्थानिक असून चांगला मुत्सद्दी होता. सप्तवार्षिक युद्धांत फ्रेडरिक दी ग्रेटच्या खालो-खाल नाणावलेला रणपंडित तोच होता. कांहीं वर्षांपूर्वी हालंडमधील बंड मोडण्याचे कामावर त्याची योजना झाली होती व तेथें त्यानें राज्य-क्रांतीचे प्रयत्न इतक्या तत्परतेनें व पूर्णपणें हाणून पाडले कीं, त्यावरून फ्रान्समध्यें ही त्यास तसल्याच कामांत पूर्ण सिद्धि मिळेल असें कित्ये-कांनीं भविष्य वर्तविलें.

अशा तयारीनिशीं हें जर्मन व आस्ट्रियन सैन्य फ्रान्समधील राज्य-क्रांति चिरडून टाकण्याकरितां मोठ्या थाटानें निघालें. आपल्या बळा-विषयीं त्यास घमेंड असल्यानें तें बिनदरद फ्रान्सच्या हद्दींत घुसलें. ता० २० आगष्ट रोजीं त्या फौजेनें लाँग्वी किल्ल्यास वेढा दिला. दोन चार कुलपी गोळे तटावर आदळले नाहींत तोंच तेथील नामोहरम झालेल्या शिबंदीनें शत्रूस दरवाजे खुले करून दिले. व्हर्डन किल्ल्यावरील

शिपायांनीं तर शत्रूस तोंड देण्याचा नुसता आव सुद्धां घातला नाहीं. गोळीची चुटकी ही न वाजवितां तो ता. २ सप्तंबर रोजीं शत्रूचे स्वाधीन झाला.

मेट्झ व सेडन या ठिकाणच्या फ्रेंच सैन्याच्या दरम्यान हें शत्रूसैन्य येऊन थडकलें मेट्झ येथील फौजेवर सेनापति केलरमन हा होता. सेडन-जवळील फौजेचा अधिकारी लाफायेटी· यास नुकतेंच कामावरून दूर केलें असून त्याचे जागीं नवीन सेनानीची नेमणूक अद्याप झाली नव्हती. अशा वेळीं प्रशियन सेनेनें डाव्या अगर उजव्या बाजूच्या एकेकट्या सैन्यावर हल्ला करून त्याचा फडशा पाडला असता, तर पारीसपर्यंत त्यास प्रतिबंध करण्यास कोणी धजलें नसतें. पण प्रशियन सैन्याचा बेत ठरण्यापूर्वीच या आणीबाणीच्या प्रसंगीं ड्यूमारिझ या सेनानायकाची सेडन येथील सैन्यावर नेमणूक झाली. तेथें येतांच त्यानें शिताफीनें आपल्या सैन्याच्या हालचाली करून दोन्हीं दळें एकत्र केलीं, आणि प्रशियन फौजेस पायबंद बसविला.

सेडन पासून नैऋत्य दिशेस १५।१६ कोसपावेतों अर्गान नांवाचा समविषम भूभाग आहे. त्या प्रदेशांत इ. स. १७९२ त दाट अरण्य असून त्यांतून शत्रूचा शिरकाव होणें कठीण होतें. आंत शिरण्यास चार पांच ठिकाणीं घाटांतून वाट होती. पण त्या घाटांत योग्य बंदोबस्त केल्यास मूठभर शिपायांस सबंध लष्करास अडवून धरतां येण्याची सोय होती. त्या बिकट वाटेवर ड्यूमारीझनें आपलें सैन्य नेऊन घाटाचा बंदोबस्त केला. अर्गानच्या घाटाची आपण थेर्मापली प्रमाणें बंदोबस्ती केली आहे असें तो ऐटीनें म्हणत असे. पण त्यावर थर्मापलीचा दाखला पूर्णपणें लागू पडण्याचाच प्रसंग आला होता.

घाटांतील एक वाट क्षुल्लक समजून तिचा त्यानें बंदोबस्त केला नव्हता. आस्ट्रियन सैन्यानें त्याच कमजोर जागीं मारा करून ती वाट सर केली आणि तें सैन्य घाट चढून वर आलें. याप्रमाणें ड्यूमारीझचा बेत फसून शत्रूनेंच त्यास घेरलें. पण त्यांतून तो मोठ्या चलाखीनें निसटून गेला. आतां ड्यूमारीझ जर परत फिरता तर त्याला आश्रयाची जागा मुळींच न राहून, जर्मन सैन्यानें थेट पारीसपर्यंत त्याचा पाठलाग केला असता आणि पारिसच्या किल्लयाखालीं त्याच्या सैन्याची धुळधाण उडून फ्रेंच प्रजासत्ताक राज्याची इतिश्री झाली असती. म्हणून तो परत न फिरतां दक्षिणेकडे वळला आणि सेंट मेनेहोल्डच्या बळकट ठाण्याला येऊन पोहोंचला. येथून वायव्येस डॅम्पीरची छावणी म्हणून एक मान्याची जागा होती. येथून चॅलॉन्सवरून पारीसला जाणारा रस्ता रोखतां येत होता. या डॅम्पीरच्या टेकडीवर केलरमनच्या सैन्यास छावणी देण्याला त्यानें हुकूम केला.

केलरमन आपल्या डॅम्पीच्या छावणींत दाखल झाला तोंच बातमी आली कीं सर्व जर्मन सैन्य अर्गान घाट चढून आलें आणि ड्यूमारीझ व केलरमनच्या छावणीच्या नैऋत्य बाजूचे लाब्यून नामक टेकडीवर लढाईचे तयारीनें शिस्तीनें उभें रहात आहे अशी बातमी पोहोचली. यावेळीं शत्रूचें सैन्य फ्रेंच सैन्याचे पश्चिमेस पारिसच्या बाजूस होतें. परंतु ड्यूमारीझची एवढी मोठी फौज आपल्या पाठीमागें तशीच टाकून पारीसवर चाल केल्यास आपला युद्धभूमीचे पायाशीं संबंध तुटेल अशी ब्रन्सविकला भीति होती. याकरितां त्या सैन्याचा मोड करूनच मग पारीसकडे मोर्चा वळवावा हें त्यास युक्त वाटलें.

ड्यूमारीझनें केलरमनला जी छावणीची जागा योजिली होती, ती सोडून तो निष्कारण आबेनदी ओलांडून व्हामीच्या पटांगणांपर्यंत वाढून

गेला. त्यामुळें तो शत्रूच्या अगदीं जवळ जाऊन भिडला ह्मणून त्याजवरच प्रथम हल्ला करण्याची ब्रन्सविकला सल्ला मिळाली. व्हामींचें पटांगण उघडें असल्यानें डॅम्पीर छावणीप्रमाणें सैन्याच्या हालचालीस तें सुरक्षित नव्हतें. यास्तव ड्यूमारीझ मदतीस येण्यापूर्वीच एकट्या केलरमनला गांठून त्याचा फडशा पाडावा व नंतर फुरसतीप्रमाणें ड्यूमारीझवर हल्ला करावा असा शत्रूनें कावा योजिला.

ठरल्याप्रमाणें ता. २०सप्टंबर रोजीं उषःकाळीं तोंडास तोंड दिसतें न दिसतें तोंच जर्मन सैन्याची उजवी बाजू केलरमनच्या डाव्या बाजूवर व पिछाडीवर चालून आली. बाकीच्या सैन्यानें त्याच्या उजव्या बाजूवर रोंख धरला. या सैन्यानें ड्यूमारीझचा केलरमनशीं असलेला संबंध तोडून टाकण्याचा प्रयत्न केला. सारांश केलरमनचें सैन्य शत्रुसैन्यांत पाचर ठोकल्याप्रमाणें सांपडलें. ड्यूमारीझला केलरमनवर ओढवणाऱ्या संकटाची पूर्वीच कल्पना झाली असल्यानें, त्याच्या पाठपुराव्याकरितां सैन्याची रवानगी करण्याची तरतूद त्यानें करून ठेविली होती. पण हें सैन्य अवघड प्रदेशांतून आस्ते आस्ते चाललें होतें. त्या दिवशीं धुकें फार पडलें असल्यानें सकाळचे दहा वाजेपर्यंत डोंगरावरून खालील पटांगणांतील किंवा दऱ्याखोऱ्यांतील कांहींएक देखावा दिसत नव्हता. दहा वाजल्यानंतर धुकें वितळून गेलें व केलरमनला आपल्या डाव्या उजव्या बाजूस प्रशियन व आस्ट्रियन सैन्याची वावटळ येत असल्याचें दिसून आलें. तो शत्रूचा अफाट सेनासागर पाहून, आपण आपली जागा सोडल्यास आपल्या सैन्यास जलसमाधि मिळेल असें केलरमनला कळून चुकलें.

मनुष्य कितीही निधड्या छातीचा असो, त्याची त्यावेळीं फ्रेंच सैन्याचे सुरक्षितेबद्दल निराशाच झाली असती. सरदार कितीही धाडसी

असला तरी, त्यास जर आपल्या हाताखालील सैन्याचे शौर्याची व दृढ-निश्चयाची खात्री नसेल तर तो अशा प्रसंगीं भांबावून गेलाच पाहिजे. आपण नेटानें पुढें चालून जावें आणि आपल्या फौजेनें आपणांस एकटें सोडून मागच्या मार्गेच पोबारा करावा. अशावेळीं निकारण शत्रूच्या तावडींत सांपडावें, किंवा लाजलज्जा सर्व गुंडाळून ठेवून सैन्य पळेल तिकडे आपणही पळावें, याखेरीज सेनापतीस तिसरा मार्गच रहात नाहीं. केलरमनची स्थिति या वेळीं अशीच होती. आपल्या सैन्यास कोणत्या वेळीं धडकी भरेल आणि तें मागच्या मार्गे पळून जाईल याचा भरंवसा नव्हता. यःकश्चित् शत्रूशीं गांठ पडली असतांही त्याच्या सैन्यानें तत्पूर्वी बरेच वेळां ' यः पलायति ' चा मार्ग स्वीकारला होता. मग आज तर करोल प्रशियन व आस्ट्रियन सैन्याशीं प्रसंग होता. यास्तव तो क्षणोक्षणीं मागें वळून पहात असे आणि फौजेंत थोडीशी चलबिचल दिसतांच आतां पलायनास प्रारंभ होणार असें त्यास वाटे.

परंतु त्या दिवशीं फ्रेंच लोकसत्ताक राज्यपद्धतीचें नशीब जोरावर दिसलें. फ्रेंच सैन्यानें आपल्या मित्रांचा व शत्रूंचा तर्क खोटा पाडला. लाबूनच्या टेकडीवरून जर्मन तोफांचा भडिमार सुरूं झाला. तथापि फ्रेंज शिपायांनीं आपली जागा नेटानें तशीच राखिली. फ्रेंच तोफा शत्रूस प्रत्युत्तर देऊं लागल्या. शत्रूसैन्याच्या रांगा दाट असल्यानें तोफांच्या मारानें त्यांचें फार नुकसान झालें. त्यावेळीं प्रशियन तोफांचें काम मंदावलें. तें पाहून केलरमननें एक पथक तयार केलें व त्यासह खालील पटांगणांत चालून जाऊन शत्रूच्या कांहीं तोफा हस्तगत करण्याचा त्यानें प्रयत्न केला. त्यावेळीं प्रशियन सैन्यांतील एका गुप्त तोफखान्यांतून त्याजवर एकदम मारा चालू झाला. तेव्हां ती फ्रेंच टोळी विस्कळित होऊन परत फिरली. केलरमनचा घोडा तोफेच्या

गोळ्यानें ठार झाला व केलरमनला त्याचे लोकांनीं उचलून परत छावणींत नेलें. नंतर प्रशियन सैन्य पुढें चाल करून आलें तें नजीक येतांच फ्रेंच गोलंदाजांचा धीर खचला व ते आपल्या जागा सोडून पळूं लागले. पण त्यांच्यावरील अम्मलदार शूर होते. त्यांनीं शब्दांनीं व कृतीनें त्यांस धीर दिला. इकडे केलरमन सावध होऊन पायदळाच्या अग्रभागीं उभा राहिला. त्यानें आपल्या पलटणीस हुकूम केला कीं, 'शत्रु अगदीं नजीक येऊन भिडेपर्यंत त्याजवर मारा करूं नका. मग एकदम संगिनीचा मारा सुरू करा.' आपल्या सेनापतीची उमेद पाहून फ्रेंच सैन्यासही स्फुरण चढलें व त्यांनीं 'फ्रेंच राष्ट्राचा जयजयकार असो' अशा आरोळ्यांनीं आकाशपाताळ दणाणून सोडलें. शत्रूचा असा कृतनिश्चय पाहून प्रशियन सैन्याचे हातपाय लटपटूं लागले. त्यांत त्यांना टेंकडीवर चढून जाऊन हल्ला करावयाचा ह्मणजे दुष्पट कठीण. तेव्हां अशा करारी बाण्यानें जीवावर उदार झालेल्या शत्रूच्या अंगावर चालून जाण्याचें त्यास धैर्य होईना ह्मणून तें लागलीच परत फिरलें.

फ्रेंचांच्या भुरट्या सैन्यास आपल्या फौजेनें पाठ दाखविली हें पाहून प्रशियाचे राजास त्वेष चढला. त्यानें छावणींतील निवडक शिलकी सैन्य आपल्याबरोबर घेतलें, त्या पिछेहाट करणाऱ्या पलटणीस आपल्या झेंड्यास व अब्रूस कलंक लावल्याबद्दल दोष दिला, आणि त्यास फिरून हल्ला करण्यास हुकूम दिला. याप्रमाणें तो आपल्या सैन्यासह हा शत्रूवर चढाव करून जात असतां फ्रेंच तोफांच्या मारानें आपले बहुतेक अधिकारी पटापट मरून पडलेले पाहून त्याचा धीर खचला. इकडे केलरमनच्या सैन्यास आतां डयूमारीझकडून कुमक येऊन पोंहोचली होती व पूर्वीचा एक हल्ला परतविला असल्यानें त्यास

दुष्पट आवेश आला होता म्हणून तें आपली जागा ठाम धरून राहिलें. प्रशियन सैन्याचा दुसरा हल्लाही त्यांनीं परतविला. या हल्ल्याचे वेळीं त्यांचे आठशें शिपाई रणांगणीं पतन पावले. सायंकाळपर्यंत याप्रमाणें नेटाची लढाई होऊन प्रशियन व अस्ट्रियन सैन्यानें माघार घेतली, आणि फ्रेंच लोकसत्ताक राज्याचे सैन्यास लोकसत्ताक राज्यपद्धतीचे प्राण-प्रतिष्ठेचे दिवशींच मोठा विजय प्राप्त झाला.

पारीसला वऱ्हाड्यांप्रमाणें थाटांत चालून जाण्याचें सर्व मनोराज्य पार ढासळून गेलें. राज्यक्रांतीचा जोर दुणावला. फ्रान्सला आपल्या अंगीं राक्षसी बळ आहे असें कळून आलें आणि त्या राष्ट्रानें पुढें त्या बलाचा राक्षसाप्रमाणेंच उपयोग केला. या पराजयानंतर कांहीं दिवस ब्रन्सविक्चें सैन्य अर्गानच्या आसपास राहिलें होतें. पण त्या फौजेंत आजारानें कहर उसळून दिला, आणि त्यास चंदी चाऱ्याचीही तूट पडूं लागली. तेव्हां तें सैन्य परत प्रशियाला निघालें. जें सैन्य पूर्वी एवढ्या दिमाखानें फ्रान्सवर चाल करून आलें होतें त्याचा एकदशांशसुद्धां सुरक्षितपणें आपल्या देशाला पोंचला नाहीं. या जयामुळें फ्रेंच लोकसत्ताक राज्याचा जिकडे तिकडे दरारा बसला. एक वर्षाचे आंतच बेल्जियम देश फ्रान्सचे अंकित झाला, आणि युरोप खंडांतील सर्व राजे लोकसत्तात्मक राज्यपद्धतीच्या भीतीनें लटलटा कापूं लागले.

या स्वारींत प्रशियन सैन्याबरोबर जर्मन कवि 'गेटी' केवळ जिज्ञासेनें आला होता. प्रशियन सैन्याचा पराजय होऊन हिरमुसल्या तोंडानें तें परत छावणींत आलें, त्यावेळीं सर्वांचीं तोंडें काळीं ठिक्कर पडलीं असून त्याजवर प्रेतकळा आल्याप्रमाणें भास होत होता. कोणीहि तोंडांतून एक चकारशब्द काढीना. सर्वांची मति कुंठित होऊन गेली. हें आज झालें काय आणि पुढें याचा परिणाम होणार तरी काय याची कोणासच

कल्पना होईना. सैन्यांतील लोक नाउमेद झाले म्हणजे गेटी त्यांस आपल्या चटकदार भाषणानें व उपदेशपर शब्दांनीं रंजवीत असे. तेव्हां या प्रसंगींही आपली खिन्नता घालविण्याकरितां त्यांनीं त्यास बोलावून आजच्या प्रसंगाविषयीं तुझें काय अनुमान आहे असें त्यास विचारिलें. तेव्हां गेटी उत्तरला "या रणभूमीवरील फ्रेंचांच्या विजयानें जगाच्या इतिहासांत मोठें संक्रमण होईल, आणि त्या संक्रमणाचे पर्वकालीं व पर्वस्थलीं आह्मी हजर होतों असें तुह्मां सर्वांस म्हणतां येईल". गेटीनें भाकित केल्याप्रमाणें ही नवी संक्रांत पुढें युरोपला कशी भोंवली हें इतिहासज्ञांस विदितच आहे.

जगांतील क्रांतिकारक लढाया:

भाग १५ वा.

वाटर्लूची लढाई इ. स. १८१५.

इ. स. १७९२ त व्हामीच्या लढाईत विजय संपादन केल्यावर फ्रेंच प्रजासत्ताक राज्यानें एक जाहिरनामा काढून युरोपखंडांतील सर्व प्रजेस असें कळविलें कीं, 'जुलमी राजांचे अंमलास कंटाळून जाऊन त्याविरुद्ध बंड करण्याचें आणि प्रजासत्ताक राज्य स्थापण्याचें ज्या लोकांचे मनांत असेल त्यांस फ्रेंच सैनिक साहाय्य करण्यास तयार आहेत.' अशा प्रकारचा जाहिरनामा ह्मणजे एकसत्ताक राज्यपद्धती-विरुद्ध बंड करण्यास चेतविणेंच होय. या जाहिरनाम्यामुळेंच इंग्लंड, आस्ट्रिया, प्रशिया इत्यादि देश फ्रान्सविरुद्ध खवळून गेले, आणि उद्दाम फ्रेंच लोकांची खोड मोडण्यास त्यांनीं कंबर बांधिली. यावेळीं फ्रान्स देशास नेपोलियन बोनापार्टासारखा सेनानी लाधला नसता तर त्या देशाची त्रेधा त्रेधा होऊन गेली असती. परंतु नेपोलियनच्या अचाट बुद्धिवैभवानें आणि अतर्क्य युद्धपाटवामुळें फ्रान्सचा बचाव झाला एवढेंच नव्हे तर त्याचा इतर सर्व देशांवर वचक बसला. नेपोलियनची सत्ता वाढतां वाढतां तो इंग्लंड आणि रशिया खेरीज-करून युरोपखंडांतील बहुतेक सर्व देशांचा सत्ताधीश झाला. नेपोलि-यनचें प्राबल्य युरोपच्या स्वास्थ्यास प्रतिबंधक वाटल्यानें युरोपियन

राष्ट्रांनीं एक जूट करून नेपोलियनचा लिप्झिक येथें पराजय केला; आणि त्यास एल्बा बेटांत अज्ञातवासांत पाठवून, युरोपची पूर्वीच्या धर्तीवरच पुनर्रचना करण्याच्या उद्देशानें सर्व राष्ट्रांचे प्रतिनिधि व्हिएन्ना शहरीं जमले.

या सभासदांचे, शांततेच्या स्थापनेप्रीत्यर्थ सुरू केलेले आनंदोत्सव अद्याप संपले नव्हते व त्यांच्या राजकीय उलाढाली पुऱ्या झाल्या नव्हत्या. इतक्यांत ता० ११ मार्च इ० स० १८१५ रोजीं फ्रान्सचा प्रतिनिधि टॅलीरँड यानें त्या सभासदांस 'नेपोलियन एल्बा बेटांतून निसटून फ्रान्सच्या किनाऱ्यावर उतरल्याचें' वर्तमान कळविलें. त्यावेळीं ती बातमी ऐकतांच सर्व प्रतिनिधींस एकदम हसूं कोसळलें; पण लवकरच त्यांच्या लक्षांत आलें कीं, ही गोष्ट आपणास हंसविणारी नव्हे, रडविणारी आहे. तत्क्षणींच आपल्या बलिष्ठ शत्रूची खोड मोडण्याकरितां काय तजवीज करावी या विचारांत ते गर्क झाले. इकडे नेपोलियन कांत टाकून दिलेल्या सर्पाप्रमाणें ताजातवाना होऊन सर्व युरोपशीं झुंजण्यास तयार झाला. आपल्या विरुद्ध सर्व राष्ट्रें पूर्वीप्रमाणेंच जूट करतील ती फोडून टाकावी या उद्देशानें एक एका राष्ट्राकडे वेगवेगळें संधान बांधण्याचा त्यानें प्रयत्न केला. त्यास आस्ट्रिया आणि रशियाची अनुकूलता होती. कारण जिंकलेल्या मुलुखाच्या वांटणीसंबंधीं सर्व राष्ट्रांत एकमत नव्हतें. ह्मणून इ० स० १७९३ व ९४ त त्यांची जी गट्टी जमली होती ती पुढें विसकटत चालली; परंतु त्या समेंत अठराव्या लुईच्या तर्फे टॅलीरँड हा फ्रेंच मुत्सद्दी होता. त्यानें विश्वप्रयत्न करून ती जूट कायम राखिली.

या व्हिएन्नाच्या कांग्रेसमध्यें बरीच भवति नभवति होऊन मार्च १५ व्या तारखेस आस्ट्रिया, स्पेन, इंग्लंड, पोर्तुगाल, प्रशिया, रशिया,

आणि स्वीडन या सात राष्ट्रांच्या प्रधानमंडळानें एक जाहिरनामा काढिला. त्यांत नेपोलियननें पूर्वीचे करारमदार मोडल्यामुळें त्यास कायद्याचे संरक्षणांतून बहिष्कृत केलें; आणि त्याला फ्रान्सचे गादीवरून हाकून लावून, इतःपर त्याजकडून युरोपच्या शांततेचा भंग होणार नाहीं, अशी कायमची तजवीज करण्याविषयीं सर्व राष्ट्रांचें वचनप्रमाण झाल्याचें जाहीर केलें. त्या सभेंत इंग्लिश प्रतिनिधि ड्यूक ऑफ वेलिंग्टन होता. फ्रान्सवर स्वारी करण्याविषयीं बेत ठरवून त्याचा त्या बाबतींत तत्काळ अभिप्राय विचारण्यांत आला. लढाईचें तोंड बेल्जियममध्यें लागणार हें उघड होतें; याकरितां वेलिंग्टनची सर्वांच्या संमतीनें तिकडे प्रथम रवानगी झाली. डच, बेल्जियम, हॅनोव्हेरियन इत्यादि प्रांतांतील शक्य तितकें सैन्य उभारून, त्यांत इंग्लंडच्या प्रधानमंडळानें तांतडीनें रवाना केलेल्या सैन्याची भर घालून, नेपोलियनचे तोंडावर त्यानें रहावें असें ठरलें. प्रशियन सैन्याची एक तुकडी एक्सलाशॅपेल येथें तळ देऊन होती. तिच्या कुमकेस दुसऱ्या प्रशियन सैन्याची भर घालून त्या सर्व फौजेवर प्रशियन शिपायांच्या नाकांतील केवळ बाल असा सरदार ब्लुचर याची योजना झाली. याप्रमाणें इंग्लंड व प्रशिया या दोन राष्ट्रांची सैन्यें आघाडीस रवाना झालीं. याखेरीज १,३०,००० आस्ट्रियन, १,२४,००० प्रशियन, १,६८,००० रशियन सैन्याची लवकरच भरती व्हावयाची होती. याप्रमाणें युरोपियन राष्ट्रांनीं नेपोलियनच्या प्रतिकारार्थ भगीरथ प्रयत्न केले.

इ० स० १८१३ व १४ च्या मोहिमांत फ्रेंच सैन्याची अति नासाडी झाली होती. पुढें बुर्बोन घराण्याची पुनश्च स्थापना झाल्यापासून सैन्याचें कारण न पडल्यानें तें संख्येनें कमी आणि अव्यवस्थित

होऊन गेलें होतें. याजमुळें नेपोलियननें सैन्य जमविण्यांत आणि त्याची सरहद्दीवर टाकोटाक रवानगी करण्यांत जें कौशल्य दाखाविलें तें अवर्णनीय होय. ता० २० मार्चला त्यानें पारिसमध्यें पाय ठेविला. व्हेन्डी प्रांतांतील राजपक्षीयांचे बंडाचा बीमोड करण्यास, आणि फ्रान्सच्या दक्षिण सरहद्दीचे संरक्षणार्थ मॅसेना यांच्या हाताखालीं बरेंचसें सैन्य ठेवून, शिवाय मे अखेरच्या आंत फ्रान्सच्या ईशान्य भागांत स्वतःच्या देखरेखीखालीं लढण्याकरितां त्यानें सव्वा लाख फौज जमा केली. या फौजेंतील शिपायांचा जामानिमा, हत्यारें, शिस्त, कवाईत, कार्यक्षमता, सर्व कांहीं सर्वोत्कृष्ट होतीं, त्याबरोबरच तोफखानाही उत्तम होता.

रशिया, आस्ट्रिया, बव्हेरिया, वगैरे देशांतील सैनिकांस व्हाइन नदीचे तीरीं येऊन पोंहोचण्यास अर्थात् बराच काळ लागणार. तत्पूर्वीच फ्रान्सचे हाडवैरी इंग्लिश व प्रशियन यांनीं, बेल्जिअम देश, नेपोलियनचे सैन्याची जमवाजमव होण्याचे आंतच व्यापून सोडला होता. ब्लुचरचे हाताखालीं १,१६,००० आणि ड्यूक ऑफ् वेलिंग्टनच्या हुकमतींत ब्रिटिश खडी फौज १,०६,००० मे अखेर जमली होती. रशिअन किंवा आस्ट्रियन लोक मदतीस येण्याचे आंतच या सैन्यावर पृथक् पृथक् हल्ला करून त्याचा मोड करण्याचा नेपोलियननें निश्चय केला. आपली फौज संख्येनें फारच कमी हें त्यास दिसत होतें. पण विलंब केल्यानें शत्रूचें बळ वाढत जाणार हें तो जाणून होता. शिवाय शत्रूच्या दोन सरदारांच्या हाताखालीं दोन ठिकाणीं छावण्या. त्यांत भिन्न राष्ट्रांचे केवळ भाडोत्री शिपाई. आपलें सर्व सैन्य स्वतःचे खास नजरेखालीं देशकार्यार्थ लढणार. त्यांतील सर्व शिपाई कसलेले, अम्मलदार अनुभविक, आणि शिपायांचा व अधिकाऱ्यांचा परस्परांच्या

कर्तबगारीवर विश्वास. यास्तव ब्रिटिश व प्रशियन्स यांच्या फौजा एकत्र होण्यापूर्वी एकेकट्या फौजेवर हल्ला करण्यास संधि सांपडली कीं पुरे. जय हा हमखास ठेवलेलाच. या दोन चिकट राष्ट्रांची खोड मोडली कीं काम झालें. बाकीच्या पूर्व सरहद्दीवर जमणाऱ्या बाजार-बुणग्यांस उडवून देण्याचें काम हां हां म्हणतां साधतां येईल. याप्रमाणें नेपोलियनचे अंतःस्थ विचार चालले होते.

फ्रान्स व बेल्जिअमच्या दरम्यान डोंगरांची तिहेरी रांग असल्यानें त्याचे आड शत्रूला न कळत आपल्या सैनेची जमवाजमव करण्यास आणि आपला हल्ला कोठें होणार हें कळूं न देण्यास फार सोईचें आहे. उलट पक्षीं वेलिंग्टन व ब्लुचर यांस नेपोलियनवर देखरेख ठेवण्याकरितां, आणि डोंगराच्या रांगेंतून कोठूनही बाहेर पडल्यास त्यास अडविण्या-करितां, उघड्या मैदानांत अंतराअंतरावर छावण्या कराव्या लागल्या. ब्लुचरचें सैन्य सांबर व म्यूज नद्यांचे कांठीं लीजपासून चार्लेरॉय-पर्यंत पसरलें होतें. वेलिंग्टननें ब्रूसेल्स शहर पाठीशीं घालून तळ दिला होता. त्याची उजवी बाजू टूर्ने येथें असून डावी बाजू चार्ले-राय गांवास येऊन भिडली होती. तेथून त्यास दळणवळण ठेवतां येत होतें. याकरितांच या उभय दलांस विभक्त करण्याकरितां चार्ले-रॉयवर हल्ला करण्याचा त्यांचा बेत ठरला. एकदां दोहों सैन्यांमधील दळणवळण बंद झालें म्हणजे आपली आवडती शक्कल योजून संधि साधून एकेकाचा फडशा पाडावयाचा या त्याच्या बेतास अनुसरून जूनच्या प्रारंभीं फ्रेंच सैन्य सरहद्दीवर जमूं लागलें. नेपोलियननेंही सर्व जुळवाजुळव इतक्या जलद व बिनचूक केली कीं ती पाहून सर्व सैन्यास त्याच्या बुद्धीचें आश्चर्य वाटलें. आपलें एकवटलेलें बळ पाहून त्यास फत्ते मिळवूं अशी उमेद आली. त्यांत ता० १४ जून

रोजीं नेपोलियन स्वतः सैन्यांत येऊन दाखल झाला. तेव्हां तर त्यांच्या आनंदास पारावार नाहींसा झाला.

याप्रसंगीं नेपोलियननें सैनिकांस उद्देशून एक जाहिरनामा काढला. त्यायोगानें त्यांचा आवेश दुणावला. तो जाहिरनामा पुढील आशयाचा होताः—

"सैनिकहो, आज मॅरेंगो व फ्रीडलंडच्या जयाचा वाढदिवस आहे. आस्टर्लिटझ, वॅग्रॅम इत्यादि जयानंतर आह्मी शत्रूस फाजील उदारपणानें वागविलें. ज्या राजांना मेहरनजर करून आह्मी गादीवर राहूं दिलें, ज्यांच्या वचनांवर आह्मी विश्वास ठेविला, तेच राजे एकत्र जमून फ्रान्सचें स्वातंत्र्य व पवित्र जन्मसिद्ध हक्क पायाखालीं तुडविण्याकरितां आले आहेत. त्यांचें हें कृत्य केवळ अन्यायाची आगळीक आहे. करितां चला; त्यांचेवर तुटून पडा आणि त्यांचा समाचार घ्या.

वीर हो, जेन्नाचे लढाईत हेच प्रशियन तुमच्या तिप्पट, आणि माँटमिरेल येथें सहापट नव्हते काय? तरी तुह्मीं बहादरांनीं त्यांस धूळ चारिली. पण तेच प्रशियन्स आतां फार शेफारून गेले आहेत. इंग्लिशांचे हातीं कैद भोगण्याचा ज्यांस दुर्दैवानें प्रसंग आला त्यांस त्यांची भयंकर वागणूक ठाऊकच आहे.

राजे लोक हे न्यायाचे व प्रजेच्या हक्कांचे शत्रू होत. अशांच्या हुकुमानें नाइलाजास्तव शस्त्र घेण्याचा प्रसंग आला ह्मणून सॅक्सन्स, बेल्जियन्स, हॅनोव्हेरियन्स हे कपाळ बडवीत आहेत. ज्या राष्ट्रांची तुमच्या विरुद्ध जूट झाली आहे त्यांची तृष्णा अनावर आहे. यांनीं १,२०,००,००० एक कोट वीस लक्ष पोल्स, तितकेच इटालियन्स, १०,००,००० दहा लक्ष सॅक्सन्स, ६०,००,००० साठ लक्ष बेल्जियन्स,

यांच्या स्वातंत्र्याचा अपहार केला आहे; आणि आतां फ्रान्सच्या स्वतंत्रतेची राखरांगोळी करण्यास हे टपले आहेत.

हे शुद्ध वेडेपीर आहेत. कुठें एकदां चुकून त्यांस जय मिळाला, तेवढ्यानेंच ते चढून गेले आहेत; परंतु फ्रेंचांना पादाक्रांत करणें आणि त्यांस दास बनविणें हें अशक्य आहे हें त्यांच्या लक्षांत येत नाहीं. फ्रान्सच्या हद्दींत पाऊल ठेवणें म्हणजे थडग्यांत पाऊल ठेवण्यासारखेंच आहे.

मर्दहो, तुम्हांस तांतडीनें कूच करावें लागेल, संकटें सोसावीं लागतील, लढाया लढाव्या लागतील; पण धीर सोडूं नका, म्हणजे जयश्री तुम्हांस वरील; आणि फ्रान्स देशाची कीर्ति, अब्रू व हक्क यांचें संरक्षण होईल. ज्यांच्या ज्यांच्या म्हणून अंतःकरणांत स्वदेशाभिमानाची ज्योत पेटली आहे, त्यांनीं मर्दाप्रमाणें लढाईत पडावें किंवा जयश्री संपादन करावी. अशी ही संधि आली आहे. "

ता० १५ जूनचा दिवस उजाडला नाहीं तोंच, फ्रेंच सैन्य तीन टोळ्यांनीं चार्लेरॉयवर चालून गेलें. ब्रुसेल्स शहर हस्तगत करण्याचा नेपोलियनचा उद्देश होता. त्या शहरचा रस्ता चार्लेरायवरूनच होता. ब्रुसेल्स शहर नेपोलियनच्या स्वाधीन झाल्यास या प्रथमच्या जयानें त्याचें पारडें जड होईल, आणि बेल्जियमचा बराच भाग फ्रेंचाचे बाजूस वळून, संयुक्त राष्ट्रांचे कटांत फूट पडेल, अशी भीति वाटत होती. याकरितां कसेंही करून ब्रुसेल्सचा बचाव करावा असा ब्लुचर आणि वेलिंग्टन यांचा विचार ठाम ठरला होता. फ्रेंच सैन्य चार्लेरायवरून येणार, हें आतां बहुतेक निश्चित झाल्याप्रमाणेंच होतें. तथापि मान्स व हॅलच्या रस्त्यानें दुसरी एकादी सैन्याची तुकडी ब्रुसेल्सवर

चाल करून येत नाहीं अशी खात्री होईपर्यंत सर्व सैन्य क्वेटरब्रास येथें आणविणें धोक्याचें होतें.

नेपोलियननें आपल्या सैन्याच्या तीन तुकड्या केल्या. डाव्या टोळीनें प्रशियन सरदार झीथन यास थुईन येथून मागें हटविलें. मध्य-भागानें चार्लेरायवरून फ्लूरसपर्यंत चाल केली, आणि उजवी तुकडी चॅटेलेटच्या पुलापावेतों जाऊन भिडली. ता. १६ रोजीं जातिनिशीं सर्व जर्मन सैन्यावर चालून जाण्याचा त्यानें निश्चय केला. इंग्लिश सैन्य जर्मन फौजेच्या मदतीस येऊं लागेल त्यास अडविण्याकरितां त्यानें मार्शलने याची योजना केली; आणि त्यास गॉसेलीज, फ्रेस्ने, क्वेटरब्रास, जिनॅप्पीआ व वाटर्लू गांवावरून ब्रुसेलवर चढाव करून जाण्यास फर्माविलें. मार्शलने यानें हुकुमाप्रमाणें गॉसेलीज व फ्रेस्ने येथून बेल्जियन फौजेस हांकून लावून क्वेटरब्रासवर चाल केली. पण फ्रेंच सैन्य सकाळपासून लढून लढून थकून गेल्यानें आणि रात्र फार झाल्यामुळें त्याच तडाक्यासरशीं क्वेटरब्रासचें महत्त्वाचें ठाणें सर करितां आलें नाहीं. मार्शलने यानें ता. १६ रोजीं क्वेटरब्रासवर आणि नेपोलिय-ननें त्याच तारखेस दोनप्रहरापूर्वी लिग्नीवर हल्ला न केल्याबद्दल कित्येक टीकाकार त्यांस दोष देतात. परंतु सैन्यांतील शिपाई हे कांहीं लाक-डाचीं बाहुलीं नव्हत. तीं हाडामासाचीं माणसेंच होत. त्यांस तहान-भूक, श्रम यांची बाधा होते आणि विश्रांतीचीही त्यास अवश्यकता आहे ही गोष्ट ते टीकाकार मुळींच विसरून जातात.

डचेस ऑफ रिचमंडच्या घरच्या नाचाहून वेलिंग्टन पहाटे तीन वाजतां निघाला तो सुमारें अकरा वाजतां क्वेटरब्रासच्या छावणींत दाखल झाला. अद्यापि फ्रेंच सैन्य फ्रेस्ने येथें स्तब्धच होतें. त्यावरून त्यानें अनुमान केलें कीं, नेपोलियनचा सर्व रोख ब्लुचरवरच असून

इंग्लिश सैन्याचे तोंडावर उगाच एकादें लहानसें सैन्य ठेविलेलें आहे. इकडे लिग्नी येथें ब्लुचर ८० हजार सैन्यासह नेपोलियनशीं दोन हात करण्याकरितां सज्ज होता. त्यानें वेलिंग्टनकडे आपणास मदत पाठविण्याविषयीं मागणी केली. वेलिंग्टननें निरोप धाडिला कीं, माझ्या केटरब्रासच्या छावणीवर फ्रेंचांचा हल्ला न होईल तर माझें सैन्य लिग्नीकडे तुमच्या कुमकेस येईल; पण इतक्यांत चाळीस हजार फौजेनिशीं मार्शल ने यानें इंग्लिश ठाण्यावर हल्ला केला. तेथें ब्रिटिश सैन्य केवळ हजार पायदळ, दोन हजार स्वार, आणि अडतीस तोफा इतकेंच होतें. यामुळें ब्लुचरला मदत करणें दूरच राहिलें; आपल्या सैन्याचा बचाव करतां करतांच वेलिंग्टनला पुरें होऊन गेलें. प्रारंभीं ब्रिटिश सैन्य थोडें असल्यानें फ्रेंचांची सरशी झाली; पण सायंकाळचे सुमारास ब्रिटिश सैन्य जमत चाललें तसतशी फ्रेंचांची पिच्छेहाट होऊं लागली.

मार्शलने व वेलिंग्टन यांचे याप्रमाणें डावपेंच चालू असतां, इकडे त्याचवेळीं ब्लुचर आणि नेपोलियन यांचें घनघोर युद्ध चालू होतें. ब्लुचरचे हाताखालीं ऐशीं हजार सैन्य आणि २२४ तोफा होत्या. शिवाय ब्यूलोचे हाताखालीं पंचवीस हजारांचें एक पथक होतें. परंतु निरोप पोंचविण्यांत काहीं चूक झाल्यामुळें तो ब्लुचरच्या साहाय्यास येऊं शकला नाहीं. वेलिंग्टनच्या बाजूस लढाईच चालू असल्यानें त्यासही ब्लुचरचा पाठपुरावा करितां आला नाहीं. तथापि त्यानें चाळीस हजार फ्रेंच सैन्य गुंतवून ठेवल्यामुळें ब्लुचरचा बराच बचाव झाला. नाहींतर त्याजवर त्यादिवशीं कठिण प्रसंग ओढवला असता. नेपोलियनकडे आपल्या प्रतिपक्षापेक्षां १२ हजार शिपाई कमती होते. तथापि पांच तास घनचक्कर लढाई देऊन त्यानें ब्लुचरच्या सैन्याची फळी फोडली,

आणि शत्रूला रणमैदानांतून पार घालवून दिलें. याप्रमाणें केवळ नेपोलियनच्या युद्धकौशल्यामुळें त्यास हा जय मिळाला. प्राशियन सैन्याचा मोड झाला तथापि त्याचे शिस्तींत, धैर्यांत, अगर आवेशांत रतिमात्र उणीव भासली नाहीं. ता. १६रोजीं रात्रौ व ता. १७रोजीं सकाळीं तें सैन्य व्यवस्थेनें मागें हटलें, आणि वेलिंग्टनशीं आपलें दळणवळण तुटूं देऊं नये ह्मणून वेव्हरनदीकडे चाललें.

इंग्लिशांचें सगळें सैन्य यावेळीं क्वेटरब्रासला येऊन पोंहोचलें होतें. पण ब्लुचरचा लिग्नी येथें पराजय झाल्याचें कळतांच आपलें सैन्य मागें हटवीत नेणें वेलिंग्टनला अवश्यक वाटलें; कारण विजयी नेपोलियन आतां आपल्या सर्व फौजेसह आपणावर चालून येणार. त्याप्रमाणें त्यानें आपल्या शिपायांस परत फिरण्याचा हुकूम दिला. इतक्यांत ब्लुचरकडून निरोप आला कीं, 'माझे सैन्याची ह्मणण्यासारखी हानि झाली नाहीं. शिपायांचा दम पूर्वीप्रमाणेंच आहे. ब्यूलोचे हाताखालील २५ हजारांचें पथक तर ताजेंतवानेंच आहे. माझा तळ नेव्हर नदीतीरीं आहे.' ही बातमी येतांच वेलिंग्टनला उमेद येऊन त्यानें उलट निरोप पाठविला कीं, 'मी उद्यईक परत फिरून मांटसेंटजीन येथें फ्रेंचांशीं लढाई देतों; मात्र माझे मदतीस २५००० हजार सैन्यासह तुह्मी स्वतः यावें.' ब्लुचरनें त्याप्रमाणें येण्याचें वचन दिलें, तेव्हां वेलिंग्टननें क्वेटरब्रास आणि ब्रुसेल्स यांच्या दरम्यान वाटर्लु येथें आपल्या सैन्याची लढाईकरितां मांडणी केली.

यावेळीं वेलिंग्टन व ब्लुचर यांचे दरम्यान अंतर बारा मैल होतें. प्राशियन सैन्य आतां सुव्यवस्थित व ताजेंतवानें झालें असून शिवाय ब्यूलोच्या कोऱ्या करकरीत सैन्याची त्यास जोड मिळाली होती. ह्मणून ब्लुचरनें वेलिंग्टनला कळविलें कीं, 'मी ता. १८ रोजीं सर्व सैन्यासह

तुमच्या मदतीस येतों. नेपोलियननें त्या तारखेस लढाई दिली नाहीं तर दुसरे दिवशीं आपणच शत्रुसैन्यावर चालून जाऊं.'

नेपोलियनची अशी समजूत झाली होती कीं, ता० १६चे लिग्नीचे लढाईंत जर्मन सैन्याचीं हाडें पुरीं खिळखिळीं झालीं आहेत. यास्तव तें सैन्य फिरून आपणावर येण्याची भीति उरली नाहीं. म्हणून त्या सैन्याचे पाठीवर जुजबी फौज देऊन त्यानें ग्राडचीस ठेविलें आणि बाकी सर्व सैन्य घेऊन तो वेलिंग्टनच्या समाचारास निघाला. ब्लुचरच्या सैन्याचा पुरा मोड झाला नाहीं, आणि ब्यूलोचें ताजेंतवानें सैन्य त्यास येऊन मिळालें आहे, अशी जर खरी बातमी नेपोलियनला कळती, तर त्यानें ग्राडचीच्या हाताखालीं अधिक सैन्य ठेवण्याची तरतूद केली असती. पण पुढें त्यास या चुकीचा भयंकर परिणाम भोगावा लागला.

वाटर्लूच्या रणांगणांत वेलिंग्टनजवळ ४९,६०८ पायदळ, १२,४०२ घोडेस्वार व १५६ तोफा होत्या. पण त्यांत खुद्द इंग्लिश सैन्य २४,००० जरूर भरेल. नेपोलियन नेहमीं म्हणे कीं, एक फ्रेंच शिपाई बराबर एक ब्रिटिश, दोन डच, बेल्जियन, जर्मन किंवा आस्ट्रियन शिपाई होत. या कोष्टकाप्रमाणें पाहतां वेलिंग्टनचें सैन्य नेपोलियनच्या फौजेहून कमी होतें. कारण त्यांतील डच, बेल्जियन वगैरे शिपाई कुचकामाचे असून शिवाय फ्रेंचांचे पक्षपाती होते. नेपोलियनचें सैन्यांत ४८,९५० पायदळ, १९,७६५ स्वार, आणि २४६ तोफा होत्या, पण फ्रेंच सैन्य अस्सल प्रतीचें असून त्याची शिस्त, टापटीप वाखाणण्याजोगी होती आणि त्याजवरचे अम्मलदार फार नाणावलेले होते.

वाटर्लूची समरभूमि म्हणजे पूर्वपश्चिम अशा दोन समांतर टेकड्यांची रांग होय. या रांगांमधील अंतर साधारणपणें अर्धा मैल होतें. उत्तरेकडील टेकड्यांवर इंग्लिश आणि दक्षिणच्या टेकड्यावर फ्रेंच

छावणी होती. दोहों बाजूच्या टेकड्यांवरून मधील दरींत येण्यास, उतार होता तो सरसकट सारखा नसून कमजास्त होता. पायदळांचे व स्वारांचे हल्ले मधल्या दरींत होत आणि तोफांचा भडिमार टेकड्यांच्या माथ्यावरून होत असे. या लढाईत नेपोलियननें डाव्या उजव्या बाजूवर अगर बगलेवर हल्ला करण्याचा प्रयत्न केला नाहीं. तर ही सर्व लढाई समोरासमोर उभे राहूनच झाली. ब्रिटिश सैन्याचे उजव्या टोंकास ह्यूगोनाट नामक एक जुनें फ्लेमिश वाडगें होतें. त्याच्या भोंवतीं ओन्या असून सभोंवतीं बाग होती आणि आसपास बिन झाडांचें रान होतें. ही माऱ्याची जागा चांगली शिबंदी ठेवून वेलिंग्टननें बंदोबस्ताची केली होती. ही जोंपर्यंत इंग्लिशांचे हातीं राहील तोंपर्यंत त्यांच्या उजव्या बगलेवर शत्रूचा हल्ला चढण्याची भीति नव्हती. पण तीच जर शत्रूचे स्वाधीन होईल तर त्यास माघार घेणें प्राप्त होतें. फ्रेंच सैन्याच्या उजव्या टोंकास पिछाडीस फ्रेंचनाईट नांवाचें एक खेडें होतें; प्रशियन सैन्याचा हल्ला हटविण्यास या खेड्यानें कांहीं वेळ मदत केली. ता० १७ रोजीं रात्रीं वादळ होऊन मोठा पाऊस पडला त्यावेळीं उभय दळें आपापल्या छावणींत उघड्यांतच होतीं. ता० १८ जूनचा चिरस्मरणीय दिवस उगवला. पण अद्याप पावसाचा जोर कमी झाला नव्हता. नऊ वाजण्याचे सुमारास आकाश निवळूं लागलें. पाऊस थांबला व सूर्य प्रकाशूं लागला. त्यावेळीं उभय दळें आपापल्या जागीं लढाईच्या शिस्तीनें उभीं राहिलीं.

वेलिंग्टननें आपल्या सैन्याच्या दोन रांगा केल्या. पुढली रांग टेकड्यांचे माथ्यावर आणि मागील रांग मागच्या उतरणीवर उभी केली. समोरच्या टेकडीवर फ्रेंच सैन्यही दोन रांगांनींच उभें राहिलें. बादशाही गारदी, घोडेस्वार व पायदळ हे मध्यभागाच्या मागें शिलकी

सैन्य म्हणून राखून ठिवलें होतें. फौजेंतील कोणत्याही भागानें पुढें हल्ला केला तर त्यास पाठबळ देण्यास व शत्रूचा हल्ला आपणावर येईल तर त्यास विरोध करण्यास केव्हांच अडचण पडूं नये, अशा शिताफीनें नेपोलियननें सैन्याची रचना केली होती.

येणेंप्रमाणें उभय दळें लढाईच्या प्रारंभाची वाट पहात आणि आपल्या शत्रूची शक्ति अजमावीत असतां, त्यांच्या मनांत काय विचार-तरंग उठले असतील याची कल्पना करणें अशक्य आहे. या लढाईच्या परिणामाविषयीं केवळ तेथें हजर असलेल्या योद्धचांसच उत्कंठा वाटत होती असें नाहीं, तर सर्व जगाचेच डोळे त्याजकडे लागले होते. या प्रबल वीरांच्या युद्धचमत्काराकडे सर्व युरोपखंड टक लावून राहिलें होतें. कारण त्या वीरांची योग्यताच तशी होती. शिवाय युरोप खंडांत लोकसत्ताक पद्धति अगर अनियंत्रित राज्यपद्धति चालू रहावयाची याचा निकालही या लढाईच्या परिणामावर अवलंबून होता.

आदल्या रात्रीपासून पावसाची झोड लागल्यामुळें चिखल फार झाला होता. त्यामुळें घोड्यांचे पाय निसरत होते. शत्रूवर हल्ला करण्यास मधल्या दरींत उतरून टेकडीवर चढून गेलें पाहिजे होतें. चढणीवर घोड्यांचे पाय ठरतील, आणि तोफांची हालचाल करण्यास हरकत पडणार नाहीं, इतका चिखल सुकतांच नेपोलियननें लढाईस सुरवात करण्याचा हुकूम दिला. त्यावेळीं सुमारें साडेअकराचा अंमल होता. आपला बंधु जेरोम यास ह्यूगोमाँटवर हल्ला करण्यास पाठवून त्यानें लढाईचा 'श्रीमन्महा' केला. फ्रेंचांच्या टोळ्यांमागून टोळ्या त्या ठाण्यावर चढाव करून गेल्या. परंतु इंग्लिशांनींही मोठ्या धिटाईनें त्यांचा प्रतिकार केला. ह्यूगोमाँटवर हल्ला सुरू होतांच ब्रिटिश सैन्याच्या उजव्या टोंकाकडील तोफांस सरबत्ती देण्यांत आली, आणि फ्रेंचांच्या

डाव्या बाजूकडून त्यांस जबाब मिळूं लागला. पुढें तोफांची सरबत्ती सर्वत्र चालू झाली. एक वाजण्याचे सुमारास नेपोलियननें मार्शलनेकडून ब्रिटिश सैन्याचा मध्यभाग व डावी बाजू यांजवर हल्ला करविला. यांत फ्रेंचांचा जय झाला असता तर इंग्लिशांच्या डाव्या बाजूची फळी फुटून डाव्या टोंकाचें सैन्य अलग राहिलें असतें, मांटजीनची टेकडी काबीज करून त्यांचा ब्रुसेल्सकडे जाण्याचा मार्ग बंद झाला असता, आणि प्रशियन सैन्याची कुमक येणार होती तिचा ब्रिटिश सैन्यास कांहीं उपयोग झाला नसता. या कारणास्तव नेपोलियनचा हा पेंच फार महत्त्वाचा होता; पण यांत मार्शलने यास माघार घ्यावी लागली. ब्रिटिश सैन्याच्या डाव्या बाजूच्या अघाडीच्या रांगेंत डच व बेल्जियन शिपाई होते. फ्रेंचांचा हा हल्ला सुरूं होतांच त्यांनीं निलाजरेपणानें पळ काढला. सकृद्दर्शनीं असा जय मिळतांच फ्रेंच शिपाई हुराळून गेले. पण पिछाडीच्या रांगेंत इंग्लिश शिपाई असून त्यांजवर पिक्टन हा सेनापति होता. तो स्वभावानें फार तापट असून शौर्याचे कामांत मार्शलनेवरही त्याची ताण होती. त्यानें आपल्या टोळीच्या दोन रांगा केल्या व प्रथम बंदुकांचा मारा करून फ्रेंच शिपाई तीस यार्डावर येतांच संगिना रोंखून एक जुटीनें त्यांनीं चाल केली आणि त्यांस रेंटून मागें ढकलिलें. पॅकच्या पायदळाचे टोळीनें फ्रेंचांच्या दुसऱ्या दोन टोळ्या मोडून काढल्या. याप्रमाणें पराभूत झालेल्या फ्रेंच तुकडीवर ब्रिटिश घोडेस्वारांची दौड येऊन आदळली. त्यांनीं तीस पुरें पिटाळून लावलें; आणि फ्रेंचांच्या ७४ तोफा त्या सैन्याबरोबर होत्या तेथपर्यंत चाल करून गोलंदाज व घोडे ठार करून त्या तोफा निरुपयोगी केल्या.

याप्रमाणें इंग्लिशांची डावी फळी फोडण्याचा नेपोलियनचा विश्वप्रयत्न फुकट गेला. या झटापटींत त्यांच्या फौजेची नुकसानी फार झाल्यानें

त्याची उजवी बाजू कमकुवत झाली. डाव्या बाजूस ह्यूगोमाँट सर करण्याचे प्रयत्न चालूच होते; पण त्यांतही अद्याप यश आलें नव्हतें. इकडे उजव्या अंगास क्षितिजाजवळ नवीन फौज येत असल्याचीं चिन्हें दिसूं लागलीं. तें ब्लुचरचें सैन्य वेलिंग्टनच्या मदतीस येत आहे अशी नेपोलियनची खात्री झाली. तथापि आपल्या फौजेचा धीर खचेल ह्मणून त्यानें तें ग्राउचीचें सैन्य आपल्या मदतीस येत आहे अशी बातमी पसरविली.

पूर्वी सांगितल्याप्रमाणें ता. १८रोजीं प्रातःकाळीं प्रशियन सैन्य वाटर्लूच्या पूर्वेस १२ मैलांवर वेव्हर नदीच्या काठीं होतें. लिग्नी येथील रणांगणांत जे लोक कामास आले होते त्यांचा जागा ब्यूलोच्या नव्या दमाच्या पथकानें भरून काढली होती. या ८० हजार सैन्यास अडविण्यास नेपोलियननें ग्राउचीच्या दिमतीस केवळ ३२ हजार सैन्य दिलें होतें. प्रशियन सेनापति ब्लुचरनें या ग्राउचीस हातोहात फसविलें. नेपोलियनच्या युद्धाचा निकाल वाटर्लू येथें होणार, वेव्हर नदीवर नव्हे, हें पक्कें जाणून, त्यानें ग्राउचीच्या तोंडावर थिल्मनच्या हाताखालीं एक सतरा हजारांची टोळी ठेऊन दिली, आणि बाकीचें सर्व सैन्य घेऊन ग्राउचीला झुकांडी देऊन, तो अचानक वाटर्लूच्या समरभूमीवर दाखल झाला. तोंडावर टाकलेला भाकरीचा तुकडा खाण्यांत कुत्रा गुंग होऊन जातो आणि इकडे चोर घर लुटतो, तशी बिचाऱ्या ग्राउचीची स्थिति झाली. ब्लुचरला शत्रूकडून जरी वाटेंत कांहीं अडथळा झाला नाहीं, तथापि मार्गांतील अडचणीच इतक्या जबर होत्या कीं, ब्लुचरहून कमी धैर्याचा सेनापति असता, किंवा त्याच्या सैनिकांत नेपोलियनाविषयीं नखशिखांत द्वेष बाणला नसता, तर त्याचें त्या दिवशीं वाटर्लूस येणेंच घडलें नसतें. आदले रात्रीं जी पावसाची संततधार लागली होती त्यामुळें

सेंट लँम्बर्टच्या खिंडींत त्याच्या तोफखान्याच्या गाड्या चिखलांत रुतून बसल्या. घोड्यांचेंही पाऊल पुढें पडेना, पायदळ सैन्य थकून निराश झालें आणि पुढें जाण्याचा उपाय खुंटला असें सर्वांस वाटलें.. पण ब्लुचरनें त्यास 'बाबा, पुता' करून आर्जाविलें. तो ह्मणाला 'वेलिंग्टनला माझें वचन गेलें आहे. आतां तुह्मी मला वचनभ्रष्ट व्हावयास लावतां काय? थोडा कळ सोसा; हरप्रयत्न करून वाटर्लूपर्यंत चला, ह्मणजे जय तुमचाच आहे.' ब्लुचरवर त्याच्या सैन्याची फार भक्ति होती. यास्तव त्याच्या मुरवतीसाठीं तें पुढें निघालें. इकडे दोन-प्रहरीं दोन वाजण्याचे सुमारास नेपोलियनला प्रशियन सैन्य क्षितिजाजवळ स्पष्ट दिसूं लागलें. तेव्हां ग्राउचीला त्यानें निरोप पाठविला कीं, 'ब्लुचर व ब्यूलो हे सेंट लँम्बर्टच्या खिंडीनें वाटर्लूकडे येत आहेत; करितां तूं ताबडतोब त्यांचा पाठलाग कर आणि माझे मुख्य सैन्यास येऊन मीळ.' ही चिठी ग्राउचीला सायंकाळीं सहा वाजतां पोंचली. पण आतां वेळ निघून गेली होती; ग्राउचीच्या येण्याचा आतां कांहीं एक उपयोग होण्याजोगा नव्हता. ही चिठी पोंचण्याचे पूर्वी ग्राउचीला वाटर्लूच्या रणांगणावरील तोफांचा धडाका ऐकूं येत होता. त्यावेळीं जनरल जिरार्डनें त्यास सुचविलें कीं, आपण वाटर्लूकडे वळूं. पण ग्राउचीचें उत्तर एक 'मला वेव्हर नदीवर लढण्याचा हुकूम आहे. मला ही जागा सोडतां येत नाहीं आणि माझ्या सैन्यापैकीं एकही पलटण मी तिकडे पाठविणार नाही.' ग्राउचीच्या या मठ्ठपणाबद्दल पुढें नेपोलियननें त्यास दोष दिला. कित्येकांनीं तर त्याजवर फितूरीचा आरोप केला. असो.

इंग्लिशांच्या डाव्या बगलेवरील हल्ला फसून आपला तोफखाना, रिसाला आणि पायदळ यांची दाणादाण उडाली, उजव्या बाजस

ह्यूगोमाँटचें ठाणेंही हस्तगत होईना, व इकडे ब्लुचरचें सैन्य जवळ येत चाललें, हें पाहून नेपोलियनची निराशा होऊं लागली. आतां साडेतीन वाजून गेले होते. मार्शलनेच्या कचक्याच्या हल्ल्यानें वलिंग्टनच्या फौजेची बरीच खराबी झाली होती; तथापि त्यांचें पाऊल ह्मणून कोठेंच मागें पडलें नव्हतें. तेव्हां नेपोलियननें आपल्या घोडेस्वारांचा हल्ला ब्रिटिश मध्य व उजव्या बाजूवर करून पाहण्याचा निश्चय केला. हा स्वारांचा हल्ला चालूं असतांनाच त्यानें ह्यूगोमाँट व ला हे सेंट हीं ठाणीं घेण्यास अधिक सैन्याची कुमक पाठविली. इकडे स्वारांच्या टोळ्या ब्रिटिश बाजूच्या टेकड्या चढून वर गेल्या, आणि त्यांनीं तोफखान्यावर चाल करून गोलंदाज ठार केले. पण वेलिंग्टननें आपल्या पायदळ पलटणीचा पोकळ व्यूह रचिला, त्यावर फ्रेंच घोडेस्वार त्वेषानें तुटून पडले. पण संगिनीच्या मारापुढें घोड्यांस तोंडच काढितां येईना. व्यूहांतील आंतल्या रांगांनीं गोळ्यांची झोड लाविली. त्यामुळें फ्रेंच रिसाल्यांतील घोड्यांची जिनें पटापट रिकामीं होऊं लागलीं. फ्रेंच स्वारांनीं आपल्या शौर्याची शर्थ केली. पण ब्रिटिशांचे आगीपुढे त्यांचा पाय ठरेना. ते एक एक पाऊल मागें हटूं लागले. त्या वेळीं कांहीं गोलंदाज पोकळ व्यूहाच्या आश्रयानें लपून राहिले होते, त्यांनीं पुढें येऊन तोफा डागण्यास सुरवात केली. तेव्हां फ्रेंच स्वारांची पुरी कंबक्ति आली. जसे जसे ते मागें हटूं लागले तसतसा त्यांच्यावर तोफांचा भडिमार अधिकाधिक होऊं लागला. याप्रमाणें या निष्फळ हल्ल्यांत फ्रेंचांस अपयश येऊन त्यांचे बहुतेक घोडेस्वार ठार झाले.

ला हे सेंटच्या हल्ल्यांत नेपोलियनच्या सैन्याची प्रथम कांहीं वेळ सरशी झाली. सहा आणि साताच्या दरम्यान डॉन्झेलॉटच्या पायदळानें तें ठिकाण सर केलें. तेथून शत्रूच्या मध्यावर हल्ला करण्यास सवड

झाली. आतां एक एक क्षण लाखाचा होता. प्रशियन सैन्य उजव्या बाजूस जवळ जवळ येत चाललें होतें. यास वाटेंतच अडवून धरण्याकरितां लोबाची पलटण पांच वाजतांच रवाना झाली होती. तिनें कांहीं वेळपावेतों ब्लुचरला थोपवून धरिलें. पण प्रशियन सैन्याची संख्या वाढत चालली तसतसें फ्रेंच मागें पाऊल घेऊं लागलें. तेव्हां ब्लुचरनें एक पलटण लोबाच्या पाठीवर ठेऊन, दुसरी फ्रेंचाच्या पिछाडीचे लाँचेनॉइट खेडें काबीज करण्यास पाठविली. प्रशियन शिपायांनीं त्या खेड्यावर तीन वेळां हल्ला केला; पण तितक्याही वेळां त्यांना फ्रेंच तरुण गारद्यांनीं मागें हटविलें. इकडे दुसऱ्या प्रशियन सैन्याच्या टोळ्या इंग्लिशांचे पिछाडीस त्यांच्या मदतीकरितां येऊं लागल्या. त्यांच्या समाचाराकरितांही नेपोलियनला कांहीं फौज पाठवावी लागली. याप्रमाणें मुख्य समरभूमीशीं काटकोन करून फ्रेंच सैन्य प्रशियन शिपायांस प्रतिबंधक करण्याकरितां लढूं लागलें. त्यामुळें वेलिंग्टनशीं लढण्यास सैन्याचा तुटवडा पडला.

हा वेळपावेतों नेपोलियन सैन्याचे मध्यभागीं असून दुर्बिणीनें सर्व हालचालींचें निरीक्षण करीत होता आणि हुकूम सोडीत होता; परंतु आतां आणिबाणीचा प्रसंग आलेला पाहून तो उठला व त्यानें आपला घोडा मागविला. यावेळीं नेपोलियननें माघार घेतली असती तर सैन्याची विशेष खराबी न होतां त्यास पारिसला पोचतां आलें असतें. त्याच्या जुन्या गारदी पलटणीनें अद्याप झुंजास हात घातला नसल्यानें ती ताजीतवानी होती. तिला शत्रूच्या तोंडावर ठेवून त्यास बाकीच्या सैन्यासह माघार घेतां आली असती; पण नेपोलियन पक्कें समजून होता कीं, आपल्या बादशाहीचा सोक्ष मोक्ष वाटर्लूच्या रणांगणावर व्हावयाचा. आपण एकदां येथून हटलों कीं, शत्रूचें बळ व

संख्या वाढत जाणार आणि मग आपणास कधींच फत्ते मिळण्याची आशा नाहीं, याकरितां येथेंच शेवटचा प्रयत्न करून पहावा असें त्यानें योजिलें.

सात साडेसातच्या सुमारास त्यानें आपलें ओल्डगार्डसचें पथक मार्शलनेच्या हवालीं करून त्यास इंग्लिश सैन्यावर हल्ला करण्यास पाठविलें. 'बादशहाचा जयजकार असो' अशी गर्जना करून तें टेकडी उतरूं लागलें. त्यांच्या डोक्यावरून पुढील टेकडीवरील शत्रुसैन्यावर तोफांचा भडिमार चालूच होता. हा हल्ला ह्युगोमाँट आणि ला हे सेंटच्या दरम्यानच्या ब्रिटिश मध्य आणि उजव्या बाजूवर होता. याच वेळीं डाँझेलॉटच्या तुकडीनें ब्रिटिश फौजेच्या मध्यावरच चाल केली. त्याच्या मदतीस पूर्वीप्रमाणें 'तरुण गारद्यांची' पलटण असती तर इंग्लिश सैन्यावर मोठाच प्रसंग गुदरला असता. पण ते गारदी या वेळीं ब्लुचरशीं लढण्यांत गुंतले होते, त्यामुळें डाँझेलॉटचा इलाज चाललां नाहीं. वेलिंग्टननें इकडे डाँझेलॉटच्या प्रतिकाराची तजवीज करून मार्शलनेच्या स्वागताची तजवीज चालली. नेच्या ओल्डगार्डशीं सामना करण्याकरितां मेटलंड आणि ॲडॅम्स यांच्या हाताखालील पलटणी तयार होत्या. फ्रेंचांच्या तोफांचा मारा चुकविण्याकरितां वेलिंग्टननें त्यांस भुईसरपटत पडण्यास हुकूम दिला. अशा स्थितींत ते असतां मार्शलने आपले ओल्ड गार्डस घेऊन त्यांजवर आला. धुरानें दिशा धुंद झाल्या होत्या, त्यामुळें गारद्यांना आपले शत्रु कोठें आहेत तेंच कळेना. ते ईर्षेनें चढाओढीनें टेकडी चढून माथ्यापासून सुमारे पन्नास कदमांवर आले. तेव्हां त्यांस ब्रिटिश अम्मलदार घोड्यावर असलेले दिसले; पण शिपा[illegible]यांचा मुळींच पत्ता नाहीं. फ्रेंच पायदळ इतकें [illegible] चढून आल्यानें त्यांच्या तो[illegible]

बत्ती आतां बंद झाली होती. कारण तोफेच्या गोळ्यानें त्यांचेच गारदी ठार होण्याचा संभव होता. याप्रमाणें तोफांची भीति नाहींशी झाली आणि शत्रूही आटोक्यांत आले असें पाहतांच 'गारदी हो उठा आणि आपल्या शत्रूंचा समाचार घ्या' असा वेलिंग्टननें हुकूम केला. तत्क्षणींच जमिनीवर सरपटत असलेले शिपाई एकदम भुताप्रमाणें उठून उभे राहिले, आणि आपल्या बंदुकीचा मारा त्यांनीं फ्रेंचांचे तोंडावर सुरू केला. ब्रिटिश पलटण चार रांगांनीं मोठ्या व्यवस्थेनें उभी होती. त्यांतील शिपायांनीं हा वेळपर्यंत युद्धांत फारशी मेहनत घेतली नव्हती. शिवाय खुद्द वेलिंग्टनच्या नजरेखालीं ते लढत होते; आणि नेपोलियनच्या कसलेल्या व नाणावलेल्या शिपायांशीं गांठ आहे, आणि यावेळीं आपण जी मर्दुमकी गाजवूं तिजवर या लढाईचे जयापजयाची व युरोपखंडाच्या शांततेची सर्व मदार आहे, हें त्यांच्या मनांत बागत असल्यानें त्यांच्या अंगीं स्फुरण चढलें व त्यांच्या बाहूंत विलक्षण करामत आली. ब्रिटिशांच्या या आवेशापुढें फ्रेंचांचा पाय टिकेना. बंदुकीची पहिली फेर झडली तेवढ्यानेंच त्यांचे तीनशें लोक पतन पावले. आपल्या रांगा लांबवून इंग्लिशांना घेरण्याचा त्यांनीं प्रयत्न केला; तोही व्यर्थ गेला. इतक्यांत संगिना खोवून त्यांचा मारा करण्याविषयीं वेलिंग्टननें हुकूम दिला. त्या मारापुढें फ्रेंचांची गठडी वळली. त्यांचें धैर्य खचलें. त्यांच्या रांगा विस्कळित झाल्या व त्यांनीं मागें पाऊल घेतलें. मेटलंडच्या हाताखालील शिपायांनीं त्यांची अंगावर शहारें येण्याजोगी कत्तल केली. इतक्यांत फ्रेंच गारद्यांची दुसरी पलटण पुढें सरसावली. इंग्लिशांच्या तोफांस न जुमानतां ती चाल करून आली. त्याशीं लढण्यास मेटलंडची पलटण परत आली होती. या फ्रेंच गारद्यांवर समोरून तोफांचा व दोहों बाजूंनें बंदुकांचा असा [illegible] सुरू झाला. अशा नेटाच्या मारापुढें कितीही निधड्या छातीचे

शिपाई असले तरी त्यांचें काय चालणार; फ्रेंच गारदी शौर्याविषयीं गाजलेले व युद्धाचे कामांत ह्यातारे झालेले; पण त्यांचेंहि धैर्य खचलें. त्यांचा पायच तेथें ठरेना. त्यांनीं कच खाऊन पळण्यास प्रारंभ केला. इतका वेळ ला हे सेंट येथें डॉझेलॉटच्या पलटणीनें मर्दुमकी गाजविली होती. पण बादशाही गारद्यांची उडालेली त्रेधा पाहून तीही कचरूं लागली; तेव्हां ॲडॅमच्या टोळीनें तीस तेथून हुसकून लाविलें. याप्रमाणें फ्रेंचांचें सर्व प्रयत्न निष्फळ होऊन त्यांस माघार घ्यावी लागली. पण एवढ्यानेंच लढाई संपली नाहीं. नेपोलियनजवळ अद्याप कांहीं फौज शिल्लक होती. शिवाय पहिली गारद्यांची पलटण, आणि दुसऱ्या कांहीं पराजित टोळ्यांतील बाकी राहिलेलें शिपाई एकत्र करून त्यानें एक पथक बनविलें. नेपोलियनची ही तयारी पाहून वेलिंग्टननें आतां आपणच शत्रूवर चालून जाण्याचा निश्चय केला. बादशाही गारद्यांची दाणादाण झालेली पाहून इतर सैनिक गलितधैर्य झाले आहेत तोंच त्यांच्यावर हल्ला करावयाचा, आणि नेपोलियनला दुसऱ्या गारदी पलटणीची व्यवस्था लावून शत्रूस तोंड देण्यास अवकाशच मिळूं द्यावयाचा नाहीं असा त्यानें बेत ठरविला. प्रशियन सैन्य अगदीं समीप येऊन भिडल्यानें आतां वेलिंग्टनला आपल्या डाव्या बाजूच्या सुरक्षिततेबद्दल काळजीच राहिली नव्हती. यास्तव तेथून ताज्या दमाचे स्वार व पायदळ त्यानें या हल्ल्याकरितां आणविलें. अशाप्रकारें आपल्या सैन्याची योग्य तरतूद करून त्यानें सर्वांस एकदम पुढें चालून जाण्यास फर्माविलें. ब्रिटिश शिपाई या हुकुमाची किती वेळ तरी उत्सुकतेनें वाट पहात होते आणि आपल्या सरदारानें पुढें जाण्यास हुकूम देण्याचें नाकारल्यामुळें ते संतप्त झाले होते. शेवटीं त्यांच्या मनोदयाप्रमाणें त्यांस हुकूम मिळतांच मग अवकाश कसचा. आधींच विस्कळीत, हतप्रभ आणि श्रांत झालेल्या फ्रेंच शिपायांवर ते तत्काळ तुटून पडले आणि त्यांनीं

एकसहा कत्तल करण्यास प्रारंभ केला. वेलिंग्टन आपल्या सैन्याच्या अग्रभागीं असून आपल्या कृतीनें व शब्दांनीं सैनिकांस उत्तेजन देत होता. फ्रेंच सैन्य पळूं लागलें तथापि त्यांचा मध्यें मध्यें उलटून गोळी-बार चालूच हाता एक दोन गोळ्या वेलिंग्टनच्या कानशिलास चाटून गेल्या. तेव्हां त्याच्या हाताखालील अम्मलदारांनीं त्यास निष्कारण जीव धोक्यांत न घालण्याविषयीं विनविलें; पण त्यानें उत्तर केलें. 'आमची फत्ते झाली. नेपोलियनची खोड मोडली. युरोपखंडांत आतां स्वस्थता नांदेल. माझें इतिकर्तव्य संपलें. आतां मला मरण आलें तर त्याची फिकीर नाहीं.'

प्लँचेनॉईट येथें एवढा वेळ यंग गार्ड्सनीं टिकाव धरला होता; पण जिकडे तिकडे पळापळीस प्रारंभ झालेला पाहून त्यांची नाउमेद झाली. तेव्हां प्रशियन सैन्य फ्रेंचांच्या उजव्या अंगास येऊन बिलगलें आणि त्यानेंही लांडगेतोड चालविली. ब्रिटिश सैन्यास सकाळपासून जिवापाड श्रम झाल्यानें त्यांचेकडून पाठलाग आणि कत्तल करणें होईना. पण प्रशियन सनिक ताज्या दमाचे असून त्यांच्या अंगीं फ्रेंचांचा द्वेष पुरा बाणला होता. त्यामुळें त्यांनीं हें असुरी काम मोठ्या हौसेनें व नेटानें चालविलें. सर्व रणांगण पळपुट्या फ्रेंच शिपायांनीं फुलून गेलें. ओल्डगार्ड्सपैकीं शिलक राहिलेल्या पठ्ठ्यांनीं या पाठलागास किंचित् तरी अडथळा करावा ह्मणून आपली शिकस्त केली. पण त्या धांवपळींत त्यांचा बेपत्ता झाला.

नेपोलियनच्या चेहऱ्यावर निराशेनें प्रेतकळा आली. 'रणभूमीवर मी प्राण देणार' असें तो बडबडूं लागला. पण जनरल सूल्ट त्याजबळ होता. त्यानें आणि इतर अधिकाऱ्यांनीं मोठ्या प्रयासानें त्याचें मन बळवून, शिताफीनें त्या संसेहोलपटींतून रस्ता काढला आणि त्यास

सुरक्षित स्थळीं नेलें. चार्लेरॉय येथें एक तास विश्रांति घेऊन नेपोलियन तडक पारिसकडे निघाला, आणि आपल्या पराजयाची वार्ता पोंचण्यापूर्वीच तेथें येऊन दाखल झाला. पण असली बातमी गुप्त कशी राहणार? लवकरच जिकडे तिकडे तिचा पुकारा होऊन सर्वत्र हाहाकार सुरू झाला. शत्रूंच्या विजयी फौजा पारिसवर चालून येत आहेत असें कळतांच बड्या व सन्मान्य लोकांच्या सभेनें नेपोलियनला राजीनामा द्यावयास लाविलें. त्याप्रमाणें ता. २२ जून रोजीं त्यानें दुसऱ्यांदा राजीनामा दिला आणि ता. २९ जूनला पारिस शहर सोडून अमेरिकेला जाण्याचे उद्देशानें तो रॉचफोर्ट बंदरीं गेला. परंतु इंग्लिश गलबतांनीं सर्व किनाऱ्यावर टेहळणी चालविली असल्यानें नाइलाजास्तव तो ता. १५ जुलै रोजीं बेलेरेफोन जहाजावरील कप्तानाच्या स्वाधीन झाला.

इकडे संयुक्त राष्ट्रांच्या फौजा आस्ते आस्ते पारिसला पोहोंचल्या आणि त्यांनीं त्या शहरास वेढा दिला. नेपोलियननें राजीनामा दिल्यावर जें प्रधानमंडळ तात्पुतें अधिकारारूढ झालें होतें, त्यानें वेलिंग्टनशीं सलोख्याचें बोलणें सुरूं केलें. ब्लुचरच्या अंगीं नखशिखांत फ्रेंचद्वेष बाणला असल्यानें त्यानें हल्ला करून शहर सर करण्याची मसलत दिली; परंतु वेलिंग्टनच्या मध्यस्तीनें रक्तपात टळून ता. ३ जुलै रोजीं तें शहर शत्रूच्या स्वाधीन झालें. पुढें फिरून अठराव्या लुईची गादीवर स्थापना झाली, आणि त्याच्या सुरक्षिततेकरितां ह्मणून तें शत्रूसैन्य तीन वर्षेपर्यंत तेथेंच तळ देऊन राहिलें.

नेपोलियनच्या युद्धाचा याप्रकारें वाटर्लूच्या लढाईनें शेवट केला. यापूर्वी तेवीस वर्षे ह्मणजे इ. स. १७९२ पासून १८१५पर्यंत यूरोपखंडांत जो ब्रह्मघोटाळा झाला होता व अराजकी बोकाळली होती, तिची

इ. स. १८१५ पासून आजवर नांदत असलेल्या शांततेशीं आणि औद्योगिक व सांपत्तिक भरभराटीशीं तुलना केली असतां, वाटर्लूच्या लढाईचें महत्त्व कळून येतें. या जयानें यूरोपखंडांतील तेवीस वर्षे माजलेली अराजकस्थिति एकदम पालटून टाकिली. वाटर्लू येथें ब्रिटिश सेनेची फत्ते झाली नसती तर ही झोटिंगपाच्छाई आणखी किती वर्षे चालली असती याचा अंदाज करवत नाहीं. ह्मणून ज्या लढाईनें फ्रेंच राज्यक्रांतीच्या युद्धाची एका घटकेंत कड लाविली, आणि अत्यंत बुद्धिमान् पण महत्त्वाकांक्षी, राज्यविध्वंसक व शांततेचा उच्छेदक जो नेपोलियन त्या रणगाजीचीं हाडें खिळखिळीं केलीं ती लढाई ब्रिटिश लोकांना तर अभिमानास्पद आहेच; पण त्या लढाईपासून पुढें यूरोपखंडांत जें शांततेचें साम्राज्य झालें त्याबद्दल जगाच्या इतिहासांतही तिला अत्यंत महत्त्व आहे.

वाटर्लू येथें वेलिंग्टनला जय प्राप्त झाला खरा; पण तो केवळ ब्रिटिश सैन्याच्या धिम्मेपणामुळेंच होय. त्यांत सेनापतीचें युद्धकौशल्य कोठेंच दिसून आलें नाहीं. आदल्या रात्रींच्या पावसामुळें नेपोलियनला युद्धास प्रारंभ करण्याला उशीर झाला नसता, किंवा ग्राउचीच्या जागीं दुसरा कोणी बाणेदार व अक्कलमंद सरदार असता, तर ब्लुचरला वाटर्लूस येतांच आलें नसतें, किंवा तो येऊन पोंचण्यापूर्वीच ब्रिटिश सैन्याची इतिश्री होऊन गेली असती. शिवाय वेलिंग्टनची त्या दिवशींची लढण्याची पद्धति शिपायांस केवळ प्राणघातक अतएव उद्वेगजनक होती. 'My plan is simply to stana my ground here to the last man'; (माझ्या हाताखालीं एक शिपाई जीवंत असेपर्यंत ही जागा सोडून द्यावयाची नाहीं हीच माझी लढाईची तऱ्हा होय) असें त्यानेंच बोलून दाखविलें होतें. ब्लुचरला येण्यास आणखी एक दोन तास अव-

काश लागला असता तर वेलिंग्टनचा हा बेत अक्षरशः खरा झाला असता. एकच जागा धरून बसून शत्रूचा मार सोशीत अगर चुकवीत राहणें याचा ब्रिटिश शिपायांसही तिटकारा आला. कित्येक वेळां त्यांनीं पुढें चालून जाण्याविषयीं परवानगी मागितली; पण ती मिळाली नाहीं ह्मणून ते रागानें लाल झाले. केवळ वेलिंग्टनच्या मुरवतीसाठीं व आपल्या स्वाभाविक चिकट स्वभावामुळें त्यांनीं शेवटपर्यंत धीर धरला; आणि त्याचें त्यांस शेवटीं अनुरूप फळही मिळालें. कारण एकदां त्यांनीं आपली जागा योग्यवेळपूर्वीच सोडिली असती ह्मणजे नेपोलियनला आपले डावपेंच चालविण्यास संधि आयतीच मिळाली असती; परंतु ही जर आणि तरची मालिका इतिहासांतून कधींच संपण्याचा संभव नाहीं.

या लढाईत इंग्लिशांचें जें नुकसान झाल्याचें वेलिंग्टननें स्वतः कबूल केलें आहे, त्यावरून नेपोलियनचें युद्धकौशल्य व फ्रेंचांचें शौर्य दिसून येतें. रणांगणाहून परत आल्याबरोबर वेलिंग्टननें आपल्या एका मित्रास पत्र लिहिलें, त्यांत तो ह्मणतो " या युद्धांत माझे जे मित्र, सोबती व शिपाई मरण पावले त्यांची संख्या पाहून माझी छाती दडपते. मला जय मिळाला हें खरें; पण सैन्याचा जो भयंकर संहार झाला त्यायोगानें तो क्लेशप्रद झाला आहे. माझ्या सैनिकांच्या शौर्यानें माझा पराजय होण्याचें आजवर टळलें आहे. पण वाटर्लूप्रमाणें इतक्या वीरांची आहुति देऊन जय मिळविणें हें पराजयाइतकेंच कमनशीब समजलें पाहिजे. आतां या जयामुळें जगाचा फायदा होईल ही गोष्ट अलाहिदा आहे. "

जगांतील क्रांतिकारक लढाया.

भाग १६ वा.

सुशिमाची लढाई इ. स. १९०५.

पौरस्त्य लोक दुर्बल दास्याला मात्र पात्र ते मंद ।
ऐसे प्रलाप करिती त्यांचें पांडित्य पाडिलें बंद ॥ १ ॥

कोलंबसानें इ. स. १४९२ त अमेरिका खंडाचा शोध लावला व वास्को दि गामानें इ. स. १४९८त कालिकत बंदरांत पाऊल ठेविलें. त्यावेळेपासून युरोपियन राष्ट्रांस दुर्बल लोकांचे देश जिंकून त्यांस बंदे गुलाम बनविण्याची चटक लागली आहे. गेल्या चार शतकांत या श्वेतवर्णी राष्ट्रांनीं सर्व पृथ्वीभर हुतूतू घालून अमेरिकन रक्तवर्णी लोकांचा नायनाट केला आणि तें खंड बहुतेक श्वेतवर्णी बनविलें. आफ्रिका खंडांतील कृष्णवर्णी रानटी जातींची पुढेंमागें तीच अवस्था होऊन तें खंडही श्वेतवर्णमय होईल असा रंग दिसतो. आशिया खंडांतील राष्ट्रें मात्र जिवट, जुनीं, बरींच सुधारलेलीं व संख्येनें मोठीं असल्यानें हें खंड गौरकायमय होणें अशक्य नसलें तरी असंभवनीय आहे. युरोपियन लोकांसही ही असंभवनीयता दिसत असून बरकरणीं ती ते स्पष्टपणें कबूलही करितात. परंतु त्यांचे अंतःकरणांतील विचार भिन्न असोवत असें अनुमान त्यांच्या कृतीवरून निघतें.

रशियाचा पूर्वेकडील राज्यविस्तार, अमेरिकेचा पॅसिफिक महासागरांतील बेटांवरील डोळा, व फारसा बभ्रा होऊं न देतां एक एक देश गट्ट करण्याची ग्रेटब्रिटनची क्लृप्ति, या सर्वांचें धोरण एकच असून त्यावरून आशिया खंडाविषयीं निराशाच उत्पन्न होणें साहजिक आहे. वरील तीन राष्ट्रांपैकीं अमेरिकेची सत्ता फिलिपाइन बेटाखेरीज तूर्त कांहीं कोणत्या भागावर दिसत नाहीं, पण इंग्लंड व रशिया यांनीं या खंडाचा मोठा भाग आक्रमिला आहे. पुल्टोवाच्या लढाईपासून रशियाचें राज्य विस्तार पावूं लागलें आणि त्याची गति पूर्वेस व दक्षिणेस अकुंठित चालली. पूर्वेस पासिफिक महासागर व दक्षिणेस अफगाणिस्थान पावेतों त्याची हद्द येऊन ठेपली. प्लासीच्या लढाईपासून इंग्लिशांची सत्ता वाढतां वाढतां थोड्याच अवधींत त्यांनीं हिंदुस्थान व ब्रह्मदेश व्यापिला. पश्चिमेस अर्धा बलुचिस्थान त्यांचे राज्यांत सामील झाला. अफगाणिस्थानानें मात्र एक दोनदां चांगला हात दाखविल्यानें त्या बाजूस राज्यतृष्णेस आवरून धरावें लागलें; पण तिबेट देशांत थेंडें मिशन पाठवून ता० ३ आगष्ट १९०४ रोजीं ल्हासा शहरांत प्रवेश करून त्यांनीं आपला हात तेथेंही शिरकविला.

याप्रमाणें उत्तरेस रशिया आणि दक्षिणेस इंग्लंड यांच्या कात्रींत सांपडल्यानें सर्व आशिया खंड लवकरच युरोपचें अंकित होईल अशी भीति वाटूं लागली. कारण एवढ्या मोठ्या खंडांत इराण, अफगाणिस्थान, चीन, जपान, एवढेच काय ते स्वतंत्र देश राहिले. त्यांत लोकसंख्येच्या मानानें चीन देश प्रमुख; पण तो अद्याप अज्ञाननिद्रेंत घोरत पडलेला. इ० स० १८४० पासूनच इंग्लिशांनीं चीनच्या शक्तीची चांचणी करून पाहिली. मुष्टिक लोकांचे बंडाचे वेळीं तर त्यांचा दुबळेपणा सर्व पाश्चात्य राष्ट्रांस विदित झाला. वाटेल त्या वेळीं चीनचे

लचके तोडूं व तें पोलंडप्रमाणें आपापसांत वांटून घेऊं अशी त्यांस धमक वाटूं लागली. अशा स्थितींत सर्व एशियाटिक लोकांचे डोळे जपानकडे लागावे हें साहजिकच होतें. रशिया अगर इंग्लंड यांतील कोणत्याही राष्ट्राचें जपानवर एकदां वर्चस्व बसलें कीं आशियाखंडाच्या स्वातंत्र्याची पुरी निराशाच. कारण पर्शिया व अफगाणिस्थान जरी स्वतंत्र असले तरी त्यांचें स्वातंत्र्य स्वतःपुरतेंच. दुसऱ्या राष्ट्रास पारतंत्र्याच्या जबड्यांतून सोडविण्याची त्यांची धमक नाहीं. तेव्हां एकदां का जपानच्या मानेवर परदास्याचें जूं बसलें ह्मणजे सर्व आशियाखंड यूरोपच्या पूर्ण कचाट्यांत सांपडल्याप्रमाणें होत होतें.

बरें, जपान देश तरी पौर्वात्यांच्या उद्धारास खंबीर आहे असें अनुमान करण्यासही कांहीं वर्षांपूर्वीं आधार नव्हता. पंधराव्या शतकांत पोर्तुगीज लोकांनीं जपानांत ख्रिस्ती धर्माचें बंड माजविलें आणि त्याबरोबरच जपानी लोकांचा राजकीय अम्मलही झुगारून देण्यास प्रारंभ केला. त्या वेळेपासून या 'परकी भूतांचा' संपर्क नको ह्मणून जपाननें परकी लोकांस आपल्या देशांत येण्याची आणि जपानी लोकांना परदेशीं जाण्याची बंदी केली. या कूपमंडूक वृत्तींत तीनशें वर्षें गेल्यावर इ. स. १८५१ त जपानचे किनाऱ्यावर लागून फुटणाऱ्या जहाजावरील माल परत मिळविण्याविषयीं व किनाऱ्यास लागलेल्या खलाशांस नीट रीतीनें वागविण्याविषयींचा करार करून घेण्याच्या मिषानें, परंतु मनांतून जपानची कुवत ताडण्याच्या हेतूनें, अमेरिकेनें कांहीं गलबतांची रवानगी त्या देशाकडे केली. त्या वेळीं जपानी लोकांजवळ ना लढाऊ जहाजें, ना तोफा, ना दारुगोळा. तिरकमट्याच्या साहाय्यानें त्यास या परकी लोकांस अडवितां येणें शक्य नव्हतें. तेव्हां दूरदर्शीपणानें अमेरिकेच्या सर्व मागण्या त्यांनीं मान्य

केल्या. पुढें इ. स. १८५५ त आपल्या देशास व्यापाराचे बाबतींत कांहीं सवलती मिळविण्याच्या उद्देशानें इंग्लिशमन लॉर्ड एल्जिन हा जपानांत गेला. त्या वेळीं परकी लोकांस नागासाकी बंदराखेरीज इतर ठिकाणीं प्रवेश नव्हता; पण ह्या इंग्रज बहादरानें जपानी लोकांच्या धमकावणीस न जुमानतां यड्डोपर्यंत आपला प्रवेश करून घेतला. परकी राष्ट्रांचें हें सामर्थ्य आणि आपला दुबळेपणा आतां जपानचे चांगलाच लक्षांत आला; व त्या वेळेपासून त्यांनीं परदेशांतून विद्या, कलाकौशल्य शिकण्याचें व्रत अंगिकारिलें. या गोष्टीस राजाश्रयही चांगला मिळाला. तथापि प्रथमतः आनुवंशिक संस्कारामुळें परदेशगमन हें पहिल्यानें लोकांस इष्ट वाटेना. तरी कित्येक खऱ्या कळकळीचे देशभक्त लोकमतास न दुखविण्यासाठीं चोरूनमारून, तर कित्येक धाडसानें उघडपणें परदेशास गेले. यूरोप व अमेरिका खंडांत जाऊन तेथील राजनीति, यंत्रकाला, शास्त्रीय शोध वगैरे विषयांत पारंगतता मिळवून ते स्वदेशीं परत आले; आणि त्यांनीं आपल्या ज्ञानाचा फैलाव देशांत सुरू केला. या शिक्षणानें साऱ्या जपान देशावर अशी कांहीं जादूची कांडी फिरविली कीं, पूर्वीचें जपान व आजचें जपान यांत जमीनअस्मानाचें अंतर पडलें. या स्थित्यंतराचे वेळीं 'मिकाडो, बड्या घराण्यांतील लोक, व सामान्य जन यांनीं जो स्वार्थत्याग केला व देशभक्ति दाखविली ती अवर्णनीय होय. जमीनदारांनीं तर आपणच आपली सर्व मिळकत राजाचे स्वाधीन केली, आणि तिचा सार्वजनिक कामाकडे उपयोग करण्यास विनविलें.'

अशा प्रकारें जपानी लोकांनीं शिक्षणप्रसार करून व जुने मानमरातब, हक्क वगैरे झिडकारून टाकून नवीन राज्यपद्धति चालू केली. जपानची याप्रमाणें प्रगति चालू असतां त्याच्या भावी वैभवास अवश्यक

व आधारभूत असा गुरुमंत्र त्यास मिळाला. जपान देशांत परकी लोकांनां कायमची वस्ति करण्याची, जमीनजुमला विकत घेण्याची, खाणी खणण्याची, आणि व्यापारांत भांडवल घालण्याची परवानगी द्यावी अगर न द्यावी असा प्रश्न इ. स. १८९२ चे सुमारास उपस्थित झाला. त्यावेळीं बॅरन केंटारो कानेको नांवाच्या जपानी उमरावानें या प्रश्नाबद्दल प्रसिद्ध तत्त्ववेत्ता हर्बर्ट स्पेन्सर यांचें मत विचारलें. तेव्हां स्पेन्सरसाहेबांनीं आपलें मत स्पष्टपणें कळविलें तें पुढील आशयाचें आहे. "अमेरिकन व युरोपियन लोकांचा होतां होईल तों जपान देशास विटाळ होऊं देऊं नका. शक्य तितकें त्यांस नेहमीं दूर राखा. त्याशीं संबंध ठेवणें तो निव्वळ व्यापार व पुस्तकें, यंत्रें, वगैरेची खरेदीविक्री एवढ्यापुरताच असूंदे. विशेषतः जीं प्रबळ राष्ट्रें आहेत त्यांशीं तर अत्यंत सावधगिरी ठेवा. त्यांचा पाय जपान देशांत कायमचा कोठेंही रोंवला जाणार नाहीं अशी खबरदारी घ्या. हरहुन्नर करून देशाचे राज्यकारभारांत त्यांनीं आपला हात एकदां शिरकविला ह्मणजे पुढें त्यांचें स्वरूप कसें बदलतें हें पाहणें असेल तर हिंदुस्थान देशाकडे नजर फेका. युरोपियन लोकांस तुह्मी जपानचे ओसरींत बिऱ्हाड ठेवण्याची परवानगी दिली कीं ते हातपाय पसरावयास प्रारंभ करणार. मग अर्थातच त्यांचे जपानी लोकांशीं तंटे होऊं लागतील. ह्या तंट्यांचें खापर जपानी लोकांचे डोक्यावर फोडून त्याबद्दल त्यांचा सूड उगविण्यास ते आपल्या सरकारास आग्रह करतील. नंतर नुकसानीदाखल कांहीं प्रांत बळकावून तेथें आपली वसाहत करतील. ती वसाहत कायम झाल्यावर क्रमाक्रमानें ते हिंदुस्थानाप्रमाणें सर्व जपान देश व्यापितील आणि तुह्मांस गुलाम करतील. ह्मणून तुह्मीं आपल्या देशांत युरोपियनांस जमिनी किंवा घरें भाड्यानें किंवा विकत घेऊं देऊं नका; खाणी खणण्याच्या सवलती देऊं नका. जपानच्या किनाऱ्यानें एका

बंदराहून दुसऱ्या बंदरास व्यापार करूं देऊं नका. तसेच जपानी युरोपियन यांजमध्यें शरीरसंबंधही होऊं देऊं नका. कारण जरी समान वर्णाच्या व उत्क्रान्तीच्या पोटाविभागांमध्यें शरीरसंबंध होऊन झालेली प्रजा बरीच श्रेष्ठ निपजून तिच्यांत उभयपक्षांचे गुण उतरतात, तथापि अत्यंत भिन्न अशा दोन वर्णांमध्यें जर बेटीव्यवहार होईल तर त्या संकरापासून झालेली प्रजा कमी दर्जाची निपजेल. तिच्यांत उभयतांचीं दोष व व्यंगें मात्र उतरतील. याचें उदाहरण पाहिजे असल्यास हिंदुस्थान, अमेरिका वगैरे ठिकाणच्या युरेजियन इत्यादि मिश्र संततीकडे पहा म्हणजे तुमची खात्री होईल." स्पेन्सर साहेबांनीं हा कानमंत्र दिल्यापासून जपाननें आपला वर्तनक्रम ठाम ठरवून टाकिला; आणि त्या आंखलेल्या मार्गानें आपली प्रगति करून घेतली.

जपाननें आपल्या नूतन संपादित बलाची प्रवेशपरीक्षा इ. स. १८९४ त चीनच्या युद्धांत दिली. परंतु तो चीन देश जुनाट खोड; त्याचा जरी जपानी लोकांनीं नक्षा उतरिला तथापि बलाढ्य युरोपियन राष्ट्रांपुढें त्याच्यानें टिकाव धरणार नाहीं असें कित्येकांचें मत होतें. इ. स. १९०० त चीनांतील मुष्टिक लोकांचे बंडाचे वेळीं जपानी सैन्याची टापटीप, कवाईत, शौर्य व धाडस ही चांगलींच व्यक्त झालीं. त्याचवेळीं जपानी सैनिकांसही रशियन, जर्मन, ब्रिटिश, अमेरिकन व फ्रेंच फौजाचे बलाबल व गुणावगुण पाहतां आले. तेव्हां त्यांनीं खूणगांठ बांधिली कीं, या पांच राष्ट्रांपैकीं कोणत्याही एका राष्ट्राशीं लढाई देण्याचा प्रसंग आल्यास आपण फत्ते मिळवूं. पण जपानी लोक जसे शूर तसेच धोरणी व राज्यकारस्थानी; युरोपियन राष्ट्रांचा स्वभाव त्यांस पक्का अवगत झालेला. एखाद्या युरोपियन राष्ट्राशीं आपण लढाई उपस्थित केल्याबरोबर दुसरीं राष्ट्रें मध्येंच पडून अगर

शत्रूस सामील होऊन आपला नायनाट करण्यास वेळ लावणार नाहींत. याकरितां एकाच काळीं अनेक राष्ट्रांशीं विरोध मांडणें चांगलें नाहीं. असा पोक्त विचार करून आपले वृद्ध मुत्सद्दी मार्किस इटो यांस इंग्लंडास पाठवून त्यांनीं इंग्लंडशीं तह केला. त्यांत एकाहून अधिक राष्ट्रांशीं जपानची लढाई जुंपल्यास इंग्लंडनें जपानला मदत करावी असा करार ठरला. एशिया खंडाचा बराचसा भाग व्यापून टाकणारीं प्रमुख परराष्ट्रें रशिया व इंग्लंड होत. त्यांपैकीं रशियाचा जितका निकट संबंध तितका इंग्लंडचा नाहीं. यास्तव रशिया हा जपानचा सहज शत्रु झाला; आणि रशिया व इंग्लंड यांचें परस्पर वैर असल्यानें इंग्लंड देश जपानचा सहज मित्र झाला.

रशियासारखा बलाढ्य शत्रू दाराशींच असल्यानें त्याशीं युद्ध करण्याचा प्रसंग केव्हां येईल याचा नेम नाहीं हें जाणून जपाननें आंतून लढाईची तयारी जय्यत ठेविली होती, आणि इंग्लंडशीं तह करून इकडे बाहेरचा बंदोबस्त करून टाकिला. तो देश अशा धोरणानें वागत असतां रशियाचें पाऊल जपानच्या नजीक येऊन ठेपलें. तेव्हां रशियाशीं दोन हात केल्याखेरीज गत्यंतर नाहीं असें जपानला कळून चुकलें. इ. स. १८९४ त जपानची चीनशीं लढाई होऊन तींत पोर्ट आर्थरचा किल्ला व ल्याओटंग द्वीपकल्प जपाननें हक्कानें मिळविलें होतें; परंतु कावेबाज रशियानें मध्यें पडून व आशिया खंडाच्या शांततेबद्दल मानभावी कळकळ दाखवून, सदर प्रांताबद्दल चीनकडून रोख खंडणी देवविली, आणि जपानची कशीबशी समजूत घालून त्याच्याकडून ते प्रांत सोडविले; परंतु रशियाचें खरें स्वरूप लवकरच प्रगट झालें. चीनला जपानची खंडणी देण्याचे कामीं पैशाची मदत करून त्यानें पोर्ट आर्थर किल्ला व डालनी बंदर उपटलें आणि मांचुरिया प्रांतांतून

पोर्टआर्थरपावेतों आगगाडीचा फांटा आणून तो प्रांतही पंजाखालीं दडपला. रशियानें मांचुरियांत आगगाडी करण्याचा उपक्रम केला. तेव्हांच जपानला पुढील भविष्य कळून चुकलें; पण त्या वेळीं इतर युरोपियन राष्ट्रांचे मध्यस्थीनें असें ठरलें कीं, रशियानें मांचुरिया प्रांतांत आपल्या आगगाडीचे संरक्षणास जरूर तेवढेंच सैन्य ठेवावें; आणि मांचुरिया व कोरिया देशांवर इतर कोणत्याही प्रकारचें स्वामित्व सांगूं नये किंवा तेथील अंतर्व्यवस्थेंत ढवळाढवळ करूं नये.' पण रशियासारखें बलाढ्य राष्ट्र असल्या शाब्दिक दबकावणीस थोडीच भीक घालणार! मांचुरियन रेल्वे तयार होतांच रस्त्याच्या संरक्षणाच्या मिषानें रशियन सैन्य वाढूं लागलें; आणि त्या सैन्यास राहण्याकरितां बराकी बांधण्याची सुरवात झाली. शिपायांची संख्या नियमित ठरली नसल्यानें मांचूरिया व कोरिया प्रांत रशियन सैनिकांनीं फुलून गेले, आणि त्यांच्या दराऱ्यानें त्या प्रांतांतील अंतर्व्यवस्थेंतही ढवळाढवळ होऊं लागली. तेव्हां पूर्वी शिष्टाई करावयास आलेल्या इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी व अमेरिका या राष्ट्रांस जपाननें रशियाची ही कृति कळवून तिचा प्रतिकार करण्यास पाचारिलें. पण स्वतःचा कार्डीमात्र फायदा नसतां केवळ जपानचे हितासाठीं एक यूरोपियन राष्ट्र दुसऱ्या यूरोपियन राष्ट्राशीं लढेल ही गोष्ट असंभवनीय होय. या मध्यस्थ राष्ट्रांनीं रशियास सामोपचारानें आपलें सैन्य परत नेण्यास सांगितलें; पण रशिया कसला खमंग त्यानें त्यांच्या बोलण्याकडे लक्षच दिलें नाहीं. चीनच्या बलाची परीक्षा त्यास पूर्वीच झाली होती. असल्या क्षुल्लक कारणास्तव युरोपियन राष्ट्रें कांहीं आपणाविरुद्ध शस्त्र धरीत नाहींत ही खात्री. मग एकट्या जपानसारख्या चिमुकल्या व कालच्या राष्ट्रास कोण दाद देणार? आपल्याशीं दोन हात करण्याची जपानची काय प्राज्ञा आहे

अशा घमेंडींतच रशियन मुत्सद्दी गर्क होते. पण 'गर्वाचें घर खालीं' या ह्मणीचा त्यांस लवकरच प्रत्यय यावयाचा होता.

इतर राष्ट्रें कांहीं रशियाला मांचूरीया सोडून देण्याबद्दल नेट लावीत नाहींत असें पाहून जपाननें ता. ६ फेब्रुवारी १९०४ रोजीं सामोपचारानें बोलणें सोडून देऊन आपल्या वकिलास परत बोलाविलें. ता. ८ फेब्रुवारी रोजीं रात्रौ जपानी आरमारावरील अधिकारी टोगो यानें पोर्ट आर्थर बंदरांतील रशियन जहाजावर हल्ला करून युद्धास प्रारंभ केला. ता. ८ व ९ या दोन दिवसांत रशियाची तीन ३ लढाऊ जहाजें व सहा क्रूझरें, यांचा नाश झाला. ता. १९ फेब्रुवारी पावेतों एकंदर अकरा गलबतें बुडालीं आणि बाकी राहिलेलीं पोर्ट आर्थर बंदरांत अडकून राहिलीं. त्यास बाहेर येण्यास वाट राहिली नाहीं. त्याचप्रमाणें ल्हाडिव्हास्टॉक बंदराचाही कोंडमारा करण्यांत आल्यानें समुद्रांत जपानचें वर्चस्व स्थापित झालें, आणि ल्याओटंग द्वीपकल्पांत जपानी सैन्य उतरूं लागलें. त्या सैन्याचे पाय किनाऱ्यास लागल्यापासून त्याला यालू नदीला पोंहोंचण्यास दोन महिने लागले.

ता. २६ एप्रिलपासून यालू नदी उतरून परतीरावरील रशियन सैन्यावर चालून जाण्याची तयारी नेटानें होऊं लागली. ता. १ मे रोजीं खुष्कीवरील पहिली निकराची लढाई झाली. तींत रशियन सेनेचा पुरा मोड होऊन ती मागें हटली. जपानची फते झाल्याचें वर्तमान ऐकून आशिया खंडांतील सर्व लोकांस अतिशय आनंद झाला. आज अनेक शतकें जगांत पहावयास सांपडला नाहीं असा चमत्कार ता. १ मे १९०४रोजीं यालू नदीवर घडून आल्याचें श्रवण करून सर्व एशियाटिक लोकांचें अंतःकरण थरारून गेलें. यापूर्वी युरोपियन व एशियाटिक यांचा सामना झाला कीं, पहिल्याचा जय व दुसऱ्याचा पराजय हें ठरू-

नच गेलें होतें. पण यालूचे लढाईत भातखाऊ आणि वामनमूर्ति जपानी शिपायांनीं, उत्कट देशाभिमानानें प्रेरित होऊन, जर्मनी तोफा व बंदुका आणि जपानी शास्त्रज्ञानें शोधून काढलेली भयंकर दारू, यांचे साहाय्यानें रशियासारख्या प्रबळ यूरोपियन राष्ट्राचे धिप्पाड शिपायांस धुळींत लोळवून सर्व जगास थक्क केलें; आणि आशिया खंडाचें नांव राखिलें.

पोर्ट आर्थर व व्लहाडिव्हास्टाकचा कोंडमारा आणि यालु नदीवरील पराभवाचें वर्तमान ऐकून रशियाच्या झारचें काळीज चर्र झालें. रशियास आशियाखंडांत आजवर पराजय कधींच ठाऊक नव्हता. त्यामुळें आपलें सैन्य व आरमार अजिंक्य आहे अशी त्याची समजूत झाली होती; पण आतां तद्विपरीत प्रकार ऐकतांच त्याचें मन उद्विग्न झालें. तथापि अहंकारानें भरलेल्या त्याच्या अंतःकरणांत निराशेस फार वेळ अवकाश मिळाला नाहीं.

रशियन राष्ट्राचा विस्तार जरी अफाट आहे तरी त्या मानानें सोईचा समुद्रकिनारा फारच थोडा आहे. उत्तरेकडील आर्क्टिक महासागर नेहमीं बर्फानें आच्छादित असल्यानें जहाजांच्या हालचालीस तो निरुपयोगीच होय. दक्षिणेस काळासमुद्र आहे, परंतु त्यांतील गलबतांस बाहेर पडण्यास बास्फोरस व दार्दनेल्सच्या सामुद्रधुनखेरीज इतर मार्ग नाहीं. इंग्लंडच्या कावेबाजपणानें 'तुर्कस्थानशीं लढाई चालूं नसेल तर या सामुद्रधुन्यांतून परकी लढाऊ जहाजें जाऊं नयेत असें इ. स. १८४०, १८५६ व १८७१ सालच्या तहांत ठरून' त्यांची नाकेबंदी झाली आहे. त्यामुळें रशियन सरकारास वाटेल त्या ठिकाणीं नेतां येण्याजोगें आरमार काय तें बाल्टिक समुद्रावरीलच होय. ह्मणून पोर्ट आर्थरचें आरमार निरुपयोगी होतांच, झारनें बाल्टिक आरमार

पसिफिक महासागरांत पाठवून तेथील जपानी आरमाराचा फन्ना उडविण्याचा आणि कोरियांतील जपानी फौजेस कोंडण्याचा निश्चय केला. खुष्कीवरून सायबेरियन रेल्वेनें रशियन सेनापतीस सैन्याची कुमक झपाट्यानें होऊं लागली. पण सेंटपीटर्सबर्गहून मांचूरिया सहा हजार मैल अंतरावर आणि जपान देश तर कोरियाला अगदीं लगत. त्यामुळें जपानचा जोंपर्यंत समुद्रावर वर्चष्मा आहे तोंपर्यंत खुष्कीवरील जपानी शिपायांस पायबंद बसणें कठीण आणि त्यांचा मोड होणें दुरापास्त; हें जाणून बाल्टिक समुद्रांतून पोर्ट आर्थरकडे आरमार रवाना करण्याची निकड लाविली.

बाल्टिक आरमार पूर्वेकडे पाठविण्याचें ठरल्यापासून तेथील सर्व बंदरांत जहाजांची जमवाजमव व दुरुस्ति चालू झाली. हें जंगी आरमार जुलै महिन्यांतच रशियन बंदरांतून बाहेर पडावयाचें होतें. पण ६०।७० गलबतें १५।२० पंधरा वीस हजार मैल अंतरावर लढाईचे तयारीनें पाठवावयास हा अवधि अगदीं अल्प होता. झारचे निकडीचे हुकूम येत पण कारागिरांची दिरंगाई चालूच होती. अशा रीतीनें जून, जुलै दोन महिने निघून गेले. इकडे पोर्ट आर्थरवर खुष्कीवरून हले होऊं लागले. तेव्हां रशियन ॲडमिरल स्क्रिडलॉफ यानें बंदरांतील जहाजें दुरुस्त करून व वाट बंद करण्याकरितां बुडविलेल्या बोटी काढून टाकून व्लाडिव्हास्टाककडे जाण्याचा निश्चय केला. ता० १० आगष्ट रोजीं रशियन आरमारानें जपानी लढाऊ जहाजांची फळी फोडून जाण्याचा प्रयत्न केला. स्क्रिडलाफजवळ ६ सहा लढाऊ जहाजें, ४ क्रुझरें, व कांहीं आगमासे होते. हें आरमार बाहेर पडतांच पोर्ट आर्थरचे आग्नेयीस २५ मैलांवर जपानी ॲडमिरल टोगोनें त्याजवर हल्ला केला. ही धावती लढाई सुमारें दोनप्रहर चालून

रशियाचीं चार गलबतें, चीन, जर्मनी वगैरे तटस्थ राष्ट्रांचे बंदरांत पळून गेलीं. बाकीचीं जहाजें नाइलाजास्तव परत पोर्ट आर्थर बंदरांत आलीं. परकी बंदरांत शिरलेल्या जहाजांस तेथल्या अधिकाऱ्यांनीं निःशस्त्र केलें आणि युद्ध संपेपर्यंत तीं गलबतें तेथेंच पाडून ठेविलीं. रशियन लोकांस लढाईचे कामीं तीं यापुढें असून नसल्याप्रमाणेंच झालीं. याप्रमाणें बाल्टिक आरमार युरोपांतून निघण्याचे पूर्वीच ॲडमिरल टोगोनें पूर्वेकडील राशियन जहाजांचा विध्वंस केला आणि त्यायोगानें आपल्या जहाजांची दुरुस्ती करण्यास व खलाशांस विश्रांति देण्यास त्यास सवड मिळाली.

इकडे जमिनीवरील युद्धांत जपानची सरशी होऊन त्यांचें पाऊल सारखें पुढें पडत होतें. ता० २६ आगष्टपासून एक आठवडाभर ल्याओटंग येथें तुंबळ रणकंदन होऊन जपानी वीर विजयी झाले. रशियन सैन्याचा भयंकर संहार होऊन राहिलेलें सैन्य मुकडेनपावेतों मागें हटलें.

झारनें फार निकड लावल्यामुळें ता. १२ सप्टंबर रोजीं बाल्टिक आरमार क्रुन्स्टाड बंदरांतून बाहेर पडण्याचें ठरलें. पण नांगर उचलून निघण्यापूर्वी वरील बारा इंची तोंडाच्या तोफा उडवून त्यांच्या गोळीबाराचा अनुभव पाहण्यांत आला. परंतु तेवढ्या धडाक्यानें त्यांतील बरींच जहाजें खिळखिळीं झालीं. त्यामुळें तो काफिला लिबो बंदरांत दुरुस्तीकरितां गेला. शेवटीं ता. ४ आक्टोबर रोजीं झारनें ॲडमिरल रोझडेव्हेंटस्की यास पूर्व आशियाकडे जाण्यास निरोप दिला, व तो २८ अठ्ठावीस जहाजांचा पहिला काफिला घेऊन निघाला. ता. १९ आक्टोबरला डेन्मार्क देशाला वळसा घालून हें आरमार उत्तरसमुद्रांत शिरलें.

क्रुन्स्टाड बंदरांतून हीं गलबतें निघण्याच्या पूर्वीपासूनच 'जपानी-लोक आगमाशांच्या माऱ्यानें ह्या आरमाराचा वाटेंतच नाश करणार आहेत' अशी बातमी पसरली होती. आरमारांतील खलाशी बहुतेक नवशिके असल्यानें या बाजार गप्पांनीं ते आधींच घाबरून गेले होते. त्यांतून कांहीं खलाशी दारू पिऊन तर्र झालेले. अशा स्थितींत हें आरमार हल्ल बंदराच्या बाजूनें जात असतां, तेथें वाटेंत सुमारें १५० दीडशे मच्छमारी बोटी त्यास दिसल्या. कंसास ज्याप्रमाणें जळीं, स्थळीं, काष्टीं, पाषाणीं कृष्ण दिसत होता त्याप्रमाणें ॲ. रोझडेस्टव्हेन्स्कीला जेथें तेथें जपानी टार्पेडो बोटींचीच भ्रांति होत होती. ह्मणून ह्या मच्छमारी बोटी दिसूं लागतांच त्या आपल्या शत्रूच्याच असाव्यात असा तर्क करून त्यांजवर त्यानें तोफांचा धडाका सुरू केला. त्यायोगानें तीन बोटी बुडाल्या. ८।१० कोळी ठार व ३०।३५जखमी झाले. ता. २१ रोजीं असा प्रताप गाजवून दोन दिवसांनीं तें आरमार डोव्हरला पोचलें; व तेथून झपाट्यानें इंग्लिश खाडींतून फ्रान्सच्या वायव्य दिशेनें अटलांटिक महासागरांत शिरलें. ता. २६ आक्टोबरला स्पेनमधील व्हिगो-बंदरांत येऊन तें दाखल झालें.

इकडे इंग्लंडांत हल्ल येथील रशियन खलाशांच्या घोर कृत्याची बातमी कळतांच सारा देश हालून गेला. इंग्लिश लोक अतिशय चवताळून गेले; आणि रशियाशीं एकदम लढाई सुरू करावी अशा सूचना होऊं लागल्या. त्यावेळीं बाल्टिक आरमार इंग्लिश खाडींतच असतें तर कदाचित् ही गोष्ट निकरावर आली असती. पण तें तर केव्हांच इंग्लंडच्या हातावर तुरी देऊन व्हिगो बंदरांत दडी मारून बसलें. तेव्हां रशियन सरकाराकडे याचा खुलासा मागवून पोकळ धमकी देण्यावांचून इंग्लंडचे हातीं कांहीं राहिलें नाहीं. अर्थात् या प्रकरणाची कमिशन-

मराठी ... दा. क. .....

मार्फत चौकशी होऊन त्याच्या निकालाप्रमाणें उभयतांनीं वागावें असें रशियाच्या संमतीनें ठरलें. हें कमिशन पारिस येथें बसून त्यानें 'रामाय स्वस्ति, रावणाय स्वस्ति' असा गुळचट निकाल दिला. नाहीं म्हणावयास इंग्लंडला नुकसानीबाबत ६५ हजार पौंड मिळाले.

कमिशनचा निकाल कळेपर्यंत रशियन जहाजांना पुढें जाऊंच देऊं नये असा ब्रिटिश राष्ट्रांचा मानस होता. परंतु कोणाच्याही दबकावणीस न जुमानतां चार रशियन अधिकाऱ्यांस मागें व्हिगो येथें ठेवून ॲ. रोझडेस्टव्हेन्स्की हा आपला काफिला घेऊन भूमध्य समुद्रांतून पुढें चालता झाला. जातां जातां वाटेंत एका फ्रेंच बोटीवरही त्यानें असाच मारा केला. तेव्हां ही ब्याद एकदांची निघून जाऊंदे, असें होऊन सुवेझच्या कालव्यांत मोठा बंदोबस्त ठेवून त्यास पुढें लावून दिलें. तांबड्या समुद्रांतीक जिबुटिल बंदरांत कांहीं दिवस नांगर टाकून तीं जहाजें मादागास्कर बेटास येऊन पोंचलीं. बाल्टिक आरामाराचा दुसरा एक भाग आफ्रिकेला वळसा घालून यावयाचा होता त्याची वाट पहात व इतक्या दूरच्या प्रवासानें नादुरुस्त झालेलीं जहाजें दुरुस्त करण्याकरितां मादागास्कर बेटानजिक तो कित्येक दिवस राहिला.

तेथें नांगर टाकून राहिल्यापासून त्या आरमारांत रशियांतून सारखी गलबतांची भर पडत चालली. जानेवारी महिन्यांत दुसरा काफिला मादागास्कर येथें येऊन दाखल झाला. झारनें दक्षिण अमेरिकेंतून ६ कोटि रुबल देऊन आठ लढाऊ जहाजें खरेदी केलीं. त्याजवर निबो गेटाफ यास अधिकारी नेमून त्याची रवानगी करून दिली.

बाल्टिक आरमारांतील बिनीचीं गलबतें मादागास्करपर्यंत येतात न येतात तोंच जपाननें पोर्ट आर्थर सर केलें. रशियन अधिकाऱ्यांनीं

तत्पूर्वीच बंदरातील जहाजें फोडून जाळून नाहींशीं केल्यानें जपानच्या हातीं लागलीं नाहींत. पण पोर्ट आर्थरसारखा भयंकर बळकट किल्ला हस्तगत केल्यानें त्याचे शौर्याची चोहोंकडे वखाणणी होऊं लागली, आणि बाल्टिक आरमाराला त्या बंदराचा आधार नाहींसा झाल्यानें आतां व्लाडिव्हास्टाकला जाण्याखेरीज गत्यंतर राहिलें नाहीं. त्या कारणानें अॅ. रोझडेस्टव्हेन्स्कीचें काम अधिक दुष्कर व धोक्याचें झालें.

मादागास्कर बेटांतील सेंट मेरी बंदरांत नांगर टाकून राहिल्यापासून बाल्टिक आरमाराविषयीं खरी हकीकत कळेनाशी झाली. तेव्हां वर्तमानपत्राचे तर्कवितर्क व बाजार बातम्या सुरूं झाल्या. ता० ९ जानेवारीं रोजीं रशियन निशाणाचें जहाज सुवेरॉफ हें खडकांला लागून फुटल्याची बातमी निघाली; पण ती पुढें खोटी पडली. अॅ. टोगो याच्या हालचालीविषयींही अशाच संभवनीय, असंभवनीय बातम्या पसरूं लागल्या. जपानी लोकांनीं मात्र आपल्या बातम्या गुप्त राखण्याची या वेळीं कमाल केली. पोर्टआर्थर जवळील लढाईची कामगिरी बजावून पुढील मसलत ठरविण्याकरितां अॅ. टोगो टोकिओला आला आणि मिकाडोचा निरोप घेऊन परत आपल्या जहाजावर आला. त्यानंतर तो कोठें गेला, त्याच्या हालचाली काय काय चालल्या होत्या व पुढील लढाईचा त्याचा बेत काय ठरला, हें सुशिमाची लढाई होऊन जाईपर्यंत जगास कळलें नाहीं.

बाल्टिक आरमाराचा दुसरा काफिला जानेवारीअखेर सुवेझ कालव्यांतून पार होऊन फेब्रुवारींत मादागास्कर बेटांतील मुख्य आरमारास मिळाला असावा. त्या वेळेपासून अॅ. रोझडेस्टव्हेन्स्की यानेंही आपल्या बेतांची व हालचालीची परिस्फुटता होऊं दिली नाहीं. त्यामुळें आज बातमी येई कीं, बाल्टिक आरमार इराणाकडे गेलें. दुसरे दिवशीं

कोणी कळवीत कीं, तें कोलंबोपावेतों येऊन थडकलें. उलट कोणी ह्मणत तें तांबड्या समुद्रांत परत गेलें.

आपल्यास आणखी मदत पाहिजे असें रोझडेस्टव्हेन्स्कीनें कळविल्यावरून ता० १५ फेब्रुवारी रोजीं तिसरा काफिला लिबो बंदरांतून निघाला, तो ता० २९ रोजीं फेब्रुवारी रोजीं डोव्हरनजीक आला. ता० ८ मार्च रोजीं मादागास्कर येथें जमलेलें आरमार घेऊन रशियन ॲडमिरल उत्तरेस फ्रेंचांच्या जिबुटिल बंदराला गेला. इकडे मांचूरियांत याच सुमारास मार्च आरंभापासून ता० ११ पर्यंत जपानी व रशियन सैन्याचा घनघोर संग्राम झाला. त्यांत रशियन सैन्याचा 'न भूतो न भविष्यति' असा नाश झाला. एकंदर दोन लाख शिपाई मयत, जखमी, कैद किंवा नापत्ता झाले, आणि शत्रूच्या पांचशें तोफा जपानी लोकांनीं पाडाव करून घेतल्या. बंदुका, दारूगोळा, याची लूट मिळाली त्याची गणतीच नाहीं.

मुकडेनच्या पराजयानें रशियन सैन्याचा फडशा पडून खुर्कीवर जय मिळण्याची झारची आशा समूळ नष्ट झाली. रशियानें तह करून निष्कारण होणारी प्राणहानि बंद करावी अशा सूचना होऊं लागल्या. बाल्टिक आरमारही पूर्वेस न येतां उत्तरेस जिबुटिलकडे वळलें. तेव्हां रशियाचा तह करण्याचा विचार ठरला असा कित्येकांनीं तर्क केला. पण ॲ. रोझडेस्टव्हेन्स्की हा केवळ जरूर तेवढीं जहाजें बरोबर घेऊन तांबड्या समुद्रांतून येणाऱ्या तिसऱ्या काफिल्यास आणण्यास गेला होता; असें मागाहून कळविण्यांत आलें. मादागास्कर बेटासमीप ॲ. रोझडेस्टव्हेन्स्की हा इतके दिवस राहिला, त्याचीं खरीं कारणें वेगळींच होतीं. त्याला आपलें आरमार कमकुवत आहे असें वाटत असल्यामुळें तो झारला अधिक जहाजें पाठविण्याविषयीं विनवणी करीत होता. परंतु

ती गोष्ट थोडक्या अवधींत साध्य होण्याजोगी नसल्यानें झारनें उलट त्यास जमलेल्या तेवढ्याच आरमारानिशीं जपानकडे जाण्यास सक्तीनं लिहिलें; पण त्याचे खलाशी बेपर्वाईनें वागूं लागले. जपानशीं लढण्यास जाणं म्हणजे आपली मृत्युमुखांत आहुतीच आहे हें जाणून कांहा तरी खुसपट काढून परत फिरण्याचा त्यांचा विचार होता. पण झारचा निकडीचा निरोप आल्यानें एकदाचें मादगास्कर बेट त्यांनीं सोडलें.

आपल्या हालचालीची परिस्फुटता होऊं न देतां ॲ. रोझडेस्टव्हेन्स्की हा जो निघाला तो थेट फ्रेंच कोचीन चायनापैकीं आनाम प्रांताचे किनाऱ्यास येऊन कामरानच्या आखातांत ता० १५ एप्रिल १९०५ रोजीं दाखल झाला. त्याच्या काफिल्यास चोवीस तासाहून अधिक वेळ बंदरांत राहूं दिल्यानें फ्रान्सनें तटस्थवृत्तीचा भंग केला. याकरितां इंग्लिशांनीं तहाचे शर्तीप्रमाणें आपले मदतीस यावें असें जपाननें टुमणें लाविलें. तेव्हां इंग्लिशांच्या मध्यस्तीवरून फ्रेंच प्रधान एम. डेक्कासे यानें या अनाहूत पाहुण्यास आनामच्या किनाऱ्याजवळून घालवून देण्याचें कबूल केलें. पण रशियन अधिकारी फारच निर्गर्दट. त्यानें मे महिन्याच्या प्रारंभीं निबोगेटॉफचा काफिला येईपर्यंत कामरानचें आखात सोडलें नाहीं. मात्र फ्रान्सच्या तटस्थवृत्तीचा भंग होऊं नये म्हणून मधून मधून कामरानचें आखात आणि हैनान बेट यांचे दरम्यान तें आरमार येरझारा घालीत होतें.

जपानी आरमाराची बातमी कोणासच कळली नव्हती. ॲ. टोगो हा फोर्मोसाबेट आपल्या रणक्षेत्राचा पाया करणार आहे, अशी गुणगुण होती. पण खुद्द टोगो अगर त्याचें आरमार कोठें आहे व त्याच्या गलबतांची संख्या किती आहे याचा पत्ताच नव्हता. युद्धाचे प्रारंभीं जपानचीं सहा मोठीं लढाऊ जहाजें होतीं. त्यांतील हॅटस्यूस

नांवाचें एक जहाज ता० ११ मे १९०४ रोजीं पोर्ट आर्थर नजीक सुरुंग लागून बुडालें. बाकी पांचापैकीं याशिमा जहाजही त्याच सुमारास सुरुंगांच्या धडाक्यानें नादुरुस्त झालें किंवा बुडालें असावें असा संशय होता. त्याबद्दल नक्की वर्तमान कोणासच कळलें नव्हतें. तथापि अॅ. टोगोजवळ चारच लढाऊ जहाजें राहिलीं असावीं असा बहुतेकांचा तर्क होता. बाल्टिक आरमारांत लढाऊ जहाजें ११ होतीं व एकंदर गलबतांची संख्या सुमारें सत्तर होती. दर्या-युद्धांत लढाऊ जहाजावरच काय ती भिस्त असल्यानें संख्येच्या मानानें पाहतां रशियन आरमार जवळ जवळ तिप्पट होतें ह्मणण्यास हरकत नाहीं. ह्मणून जपानला या समुद्रावरील लढाईंत यश येईल अशी खात्री वाटत नव्हती. पण अॅ. टोगो व त्याच्या आरमारावरील खलाशी यांस स्वशक्तीची खात्री असल्यानें त्यांनीं लढाईचा बेत पूर्वीपासून ठरवून ठेवला होता व ते बेफिकीर होते.

शेवटीं निबोगेटाफचें आरमार येऊन पोहोंचलें आणि यापुढें फ्रेंच बंदरांत राहणें शक्य नाहीं असें पाहून अॅ. रोझडेस्टव्हेन्स्की हा मे महिन्याच्या अखेरीस चिनी समुद्रांतून पासिफिक महासागरांत शिरला. जपान व कोरिया यांचेमधून सुशिमा बेटाजवळून थेट उत्तरेस जावें, अगर फासिफिक महासागरांतून जपान डाव्या बाजूस टाकून उत्तरेच्या दिशेनें व्हाडिव्हास्टॉकला दाखल व्हावें, याखेरीज तिसरा मार्ग रशियन आरमारास नव्हता. यांतील पहिला मार्ग धोक्याचा परंतु शक्य होय. कारण एवढ्या मोठ्या आरमाराला जपानला वळसा घालून जाणें शक्य व सुरक्षित नव्हतें. फ्रेंच बंदरांतून तर हकालपट्टी झालेली; कोळशाचा पुरवठाही बेताचाच असल्यानें इतक्या वळशाचा मार्ग आक्रमिणें दुर्घट; बरें हप्त्या हप्त्यानें जहाजांची रवानगी करावी, किंवा अर्धें आरमार

बाशोच्या खाडींतून व बाकीचें जपानच्या पूर्वेकडूनें पाठवावें तर आपण होऊन आपलें बळ कमती केल्याप्रमाणें होणार आणि शत्रूच्या आयतेंच भक्ष्यस्थानीं पडण्यास कारणीभूत होणार. यदाकदाचित् जपानला वळसा घालून जाण्याचें धाडस केलें तरी त्याचा काय उपयोग? एवढा फेरा घेऊन जपानचे उत्तरेस पोहचून व्लहाडिव्हास्टॉककडे वळणार तोंच जपानी आरमार मधल्या जवळच्या वाटेनें येऊन दत्त म्हणून पुढें उभें राहणार. मग दूरच्या प्रवासानें नादुरुस्त झालेल्या जहाजानिशीं लढाई द्यावयाची; त्यापेक्षां कडेकोट तयारी करून धडाक्यासरसें थेट व्लहाडिव्हास्टाकपर्यंत जावें. वाटेंत जपानी आरमार आडवें येणार हें ठरलेलें. त्यास भक्ष्य म्हणून कांहीं किरकोळ जहाजें त्यांच्या तोंडावर ठेवावीं आणि साधल्यास त्यांचीं कांहीं गलबतें बुडवून पुढें निघून जावें. एकदां व्लहाडिव्हस्टॉक बंदर गांठलें म्हणजे जपानी आरमारास त्रास देण्याला व कोरिया, मँचूरियाशीं त्यांचें दळणवळण बंद पाडण्याला मुळींच अवकाश लागणार नाहीं." असा एकंदर साधकबाधक गोष्टींचा विचार करून रोझडेस्ट व्हेन्स्कीनें सुशिमाचे सामुद्रधुनींतूनच पुढें जाण्याचा निश्चय केला. ॲ. टोगोनें दूरदृष्टीनें हें पूर्वीच ताडलें होतें. सबब तो तेथें आपल्या तयारीनिशीं होता.

जपानला वळसा घालण्याची हुलकावणी दाखविण्याला कांहीं जुनीं निरुपयोगीं गलबतें पूर्वेच्या बाजूस पाठवून ता. २६ मे १९०५ रोजीं रशियन ॲडमिरल आपल्या मुख्य काफिल्यासह उत्तरेस निघाला. स्वतःच्या हालचाली गुप्त ठेवण्यांत जपानी लोक जितके निष्णात तितकेच हेरांकडून शत्रूच्या बातम्या काढण्यांत ते तरबेज होते. रोझडेस्टव्हेन्स्कीचा मोर्चा उत्तरेकडे वळतांच टेहेळणी करणाऱ्या कुझरांनीं ती बातमी बिन तारेनें ॲ. टोगोस कळविली. तत्क्षणींच आपण लढाई-

वर जात असल्याचें मिकाडोस कळवून आपल्या लढाऊ जहाजांसह ॲ. टोगो सासेबो बंदरांतून निघाला. या ठिकाणीं तो चार महिने आपल्या आरमारासह असून त्याची वार्ता कोणास कळली नव्हती.

रशियन आरमार फोर्मोसा बेटास डावीकडे टाकून बाशी नामक सामुद्रधुनीतून बाहेर पडलें व कोरियाच्या सामुद्रधुनीकडे येऊं लागलें. ॲ. टोगोनें बाल्टिक आरमारास वेढण्याची तजवीज योजून ठेविली होती. ॲ. कामिमुरा यांस कांहीं क्रूझरें बरोबर देऊन त्यानें पुढें रवाना केलें. बाल्टिक आरमार दृष्टीस पडतांच कामिमोरानें घाबरून बाजूस निघून जाण्याचें मिष केलें. रोझडेस्टव्हेन्स्कीस शत्रूचा पाठलाग करण्यास सवड नव्हती. यास्तव आपला रस्ता मोकळा सोडून शत्रूचें आरमार बाजूस निघून गेल्याचें पाहतांच तो झपाट्यानें पुढें निघाला. पण यामुळें आपणासाठीं पसरून ठेवलेल्या जाळ्यांत आपण सांपडत आहों हें त्याच्या लक्षांत आलें नाहीं. सुशिमाचे सामुद्रधुनीजवळ तो जातो न जातो तोंच कामिमुराचीं क्रूझरें उलट खाऊन त्याचा पाठलाग करूं लागलीं. पुढच्या बाजूस ॲ. टोगो हा आपल्या लढाऊ जहाजासह सज्ज होताच. डाव्या व उजव्या बाजूकडून क्रूझरें व आगमासे यांचा काफिला रशियन आरमारासमीप येऊं लागला.

याप्रमाणें रशियन आरमाराला चोगीर्दे घेरून टाकून टोगोनें लढाईस सुरवात करण्याविषयीं इशारत दिली. 'जपान देशाचें भावी वैभव या लढाईचे परिणामावर अवलंबून आहे; यासाठीं तुह्मी सर्वजण आपल्या मर्दुमकीची शर्थ कराल असा मीं भरंवसा बाळगतों.' असा उत्साहजनक निरोप त्यानें आपल्या हाताखालील लोकांस खुणेनें कळविला.

जपानी आरमाराचा शत्रूवर हल्ला सुरू झाला त्यावेळीं दाट धुकें पडलें होतें. त्याकारणानें समुद्रावरील दूरदूरचीं गलबतें दिसण्याची मुष्कील

होतीं. वारा सुटून समुद्र खवळून गेला होता. दोन्ही आरमारें सुशिमा बेटाच्या आग्नेयीस ओकोशिमा नांवाच्या द्वीपसमूहाजवळ येऊन भिडतांच ॲ. टोगो याच्या लढाऊ जहाजांनीं रशियन आरमारावर तोफांचा भयंकर भडिमार सुरूं केला. रशियन गलबतावरून त्यास प्रत्युत्तरही मिळूं लागलें. दोनप्रहरीं दोन वाजेपर्यंत उभयपक्षांकडून सारख्याच नेटानें मारा होत होता; पण जपानी गोलंदाज आपल्या कामांत तरबेज व त्यांच्या तोफा दारुगोळा वगैरे सामुग्रीही जय्यत होती. त्यावेळीं समुद्र तुफान होता; पण टोगोचा दूरदर्शीपणा विलक्षण असल्यानें तुफान समुद्रांत गलबतें डुलत असतांनासुद्धां गोळा अचूक मारण्याची तालीम त्यानें आपल्या गोलंदाजांस पूर्वीच देऊन ठेविली होती. त्याचा यावेळीं त्यास चांगला फायदा मिळाला. जपानी तोफांतून सुटलेला एकही गोळा वाया जात नसे. रशियन खलाशी व गोलंदाज हे नवशिके होते. त्यांचे गोळे समुद्रांत पडून जात, जपानी आरमारापर्यंत पोंचत नसत. कांहीं तोफांचीं तोंडे उंच केलीं होतीं, त्यांतील गोळे जपानी जहाजावरून जाऊन पलीकडे पडत. शिवाय रशियन गलबतावरील दारू चांगली उडत नसे.

तोफांचा दणका सुरू झाल्यावर शत्रूंचा अचूक मार पाडून रशियन खलाशी व गोलंदाज घाबरून गेले. त्यांतील कित्येकांनीं तो मार चुकविण्याकरितां समुद्रांत उड्या टाकल्या. दोन वाजल्यापासून दारुगोळा संपल्यामुळें असो किंवा जपानी गोलंदाजांच्या अचूक व भयंकर भडिमारापुढें टिकाव न धरवल्यामुळें असो, रशियन आरमारांत धांदल उडाली. संध्याकाळच्या सुमारास तर त्यांत इतकी अव्यवस्था होऊन गेली कीं, सर्व जहाजांनीं मिळून एकजुटीनें शत्रूच्या माराचा प्रतिकार करणें अशक्य झालें. याप्रमाणें लढाई सुरू झाल्यापासून एक दोन प्रहरच्या आंतच ॲ. टोगोची खात्री झाली कीं आपण लढाई जिंकली.

आतां रशियाचीं किती जहाजें हातीं लागतात, बुडतात किती, व निसटून किती जातात एवढाच कायतो प्रश्न राहिला.

सूर्य मावळून काळोख पडतांच ॲ. टोगोनें आपल्या असंख्य टार्पेडो बोटी बाल्टिक आरमारावर सोडिल्या; आणि मोठ्या लढाऊ जहाजांनींही त्यांजवर मारा चालू ठेविला. शिवाय बाल्टिक आरमाराचे वाटेवर पाण्याखालील सुरुंग पेरून ठेविलेच होते. त्यायोगानें रशियन खलाशांची त्रेधा तिरपीट उडाली. एकीकडून तोफांचा भडिमार, दुसरीकडे आगमाशांची झोड, पळून जावें तर अकस्मात् सुरुंग लागून जलसमाध मिळावयाची. अशा रीतीनें जपानी लोकांनीं रात्रभर त्यांचा पिच्छा पुरविला. सूर्योदय झाल्यावर रशियन आरमाराची फाटाफूट व पांगापांग झाल्याचें दृष्टोत्पत्तीस आलें. तेव्हां त्यांचा पाठलाग करण्याचें काम जपानी क्रूझरांनीं चालविलें. ही पळती लढाई रविवार अहोरात्र व सोमवार दोन प्रहरपर्यंत चालली होती. ओकोशिमा बेटापासून जपानी समुद्राचे मध्यें लिऑन कोर्ट नांवाचे खडक आहेत तेथपर्यंतच्या तीनशें मैलांच्या टापूंत ही धांवपळ सुरू होती. या धांदलींत कोणाची वार्ता कोणास नाहीं अशी स्थिति झाली. ता० २७ शनिवारीं रात्रीं प्रथम जपानी टॉर्पेडो बोटींनीं हल्ला केला. तो असह्य झाल्यामुळें रशियन ॲ. एक्सिस्ट हा कांहीं जहाजांसह जो निसटला तो फिलिपाईन बेटांतील मॅनिला बंदरीं जाऊन राहिला. खुद्द ॲ. एक्सिस्ट यांस जबर जखम लागली होती आणि त्याच्या जहाजांच्या फनेली मोडल्यामुळें तीं नादुरुस्त झालीं होतीं. तटस्थ राष्ट्रांच्या हद्दींत हीं गलबतें गेल्यानें अमेरिकन सरकारच्या हुकुमावरून तीं निःशस्त्र करून लढाई संपेपर्यंत अडकवून ठेवण्यांत आलीं.

जपानी गोलंदाज शत्रूच्या जहाजावर मारा करीत तो त्यावरील एंजिनाच्या खोलीवर करीत. त्या तोफेच्या धडाक्यानें एकवार एंजिन

नादुरुत झालें कीं तें गलबत हस्तगत झाल्याप्रमाणेंच झालें. कारण मग त्यास मागें किंवा पुढें कोणीकडेच जाण्याची शक्ति रहात नसे. अशा रीतीनें त्यांनीं शत्रूचीं कित्येक गलबतें पाडाव केलीं. मोठ्या लढाऊ जहाजावर तोफांच्या गोळ्याचा परिणाम विशेष होत नसल्यानें त्याजखालीं जलांतःसंचारी होड्या सोडून त्या गलबतांना भोंकें पाडण्यांत आलीं. शिवाय आगमाशांनीं तर प्रळयच करून सोडिला होता. पण सर्वांत अत्यंत आश्चर्याची गोष्ट ही कीं, या शत्रूनौकाविध्वंसक भिन्न-भिन्न साधनांपैकीं कोणच्या साधनाचा उपयोग अधिक झाला हें जगास त्यांनीं मुळींसुद्धां कळूं दिलें नाहीं.

रशियन लढाऊ जहाजांपैकीं निकोलस जहाज शनिवारच्या लढाईंतच उपडें होऊन बुडालें. बोरोडिनो व आलिम्पिया यांस टॉर्पेडो बोटींनीं आग लावून दिली. समुद्राच्या तळास किती जहाजें व गलबतें गेलीं याचा पत्ताच नाहीं. ॲ. रोझडेस्टव्हेन्स्की हा प्रथम सुवेरॉप जहाजावर होता. पण जपानी खलाशांनीं जलांतःसंचारी बोट त्याचे खालीं सोडून तें जहाज धडाक्यानें उडवून दिलें. तें बुडण्यापूर्वी रोझडेस्टव्हेन्स्की हा आपल्या हाताखालील अधिकाऱ्यांसह दुसऱ्या जहाजावर गेला. तेव्हां जपानी लोकांनीं त्याचा पाठलाग करून तोफेच्या मारानें तेंही जहाज खिळखिळें करून टाकिलें. त्यावेळीं त्यांतून उतरून तो बीबोव्ही बोटीवर गेला; परंतु ती बोटही शत्रूच्या हातीं लागल्यामुळें तो लष्करी कैदी झाला. त्यास सासेबो बंदरांतील दवाखान्यांत पाठविण्यांत आलें. रोझडेस्टव्हेन्स्की याच्या कपाळावर, दंडावर, दोन्ही पायांवर व पाठीवर अशा पांच जखमा होत्या. ॲ. निबोगेटॉफ हाही जखमी होऊन शत्रूचे तावडींत सांपडला. त्यालाही त्याच दवाखान्यांत ठेविलें होतें.

याप्रमाणें दोन दिवस लढाई होऊन रशियाच्या सर्व आरमाराचा फडशा पडला. जपानच्या चिमुकल्या आरमारानें रशियाच्या प्रचंड आरमाराचा केवळ अठ्ठेचाळीस तासांच्या अवधींत पुरा विध्वंस करून सोडला. त्या आरमारांत ११ लढाऊ जहाजें, क्रूझरें व इतर गलबतें मिळून संख्या सत्तरांवर होती. याशिवाय टार्पेडो बोटी व जलांत संचारी होड्या किती होत्या याचा पत्ताच नाहीं. या सर्व गलबतांवर मिळून सुमारें तेवीस हजार खलाशी होते. त्यांतील १४ हजारांस जलसमाधि मिळाली; ६ सहा हजार कैद झाले, आणि बाकीचे तीन हजारांचा पत्ता लागला नाहीं. जपानचे केवळ ८०० लोक ठार अथवा जायबंदी झाले. लढाऊ जहाजें, क्रुझरें व टार्पेडो विनाशक बोटी यांस धक्कासुद्धां लागला नाहीं. फक्त तीन टॉर्पेडो बोटी बुडाल्या. ॲ. टोगो याचें जहाज मिकासा हेंच प्रथम अघाडीस असल्यानें तें बरेंच नादुरुस्त झालें. पण एकही जहाज बुडालें किंवा निकामी झालें नाहीं. खुद्द ॲ. टोगो हा युद्धाच्या अवलीपासून अखेरपर्यंत सर्वत्र नजर ठेवीत व हुकूम देत होता. तो दुर्बिणींतून युद्धाचें निरीक्षण करीत असतां एक तोफेचा गोळा येऊन त्याच्या नजीकच्या कंपासपेटीवर आदळला. त्या पेटीचे राई राई एवढे तुकडे झाले. पण ॲ. टोगो यास कांहींही दुखापत झाली नाहीं. दुय्यम ॲडमिरल मिसु यास मात्र एक लहानशी जखम झाली. जपानच्या झालेल्या नुकसानीशीं रशियाच्या हानीची तुलना केली असतां जमीनअस्मानचें अंतर दृष्टीस पडतें. रशियाच्या एकंदर लहान मोठ्या सत्तर गलबतांपैकीं पांच सहा गलबतें कशीं बशीं व्लाडिव्हास्टाकला जाऊन पोहोंचलीं. युद्धाचा प्रारंभ झाल्याबरोबर जो ॲ. एक्रिस्ट फिलीपाईन बेटांस पळून गेला त्याजबरोबर पांच सहा किरकोळ जहाजें मॅनिला बंदरांत जाऊन अमेरिकेच्या तावडींत सांपडलीं. दोन जंगी लढाऊ जहाजें, पांच क्रूझरें आणि कित्येक टार्पेडो

बोटी जपानच्या हस्तगत झाल्या. याखेरीज इतर सर्व जहाजांनीं समुद्राचा तळ पाहिला. रशियाचें सर्वस्वी नुकसान झालें, आणि जपानशीं तह करून लढाई संपविण्याखेरीज दुसरा मार्गच राहिला नाहीं या तहानें कोरिया प्रांत जपानच्या वर्चस्वाखालीं आला, मांचुरिया चीनला परत मिळाला, अर्धं सायालिन बेट जपानच्या ताब्यांत आलें, आणि पाडाव झालेल्या कैद्यांच्या खर्चामोबदला व मुक्ततेसाठीं म्हणून बरीच मोठी रक्कम रशियास भरावी लागली. पोर्ट आर्थरसारखा भयंकर किल्ला रशियाचे ताब्यांतून जपानकडे आल्यानें जपान, कोरिया व चीन या देशांच्या दारांतील एक मोठें अरिष्ट दुरावलें.

इंग्लंडच्या समुद्रांत मच्छीमारी बोटीवरील निरुपद्रवी कोळ्यांची कत्तल झाल्यावेळीं, 'हें बाल्टिक आरमार जपानच्या तडाक्यांत सांपडतांच कागदाच्या नावाप्रमाणें महासागराच्या तळीं जाईल, असें भविष्य एका जर्मन लेखकानें केलें होतें. तें ॲ. टोगो यानें अक्षरशः खरें करून दाखविलें. पोर्ट आर्थरच्या पहिल्या हल्ल्यापासून तों मुकडेनच्या घनघोर रणसंग्रामापर्यंत रशियाचे नशिबीं सारखा अपजयच लागला होता; पण या अपयशानें झारचा कांहीं धीर खचलेला दिसला नाहीं. मुकडेनच्या लढाईत दोन लक्ष सैन्य गडप झालें, तर त्याच्या जागीं चार किंबहुना जरूर लागल्यास दहा लक्ष सैनिक पाठविण्यास रशिया समर्थ व तयार होता. जपानला सहज चिरडून टाकूं अशी रशियन लोकांची घमेंड मुकडेनच्या पराभवानंतरही कायमच होती; पण बाल्टिक आरमार नामशेष झाल्यानंतर ती सर्व घमेंड पार लयाला गेली. ज्या लढाऊ जहाजांनीं समुद्राचा तळ पाहिला, किंवा जीं जपानच्या अंकित झालीं, त्यांच्या ऐवजीं दुसरीं जहाजें तयार करणें अति खर्चाचें व कालावधीचें काम होय. तोंपर्यंत समुद्रावर जपानचें

वर्चस्व राहणार हें निश्चित झालें. जपानी लोकांस एवढा मोठा विजय कसा मिळाला हें एक जगाला कोडेंच पडलें आहे. रशियन जहाजांस जलसमाधि देण्याच्या कामीं तोफा, सुरुंग, किंवा आगमासे यांतून कशाचाही उपयोग जपाननें केला असो; ज्या ठिकाणीं रशियन आरमाराकरितां जाळें पसरून ठेविलें होतें, तेथेंच त्यास युक्तीनें नेऊन अॅ. टोगोनें त्याचा सर्वतोपरी फडशा पाडला, व आपल्या मातृभूमीस युरोपियन राष्ट्रांच्याही सन्मानास पात्र करून ठेविलें ही गोष्ट निर्विवाद आहे.

अलीकडील लढाया, मग त्या समुद्रावर होवोत वा जमिनीवर होवोत यंत्रकलेच्या साहाय्यानें होत असतात. हीं यंत्रें कोणतीं व त्यांचें सहाय्य केव्हां कसें घ्यावें याचा यूरोपियन राष्ट्रांस बालाभ्यासच आहे. त्या योगानें युरोपियन राष्ट्रांनीं आजवर आशिया खंडांतील राष्ट्रांवर जय मिळविले. त्या जयानें फुगून जाऊन, आपले जय यंत्रसामर्थ्यानें नव्हत तर स्वशौर्यानें होतात असें तीं मानूं लागलीं. पण आतां तो भ्रम पूर्णपणें दूर झाला. अर्वाचीन शास्त्रीय शोधांनीं जीं जीं घातुक हत्यारें तयार झालीं आहेत तीं उपयोगांत आणून आपल्यापेक्षां दुप्पट युरोपियन आरमाराची किंवा सैन्याची धुळधाण उडविण्यास पौर्वात्य राष्ट्रें समर्थ आहेत हें जपाननें ढळढळीतपणें जगाचे प्रत्ययास आणून दिलें. जपानच्या या धाडशी कृत्यानें जगाच्या इतिहासांत पुढें जो फरक पडणार आहे त्याचें पूर्णस्वरूप आज लक्षांत येणें कठीण आहे. तथापि एवढी गोष्ट निश्चित आहे कीं, पूर्वेकडून पश्चिमेकडे गेलेली मुसलमानांची लाट फ्रान्स देशांत 'टूर्स' येथें थप्पड खाऊन आल्यामुळें, यूरोपचा नकाशा, इतिहास व धर्म यांत जसा फरक पडला तसा किंबहुना त्याहूनही जास्त महत्त्वाचा परिणाम आशिया खंडावर या सुशिमाचे लढाईनें होणार. तो कोठें,

कसा, व केव्हां हें आज निश्चयानें सांगतां येणं शक्य नाहीं. पण पाश्चात्यांची पूर्वेकडे वहात आलेली लाट परत फिरली हें निर्विवाद आहे. आशिया खंड हें गोऱ्या राष्ट्रांकरितां ईश्वरानें एक सुपिक कुरण निर्माण केलें आहे, ही समजूत आतां पार बुडाली. एशियाटिक लोकांस न पुसतां आशिया खंडांत हुतुतु घालण्याचे दिवस आतां गेले. सुशिमाच्या लढाईनें ही जी मोंठी क्रान्ति घडवून आणली, त्याबद्दल सर्व आशिया खंड जपानचें ऋणी आहे. आशिया खंडाच्या अभ्युदयाचा सूर्य आज कोठें नुकता क्षितिजावर आलेला आहे. तो पुढें कोठवर वर चढतो याचा अंदाज आज करणें कठिण आहे. परंतु ऐतिहासिकदृष्ट्या विचार करतां हा लवकरच मध्यान्हीं येऊन आपल्या किरणांनीं सर्व आशिया खंडभर जागृति उत्पन्न करील असा रंग दिसतो.

उपसंहार.

मॅरेथॉन ते सुशिमाअखेर १६ लढायांचा ह्याप्रमाणें संक्षिप्त इतिहास आहे. क्रीसी साहेबाच्या पुस्तकांत वाटर्लूपर्यंतच्या पंधराच लढाया असल्यानें तो ग्रंथ एका अर्थीं अपुराच होता; त्यांत सुशिमाच्या लढाईची भर पडून तो आतां पुरा झाला आहे. कारण त्यायोगानें जगाचे चक्रनेमिक्रमांतील एक फेरा पूर्ण झाला. मॅरेथॉनच्या लढाईत बलाढ्य पर्शियन राष्ट्राचा पराजय होऊन आशिया खंडाचा भाग्यरवि पश्चिम समुद्रांत अस्ताचलास गेला, तो सुशिमाच्या लढाईतील जपानच्या विजयानें पूर्व समुद्रांतून पुनरपि उदित झाला असें ह्मणण्यास प्रत्यवाय नाहीं. अर्थात् ह्या दरम्यानच्या काळांत युरोप खंडांत सुधारणा-रवि तळपत असून एशिया खंडाच्या बहुतेक भागांत अज्ञानांधकार पसरला: होता. ह्मणूनच प्रस्तुत कालांतील सर्व क्रांतिकारक लढायांत युरोपियन लोकांनीं एशियाटिकांचा पराजय केल्याचीच रडकथा आहे. अखेरची सुशिमाची लढाई मात्र त्यास अपवादात्मक आहे. मॅरेथॉनची लढाई इ. स. पूर्वी ४९० वे वर्षी झाली; त्यानंतर २३९४ वर्षांनीं अथवा ठोकळ मानानें पाहतां २४०० चोवीसशें वर्षांनीं युरोपिअन सैन्यानें एशियाटिक शिपायापुढें पळ काढला. मध्यंतरींच्या काळांत दर एक लढाईत पाश्चात्याचाच जय होत होता असा कांहीं प्रकार नाहीं. कांहीं किरकोळ चकमकींत तद्विपरीत प्रकार घडून आला आहे; परंतु त्यांत महत्त्वाची चिरपरिणामी अशी एकमुद्धां लढाई नाहीं. शिकंदरनें डरायसचे आणि रोमन लोकांनीं मिडीडेटसचे राज्याची परिसमाप्ति केल्यानंतर बऱ्याच वर्षांनीं हूण लोकांनीं फ्रान्स देशापर्यंत आणि तदनंतर आरबांनीं पिरिनीज पर्वतापर्यंत दौड मारिली; परंतु चेलान्स

आणि टूर्स ह्या लढायांत त्या उभयतांच्या प्रगतीस कायमचा विरोध झाला. तेराव्या शतकाच्या प्रारंभीं तार्तर लोकांचा दिग्विजयी पुढारी बातुखान ह्यानें रशिया देश पादाक्रांत करून तेथें आपल्या गादीची स्थापना केली; परंतु त्याची सत्ता दोन तीन शतकांहून अधिक काल टिकली नाहीं. त्यानंतर तुर्क लोकांनीं उचल खाल्ली आणि इ. स. १४५३ त कान्स्टंटिनोपलच्या तटावर त्यांचा अर्धचंद्र फडकूं लागला. ह्या तुर्क लोकांची चढती कमान सुमारें १६८० पावेतों होती; परंतु व्हिएन्नाच्या वेढ्यांत व लेपँटोच्या दर्यायुद्धांत त्यांना जी थप्पड मिळाली तेव्हांपासून त्यांचें आजवर आंत पाऊलच आहे. एवंच इ. स. पूर्वी ५०० वर्षांपासून तों सांप्रतच्या विसाव्या शतकापावेतों पैर्वात्य राष्ट्रांपैकीं इराणी, हुणिश, आरबी, तार्तर, मोंगल व तुर्क लोकांनीं पाश्चात्यांवर प्यादेमात करण्याचे जितके प्रयत्न केले तितके सर्व अखेर निष्फळ झाले. अठराव्या शतकापासून तर पाश्चात्यांची चढती कळा सारखी चालूच आहे. ही जी युरोपिअनांची टोळधाड आज दोनशें वर्षें आशियाखंडावर लोटत आहे, तिच्या प्रतिकाराचा ओनामा सुशिमाच्या लढाईनें घालून दिला. ह्मणूनच मॅरेथानच्या लढाईस आशिया खंडाच्या भाग्यरवीचा अस्त ह्मटल्यास सुशिमाच्या लढाईला त्याचा उदय ह्मटलें पाहिजे. तेव्हां अर्थात्च क्रीसी साहेबांनीं वर्णिलेल्या मॅरेथान ते सुशिमापर्यंतच्या पंधरा लढाया आशिया खंडाच्या काळरात्रींत लढल्या गेल्यानें त्यांत पैर्वात्यांचा पराक्रम दृग्गोचर होण्याला कोठेंच अवकाश मिळाला नाहीं. ही उणीव सुशिमाच्या लढाईनें भरून काढून युरोपिअन सुधारणेचे सोळा संस्कार पूर्ण केले. एवढ्याच कारणावर क्रीसी साहेबांचा ग्रंथ अपुरा होता तो आतां पुरा झाला असें वर ह्मटलें आहे.

प्रस्तावनेंत दिलेल्या क्रांतिकारक लढाईच्या व्याख्येवरून पाहतां जगाच्या सुधारणेस आजवर ज्या ज्या राष्ट्रांचें साहाय्य झालें त्या त्या

राष्ट्रांच्या इतिहासांतील निदान एक एक तरी लढाई ह्या पुस्तकांत यावयाला पाहिजे होती. प्राचीनकालीं सुधारणेचा ओघ भरतखंड, असीरिया, इजिप्त, ग्रीस, रोम, स्पेन, फ्रान्स ह्या अनुक्रमानें पश्चिमेकडे गेला, असें मत युरोपखंडाच्या सुधारणेचा इतिहास लिहिणारे ड्रेपर आणि गिझो ह्यांनींही प्रतिपादिलें आहे. त्यावरून सर्व जगाचे सुधारणेस आदिकारण अशा भरतभूमींतील सुधारणौघास ज्यामुळें इष्ट वळण लागलें अशा एखाद्या चिरपरिणामी क्रांतिकारक लढाईचा समावेश ह्या ग्रंथांत होणें अवश्य होतें. परंतु भारतवासीयांच्या दुर्दैवानें तसा विश्वसनीय प्राचीनेतिहास उपलब्ध नाहीं. तीच शोचनीय स्थिति असीरिया आणि इजिप्त ह्या देशांची आहे. त्यामुळें साहजिकच ग्रीस देशाला अग्रपूजेचा मान मिळून जगांतील क्रांतिकारक लढायांची सुरवात मॅरेथॉनच्या रणयज्ञापासून झाली. मॅरेथॉनच्या विजयापासून ग्रीक सुधारणेचा पाया घातला गेला. तस्मात् त्या लढाईच्या महत्त्वाविषयीं भिन्नमत होण्याचा संभव नाहीं. एकाद्या राष्ट्राचें अस्तित्व जर जगाच्या हिताहिताच्या दृष्टीनें महत्त्वाचें असेल तर त्या राष्ट्रास नामशेष करणारी लढाईसुद्धां एका अर्थीं क्रांतिकारकच म्हटली पाहिजे. परंतु साधारणतः एका राष्ट्राचा अस्त हा दुसऱ्या राष्ट्राच्या उदयाचें पूर्व चिन्हच असतो. असा संबंध ज्या ठिकाणीं असेल तेथें विजयगिरीवर आरूढ होऊं इच्छिणाऱ्या देशाच्या उत्कर्षास जी लढाई कारणीभूत असेल तिचा निर्देश केला म्हणजे झालें; पूर्वीच्या राष्ट्राच्या वैभवाचा अस्त करणारी लढाई तीपुढें कमी योग्यतेची ठरणार हें उघड आहे. ह्या तत्त्वास अनुसरून पाहतां क्रीसी साहेबांनीं दिलेली दुसरीच म्हणजे सॅरेक्यूजची लढाई अतिव्याप्ति दोषास पात्र ठरते. सॅरेक्यूजच्या वेळ्यांत अथीनियन राष्ट्राचें वैभव अस्ताचलास गेलें खरें; परंतु त्यामुळें आणि त्याचकालीं रोमन राष्ट्र पुढें सरसावलें असें म्हणतां येत नाहीं. रोमच्या साम्राज्याचा पाया मेटॉरसच्या

लढाईनें दृढ केला गेला. तेव्हां त्या लढाईविषयीं कोणीं आक्षेप घेऊं शकणार नाहीं. अरबेलाच्या लढाईनें पूर्वी अर्धवट ढासळलेलें पर्शियन साम्राज्य पूर्णपणें लयाला गेलें आणि आशिया खंडाच्या गुलामगिरीला प्रारंभ झाला. विन्फील्डच्या लढाईनें रोमन साम्राज्याची वाढ खुंटली आणि ट्यूटॉनिक जातीच्या लोकांच्या पायांतील दास्यशृंखला कायमची तुटून पडली. त्यायोगानें पुढें ट्यूटॉन्स व सॅक्सन्स ह्यांना जगभर हुतुतु घालण्याला अवसर मिळाला. चॅलान्सच्या लढाईनें हूण लोकांसारख्या रानदांडग्यांचे तावडींतून युरोपखंडाची मुक्तता झाली आणि मध्यकालीन सुधारणेच्या बीजावरील संकट टळलें ह्मणून ती लढाई क्रांतिकारक गणली जाण्यास हरकत नाहीं. त्यानंतरची क्रांतिकारक लढाई ट्रूर्स येथील होय. ह्या लढाईस राजकीय महत्त्वापेक्षां धार्मिक महत्त्वच अधिक आहे. ख्रिस्त्यांचा क्रूस आणि महंमदीयांचा अर्धचंद्र ह्या दोहोंतून युरोपखंडावर कोणचें निशाण फडकत रहावें ह्याचा मुसलमानांना प्रतिकूल असा निकाल ट्रूर्स येथें लागला. ह्या लढाईत अरब लोकांना विजयश्रीनें वरिलें असतें तर ख्रिस्तीधर्माची मुंडी मुरगळली जाऊन आजकाल फ्रान्स, जर्मनी, इंग्लंड वगैरे देशांतून लांब लांब दाढीवाले निमाज पढतांना दिसून आले असते. तेव्हां ख्रिस्ती धर्माच्या दृष्टीनें तर ही लढाई क्रांतिकारक आहेच; पण तिचें राजकीय महत्त्वही अगदींच दुर्लक्ष्य करण्याजोगें नाहीं. कारण धार्मिक मतांतराबरोबर युरोपचीं राजकीय मतेंही बदलून गेलीं असतीं, आणि व्यक्तिस्वातंत्र्याच्या कल्पनेचा बीमोड होऊन आज जी प्रजासत्ताक अगर नियंत्रित राजसत्ताक राज्यपद्धति दिसून येते तिचा लोप बाल्यावस्थेतच झाला असता. हेस्टिंग्जच्या लढाईनें जगांत कोणती कामगिरी बजाविली हें ताडणें कठिण आहे. व्यक्तिदृष्ट्या इंग्लिश राष्ट्राचें जरी त्यामुळें कोटकल्याण झालें असलें तरी इतर देशांना त्याचें काय होय? परंतु केवळ मूळ प्रेरकार इंग्रज असल्यानें त्यानें ही लढाई क्रांतिकारक लढा-

यांत घुसडून दिली आहे. आर्लीन्सच्या वेढ्यांत फ्रेंचांचा मोड झाला असता तर फ्रेंचराष्ट्र नामशेष झालें असतें. परंतु त्याबरोबरच इंग्लंडचें आणि पर्यायेंकरून युरोपखंडांचें अहित झालें असतें. कारण फ्रान्स देश इंग्लंडच्या राजाच्या पुरा ताब्यांत आल्यावर भिकारड्या इंग्लंडच्या राजधानीला कायमचा रामराम ठोकून पारीस राजधानींतून इंग्लिश राजांनीं आपला बादशाही अम्मल गाजविण्याला सुरवात केली असती. मग कोठची पार्लमेंट आणि कोठची नियंत्रित राजसत्ता! स्पॅनिश आरमाराचा जो इंग्लिश नाविकांनीं पुरा मोड केला त्याचें महत्त्व टूर्स लढाईप्रमाणेंच अर्धवट राजकीय तर अर्धवट धार्मिक आहे. टूर्सच्या समरभूमीवरील झगडा अर्धचंद्र आणि क्रूस यांचे दरम्यानचा होता; पण स्पॅनिश लोकांशी इंग्लिश खाडींत झालेली चकमक ख्रिस्ती धर्मांतीलच जुन्या व नव्या पक्षाची होती. स्पेनच्या विजयानें प्रोटेस्टंट धर्म ठार बुडाला असता आणि कॅथलिक धर्माच्या शिरजोरपणानें युरोपखंडास धार्मिक गुलामगिरीबरोबर राजकीय दास्यही पत्करावें लागलें असतें; 'इक्विझिशन' सारख्या धर्मसभांचा सुळसुळाट होऊन पाद्री भटांचें स्तोम माजलें असतें; अर्वाचीन शास्त्रें व कला यांच्या प्रसारास तेणेंकरून जबरदस्त अडथळा आला असता, आणि भौतिक शास्त्रांतील आश्चर्यकारक शोध जगाचे नजरेसमोर आलेच नसते. ब्लेन्हीमच्या लढाईनें चवदाव्या लुईच्या अनावर राज्यतृष्णेस आळा बसला आणि युरोपखंडांतील लहानसहान देश फ्रेंच साम्राज्यांत गडप होण्याचें टळलें. तथापि ही लढाई क्रांतिकारक गणण्याइतकी महत्त्वाची नाहीं हें उघडच आहे. आतां इंग्रज इतिहासकार जें या लढाईला महत्त्व देतात तें एका विशिष्ट तत्त्वाकरितां होय. तें तत्त्व म्हणजे राज्यसत्तेचा समतोलपणा (Balance of power) हें होय. युरोपखंडांत कोणतेंही एकादें राष्ट्र प्रबळ होऊन शेजारचे चिमुकले देश गट्ट करूं इच्छील

तर त्यास विरोध करण्याला इतर प्रमुख राष्ट्रें एकजुटीनें तयार असतात. अशारीतीनें कोणतेंही एक राष्ट्र वाजवीपेक्षां अधिक बलाढ्य झाल्यानें इतर राष्ट्रांच्या जीवितास अपाय होऊं नये ह्मणून या 'समतोलपणा' चे तत्त्वाविषयीं कांहीं नियम ठरविलेले आहेत. ते नियम झुगारून देऊन बेलज्यम, हॉलंड, इटली, स्पेन, पोर्तुगाल, जर्मनींतील कांहीं संस्थानें, आणि स्पॅनिश वसाहती हे सर्व प्रदेश आक्रमिण्याचा १४ व्या लुईनें सपाटा चालविला. ब्लेन्हीमच्या लढाईत त्याचीं हाडें खिळखिलीं झालीं नसतीं तर त्याचा हा हेतु सिद्धीस जाऊन बेलजियम, हॉलंडसारखे चिमुकले देश आपल्या स्वातंत्र्यास मुकले असते. आतां ह्यावर असा एक आक्षेप येण्याचा संभव आहे कीं, उपरिनिर्दिष्ट राष्ट्रांस पारतंत्र्य प्राप्त होऊन व्यक्तिशः त्यांचें कितीही नुकसान झालें तरी त्यावर युरोपखंडाचें अथवा जगाचें कोणतें कल्याण अकल्याण अवलंबून होतें? परंतु ह्या आक्षेपाचा परिहारही उघडच आहे. जगांत जी कांहीं प्रगति, सुधारणा, किंवा घडामोड होत असते ती सर्व भिन्नत्वावर अवलंबून आहे. कल्पना करूं कीं, यक्षिणीच्या कांडीनें उद्यांपासून सर्व जगतीतलावर एकच साम्राज्य स्थापिलें गेलें तर ही परिस्थिति शक्य असली तरी प्रगतीच्या दृष्टीनें इष्ट आहे काय? इष्ट नाहीं असाच जबाब ह्यावर आला पाहिजे. जगाची मुळीं उत्पत्ति व स्थितिच भिन्नपणावर (द्वैतावर) अवलंबून आहे. भिन्न भिन्न राष्ट्रांत चढाओढ अथवा चुरस नसेल तर सगळ्या जगाची स्थिति डबक्यांत सांचलेल्या पाण्याप्रमाणें होऊन तत्काल बिघडून जाईल. असो. ह्यावरून प्रस्तुत एवढेंच ध्यावयाचें कीं, चवदाव्या लुईच्या वेळीं अथवा नेपोलियनच्या वेळीं सर्व युरोपखंड जर फ्रान्सच्या साम्राज्यांत सामील झालें असतें, तर सुधारणेच्या गतीला तो एक प्रतिबंधच झाला असता. असला अनिष्ट प्रकार टळला ह्मणून ब्लेन्ही-

मच्या लढाईची गणना क्रांतिकारक लढायांत केल्यास चालेल. पुल्टोवाच्या लढाईनें रशियाचे अभ्युदयास प्रारंभ झाला. युरोपांत व विशेषेंकरून आशिया खंडांत रशियाचा जो पुढें राज्यविस्तार झाला त्यास पुल्टोवा येथील विजयच कारणीभूत होय. सांप्रत रशियाचें साम्राज्य पृथ्वीच्या $\frac{१}{५}$ एकपंचमांश भागावर पसरलें आहे, आणि आशिया खंडाचा भावी इतिहास रशिया, इंग्लंड, आणि जपान ह्या तीन राष्ट्रांच्या बलाबलावर अवलंबून आहे, ही गोष्ट लक्षांत घेतां पुल्टोव्हाच्या लढाईचें खरें महत्त्व तत्काळ मनांत बिंबतें. यानंतरची क्रांतिकारक लढाई 'साराटोगा' ची होय. ह्या लढाईनें अमेरिकेंतील 'संयुक्त संस्थानें' स्वतंत्र झालीं. अमेरिकन लोकांच्या दृष्टीनें तर ही लढाई महत्त्वाची आहेच; त्याजविषयीं वाद नाहीं; पण जगाचे इतिहासास त्यामुळें कोणतें वळण लागलें आणि जगाचें ह्यांत कोणतें हित साधलें असा प्रश्न कित्येक करितात. ते ह्मणतात 'अमेरिका खंडांत इंग्लिशांनीं जाऊन वसाहती केल्या. त्या वसाहतींवर इंग्लंडचें सार्वभौमत्व होतें. त्या सार्वभौमत्वाचें चिन्ह ह्मणून प्रत्येक वसाहतीवर गव्हर्नरची नेमणूक इंग्लंडहून होत असे, व सैन्यावरील अधिकारीही तेथूनच येत असत. इतर सर्व अंतर्व्यवस्था वसाहतवाल्यांचेच हातीं होती. आतां अमेरिका स्वतंत्र झाली ह्मणजे काय? तर इंग्लंडहून तेथें गव्हर्नर व सेनापति जावयाचे बंद झाले एवढेंच कायतें. ह्यांत जगाचें हिताहित काय झालें आणि साराटोगाच्या लढाईला महत्त्व तरी कशाबद्दल द्यावयाचें' ह्या आक्षेपास उत्तर हेंच कीं, कोणत्याही देशावर परकी अम्मल (मग तो कितीही अल्प प्रमाणानें असो) असेपर्यंत त्या देशांतील लोकांचें खरें बुद्धिवैभव प्रगट होत नाहीं. युनायटेडस्टेट्समध्यें आजकाल जो विद्या व कलाकौशल्य यांचा प्रसार झाला आहे व एडिसनसारखे विद्युच्छास्त्रज्ञ जे नवे नवे शोध लावीत आहेत तें सर्व स्वतंत्रतेचें फल होय. तीं संस्थानें

इंग्लंडच्या ताब्यांतच असतीं तर प्रस्तुतप्रमाणें अमेरिका खंड हें विद्येचें व सुधारणेचें माहेरघर बनलें असतें काय? यास प्रत्यंतर पहावयाचें असल्यास दूर जावयास नको. अमेरिका खंडांतच युनायटेड स्टेट्सच्या उत्तरेस कानडा प्रांत आहे. स्वातंत्र्य संग्रामांत हा प्रांत नानाविध कारणामुळें इंग्लंडला चिकटून राहिला. त्यामुळें तो अद्यापपावेतों इंग्लंडच्याच साम्राज्यसत्तेखालीं आहे. आतां हिंदुस्थानाप्रमाणें तेथें परकी अम्मल दुःसहही नाहीं अथवा येथल्याप्रमाणें विद्याप्रसारास तेथें अडथळाही नाहीं. संयुक्त संस्थानांतील हवापाण्याहून तेथील हवापाणी कांहीं वेगळें नाहीं व भूगर्भांतर्गत किंवा कृषिकर्मोद्भूत संपत्तीचीही तेथें वाण नाहीं. धर्माच्या अगर भाषेच्याही बाबतींत त्यांस कांहीं संयुक्त संस्थानापेक्षां अधिक अननुकूलता नाहीं. असें असून जगाचे इतिहासांत कानडाचें नांव येईल असें एक तरी महत्कृत्य तत्रस्थांचे हातून घडलें आहे काय? मुळींच नाहीं. उलट पक्षीं युनायटेडस्टेट्सकडे पहा. एकोणीसाव्या शतकांत जे जे नवीन शास्त्रीय शोध लागले त्यांतला बराच वांटा संयुक्त संस्थानांचा आहे. अमेरिकेंतील भौतिक शास्त्रांची प्रगति आणि तेथील अचाट कल्पनातीत प्रचंड कामें पाहून मन थक्क होऊन जातें, अ.णि हीं संस्थानें इंग्लंडच्याच पंखाखालीं आजवर राहिलीं असतीं तर त्यांचें बुद्धिवैभव असें झळकलें असतें काय असा प्रश्न उद्भवतो. कानडाच्या कर्तृत्वशक्तीवरून वरील प्रश्नाचें उत्तर काय येणार हें दिसतच आहे. तर हा सर्व प्रभाव साराटोगाच्या लढाईनें संपादन केलेल्या स्वातंत्र्याचा होय. शिवाय अमेरिकन संस्थानें स्वतंत्र झालेलीं पाहून फ्रान्स देशांत स्वातंत्र्यस्फूर्ति झाली व तेथें राज्यक्रांति होऊन सर्व युरोपखंडाचें राजकीय वातावरण बदलून गेलें; आणि राजाकडून अगर बड्या लोकांच्या हातून मध्यम व कनिष्ठ वर्गावर होणारा असह्य जुलम बंद झाला. ह्या सर्व राजकीय

क्रांतीचेंही श्रेय साराटोगाच्या लढाईसच दिलें पाहिजे. हीच कार्य-कारणपरंपरा थोडीशी अधिक लांबविल्यास आस्ट्रेलिया आणि ब्रान्सवॉल वगैरे वसाहतींना आज जीं स्वतंत्र पार्लमेंटें मिळालीं आहेत त्यांचेंही श्रेय पर्यायेंकरून ह्याच लढाईला द्यावें लागतें. ह्याखेरीज अमेरिका व इंग्लंड विभक्त झाल्यानें उभयतांच्या शक्तीची वाढच झाली, आणि अँग्लोसॅक्सन जातीचें कर्तृत्व वृद्धिंगत पावलें. आतां ह्या बळाचा दुरुपयोग होण्याचा संभव आहे हें कबूल केलें तरी तूर्त लोकसत्ताक राज्यपद्धति, आचार व विचारस्वातंत्र्य, विद्या व कलाकौशल्य आणि ज्ञानप्रसार ह्या सर्व बाबतींत अमेरिकाखंड हें सर्व जगास कित्ता घेण्याजोगें झालें आहे. ह्याकरितां साराटोगाच्या लढाईचा परिणाम वैयक्तिक अथवा एकदेशीय नसून सर्वगामी आहे हें उघड दिसून येतें.

आतां क्रीसी साहेबांनीं दिल्यापैकीं शेवटच्या व्हामी आणि वाटर्लू ह्या दोन लढाया राहिल्या. त्या दोहोंच्या महत्त्वाविषयीं विचार एकसमयावच्छेदेंकरूनच केला पाहिजे; कारण त्यांचा तसाच निकट संबंध आहे. व्हामीच्या लढाईत फ्रान्सनें आपलें खरें नवीन विराट स्वरूप प्रथमतः प्रकट केलें. राजघराण्याचा व बडे लोकांचा जुलूम आपण अतःपर सहन करणार नाहीं व तशी जबरदस्ती कोणी करूं लागल्यास त्यांचा समाचार घेण्याची आमचे अंगांत ताकद आहे हें फ्रेंच लोकांनीं प्रथमतः जगाच्या निदर्शनास आणून दिलें. ह्या लढाईत एवढेंच निष्पन्न झालें असतें तर ह्या लढाईचा परिणाम एकदेशीच गणला जाऊन जगाचे इतिहासांत तिला स्थान मिळालें नसतें. परंतु व्हामीच्या लढाईत फ्रान्सनें जय मिळवून आमचें स्वातंत्र्य राखण्याला आम्ही समर्थ आहों इतकेंच नव्हे, तर जे कोणी जुलमानें गांजलेले लोक दास्यशृंखला तोडून टाकण्यास उद्युक्त असतील त्यांना आम्ही साहाय्य करूं असें जगजाहीर

करून जुलमी सत्तेचें अस्तित्वच संशयांत पाडिलें. फ्रेंच लोकांचा हा जाहिरनामा प्रजेवर मनमानेल तशी झोटिंग पाच्छाई गाजविण्याला चटावलेल्या राजांना कसचा सहन होतो? त्यांनीं लगेच तत्प्रतिकारार्थ शस्त्र उपसलें; व आश्चर्य हें कीं, ज्या गांजलेल्या प्रजेच्या हितार्थ ह्मणून फ्रेंच लोकांचा हा प्रयत्न होता तेच जुलमानें त्रस्त झालेले निरनिराळ्या देशांतील प्रजाजन आपआपल्या जुलमी राजांस साहाय्य करण्याला तयार झाले. अशा रीतीनें फ्रेंच राज्यक्रांतीचा फायदा घेण्याच्या ऐवजीं फ्रेंच लोकांवरच पूर्वीची जुलमी राज्यपद्धति लादण्याचा विडा बहुतेक सर्व युरोपखंडानें उचलला. असल्या ह्या अमानुष प्रकाराचा प्रतिकार करण्याकरितां फ्रान्समधील एक अद्वितीय पुरुष पुढें सरसावला. हा अप्रतिम सेनानायक नेपोलियन बोनापार्ट होय. नेपोलियनचें युद्धकौशल्य पाहून तोंडांत बोट घालणार नाहीं असा वाचक दुर्मिळ. पण सर्व युरोपखंडच त्याजवर उलटल्यावर तो तरी किती टिकाव धरणार. प्रथमतः लिप्झिक येथें आणि अखेरीस वाटर्लूच्या रणांगणावर त्याचा पुरा मोड होऊन जो फ्रान्स देश व्हामीच्या लढाईनंतर इतर राष्ट्रास दास्यांतून मुक्त करण्याला चंग बांधून निघाला होता, त्याच फ्रान्स देशाचे कपाळी अप्रिय अशा बुर्बोन घराण्याचें जोखड जूं निमूटपणें सहन करण्याची पाळी वाटर्लूच्या पराजयानें आली. ह्मणजे व्हामीच्या लढाईनें फ्रान्सला व तद्द्वारा सर्व यूरोपखंडाला जें स्वातंत्र्य लाधलेंसें भासलें होतें तें वाटर्लूच्या लढाईनें तोंडचें काढून नेलें. असा ह्या दोन लढायांचा परिणाम परस्परविरोधी आहे. अर्थात् व्हामी अगर वाटर्लू ह्या दोहोंपैकीं एक लढाई जगास हितकारक तर दुसरी अहितकारक असली पाहिजे. आतां वाटर्लूची लढाई हितपरिणामी मानिल्यास स्वातंत्र्यापेक्षां दास्य श्रेष्ठ मानल्याप्रमाणें होईल. ह्याकरितां व्हामीची लढाईच जगाचे दृष्टीनें सुपरिणामी ह्मटली पाहिजे. पण हा इष्ट परिणाम चिरकाल न टिकतां

अल्पावधींतच अस्तंगत झाला म्हणून व्हामीच्या लढाईला गौणत्व प्राप्त होतें. अर्थात् कैमुतिक न्यायानें वाटर्लूची लढाई गौणतर ठरते, आणि क्रांतिकारक लढाईच्या व्याख्येप्रमाणें ती अतिव्याप्ति दोषास पात्र होते. आतां वाटर्लूचा रणसंग्राम हा इंग्लिश सैन्याच्या धैर्य, शौर्य व चिकाटी ह्या गुणांचें स्मारकच असल्यानें क्रीसीसारख्या अहंमन्य इंग्लिश गृहस्थानें ती लढाई आपल्या पुस्तकांतून वगळणें हें असंभवनीय आहे. ह्या ठिकाणीं हेंही सांगून ठेविलें पाहिजे कीं, कित्येकांच्या मतें नेपोलियननें आपल्या कारकीर्दीच्या अखेरीस ज्या ज्या लढाया मारल्या त्या त्या केवळ सद्धेतुप्रेरित नसून उलट परकी राष्ट्रांचें स्वातंत्र्य हिरावून घेण्याच्या दुष्ट बुद्धीनें आरंभिल्या होत्या. ह्याकरितां दुबळ्या राष्ट्रांस त्यांच्या कचाटींतून सोडविणें हें इंग्लंडसारख्या प्रबळ राष्ट्रांचें कर्तव्यच होतें; आणि वाटर्लूच्या लढाईमुळें सर्व युरोपखंड नेपोलियनच्या तावडींतून कायमचें सुटलें म्हणून ती लढाई महत्त्वाची होय. ह्या आक्षेपास उत्तर हेंच कीं, नेपोलियनच्या स्वभावाचें व हेतूंचें जें चित्र इंग्लिश लेखणींतून उतरलें आहे तें द्वेषमूलक आणि अतिशयोक्तिपूर्ण आहे.

असो. येणेंप्रमाणें मॅरेथॉन ते वाटर्लूअखेर प्रत्येक लढाईच्या योग्यायोग्यतेविषयीं चर्चा झाली. त्यांत सॅरेक्यूजचा वेढा आणि हेस्टिंग्जची लढाई ह्या दोन तर अगदींच टाकाऊ ठरतात. वाटर्लूविषयीं भिन्न भिन्न अभिप्राय पडणें शक्य आहे. बाकीच्या बारा लढायांविषयीं बहुतेक एकमत होईल असें वाटतें. शेवटची जी सुशिमाची लढाई तिच्या महत्त्वाविषयीं चर्चा करणेंच योग्य होणार नाहीं. आशिया खंडांतील लोकांस तो आपल्या अभ्युदयाचा पाडवाच वाटतो; एवढें सांगितल्यास पुरे आहे. आतां क्रीसीच्या पंधरा लढायांपैकीं ज्या दोन तीन अगदींच गौण ठरतात त्या लढाया ह्या प्रतिकृतींत वगळून टाकल्या

नाहींत असा एक प्रश्न उद्भवतो; परंतु क्रीसी साहेबांनींच आपल्या पुस्तकाच्या प्रस्तावनेंत कबूल केल्याप्रमाणें कोणाही दोघा इतिहासकारांचीं मतें सर्व लढायांविषयीं तंतोतंत सारखीं पडणें हें जर शक्य नाहीं, तर केवळ एकट्या भाषांतरकाराच्या मर्जीनुरूपच त्या लढायांस छाट देणें योग्य वाटलें नाहीं. शिवाय त्या लढाया वगळल्यानें ऐतिहासिक कार्यकारणपरंपरेच्या शृंखलेंत बराच दूरान्वय होण्याचा संभव असल्यानें आणि वादविषयीभूत लढायांच्या वर्णनापासून बराचसा बोध घेतां येण्याजोगा असल्यानें इतका चिकित्सेखोरपणा पतकरिला नाहीं. असो. क्रीसी साहेबांनीं कांहीं महत्त्वाच्या लढाया आपल्या पुस्तकांत न दिल्यानें तें पुस्तक अव्याप्ति दोषास पात्र झालें आहे त्याचा विचार काय असा एक प्रश्न संभवतो. ह्या लढाया बहुतेक सर्व आशिया खंडांतीलच आहेत; आणि मूळ पुस्तकाच्या मानानें पाहतां ह्या गाळलेल्या भागाचा विस्तार बराच होऊन त्याचा समावेश ह्या पुस्तकांतच केला असता तर 'मिय्या मूठभर आणि दाढी हातभर' असा प्रकार झाला असता. ह्यास्तव प्रस्तुतचें पुस्तक वाचकवर्गास पसंत पडून त्यांच्याकडून प्रोत्साहन मिळाल्यास 'जगांतील क्रांतिकारक लढायां' चा दुसरा भाग प्रसिद्ध करण्यांत येईल आणि त्यांत मुख्यत्वें करून आशियाखंडांतील लढायांचा समावेश केला जाईल. ईशकृपेनें तो योग लवकरच येईल अशी आशा करून हा उपसंहार संपवितों.

REFBK-0000382

